टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

इतिहास विभाग

तात्विक व सामाजिक शास्त्र विद्याशाखा अंतर्गत ' इतिहास ' विषयातील

विद्यावाचस्पती (पीएच. डी.) पदवीसाठी

सादर करण्यात आलेला प्रबंध

बार्शी तालुक्याचा आर्थिक इतिहास

(इ. स. १९४७ ते इ. स. १९९०)

संशोधक

श्री. बळीराम हणुमंत जाधव

मार्गदर्शक

प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील

मु. तुळशीनगर, पोस्ट. जामसंडे,

ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग

एप्रिल - २०१४

संशोधकाचे प्रमाणपत्र

मी **श्री. बळीराम हणुमंत जाधव** असे घोषित करतो की, **" बार्शी तालुक्याचा आर्थिक इतिहास " (इ. स. १९४७ ते इ. स. १९९०)** या विषयावरील हा प्रबंध तात्विक व सामाजिक शास्त्र विद्याशाखा अंतर्गत **' इतिहास '** विषयातील विद्यावाचस्पती (पीएच. डी.) या पदवीसाठी सादर करीत आहे.

सदर प्रबंध यापूर्वी या किंवा इतर कोणत्याही विद्यापीठास कोणत्याही पदवीसाठी सादर करण्यात आलेला नाही.

संशोधक

मार्गदर्शकांचे प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, टिळक महाराष्ट्र विद्यापीठामध्ये तात्विक व सामाजिक शास्त्र विद्याशाखा अंतर्गत ' इतिहास ' विषयातील विद्यावाचस्पती (पीएच. डी.) या पदवीसाठी **श्री. बळीराम हणुमंत जाधव** यांनी **" बार्शी तालुक्याचा आर्थिक इतिहास " (इ. स. १९४७ ते इ. स. १९९०)** या विषयावरील हा प्रबंध माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केलेला आहे.

सदर प्रबंधामध्ये त्यांनी नमूद केलेली माहिती व संशोधनात्मक विधाने ही माझ्या माहितीप्रमाणे बरोबर आहेत. यापूर्वी हा प्रबंध या किंवा इतर कोणत्याही विद्यापीठास कोणत्याही पदवीसाठी सादर करण्यात आलेला नाही.

मार्गदर्शक

प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील

ठिकाण :

दिनांक :

ऋणनिर्देश

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे यांनी मला सदर विषयामध्ये पीएच. डी. करण्याची संधी दिल्यामुळे सर्वप्रथम मी या विद्यापीठाचा ऋणी आहे. या विद्यापीठातील डॉ. विजय कारेकर (अधिष्टाता, सामाजिक शास्त्र विभाग) यांनी मला केलेल्या सहकार्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. तसेच डॉ. दिपक देशपांडे, डॉ. श्रध्दा कुंभोजकर, श्रीमती. वाते मॅडम, शिवाय या विद्यापीठातील पीएच. डी. विभागातील सर्व कर्मचाऱ्यांनी मला वेळोवेळी उत्तम सहकार्य केले. त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. **" बार्शी तालुक्याचा आर्थिक इतिहास " (इ. स. १९४७-१९९०)** हा शोधप्रबंध माझे मार्गदर्शक प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांच्या अचूक व बहुमूल्य मार्गदर्शनामुळेच मी पूर्ण करू शकलो, त्यांचे आभार मानण्याची औपचारिकता पाळण्याऐवजी मी त्यांच्या ऋणात राहणेच पसंत करीन. तसेच त्यांच्या सौभाग्यवती श्रीमती माधुरी पाटील यांच्या सहकार्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. माझ्या या संशोधन कार्याला अगदी प्रारंभीपासून डॉ. रविराज फुरडे व प्रकाश फुरडे यांनी मला सतत उत्स्फूर्त प्रोत्साहन दिले.

शिवाजी रात्र महाविद्याल सोलापूर येथील इतिहास विभाग प्रमुख डॉ. सोपानराव जावळे यांनी संशोधनासाठी वेळात वेळ काढून माझ्याबरोबर मुंबई, पुणे, कोल्हापूर येथील विविध ग्रंथालयामध्ये येण्याचे कष्ट घेतले. त्यामुळे त्यांचे आभार मानण्याच्या औपचारिकतेऐवजी मी त्यांच्या ऋणात राहणेच पसंत करीन. त्याचबरोबर पंढरपूरचे प्रा. डॉ. विकास कदम, प्रा. सौ. प्रमिला देशमुख, मोहोळचे प्रा. भारत जाधव, श्री. रमेश नारायणकर यांच्या सहकार्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

या संशोधनासाठी संदर्भ साधने मिळविताना आलेल्या अडचणी दूर करणारे सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार दिलीपरावजी सोपल, मा. नगराध्यक्ष श्री. योगेशजी सोपल, श्री. धनराज गरड, ॲड. राजेश उंबरदंड, विधानभवन ग्रंथालयातील श्री. बाबा वाघमारे यांनी मला मोलाचे सहकार्य केले.

त्याचबरोबर माझे जेष्ठ सहकारी श्री. अच्युत निंबाळकर, प्रा. संजय मुजमुले, प्रा. त्रिंबक कदम, प्रा. संजय शिंदे, प्रा. प्रशांत लोंढे, प्रा. आप्पासाहेब फुंदे, प्रा. सौ. वृषाली पाटील, प्रा. सौ. रेखा राऊत, सौ. सुनिता शेळके, श्री. कालिदास शेळके, अकबर अत्तार यांनी मला सतत प्रोत्साहन दिले.

मुंबई पुराभिलेखागार, मुंबई, अर्थ व सांख्यिकी संचालनालय बांद्रा-मुंबई, जणगणना कार्यालय मोहता मार्केट, चर्चगेट-मुंबई, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथालय पुणे, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र अभ्यासकेंद्र पुणे, सोलापूर जिल्हा परिषद, बार्शी टेक्सटाईल मिल बार्शी, बार्शी पंचायत समिती, कृषी उत्पन्न बाजार समिती बार्शी, सार्वजनिक वाचनालय बार्शी तसेच जिल्ह्यातील विविध ग्रंथालयातील व वाचनालयातील सर्व कर्मचारी, तालुक्यातील विविध बँकांचे शाखाधिकारी, डाळ उद्योजक यांनी मला उत्तम सहकार्य केले. माझ्या या वाटचालीत माझ्या पाठीशी सतत खंबीरपणे उभी असणारी माझी आई सौ. सुमन जाधव, माझे वडील श्री. हणुमंत जाधव, जेष्ठ बंधु श्री. संजय जाधव, श्री. प्रवीण जाधव, माझे मामा श्री. समाधान माने, तसेच माझे मित्र किरण गुरव, राजेश विधाते, महेश माने, सुदर्शन लिगाडे, बालाजी शिंदे, पुष्पराज यादव यांच्या सहकार्यामुळेच मी हे कार्य पूर्ण करू शकलो.

संशोधक

श्री. बळीराम हणुमंत जाधव

अनुक्रमणिका

अ. क्र.	प्रकरणाचे नाव	पृष्ठ क्र.
१	प्रस्तावना	५ ते ७१
२	बार्शी तालुक्याचा कृषी विकास	७२ ते ११६
३	कृषी उत्पन्न बाजार समिती बार्शी	११७ ते १६५
४	बार्शी तालुक्यातील प्राथमिक सहकारी शेती संस्था व बँका	१६६ ते २२१
५	आद्यौगिक विकास	२२२ ते २८०
६	उपसंहार	२८१ ते २९४
७	संदर्भ सूची	२९५ ते ३०४
८	छायाचित्रे	३०५ ते ३०७
९	परिशिष्टे	३०८ ते ३४७

नकाशांची यादी

अ. क्र.	नकाशांचे शीर्षक	पृष्ठ क्र.
१	दख्खन प्रांतातील बार्शी उपविभाग व सोलापूर	१
२	मुंबई प्रांतातील बार्शी उपविभाग व सोलापूर	२
३	इ. स. १९८१ पूर्वीचा सोलापूर जिल्हा	३
४	इ. स. १९८१ नंतरचा सोलापूर जिल्हा	३
५	इ. स. १९८१ पूर्वीचा बार्शी तालुका	४
६	इ. स. १९८१ नंतरचा बार्शी तालुका	४
७	बार्शी तालुक्याचा उस्मानाबाद जिल्ह्याला जोडलेला प्रदेश	२९
८	सोलापूर जिल्ह्यातील आठवडी बाजार	३७
९	कृषी उत्पन्न बाजार समिती बार्शी मुख्य आवाराचा नकाशा	१२४
१०	बार्शी बाजार समितीची ग्रामीण भावप्रसिध्दी योजना	१४८

आलेखांची यादी

अ. क्र.	आलेखांचे शीर्षक	पृष्ठ क्र.
१	बार्शी तालुक्याची लोकसंख्या	३०
२	बार्शी तालुक्यातील प्राथमिक सहकारी शेती संस्थेच्या सभासद संख्येतील वाढ	१८१
३	बार्शी तालुक्यातील प्राथमिक सहकारी शेती संस्थेच्या संख्येतील वाढ	१८२
४	बार्शी सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेची आर्थिक उलाढाल	२०२
५	बार्शी सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेच्या सभासद संख्येतील वाढ	२०३
६	बार्शी पेठेतील तेलबियांची किंमत	२६६

तक्त्यांची यादी

अ. क्र.	तक्त्यांचे शीर्षक	पृष्ठ क्र.
१)	बार्शी तालुक्यातील जंगल क्षेत्र	२८
२)	बार्शी तालुक्यातील आठवडी बाजार	३६
३)	सोलापूर जिल्हयातील नगरपालिकांचे उत्पन्न	४२
४)	सोलापूर जिल्हयातील तालुकानिहाय गावांची संख्या	५३
५)	वैराग गोळीबारातील हुतात्म्यांची नावे	५६
६)	बार्शी तालुक्याचे लोकप्रतिनिधी	६५
७)	बार्शी तालुक्यातील शेतकरी व शेतमजूर	७५
८)	बार्शी तालुक्यातील भूमी उपयोजन	७७
९)	तालुक्यातील बागायती व जिरायती क्षेत्र	७९
१०)	बार्शी तालुक्यातील गळीताचे पीक क्षेत्र	८१
११)	तालुक्यातील तृणधान्ये पीक क्षेत्र	८२
१२)	बार्शी तालुक्यातील कडधान्ये पीक क्षेत्र	८३
१३)	बार्शी तालुक्यातील पाऊस	८५
१४)	बार्शी तालुक्यातील विहिरी	८९
१५)	बार्शी तालुक्यातील महत्वाचे पाझर तलाव	९१
१६)	बार्शी तालुक्यातील जमीन - महसूल	९९
१७)	बार्शी तालुक्यातील पशुधन	१०७
१८)	बार्शी तालुक्यातील कृषी अवजारे	१०८
१९)	बार्शी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या परवाना धारकांची माहिती	१२८
२०)	दुय्यम बाजार आवार वैराग परवाना धारकाची माहिती	१३१
२१)	दुय्यम बाजार आवार येडशी-कसबे तडवळे उत्पन्न व खर्च	१३३
२२)	शेतमालाचे नियमन	१३४
२३)	नियमनामुळे मार्केट चार्जेस मध्ये झालेली कपात व शेतकऱ्यांची झालेली बचत	१३५
२४)	बाजार समितीस मिळालेली प्रतवार फी	१४०

२५)	जनावरांच्या बाजारातील भाषा	१५५
२६)	बार्शी जनावराच्या बाजारातील आर्थिक उलाढाल	१५६
२७)	तालुक्यातील परवानाधारक सावकार व त्यांचे व्यवहार	१६९
२८)	तालुक्यातील सोसायट्यांची इ. स. १९५३ पर्यंतची स्थिती	१८०
२९)	तालुक्यातील प्राथमिक सहकारी शेती संस्थांची आर्थिक स्थिती	१८८
३०)	तालुक्यातील प्राथमिक सहकारी शेती संस्थांचे आर्थिक व्यवहार	१८९
३१)	बार्शी सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेचे पहिले कार्यकारी मंडळ	२०१
३२)	बार्शी पेठेतील तुरीची आवक व किंमत	२३८
३३)	बार्शीतून होणारी तूर डाळीची निर्यात	२३९
३४)	लोकमान्य मिल बार्शी, आर्थिक उलाढाल	२४७
३५)	भारतातील सहकारी साखर कारखाने	२५७
३६)	भोगावती साखर कारखान्याचे संस्थापक संचालक मंडळ	२५९

छायाचित्रांची यादी

अ. क्र.	छायाचित्रांचे शीर्षक	पृष्ठ क्र.
१	बार्शी येथे झालेल्या सत्कारप्रसंगी लोकमान्य टिळक यांच्या समवेत बार्शीचे श्री. रामचंद्र मोरेश्वर साने	३०५
२	जिल्ह्यातील सहकाराचे जनक श्री. रामचंद्र मोरेश्वर साने बार्शी,	३०५
३	मुख्य बाजार बार्शी येथील आवारात कडब्याचे लिलाव सुरू झाले त्यावेळचे दृष्य	३०६
४	बार्शी बाजार समितीचा पेठवार्ता प्रसिध्दी फलक	३०६
५	बार्शी बाजार समितीचे खेड्यातून मालविक्री टाळावी यासंबंधी माहिती देणारे पोस्टर	३०७
६	बार्शी टेक्सटाईल मिलला महाराष्ट्रात प्रथम व भारतात तृतीय क्रमांक मिळाल्याबद्दलचा पुरस्कार देताना टेक्सटाईल मंत्री श्री. शरद यादव	३०७


परिशिष्टांची यादी

अ. क्र.	परिशिष्टांचे शीर्षक	पृष्ठ क्र.
१)	आगळगाव - काटेगाव रस्त्यासाठी संपादन करण्यात येत असणाऱ्या जमिनीसंदर्भात जमीन मालकांचे निवेदन	३०८
२)	आगळगाव - काटेगाव रस्त्यासाठी आगळगाव शेजारील संपादन करण्यात येत असणाऱ्या जमिनीचा नकाशा	३१०
३)	बार्शी पाथरी पाणी पुरवठा योजनेच्या अंमलबजावणीसाठी मुंबई प्रांताने केलेला ठराव	३११
४)	बार्शी पाथरी पाणी पुरवठा योजनेच्या अंदाजपत्रकीय रक्कम मंजुरीच्या संदर्भातील पत्र	३१४
५)	बार्शी पाथरी पाणी पुरवठा योजनेसाठी लागणाऱ्या वाढीव रकमेच्या तरतुदीच्या संदर्भातील पत्र	३१७
६)	बार्शी पाथरी पाणी पुरवठा योजनेच्या मंजूर कर्जाऊ रकमेवर व्याज न आकारणे संदर्भातील पत्र	३१८
७)	बार्शी पाथरी पाणी पुरवठा योजनेसाठी घेण्यात आलेल्या अतिरिक्त साहित्याची यादी	३१९
८)	बार्शी पाथरी पाणीपुरवठा योजनेचे काम पूर्ण झाल्यासंदर्भातील पत्र	३२०
९)	आगळगाव - काटेगाव रस्त्याच्या भू-संपादन अंतर्गत येणाऱ्या क्षेत्राच्या संयुक्त मोजणी संदर्भातील पत्र	३२१
१०)	बार्शी-तुळजापूर रस्त्याच्या भूसंपादनासंदर्भातील पूर्व चौकशीबाबतचे पत्र	३२३
११)	बार्शी-तुळजापूर रस्त्याच्या भूसंपादन करण्यात आलेली बार्शी तालुक्यातील जमिनीची माहिती	३२४
१२)	बार्शी तालुक्यातील वैराग भागातील कुळ जमिनीसंदर्भातील सोलापूर जिल्हाधिकाऱ्यांचे पत्र	३२५
१३)	बार्शी तालुक्यातील कोल्हापूर पद्धतीचे बंधारे	३२७
१४)	कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती	३२८
१५)	दुय्यम बाजार आवार वैराग - शेतमालाची आवक	३२९
१६)	बार्शी बाजार आवारातील जनावर बाजारातील जनावरांची आवक	३३०
१७)	दुय्यम बाजार आवार वैराग - उत्पन्न व खर्च	३३१
१८)	बाजार समितीची इ. स. १९४९-५० पासून, इ.स १९९०-९१ अखेरची स्थिती	३३२
१९)	नियमित शेतमालाची मार्केटमध्ये झालेली आवक व किंमत	३३३
२०)	बार्शी तालुक्यातील डाळ कारखाने (इ. स. १९९० पर्यंतचे)	३३४
२१)	लोकमान्य मिल बार्शी, आर्थिक उलाढाल	३३५
२२)	बार्शी तालुक्यातील परवानाधारक सावकार (इ. स. २०११ अखेर)	३३६

२३)	बार्शी तालुक्यातील प्राथमिक सहकारी शेती संस्थांची आर्थिक स्थिती	३३७
२४)	बार्शी तालुक्यातील प्राथमिक सहकारी शेती संस्थांची आर्थिक व्यवहार	३३८
२५)	इ. स. १९९० पूर्वी बार्शी तालुक्यात स्थापन झालेल्या प्राथमिक सहकारी शेती संस्था	३३९
२६)	सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या बार्शी तालुक्यातील शाखा	३४३
२७)	बँकांसाठी प्रश्नावली	३४४
२८)	उद्योजकांसाठी प्रश्नावली	३४६


नकाशा क्र. १

दख्खन प्रांतातील बार्शी उपविभाग व सोलापूर



नकाशा क्र. २


मुंबई प्रांतातील बार्शी उपविभाग व सोलापूर



संदर्भ : CENCUS OF INDIA, BOMBAY, इ. स. १९०१.

नकाशा क्र. ३


इ. स. १९८१ पूर्वीचा सोलापूर जिल्हा



संदर्भ : MAHARASHTRA STATE GAZETTEERS, SOLAPUR DISTRICT, इ. स. १९७७

नकाशा क्र. ४


इ. स. १९८१ नंतरचा सोलापूर जिल्हा



संदर्भ : MAHARASHTRA STATE GAZETTEERS, SOLAPUR DISTRICT, इ. स. १९७७

नकाशा क्र. ५


इ. स. १९८१ पूर्वीचा बार्शी तालुका



संदर्भ : CENCUS OF INDIA, SOLAPUR DISTRICT, इ. स. १९६१

नकाशा क्र. ६

इ. स. १९८१ नंतरचा बार्शी तालुका



संदर्भ : CENCUS OF INDIA, SOLAPUR DISTRICT, इ. स. १९९१

प्रकरण पहिले

प्रस्तावना

अ. क्र.	घटक
१.१	**संशोधनाचा विषय**
१.२	**आजवर झालेल्या संशोधनाचा आढावा**
१.३	**संशोधनाची गरज व महत्व**
१.४	**संशोधनाची उद्दिष्ट्ये व पूर्तता**
१.५	**संशोधनाची गृहितके**
१.६	**संशोधन विषयाचा कालखंड**
१.७	**संशोधनाची व्याप्ती व मर्यादा**
१.८	**संशोधन पध्दती**
१.९	**प्रबंधाची थोडक्यात रूपरेषा**
१.१०	**विषय प्रवेश**
१.११	**बार्शी तालुक्याचा परिचय**
	१.११.१ भौगोलिक परिस्थिती
	१.११.२ हवामान व पर्जन्य
	१.११.३ क्षेत्रफळ
	१.११.४ लोकसंख्या
	१.११.५ पौराणिक, अध्यात्मिक व सांस्कृतिक महत्व
	१.११.६ शैक्षणिक वाटचाल
	१.११.७ व्यापारी महत्व
	१.११.८ आठवडी बाजार
	१.११.९ पाथरी - बार्शी पाणीपुरवठा योजना
	१.११.१० बार्शी लाईट रेल्वे
	१.११.१ १ बार्शी शहर
१.१२	**बार्शी तालुक्याचे स्वातंत्र्यलढ्यातील योगदान**
१.१३	**बार्शी तालुक्याचे हैद्राबाद मुक्ती संग्रामातील योगदान**
	१.१३.१ रझाकार संघटना

	१.१३.२ हैद्राबाद हिंदू महासभा
	१.१३.३ सरहद्दीलगतचे बार्शी तालुक्यातील कँम्प्स्
	१.१३.४ निजामाची शरणागती
१.१४	**गोवा मुक्ती संग्रामातील बार्शी तालुक्याचे योगदान**
१.१५	**बार्शी तालुक्यातील महत्वाची गावे**
१.१६	**स्वातंत्र्योत्तर बार्शी तालुक्याची राजकीय वाटचाल**

प्रकरण पहिले

प्रस्तावना

' आर्थिक व्यवहार ' हा मानवी जीवनाचा एक अविभाज्य घटक आहे. मानवाच्या भौतिकदृष्ट्या सुखकर होण्याच्या नैसर्गिक प्रवृत्तीतून त्याचे आर्थिक व्यवहार सुरू होतात. अगदी प्रारंभीच्या रानटी अवस्थेपासून मानवाने आपल्या बुध्दिकौशल्याचा वापर करून आपला चरितार्थ चालविण्यासाठी क्रमाक्रमाने निरनिराळे प्रयोग केले. यातूनच शेती सुरू झाली. दैनंदिन जीवनावश्यक वस्तूंचे उत्पादन होऊ लागले. वस्तूच्या देवघेवीतून व्यापार सुरू झाला. पुढे तंत्रज्ञानाच्या विकासाने यामध्ये अमुलाग्र बदल घडवून आणले. याचे दूरगामी परिणाम मानवी जीवनावर झाले. अशा मानवी जीवनाच्या महत्वपूर्ण असलेल्या आर्थिक बाबीकडे इतिहासकाराचे लक्ष जाणे स्वाभाविक आहे. यातूनच विशेषतः एकोणिसाव्या शतकापासून ' आर्थिक इतिहास ' हा इतिहासलेखनाचा प्रकार प्रकर्षाने पुढे आला.

प्राचीन काळी ग्रीकांनी राजकीय घटनांना केंद्रस्थानी ठेऊन इतिहासलेखनास प्रारंभ केला. पुढे अनेक शतके याच दृष्टीने इतिहासलेखन झाले. इतिहास म्हणजे राजकीय जीवनाचा आलेख असे समीकरणच तयार झाले होते. पुढे काळाच्या ओघात यामध्ये बदल होत गेले. अठरावे शतक हा बुध्दीवाद्यांचा काळ समजला जातो, तर एकोणिसाव्या शतकाच्या सुरूवातीला इतिहासकार राष्ट्राच्या इतिहासलेखनात रस घेऊ लागले. त्यामुळे या शतकात मानवी जीवनाचा अधिक व्यापक दृष्टीने विचार होऊ लागला. माणूस हा समाजाचा अविभाज्य घटक असल्याने त्याच्या जडणघडणीत समाजाचा मोठा वाटा असतो. यातून समाजाचा अभ्यास करण्याची प्रवृत्ती वाढली. साहजिकच इतिहास म्हणजे गतकालीन मानवी जीवनाचा अभ्यास असेल तर राजकीय घटनाबरोबरच आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक घटकांचाही इतिहासकारांनी विचार करावा अशी भूमिका तयार होऊ लागली. याच भूमिकेतून आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक इतिहासलेखनाची नवी दालने खुली झाली. यापैकीच एक असणारा ' आर्थिक इतिहास ' हा एक खूप महत्वाचा प्रकार आहे. " आर्थिक इतिहास म्हणजे मानवाच्या आर्थिक व्यवहारांचा इतिहास " अशी याची व्यापक व्याख्या केली जाते. यामध्ये कृषी विकास, जमीन महसूल, शेतकरी, शेतमजूर, विविध वस्तूंचे उत्पादन व वितरण व्यवस्था करणाऱ्या संस्था, बाजार व्यवस्था या आर्थिक व्यवस्थेशी निगडित असलेल्या विविध वित्तीय संस्था, दळणवळण, उद्योग, व्यापार अशा अनेक घटकांचा अंतर्भाव आर्थिक इतिहासाच्या कक्षेत होतो. एकोणिसाव्या शतकामध्ये आधुनिक तंत्रज्ञानामुळे या घटकामध्ये लक्षवेधक बदल झाले. यातूनच आर्थिक इतिहासलेखनाच्या कक्षा रूंदावत गेल्या.

सोलापूर जिल्ह्यातील ' बार्शी तालुका ' हा आर्थिकदृष्टया सुसंपन्न तालुका आहे. या तालुक्याला समृध्द अशी भौगोलिक स्थिती लाभलेली आहे. जिल्ह्याच्या मानाने या तालुक्यातील मृदा उत्तम प्रकारची आहे. शिवाय तालुक्यातील नद्या, बंधारे, छोटे तलाव, मध्यम जलसिंचन प्रकल्प यामुळे तालुक्याच्या कृषी विकासाला गती मिळाली. पूर्वी निजाम व मोगल यांच्या सीमेवर व नंतर पश्चिम महाराष्ट्र व मराठवाडा

यांच्या सीमेवर असलेल्या बार्शी तालुक्याला संपन्न अशी व्यापारी पार्श्वभूमी लाभलेली आहे. यामुळे सोलापूर जिल्ह्यातील आर्थिक घडामोडीचे महत्वाचे केंद्र अशी बार्शी तालुक्याची ओळख निर्माण झाली. या ठिकाणी होणारी आर्थिक उलाढाल लक्षवेधक आहे. स्वातंत्र्यानंतर बार्शी तालुक्यामध्ये कृषी उत्पन्न बाजार समितीची स्थापना झाली. त्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतमालाला योग्य भाव मिळण्यास मदत झाली. थोडक्यात शेतकऱ्यांच्या कष्टाला न्याय देण्याचे कार्य या बाजार समितीने केले. सोलापूर जिल्ह्याच्या सहकारी चळवळीच्या इतिहासात बार्शी तालुक्याचे स्थान अविस्मरणीय आहे. कारण या जिल्ह्यातील सहकारी चळवळीच्या इतिहासाची सुरूवात बार्शी तालुक्यापासून झाली. इ. स. १९०४ मध्ये तत्कालीन बार्शी तालुक्यातील " कसबे तडवळे " येथे एका सहकारी संस्थेची स्थापना झाली. बार्शी तालुक्याच्या आर्थिक विकासामध्ये सहकाराची भूमिका उल्लेखनीय आहे. सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या स्थापनेपूर्वी इ. स. १९०६ मध्ये बार्शी येथे मुहूर्तमेढ रोवणाऱ्या ' बार्शी अर्बन को-ऑपरेटीव्ह बँके ' ने संपूर्ण बार्शी तालुका, तसेच सोलापूर जिल्ह्यासह जिल्ह्याच्या बाहेरही वित्तपुरवठा करून बार्शी तालुक्याच्या आर्थिक समृध्दीचे दर्शन घडविले. बार्शी लाईट रल्वेने बार्शी तालुक्याच्या व्यापार उद्योगाच्या क्षेत्रामध्ये अमुलाग्र बदल घडवून तालुक्याच्या आर्थिक विकासाची पायाभरणी केली. तालुक्यातील डाळ उद्योग, तेल उद्योग, सूत व कापड उद्योग यासारख्या छोट्या - मोठ्या उद्योगधंद्यांनी तालुक्याच्या औद्योगिकीकरणामध्ये मोलाची भर घालून तालुक्याच्या आर्थिक विकासाला हातभार लावला. जिल्ह्यामध्ये बार्शी नगरपालिकेचे उत्पादन सर्वाधिक होते. या विविध घटकांनी बार्शी तालुक्याच्या विकासाला कशा प्रकारे हातभार लावला याचे संशोधन करण्याच्या उद्देशाने " बार्शी तालुक्याचा आर्थिक इतिहास " (इ. स. १९४७ ते १९९०) हा विषय संशेधनासाठी निश्चित केला.

१.१ संशोधनाचा विषय

इतिहास लेखनाचे विविध प्रकार असून विसाव्या शतकामध्ये ' प्रादेशिक इतिहास ' हा महत्वाचा इतिहासलेखनाचा प्रकार प्रकर्षाने पुढे आला. एखाद्या विशिष्ट प्रदेशाची सखोल व सर्वांगीण माहिती मिळविणे हा प्रादेशिक इतिहासलेखनाचा प्रधान हेतू असतो. याच प्रादेशिक इतिहासलेखनाचा सूक्ष्म प्रकार म्हणजे ' स्थानिक इतिहासलेखन ' होय. पश्चिम महाराष्ट्राचा इतिहास हा प्रादेशिक इतिहास मानला तर, या भागातील एखाद्या जिल्ह्याचा अथवा तालुक्याचा इतिहास हा स्थानिक इतिहास ठरेल. विसाव्या शतकामध्ये एखाद्या विषयाचा सूक्ष्म व चिकित्सक अभ्यास करण्याच्या प्रवृत्तीमुळे व प्रत्येक घटकाला स्वतंत्र इतिहास असल्यामुळे स्थानिक इतिहासलेखनाचे महत्व दिवसेंनदिवस वृध्दिंगत होत आहे. प्रो. रेनियर यांनी म्हटल्याप्रमाणे " स्थानिक इतिहास हा अशा प्रकारे लिहिला पाहिजे की तो देशाच्या इतिहासामध्ये चपखलपणे बसला पाहिजे." अशा या स्थानिक इतिहासामध्ये आर्थिक इतिहास खूप महत्वाचा असतो.

याचाच एक भाग म्हणून मी " बार्शी तालुक्याचा आर्थिक इतिहास " (इ. स. १९४७ ते १९९०) हा विषय संशोधनासाठी निवडला. इतिहासकाराकडून या उपेक्षित असलेल्या अभ्यास विषयावर नवा प्रकाशझोत टाकण्याचा प्रयत्न प्रस्तुत प्रबंधातून करण्यात आलेला आहे.

१.२ आजवर झालेल्या संशोधनाचा आढावा

बार्शी तालुक्याच्या आर्थिक इतिहासावर आजतागायत कोणतेही संशोधन झालेले नाही. मात्र या विषयाच्या अनुषंगाने झालेले संशोधन व त्याचा थोडक्यात गोषवारा खालीलप्रमाणे.

१) Ms. Bangar. A. S., History of Barshi : A Studay of Economic conditions (१८५६ ते १९६०) शिवाजी विद्यापिठाच्या एम्. फिल. पदवीसाठी सादर केलेला प्रबंध. नोव्हेंबर १९८७.

सदर संशोधन केवळ बार्शी शहरापुरते असून ते इ. स. १९६० पर्यंतच मर्यादित आहे. या प्रबंधातून बार्शी तालुक्याचा आर्थिक इतिहास समजून येत नाही.

२) श्री. अंधारे राहूल, बार्शी शहराचा उदय आणि विकास (इ. स. १८६५ ते १९६५) टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या एम्. फिल. पदवीसाठी सादर केलेला प्रबंध. इ. स. २००८

सदर संशोधन केवळ बार्शी शहरापुरते मर्यादित असून ते इ. स. १९६५ पर्यंतच मर्यादित आहे. या प्रबंधामध्ये बार्शी नगरपालिका, बार्शी शहराचे सांस्कृतिक वैभव या बाबी केंद्रिभूत आहेत. बार्शीच्या अर्थकारणाचा फारच ओझरता आढावा यामध्ये घेतलेला असून तोही केवळ बार्शी शहरापुरता मर्यादित आहे. त्यामुळे या प्रबंधातून तालुक्याचा आर्थिक इतिहास समजून येत नाही.

त्यामुळे संपूर्ण बार्शी तालुक्याच्या आर्थिक इतिहासाचा मागोवा घेणारे एकही संशोधन झालेले नाही. याचा विचार करून बार्शी तालुक्याचे आर्थिक महत्व मांडण्याच्या उद्देशाने मी संशोधनासाठी " बार्शी तालुक्याचा आर्थिक इतिहास " (इ. स. १९४७ ते १९९०) हा विषय निवडला. या प्रबंधातून मी स्वातंत्र्योत्तर काळामध्ये बार्शी तालुक्यात झालेला कृषी विकास, कृषी उत्पन्न बाजार समितीची वाटचाल व तिचे शेतकऱ्यांच्या जीवनातील स्थान, तालुक्याच्या आर्थिक विकासातील भूमिका, बार्शी तालुक्यातील सहकाराची वाटचाल व त्याचे तालुक्याच्या आर्थिक विकासातील योगदान, तालुक्यातील प्राथमिक सहकारी शेती संस्था व बँका यांनी तालुक्याच्या आर्थिक विकासात पार पाडलेली मौलिक भूमिका, बार्शी तालुक्याची लक्षवेधक औद्योगिक परंपरा, तालुक्यातील रस्ते, रेल्वे अशा दळणवळण साधनांचा झालेला विकास व त्यांनी तालुक्याच्या आर्थिक विकासाची केलेली पायाभरणी, तालुक्यातील औद्योगिक विकास व यातून झालेला तालुक्याचा आर्थिक विकास अशा विविध दृष्टीकोणातून या प्रबंधाची मांडणी करण्यात आलेली

आहे. याचबरोबर स्थानिक इतिहासाचा एक अविभाज्य घटक म्हणून तालुक्याची चित्तवेधक पौराणिक, ऐतिहासिक, राजकीय, सांस्कृतिक व शैक्षणिक परंपरांपरेची थोडक्यात मांडणी केलेली आहे.

१.३ संशोधनाची गरज व महत्व

बार्शी तालुक्याला आधुनिक महाराष्ट्राच्या आर्थिक इतिहासात अनन्यसाधारण असे महत्व आहे. याचा इतिहासाच्या दृष्टीने म्हणावा तसा अभ्यास करण्यात आलेला नाही. इतिहास हा गतकालीन मानवी जीवनाचा आरसा असतो. तो समाजाचे स्मृतीभांडार असतो. यातूनच माणसाचे अनुभवविश्व समृध्द होत असते. इतिहासच लोकांना आपल्या सुसंपन्न परंपरेची जाणीव करून देतो. व्यक्तीपुढे उभ्या असलेल्या अनेक समस्यांची बीजे गतकाळात रुजलेली असतात. ती कशी रूजली व ती कोणी रूजवली याचे उत्तर इतिहासातूनच मिळते व त्याचे निराकरण करणे सुलभ होते. याच दृष्टीकोणातून मी संशोधनासाठी " बार्शी तालुक्याचा आर्थिक इतिहास " (इ. स. १९४७ ते १९९०) हा विषय निश्चित केला. मानवाच्या जीवनामध्ये अर्थकारणाची खूप मौलिक भूमिका असते. बार्शी तालुक्याच्या आर्थिक इतिहासामध्ये मोलाची भूमिका पार पाडणाऱ्या शेती, कृषी उत्पन्न बाजार समिती, सहकारी चळवळ, प्राथमिक सहकारी शेती संस्था व बँका, दळणवळण, व्यापार व उद्योग अशा विविध घटकांची नव्या पिढीला ओळख होऊन, या नव्या पिढीने तालुक्याचा आर्थिकदृष्ट्या नावलौकीक वाढवावा यासाठी हा विषय संशोधनासाठी निश्चित केला आहे.

बार्शी तालुक्याच्या वैभवशाली व लक्षवेधक आर्थिक परंपरेची ओळख महाराष्ट्राला व्हावी व यातून महाराष्ट्रातील इतर तालुक्यांनी बार्शी तालुक्याचे अनुकरण करून आपापल्या तालुक्याचा आर्थिक विकास साधावा या उद्देशाने सदर विषय निश्चित केला. संशोधन ही अखंडपणे चालणारी प्रक्रिया आहे. एखाद्या संशोधकाला संबंधित संशोधनाचे सर्वच पुरावे मिळतीलच असे नाही. कालांतराने त्याला न सापडलेले पुरावे दुसऱ्या संशोधकाच्या हाती पडून संबंधित विषयाचा नव्या व जुन्या साधनांच्या आधारे नवा इतिहास लिहिता येतो. त्यामुळे तालुक्याच्या आर्थिक विकासाचे मर्म उलगडून तालुक्याच्या सुसंपन्न आर्थिक इतिहासाचे पुनर्लेखन व्हावे व यातून उलगडणारा तालुक्याचा समृध्द आर्थिक वारसा नव्या पिढीने निष्ठेने जपून, त्यामध्ये प्रयत्नपूर्वक भर घालून अखिल महाराष्ट्रामध्ये तालुक्याचा आर्थिक नावलौकिक वाढावा या दृष्टीने मी सदर विषय संशोधनासाठी निवडला आहे.

या संशोधनामुळे बार्शी तालुक्याच्या आर्थिक इतिहासातील शेती, कृषी उत्पन्न बाजार समिती, सहकारी चळवळ, प्राथमिक सहकारी शेती संस्था, बँका, व्यापार, उद्योग व दळणवळण यांची भूमिका समजून येईल. याच्याच जोडीला स्थानिक इतिहासाचा एक अविभाज्य भाग या अर्थाने तालुक्याला लाभलेल्या वैभवशाली ऐतिहासिक, पौराणिक, राजकीय, सांस्कृतिक व शैक्षणिक परंपरेची तसेच

तालुक्यातील काही वैभवशाली गावांची थोडक्यात परंतू तालुक्याच्या महतीत भर टाकणारी माहिती या प्रबंधामुळे एकत्रित उपलब्ध होईल.

१.४ संशोधनाची उद्दिष्ट्ये व पूर्तता

१) बार्शी तालुक्यामधील कृषी विकासातील स्थित्यंतराचा आढावा घेणे.

सोलापूर जिल्ह्याच्या तुलनेत केवळ बार्शी तालुक्यामध्ये मोठ्या प्रमाणावर काळी मृदा आढळते. शिवाय तालुक्यात खात्रीशीर पाऊस पडतो. तालुक्यामध्ये स्वातंत्र्योत्तर काळात जलसिंचनाच्या सोयी-सुविधामध्ये वाढ झाली. त्यामुळे स्वातंत्र्योत्तर काळामध्ये बार्शी तालुक्याच्या कृषी क्षेत्रात अमुलाग्र बदल घडून आले. ज्वारी, तूर, विविध तेलबिया, बोर, द्राक्ष यांचे तालुक्यामध्ये मोठ्या प्रमाणावर उत्पादन घेतले जाते. सोलापूरला ज्वारीचे कोठार बनविण्यामध्ये बार्शी तालुक्याचे अनन्यसाधारण असे योगदान आहे. तालुक्यामध्ये भोगावतीचा अपवाद वगळता इतर सर्व नद्या लहान स्वरूपाच्या आहेत. मात्र स्वातंत्र्योत्तर काळामध्ये तालुक्यामध्ये हिंगणी, बाभुळगाव, ढाळे पिंपळगाव, जवळगाव यासारखे मध्यम प्रकल्प तसेच तालुक्यातील काही इतर छोटे जलसिंचन प्रकल्प, नद्यावर असलेले बंधारे, सतत वाढणारी विहिरींची संख्या यामुळे तालुक्यातील कृषी विकास झपाट्याने झाला. बार्शी तालुक्यातील जमीन महसूलाची वसूली जिल्ह्यामध्ये सर्वात उत्तम होती. हे तालुक्याच्या कृषी व आर्थिक समृध्दीचे द्योतक आहे. कृषी विकासामुळे तालुक्यामध्ये विविध वित्तीय संस्थांचे जाळे निर्माण झाले. त्यांनी शेतकऱ्यांना मुबलक प्रमाणात वित्तपुरवठा केला. या आर्थिक पाठबळामुळे शेतकरी आधुनिक तंत्राने शेती करू लागला. साहजिकच शेती उत्पादन प्रचंड वाढले. आधुनिक तंत्राच्या सहाय्याने बार्शी तालुक्यातील शेतकरी निर्यातक्षम उत्पादन घेऊ लागला. थोडक्यात त्याचा शेतीकडे पाहण्याचा दृष्टीकोणच बदलला.

२) कृषी उत्पन्न बाजार समितीचे शेतकऱ्यांच्या व तालुक्याच्या आर्थिक इतिहासातील योगदान अभ्यासणे.

बार्शी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या स्थापनेमुळे शेतकऱ्यांच्या, सावकाराकडून होणाऱ्या पिळवणुकीला मोठ्या प्रमाणात आळा बसला. कृषी उत्पन्न बाजार समितीच्या स्थापनेमुळे शेतकऱ्यांना आपला शेतमाल विकण्यासाठी हक्काची व नियमबध्द अशी बाजारपेठ उपलब्ध झाल्याने शेतकऱ्यांना आपल्या शेतमालाची योग्य किंमत मिळू लागली. कारण पूर्वी शेतमालाच्या विक्रीसंबंधी कोणतीही नियमबध्द व्यवस्था नसल्यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या शेतमालाचा योग्य मोबदला मिळत नव्हता. बाजार समितीच्या भाव प्रसिध्दीकरण योजनेमुळे शेतकऱ्यांना सर्व ठिकाणचे बाजारभाव समजू लागले. बाजार समितीच्या शेतमालाचे नियमन व शेतमालाची तोलाई या प्रक्रियेमुळे शेतकऱ्याची होणारी फसवणूक मोठ्या

प्रमाणात कमी झाली. बाजार समितीच्या शेतमालाची प्रतवारी करण्याच्या पध्दतीमुळे गुणवत्तापूर्ण शेतमालाचे उत्पादन करण्यास शेतकऱ्याला प्रोत्साहन मिळाले. त्यामुळे शेतकऱ्याकडे मुबलक प्रमाणात पैसा येऊ लागला. यातूनच शेतकरी पुढे आधुनिक शेतीकडे वळला. शेतकऱ्याकडे मुबलक प्रमाणात पैसा आल्यामुळे त्याचे राहणीमान उंचावले. पूर्वी झोपडीमध्ये राहणारा शेतकरी आता चांगल्या घरामध्ये राहू लागला आहे. त्यांचीही मुले उच्च शिक्षण घेऊ लागली आहेत. एकंदर या बाजार समित्यांनी शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासास मोलाचा हातभार लावला.

बार्शी तालुक्याच्या आर्थिक विकासामध्ये शेतीचा मोलाचा वाटा आहे. या शेतीउत्पादनाला योग्य आर्थिक न्याय देण्याचे काम कृषी उत्पन्न बाजार समितीने केले आहे. शेतमालाला चांगला भाव मिळाल्यामुळे शेतकरी पडीक जमीन मोठ्या प्रमाणात लागवडीखाली आणू लागला. त्यामुळे तालुक्याच्या एकूण कृषी उत्पादनामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली. बाजार समितीमुळे तालुक्यामध्ये वखार व्यवसायाला चालना मिळाली. शेतमालावर प्रक्रिया करण्याच्या उद्योगास चालना मिळाली. यातूनच तालुक्यामध्ये डाळ व तेल उद्योगांनी गरूडझेप घेतली. याचे तालुक्याच्या आर्थिक विकासावर सकारात्मक परिणाम झाले. शिवाय तालुक्यात शेतीपूरक उद्योगधंदे मोठ्या प्रमाणात वाढले. उदा. खते, बी-बियाणे, किटकनाशके, शेतीपूरक अवजारे निर्मिती इत्यादी व्यवसाय भरभराटीस आले. रेल्वे, रस्ते अशा दळणवळणाच्या प्रभावी सोयीमुळे बार्शी येथे मोठ्या प्रमाणात शेतमालाची आवक होते. या माध्यमातून येथे फार मोठी आर्थिक उलाढाल घडून येते. याचा बार्शी तालुक्याच्या आर्थिक विकासाशी जवळचा संबंध आहे.

३) बार्शी तालुक्यातील सहकारी चळवळीचा आढावा घेऊन तालुक्याच्या आर्थिक इतिहासातील प्राथमिक सहकारी शेती संस्थांच्या योगदानाचा आढावा घेणे.

सोलापूर जिल्ह्यातील सहकारी चळवळीचा प्रारंभ हा बार्शी तालुक्यापासूनच झाला आहे. त्यामुळे सोलापूर जिल्ह्याच्या सहकारी चळवळीच्या इतिहासात बार्शी तालुक्याचे नाव सुवर्णाक्षरांनी कोरलेले आहे. बार्शी तालुक्यामध्ये सहकारी चळवळीचा प्रारंभ करण्याचे श्रेय रामचंद्र मोरेश्वर साने यांना जाते. त्यांनी बार्शी तालुक्यातील " कसबे तडवळे " या ठिकाणी मे १९०५ मध्ये पहिली सोसायटी स्थापन केली. ही बार्शी तालुक्यातीलच नव्हे तर सोलापूर जिल्ह्यातील पहिली व तत्कालीन मुंबई प्रांतामधील सहावी सहकारी सोसायटी होती. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर लोकांच्या आर्थिक जीवनामध्ये सहकारी चळवळ हा एक महत्वाचा घटक बनला होता. बार्शी तालुक्यामध्ये या चळवळीने अभूतपूर्व यश मिळविले. स्वातंत्र्यापूर्वी बार्शी तालुक्यामध्ये ३७ प्राथमिक सहकारी शेती संस्था स्थापन झाल्या होत्या. पुढे इ. स. १९९० अखेर ही संख्या ११६ पर्यंत वाढली. थोडक्यात स्वातंत्र्यप्राप्तीनंतर बार्शी तालुक्यातील विविध कार्यकारी सहकारी सोसायट्यांचा विस्तार वाढला. शेतीच्या माध्यमातून तालुक्याच्या अर्थकारणाची सुयोग्य घडी बसविण्याचा

पाया या सोसायट्यांनी घातला. सोसायट्यांची संख्या व सभासदांची संख्या यामध्ये बार्शी तालुक्याचा सोलापूर जिल्ह्यामध्ये प्रथम क्रमांक होता. जो इ. स. २०१३ पर्यंत कायम आहे. तालुक्यातील या सोसायट्यांनी आपली सामाजिक बांधिलकी अतिशय सचोटीने जोपासलेली आहे. गावातील विविध सार्वजनिक कामे, शाळा, आरोग्य, नैसर्गिक आपत्ती, वाचनालये, व्यायामशाळा अशा विविध बाबीवर सातत्याने खर्च करण्याचे कल्याणकारी उपक्रम सहकारी संस्थांनी राबविले. शेतकऱ्यांच्या सोयीसाठी तालुक्यातील प्रमुख १० प्राथमिक सहकारी शेती संस्थांनी कृषी ऊत्पन्न बाजार समिती बार्शीच्या बाजार भाव प्रसिध्दीचे काम केले.

४) बार्शी तालुक्याच्या आर्थिक इतिहासातील बँकांचे योगदान अभ्यासणे

इ. स. १९९० अखेर बार्शी तालुक्यामध्ये सहा राष्ट्रीयीकृत बँकांच्या तालुक्यात विविध ठिकाणी शाखा स्थापन होत्या. या राष्ट्रीयीकृत बँकांनी तालुक्यातील औद्योगिक, शेती, व्यापार अशा विविध घटकांना सातत्याने वित्त पुरवठा करून त्यांच्या पर्यायाने तालुक्याच्या आर्थिक विकासात भर घातली. समाजातील मध्यम व दुर्बल घटक, स्त्रिया, विद्यार्थी, शेतकरी, छोटे व्यावसायिक यांना आर्थिक आधार दिला. त्यामुळे लोकांचे जीवनमान उंचावले. तालुक्यातील विद्यार्थ्यांना विविध पारितोषिकांच्या माध्यमातून सतत प्रोत्साहन दिले. स्त्रियांच्या आर्थिक स्वावलंबनासाठी बचत गट स्थापन केले. तसेच भूकंप, महापूर, अशा प्रसंगी वेळोवेळी देणग्या दिल्या आहेत.

बार्शी तालुक्याच्या आर्थिक विकासामध्ये राष्ट्रीयीकृत बँकांबरोबरच सहकारी बँकांचाही मोलाचा वाटा आहे. सदर तालुक्यामध्ये सहकारी बँकेच्या सर्वाधिक शाखा ग्रामीण भागामध्ये स्थिरावल्या आहेत. या शाखांनी प्रामुख्याने ग्रामीण भागातील तळागाळाचा घटक असलेल्या माणसाला आपला केंद्रबिंदू बनविले आहे. तालुक्यामध्ये ' सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँके ' च्या सर्वाधिक शाखा आहेत. या बँकेची पहिली शाखा तालुक्यामध्ये स्वातंत्र्यानंतरच स्थापन झाली. तालुक्यामध्ये फार मोठे सहकारी उद्योग नसल्यामुळे कर्जवाटपामध्ये सहकारी सोसायट्यांच्या माध्यमातून तसेच इतर विविध योजनांच्या माध्यमातून शेतकरीच अग्रभागी होता. यामुळे खऱ्या अर्थाने शेतीच्या विकासाला चालना मिळाली. सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या स्थापनेपूर्वीच बार्शी तालुक्यात इ. स. १९०६ मध्ये मूहूर्तमेढ रोवलेल्या " बार्शी सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक " या बँकेचे कार्य खूपच गौरवास्पद आहे. या बँकेने केवळ तालुक्यालाच नव्हे तर संपूर्ण सोलापूर जिल्ह्याला तसेच जिल्ह्याच्या बाहेरही वित्तपुरवठा केला होता. याशिवाय सांगली नागरी सहकारी बँक, सोलापूर जनता सहकारी बँक, पंढरपूर नागरी सहकारी बँक या बँकेच्या बार्शी तालुक्यातील

शाखांनी तालुक्याच्या आर्थिक विकासामध्ये मोलाची भर घातलेली आहे. या बँकांनी तालुक्यातील व्यापार व छोट्या-मोठ्या उद्योग-व्यवसायाला सोन्याचे दिवस आणले.

५) बार्शी तालुक्यातील रस्ते व रेल्वे या दळणवळण साधनांच्या विकासाचा आढावा घेणे.

इ. स. १८५५ नंतर सोलापूर जिल्ह्यामधील रस्त्यांच्या स्थितीमध्ये हळूहळू बदल होऊ लागले. त्या काळामध्ये ' पंढरपूर ' हे ठिकाण आठ रस्ते मार्गांनी जोडलेले होते. या आठ मार्गापैकी दोन मार्ग बार्शी तालुक्यातील पानगावमधून जात होते. कालांतराने स्थानिक निधीतून सोलापूरमध्ये ७ रस्ते बनविण्यात आले. त्यांचा बार्शी तालुक्याशी जास्त संबंध होता. पुढे इ. स. १८५९-६० मध्ये " दि ग्रेट इंडियन पेनुसुला रेल्वे " मार्गामुळे या रस्तेमार्गावरील वाहतूक प्रचंड वाढली. त्यामुळे बार्शी ते कुर्डूवाडी हा रस्ता निजामाच्या प्रदेशाकडे जाताना एक महत्वाचा रहदारीचा रस्ता बनला. जिल्हा परिषदेच्या स्थापनेनंतर तालुक्याचा रस्ते विकास झपाट्याने घडून आला. तालुक्यातील सर्व गावे प्रमुख रस्त्यांना जोडली. इ. स. १९७२ ते १९७४ या काळात दुष्काळग्रस्त स्थितीमुळे लोकांच्या हाताला काम मिळावे म्हणून अनेक नवीन रस्त्यांची कामे हाती घेण्यात आली. यातूनच बार्शी तालुक्याच्या दळणवळण विकासाला चालना मिळून तालुक्याच्या व्यापार - उद्योगामध्ये उल्लेखनीय वाढ झाली.

बार्शी तालुक्याच्या दृष्टीने बार्शी लाईट रेल्वेशी सलग्न असणारा सोलापूर जिल्ह्यातील दक्षिण-मध्य रेल्वेचा ' मुंबई-सोलापूर-मद्रास ' हा रेल्वेमार्ग एक महत्वाचा व्यापारी मार्ग आहे. या रेल्वेमार्गामुळे बार्शी तालुक्याच्या आर्थिक विकासाला प्रचंड गती मिळाली. या मार्गामुळे बार्शी तालुका संपूर्ण भारताला जोडला जाऊन तालुक्यातील विविध उद्योगधंद्यामध्ये उत्पादित होणाऱ्या मालाला जास्त बाजारपेठा मिळाल्या. त्यामुळे उद्योजकांना होणाऱ्या फायद्यात वाढ झाली. त्यांना उद्योगधंदे वाढविण्यास किंवा नवीन उद्योगधंदे सुरू करण्यास प्रोत्साहन मिळाले. यामुळे बार्शी तालुक्याच्या औद्योगिक विकासास झपाट्याने घडून आला. यामध्ये रेल्वेची भूमिका महत्वाची आहे. ' लातूर - मिरज ' ही मध्य रेल्वेची नॅरोगेज लाईन बार्शी तालुक्यातून जाते. या नॅरोगेज मार्गाच्या ब्रॉडगेजमध्ये रूपांतर करण्याच्या कामाला इ. स. १९९२-९३ मध्ये मंजूरी मिळाली. यामुळे बार्शी तालुक्याच्या विकासाला खूप चालना मिळाली. शेतकऱ्यांना आपला माल संपूर्ण देशामध्ये विकता येऊ लागला. तालुक्यातील व्यापार-उद्योगाच्या उत्कर्षामध्ये या रेल्वेचा सिंहाचा वाटा आहे. यामध्ये डाळ उद्योग, तेल उद्योग, कापड उद्योग यांचा आवर्जून उल्लेख करावा लागतो. बार्शीची डाळ संपूर्ण देशामध्ये प्रसिध्द झाली. याशिवाय बार्शीमध्ये येणाऱ्या विविध शेतमालाच्या आवकेमध्ये प्रचंड वाढ झाली. बाजार समितीला आलेला शेतमाल संपूर्ण देशामध्ये निर्यात करणे सोयीस्कर झाले. येथील औद्योगिक वसाहतीमधील उद्योगधंदे खूप वेगाने वाढले. त्यांना लागणारा कच्चा माल व

त्यांनी उत्पादित केलेला पक्का माल यांची वाहतूक रेल्वेमुळेच सुलभ व गतिमान झाली. यातूनच येथे उद्योगधंद्यासाठी पूरक वातावरण निर्माण झाले. यामुळे बार्शीचा औद्योगिक विकास झपाट्याने झाला. या दळणवळण विकासाच्या माध्यमातून तालुक्याचे अर्थकारण जलद गतीने विकसित होत गेले.

६) बार्शी तालुक्याच्या आर्थिक इतिहासातील विविध उद्योगांच्या योगदानाचा आढावा घेणे.

बार्शी तालुक्याच्या आर्थिक इतिहासामध्ये उद्योग व विविध व्यवसाय यांना अतिशय महत्वाचे स्थान आहे. उद्योगधंद्यामुळे तालुक्याची अर्थव्यवस्था समृध्दशाली होण्यास खूप मदत झाली. फार पूर्वी पासूनच बार्शीची ओळख ही एक व्यापारी पेठ म्हणून होती. बार्शीच्या व्यापारी पेठेने केवळ देशातीलच नव्हे तर, परदेशातील व्यापाऱ्यांनाही आकर्षित केले होते. जिल्ह्यातील सूत उद्योगाची ' बार्शी ' आणि ' सोलापूर ' ही प्रमुख केंद्रे होती. बार्शीमध्ये कापसाचा व्यापार फार मोठ्या प्रमाणामध्ये चालत होता. यातूनच येथे जिनिंग व प्रेसिंग कारखाने सुरू झाले. त्याचे रूपांतर पुढे लोकमान्य सूत गिरणी, जय शंकर सूत गिरणी व राजन कापड व सूत गिरणी या तीन गिरण्या स्थापन होण्यामध्ये झाले. या गिरण्यांनी बार्शीच्या औद्योगिक परंपरेत लक्षणीय भर घातली. इ. स. १९८९-९० अखेर तालुक्यामध्ये २२ डाळ कारखाने तर, २० ऑईल मिल्स चालू होत्या. यांनी तालुक्याच्या आर्थिक विकासात मोलाची भर घातली. इ. स. १९९० पूर्वी तालुक्यामध्ये एकमेव भोगावती सहकारी साखर कारखाना होता. मात्र त्याची वाटचाल खूपच खडतर होती. याशिवाय तालुक्यातील लाकूड उद्योग, दोरखंड उद्योग, कातडी उद्योग, गूळ उद्योग, विडी उद्योग, पांढरा कोळसा निर्मिती उद्योग, पी. व्ही. सी पाईप असे अनेक उद्योग तालुक्यामध्ये भरभराटीस आले. त्यांनी तालुक्याच्या आर्थिक विकासात मोलाची भर घातली. या उद्योगातून तालुक्यामध्ये फार मोठ्या प्रमाणामध्ये रोजगार निर्मिती होऊन, तालुक्यातील बेकारीचे प्रमाण कमी होण्यास मदत झाली. अशा प्रकारे तालुक्यातील सर्व छोट्या-मोठ्या उद्योगधंदयांच्या माध्यमातून तालुक्याची वैभवशाली व लक्षवेधक औद्योगिक परंपरा निर्माण होऊन तालुक्याच्या आर्थिक विकासात मोलाची भर पडली.

१.५ संशोधनाची गृहितके

१) बार्शी तालुक्याच्या आर्थिक विकासामध्ये कृषीचे अनन्यसाधारण असे योगदान आहे.

२) कृषी उत्पन्न बाजार समितीचे बार्शी तालुक्याच्या व शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासात महत्वाचे योगदान आहे.

३) प्राथमिक सहकारी शेती संस्थांनी तालुक्याच्या आर्थिक विकासात मोलाचे योगदान दिले आहे.

४) बार्शी तालुक्याच्या आर्थिक विकासातील बँकांचे योगदान महत्वपूर्ण आहे.

५) बार्शी तालुक्यातील रस्ते व रेल्वे या दळणवळण साधनांच्या विकासातून तालुक्याच्या आर्थिक विकासाची सुयोग्य पार्श्वभूमी तयार झाली.

६) तालुक्यातील विविध उद्योगधंद्यांनी तालुक्याच्या आर्थिक विकासात मोलाची भर घातली.

१.६ संशोधन विषयाचा कालखंड

" बार्शी तालुक्याचा आर्थिक इतिहास " हा माझ्या संशोधनाचा विषय असून या विषयाचा कालखंड इ. स. १९४७ ते १९९० हा आहे. हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर बार्शी तालुक्याच्या आर्थिक इतिहासामधील झालेले बदल अभ्यासण्याच्या दृष्टीने हा कालखंड निश्चित केला. स्वातंत्र्यानंतर बार्शी तालुक्यामध्ये कृषी विकासाचे एक नवे पर्व सुरू झाले. शेतीसाठी आवश्यक असणाऱ्या सिंचनाच्या गरजेतून तालुक्यामध्ये मध्यम व लघु सिंचन प्रकल्प, छोटे तलाव, बंधारे यांची निर्मिती प्रामुख्याने स्वातंत्र्यप्राप्तीनंतर झाली, कृषी क्षेत्रात आधुनिकता आली. याचा सर्वकष परिणाम तालुक्याच्या कृषी विकासावर झाला. शेतकऱ्यांच्या कष्टाला न्याय म्हणजेच त्यांच्या शेतमालाला योग्य भाव देण्याचे काम करणाऱ्या बार्शी कृषी उत्पन्न बाजार समितीची स्थापना ही स्वातंत्र्यानंतरच झालेली आहे. स्वातंत्र्यापूर्वी जवळजवळ ४३ वर्षे आगोदर बार्शी तालुक्यामध्ये सुरू झालेल्या सहकारी चळवळीचा खऱ्या अर्थाने स्वातंत्र्यानंतरच झपाट्याने विकास घडून आला. स्वातंत्र्यापूर्वी बार्शी तालुक्यातील प्राथमिक सहकारी शेती संस्थांची संख्या ३७ इतकी होती. पुढे इ. स. १९९० पर्यंत ही संख्या ११६ इतकी प्रचंड वाढली. यामध्ये इ. स. १९५८ ते इ. स. १९६० या काळामध्ये ३२ विविध कार्यकारी सहकारी सोसायट्या स्थापन झाल्या. स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये जितक्या सोसायट्या स्थापन झाल्या होत्या, जवळजवळ तितक्याच सोसायट्या इ. स. १९५८ ते इ. स. १९६० या दोन वर्षाच्या काळामध्ये स्थापन झाल्या. थोडक्यात स्वातंत्र्यप्राप्तीनंतर विविध कार्यकारी सहकारी सोसायट्यांचा विस्तार वाढला. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच ' सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँके ' ची पहिली शाखा बार्शी तालुक्यामध्ये स्थापन झाली. इ. स. १९९० अखेर बार्शी तालुक्यामध्ये विविध ठिकाणी या बँकेच्या १२ शाखा कार्यरत होत्या. याशिवाय इतर सहकारी बँकांच्या शाखा स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच तालुक्यामध्ये स्थापन झाल्या आहेत. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच तालुक्यामध्ये राष्ट्रीयीकृत बँकांच्या शाखांचे जाळे निर्माण झाले. त्यांनी तालुक्याच्या आर्थिक विकासामध्ये मोलाची भर घातली. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर खऱ्या अर्थाने तालुक्यातील रस्त्यांचा झपाट्याने विकास घडून आला. याच माध्यमातून खऱ्या अर्थाने रेल्वे गावोगावी पोहोचली. या दळणवळण साधनांच्या विकासानेच तालुक्याच्या आर्थिक विकासाची सुयोग्य पायाभरणी केली. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच तालुक्यातील वैभवशाली डाळ उद्योग झपाट्याने वाढला. इ. स. १९९० पर्यंत तालुक्यातील डाळ कारखान्यांची संख्या २५-३० पर्यंत पोहोचली. हीच स्थिती तालुक्यातील तेल उद्योगाची होती. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच या उद्योगामध्ये आधुनिकता आली.

स्वातंत्र्यापूर्वी स्थापन झालेल्या तीन सूत गिरण्या स्वातंत्र्यप्राप्तीनंतर बंद पडल्या. यापैकी दोन कायमच्या बंद पडल्या, तर एक केंद्र सरकारच्या अधिपत्त्याखाली गेली. या गिरणीने आपल्या गुणवत्तेतून संपूर्ण भारतामध्ये आपली ओळख निर्माण केलेली आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर बार्शी तालुक्यामध्ये औद्योगिक वसाहत निर्माण होऊन त्यामध्ये विविध प्रकारचे उद्योग सुरू झाले. इ. स. १९९० पर्यंत तालुक्यामध्ये एकमेव असणारा भोगावती सहकारी साखर कारखाना सुस्थितीत होता. या सर्व घडामोडीचा तालुक्याच्या आर्थिक इतिहासाशी घनिष्ठ संबंध आहे. थोडक्यात इ. स. १९४७ ते इ. स. १९९० हा कालखंड बार्शी तालुक्याच्या आर्थिक विकासाच्या दृष्टीने वैभवाचा कालखंड होता. त्यामुळे या वैभवाची पार्श्वभूमी, कारणे, त्यातील लोकसहभाग, यांचा तालुक्याच्या आर्थिक विकासावर झालेला परिणाम अशा विविध बाबींच्या अभ्यासासाठी " बार्शी तालुक्याचा आर्थिक इतिहास " या संशोधन विषयासाठी इ. स. १९४७ ते इ. स. १९९० हा कालखंड निश्चित केला.

१.७ संशोधनाची व्याप्ती व मर्यादा

सोलापूर जिल्ह्यामध्ये ११ तालुके असून यामध्ये बार्शी तालुक्याचा झालेला आर्थिक विकास लक्षवेधक आहे. फार पूर्वीपासून जिल्ह्याच्या आर्थिक घडामोडीचा केंद्रबिंदू बार्शी तालुका आहे. पूर्वी मोगल व निजाम यांना जोडणारा प्रदेश तर, स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्र यांना जोडणारा तालुका अशी ख्याती असलेला हा तालुका आर्थिक दृष्टीकोनातून खूप समृध्दशाली मानला जातो. स्वातंत्र्योत्तर काळामध्ये या तालुक्याचा आर्थिक विकास फार झपाट्याने झाला आहे. त्यामुळे मी माझ्या संशोधनासाठी जिल्ह्याची निवड न करता ' बार्शी तालुक्याची ' निवड केली आहे. सदरचे संशोधन महाराष्ट्र राज्यात असणाऱ्या सोलापूर जिल्ह्यातील ' बार्शी तालुक्याशी ' संबंधित आहे. ते बार्शी तालुक्यातील आर्थिक घटकाशी संबंधित असून, इ. स. १९४७ ते इ. स. १९९० या कालावधीशी संबंधीत आहे.

१.८ संशोधन पध्दती

सदरचे संशोधन ऐतिहासिक संशोधन पध्दती व सर्वेक्षणात्मक संशोधन पध्दतीनुसार करण्यात आलेले आहे. या संशोधनासाठी प्राथमिक संदर्भ साधने, दुय्यम संदर्भ साधने, जनगणना अहवाल, विधानसभेतील चर्चेचे अहवाल, नेत्यांची चरित्रे, जिल्हा परिषदेचे अर्थसंकल्प, विविध संस्थांचे वार्षिक अहवाल, अप्रकाशित साधने, अभिलेखागारातून उपलब्ध होणारी मूळ कागदपत्रे, गॅझेटियर, शिलालेख, संदर्भ ग्रंथ, स्मरणिका, वृत्तपत्रे, नकाशे, फोटो अशा विविध साधनांचा आधार घेतलेला आहे. ही संदर्भ साधने मुंबई पुराभिलेखागार मुंबई, विधान भवन ग्रंथालय मुंबई, अर्थ व सांख्यिकी संचालनालय बांद्रा-मुंबई, जनगणना कार्यालय मोहता मार्केट कार्यालय चर्चगेट-मुंबई, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र अभ्यास

केंद्र पुणे, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथालय पुणे, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, सोलापूर जिल्हा परिषद कार्यालय, अर्थ व सांख्यिकी कार्यालय सोलापूर, सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मुख्य कार्यालय सोलापूर, याशिवाय विविध बँकांची मुख्य कार्यालये, शाखा, बार्शी पंचायत समिती, तसेच जिल्हा व तालुक्यातील विविध ग्रंथालये अशा विविध ठिकाणाहून प्राप्त करून सदर संशोधनाची मांडणी केलेली आहे. तालुक्यातील विविध उद्योगधंदयांच्या संशोधनासाठी सर्वेक्षण पध्दतीचा अवलंब करण्यात आलेला आहे. तसेच या संशोधनासाठी काही लोकांच्या प्रत्यक्ष मुलाखतीही घेण्यात आलेल्या आहेत. अशा रीतीने या संशोधनासाठी ऐतिहासिक संशोधनाद्वारे सर्वेक्षणात्मक संशोधन पध्दती तसेच प्रत्यक्ष मुलाखत व विविध संदर्भ ग्रंथांचा आधार घेऊन प्रस्तुत प्रबंधाची मांडणी करण्यात आलेली आहे.

१.९ प्रबंधाची थोडक्यात रूपरेषा

" बार्शी तालुक्याचा आर्थिक इतिहास " (इ. स. १९४७ ते १९९०) हा माझ्या संशोधनाचा विषय असून, त्याची एकूण सहा प्रकरणामध्ये मांडणी करण्यात आलेली आहे. यापैकी पहिले प्रकरण ' प्रस्तावना ' हे आहे. तालुक्याचा इतिहास लिहित असताना जिल्ह्याच्या इतिहासावर थोडक्यात प्रकाश टाकणे आवश्यक असते, याचा विचार करून या प्रकरणामध्ये सोलापूर जिल्ह्याचा इतिहास थोडक्यात मांडलेला आहे. बार्शी तालुक्याची भौगोलिक स्थिती, हवामान, पर्जन्य, क्षेत्रफळ, लोकसंख्या, शैक्षणिक वाटचाल या बाबींचा थोडक्यात आढावा घेण्यात आलेला आहे. तसेच बार्शी तालुक्याचे पौराणिक, अध्यात्मिक महत्व, ऐतिहासिक, सांस्कृतिक वाटचाल याचे महत्व स्पष्ट केले आहे. यातून या तालुक्याची एक वेगळी ओळख निर्माण झालेली आहे. जिल्ह्यातील आर्थिक घडामोडीचे बार्शी तालुका हे सर्वात मोठे केंद्र असल्याने तालुक्याची व्यापारी पार्श्वभूमी, आठवडी बाजार, यात्रा यांच्या माध्यमातून होणाऱ्या आर्थिक उलाढालींचा सर्वसमावेशक आढावा प्रबंधात घेण्यात आलेला आहे. तालुक्याचा केंद्रबिंदू असलेले बार्शी शहर व या शहरासाठी वरदायीनी असलेली इंग्रजकालीन ' पाथरी-बार्शी पाणीपुरवठा योजना ' याचा समग्र आढावा घेण्यात आलेला आहे. बार्शी तालुक्याच्या आर्थिक इतिहास समृध्द करणाऱ्या ' बार्शी लाईट रेल्वे ' ची माहिती देण्यात आलेली आहे. याशिवाय या तालुक्याने हैद्राबाद मुक्ती संग्रामामध्ये, भारताच्या स्वातंत्र्य लढयात, गोवा मुक्ती संग्राम अशा देशाच्या इतिहासात सुवर्ण अक्षरांनी लिहिलेल्या घटनामध्ये अविस्मरणीय व ऐतिहासिक असे योगदान दिलेले आहे. याची चर्चा या प्रकरणात केलेली आहे. तसेच स्वातंत्र्योत्तर काळातील बार्शी तालुक्याच्या राजकीय वाटचालीचा आढावा घेतलेला आहे. त्याचप्रमाणे तालुक्यातील काही महत्वाच्या गावांचे थोडक्यात महत्व मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. सदर संशोधनाचा विषय स्थानिक असल्यामुळे या सर्व बाबींचा थोडक्यात आढावा घेतलेला आहे.

शेती हा बार्शी तालुक्याच्या आर्थिक विकासाचा कणा आहे. ज्वारी, तूर, विविध तेलबिया, बोर, द्राक्ष यांचे तालुक्यामधे मोठ्या प्रमाणावर उत्पादन घेतले जाते. सोलापूरला ज्वारीचे कोठार बनविण्यामध्ये बार्शी तालुक्याचे अनन्यसाधारण असे योगदान आहे. दख्खनच्या पठारावरून वाहून आलेल्या मातीने सोलापूर जिल्ह्याचा प्रदेश व्यापलेला आहे. जिल्ह्यामध्ये सर्वसाधारणत: काळी, बरड आणि तांबडी अशी तीन प्रकारची मृदा आढळते. याला केवळ बार्शी तालुका अपवाद आहे. या तालुक्यामध्ये मोठ्या प्रमाणावर काळी मृदा आढळते. शिवाय जलसिंचनाच्या सोयीही उपलब्ध असल्याने या तालुक्याच्या कृषी विकासास गती मिळाली आहे. या दृष्टीने " कृषी विकास " या दुसऱ्या प्रकरणामध्ये बार्शी तालुक्यातील मृदा, शेतकरी, शेतमजूर व शेतीची अवजारे यांची संख्या, तालुक्यातील भूमीउपयोजन, विविध पिकनिहाय क्षेत्र याची सविस्तर माहिती देण्यात आली आहे. जलसिंचनाची विविध साधने व त्यांचे तालुक्याच्या कृषी विकासातील योगदान याची सर्वसमावेशक माहिती या प्रकरणात दिलेली आहे. कारण जलसिंचनाच्या साधनाशिवाय शेती विकासाची कल्पना होऊ शकत नाही. तालुक्यामध्ये केवळ ' भोगावती ' ही एकमेव मोठी नदी आहे. इतर सर्व नद्या लहान स्वरूपाच्या आहेत. असे असले तरी तालुक्यातील छोटे व मध्यम प्रकल्प, विविध नद्यांवर असलेले कोल्हापूर पद्धतीचे बंधारे व विहीरी यावर या तालुक्यातील बहुतांशी शेती अवलंबून आहे. सोलापूर जिल्ह्यामध्ये अक्कलकोट नंतर बार्शी तालुक्याचा जमीन महसूलासंदर्भात द्वितीय क्रमांक लागत असला तरी, मागणी व जमा यासंदर्भात जिल्ह्यामध्ये बार्शी तालुक्याचाच प्रथम क्रमांक लागतो. म्हणजेच तालुक्यातील जमीन महसूल वसूली जिल्ह्यामध्ये सर्वात उत्तम होती. हे तालुक्याच्या कृषी व आर्थिक समृध्दीचे द्योतक आहे. तालुक्यामध्ये पडलेल्या दुष्काळांचा तालुक्याच्या कृषी विकासावर झालेला परिणाम, दुष्काळ निवारण्यासाठी शासनाने केलेले प्रयत्न याचा उहापोह या प्रकरणात केलेला आहे. बार्शी तालुका महाराष्ट्रामध्ये बांध बंदिस्तीच्या कामामध्ये आघाडीवर होता. या तालुक्यातील बांध बंदिस्तीचे काम पाहण्यासाठी भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी या तालुक्यास आवर्जून भेट दिली. शेतीस जोडधंदा म्हणून केले जाणारे पशुपालन, तालुक्याच्या कृषी विकासातील जिल्हा परिषद व पंचायत समिती यांचे योगदान याची सविस्तर माहिती या प्रकरणात दिलेली आहे.

" कृषी उत्पन्न बाजार समिती बार्शी " या तिसऱ्या प्रकरणामध्ये कृषी उत्पन्न बाजारांचा इतिहास, उद्देश, कार्य, व्याप्ती, बार्शी कृषी उत्पन्न बाजार समितीची कार्यप्रणाली याचा सविस्तर उहापोह करण्यात आला आहे. कृषी उत्पन्न बाजार समितीच्या स्थापनेमुळे शेतकऱ्यांना आपला शेतमाल विकण्यासाठी हक्काची व नियमबध्द अशी बाजारपेठ उपलब्ध झाली. कारण पूर्वी शेतमालाच्या विक्रीसंबंधी कोणतीही नियमबध्द व्यवस्था नव्हती. त्यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या शेतमालाचा योग्य मोबदला मिळत नव्हता. परंतू बाजार समितीच्या स्थापनेमुळे शेतकऱ्यांना आपल्या शेतमालाची योग्य किंमत मिळू लागली. साहजिकच

शेतकऱ्याला शेती करण्यास प्रोत्साहन मिळाले. बाजार समितीच्या भाव प्रसिध्दीकरण योजनेमुळे शेतकऱ्यांना सर्व ठिकाणचे बाजारभाव समजू लागले. त्यामुळे शेतकऱ्याच्या शेतमालाला योग्य भाव मिळू लागला. बाजार समितीच्या शेतमालाची प्रतवारी करण्याच्या पध्दतीमुळे गुणवत्तापूर्ण शेतमालाचे उत्पादन करण्यास शेतकऱ्याला प्रोत्साहन मिळाले. त्यामुळे शेतकऱ्याकडे मुबलक प्रमाणात पैसा येऊ लागला. यातूनच शेतकरी पुढे आधुनिक शेतीकडे वळला. शेती करण्याची नवनवीन तंत्रे शेतकरी आत्मसात करू लागला. शेतीपूरक व्यवसायामध्ये वाढ झाली. बाजार समितीच्या शेतमालाचे नियमन व शेतमालाची तोलाई या प्रक्रियेमुळे शेतकऱ्याची होणारी फसवणूक मोठ्या प्रमाणात कमी झाली. कृषी उत्पन्न बाजार समितीच्या स्थापनेमुळे शेतकऱ्यांचा सावकारांकडून होणाऱ्या पिळवणुकीला मोठ्या प्रमाणात आळा बसला. पूर्वी ग्रामीण भागामध्ये दुणीने धान्य देण्याची पध्दत होती. म्हणजे चालू वर्षी घेतलेले धान्य पुढच्या वर्षी दुपटीने परत द्यावे लागत असे. अशा अनेक अघोरी पध्दती बाजार समितीच्या स्थापनेमुळे नामशेष झाल्या. शेतकऱ्यांकडे मुबलक प्रमाणात पैसा आल्यामुळे त्याचे राहणीमान उंचावले. पूर्वी झोपडीमध्ये राहणारा शेतकरी आता चांगल्या घरामध्ये राहू लागला. त्यांचीही मुले उच्च शिक्षण घेऊ लागली. एकंदर या बाजार समित्यांनी शेतकऱ्याच्या सर्वांगीण विकासास मोलाचा हातभार लावला.

दैनंदिन जीवनामध्ये येणाऱ्या अडीअडचणींतून मार्ग काढण्यासाठी लोकांना आवश्यक असणाऱ्या पैशाची गरज भागविण्याचे काम पूर्वी सावकार, व्यापारी, जमिनदार करत होते. या घटकाकडून लोकांचे खूप आर्थिक शोषण होत असे. याच प्रश्नातून विविध वित्तीय संस्थांचा उदय झाला. यामध्ये बँका व प्राथमिक सहकारी शेती संस्था खूप महत्वाच्या आहेत. बार्शी तालुक्याच्या आर्थिक विकासामध्ये या वित्तीय संस्थांचा मोलाचा वाटा आहे. याचा " बार्शी तालुक्यातील प्राथमिक सहकारी शेती संस्था व बँका " या प्रबंधातील चौथ्या प्रकरणाच्या माध्यमातून आढावा घेतलेला आहे. या प्रकरणाचे प्रमुख दोन भाग करण्यात आलेले आहेत. **अ)** प्राथमिक सहकारी शेती संस्था व **ब)** बँका. या प्रकरणामध्ये सुरूवातीला प्राचीन काळापासून अर्थकारणाचा प्रमुख घटक असलेल्या सावकारा विषयी सविस्तर माहिती देण्यात आली आहे. त्यानंतर सहकाराचा उदय, विकास, व्याख्या, तत्वे, वैशिष्टये यांची समग्र परंतू थोडक्यात माहिती देण्यात आलेली आहे. पुढे भारतातील सहकारी चळवळ व जिल्ह्यातील सहकारी चळवळ यांचा थोडक्यात आढावा घेण्यात आला आहे. जिल्ह्यातील सहकारी चळवळीचा प्रारंभ हा बार्शी तालुक्यापासूनच झाला आहे. त्यामुळे सोलापूर जिल्ह्याच्या सहकारी चळवळीच्या इतिहासात बार्शी तालुक्याचे नाव सुवर्णाक्षरांनी कोरलेले आहे. १९०५ मध्ये " कसबे तडवळे " या ठिकाणी तालुक्यातील पहिली सोसायटी व इ. स. १९१८ मध्ये जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक स्थापन करण्यात रामचंद्र मोरेश्वर साने यांचा पुढाकार होता. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर लोकांच्या आर्थिक जीवनामध्ये सहकारी चळवळ हा एक महत्वाचा घटक बनला होता.

बार्शी तालुक्यामध्ये या चळवळीने अभूतपूर्व यश मिळविले. प्राथमिक सहकारी शेती संस्थांचा संबंध राष्ट्राच्या अगदी प्रारंभीचा घटक असलेल्या खेडेगावाशी असतो. आर्थिक दृष्टीकोनातून इतकी जवळीकता इतर कोणत्याही वित्तीय संस्थेकडे नाही. शेतकऱ्यांच्या शेतीसंदर्भातील बहुतांशी गरजा यांनी सोडविलेल्या आहेत. स्वातंत्र्यपूर्वी बार्शी तालुक्यामध्ये ३७ प्राथमिक सहकारी शेती संस्था स्थापन झाल्या होत्या. पुढे इ. स. १९९० अखेर ही संख्या ११६ पर्यंत वाढली. त्यांनी शेतीच्या माध्यमातून तालुक्याच्या अर्थकारणाच्या समृध्दीचा पाया घातला. सोसायट्यांची संख्या व सभासदांची संख्या यामध्ये बार्शी तालुक्याचा सोलापूर जिल्ह्यामध्ये प्रथम क्रमांक होता. जो इ. स. २०१३ पर्यंत कायम आहे. तालुक्यातील या सोसायट्यांनी आपली सामाजिक बांधिलकी अतिशय सचोटीने जोपासलेली आहे. गावातील विविध सार्वजनिक कामे, शाळा, आरोग्य, नैसर्गिक आपत्ती, वाचनालये, व्यायामशाळा अशा विविध बाबीवर सातत्याने खर्च करण्याचे कल्याणकारी उपक्रम या सहकारी संस्थांनी राबविले. शेतकऱ्यांच्या सोयीसाठी तालुक्यातील प्रमुख १० प्राथमिक सहकारी शेती संस्थांनी कृषी ऊत्पन्न बाजार समिती बार्शीच्या बाजार भाव प्रसिध्दीचे काम केले. अशाप्रकारे या सोसायट्यांनी तालुक्याच्या आर्थिक विकासामध्ये दिलेल्या लक्षवेधी योगदानाचा आढावा या प्रकरणात घेण्यात आलेला आहे.

याच प्रकरणाच्या दुसऱ्या विभागामध्ये तालुक्याच्या आर्थिक विकासातील बँकांचे योगदान अभ्यासण्यात आलेले आहे. यातही बँकांचे राष्ट्रीयीकृत व सहकारी असे दोन भाग केलेले आहेत. सुरूवातीला बँक ही संकल्पना स्पष्ट करून बँकेच्या इतिहासाची थोडक्यात चर्चा करून, भारतातील आधुनिक बँकेची सुरूवात कशी झाली याची माहिती दिलेली आहे. त्यानंतर तालुक्याच्या विकासातील राष्ट्रीयीकृत बँकांचे योगदान स्पष्ट केलेले आहे. तालुक्यातील राष्ट्रीयीकृत बँकांनी औद्योगिक, शेती व व्यापार अशा विविध घटकांना सातत्याने वित्त पुरवठा करून त्यांच्या पर्यायाने तालुक्याच्या आर्थिक विकासात भर घातली. समाजातील मध्यम व दुर्बल घटक, स्त्रिया, विद्यार्थी, शेतकरी, छोटे व्यावसायिक यांना आर्थिक आधार दिला. त्यामुळे लोकांचे जीवनमान उंचावले. तालुक्यातील विद्यार्थ्यांना विविध पारितोषिकांच्या माध्यमातून सतत प्रोत्साहन दिले. स्त्रियांच्या आर्थिक स्वावलंबनासाठी बचत गट स्थापन केले. तसेच भूकंप, महापूर, अशा प्रसंगी वेळोवेळी देणग्या दिल्या आहेत.

बार्शी तालुक्याच्या आर्थिक विकासामध्ये राष्ट्रीयीकृत बँकाबरोबरच सहकारी बँकांचाही मोलाचा वाटा आहे. सदर तालुक्यामध्ये सहकारी बँकेच्या सर्वाधिक शाखा ग्रामीण भागामध्ये स्थिरावल्या आहेत. शासनाच्या विविध योजनांतून दुर्बल घटकाला वित्तपुरवठा केला आहे. तालुक्यातील सहकारी बँकेमध्ये " सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँके " च्या सर्वाधिक शाखा आहेत. तालुक्यामध्ये फार मोठे सहकारी उद्योग नसल्यामुळे कर्जवाटपामध्ये सहकारी सोसायट्यांच्या माध्यमातून तसेच इतर विविध योजनांच्या

माध्यमातून शेतकरीच अग्रभागी होता. यामुळे खऱ्या अर्थाने शेतीच्या विकासाला चालना मिळाली. सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या पूर्वीच इ. स. १९०६ मध्ये मूहूर्तमेढ रोवलेल्या " बार्शी सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँके " चे कार्य खूपच गौरवास्पद आहे. या बँकेने केवळ तालुक्यालाच नव्हे तर संपूर्ण सोलापूर जिल्ह्याला तसेच जिल्ह्याच्या बाहेरही वित्तपुरवठा केला होता. याशिवाय सांगली नागरी सहकारी बँक, सोलापूर जनता सहकारी बँक, पंढरपूर नागरी सहकारी बँक या बँकेच्या बार्शी तालुक्यातील शाखांनी तालुक्याच्या आर्थिक विकासामध्ये मोलाची भर घातलेली आहे. हे करत असताना आपल्या सामाजिक जबाबदारीचेही भान ठेवलेले आहे.

बार्शी तालुक्याच्या अर्थकारणामध्ये उद्योग व विविध व्यवसाय यांना अतिशय महत्वाचे स्थान आहे. सदर तालुका जरी शेतीप्रधान असला तरी येथील उद्योगधंदयामुळे तालुक्याची अर्थव्यवस्था समृध्दशाली होण्यास खूप मदत झाली. बार्शी आणि सोलापूर ही जिल्ह्याची दोन टोके असल्यामुळे त्यांचा व्यापार जिल्ह्यासह जिल्ह्याबाहेरील भागाशी मोठ्या प्रमाणावर होता. बार्शी हे मराठवाड्याचे प्रवेशद्वार असल्याने मराठवाड्यातून निर्यात होणारा सर्व प्रकारचा माल व मराठवाड्याला लागणारा सर्व माल त्यांना बार्शीमार्गेच आयात करावा लागत असे. सोलापूर जिल्ह्यातील चार प्रादेशिक जकात नाक्यांपैकी एक जकात नाका बार्शी तालुक्यातील ' कुसळंब ' या ठिकाणी, तर दुसरा जकात नाका बार्शी स्टेशन रोड या मार्गावर ' पापनस ' या ठिकाणी होता. हे तालुक्याच्या व्यापारी व आद्योगिक समृध्दीचे द्योतक आहे. फार पूर्वी पासूनच बार्शीची ओळख ही एक व्यापारी पेठ म्हणून होती. बार्शीच्या व्यापारी पेठेने केवळ देशातीलच नव्हे तर, परदेशातील व्यापाऱ्यांनाही आकर्षित केले होते. येथे कापसाचा व्यापार फार मोठ्या प्रमाणामध्ये चालत होता. यातूनच येथे जिनिंग व प्रेसिंग कारखाने सुरू झाले. पुढे सूत व कापड गिरण्यांची सुरूवात झाली. मात्र बार्शी लाईट रेल्वेमुळे बार्शीच्या औद्योगिक विकासाला खऱ्या अर्थाने गती मिळाली. माझ्या संशोधनातील पाचवे प्रकरण " औद्योगिक विकास " हे आहे. या प्रकरणाच्या माध्यमातून तालुक्याच्या औद्योगिक विकासावर प्रकाश टाकलेला आहे. या प्रकरणाच्या सुरूवातीला प्रसिध्द बाजारपेठ या दृष्टीने तालुक्याचे महत्व थोडक्यात स्पष्ट केले आहे. कोणत्याही देशाचा आर्थिक विकास व औद्योगिक यश प्रभावी दळणळवणावर अवलंबून असते. औद्योगिक विकासासाठी अत्यावश्यक असणाऱ्या दळणवळणाची तालुक्याच्या संदर्भातील मौलीक माहिती मांडलेली आहे. यामध्ये तालुक्यातील रस्ते व रेल्वेच्या विकासाचा उहापोह केलेला आहे. या दळणवळणाच्या साधनांनी तालुक्याच्या आर्थिक विकासाची पार्श्वभूमी तयार केली. पुढे तालुक्यातील प्रमुख उद्योगधंद्यांची सविस्तर माहिती दिलेली आहे. यामध्ये सुरूवातीला बार्शीच्या आर्थिक वैभवाचे, समृध्दीचे प्रतिक असलेल्या डाळ उद्योगाची माहिती दिलेली आहे. बार्शीची डाळ संपूर्ण भारतामध्ये विशेषत: दक्षिण भारतामध्ये खूप प्रसिध्द आहे. इ. स. १९८९-९० अखेर

तालुक्यामध्ये २२ डाळ कारखाने कार्यरत होते. जिल्ह्यातील सूत उद्योगाची बार्शी आणि सोलापूर ही प्रमुख केंद्रे होती. या उद्योगांतर्गत तालुक्यामध्ये असलेल्या लोकमान्य सूत गिरणी, जय शंकर सूत गिरणी व राजन कापड व सूत गिरणी या तीन गिरण्यांचा सविस्तर इतिहास दिलेला आहे. जागतिक बाजारामध्ये सूत निर्यात होणाऱ्या जय शंकर मिलच्या राष्ट्रीयीकरणाची सविस्तर माहिती या प्रकरणात दिलेली आहे. या गिरण्यांनी बार्शीच्या औद्योगिक परंपरेत लक्षणीय भर घातली. या गिरण्यांनी केलेल्या सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक कार्यांचाही आढावा यात घेण्यात आलेला आहे. यानंतर तालुक्यामध्ये एकमेव असलेल्या भोगावती सहकारी साखर कारखान्याच्या वाटचालीचा आढावा घेण्यात आलेला आहे. या कारखान्याची स्थापना, सोलापूर व उस्मानाबाद अशा दोन जिल्ह्यातील आठ तालुक्यांच्या परिसरातील सुमारे ३०० गावांचे कार्यक्षेत्र, प्रत्यक्ष गाळपास सुरूवात, कारखाना सातत्याने बंद असणे, त्यावरील कर्जाचा बोजा, कर्जमाफी, सातत्याने तोट्यात असूनही कारखान्याने आपली सामाजिक बांधिलकी जोपासण्याचा केलेला प्रयत्न अशा विविध बाबींचा आढावा घेण्यात आलेला आहे. यानंतर तालुक्यातील समृध्दशाली परंपरा लाभलेल्या तेल उद्योगाची सविस्तर माहिती दिलेली आहे. इ. स. १९९० अखेर बार्शी तालुक्यामध्ये एकूण २० ऑईल मिल्स चालू होत्या. या उद्योगाचे बार्शी तालुक्यातील वैराग हे प्रसिध्द केंद्र होते. याशिवाय तालुक्यातील लाकूड उद्योग, दोरखंड उद्योग, कातडी उद्योग, गूळ उद्योग, विडी उद्योग, पांढरा कोळसा निर्मिती उद्योग, पी. व्ही. सी पाईप उद्योग अशा उद्योगांची थोडक्यात माहिती दिलेली आहे. औद्योगिक वसाहतीत सुरू असलेल्या विविध उद्योगांचीही सविस्तर माहिती या प्रकरणात दिलेली आहे. या उद्योगामुळे तालुक्यामध्ये फार मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती झाली. विचारांचे आदानप्रदान होऊ लागले. विविध जातीधर्माचे लोक एकत्र काम करू लागले. सामाजिक व धार्मिक विषमता कमी होण्यास मदत झाली. तालुक्याचे वाहतूक क्षेत्र झपाट्याने विस्तारले. पूरक व्यवसायांना प्रोत्साहन मिळाले. या सर्वातून बार्शी तालुक्याच्या आर्थिक विकासाला कमालीची गती मिळाली.

शेवटी प्रबंधाच्या " समारोप " या सहाव्या प्रकरणामध्ये तालुक्याचा ऐतिहासिक, भौगोलिक, व्यापारी, शैक्षणिक, पौराणिक, सांस्कृतिक, राजकीय अशा विविध दृष्टीकोणातून विचार करून तालुक्याच्या सर्वांगीण आर्थिक विकासावर चर्चा करून प्रबंधातील मुख्य पाच प्रकरणांचा थोडक्यात आढावा घेऊन निष्कर्ष काढण्यात आलेला आहे.

१.१० विषय प्रवेश

सामाजिक व राजकीयदृष्टया स्वयंपूर्ण घटक या नात्याने महाराष्ट्राच्या उत्क्रांतीची कहाणी भारताच्या प्राचीन इतिहासात खूप चित्तवेधक आहे. महाभारतामध्ये महाराष्ट्राचा उल्लेख नसला तरी या

महाकाव्यामध्ये विदर्भाचा उल्लेख अनेक वेळा आलेला आहे. या महाकाव्यातील काही स्त्रिया विदर्भातील राजकन्या असल्याचा उल्लेख मिळतो. त्याचप्रमाणे नाग व आर्य यासारख्या देशांतर करणाऱ्या लोकांची अपरांत येथील वसाहत फार जुनी आहे. अपरांत या भागाचा उल्लेख महाभारतात असून ते हल्लीचे कोकण होय. परशुरामाने अपरांत भागात वास्तव्य केले होते. युध्दातून निवृत्त झाल्यानंतर तो सध्याच्या चिपळूण जवळील महेंद्र पर्वतामध्ये राहावयास गेला होता, अशी महाभारतात कथा आहे. याच कारणामुळे प्राचीन ग्रंथामध्ये संपूर्ण पश्चिम किनाऱ्याचा उल्लेख परशूरामक्षेत्र असाही करण्यात आला आहे. इ. स. पू. ७ व्या शतकानंतर दक्षिणेकडे स्थलांतर केलेले आर्य, त्यापूर्वीच या प्रदेशामध्ये स्थिर झालेले नाग लोक, याशिवाय ग्रीस व मध्य आशियातून आलेले लोक यांचा मराठी संस्कृती, भाषा यावर प्रभाव पडला.[१]

हिंदुस्थान स्वतंत्र होण्यापूर्वी प्राचीन महाराष्ट्रावर सातवाहन, वाकाटक, कलचुरी, राष्ट्रकुट, चालुक्य व यादव या घराण्यांनी राज्य केले. इ. स. १२९६ मध्ये अल्लाउद्दिन खिलजीने यादवांचा पराभव करून महाराष्ट्रामध्ये इस्लामी सत्तेचा पाया घातला. १६ व्या शतकात महाराष्ट्रामध्ये अनेक स्वतंत्र मुस्लिम सत्ता उदयास आल्या. अशाच अवस्थेत महाराष्ट्रामध्ये शिवाजी महाराजांचा जन्म झाला. त्यांनी पुढे या मुस्लिम सत्तेशी संघर्ष करत हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. १८ व्या शतकात या स्वराज्याचे साम्राज्यात रूपांतर झाले. १९ व्या शतकाच्या सुरूवातीला हे साम्राज्य इंग्रजांनी नष्ट केले. पुढे हिंदूस्थानच्या स्वातंत्र्यानंतर सध्याचा गुजरात व महाराष्ट्र यांचे मिळून १ नोव्हेंबर १९५६ रोजी द्वैभाषिक मुंबई राज्य स्थापन झाले. नंतर भाषानिहाय प्रांत रचनेनुसार मध्य प्रदेशातील विदर्भ व हैद्राबादमधील मराठवाडा यांचा तत्कालीन मुंबई राज्यात समावेश करून १ मे १९६० रोजी सध्याच्या ' महाराष्ट्र ' राज्याची स्थापना झाली.[२] यशवंतराव चव्हाण हे मुंबई राज्याचे शेवटचे मुख्यमंत्री, द्वैभाषिक मुंबई राज्याचे पहिले व शेवटचे मुख्यमंत्री ठरले. शिवाय महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री होण्याचा मान त्यांनाच मिळाला.[३]

गौरवशाली ऐतिहासीक परंपरा लाभलेला पश्चिम महाराष्ट्रातील सोलापूर हा एक खूप महत्वाचा जिल्हा आहे. या जिल्ह्याचे क्षेत्रफळ सुमारे ६,००० चौ. मै. इतके आहे. भीमा, सीना, भोगावती, बोरी, माण या जिल्ह्यातील प्रमुख नद्याआहेत. येथील पावसाचे प्रमाण असंतुलित आहे. या जिल्ह्यातील लोकांना सतत दुष्काळग्रस्त परिस्थितीचा सामना करावा लागतो. ज्वारी, बाजरी, गहू, मुग, उडिद, मटकी, मिरची, मका, शेंग व कापूस ही या जिल्ह्यातील प्रमुख पिके आहेत. पंढरीचा विठोबाराया, बार्शीचा भगवंत, येडशीचा रामलिंग, सोलापूरचा सिध्देश्वर, आक्कलकोटचे स्वामी समर्थ, वडवळचा नागनाथ ही या जिल्ह्यातील काही प्रमुख देवस्थाने आहेत.[४] सोलापूर जिल्ह्याची समुद्रसपाटीपासूनची उंची साधारणत: ५५० मीटर आहे. याला उत्तर-पूर्व बार्शीचा काही भाग, मध्य माढा, मध्य करमाळा, दक्षिण सांगोल्याचा काही भाग अपवाद आहे. हा सर्व भाग काहीसा डोंगराळ आहे.[५]

अशा विविधतेने नटलेल्या या सोलापूर जिल्ह्याला प्राचीन इतिहास लाभलेला आहे. इ. स. पू. ९० ते इ. स. ३०० या कालखंडामध्ये इतर दख्खनच्या प्रदेशाप्रमाणे सोलापूरच्या प्रदेशावर सातकर्णी सत्ताधिशांचे राज्य होते. पुढे इ. स. ५५० ते इ. स ७६० या काळामध्ये चालुक्याचे, पुढे इ. स. ९७३ पर्यंत राष्ट्रकुटांचे, त्यानंतर पुढे १३ व्या शतकापर्यंत देवगिरीच्या यादवांचे राज्य होते. या यादवांचा पुढे मुस्लिमांनी पाडाव केल्यानंतर हा प्रदेश इस्लामी सत्तेच्या वर्चस्वाखाली आला. इ. स १३४७ मध्ये हसण याने एका राजघराण्याची स्थापना केली. ते बहामणी या नावाने ओळखले जाते. हसण याचा आश्रयदाता एक गंगू नावाचा ब्राह्मण होता. त्या ब्राह्मणाच्या उपकारामुळे हसणने आपल्या नावासमोर गंगू हे नाव जोडले. शिवाय यामुळेच या राजघराण्याला बहामणी सत्ता असे म्हटले जात असावे. पुढे या बहामणी सत्तेने दक्षिणेवर १५० वर्षे राज्य केले. प्रादेशिक सरदारांचा शिरजोरपणा आणि त्यांची वाढती शक्ती यामुळे बहामणी सत्तेस धोका निर्माण झाला. हा धोका टाळण्यासाठी मोहंमद शहा बहामणी दुसरा याचा मंत्री ' महंमद गवान ' याने बहामणी प्रदेशाची विभागणी आठ प्रदेशामध्ये केली होती. त्यानुसार सोलापूर आणि परांड्याच्या परिसरातील ११ मुलूख हे झईन खान व ख्वाजा जहान या दोन बंधुकडे सोपविण्यात आले. पुढे या दोन बंधुंमध्ये या प्रदेशाच्या मालकीवरून मतभेद निर्माण झाले. याचे रूपांतर संघर्षात झाले. यामध्ये निजामशाहाने ख्वाजा जहानची, तर अदिलशहाने झईन खानची बाजू घेतली. यातूनच पुढे या ११ विभागांचे विभाजन होऊन बार्शी, माढा, परांडा व करमाळा हे प्रदेश ' ख्वाजा जहानला ' मिळाले. पुढे अनेक वर्ष हे विभाग त्याच्याच अधिपत्त्याखाली राहिले. नंतर हा प्रदेश निजामशहाच्या अधिपत्त्याखाली येऊन, त्याने हा प्रदेश त्यांच्याकडे आलेल्या निंबाळकरांना दिला.[६]

मराठयांच्या स्वातंत्र्ययुध्दामध्ये या जिल्ह्याचे महत्वपूर्ण योगदान आहे. शिवाजीराजांना स्वराज्य उभारणीच्या कार्यामध्ये मोलाची साथ देणारे शिवाजीराजांचे पहिले पेशवे ' शामराज नीलकंठ ' यांचे मूळ गाव याच जिल्ह्यातील करमाळा तालुक्यातील हिवरे हे होय. औरंगजेब बादशहाच्या छावणीचा सोन्याचा कळस कापून आणण्यास संताजी घोरपडे समवेत असलेले विठोजी चव्हाण याच जिल्ह्यातले. या कामगिरीमुळे त्यांना छत्रपतीकडून हिम्मतबहाद्दर हा किताब मिळाला. निंबाळकर घराण्याचा फार मोठा विस्तार या जिल्ह्यामध्ये आहे. भोसले घराण्याशी त्यांचे वैवाहिक संबंध होते. याच जिल्ह्यातील ब्रहमपुरी येथे हिंदूस्थानचा मोगल बादशहा औरंगजेब ४ वर्षे छावणी करून होता. साहजिकच हे ठिकाण अखिल हिंदूस्थानची प्रासंगिक राजधानी बनले होते. पेशवे-इंग्रज यांच्यातील आष्टीची लढाई, पानशांनी लढलेली सोलापूर किल्ल्याची लढाई अशा अनेक लढायांचा हा जिल्हा साक्षीदार आहे.[७] १९ फेब्रूवारी १८१८ रोजी जनरल स्मिथ याने पेशव्यावर मिळविलेल्या विजयाने सोलापूर जिल्हा ब्रिटिशांच्या ताब्यात गेला.[८]

इ. स. १८१८ मध्ये पेशवाईच्या अस्तानंतर तत्कालीन सोलापूरच्या प्रदेशातील २६१ गावे ब्रिटिशांच्या अधिपत्त्याखाली आली. यातील १२३ गावे बार्शी तालुक्यातील होती. इ. स १८६९ पूर्वी सोलापूरचे उपविभाग वारंवार एका जिल्ह्यातून दुसऱ्या जिल्ह्याला जोडले जायचे. इ. स. १८६४ पर्यंत सांगोला व पंढरपूर सातारा जिल्ह्यामध्ये होते. माळशिरस इ. स. १८७५ पर्यंत साताऱ्यामध्ये होते. इ. स. १८३८ पूर्वी करमाळा हा उपविभाग अहमदनगर जिल्ह्यात होता तर मोहोळ पुण्यामध्ये होता. बार्शी व सोलापूर हे विभाग एकापेक्षा अधिकवेळा पुण्यातून अहमदनगरमध्ये व अहमदनगरमधून पुण्यामध्ये सामाविष्ट झाले होते. इ. स. १८३८ मध्ये सोलापूर, बार्शी, मोहोळ, माढा, करमाळा, इंडी, हिप्परगी आणि मुद्देबिहाळ यांचा मिळून सोलापूर जिल्हा तयार झाला. इ. स. १८६४ मध्ये तो पुन्हा विखुरला. इ. स. १८६९ मध्ये सोलापूर, बार्शी, माढा, मोहोळ, पंढरपूर, सांगोला यांचा मिळून सोलापूर जिल्हा बनला. यामध्ये इ. स. १८७५ साली साताऱ्याकडून माळशिरसचा समावेश करण्यात आला.[९] इ. स. १९५६ च्या राज्यपुनर्रचनेनुसार सोलापूर जिल्हा तत्कालीन मुंबई राज्यामध्ये होता. इ. स. १९६० मध्ये महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर सोलापूर हा महाराष्ट्र राज्यातील एक जिल्हा बनला.[१०]

इंग्रजांच्या गुलामगिरीविरूध्द दिलेल्या स्वातंत्र्य लढयाचा इतिहास हा सोलापूर जिल्ह्याच्या गौरवाचा विषय आहे. या काळामध्ये महात्मा गांधी, लोकमान्य टिळक, सुभाषचंद्र बोस यासारख्या अनेक महान विभूतींचा या जिल्ह्याशी प्रत्यक्ष संबंध आला. मार्शल लॉ सारख्या जूलमी लष्करी कायदा व यातूनच फासावर गेलेले सोलापूरचे जगन्नाथ शिंदे, कुर्बान हुसेन, मल्लाप्पा धनशेट्टी व किसन सारडा ही घटना जिल्ह्याच्याच नव्हे तर देशाच्या इतिहासात महत्त्वाची मानली जाते. [११] अशा या सोलापूर जिल्ह्यामधील बार्शी हा एक आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक व राजकीयदृष्ट्या समृध्दशाली तालुका आहे.

१.११ बार्शी तालुक्याचा परिचय

रायगड किल्ला ताब्यात आल्यानंतर शाहू महाराजांनी त्याची पुढील व्यवस्था पाहण्यासाठी आपल्या वतीने यशवंत महादेव पोतनीस यांची नेमणूक केली होती. यासाठी त्याला एकूण १०२ गावांचे उत्पन्न लाऊन दिले होते. यामध्ये बार्शी तालुक्यातील येडशी व कसबे-तडवळे या दोन गावांचा समावेश होता. इ. स १६९९ मध्ये राजाराम महाराजांनी मोगलाविरूध्द मोहीम काढली. यावेळी बादशहा स्वत: सातारच्या किल्ल्याला वेढा देऊन बसला होता. त्यामुळे त्याने आपला नातू बेदारबक्त याला राजारामाविरूध्द पाठविले. यावेळी राजाराम बार्शी-परांडा भागातून जात होते. बादशहाच्या हुकूमाप्रमाणे चिनकीलीचखान बार्शी-परांडा परिसरामध्ये बेदारबक्तास येऊन मिळाला. पुढे झुल्फीकारखानही बेदारबक्ताच्या मदतीस आला. त्यामुळे राजारामास माघार घ्यावी लागली.[१२]

इ. स. १८६९ पूर्वी सोलापूर विभागाचे विविध उपविभाग वारंवार एका जिल्ह्यातून दुसऱ्या जिल्ह्याला जोडले जायचे. यातीलच एक महत्वाचा असणारा बार्शी हा उपविभाग वारंवार एका जिल्ह्यातून दुसऱ्या जिल्ह्याला जोडला जायचा. इ. स. १८१९-२० मध्ये बार्शी उपविभाग अहमदनगर जिल्ह्यात होता. इ. स. १८२०-२२ च्या दरम्यान तो पुन्हा सोलापूरला जोडण्यात आला. इ. स. १८२६ मध्ये तो पुन्हा अहमदनगर जिल्ह्यास जोडण्यात आला. इ. स. १८३१ मध्ये बार्शी उपविभाग पुण्याला जोडण्यात आला. तर इ. स १८३८ मध्ये तो पुन्हा सोलापूरला जोडण्यात आला. तो आजतागायत कायम आहे.[१३]

१.११.१ भौगोलिक परिस्थिती

बार्शी तालुक्याचे भौगोलिक स्थान १७° ५९ ते १८° २६ उत्तर अक्षांश आणि ७५° ४२ ते ७६° ९ पूर्व रेखांश यांच्या दरम्यान आहे. पूर्वेला बालाघाटच्या डोंगररांगा व पश्चिमेला सीना नदी यामध्ये बार्शी तालुका पसरलेला आहे. तालुक्याचा पृष्ठभाग उत्तरेकडील बालाघाट टेकड्यांकडून दक्षिण-पूर्वेला सीना नदीकडे मंद उताराचा आहे. बार्शी तालुक्यामध्ये झाडांचे प्रमाण खूप होते.[१४] बार्शी तालुक्यातील बालाघाटच्या डोंगराळ परिसरामध्ये मोठ्या प्रमाणत जंगले आढळून येतात. ही जंगले मिश्र स्वरूपाची आहेत. या जंगलामध्ये खैर, हिवर, आपटा, बोर, शिसव, लिंब, बाभूळ, चंदन ही झाडे प्रामुख्याने आढळून येतात. वनविभागाने या परिसरामध्ये मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण केलेले आहे.[१५]

तक्ता क्र .१

बार्शी तालुक्यातील जंगल क्षेत्र

सन	जंगल क्षेत्र
१९५१	७,३०० एकर
१९६१	७,०५८ एकर
१९७१	६,९३५ एकर
१९८१	५,७७० एकर
१९९१	४,०८६ एकर

(संदर्भ :- सोलापूर जिल्ह्याची जनगणना , जनगणना कार्यालय मोहता मार्केट मुंबई.)

तालुक्याच्या जंगलामध्ये चित्त्यासारखे मांसाहारी प्राणी क्वचितच आढळतात. शाकाहारी प्राण्यामध्ये ससा, हरीण, चिंकारा काळवीट, भारतीय लहान काळवीट हे प्राणी मोठ्या प्रमाणात आढळून येतात. याशिवाय रामलिंगच्या डोंगरामध्ये रानडुकरे मोठ्या प्रमाणात आढळून येतात.[१६] भोगावती नदी

सोडल्यास बार्शी तालुक्यामध्ये इतर मोठ्या नद्या नाहीत. चांदणी, बेडकी, झरीना, नागझरी आणि राम या बार्शी तालुक्यातील काही छोटया नद्याआहेत.[१७]

१.११.२ हवामान व पर्जन्य

सोलापूर जिल्ह्याच्या सर्व भागामध्ये हवामान साधारणत: उष्ण आहे. याला अपवाद फक्त बार्शी तालुका आहे. बार्शी तालुक्याचे हवामान जिल्ह्याच्या इतर भागाच्या मानाने थंड आहे. बालाघाट डोंगररांगा जवळ असल्याने बार्शी तालुक्यातील हवामान चांगले आहे.[१८] बार्शी तालुक्यातील येडशी हे ठिकाण सोलापूर जिल्ह्याचे माथेरान समजले जाते. यावरून बार्शीच्या हवामानाचा अंदाज येऊ शकेल.

पावसाच्या प्रमाणानुसार सोलापूर जिल्ह्याचे पूर्व, मध्य व उत्तर असे तीन विभाग पडतात. यापैकी पूर्व विभागामध्ये खात्रीशीर पाऊस पडतो. या पूर्व विभागामध्ये बार्शी तालुक्याचा समावेश होतो. बार्शी तालुक्यामध्ये वार्षिक सरासरी ७२५ मि. मी. पाऊस पडतो. विशेषत: तालुक्याच्या बालाघाट डोंगर रांगांच्या परिसरामध्ये अधिक पाऊस पडतो.[१९]

सदर प्रबंधातील कृषी विकास या प्रकरणामध्ये तालुक्यातील पावसाची सविस्तर आकडेवारी दिलेली आहे.


१.११.३ क्षेत्रफळ

सोलापूर जिल्ह्याचे प्रशासनाच्या सोयीसाठी तीन विभागामध्ये विभाजन करण्यात आले. १) माढा प्रांत २) सोलापूर प्रांत ३) पंढरपूर प्रांत. यापैकी सोलापूर प्रांतामध्ये बार्शी तालुक्याचा समावेश होता. प्रत्येक विभाग प्रांत अधिकाऱ्याच्या अधिपत्त्याखाली होता. तर तालुका मामलेदाराच्या अधिपत्त्याखाली होता. क्षेत्रफळाच्या दृष्टीने बार्शी तालुक्याचा सोलापूर जिल्ह्यामध्ये प्रथम क्रमांक होता.[२०]

इ. स. १९५१ च्या जनगणनेनुसार बार्शी तालुक्याचे क्षेत्रफळ सोलापूर जिल्ह्यामध्ये सर्वाधिक ६२७.८ चौ. मैल होते. यापैकी ५९८.८ चौ.मैल. क्षेत्र ग्रामीण तर २९.० चौ. मैल क्षेत्र शहरी होते.[२१] इ. स. १९८१ च्या जनगणनेनंतर १३ ऑगस्ट १९८२ रोजी बार्शी तालुक्यातील **१)** येडशी **२)** दुधगाव **३)** गोपाळवाडी **४)** कोंबडवाडी **५)** कसबे तडवळे **६)** जवळे दुमाला **७)** अंबेजवळगे **८)** कौडगाव ही गावे उस्मानाबाद जिल्ह्यास जोडण्यात आली. त्यामुळे क्षेत्रफळाच्या दृष्टीने बार्शी तालुका सोलापूर जिल्ह्यामध्ये द्वितीय क्रमांकावर आला.[२२]

नकाशा क्र. ७

बार्शी तालुक्याचा उस्मानाबाद जिल्ह्याला जोडलेला प्रदेश




संदर्भ : CENCUS OF INDIA, SOLAPUR DISTRICT, इ. स. १९९१

१.११.४ लोकसंख्या

इ. स. १९५१ च्या जनगणनेच्यावेळी सोलापूर जिल्हा हा मुंबई प्रांताचा एक भाग होता. या जिल्ह्याच्या पाच ग्रामीण विभागापैकी पहिल्या विभागामध्ये ' बार्शी ' तालुक्याचा समावेश होता. तसेच ग्रामीण भागामध्ये राहणाऱ्या लोकसंखेचा विचार केल्यास सोलापूर जिल्ह्यामध्ये बार्शी तालुक्याचा प्रथम क्रमांक लागतो. याशिवाय ग्रामीण भागातील स्त्री-पुरूष संख्येच्या बाबतीतही सोलापूर जिल्ह्यामध्ये बार्शी तालुक्याचा प्रथम क्रमांक लागतो.[२३] इ. स. १९८१ च्या जणगणनेनंतर १३ ऑगस्ट १९८२ रोजी बार्शी तालुक्यातील ८ गावे उस्मानाबाद जिल्ह्यास जोडण्यात आली. त्यामुळे लोकसंख्येच्या दृष्टीने व लोकसंख्येच्या घनतेच्या दृष्टीने सोलापूर जिल्ह्यामध्ये बार्शी तालुका चौथ्या क्रमांकावर आला.[२४]

आलेख क्र .१

बार्शी तालुक्याची लोकसंख्या



(संदर्भ :- सोलापूर जिल्ह्याची जनगणना , जनगणना कार्यालय मोहता मार्केट, मुंबई, संबंधित वर्षे.)

१.११.५ पौराणिक, अध्यात्मिक व सांस्कृतिक महत्व

प्रभू रामचंद्र सीतेच्या शोधार्थ दंडाकारण्यामध्ये आले होते. या दंडाकारण्यामध्ये बार्शी तालुक्यातील येडशी जवळच्या जंगलाच्या परिसरामध्ये प्रभू रामचंद्र यांनी तीन दिवस वास्तव्य केले होते. या परिसरामध्ये पूर्वी ऋषीमुनी वेदशास्त्राचे अध्ययन करत होते. म्हणून पूर्वी या परिसराला वेदश्री म्हणत. पुढे काळाच्या ओघात याचा अपभ्रंश होऊन या परिसराला येडशी हे नाव पडले. याच परिसरामध्ये रामाने जटायूचा अंत्यविधी करून त्याची समाधी स्थापन केली.[२५] प्रभू रामचंद्र दररोज महादेवाची पूजा करत. येडशीच्या घनदाट जंगलामध्ये त्यांनी शिवलिंगाची स्थापना केली होती. त्यामुळे या परिसराला व तेथील मंदिराला रामलिंग या नावाने प्रसिध्दी मिळाली आहे.[२६] इ. स १९८१ च्या जनगणनेनंतर हे ठिकाण उस्मानाबाद जिल्ह्याला जोडण्यात आले आहे. येडशीच्या जंगलाच्या परिसरामध्ये ब्रिटिश काळामध्ये बांधलेले आणि ' दुर्गादेवी ' या नावाने प्रसिध्द असलेले हिलस्टेशन आहे. पूर्वीच्या वेदाभ्यासाची परंपरा दाखवणारे गुरूकुल नामक संस्कृत विद्यालय याच परिसरामध्ये आहे. येडशीच्या घनदाट जंगलामध्ये अनेक प्रकारच्या आयुर्वेदिक वनस्पती आहेत.[२७]

राजा अंबरीष हा एक श्रेष्ठ भक्त होता. ' कामंदकीय नितीसार ' या ग्रंथात भगवान परशुरामाबरोबर राजा अंबरीषचा अत्यंत गौरवपूर्ण उल्लेख आलेला आहे. श्रीमद्भागवत पुराणाच्या नवव्या स्कंधातील चवथ्या अध्यायामध्ये राजा अंबरीषाचे साधन द्वादशीचे व्रत, दुर्वास ऋषींनी त्याचे व्रतभंग करण्याचा केलेला निष्फळ प्रयत्न याची पौराणिक कथा आलेली आहे. सोलापूरचे कवी राम जोशी यांनी भगवंताचा महिमा सांगणारी लावणी रचली आहे. या भगवंताच्या मंदिरास इ. स. १७५९-६० मध्ये नानासाहेब पेशवे यांनी

मंदिराच्या खर्चासाठी सनद दिली. इ. स. १८७४ मध्ये इंग्रज सरकारनेही सनद दिली. तसेच अहिल्याबाई होळकर यांनी या मंदिरास देणगी दिली होती.[२८]

भारतात विष्णूच्या भगवंत रूपातील केवळ दोनच मंदिरे आहेत. यापैकी एक ' बार्शी ' येथे आहे तर दुसरे ' वाराणशी ' येथे आहे.[२९]

भगवंताचे हे मंदिर इ. स. १२४५ च्या सुमारास हेमाडपंती पध्दतीने बांधलेले आहे. भगवंताची मूर्ती गंडकी शिळेच्या गूळगूळीत काळया पाषाणाची आहे. भगवंताच्या उजव्या हाताखाली श्री अंबरीष राजाची प्रतिमा कोरलेली आहे. गाभाऱ्यासमोरील नक्षीदार खांबाचा मंडप दोनशे वर्षापूर्वीचा असावा असे देणगीदारांच्या उल्लेखावरून समजते. मंदिराच्या उत्तरेकडील ओवरीत भक्तराज श्री जोगापरमानंद यांची समाधी आहे. नामदेवकालीन महान संत मांदियाळीमध्ये बार्शीचे संत जोगा परमानंद यांचा समावेश होतो. महिपताच्या भक्तीविजय ग्रंथात जोगा परमानंद यांचा उल्लेख येतो. शिखांचा पवित्र ग्रंथ गुरूग्रंथसाहेब यामध्ये जोगा परमानंद यांच्या काही ओव्या आहेत. त्यामुळे अनेक शिख यात्रेकरू जोगा परमानंद यांच्या समाधीला भेट देतात. संत जनाबाईच्या एका अभंगानुसार विसोबा खेचरासारखे श्रेष्ठ संत देखील जोगा परमानंदाकडे आकर्षित झाले होते. संत नामदेवाचे गुरू विसोबा खेचर यांची समाधी बार्शी येथील उत्तरेश्वर मंदिराच्या पाठीमागे आहे. या गुरू-शिष्याची प्रथम भेट बार्शी येथील मल्लिकार्जुन मंदिरामध्ये झाली होती. ' द्वादशीचे गावी झाला उपदेश ' असे नामदेवाच्या एका अभंगामध्ये म्हटलेले आहे. पंढरपूरला एकादशी धरून बार्शीला भगवंताचे दर्शन घेऊन द्वादशी सोडण्याची परंपरा आजतागायत चालू आहे.[३०] मराठवाड्यातून पंढरपूरला जाणाऱ्या अनेक दिंड्या तसेच बार्शी तालुक्यातील काही गावातून जाणाऱ्या दिंड्यांची भगवंत ट्रस्ट मार्फत योग्य ती सोय केली जाते.[३१]

इ. स. १६९५ मध्ये मुघल बादशहा औरंगजेब सोलापूर जिल्ह्यातील ब्रह्मपूरी येथे मुक्कामी असताना त्याने आपला सरदार आसदखान यास बार्शीचे भगवंत मंदिर पाडण्याचा हुकूम दिल्याची माहिती मिळते.[३२]

त्याचबरोबर तालुक्यातील वैराग या गावी संतनाथ महाराज यांचे भव्य मंदिर असून, ते वैरागचे ग्रामदैवत आहे. या देवस्थानाची यात्रा मोठ्या प्रमाणात भरते. सोलापूर जिल्ह्यातील एक मोठी यात्रा म्हणून या ग्रामदैवताच्या यात्रेचा उल्लेख आढळतो.[३३]

भगवंताची बार्शी व तुळजाभवानीचे तुळजापूर या दोन तीर्थक्षेत्रांना जोडणाऱ्या रस्त्यावर बार्शीपासून २५ कि. मी. अंतरावर उपळे (दुमाला) हे ठिकाण तेथील प्राचीन रामेश्वराच्या मंदिरामुळे प्रसिध्द

आहे. रामेश्वराच्या मंदिरामुळे या गावाला रामनाथाचे उपळे म्हणूनही ओळखतात. प्रभू रामचंद्रांनी आपल्या दंडकारण्यातील वनवास काळात ज्या-ज्या ठिकाणी वास्तव्य केले, त्या ठिकाणी पूजा-अर्चा करण्यासाठी महादेवाच्या पिंडीची स्थापना केली जाते असे मानले जाते. भोगावती नदीच्या तीरावर हे गाव व मंदिर आहे. हे मंदिर हेमाडपंथी शैलीचे आहे. मंदिराच्या गाभाऱ्यात रामेश्वराची पिंडी आहे. श्रावण महिन्यामध्ये सकाळच्यावेळी सुर्याची किरणे या पिंडीवर पडतात.[३४]

शाहीर अमर शेखचे नाव घेताच लोकांना संयुक्त महाराष्ट्राचा लढा आठवतो. बार्शीतील मंगळवार पेठेमध्ये त्यांचे घर आहे. शाहिर आण्णाभाऊ साठे यांनी स्थापन केलेले लाल बावटा कला पथक अण्णाची लेखणी व अमर शेखांचा आवाज यामुळे भारतातच नव्हे तर, त्यांची रशियापर्यंत प्रसिध्दी गेली होती. बार्शी नगरपालिकेने या दोघांचे एकत्र पुतळे बसवून दोघांच्या मैत्रीला अखंडत्व दिले आहे.[३५] इ. स. १९४२ च्या चळवळीमध्ये मेहबूब पटेल भूमिगत झाला. पुढे हाच मेहबुब पटेल शाहीर अमर शेख बनला. शाहिर अमर शेख यांच्या आवाजाने शिवशाहिर बाबासाहेब पुरंदरे देखील प्रभावित झाले होते. त्यांनी अमर शेख यांचे तोंडभरून कौतुक केले होते.

इ. स. १८६३ मध्ये गोविंद जिवाजी व रामचंद्र मोरेश्वर साने यांनी बार्शी येथे सार्वजनिक वाचनालयाची स्थापना केली. बार्शीचा वकीलवर्ग पुढारलेला होता. यातूनच इ. स. १८९८ मध्ये गोविंद कृष्ण टिळक यांनी रिक्रिएशन क्लब स्थापन केला. इ. स. १९२४ मध्ये गोविंद कृष्ण टिळक व बाबाराव काळे यांनी पुढाकार घेऊन खास ब्राह्मणासाठी समर्थ व्यायामशाळेची स्थापना केली. इ. स. १९३४-३५ मध्ये भगिनी समाज स्थापन झाला. यातूनच पुढे महिला समाजाचा उदय झाला. याचे काम गोविंद कृष्ण टिळक यांच्या सौभाग्यवती पाहत होत्या. इ. स. १९३४ मध्ये स्थापन झालेल्या हरिजन सेवक संघाने गांधी छात्रालय स्थापन करून हरिजन उध्दाराचे मोलाचे कार्य केले. इ. स. १९३५-३६ मध्ये बार्शीत ब्राह्मण अनाथ विद्यार्थीगृह सुरू झाले.[३६]

बार्शी येथे इ. स. १९०२ मध्ये प्रसिध्द पत्रकार श्रीपादराव टिकेकर यांचा जन्म झाला. ' इंडियन टेक्सटाईल जर्नल ' मध्ये लेख लिहून त्यांनी इ. स. १९२० मध्ये आपल्या पत्रकारितेची सुरूवात केली. केसरी, क्रॉनिकल अशा वृत्तपत्रांतून त्यांचे लेख प्रसिध्द होऊ लागले. इ. स. १९३० मध्ये ते केसरीचे प्रतिनिधी म्हणून अफगाणिस्तानला गेले होते. महाराष्ट्रातील पहिला ' मुक्तपत्रकार जनक ' हा मान त्यांना मिळाला. त्यांच्यामुळेच लोकहितवादींची शतपत्रे मराठी वाचकांना उपलब्ध झाली.[३७]

बार्शीतील वेळापूरकर मठाचे मठाधिपती श्री. ष. बृ. १०८ गुरू मुक्तेश्वर शिवाचार्य वेळापूरकर महास्वामी यांना संपूर्णानंद संस्कृत विश्वविद्यालयाच्या दिक्षांत सोहळ्यामध्ये इ. स. १९८९ मध्ये उत्तर

प्रदेशचे तत्कालीन मुख्यमंत्री एन. डी. तिवारी व काशी नरेश यांच्या उपस्थितीत विश्वविद्यालय सुवर्ण पदक, अन्नप्रसाद मुखर्जी सुवर्ण पदक व जगद्गुरू विश्वआराध्य सुवर्ण पदक अशा तीन सुवर्ण पदकासह ' शक्ती विशिष्ठाद्वैत वेदांतचार्य ' ही पदवी मिळाली.[३८] विक्रम वडतीले याने कुस्तीच्या माध्यमातून तर, प्रार्थना ठोंबरे हिने टेनिसच्या माध्यमातून बार्शी तालुक्याचे नाव जागतिक पातळीवर पोहचविले. नऊ वर्षाच्या सौरभ मोरे या बालकीर्तनकाराने जगामध्ये इंग्रजीतून पहिल्यांदा कीर्तन करण्याचा मान मिळविला. तो बार्शी तालुक्यातील ' साकत ' या गावचा आहे.[३९]

१.११.६ शैक्षणिक वाटचाल

बार्शी तालुक्यातील प्राथमिक शिक्षणाचा श्री गणेशा मुलांची मराठी शाळा नं १ ने झाला. या शाळेत पहिली पासून ते सातवी पर्यंत शिक्षणाची सोय होती. इ. स. १८३९ पासून या शाळेचा उल्लेख येतो. त्यावेळी शाळेच्या पटावर १४९ मुले होती. इ. स. १८६४ साली या शाळेचा कारभार बार्शी नगरपालिकेच्या ताब्यात आला. ही शाळा तालुक्याचा शैक्षणिक केंद्रबिंदू होती. या शाळेमार्फत तालुक्याच्या इतर शाळांचा कारभार पाहिला जात होता. बार्शी नगरपालिकेने इ. स. १९१४ मध्ये या शाळेची दुमजली दगडी इमारत बांधली. शिवाय या शाळेच्या आवारात एक व्यायामशाळा होती. या सर्व वास्तू आजतागायत सुस्थितीमध्ये आहेत. या शाळेतून अनेक नामवंत विद्यार्थ्यांची जडण-घडण झाली.[४०]

इ. स. १८६९ मध्ये सोलापूर जिल्ह्यामध्ये सर्वप्रथम बार्शी येथे मुलींची शाळा उघडण्यात आली. पुढील १० वर्षात शाळांची संख्या ३ होऊन या शाळेत १११ विद्यार्थी शिकत होते. इ. स. १८८२-८३ मध्ये ही संख्या ४ वर जाऊन या शाळेतील विद्यार्थीसंख्या १७६ झाली. याच कालावधित बार्शी शहरामध्ये ४ सरकारी शाळा होत्या व या शाळेत ३२३ विद्यार्थी होते. वैरागमध्ये १ शाळा होती. त्या शाळेत ८० विद्यार्थी शिक्षण घेत होते.[४१] इ. स. १८८२-८३ मध्ये सोलापूर जिल्ह्यातील शहरी भागामध्ये १५४ सरकारी शाळा सुरू करण्यात आल्या होत्या. तर ग्रामीण भागामध्ये प्रत्येकी चार खेडयांसाठी १ शाळा देण्यात आली होती. यावेळी बार्शी तालुक्यामध्ये २४ शाळा होत्या.[४२] कर्मवीर मामासाहेब जगदाळे यांनी गोरगरीब मुलांना शिक्षण मिळावे म्हणून ५ ऑगस्ट १९३४ रोजी श्री शिवाजी मराठा बोर्डिंग सुरू केले. इ. स. १९४७ मध्ये मामांनी या बोर्डींगचे " श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ " यामध्ये रूपांतर करून बार्शी तालुका व उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये शिक्षण प्रसार करण्याचे महान कार्य केले.[४३]

इ. स. १९६९-७० मध्ये श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाची स्थावर मालमत्ता २३,७७,६७४ इतकी होती. वार्षिक उत्पन्न १४,७६,८२३ इतके होते. तर खर्च १२,८१,५६३ इतका होता. ऑक्टोबर १९६५

मध्ये बार्शी येथे " भारत शिक्षण प्रसारक मंडळ " स्थापन झाले. या संस्थेचेही बार्शी तालुक्याच्या शिक्षण विकासामध्ये महत्वाचे योगदान आहे.[४४]

लोकमान्य टिळकांचा प्रभाव असलेले भगवंत पंढरीनाथ ऊर्फ काकासाहेब सुलाखे यांनी बार्शी येथे न्यू इंग्लीश स्कूलची स्थापना केली. याचेच पुढे सुलाखे हायस्कूलमध्ये रूपांतर झाले. बार्शी तालुक्याच्या शैक्षणिक जडणघडणीमध्ये या हायस्कूलचे मोठे योगदान आहे. इ. स. १९५४ मध्ये भाऊसाहेब झाडबुके यांनी बार्शी येथे बार्शी शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना केली. आपल्या संस्थेच्या माध्यमातून त्यांनी बार्शी तालुका व आसपासच्या परिसरातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची सोय केली.[४५] बार्शी तालुक्यातील मळेगाव येथे कर्मवीर गडसिंग गुरूजी यांनी " नर्मदेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ " स्थापन केले. आपल्या संस्थेच्या माध्यमातून त्यांनी बार्शी तालुका तसेच पुणे जिल्हा व कोकणमध्ये शिक्षण प्रसाराचे महान कार्य केले.[४६]

१.११.७ व्यापारी महत्व

' बार्शी ' हे सोलापूर जिल्ह्यातील सर्वात महत्वाचे व्यापारी ठिकाण होते. निजामाच्या राज्यातील सर्व प्रकारचा माल बार्शी मार्गेच पश्चिमेकडे पाठविला जात असे. बालाघाटातील लातूर, गंगाखेड, मोमीनाबाद, नांदेड, पाथरी, हिंगोली आणि बीड या ठिकाणाहून मागवलेला माल व्यापाऱ्यांना बार्शीमार्गेच न्यावा लागत असे. बार्शी हे निजाम व मोगल यांच्या सीमेवरील ठिकाण असल्याने या ठिकाणी मालाची देवाण-घेवाण फार मोठ्या प्रमाणात होत असे. या ठिकाणी मुंबईचे व स्थानिक व्यापारी यांच्या शिवाय युरोपीय व्यापारी व्यापार करत होते. जिल्ह्यातील व्यापाराचे एक वैशिष्टय म्हणजे दलाल होय. त्यांचे या पेठेवर वर्चस्व होते. धान्याच्या किमती कमी-जास्त झाल्या तरी त्याचा यांच्या उत्पन्नावर परिणाम होत नसे. कारण मालाचे कमिशन ठरल्याप्रमाणे त्यांना मिळत असे.[४७]

इ. स. १७९५ मध्ये पेशवे आणि निजाम यांच्यात खड्र्याची लढाई झाली. खड्र्याकडे जाताना निजामाच्या सैन्याने बार्शी पेठ लुटली व या पेठेची खूप नासधूस केली. पानिपत युध्दाच्यावेळी बार्शी परगण्यातील १२ गावांची कमाविशी पेशव्यांनी भगवान शामराव यास सांगितली होती. कसबे बार्शी येथील पेठ याकूदपूर वैराण आहे अशी नोंद आहे. यावरून पूर्वी बार्शीच्या पेठेला ' याकुदपूर ' म्हणत असावेत. दुष्काळामुळे बार्शीची पेठ वैराण झाली होती. तरी पुन्हा नवी पेठ वसविण्यासाठी भगवान शामराव यास माधवराव पेशवे यांनी इ. स. १७७७-७८ मध्ये हुकूम दिला होता. वाणी, उदमी यांना सात सालचा कौल दिला. पेठ वसाहतीसाठी जमीन दिली. रामशास्त्री प्रभुणे हे पेशव्यांचे न्यायाधीश होते. याच रामशास्त्री प्रभुणे यांनी बार्शी पेठेतील एका प्रकरणाचा निवाडा दिला होता.[४८]

अशा प्रकारे ऐतिहासिक काळापासून बार्शी हे व्यापारी उलाढालीचे महत्वाचे केंद्र होते. त्याकाळी दळणवळणाची साधने आजच्या इतकी प्रगत नव्हती. बैलाच्या पाठीवर मालाच्या गोण्या टाकून मालाची वाहतूक केली जात असे. इ. स. १८५९-६० पर्यत बार्शी तालुक्यातील वैराग हे गाव व्यापारामध्ये बार्शीच्या पुढे होते. इ. स. १८५९-६० ला कुर्डूवाडीला रेल्वे लाईन आली. पुढे बार्शी-कुर्डूवाडी सडक तयार झाली व तेंव्हापासून बार्शीला खरे व्यापारी महत्व प्राप्त झाले. १९ व्या शतकाच्या अखेरीस मराठवाड्यात पिकलेल्या मालाची बाजारपेठ व मराठवाड्याला लागणाऱ्या मालाची उतारपेठ म्हणून बार्शीची सर्वत्र ख्याती झाली. याच काळात बार्शीचे व्यापारी संबंध इतर महत्वाच्या शहराशी जोडले गेले. ब्रिटिश व डच कंपन्याशी संपर्क ठेवता यावा म्हणून बार्शीचे श्री. महादप्पा शेठ कथले यांनी मुंबई व कलकत्ता या ठिकाणी त्याकाळी आपल्या पेढ्या सुरू केल्या होत्या. १९ व्या शतकाच्या अखेरीस येथील अडत बाजाराची व्याप्ती खूप वाढली. सध्या तेलबिया, अन्नधान्य, द्विदल जिनसा, गूळ, हळद यांचा व्यापार मोठ्या प्रमाणात चालतो.[४९]

१.११.८ आठवडी बाजार व यात्रा

प्राथमिक बाजार म्हणजेच 'आठवडी बाजार' होय. आठवड्यातून एका विशिष्ट दिवशी हा बाजार भरतो. हिंदुस्थानमधील बहुतेक मोठ्या खेड्यामध्ये असे बाजार नियमित भरतात. आठवडी बाजारालाच उत्तर प्रदेश, बिहार, ओरीसा, बंगाल व मध्य प्रदेश या राज्यामध्ये ' हाट ' असे म्हणतात. तर दक्षिणेतील काही राज्यात आठवडी बाजाराला ' शंडी ' असे म्हणतात. या बाजाराचे व्यवस्थापन व संघटन साधारणत: ग्रामपंचायतीकडे असते. पूर्वी आपल्या देशामध्ये जमिनदारी पध्दती अस्तित्वात असताना बिहार, ओरिसा, बंगाल या राज्यात जमिनदारच स्वत: ही जबाबदारी पार पाडत. पुढे जमिनदारीचा शेवट झाल्याने हे काम ग्रामपंचायतीकडे आले. याच्या मोबदल्यामध्ये ग्रामपंचायतीला विक्रीसाठी माल आणणाऱ्या शेतकऱ्यांकडून माल विक्रीसाठी वापरलेल्या जागेबद्दल, मालाच्या विक्रीवरील व पंचायतीकडून पुरविलेल्या सेवा असे तीन प्रकारचे कर मिळत.[५०]

इ. स. १८८४ अखेर सोलापूर जिल्ह्यामध्ये ४२ आठवडी बाजार भरायचे. यापैकी ४ बार्शी तालुक्यातील बार्शी, तडवळे, पांगरी, वैराग या ठिकाणी भरायचे. या बाजारामध्ये विविध धान्य, मसाले, कापूस, कापड, सूत, मातीची भांडी, तूप, चमडा यासारख्या वस्तू बाजारामध्ये विक्रीस येत. संपूर्ण दिवसभर हा बाजार चालत असे.

तक्ता क्र .२

बार्शी तालुक्यातील आठवडी बाजार

वार	आठवडी बाजार भरणारी गावे
सोमवार	येडशी, मालवंडी, गौडगाव
मंगळवार	कसबे तडवळे, भातंबरे
बुधवार	वैराग
गुरूवार	चारे, शेळगाव
शुक्रवार	कारी, आळजापूर
शनिवार	बार्शी
रविवार	पांगरी, मौजे तडवळे, मालेगाव


(संदर्भ :-सोलापूर जिल्ह्याची जनगणना , इ. स. १९६१, पृष्ठ क्र २३१.)

अशा बाजारामध्ये दुकानदाराशिवाय लमाणी-फेरीवाल्यांकडून विविध वस्तू विकल्या जायच्या. लमाणी लोक व्यापाऱ्यांकडून वस्तू विकत घेऊन मोक्याच्या ठिकाणी तसेच निजामाच्या प्रदेशात विकायचे. मालाच्या वाहतुकीसाठी बैलगाड्याचा वापर करायचे. पुढे रेल्वे वाहतुकीमुळे यांचा व्यापार नामशेष झाला. खेड्यामध्ये सुतार, कुंभार हे लोक पावसाळयामध्ये विविध वस्तूंची निर्मिती करून त्याची गावोगावी फिरून विक्री करत. असे अनेक घटक या आठवडी बाजाराशी निगडित होते. सोलापूर जिल्ह्यामध्ये जनावरांचे मोठे बाजार भरतात. यामध्ये बार्शी तालुक्यातील बार्शी, वैराग आणि येडशी या ठिकाणचे जनावरांचे बाजार उल्लेखनीय आहेत. या बाजारामध्ये खिल्लारी, घीर जातीची जनावरे, पंढरपुरी म्हैस खूप प्रसिध्द आहे.[५१]

वर्षातून विशिष्ट ठिकाणी ठराविक वेळेस धार्मिक कारणाच्या निमित्ताने जमणाऱ्या समुदायाला 'जत्रा' असे म्हणतात. जत्रेमध्ये येणाऱ्या व्यक्ती प्रामुख्याने यात्रेकरू, हौशी प्रवाशी व या निमित्त आपल्या मालाची विक्री करणारे व्यापारी अशा तीन प्रकारच्या असतात. जत्रेच्या निमित्ताने ग्रामीण भागामध्ये आवश्यक असणाऱ्या उपभोग्य वस्तूंची खरेदी-विक्री मोठ्या प्रमाणावर होत असल्यामुळे या जत्रांचे व्यापारविषयक दृष्टीकोनातून महत्व कायम आहे. आपल्या देशातील बहुतेक जत्रा ऑक्टोबर ते मे या दरम्यान भरतात. पूर्वी या जत्रांची सर्व जबाबदारी जमिनदार पाहत असत. जमिनदारी पध्दती नष्ट केल्यामुळे सध्या या जत्रांची जबाबदारी जिल्हाधिकारी पाहतात.[५२]

नकाशा क्र. ८

सोलापूर जिल्ह्यातील आठवडी बाजार



संदर्भ : CENSUS OF INDIA १९६१, VOL. X, MAHARASHTRA, PART. VIIC, WEEKLY MARKETS IN MAHARASHTRA.

इ. स. १९६०-६१ पर्यंत बार्शी तालुक्यामध्ये १४ ठिकाणी आठवडी बाजार भरत होते. या बाजाराच्या माध्यमातून संबंधित बाजार ठिकाणी फार मोठी आर्थिक उलाढाल घडून येते. बार्शी तालुक्यामध्ये जवळ-जवळ २९ गांवामध्ये मोठ्या स्वरूपाच्या वेगवेगळया देवतांच्या यात्रा भरतात. यापैकी बार्शी शहरामध्ये भगवंत व मल्लिकार्जुन, वैराग येथे संतनाथ, धामणगाव (दुमाले) येथे माणकोजी बोधले बुवा, मालेगाव येथे नागनाथ, उपळे दुमाला येथे महादेव, येडशी येथे रामलिंग, सासुरे येथे महांकाळेश्वर, बावी येथे खंडोबा, पानगाव येथे भैरोबा, गोरमाळे येथे सिध्देश्वर या देवतांच्या यात्रा मोठ्या स्वरूपात भरतात. या यात्रेच्या माध्यमातून फार मोठी आर्थिक उलाढाल होते.[५३] इ. स. १९९० अखेर बार्शी तालुक्यामध्ये भरणाऱ्या आठवडी बाजारांची संख्या १६ झाली होती.[५४]

ग्रामीण जीवनामध्ये या आठवडी बाजारांचे महत्व अनन्यसाधारण असे होते. लोकांना हव्या असणाऱ्या दैनंदिन वापराच्या वस्तू आपल्या गावाशेजारी विविध गावी भरणाऱ्या आठवडी बाजारांतून मिळत त्यामुळे लोकांचा पैसा व वेळ या दोन्हींची बचत होत असे. शिवाय लोकांचे परस्पर संबंध दृढ होण्यास मदत होत असे. लोक जातीधर्म विसरून जत्रेच्या माध्यमातून एकत्र येत. यातून सामाजिक सलोखा निर्माण होण्यास मदत झाली. पूर्वी अनेकांचे विवाह या यात्रेच्या ठिकाणी ठरत. तर काही प्रसंगी ते त्याच

ठिकाणी होत. यामागे धार्मिक भावना असल्या तरी, त्यामुळे पैशांचीही बचत होत असत. थोडक्यात ग्रामीण जीवनाच्या वाटचालीत अशा यात्रांचे एक वेगळेच स्थान आहे.

१.११.९ पाथरी-बार्शी पाणीपुरवठा योजना

इ. स. १८९१ मध्ये बार्शी शहराची लोकसंख्या २०,०९४ इतकी होती. शहरातील विहीरी व जय शंकर मिल समोरील तलाव यावरच हे शहर पाण्यासंदर्भात अवलंबून होते. एखाद्यावर्षी अवर्षण पडले तर लोकांचे पाण्यासाठी प्रचंड हाल होत. यातून मार्ग काढण्यासाठी बार्शी नगरपालिकेने बार्शीपासून १२ मैलावर असणाऱ्या पाथरी येथून पाणी आणण्याचे ठरविले. शिवाय पाथरी तलाव बार्शी शहरापेक्षा उंचीवर असल्याने उताराने पाणी येणे शक्य होते.[५५]

बार्शी नगरपालिकेने ही पाथरी - बार्शी पाणीपुरवठा योजना पूर्ण करण्यासाठी आपल्या दर वर्षीच्या अर्थसंकल्पात १० वर्षासाठी ५,००० रू. ची तरतूद केली होती. कारण बार्शी नगरपालिकेने मागितलेल्या कर्जाला मुंबई सरकारने मान्यता दिलेली नव्हती. त्यामुळे हे पाणीपुरवठा योजनेचे काम थांबलेले होते. या पाथरी - बार्शी पाणीपुरवठा योजना नगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्याआगोदर या योजनेवर तत्कालीन मुंबई सरकारचा २१,००० रू. खर्च झाला होता. त्याची माहिती खालीलप्रमाणे.

१) मुख्य पाईप लाईन :-१४,००० रू.
२) बांधकाम व इतर साहित्य :-७,००० रू.

या पाथरी - बार्शी पाणीपुरवठा योजना पूर्ण करण्यासाठी ०५,०३,३१०रू खर्च अपेक्षित होता. त्याची माहिती खालीलप्रमाणे.

१) सरकारी कर्ज :- ०२,३५,००० रू.
२) सरकारी अनुदान :- ०२,६१,५०० रू.
३) नगरपालिका निधी :- ०६,८१० रू.

या पाणी पुरवठा योजनेचे अपूर्ण काम पूर्ण करण्यासाठी बार्शी नगरपालिकेने त्यांचा प्रस्ताव सादर करावा असा आदेश तत्कालीन कमिशनरने या नगरपालिकेला दिला होता. या कामाच्या सुधारित आराखड्यानुसार या कामाची अंदाजे नवी किंमत ०६,०३,८९३ रू इतकी झाली. ही रक्कम शासनाकडून मंजूर होण्यापूर्वी सार्वजनिक बांधकाम खात्याकडून या नगरपालिकेने आगाऊ रक्कम घेऊ नये. ती नगरपालिकेने स्वत:च्या तिजोरीतून खर्च करावी असे शासनाकडून बार्शी नगरपालिकेस सांगण्यात आले होते.[५६]

सुरूवातीला शासनाने या कामाकरिता ०४,७३,०८७ रू. इतकी रक्कम मंजूर केली. शिवाय सुलाखे मिल ते बार्शी स्पिनिंग मिल दरम्यान ४ इंची पाईपलाईन टाकण्याकरिता शासनाने १३,७७१ रू. मंजूर केले होते. त्यावेळी ई. एम. डुग्गन हे सरकारी सचिव होते.[५७]

तत्कालीन मुंबई सरकारने या पाथरी-बार्शी पाणीपुरवठा योजनेच्या कामाला १० जून १९१३ रोजी मंजुरी दिली. त्यावेळेचा या कामावरील अंदाजीत खर्च ०४,७३,००७ रू. इतका होता. यापैकी ०२,३५,००० रू. सरकारने अनुदान स्वरूपात बार्शी नगरपालिकेला दिले. तर ०२,३५,००० रू. ४ टक्के दराने २० हप्त्यामध्ये परत करण्याच्या अटीवर दिले. डिसेंबर १९१५ मध्ये या कामाची प्रत्यक्ष सुरूवात झाली. दुसऱ्या महायुध्दामुळे वस्तूंच्या किमती वाढल्यामुळे नियोजित रकमेमध्ये काम पूर्ण होणे शक्य नसल्याने शासनाने ७ नोव्हेंबर १९१९ रोजी १३,६७१ रू. वाढवून दिले. याचबरोबर बार्शी नगरपालिकेचा ५०,००० रू. मागणीचा अर्ज शासनाने नाकारला. याउलट अधिकच्या खर्चासाठी २५,००० रू. कर्ज मागणीच्या सूचना केल्या. मात्र बार्शी नगरपालिकेच्या अस्थिर आर्थिक परिस्थितीमुळे ही सूचना सरकारने मान्य केली नाही. अधिकच्या अनुदानाद्वारे हे काम ३१ मार्च १९२१ पर्यंत चालू होते. त्यानंतर ते पुन्हा निधी अभावी थांबले. पुढे इ. स. १९२५-२६ च्या दरम्यान मुख्य लाईन पूर्ण झाली होती परंतू इतर छोट्या लाईनचे काम अपूर्ण होते. बार्शी नगरपालिकेने हे काम पूर्ण करण्यासाठी स्वत:च्या निधीतून २३,६९७ रू. खर्च केले. १५फेब्रुवारी १९२७ ला मुख्य अभियंत्याने हे काम बार्शी नगरपालिकेकडे सुपूर्त केल्याचा अहवाल दिला. पुढे इ. स. १९२९ मध्ये ही पाथरी-बार्शी पाणीपुरवठा योजना पूर्ण झाली.[५८]

या पाणीपुरवठा योजनेमुळे बार्शी शहराच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटला. कै. रामचंद्र मोरेश्वर ऊर्फ भाऊसाहेब साने यांनी या पाथरी-बार्शी पाणीपुरवठा योजनेच्या कामासाठी सरकारशी पत्रव्यवहार करून सातत्याने पाठपुरावा केला. कै. गोविंद कृष्णाजी टिळक यांच्या काळात पाथरी तलावाचे पाणी बार्शी शहरात प्रत्यक्ष नळाने मिळण्यास सुरूवात झाली.[५९]

१.११.१० बार्शी लाईट रेल्वे

ब्रिटिश सरकारने भारतात रेल्वेचे जाळे विणण्याचे निश्चित केल्यानंतर त्यांनी हे काम खाजगी कंपन्यांना दिले. यातूनच इ. स. १८४९ मध्ये " दि ग्रेट इंडियन पेनुसुला रेल्वे " या खाजगी कंपनीने भारतात रेल्वे रूळ उभारणीचे काम सुरू केले. यानंतर पुढे ११ वर्षांनी इ. स. १८६० मध्ये सोलापूर जिल्ह्यामध्ये रेल्वेचे आगमन झाले.[६०] ' बार्शी लाईट रेल्वे कंपनी ' आणि ' निजाम सरकार' यांच्यामध्ये २१ एप्रिल १९०९ रोजी झालेल्या ' लातूर एक्स्टेंशन ' करारानुसार इ. स. १९११ मध्ये मिरज-लातूर नॅरोगेज रेल्वेमार्ग सुरू करण्यात आला. पूर्वी या रेल्वेस बार्शी लाईट रेल्वे म्हणून ओळखले जात होते.[६१]

लातूर-मिरज या रेल्वेमार्गाची एकूण लांबी १८६.९० कि. मी. असून या मार्गावर २३ स्थानके आहेत. सामान्यपणे दोन स्थानकामधील अंतर ९.८ कि.मी आहे. या मार्गावरील २३ स्थानकापैकी येडशी, रामलिंग, पांगरी, कुसळंब, बार्शी, उपळाई व शेंद्री ही ७ स्थानके बार्शी तालुक्यातील आहेत. या नॅरोगेज रेल्वेमार्गचे ब्रॉडगेज रेल्वेमार्गामध्ये रूपांतर करण्याच्या कामाला सुरूवात झाल्यामुळे कुर्डूवाडी मार्गे हा भाग मुंबई- मद्रास या ठिकाणाशी जोडला गेला. त्यामुळे या भागाच्या विकासाला चालना मिळाली.[६२] सध्या हे काम पूर्ण झाले असून या रेल्वेमार्गामुळेच मालाची ने-आण जलद गतीने शक्य झाली आहे. शिवाय संपूर्ण भारतातील महत्वाच्या बाजारपेठेशी बार्शी जोडली गेली. थोडक्यात या रेल्वेने बार्शी तालुक्याच्या आर्थिक समृध्दीचा पाया भक्कम करण्यात बहुमुल्य योगदान दिले आहे.

१.११.११ बार्शी शहर

' बार्शी ' हे शहर आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व राजकीयदृष्टया खूप महत्वाचे आहे. बार्शीचे मूळ नाव ' द्वादशीक्षेत्र ' असे होते. द्वादशी या संस्कृत शब्दास प्राकृत भाषेत बारस असा शब्द आहे. यावरून बारस-बारसापूर-बार्शी असे नाव तयार झाले.[६३] येथेच विसोबा खेचर समाधिस्त झाले.[६४]

इ. स. १६९१ मध्ये छत्रपती राजाराम महाराज यांनी नागोजी माने याला सरदेशमुखीसाठी जे मुलूख दिले होते त्यामध्ये बार्शी हे ठिकाण होते. इ. स. १७६४ मध्ये पेशवे माधवराव यांच्या इच्छेप्रमाणे राघोबादादा (रघुनाथराव) हैदर अलीविरूध्दच्या मोहीमेसाठी कर्नाटककडे निघाले. त्यांचा प्रवास सीना नदीच्या काठाने चालू होता. यावेळी ते बार्शी-पानगाव जवळ भुईंज पिंपरी येथे मुक्कामास आले होते. त्यावेळी बार्शी-पानगाव हा निंबाळकरांच्या जहागिरीचा महाल होता. या महालातून राघोबादादाने घासदाना म्हणून निंबाळकराकडून पावनेतीन लाख रूपये खंडणी घेतली होती. बार्शी परगण्याची जहागिरी मुधोजी नाईक निंबाळकर आणि कृष्णाजी नाईक निंबाळकर यांच्याकडे चालत आलेली होती. निंबाळकराच्या गैरहजेरीमध्ये बहिरोराम याने बार्शी परगण्यातील बावी, सौदरे, तांदूळवाडी, शेलगाव ही ठाणी घेतली होती. इ. स. १७४६-४७ मध्ये बावी ठाण्याखेरीज बाकीची ठाणी निंबाळकरांना परत करावी असा हूकुम पेशव्यांनी बहिरोरामला दिला होता. हा करकंभचा ठाणेदार होता. राक्षसभूवनची लढाई मराठ्यांच्या इतिहासामध्ये एक महत्वाची लढाई मानली जाते. माधवराव पेशवे निजामाकडे जाताना वाटेत मोगलांचा मुलूख नासधूस करत जात होते. त्यांनी बार्शी परगण्यांची खूप खराबी केली होती.[६५]

बार्शी शहरामध्ये वीरशैव लिंगायत समाजाचे अनेक मठ आहेत. तेथील मठाचे मठाधिश जगत्गुरूच्या मार्गदर्शनाखाली विविध धार्मिक उपक्रम, संस्कृत पाठशाळा चालवितात. श्रीमद् जगत्गुरू पंचाचार्यापैकी जगत्गुरू श्री. प्रसन्न रेणुकाचार्य रंभापुरी महास्वामी बार्शीचे रहिवाशी आहेत, ही बार्शीच्या

दृष्टीने अभिमानाची बाब आहे. इ. स. १९३२ मध्ये राचलिंग महाराजांनी सूरू केलेले ' वीरशैव गर्जना ' या साप्ताहिकाचे संपादकत्व पुढे रेवनसिध्द शिवाचार्य परंडकर महाराज यांच्याकडे आले.[६६]

इ. स. १९५४ मध्ये परंडकर महाराज यांचा बार्शीतील भगवंत मैदानावर चार जगत्गुरूंच्या उपस्थितीमध्ये पट्टाभिषेक सोहळा मोठ्या दिमाखात संपन्न झाला होता. परंडकर महाराजांनी बार्शीच्या पाण्याचा प्रश्न चांदणी प्रकल्पाच्या माध्यमातून मार्गी लावण्यामध्ये मोठे योगदान दिले. त्यापूर्वीचे परंडकर मठाचे मठाधिश राचलिंग महाराजांनी जय शंकर मिल, पाठशाळा तसेच वीरशैव बोर्डिंग यांच्या स्थापनेमध्ये अनन्यसाधारण योगदान दिले.[६७]

बार्शी शहरातील हे मठ वीरशैव समाजाचे असले तरी काही मठाचे अध्यक्ष मुस्लिम, ब्राह्मण, मराठा, खाटिक या जातीचे होते. या मठांनी सर्वधर्मसमभाव जोपासून बार्शीच्या सांस्कृतिक क्षेत्रामध्ये मौलिक योगदान दिले आहे. उदा :-औंधकर मठाचे अध्यक्ष वकील अब्दुल गन्नी हे आहेत. या मठांच्या माध्यमातून सर्व उत्सव साजरे केले जातात. गणेशोत्सव फार मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. तसेच मोहरमही प्रत्येक मठातून साजरा केला जातो. प्रत्येक मठाच्या स्वतंत्र सवाऱ्या आहेत. यापैकी माणूरकर मठाच्या झेंडे सवारीला पहिला मान आहे.[६८]

सोलापूर जिल्ह्याच्या चार शहरी विभागापैकी दुसऱ्या विभागामध्ये ' बार्शी शहराचा ' समावेश होता. इ. स. १९६१ च्या जनगणनेनुसार पंढरपूर, सांगोला, सोलापूर व कुर्डूवाडी येथील नगरपालिका १०० वर्षापेक्षा जास्त जुन्या होत्या, तर बार्शी व करमाळा येथील नगरपालिका जवळ-जवळ १०० वर्षाच्या होत्या. इ. स. १९६१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येपैकी २७.९५% लोकसंख्या जिल्ह्यातील १० नगरपालिका क्षेत्रामध्ये वास्तव्यास होती. यामध्ये बार्शी शहराची लोकसंख्या ५०,३८९ इतकी होती. जिल्ह्यामध्ये बार्शी व उत्तर सोलापूर या तालुक्यांची लोकसंख्येची घनता सर्वाधिक होती. कारण सोलापूर जिल्ह्यातील ही मोठी शहरी केंद्रे आहेत. इ. स. १९५१ मध्ये बार्शी तालुक्याची लोकसंख्येची घनता २९८ दर चौ. मैल इतकी होती, तर इ. स. १९६१ मध्ये ३५२ दर चौ. मैल इतकी होती.[६९]

तक्ता क्र .३

सोलापूर जिल्ह्यातील नगरपालिकांचे उत्पन्न (प्रमाण : आकडे हजारात)

नगरपालिका	१९६१-६२	१९६४-६५	१९७१-७२	१९७४-७५	१९८१-८२	१९८४-८५	१९९०-९१
बार्शी	९१०	११५६	३०५१	४३३४	१००३३	१७७६०	५१,७३१

आक्कलकोट	१९१	१७१	५३९	८०४	३८७०	६८४१	२४१५४
दुधनी	४७	४५	१७६	२११	५४८	१२१०	३२२३
मैंदर्गी	३८	२७	९४	१२८	६२४	२३१५	२०१४
मंगळवेढे	१००	१०५	३२९	५०८	१३४२	३०६६	९१२६
पंढरपूर	५८४	६५७	२५४८	३२०२	१०६३८	१५८३८	४५०२१
सांगोला	५२	६९	२७९	२४६	११०५	१७८९	७६५२
करमाळा	१७२	१५१	४५५	५६३	१९०७	२६९५	१३४५४
कुर्डूवाडी	१५३	२४२	४१६	५९९	१६२९	४५१८	१०३४८

(संदर्भ : सामाजिक आर्थिक विवेचन, सोलापूर जिल्हा)

सदर तक्त्यावरून असे लक्षात येईल की सोलापूर जिल्ह्यामध्ये बार्शी नगरपालिकेचे उत्पन्न सर्वाधिक होते. पंढरपूर नगरपालिकेचा अपवाद वगळता बार्शी नगरपालिकेच्या उत्पन्नाच्या जवळपासही सोलापूर जिल्ह्यामधील इतर कोणत्याही नगरपालिकेचे उत्पन्न दिसत नाही. यावरून बार्शी नगरपालिकेची व पर्यायाने बार्शी शहराची आर्थिक समृध्दी लक्षात येईल.

इ. स. १९६९ मध्ये बार्शी नगरपालिकेचे उत्पन्न २५,१७५ रू इतके होते. तर विविध सेवांवरती २७,३६९ इतका खर्च करण्यात आला. उत्पन्नाच्या संदर्भात सोलापूर जिल्ह्यामध्ये बार्शीचा प्रथम क्रमांक होता. कासारी, आळजापूर व आंबेगाव ही बार्शी तालुक्यातील बार्शी शहरापासून सर्वाधिक जास्त अंतरावरील गावे होती, तर अलिपूर हे बार्शी शहरापासूनचे सर्वात जवळचे गाव होते. इ. स. १९६९ अखेर बार्शी शहरामध्ये ४४.५४ कि. मी. लांबीचे पक्के रस्ते तयार झाले होते. तर २.३६ कि. मी. लांबीचे कच्चे रस्ते तयार झाले होते. सांडपाण्याची व्यवस्था उत्तम होती. शहरातील मैला वाहून नेहण्यासाठी ट्रॅक्टरची सोय होती. ढकलगाडी व पाण्याच्या टाकीद्वारे पाणीपुरवठा केला जात होता. शहरामध्ये अग्निशामक दलाची सेवा उपलब्ध होती. याशिवाय रस्त्यावरील दिव्यांची संख्या ९२० इतकी होती.[७०]

पूर्वीपासून बार्शी शहराचे दोन विभाग होते. १) पेठकर २) कसबेकर. या दोन्ही विभागामध्ये वर्चस्वाच्या माध्यमातून नेहमी चुरस लागत असे. या दोन्ही विभागाच्या स्वतंत्र व्यायामशाळा होत्या. त्यांची माहीती पुढीलप्रमाणे.

१) घोडेगल्ली व्यायामशाळा (तालिम): या तालमीचे संस्थापक व वस्ताद बाबाय्या राचय्या हे होते. सुमारे १५० वर्षापूर्वी त्यांनी या तालमीची उभारणी केली. स्वत: जंगम असले तरी यांचे दैवत मौलाली हे होते. मोहरम उत्सव हे फार मोठ्या प्रमाणात साजरा करत. बाबाय्यांच्या मृत्यूनंतर त्यांचे चिरंजिव आप्पय्या यांनी

त्यांचा वारसा पुढे चालविला. घोडेसवारीमध्ये ते खूपच पटाईत होते. यांनी बार्शीमध्ये अनेक नामवंत पैलवान घडविले. यामध्ये मुकाराम पैलवान, अपुने पैलवान, चाँद वस्ताद, किसन नायकू, सूर्यभान सुपेकर, निवृत्ती गव्हाणे, पंढरी अवधूत यांचा आवर्जून उल्लेख करावा लागतो. यापैकी सूर्यभान सुपेकर यांनी पतियाळा येथे सिलोनच्या नामवंत मल्लाला कुस्तीत पराभूत केले होते.

२) कसबेकर व्यायामशाळा (गंगारामभाई वस्ताद तालिम बाणेकरी) : या तालमीचे संस्थापक व वस्ताद ' गंगारामभाई ' हे मूळचे बार्शी जवळील परांडा येथील होते. गन्नी साहेब या नामवंत पैलवानाला यांनीच घडविले. या गन्नी साहेबांनी घोडेगल्ली व्यायामशाळेचा प्रसिध्द मल्ल अपुने पैलवान याचा पराभव केला तेव्हा त्यांची बार्शी शहरातून हत्तीवरून मिरवणूक काढली होती. या तालमीचे मल्ल नाना काळे हे ऑलिंपिकवीर ' खाशाबा जाधव ' मु. पो. गोळेश्वर, ता- कऱ्हाड, जि- सातारा यांच्याबरोबर लढले होते.

' बार्शी शहर ' हे रसिकांचे शहर म्हणूनही ओळखले जाते. नामांकित गवई पंडित भिमसेन जोशी, अल्लार खाँ, बिस्मिल्ला खाँ, आशा भोसले, पंडित रविशंकर, प्रसाद सावकार, बालगंधर्व, छोटा बालगंधर्व, रामदास कामत, हिराबाई बडोदेकर, वसंतराव देशपांडे, जयमाला शिलेदार, कीर्ती शिलेदार, सरस्वती राणी, केडेबुवा, तांबडेबुवा करंदिकर, कीर्तन केसरी यांचे गणेशोत्सवाच्या माध्यमातून बार्शी शहरामध्ये अनेकवेळा गायनाचे कार्यक्रम झाले आहेत.

बार्शी शहरातील अबु ताशेवाले व सनईवादक चिंगा फकिरा हे संपूर्ण महाराष्ट्रामध्ये प्रसिध्द होते. इ. स. १९३४ साली कोलंबिया कंपनीने चिंगा फकिरा याच्या सनईवादनाचे रेकॉर्डिंग करून ते वितरीत केले होते. हैद्राबाद व ग्वाल्हेर येथील चिंगा फकिरा याच्या सनईवादनाचे कार्यक्रम खूप गाजले होते. महाराष्ट्रामध्ये लावणी व तमाशासाठी बार्शी शहर विशेष प्रसिध्द होती. ज्यावेळी महाराष्ट्रामध्ये लावणीचा दोन आणे दर होता, त्यावेळी बार्शीमध्ये लावणीचा दर १ रूपया इतका होता. लावणी सादर करणाऱ्या स्त्रीला बार्शीकरांनी काही दिले तर त्याचे महाराष्ट्रभर नाव होत असे. इ. स. १९२०-३० च्या दरम्यान पुण्याच्या गोदावरीबाईला लावणीच्या एका बैठकीत २,००० रूपये मिळाले होते. या सर्व बाबी या शहराची आर्थिक समृध्दी दर्शवतात.[७१]

१.१२ बार्शी तालुक्याचे स्वातंत्र्य लढ्यातील योगदान

ब्रिटिशांच्या विरोधात देशाप्रमाणेच संपूर्ण सोलापूर जिल्ह्यामध्ये कायदेभंग, असहकार, सत्याग्रह यांनी तीव्र स्वरूप धारण केले होते. यामध्ये बार्शी तालुक्याचे योगदान मोठे आहे. इ. स. १९२१ मध्ये महात्मा गांधींची बार्शी नगरपालिकेच्या मैदानावर खूप मोठी सभा झाली होती. या सभेनंतर बार्शी शहर व

तालुक्यामध्ये स्वदेशी, ग्रामोद्योग अशा विधायक कामांनी जोर धरला. इ. स. १९३० मधील महात्मा गांधींच्या मिठाच्या सत्याग्रहाला पाठींबा देण्यासाठी बार्शी तालुक्यामध्ये एक मोहीम राबविण्यात आली. सभेमध्ये समुद्राचे पाणी आणून मीठ बनविण्याच्या सत्याग्रहामध्ये बार्शी तालुक्यातील अनेक लोक सहभागी झाले होते. यामध्ये प्रामुख्याने बार्शीचे भगवंतराव कथले, डॉ. व्यंकटप्रसाद पांडे, शिवाजीभाई आर्य, भिमाशंकर वायचळ, दिगंबर देवधरे, शंकर बेले, बापूराव मठपती, जगदाळे मामा, माणिकराव देशमुख, दहिटणेचे बाबू राऊत, सोपान काशीद, सोपान जाधव, बाजीराव काशीद. याशिवाय उपळे दुमाला या गावचे लक्ष्मण बुरगुटे, बाबुलाल वखारिया, रंगनाथ नेवाळे, दत्तोबा जाधव, चंद्रहास जाधव, वाघमारे, मळेगावचे मुंबरे तर येडशीचे गुरव यांचे योगदान महत्वपूर्ण होते. शाहीर हरीभाऊ भंडारे यांनी पोवाड्याच्या कार्यक्रमाद्वारे बार्शी तालुक्यामध्ये लोकजागृतीचे मोठे काम केले. या कामामध्ये त्यांना दिगंबर देवधरे यांनी मोलाची साथ दिली. इ. स. १९३९ मध्ये दुसऱ्या महायुध्दाच्या विरोधात काँग्रेसने सत्याग्रह सुरू केला. बार्शी तालुक्यानेही याला सक्रिय पाठींबा देऊन कायदेभंग, इंग्रजविरोधी व्याख्याने व मोर्चे या माध्यमातून संपूर्ण तालुका हलवून सोडला. इ. स. १९४१ च्या महात्मा गांधीच्या वैयक्तिक सत्याग्रहामध्ये बार्शी तालुक्यातील डॉ. व्यंकटप्रसाद पांडे, शंकर गोईलकर, आझाद मास्तर, शिवाजीभाई आर्य, दिगंबर शिराळ, बाबुराव राऊत, गेनदेव जाधव, सोपान काशीद यांनी भाग घेतला होता. इ. स. १९४२ च्या ' छोडो भारत ' चळवळीमध्ये डॉ. व्यंकटप्रसाद पांडे यांनी भाग घेऊन इतर कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्याचे काम केले. त्यांचे स्वत:चे घर या चळवळीचे केंद्र बनले होते. यावेळी मिरवणुका काढणे, परदेशी मालाच्या होळ्या करणे, नगरपालिकेवर तिरंगा झेंडा लावणे असे कार्यक्रम बहुसंख्य कार्यकर्त्यांनी भूमिगत राहून केले.

महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली सुरू झालेल्या भारतीय स्वातंत्र्य चळवळीमध्ये स्त्रियांही मोठ्या प्रमाणामध्ये भाग घेऊ लागल्या. सोलापूर जिल्ह्यातील पहिल्या महिला सत्याग्रही म्हणून पित्रे यांचा उल्लेख केला जातो. श्रीमती विमल कोटणीस यांनी इ. स. १९४२ च्या चळवळीत भूमिगत राहून कार्य केले. या चळवळीमध्ये बार्शी तालुक्यातील प्रभाताई सुलाखे, वीणा सुराणा, जानकीबाई लागू यांनी महत्वाचे योगदान दिले. राष्ट्रसेवा दलाच्या माध्यमातून कुंदा जगदाळे यांनी मोलाचे कार्य केले.[७२]

इ. स. १९२८ पासून बार्शी तालुक्यातील महादेव अप्पा खुडे यांनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीमध्ये सक्रीय सहभाग घेतला होता. गांधीजींच्या मिठाच्या सत्याग्रहामध्ये त्यांचा सहभाग होता. इ. स. १९३० मध्ये सोलापूरला पुकारलेल्या ' मार्शल लॉ ' मध्ये महादेव अप्पा खुड यांना अटक होऊन सहा महिने तुरुंगवासाची शिक्षा झाली होती. बार्शीचे श्री. रुद्राप्पा वीरभद्र पोटे यांनी भारतीय स्वातंत्र्य लढयात राष्ट्रसेवा दलाच्या माध्यमातून काम केले. प्रौढ वर्गाला साक्षर करण्यासाठी त्यांनी प्रौढ साक्षरता वर्ग चालविले. कामगारांना जागृत करण्याचा प्रयत्न केला. श्री. ना. ग. गोरे यांच्या नेतृत्वाखाली पुणे येथील सरकारी धान्याच्या

कोठारावर झालेल्या सत्याग्रहामध्ये त्यांनी सहभाग घेतला होता. यामुळे त्यांना अटक झाली व त्यांची नोकरीही गेली.[७३]

श्री. सदाशिव रामलिंग ढोले यांना पत्रके वाटणे, प्रभातफेऱ्या काढणे, प्रचारसभा घेणे अशी सरकारविरोधी प्रचार केल्यामुळे ९ महिने शिक्षा व १०० रू. दंड झाला होता. बार्शी तालुक्यातील धामणगाव येथील श्री. सोपान रामजी भोसले यांनी धामणगाव येथे एक चरखासंघ काढला होता. पानगावचे श्री. अंबऋषि बाबुराव विभुते यांनी बाबु गेणूला गाडीच्या चाकाखाली चिरडल्यामुळे सभा घेतली. यावेळी त्यांना प्रचंड मारहाण करण्यात आली. तरीही त्यांनी सरकारविरोधातील कार्य चालूच ठेवले. उपळे दुमाला येथील प्रांताचा तंबू लुटण्यामध्ये यांचा सक्रीय सहभाग होता.[७४]

१.१३ बार्शी तालुक्याचे हैद्राबाद मुक्ती संग्रामातील योगदान

हैद्राबादच्या निजाम घराण्याचा संस्थापक मीर कमरूद्दिन होय. त्याचे पूर्वज शहाजहान बादशहाच्या कृपेने दिल्लीत स्थायीक झाले. पुढे बादशहाच्या कृपेने इ. स. १७१३ मध्ये मीर कमरूद्दिनची दक्षिणेचा सुभेदार म्हणून नेमणूक झाली. पुढे दिल्ली दरबारातील सत्ता संघर्षाचा फायदा घेऊन त्याने हैद्राबाद येथे स्वतःचे राज्य स्थापन केले. पुढे मुघल सम्राट फर्रूखसियर याने याच कमरूद्दिनला निजाम-उल-मुल्क ही पदवी दिली. ' निजाम ' या शब्दाचा अर्थ ' व्यवस्था ' किंवा ' बंदोबस्त ' असा आहे. तो अतिशय चाणाक्ष बुध्दीचा होता. पुढे महमूदशहा याने निजामाला आसिफजहा ही पदवी दिली. तेव्हापासून या घराण्याला आसिफजहा घराणे म्हणून संबोधले जाते. हा पहिला निजाम अनियंत्रित असला तरी त्याने जनतेच्या कल्याणाकडे सातत्याने लक्ष दिले. त्याने स्थिर शासन निर्माण केले होते. यामध्ये त्याने हिंदू सरदारांचेही सहकार्य घेतले होते. २१ मे १७४८ रोजी हा पहिला निजाम मृत्यू पावला. पुढे त्याच्या वारसामध्ये सत्ता-संघर्ष सुरू झाले. यातून हे घराणे दुबळे बनले. त्याच्या वारसांनी इंग्रजांच्या मर्जीत राहून स्वतःचे अस्तित्व जपले. तरी त्यांची आर्थिक परिस्थिती खूपच वाईट झाली होती. शिवाय निजामाच्या दडपशाहीला लोक कंटाळले होते. निजाम सरकारने सामाजिक जीवनावर विविध निर्बंध लादले. पहिल्या पाच निजामांचे हिंदूविषयक धोरण व्यवस्थित होते. मात्र सहाव्या निजामाने इ. स. १८८५ पासून हिंदू धर्मियाविषयी खूपच जाचक धोरण स्वीकारले. इ. स. १९८५ मध्ये दसरा व मोहरम हे सण एकाच वेळी आले. पण निजामाने हिंदूवर अनेक निर्बंध लादले. इ. स. १९११ मध्ये सातवा निजाम गादीवर आला. इ. स. १९१७ मध्येही दसरा व मोहरम हे सण एकाच वेळी आले. याही वेळी निजामाने हिंदूवर जाचक असे निर्बंध लादले. हिंदूंच्या धार्मिक स्वातंत्र्यावर बंधने घातली. त्यामुळेच या संस्थानातील हिंदू जनता निजामाच्या विरोधात आंदोलनाच्या पवित्र्यात ऊभी राहिली. इ. स. १९२० हा हैद्राबाद मुक्ती संग्रामाचा आरंभ बिंदू मानला जातो.

इ. स. १९२३ ते १९३१ या काळात काकीनाडा, मुंबई, पुणे, अकोला येथे राजकीय परिषदा घेण्यात आल्या. यापैकी अकोला येथील परिषदेचे अध्यक्ष व स्वागताध्यक्ष मराठवाड्यातीलच होते. हैद्राबाद मुक्ती संग्रामामध्ये इ. स. १९३७ व १९३८ ही दोन वर्षे अत्यंत महत्वाची मानली जातात. १ जून १९३७ मध्ये परतूर येथे झालेल्या महाराष्ट्र परिषदेच्या अधिवेशनामध्ये जनतेच्या धार्मिक हक्काची पायमल्ली करण्याच्या बाबीचा तीव्र निषेध करण्यात आला. त्यमुळे पुढे निजामाने अशा अधिवेशनामध्ये राजकीय प्रश्नावर चर्चा करण्यावर बंदी घातली होती.[७५]

हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यानंतर हिंदुस्थानसमोर जे अनेक महत्वाचे प्रश्न होते, त्यापैकीच एक हैद्राबाद संस्थानाचा होता. हिंदूस्थानच्या स्वातंत्र्यानंतरही हैद्राबाद हिंदुस्थानमध्ये सामील झाले नव्हते. ही काही अचानक घडलेली घटना नव्हती. इंग्रजांच्या ' फोडा आणि झोडा ' या नितीचा तो एक परिणाम होता. संस्थाने व मुस्लिम जातीयता या दोन प्रश्नांची हैद्राबादमध्ये एकजूट झालेली होती. जातीयतेला खास सवलती देण्याच्या इंग्रजी व्यवहाराची हैद्राबादने नुसती रीच ओढली नाही, तर त्यांनी यासंदर्भात कमालीची आघाडी मारली. हिंदूस्थानातून हजारो मुस्लिमांना नोकरीच्या निमित्ताने हैद्राबादमध्ये बोलाविले. इस्लामी संस्थांना भरमसाठ देणग्या दिल्या. शेकडो मुस्लिमांना वर्षासने व अनेक विधी निमित्ताने तनखा व देणग्या दिल्या. उस्मानिया विद्यापीठ स्थापन करून सरकारी नोकऱ्यांची ठेकेदारी बहाल करून व मुसलमान हे राज्यकर्ते आहेत या तत्वाचा प्रचार करून हैद्राबादमधील मुस्लिमांचे संघटन करण्यात आले. या अशा परिस्थितीत ' एत्तेहादुल मुसलमीन ' या फाशीवादी इस्लाम संघटनेचा पाठिंबा असलेल्या हैद्राबादमधील नोकरशाहीला स्वतंत्र हैद्राबादची स्वप्ने दिसू लागली होती.[७६]

१.१३.१ रझाकार संघटना

इ. स. १९४० मध्ये बहादूर यारजंग यांनी रझाकार ही संघटना स्थापन केली. ' रझाकार ' म्हणजे " धुळीत पडलेल्यांना वर उचलणारा स्वयंसेवक " होय. या संघटनेने हिंदूवर प्रचंड अन्याय केला. ' कासिम रझवी ' हा रझाकारांचा नेता होता. तो मूळचा लातूरचा होता. तो लातूर येथे वकिली करत होता. त्यानेच ही संघटना अतिरेकी बनविली. तो निजामाचा हस्तक होता. निजामाच्या या अन्यायापासून मुक्त होण्यासाठी इ. स. १९४५ पासून हैद्राबाद स्वातंत्र्य संग्राम गतिमान होऊ लागला. ७ ऑगस्ट १९४७ ला हैद्राबाद मुक्ती संग्रामाचे शेवटचे पर्व सुरू झाले. निजामाने प्रचंड अत्याचार सुरू केले. त्यामुळे हैद्राबाद स्टेट काँग्रेसच्या कृती समितीने भूमिगत कार्यकर्त्यांमार्फत सशस्त्र लढा सुरू केला. यासाठी हैद्राबाद संस्थानाच्या सरहद्दीलगत लढाऊ कॅम्प्स् उघडण्यात आले.

१.१३.२ हैद्राबाद हिंदू महासभा

२३ मार्च १९३३ रोजी गुढी पाडव्याच्या मुहूर्तावर हैद्राबाद येथे " हैद्राबाद हिंदू महासभेची " स्थापना झाली. निजामाच्या अत्याचाराला विरोध करण्यासाठी ही संस्था स्थापन झाली होती. हिंदूंच्या दयनीय स्थितीची माहिती लोकमान्य टिळकांच्या केसरी वर्तमानपत्रामुळे सर्वत्र पसरण्यास खूप मदत झाली. महाराष्ट्र हिंदू महासभेने हैद्राबाद हिंदू महासभेस पाठिंबा दिला. तत्कालीन महाराष्ट्र हिंदू महासभेचे नेते आण्णासाहेब भोपटकर यांनी बार्शी तालुक्यातील अनेक वकील, व्यापारी, शिक्षक यांच्याशी सल्लामसलत केली होती. यासाठी ते बार्शी तालुक्यातील तडवळे येथे आले होते. ८ जुलै १९३८ च्या केसरीच्या अंकात यासंदर्भात एक अग्रलेख छापण्यात आला. त्यामुळे जनमत प्रक्षुब्ध बनले.

१.१३.३ सरहद्दीलगतचे बार्शी तालुक्यातील कॅम्प्स्

स्वामी रामानंद तीर्थ व हैद्राबाद स्टेट कॉग्रेसचे अध्यक्ष दिगंबराव बिंदू यांनी दिल्ली येथे महात्मा गांधी यांची भेट घेऊन हे कॅम्पस् उघडण्याची परवानगी घेतली. हैद्राबाद संस्थानाच्या सरहद्दीलगत असे ११५ लढाऊ कॅम्पस् उघडण्यात आले. यामध्ये बार्शी तालुका व उस्मानाबाद जिल्हा यांच्या सरहद्दीलगत बार्शी तालुक्यामध्ये उभारण्यात आलेल्या कॅम्पस्नी या हैद्राबाद मुक्ती संग्रामामध्ये मोलाचे योगदान दिले.[७७]

१) बार्शी कॅम्प

इ. स. १९४७ ते १९४८ या काळात रझाकाराच्या अत्याचारामुळे अनेक लोकांनी हैद्राबाद संस्थानातून पळ काढला. या लोकांसाठी बार्शी येथे उत्तरेश्वर मंदिरामध्ये बापूराव मास्तर, ग्यानुराव साळुंखे, शिवाजी आर्य इत्यादी कार्यकर्त्यांनी एक कॅम्प सुरू केला. येथे दररोज १०००-१२०० लोक जेवण करत होते. याचा सर्व खर्च स्थानिक कार्यकर्त्यांनी जमा केलेल्या फंडातून भागविला जात. बार्शीतील तात्यासाहेब बोरगावकर यांनी स्टेट कॉग्रेसच्या ऑफिससाठी स्वत:चे घर विनामूल्य दिले होते. या कॅम्पमधील सैनिकांनी उपळा येथील निजाम पोलीसांशी दिलेल्या सशस्त्र लढ्यात मोतीलाल रामजीवन भूरावत हे शहिद झाले.[७८]

२) कौडगाव कॅम्प

कौडगाव कॅम्प हा चिंचोली कॅम्पच्या मार्गदर्शनाखाली चालतअसे. या कॅम्पचे प्रमुख वासुदेव तेरकर हे होते. या कॅम्पमध्ये ३० मुक्तिसैनिक होते.

३) अंबेजवळगे कॅम्प

हा कॅम्प चिंचोली व गौडगाव कॅम्पच्या दरम्यान होता. या कॅम्पचे प्रमुख नामदेवराव नाडे हे होते. या कॅम्पमध्ये ६० मुक्ति सैनिक होते. या कॅम्पमधील मुक्तिसैनिकांनी अंबेहोळ, जुनवनी, घाटंग्री या ठिकाणी कारवाया केल्या.

४) वाघोली कॅम्प

हा कॅम्प चिंचोली व गौडगाव कॅम्पच्या दरम्यान होता. या कॅम्पचे प्रमुख वसंतराव देशमुख व राजेंद्र देशमुख हे होते. या कॅम्पमध्ये ४७ मुक्तिसैनिक होते. येथील मुक्तिसैनिकांनी सारोळा येथील रझाकाराचा अड्डा हल्ला करून कायमचा बंद केला. बेंबळे पोलीस ठाण्यावर हल्ला करून एका अरबाला ठार मारले. निजामाच्या पोलीस व्हॅनवर हल्ला करून त्यांच्या ताब्यातील अनेक लोकांना मुक्त केले.

५) गौडगाव कॅम्प

बार्शी तालुक्यातील गौडगाव कॅम्प हा एक कृतिशील कॅम्प होता. या कॅम्पचे प्रमुख राजाभाऊ जाधव व नरहरराव मालखरे हे होते. या कॅम्पचे बहुसंख्य मुक्तिसैनिक समाजवादी विचारसरणीचे होते. या कॅम्पमध्ये १५० मुक्तिसैनिक होते.

६) चिंचोली कॅम्प

बार्शी तालुक्यातील या कॅम्पचे प्रमुख रामचंद्र शास्त्री, चंद्रशेखर बाजपेयी व श्रीधर वर्तक हे होते. या कॅम्पमध्ये २५० मुक्तिसैनिक होते. हैद्राबाद मुक्ती संग्रामामध्ये या कॅम्पचे योगदान महत्वपूर्ण मानले जाते. येथील मुक्तिसैनिकांनी निजामाच्या बर्दापूर व अपसिंगा येथील रझाकारावर धाडशी हल्ला केला होता. यामध्ये श्रीधर वर्तक यांना वीरमरण आले.[७९] येथील मुक्तिसैनिकांनी काही गावांमध्ये असहकाराची चळवळ उभी केली. अनेक गावांमध्ये साराबंदी यशस्वी करून दाखविली. या कॅम्पमध्ये बार्शी तालुक्यातील सुर्डी या गावातील श्री. दगडू केरबा लेकरे, श्री. दत्तात्रय गोविंद वडगावकर, श्री. नागा कृष्णा रोहिले हे मुक्तिसैनिक खूप सक्रिय होते. या कॅम्पमधील मुक्तिसैनिकांनी भूम-परांडयामधील ६२ खेडी निजामाच्या अंमलातून मुक्त केली होती.

हैद्राबाद मुक्ती संग्रामामध्ये उल्लेखनीय योगदान दिलेल्या बार्शी तालुक्यातील काही स्वातंत्र्यसैनिकांची माहिती खालीलप्रमाणे.[८०]

१) श्री तुकाराम एकनाथ लोहार

श्री तुकाराम एकनाथ लोहार हे बार्शी तालुक्यातील हत्तीज गावचे रहिवासी होते. ' आळणी ' या गावी हैद्राबाद मुक्ती संग्रामाच्या माध्यमातून फिरत असताना ते पकडले गेले. त्यांच्यासह इतर ७ जण व ५ मुले यांना रझाकारांनी गोळ्या घातल्या.

२) श्री. लाला मारूती वाघमारे

बार्शी तालुक्यातील धामणगाव या गावचे रहिवासी असलेल्या शाहिर श्री. लाला मारूती वाघमारे यांनी पोवाड्याच्या माध्यमातून लोकांना रझाकाराविरूध्द आंदोलनाच्या पवित्र्यात उभे करण्याचे महान कार्य केले. त्यामुळे संतापलेल्या रझाकारांनी त्यांना पकडून जिवंत पुरले. मात्र राष्ट्रप्रेमाणे भारलेल्या श्री. वाघमारे यांनी पुरतानादेखील हातातील तिरंगा ध्वज सोडला नाही.[८१]

३) काशीनाथ तुकाराम घोडके

हैद्राबाद मुक्ती संग्रामामध्ये भाग घेऊन श्री रघुनाथराव किसनराव टेके यांच्या मार्गदर्शनाखाली काम केले. निजामाच्या जकात नाक्यांना आगी लावणे, निजामाच्या पोलीस चौकीवर हल्ले करणे, स्टेट कॉंग्रेसची पत्रके वाटणे अशी कामे त्यांनी केली. तसेच त्यांनी गोदामे लुटून धान्य गोरगरीबांना वाटले.

४) श्री सखाराम बाबुराव कुलथे

बार्शी शहरातील रहिवासी श्री सखाराम बाबुराव कुलथे यांना हैद्राबाद मुक्ती संग्रामामध्ये भूमिगत राहून कार्य केले. त्यांच्यावर पकड वॉरंट काढण्यात आला होता, मात्र ते शेवटपर्यंत सापडले नाहीत. या संघर्षात त्यांनी सरहद्दीवरील प्रत्येक कॅम्पस् मध्ये जाऊन तेथील मुक्ती सैनिकांना हत्यारे चालविण्याचे प्रशिक्षण दिले. तालुक्यातील शेंद्री येथील श्री मोतीचंद शहा यांच्या वाडयात राहणाऱ्या ४० रझाकारांना ठार मारण्यामध्ये त्यांचे मोलाचे योगदान होते. त्यांनीच या प्रेताची विल्हेवाट लावली. शेंद्री येथील प्रसंग चालू असतानाच त्यांनी स्वत:चा जीव धोक्यात घालून तेथील लोकांना लष्कराच्या ट्रकमधून सुरक्षित स्थळी पोहचविले होते. स्वत: क्रांतिसिह नाना पाटील यांनी श्री. कुलथे यांना मार्गदर्शन केले होते. बार्शी तालुक्यातील श्रीपतपिंपरी येथे श्री आनंदराव विठ्ठलराव पाटील यांच्या वाड्यात राहणाऱ्या रझाकारांवर त्यांनी सशस्त्र हल्ला केला होता. तत्कालीन सेनाप्रमुखांनी त्यांना एक बंदुक दिली होती.

५) श्री. रफिउद्दीन अमिन शेख

श्री. रफिउद्दीन अमिन शेख हे बार्शी तालुक्यातील आगळगावचे रहिवासी होते. हैद्राबाद मुक्ती संग्रामामध्ये भाग घेऊन त्यांनी भूमिगत राहून कार्य केले. स्वत: इस्लाम धर्मीय असूनही इस्लामी निजाम

राजवटीच्या विरोधात ते लढले ही उल्लेखनीय बाब होय. त्यांनी वैरागचे आझाद मास्तर व गोविंदराव बुरगुटे यांच्या सोबत राहून कार्य केले. कडकनाथवाडी येथील निजामाच्या जकात नाक्यावरील नाकेदारांना पळवून लावून हे जकात नाके यांनी काबीज केले होते. उंबरगेत मिरवणूक काढली म्हणून त्यांना तेथील पोलीस पाटलाने शाळेत कोंडून ठेवले होते. मात्र तेथून ते फरार झाले ते परत कधीच सापडले नाहीत.

६) श्री. रूद्राप्पा विरभद्राप्पा पोटे

श्री. पोटे यांनी भिमाशंकर वायचळ यांच्या मार्गदर्शनाखली हैद्राबाद मुक्ती संग्रामामध्ये भूमिगतांना खूप सहकार्य केले. यामध्ये बुलेटिन वाटणे, छोटी हत्यारे पुरविणे, अन्न पुरवठा करणे अशा बाबींचा समावेश होता.

७) दगडू रामा सावंत

बार्शीतील दगडू रामा सावंत यांनी हैद्राबाद मुक्ती संग्रामामध्ये भाग घेऊन आसपासच्या निजामी पोलीस चौक्यावर धाडशी हल्ले केले. रझाकारावर लपून-छपून हल्ले करण्याचे काम त्यांनी सतत केले.

८) दिगंबर रामलिंग थळपती

बार्शीमधील दिगंबर रामलिंग थळपती यांनी हैद्राबाद मुक्ती संग्रामामध्ये भाग घेऊन आपल्या जीवाची पर्वा न करता गावोगावी जाऊन निजामाविरूध्द प्रचार व लोकजागृती करण्याचे धाडसी काम केले. याशिवाय मोर्चे काढणे, शस्त्रास्त्रे वाटणे, निजामी राजवटीविरूध्द पत्रके वाटण्याचे काम केले. तसेच राष्ट्रसेवादलाच्या माध्यमातून लोकजागृती व साक्षरतेसाठी शैक्षणिक वर्ग चालविले.[८२]

९) भिमाशंकर वायचळ

भिमाशंकर वायचळ यांनी या हैद्राबाद मुक्ती संग्रामामध्ये मोलाचे योगदान दिले. बार्शी तालुक्यातील कसबे तडवळे या गावचे रहिवासी श्री शिवाजी केशव अडसूळ व मोतीलाल रामजीवन भुरावत यांनाही रझाकारांनी मारले. तर तुरूंगातील छळामुळे सदाशिव पाठक मरण पावले. या सर्व घटना भिमाशंकर वायचळ यांच्या समक्ष घडल्या. धामणगावच्या श्री. लाला मारूती वाघमारे यांनाही ठार मारले. त्यांचे स्मारक धामणगाव येथे आहे. तालुक्यातील इतर गावातूनही रझाकाराच्या जुलमास प्रखर विरोध करण्यास प्रोत्साहन दिले.

१०) शेख हिराजी अब्बास

हे तालुक्यातील पांगरी या गावचे रहिवासी होते. त्यांनी हैद्राबाद मुक्ती संग्रामामध्ये बहुमुल्य असे योगदान दिले. सरकारी बसची नासधुस केली. त्यामुळे त्यांची तुरूंगात रवानगी झाली. पुढे तुरूंगातून मुक्त झाल्यानंतर भूमिगत राहून कार्य केले. रझाकारापासून जनतेचे रक्षण करून त्यांच्या पुनर्वसनाला हातभार लावला. भारत सरकारच्या हैद्राबाद मुक्तिसाठी निघालेल्या सैन्याला रस्ते दाखविले.[८३]

१.१३.४ निजामाची शरणागती

भारताच्या स्वातंत्र्यानंतर हैद्राबादच्या निजामाने भारतीय संघराज्यामध्ये सामील होण्यास नकार दिला. रझाकारांनी त्याला पाठिंबा दिला. पुढे यातूनच जातीय दंगली झाल्या. या दंगलीमुळे परिस्थिती आवाक्याबाहेर जात आहे असे दिसताच भारत सरकारने १३ सप्टेंबर १९४८ रोजी भारतीय फौजा हैद्राबादमध्ये घुसविल्या.[८४] त्याचे नेतृत्व मेजर जनरल चौधरी यांच्याकडे होते. त्यांनी हैद्राबाद संस्थानाच्या चोहोबाजूने सैन्य आत घुसविले. सर्वत्र गोंधळ माजला. १७ सप्टेंबर १९४८ रोजी अवघ्या चार दिवसात सार्वभौमत्वाचे स्वप्न पाहणाऱ्या निझामाने व रझाकाराचे नेतृत्व करून डरकाळ्या फोडणाऱ्या कासिम रझविने हताश होऊन शरणागती पत्करण्याचा निर्णय घेतला. तत्कालीन रेसीडेन्ट श्री. के. एम. मुन्शी यांच्या वतीने निजामाने शरणागती घोषित केली. त्यानंतर मराठवाडा स्वतंत्र भारताचा भाग बनला.[८५]

१.१४ गोवा मुक्तिसंग्रामातील बार्शी तालुक्याचे योगदान

भारताला स्वातंत्र्य मिळाले तरी गोव्यामध्ये पोर्तुगीजांची सत्ता होती. तेथील जनतेवर पोर्तुगिजांनी खूप अत्याचार केले. स्थानिक लोकांचा विरोध पोर्तुगिजांनी मोडून काढला. त्यामुळे हा लढा देशव्यापी होण्यासाठी व सर्व भारतीयांनी या लढयाला सहकार्य करावे म्हणून ' गोवा विमोचन सहाय्य समिती ' स्थापन करण्यात आली. या समितीमार्फत मुक्तिसैनिकांच्या १० तुकडया पाडण्यात आल्या होत्या. यातील १० व्या तुकडीमध्ये बार्शीतील काशीनाथ जाधव, रणजित सुपेकर, वसंत गोणीकर, सुरडकर हे स्वातंत्र्य सैनिक श्री. म. लु. लिमये यांच्या नेतृत्वाखाली काम करत होते. शेवटी १९ डिसेंबर १९६१ रोजी भारत सरकारने सैन्य पाठवून चारच दिवसांमध्ये गोवा पोर्तुगिजांच्या जुलमातून मुक्त केला.[८६]

या संघर्षात वैराग येथील श्री. मोहिते किसन बाळाराम यांनी इ. स. १९५२-५३ मध्ये गोवा नॅशनल कॉंग्रेसच्या वतीने गोवा मुक्ती संग्रामामध्ये भाग घेतला होता.[८७] इ. स. १९५५ मध्ये श्री. वसंतराव गोयेकर, श्री. श्रेणिक देवधरे, श्री. दत्तू पाठक, श्री. दगडू कदम, श्री. बापूराव मठपती, श्री. वाळके इत्यादी लोकांनी सक्रिय सहभाग घेतला होता.[८८]

१.१५ बार्शी तालुक्यातील महत्वाची गावे

तालुक्यातील बार्शी हे एकमेव शहर असले तरी या तालुक्यामध्ये अनेक महत्वाची गावे आहेत. यामध्ये वैराग, पानगाव, धामणगाव (बोधले), कारी, आगळगाव यांचा समावेश होतो. या गावांना उल्लेखनीय असा इतिहास लाभलेला आहे.

ज्या वस्तीभोवती लागवडीयोग्य योग्य जमीन आहे, आणि जिच्यामध्ये मातंबर शेतकरी व पुष्कळसे मजूर असतात, अशा वस्तीला गाव म्हणतात. गावाच्या हद्दीला ' शीव ' ही संज्ञा आहे. गावाचे निसर्गानुरोधानेच दोन भाग पडतात. एक ' पांढरी ' किंवा ' गावठाण ' आणि दुसरा ' काळी ' किंवा ' रान ' . काळी आणि पांढरी या संज्ञा जमिनीच्या रंग व गुणधर्मावरून प्रचारात आल्या. त्यामुळेच पांढरीचा वापर वस्तीसाठी, तर काळीचा वापर शेतीवाडीसाठी केलेला आढळतो. आपल्याकडे खेडेगावाचे दोन प्रकार आढळतात. एक मौजे आणि दुसरा कसबा. ' कसब ' या शब्दापासून कसबा हा शब्द तयार झालेला आहे. कसब म्हणजे ' कला ' अथवा ' हुन्नर ' होय. व्यापार, हुन्नर व कसबी मजुरी करणारे लोक मौज्यापेक्षा कसब्यात अधिक असतात. शिवाय कसब्याखाली वाड्याही जास्त असतात. कसब्याचे गाव मौज्यापेक्षा विस्तृत, चव्हाटयाचे, रोजगारी व संपन्न असते. मोठ्या व्यापाऱ्याच्या गावाला पेठ म्हणतात. पेठ म्हणजे बाजार किंवा दुकानदारांनी व्यापलेला गावाचा भाग होय. जेव्हा एखांद्या गावाला लोक ' शहर ' हे नाव देतात, तेव्हा लोकसंख्येचा व तेथील उद्योगधंदयांच्या संख्येचा विचार हेतो. किंबहुना काळीपेक्षा पांढरी बळावली की त्या गावाची गणना शहरात होऊ लागते. ज्या धंद्याचा काळीशी निकट संबंध नाही ते करणाऱ्यांना ' पांढरपेशे ' म्हणतात.[८९]

तक्ता क्र .४

सोलापूर जिल्ह्यातील तालुकानिहाय गावांची संख्या

तालुके	इ.स.१९५१	इ.स.१९६१	इ.स.१९७१	इ.स.१९८१	इ.स.१९९१	इ.स.२००१
बार्शी	१२८	१२९	१२९	१४२	१३६	१३९
आक्कलकोट	११५	११८	१२१	१२८	१३७	१३५
द.सोलापूर	४२	४३	४४	८७	८९	९१
उ.सोलापूर	८०	८०	८०	५०	५४	४०
मोहोळ	८७	८८	८९	१०४	१०४	१०१
पंढरपूर	८२	८२	९८	९३	९५	१००
सांगोला	६८	६८	६९	८७	१०१	१०२

मंगळवेढे	७०	७१	७१	७९	८२	८१
माढा	९५	९६	९८	११८	११७	११६
करमाळा	९५	९६	९६	११८	११८	११८
माळशिरस	७२	७५	७५	१०४	११०	११७

(संदर्भः- सोलापूर जिल्ह्याची जनगणना, जनगणना कार्यालय मोहता मार्केट मुंबई.)

कोणत्याही स्थानिक प्रदेशाची किंवा मुलकी गावाचा भाग म्हणून असणारी गावे किंवा वाड्या यांच्या गटाची लोकसंख्या २००० पेक्षा कमी नाही अशी प्रांतिक सरकारची खात्री झाल्यावर सरकारी गॅझेटमध्ये जाहिरनामा प्रसिध्द करून असा स्थानिक प्रदेश गाव असल्याचे संबंधित सरकार जाहीर करते. शिवाय प्रांतिक सरकारला सरकारी गॅझेटमध्ये जाहिरनामा प्रसिध्द करून २००० पेक्षा कमी लोकसंख्या असलेला कोणताही स्थानिक प्रदेश सन १९३३ च्या मुंबई गावपंचायती संदर्भातील ॲक्ट अन्वये गाव म्हणून जाहीर करण्याचा अधिकार आहे.[९०] जनगणना अहवालानुसार गावांच्या संख्येच्या बाबत व ग्रामीण लोकसंख्येच्या संदर्भात बार्शी तालुका जिल्ह्यामध्ये प्रथम क्रमांकावर आहे. तालुक्यातील काही महत्वाच्या गावांची माहिती पुढीलप्रमाणे.

१) वैराग

' वैराग ' या गावामध्ये श्री सद्गुरू सच्चिदानंद संतनाथ महाराज हे महान संत होऊन गेले. संत दासगणू महाराज यांनी ' भक्तिसारामृत ' नावाचा संताचे वर्णन करणारा ओवीबध्द ग्रंथ लिहिला. या ग्रंथातील एका अध्यायामध्ये संतनाथ महाराजांचे चरित्र आलेले आहे. बार्शीला रेल्वेमार्ग होण्यापूर्वी वैराग ही बार्शी तालुक्यातील मुख्य बाजारपेठ होती. ज्या गावात पूर्वी भव्य वाडे, मल्लिकार्जुन मंदिरासारखे संपूर्ण दगडी व अवाढव्य मंदिर बांधले गेले, त्या काळामध्ये या गावामध्ये निश्चितच सुबत्ता असली पाहिजे. याच्या जोडीला पुढे संतनाथ महाराजांच्या आगमनामुळे वैराग्य लाभल्याने या गावाला ' वैराग ' हे नाव पडले. असावे.[९१] वैरागच्या पूर्वेला संतनाथ मंदिर आहे. या मंदिरावरील शिलालेखानुसार हे मंदिर इ. स. १७८० मध्ये बांधल्याचे समजते. या मंदिराचा गाभारा, व्हरांडा व हॉल ३०० वर्षापूर्वी काही व्यापाऱ्यांनी एकत्र येऊन बांधलेला आहे. इ. स. १९२७-३४ या काळात या मंदिराच्या मुख्य मनोऱ्याचे नुतनीकरण केले. संतनाथ महाराजांच्या यात्रेला २५ ते ३० हजार लोक येतात. ही यात्रा ६ दिवस चालते. ' पोर्णिमा ' हा या यात्रेचा मुख्य दिवस असतो.[९२] श्रावण शुध्द ११ ते श्रावण वद्य १ हा संतनाथ महाराजांच्या यात्रेचा कालावधी आहे. वैराग येथे प्रत्येक ' बुधवारी ' आठवडा बाजार तसेच जनावरांचाही मोठा बाजार भरतो.[९३]

इ. स. १७६८ मध्ये पानगाव हा परगणा पेशव्यांनी निंबाजी निंबाळकराकडून काढून घेतला व तो परगणा माधवराव कृष्ण पानसे व भिमराव यशवंत पानसे यांना दिला. त्यानंतर निंबाजी निंबाळकर यांनी वैराग येथे स्थलांतर केले. निंबाजी निंबाळकर व दर्याबाई यांना मानसिंग व मकरंदसिंग असे दोन पुत्र होते. पेशव्यांनी हैदर अलीवर केलेल्या तिसऱ्या स्वारीमध्ये मानसिंगराव निंबाळकर यांनी खूप पराक्रम गाजवला. हैदरचा यामध्ये पराभव झाला. मात्र या लढाईमध्ये मानसिंगराव निंबाळकर ठार झाले. निंबाजी निंबाळकर व दर्याबाई यांची मुलगी ' कमळजाबाई ' चा करवीरचे छत्रपती शिवाजी दुसरा यांच्याबरोबर विवाह झाला. करवीर छत्रपती संभाजीच्या मृत्युनंतर युगपुरूष छत्रपती शिवाजी महाराजांचे वडिल शहाजीराजे यांचे बंधू शरीफजी यांच्या वंशातील ' माणकोजी ' याला करवीर छत्रपती संभाजीच्या ईच्छेनुसार दत्तक घेण्यात आले व त्यांचे ' दुसरे शिवाजी ' हे नाव ठेऊन त्यांना करवीरच्या गादीवर बसविण्यात आले होते. त्यांच्या मृत्युनंतर कमळजाबाईचे पुत्र शहाजी ऊर्फ ' बुवासाहेब ' महाराज करवीरच्या गादीचे छत्रपती झाले. वैरागच्या व बार्शी तालुक्याच्यादृष्टीने ही खूपच अभिमानाची बाब आहे. बुवासाहेब छत्रपतींनी आपल्या काळामध्ये वैरागचे हणमंतराव निंबाळकर यांना खास समारंभ आयोजीत करून १० जुलै १८२६ रोजी ' सरलष्करपद ' दिले होते. सरलष्करपदाचे मानकरी हणमंतराव निंबाळकर यांचा वैराग येथे एक भव्य वाडा आहे. याशिवाय वैराग येथे हत्ती तलाव असून या वास्तू आजही त्या गतवैभवाची साक्ष देतात.[९४]

सोलापूर नंतर बार्शी तालुक्यातील वैराग हे लिंगायत-वाणी समाजाच्या वास्तव्याचे मुख्य ठिकाण होते. व्यापार हा यांचा मुख्य व्यवसाय होता. हे घाऊक पध्दतीने माल खरेदी करून व्यापार करत असत. ब्रिटिश साम्राज्याच्या सुरूवातीला वैराग हे एक महत्वाचे व्यापारी केंद्र होते. पुढे बार्शी व सोलापूर येथील वाढत्या व्यापारामुळे वैरागचे व्यापारी महत्व कमी झाले. इ. स. १८१८ मध्ये पडलेल्या दुष्काळाची झळ संपूर्ण सोलापूर जिल्ह्याला मोठ्या प्रमाणात बसली. यामध्ये बार्शी तालुक्याची परिस्थिती फारच बिकट होती. याचबरोबर साथीचे रोग पसरून हजारो लोक मृत्यूमुखी पडले. अशा बिकट परिस्थितीमध्ये बार्शी तालुक्यातील वैराग येथील ' घोंगडे ' या सावकाराने अनेक ठिकाणी मोफत अन्नछत्रे चालविली.[९५]

वैरागचे व्यापारी महत्व लक्षात घेऊन बार्शी कृषी उत्पन्न बाजार समितीने वैराग व आसपासच्या परिसरातील गावांसाठी एक दुय्यम बाजार समिती वैराग येथे स्थापन्याचे ठरविले. ' वैराग ' या गावी मुंबई सरकारच्या नोटिफिकेशन नं.पी.एम.ए ३९५४ दिनांक २७/१२/१९५४ अन्वये दुय्यम बाजार आवार स्थापन करण्याचे अधिकार बार्शी बाजार समितीस मिळाले होते परंतू ऑफिसची जागा ताब्यात न आल्याने इ. स. १९५४-५५ मध्ये याची अंमलबजावणी होऊ शकली नाही.[९६] इ. स. १९५५-५६ मध्ये वैराग येथे दुय्यम बाजार आवार झाले.[९७]

इ. स. १९२४ मध्ये वैराग येथील मुख्य चौकात महात्मा गांधी यांची सभा झाली. तेव्हापासून या चौकाला गांधी चौक असे संबोधले जाते. इ. स. १९३३ मध्ये डॉ. राजेंद्रप्रसाद यांना स्वातंत्र्यलढ्याच्या चळवळीसाठी थैली अर्पण करण्यात आली होती. इ. स. १९४६ साली वैरागच्या तलावाचे भूमिपूजन शंकरराव देव यांच्या हस्ते झाले होते. इ. स. १९४९ साली मुख्यमंत्री मोरारजी देसाई यांच्या हस्ते येथील वसतिगृहाची पायाभरणी झाली. तर उद्घाटन राज्यपाल प्रकाश यांच्या हस्ते झाले. इ. स. १९५८ साली वैरागकरांनी यशवंतराव चव्हाण यांना मानपत्र अर्पण केले. इ. स. १९५९ साली श्रीमती इंदिरा गांधी यांच्या हस्ते येथील जि. प. च्या मराठी शाळेचे उद्घाटन झाले. ११ एप्रिल १९६० रोजी भारताचे पहिले पंतप्रधान पंडित नेहरू व मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते वैराग पाणीपुरवठा योजनेचा शुभारंभ झाला. इ. स. १९७२ साली एस. एम. जोशी यांची भेट अशा अनेक सुवर्ण क्षणांनी वैरागचा इतिहास भारलेला आहे.[१८] इ. स. १९७१-७२ च्या भीषण दुष्काळात लोकांना काम मिळावे म्हणून वैराग येथील शासकीय गोदामावर वैरागच्या इतिहासप्रसिध्द निंबाळकर घराण्यातील चंद्रकांत नाना निंबाळकर यांच्या नेतृत्वाखाली लोकांनी मोर्चा काढला. यावेळी पोलिसांनी अचानकपणे मोर्चावर केलेल्या गोळीबारात ८ लोक मृत्यूमुखी, तर ६५ लोक जखमी झाले होते. या जखमींवर डॉ. भातलवंडे यांनी मोफत उपचार केले.[१९] या हुतात्म्यांची आठवण म्हणून वैराग ग्रामपंचायतीने ' हुतात्मा कीर्ती स्तंभा ' ची उभारणी केली. या गोळीबारातील हुतात्म्यांची नावे पुढीलप्रमाणे.

तक्ता क्र . ५

वैराग गोळीबारातील हुतात्म्यांची नावे

अ.क्र	नाव	गाव
१)	श्री. बब्रुवान तुळशीराम माळी	मानेगाव
२)	श्री. उध्दव श्रीपती गोफण	हळदुगे
३)	श्री.रघुनाथ गणपती माने	रातंजन
४)	श्री.चतुर्भूज विठ्ठल ताकभाते	श्रीपतपिंपरी
५)	श्री.इब्राहिम चाँदसाहेब शेख	वैराग
६)	श्री.एकनाथ ज्योती वायकुळे	वैराग
७)	श्री.भास्कर बाबुराव वाळके	मानेगाव
८)	सौ. सुंदराबाई लक्ष्मण चव्हाण	वैराग

(संदर्भ : लोकमत वर्तमानपत्र, हॅलो सोलापूर ग्रामीण, पृष्ठ क्र ३, २३ जुलै २०१२)

२) पानगाव

१५ व्या शतकाच्या उत्तरार्धात बार्शी तालुक्यातील पानगाव हा एक परगणा होता. तो परांड्याच्या अधिपत्त्याखाली होता. त्यावेळी या परगण्यामध्ये २२ गावांचा समावेश होता. १८ व्या शतकानंतर या ऐतिहासिक गावाचे महत्व पुन्हा वाढले. इ. स. १७५० मध्ये सातारच्या छत्रपती पदावर आरूढ झालेला रामराजा त्यापूर्वीची ५ वर्षे या पानगावामध्ये होता.[१००] ' रामराजा ' हा छत्रपती राजाराम महाराज व महाराणी ताराबाई यांचा नातू होता. ताराबाईने आपल्या या नातवाचे नाव राजाराम असे ठेवले होते. परंतू नवऱ्याच्या नावाचा उच्चार कसा करावा म्हणून ती आपल्या या नातवाला ' राजाराम ' म्हणण्याऐवजी ' रामराजा ' म्हणत असे. जन्मापासून तो अज्ञातवासामध्येच वाढला होता. कारण करवीर छत्रपती घराण्यातील लोकांकडून त्याला ठार मारण्याचा संभव होता. सुरूवातीला या रामराजाला ' बावडा ' येथे ठेवण्यात आले. तेथे घासीराम रजपुताच्या पत्नीने त्याला ५ वर्ष सांभाळले. येथे त्याला मारण्यासाठी करवीर छत्रपती घराण्यातील लोकांनी केलेल्या हल्ल्यात रजपुताची बायको ठार झाली. त्यामुळे १७ फेब्रुवारी १७४५ नंतर रामराजाला त्याची मोठी बहिण दर्याबाई निंबाळकर हिच्याकडे या पानगावमध्ये ठेवण्यात आले.

शाहूच्या मृत्यूनंतर दुसऱ्या दिवशी पेशव्याने बापूजी खंडेराव चिटणीस, महादोबा पुरंदरे व ताराबाईचे विश्वासू चिंतो विनायक, लिंगेजी अनंत व इंद्रोजी कदम असे प्रमुख लोक रामराजाला आणण्यासाठी पानगावला पाठविले. बरोबर राजघराण्याचा शाही थाट दिला होता. तो थाट या गावाने पाहिला आहे. ४ जानेवारी १७५० रोजी रामराजा साताऱ्यात पोहचले व त्याच दिवशी त्यांचा राज्यारोहण समारंभ झाला. तुळजापूरच्या गोंधळयांनी रामराजाची खूप सेवा केल्यामुळे त्यांना ५ हजार रूपये इनाम देण्यात आला. छत्रपती रामराजाने आपली बहिण दर्याबाई निंबाळकरचा पती ' निंबाजी निंबाळकर ' यांना २० नोव्हेंबर १७५० रोजी ' सरलष्करपद ' दिले. म्हणजे मराठी स्वराज्याचे सरलष्करपद बार्शी तालुक्याला मिळाले ही या गावाच्या व तालुक्याच्या दृष्टीने अभिमानास्पद घटना होती.[१०१]


छत्रपती रामराजाने निंबाजी निंबाळकर यांना सरलष्कर या पदासाठी सरंजाम म्हणून पानगावसह १३ परगणे, ११ गावे व बीड जिल्ह्यातील साडेतीन परगणे दिले होते. पुढे सवाई माधवराव यांनी पानगाव हा परगणा तोफखाना प्रमुख माधवराव कृष्ण पानसे व भिमराव यशवंत पानसे यांना दिला. तो दुसऱ्या बाजीरावापर्यंत यांच्याकडेच होता. पुढे दुसऱ्या बाजीरावाने पानसे यांचा तोफखाना प्रमुख या पदासह सरंजाम काढून घेऊन हे पद त्रिंबकजी डेंगळे यांना दिले. यापूर्वी हा परगणा पेशव्यांनी निजामाला दिला होता. तो इ. स. १७७३-७४ मध्ये निजामाने पेशव्यांना परत केला होता. पानगाव परगण्याच्या मोबदल्यात

पेशव्यांनी बीड परगण्यातील ४१ गावे निजामाला दिली व पानगाव स्वत:कडे घेतले. यावरून या पानगाव परगण्याचे महत्व लक्षात येते.

तोफखाना विभागाचे प्रमुख म्हणून प्रसिध्दीस आलेले हे ' पानसे घराणे ' पानगावचे होते. इ. स. १७९५ पर्यंत उदगीरची लढाई, पानिपत मोहिम, हैदरविरूध्दची मोहीम, खड्र्याची लढाई अशा अनेक युध्दप्रसंगामध्ये या पानसे घराण्याने आपली कर्तबगारी दाखवून दिली होती. याच घराण्यातील गणपतराव पानसे यांनी सोलापूरचा किल्ला लढवून स्वत:चे नाव इतिहासात आजरामर केले. सध्या पानगाव येथे पानसे सरदाराचे दोन वाडे आहेत. एका वाड्यात गोपाळकृष्ण मंदिर आहे. त्यांनी इ. स. १७७७ मध्ये पानगावच्या पूर्वेस एक खंडोबाचे मंदिर बांधले होते. ते आजही सुस्थितीमध्ये आहे. हे खंडोबाचे मंदिर शिवाजी खंडेराव पानसे यांनी बांधले होते. हत्तीला पाणी पिण्यासाठी गावाच्या वायव्येस बांधलेला अष्टकोणी तलाव आजही अस्तित्वात आहे. या सर्व ऐतिहासिक खुणा पानगावच्या गतवैभवाची साक्ष देतात.[१०२] गोपाळ आष्टी येथे पेशव्यांचा पराभव झाला. पेशव्यांचे सेनापती बापू गोखले धारातिर्थी पडले. इंग्रजांचा पाठलाग चालू असतानाच गणपतराव पानसे यांनी वैराग व सासुरे भागात इंग्रजांना जोरदार टक्कर दिली होती. युगप्रवर्तक छत्रपती शिवाजी महाराजांचे धाकटे पुत्र छत्रपती राजाराम महाराज यांना एकूण ४ राण्या होत्या. त्यांची चौथी राणी मातुश्री ' अहिल्याबाई ' ही पानगावच्या निंबाळकर घराण्यातील होती. छत्रपती राजाराम महाराजांच्या निधनानंतर त्यांचे पागोटे घेऊन त्या सती गेल्या.[१०३] अशाप्रकारे बार्शी तालुक्यातील या ' पानगावला ' वैभवसंपन्न इतिहास लाभलेला आहे.

३) कारी

बार्शीच्या पूर्वेला भोगावती नदीच्या किनारी वसलेले कारी हे एक बार्शी तालुक्यातील ऐतिहासिक व महत्वाचे गाव आहे.[१०४] या गावाला प्राचीन इतिहास लाभलेला आहे. या भागामध्ये यादव घराण्याची सत्ता होती. यादव घराण्यातील पराक्रमी राजा सिंघण याच्या काळामध्ये त्याची पत्नी कामाईदेवीच्या आग्रहास्तव कारी या गावामध्ये हेमाडपंती शैलीचे एक महादेवाचे मंदीर बांधलेले असून ते आजही सुस्थितीत आहे. हे मंदीर पूर्वाभिमुख आहे. इ. स. २०१०-११ मध्ये या मंदीराचा कारी येथील ग्रामस्थांनी जिर्णोध्दार केला आहे.[१०५] हा पराक्रमी राजा सिंघण यादव राजवंशाचा संस्थापक मानला जातो.[१०६]



कारी येथील महादेवाच्या मंदिरातील शिलालेख

कारी या गावामध्ये सूर्यनारायणाचे मंदिर आहे. या मंदिरामधील मूर्ती अप्रतिम आहे. अष्टदिशा, चंद्र, सूर्य, रथ, रथाचे घोडे, सारथी अरूण यासह ही मूर्ती म्हणजे भारतीय शिल्पकलेचा उत्कृष्ट नमुना होय. ही मूर्ती १०-११ व्या शतकातील असावी असा अंदाज डेक्कन कॉलेजच्या पुरातत्व विभाग प्रमुख शोभना गोखले यांनी व्यक्त केला होता. त्या इ. स. १९८० च्या दरम्यान कारीमध्ये आल्या होत्या. गावाच्या पूर्वेस खंडोबाचे मंदिर आहे. तेथे पूर्वपरंपरेप्रमाणे चंपाषष्टीला फार मोठी यात्रा भरते. गावाभोवती संपूर्ण भक्कम तटबंदी होती व पूर्वेला एकच प्रवेशद्वार होते. आज तटबंदी कोसळलेली असली तरी प्रवेशद्वार सुस्थितीमध्ये आहे. कारी या गावाला ९००० एकर पेक्षा जास्त शिवार लाभलेला आहे. यामध्ये या गावच्या तिन्ही देवस्थानला असणाऱ्या वतनी जमिनीचे प्रमाण उल्लेखनीय होते. या गावाच्या शिवारातील जमिनीची प्रत अत्यंत चांगली आहे. शिवाय पाण्याची पातळीही चांगली आहे. इ. स. १९७२-७३ च्या भीषण दुष्काळाचाही या गावावर फारसा परिणाम झाला नाही. या दुष्काळामध्ये या गावच्या आसपासच्या १५-२० गावातील लोक कामासाठी किंवा उदरनिर्वाहासाठी या गावामध्ये येत होते. या दुष्काळात कारीमध्ये पुरूषाला ८ आणे तर बाईला ४ आणे रोजगार होता. सोलापूर जिल्ह्यामध्ये नान्नज नंतर द्राक्ष पिकासाठी कारी खूप प्रसिध्द होते. आजही द्राक्षाच्या उत्पादनाच्या संदर्भात कारीचा तालुक्यात प्रथम क्रमांक लागतो. येथील द्राक्ष परदेशातदेखील निर्यात होतात.

कारीमध्ये इंग्रजाच्या काळातच मराठी शाळा सुरू झाली होती. मात्र पुढील शिक्षणाची सोय नव्हती. त्यामुळे प्रा. सौ. प्रमिला देशमुख यांना सुरूवातीच्या शिक्षणामध्ये खूप अडचणींना तोंड द्यावे लागले. विवाहानंतर त्यांनी आपले पती प्राचार्य माणिकराव देशमुख यांच्या प्रेरणेने बार्शी येथे आपले शिक्षण पूर्ण केले. पुढे त्यांनी बार्शीतील श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयामध्ये मराठी विषयाच्या प्राध्यापिका म्हणून काम केले. नोकरी करत असतानाच त्यांनी इ. स. १९८३ मध्ये कारी येथे माध्यमिक शाळा सुरू

केली. स्वत: ला आलेल्या अडचणी आपल्या गावातील इतर मुलींना येऊ नये हा त्यांचा मुळ उद्देश होता. यासाठी त्यांनी मोफत वसतिगृह चालविले. आज याच शाळेमधून अनेक विद्यार्थी उच्च पदावर विराजमान आहेत. यात प्रा. सौ. प्रमिला देशमुख यांचा सिंहाचा वाटा आहे. याच वर्षी कारीमध्ये श्री. शरद हवेली यांनीही एक माध्यमिक शाळा सुरू केली.[१०७]

कारीमध्ये दर ' शुक्रवारी ' आठवडा बाजार भरतो. तो आजही चालू आहे. या बाजारामध्ये केवळ जिवनोपयोगी वस्तुंची खरेदी-विक्री होत असली तरी या बाजाराचे स्वरूप खूप मोठे आहे. या बाजारासाठी सोनेगाव, भानसगाव, आंबेजवळगे, गुंजेवाडी, नारी, गोरमाळे येथील लोक मोठ्या संख्येने येतात. [१०८]

कारीमध्ये ५०० एकरपेक्षा जास्त जमिनीवर द्राक्षबाग आहे. इ. स. १९७० साली या गावचे श्री. शरद सुखदेव हवेली यांनी या गावामध्ये प्रथम द्राक्षबाग लावली. त्यांचे आजोळ नान्नज होते. हे नान्नज द्राक्षाच्या संदर्भात सोलापूर जिल्ह्यामध्ये सर्वपरिचित आहे. याच प्रेरणेने हवेली यांनी कारीमध्ये द्राक्षबाग लावली. कारी परीसरात लिंबू व मोसंबीच्या बागा मोठ्या प्रमाणात आहेत. ऊसाचे क्षेत्रही मोठे आहे. गावामध्येच गूळ प्रक्रिया उद्योग चालत असे. यांच्या प्रयत्नातून इ. स. १९८५-८६ मध्ये कारी येथे एक कोल्हापूर पध्दतीचा बंधारा बांधण्यात आला. या बंधाऱ्याचा या गावाला खूप फायदा झाला.[१०९]

४) धामणगाव (बोधले / वैराग)

बार्शी तालुक्यातील धामणगाव येथे माणकोजी बोधले या संत तुकारामांच्या समकालीन महान संताचा जन्म झाला. महिपतींनी लिहिलेल्या संत चरित्रांच्या पोथीमध्ये बोधलेबुवांचा एक अध्याय आहे. तथापी शिवरामात्मजांनी लिहिलेल्या ' बोधलिलांबरी ' या पोथीमुळे या महान संताचे चरित्र आपणास उपलब्ध झाले. माणकोजी प्रापंचिक जीवनात समाधानी होते. पतीच्या कार्यात निष्ठेने साथ देणारी ममताईसारखी पत्नी, यमाजीसारखा आज्ञाधारक पुत्र, भगीरथीसारखी सून, प्रपंचातील वैभव माणकोजींना लाभलेले होते. तथापी माणकोजीची आंतरिक मन:स्थिती अनासक्त योग्याची होती. त्यांनी दुष्काळात घरातील सर्व धान्य लोकांना वाटून टाकले. शेवटी शेतात पेरायला नेलेले बियाणं देखील त्यांनी पंढरीच्या वाटेवरील वारकऱ्यांना मुक्तहस्ते वाटून टाकले. याशिवाय त्यांना अनेकदा जीवनाची सत्त्वपरीक्षा पाहणाऱ्या प्रसंगाला तोंड द्यावे लागले. मात्र ते या साऱ्या प्रसंगातून अत्यंत धीरोदात्तपणे बाहेर पडले.[११०]

भारतीय साहित्य हे संताच्या दंतकथांनी सुसंपन्न बनले आहे. हे संत आपले सर्वस्व देवाच्या चरणी अर्पण करतात. असेच एक संत म्हणजे धामणगाव येथील माणकोजी बोधले होय. शस्त्राचा त्याग करून विणा हाती घेतलेले हे महाराष्ट्राच्या इतिहासातील एक महान संत होते. ते मराठा समाजाचे शूर, धाडशी

सरदार होते. त्यांचे पूर्वीचे आडनाव ' जगताप ' होते.[१११] भानाजीराव जगताप हे मूळचे ' सासवडचे ' वतनदार घराणे होते. कुलदैवत तुळजापूरच्या देवीच्या दर्शनाला जाताना त्यांनीच हे धामणगाव चांगले वसविले. येथेच त्यांना ' शिवाजी ' व ' माणकोजी ' हे दोन पुत्र झाले. यावेळी त्यांच्याच गोत्रातील भिकाजी जगताप हा धामणगावचा पाटील होता. त्याला वारस नसल्यामुळे त्याने आपले पाटीलकीचे वतन भानाजीरावांना दिले.[११२] पुढे आपला मोठा भाऊ शिवाजी यांच्या सांगण्यावरून माणकोजी पंढरपूरला गेले. तेथे साक्षात पांडुरंगाने त्यांना एकांतात बोध केल्याची कथा आहे. त्यामुळे ते पुढे ' बोधले ' आडनावाने प्रसिध्द झाले. त्यांनी आपली सर्व शस्त्रे पांडुरंगासमोर ठेवली आणि भक्तीमार्ग स्वीकारला.[११३]

या महान माणकोजी बोधले महाराजांनी जेष्ठ वद्य तृतिया शके १६१६ मध्ये धामणगाव येथे संजीवन समाधी घेतली. आज त्यांच्या समाधीला एका मोठ्या तीर्थस्थळाचे स्वरूप प्राप्त झाले आहे.[११४] पंढरपूर येथे पांडुरंगाच्या मंदिरापासून दक्षिणेस पाऊण मैलावर विष्णूपद हे मंदिर आहे. या मंदिराची मूळ बांधणी बोधलेबुवाची असून हे मंदिर त्यांनी इ. स. १६४० मध्ये बांधले होते.[११५] या महान विठ्ठल भक्त माणकोजी बोधले महाराज यांना छत्रपती शिवाजी महाराज गुरूस्थानी मानत असत. धामणगाव येथील बोधले महाराजांच्या मठाची तसेच समाधीची व्यवस्था त्यांचे वंशज पाहतात. या देवस्थानला इनामी जमिनी लावून दिलेल्या आहेत.[११६]

अशा इतिहासाची साक्ष देणारे अनेक अवशेष आजही तेथे पहावयास मिळतात. तेथील बोधले महाराजांच्या मठातील सर्व मंदिराचे कळस मुस्लिम पध्दतीचे घुमटाकार असून त्या कळसावर आपणास चंद्र पहावयास मिळतो. लोकसंख्येचा विचार केल्यास हे गाव फारसे मोठे नव्हते. मात्र केवळ माणकोजी बोधले या संतामुळे या गावाची एक वैशिष्टयपूर्ण ओळख निर्माण झाली व ती आजतागायत कायम आहे. या महान संताच्या स्मरणार्थ धामणगावामध्ये जून-जुलै मध्ये आषाढी एकादशी ते पोर्णिमा व ऑक्टोबर-नोव्हेंबर मध्ये कार्तिक एकादशी ते पोर्णिमा अशी वर्षातून दोन वेळेस यात्रा भरते.[११७]

बोधले महाराजांना इनाम दिलेल्या जमिनी महाराष्ट्र तसेच महाराष्ट्राबाहेर देखील मोठ्या प्रमाणात आहेत. त्यापैकी काहींचा शोध लागलेला आहे. जे लोक या वतनी जमिनी वापरतात ते माणकोजी बोधले महाराज यांचे कार्य पुढे चालविण्याचा कोणताही प्रयत्न करत नाहीत.[११८]

५) आगळगाव

चांदनी नदीच्या तीरावर वसलेले आगळगाव हे एक बार्शी तालुक्यातील महत्वाचे गाव आहे. गावाच्या दोन्ही बाजूने नद्या आहेत. जवळच बाभुळगाव येथे चांदनी नदीवर एक तलाव आहे. याचा

आगळगाव परिसराला खूप फायदा झाला.[११९] आगळगाव येथील आठवडा बाजार प्रत्येक बुधवारी भरत होता. मात्र बार्शी हे शहर खूपच जवळ असल्याने येथील बाजार सध्या भरत नाही.[१२०]

इंग्रजाच्या काळापासूनच आगळगाव येथे प्राथमिक शिक्षणाची सोय उपलब्ध आहे. तसेच या ठिकाणी माध्यमिक शिक्षणाची सोय उपलब्ध आहे. चैत्र शुध्द नवमीला या ठिकाणी रामनवमी निमित्त फार मोठा स्वरूपात ' रामनवमी उत्सव ' साजरा केला जातो. ऑक्टोबर-नोव्हेंबर मध्ये उरूस साजरा होतो. या गावामध्ये चार मंदिरे व एक मठ, आहे. या मंदिर व मठाच्या माध्यमातून वेगवेगळे सण-उत्सव साजरे केले जातात. याशिवाय या गावामध्ये व्यायामशाळा, ग्रंथालय व दवाखान्याचीही सोय आहे.[१२१]

आगळगाव हे गाव शिक्षकांचे गाव म्हणून अखिल महाराष्ट्रात प्रसिध्द आहे. या गावामध्ये १५०० पेक्षा जास्त प्राथमिक शिक्षक आहेत. अखिल महाराष्ट्रात एका खेडयामध्ये इतके प्राथमिक शिक्षक कदाचीत कोणत्याच गावात नसतील. या गावातील वैद्य आडनावाच्या एका कुटुंबामध्ये २० पेक्षा अधिक शिक्षक आहेत. एखादा-दुसरा अपवाद वगळता या गावामध्ये असे एकही कुटुंब नाही की ज्या कुटुंबामध्ये शिक्षक नाही. या गावातील बहुसंख्य लोक विवाहासाठी इतर कोणत्याही नोकरदारापेक्षा शिक्षकालाच अधिक पसंती देतात. ज्ञानदानाचे पवित्र कार्य करण्याचे काम अखंडपणे आगळगावकर करत आहेत. या गावामध्ये शिकण्यासाठी आलेला विद्यार्थी शिक्षक होतो असे समिकरणच बनले होते. बार्शी तालुक्यामध्ये असणाऱ्या सर्व प्रकारच्या फळबागा आगळगावच्या शिवारामध्ये दिसून येतात. मात्र या गावाचा नोकरीकडे जास्त कल असल्याने शेतीच्या विकासाकडे जास्त लक्ष दिसून येत नाही.[१२२] अखिल महाराष्ट्राच्या ग्रामीण भागामध्ये या गावातील प्राथमिक शाळा नावाजलेली होती. खूप दूरवरून मुले येथील शाळेमध्ये शिकण्यासाठी येत.[१२३]

शिक्षणाचा हा वारसा लक्षात घेऊनच कर्मवीर मामासाहेब जगदाळे यांनी आगळगाव येथे हे लोकसेवा विद्यालय सुरू केले. इ. स. १९५८ मध्ये सुरू केलेल्या या हायस्कूलसाठी आगळगावचे श्री. दगडू संभाजी नाईक यांनी आपली चार एकर जमीन दान दिली. शिवाय या हायस्कूलच्या अडीअडचणीच्या वेळी आगळगावच्या श्री. रमेश मोरे व श्री. दत्तात्रय कानडे गुरूजी यांनी खूप मदत केली. या विद्यालयामुळे आगळगाव परिसरातील विद्यार्थ्यांना माध्यमिक शिक्षण जवळच उपलब्ध झाले. याचा विशेषत: गरीब विद्यार्थ्यांना जे पैशाअभावी शिक्षणासाठी बाहेर जाऊ शकत नव्हते त्यांना खूप फायदा झाला.[१२४]

महाराष्ट्राची कुलस्वामिनी तुळजाभवानीचे ' बुऱ्हाणनगर ' हे माहेर आहे तर ' तुळजापूर ' हे सासर आहे असे म्हटले जाते. नगरचे इतिहास संशोधक कै. सरदार नानासाहेब मिरीकर यांच्या संशोधनातून पुढील माहिती उजेडात आली. शालीवाहन राजे देवी भक्त होते. त्यांच्या देवीचे नाव 'अंबिका' होते. कारण बुऱ्हाणनगर येथे सापडलेल्या सोन्याच्या नाण्यावर एका बाजूला देवीचे चित्र असून दुसऱ्या बाजूला अंबिका

प्रसन्न असे लिहिलेले आहे. शालीवाहन घराण्याला उतरती कळा लागल्यानंतर राजा ' शंभूराव ' याने देवीची मूर्ती ' अंधेरी नगरी ' येथे आणून ठेवली. हे ठिकाण अहमदनगरच्या ईशान्येस आहे. इस्लामी शासकांनी १६ व्या शतकात या ठिकाणाचे नाव ' बुऱ्हाणनगर ' ठेवले. या ठिकाणी ' तेलंगा ' नावाचा राजा होता. देवीची मूर्ती ३००-४०० वर्ष या ठिकाणी होती. पुढे या राजाची २८ वी पिढी ' देवकर ' या आडनावाने नावारूपास आली. ते देवीची पूजा करत म्हणून त्यांना ' भगत ' हे आडनाव प्राप्त झाले. ' तेलंगा राजा ' कर्नाटक स्वारीवर जाताना सुरक्षिततेसाठी त्यांनी देवीची मूर्ती चिंचपूर (सध्याचे तुळजापूर) येथे ठेवली. त्या लढाईतच तेलंगा राजाचा अंत झाला. या तेलंगा राजाची समाधी तुळजापूर येथे आहे. अफजलखानाच्या आक्रमणामुळे ' जानकोजी देवकर-भगत ' यांनी ही मूर्ती बुऱ्हाणनगर येथे आणली. जात्यात भरडलेली मूर्ती नकली आहे हे अफजलखानाला समजताच त्याने जानकोजी देवकर-भगत यांचा पाठलाग सुरू केला. जानकोजी देवकर-भगत अहमदनगरच्या हद्दीत आले. मात्र त्यावेळी अहमदनगर मुघलांच्या ताब्यात असल्याने अफजलखान जामखेडपासूनच परत गेला. पुढे अफजलखानाच्या वधानंतर पुन्हा ही मूर्ती तुळजापूरला आणली. जानकोजीची देवीवर अपार श्रध्दा होती. जानकोजी तुळजापूरला गेले. त्या ठिकाणी देवीने त्यांना दृष्टांत दिल्याची कथा आहे. त्यावेळी जानकोजींनी देवीकडे माझ्या पिढयानपिढयांना तुझी सेवा करण्याची संधी मिळावी असा वर मागितला. त्यावेळी देवीने जानकोजीला " तू पाठविलेल्या पालखीतून सीमोल्लंघन करीन व तू पाठविलेल्या पलंगावर मी पाच दिवस निद्रा करीन " असा आशीर्वाद दिला. तेव्हापासून पालखी व पलंग नगरहून तुळजापूरला नेण्याची प्रथा आजतागायत चालू आहे. जानकोजी देवकर-भगत यांच्या वंशजामधील मोठ्या मुलाकडे हा वारसा परंपरेने जातो. जानकोजी देवकर-भगत यांना देवीने दिलेल्या आशिर्वादामुळे दरवर्षी दसऱ्याला मूळ मूर्ती जानकोजी देवकर-भगत यांच्या वंशजांनी आणलेल्या पालखीत बसविली जाते. नंतर त्यांनी आणलेल्या पलंगावर पाच दिवस देवीच्या मूर्तीस ठेवले जाते. तोपर्यंत सिंहासन रिकामे असते. [१२५]

सीमोल्लंघनाच्या दिवशी गाभाऱ्यातून तुळजाभवानीच्या मूर्तीला १०८ वस्त्रामध्ये लपेटून जानकोजी देवकर-भगत यांच्या वंशजांनी आणलेल्या पालखीत बसविली जाते. त्यानंतर भोप्यांचे काम संपले. आता त्यांचा देवीशी काही संबंध राहत नाही. त्यानंतर ' १२ भोई ' व ' जानकोजी देवकर-भगत यांचे वंशज ' हे पालखीसह मंदिराला प्रदक्षिणा घालतात.[१२६]

१५० वर्षापूर्वी ही पालखी नगरहून तुळजापूरला निघाली होती. पालखी आगळगाव पर्यंत आली. मात्र मुसळधार पावसामुळे नदीला पूर आलेला होता. तुळजापूरला पालखी घेऊन जाणे गरजेचे होते. तेव्हा ही पालखी नदीच्या पलीकडे कशी न्यायची असा प्रश्न पडला. त्यावेळी आगळगावकरांनी धाडस दाखवून ही पालखी पुरातून पलीकडे नेली. तेव्हापासून या पालखीला खांदा देण्याचा मान या आगळगावला मिळाला

आहे व तो आजतागायत कायम आहे. देवीचा पलंगदेखील बार्शी तालुक्यातील उंबरगे, आगळगाव, बाभूळगाव, घारी-पुरी, पांगरी, गोरमाळे, भातंबरे, गौडगावमार्गे तुळजापूरला जातो. अखिल महाराष्ट्राची कुलस्वामिनी तुळजाभवानी प्रत्येक वर्षी पालखीच्या माध्यमातून आगळगावकरांच्या खांद्यावर असते हा या गावासाठी सुवर्णक्षण असतो.[१२७]

बार्शी तालुक्याच्या राजकारणाचा ' आगळगाव ' हे गाव केंद्रबिंदू आहे. या तालुक्यतील पंचायत समितीपासून ते विधानसभेपर्यंतच्या सर्व निवडणूक प्रचाराचा शुभारंभ आगळगावमधील विठ्ठल मंदिरामध्ये श्रीफळ वाढवून होतो. विठ्ठल मूर्ती ही बहुतेक काळ्या पाषाणाची असते. मात्र आगळगाव येथील विठ्ठल मूर्ती संगमरवरी दगडाची आहे, हे विशेष.[१२८]

१.१६ स्वातंत्र्योत्तर बार्शी तालुक्याची राजकीय वाटचाल

बार्शीमध्ये महात्मा गांधी यांची सभा ऐकून राष्ट्रप्रेमाने प्रेरीत होऊन भारताच्या राजकारणावर छाप पाडणारे, सुरवातीला शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने व नंतर काँग्रेसच्या वतीने कार्य करणरे महान स्वातंत्र्य सेनानी, खासदार कै. तुळशीदास जाधव हे बार्शी तालुक्यातील ' दहिटणे ' या गावचे होते. महात्मा गांधी यांचा त्यांच्यावर इतका प्रभाव पडला होता की, इंग्रजांनी पिस्तूल रोखले तरी तुळशीदास जाधव यांनी डोक्यावरील गांधीटोपी काढली नाही. मोर्चे, तुरूंगवास, निदर्शने, जनसामान्याचे प्रबोधन, प्रारंभी काँग्रेसला हरवणे, नंतर काँग्रेसमध्ये जावून जिवापाड काम करणे, दिल्लीचे राजकारण, शेतकरी, कामगारांचे प्रश्न सोडविणे, सततचे परदेश दौरे अशा व्यापासह वयाच्या ९७ वर्षापर्यंत त्यांनी राजकारण, समाजकारण याबरोबरच बार्शी तालुक्याच्या आर्थिक विकासात मोलाचे योगदान दिले. त्यांचे नेहरू परिवाराबरोबर खूप जिव्हाळयाचे संबंध होते.[१२९]

भारत देश स्वतंत्र झाल्यानंतर झालेल्या विधान सभेच्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीत श्री. नरसिंह तात्या देशमुख हे बार्शी तालुक्याचे पहिले आमदार झाले. कर्मवीर मामासाहेब जगदाळे यांना राजकारणात विशेष रस नव्हता, परंतू संस्थेच्या विकासासाठी व सरकार दरबारी महत्वाची कामे करून घेण्यासाठी मामांनी शेतकरी कामगार पक्षातर्फे त्यांचे मित्र व संस्थेचे सहकारी श्री. नरसिंह तात्या देशमुख यांना उभे करून निवडून आणले. मामांच्या या दबदब्यामुळे यशवंतराव चव्हाण सारखे नेते बार्शीला आवर्जून भेट देत. तत्कालीन शिक्षण मंत्री बाळासाहेब देसाई यांनी शासनातर्फे संस्थेला मंजूर केलेल्या एक लाखाच्या अनुदानाच्या पत्रावर सही करताना एक लाखाचा आकडा बदलून तो दोन लाख केला होता. हा मामांच्या बार्शी तालुक्यावरील प्रभावाचा परिणाम होता.[१३०]

श्री. नरसिंह तात्या देशमुख यांच्या नंतर हिंदूस्थानच्या स्वातंत्र्य चळवळीमध्ये अनेकवेळेस तुरूंगवास भोगलेले श्री. शिवाजीभाई आर्य हे इ. स. १९५७ मध्ये काँग्रेस पक्षाच्या वतीने बार्शी तालुक्याचे आमदार झाले. बार्शी तालुक्याच्या दृष्टीने श्री. शिवाजीभाई आर्य यांचे कार्य अत्यंत आदर्श मानले जाते. मोठ्या निरपेक्ष भावनेने त्यांनी बार्शी तालुक्याची सेवा केली. श्री. शिवाजीभाई आर्य यांच्या नंतर श्रीमती प्रभाताई शंकर झाडबुके या काँग्रेस पक्षाच्या वतीने दोन वेळेस अनुक्रमे १९६२-१९६७ व १९६७-१९७२ या कालावधीमध्ये बार्शी तालुक्याच्या आमदार झाल्या. बार्शी तालुक्याच्या विकासासाठी त्यांनी अथक प्रयत्न केले. एक अभ्यासू लोकप्रतिनिधी म्हणून त्यांची ओळख होती.[१३१] बार्शी तालुक्यातील आजपर्यंतच्या त्या एकमेव विधानपरिषद सदस्य आहेत. श्रीमती. प्रभाताई शंकर झाडबुके वगळता स्वातंत्र्यापासून इ. स. २०१३ पर्यंत बार्शी तालुक्यातील कोणालाही विधानपरिषद सदस्य होण्याची संधी मिळालेली नाही. पहिल्या महाराष्ट्र वित्त आयोगाच्या तीन सदस्यामध्ये श्रीमती. प्रभाताई झाडबुके यांचा समावेश होता. त्यांच्या अभ्यासू वृत्तीमुळेच त्यांना पहिल्या महाराष्ट्र वित्त आयोगावर काम करण्याची संधी मिळाली.[१३२]

तक्ता क्र . ६

बार्शी तालुक्याचे लोकप्रतिनिधी

अ.क्र	नाव	पक्ष	कालावधी
१	श्री.नरसिंह तात्या देशमुख	शे.का.प	**१९५२-१९५७**
२	श्री.शिवाजीभाई आर्य	काँग्रेस	**१९५७-१९६२**
३	श्रीमती.प्रभाताई शंकर झाडबुके	काँग्रेस	**१९६२-१९६७**
४	श्रीमती.प्रभाताई शंकर झाडबुके	काँग्रेस	**१९६७-१९७२**
५	सौ.शैलजाताई चतुर्भूज शितोळे	काँग्रेस	**१९७२-१९७७**
६	श्री.कृष्णराव नानासाहेब देशमुख	काँग्रेस	**१९७७-१९८०**
७	श्री.बाबुराव महादेव नरके	काँग्रेस	**१९८०-१९८५**
८	श्री.दिलीप गंगाधर सोपल	एस.काँग्रेस	**१९८५-१९९०**
९	श्री.दिलीप गंगाधर सोपल	काँग्रेस	**१९९०-१९९५**
१०	श्री.दिलीप गंगाधर सोपल	अपक्ष	**१९९५-२०००**
११	श्री.दिलीप गंगाधर सोपल	रा. काँग्रेस	**२०००-२००५**
१२	श्री.राजेंद्र विठ्ठल राऊत	शिवसेना	**२००५-२००९**
१३	श्री.दिलीप गंगाधर सोपल	अपक्ष	**२००९..पासून**

(संदर्भ :- जिल्हा निवडणुक कार्यालयातून मिळालेली माहिती.)

इ. स. १९७२ च्या निवडणुकीमध्ये कॉग्रेस पक्षाचे तिकीट मिळविण्यासाठी जगदाळे मामा यशवंतराव चव्हाण यांना भेटले. मात्र स्वत: यशवंतराव चव्हाण यांनी मामांनी स्वत: राजकारणात उतरू नये असा सल्ला दिला. शिवाय संस्थेच्या कामातून मामांना उसंत मिळत नव्हती. त्यामुळे मामांनी आपला विचार बदलला व आपल्या मानसकन्या प्रा. सौ. शैलजा शितोळे यांना काँग्रेस पक्षाचे तिकीट मिळवून दिले. त्यावेळी झालेल्या अटीतटीच्या लढतीत प्रा. सौ. शैलजा शितोळे यांनी शेतकरी कामगार पक्षाचे श्री. ज्ञानेश्वर पाटील यांचा पराभव केला. प्रा. सौ. शैलजा शितोळे यांनी मामांच्या मार्गदर्शनाखाली बार्शी तालुक्यासाठी उत्तम कार्य केले.[१३३] इ. स. १९७२ च्या अधिवेशनामध्ये आमदार श्रीमती. शैलजा शितोळे या १०० टक्के हजर होत्या. या वर्षी त्यांची विधान भवन इमारतीच्या बांधकाम व विस्तार समितीवर नियुक्ती झाली होती.[१३४] प्रा. सौ. शैलजा शितोळे यांच्यानंतर श्री. कृष्णराव नानासाहेब देशमुख हे काँग्रेस पक्षाच्या वतीने इ. स. १९८० पर्यंत बार्शी तालुक्याचे आमदार होते. त्यांच्यानंतर श्री. बाबुराव महादेव नरके हेही काँग्रेस पक्षाच्याच वतीने इ. स. १९८०-१९८५ पर्यंत बार्शी तालुक्याचे आमदार होते. श्री. बाबुराव महादेव नरके यांच्यानंतर एस. काँग्रेस पक्षाच्या वतीने ' चरखा ' या चिन्हावर इ. स. १९८५ मध्ये श्री. दिलीप गंगाधर सोपल हे बार्शी तालुक्याचे आमदार झाले. इ. स. १९८५ पसून इ. स. २००५ पर्यंत श्री. दिलीप गंगाधर सोपल हे प्रत्येक वेळी वेगवेगळया चिन्हावर बार्शी तालुक्याचे आमदार झाले. इ. स. २००९ मध्ये ते पुन्हा एकदा वेगळयाच चिन्हावर आमदार झाले आहेत. इ. स. २००५ ते २००९ या कालावधीमध्ये श्री. राजेंद्र विठ्ठल राऊत हे शिवसेनेच्या वतीने बार्शी तालुक्याचे आमदार झाले होते. सोपल यांनी कॅन्सर हॉस्पिटलला अनेक ठिकाणाहून मदत मिळवून दिली. सोपल यांच्या प्रयत्नामुळेच उद्योगपती ' रतनजी टाटा ' यांनी या हॉस्पिटलला भेट देऊन मोठी आर्थिक देणगी दिली. तसेच सोपल यांनी बार्शी शहराला तिर्थक्षेत्राचा दर्जा मिळवून दिला. त्यामुळे शहराच्या विकासासाठी शासनाकडून भरपूर आर्थिक मदत मिळाली.[१३५]

बार्शी तालुक्यातील वैरागसह ५७ गावांची राजकीयदृष्टया खूप बिकट स्थिती होती. कारण सर्व कामासाठी या भागाला बार्शीला यावे लागत होते, मात्र या भागाचे मतदान बार्शी तालुक्यात नव्हते. इ. स. १९४७ मध्ये हा भाग उत्तर सोलापूरला जोडला होता. इ. स. १९५२ मध्ये हा भाग माढयाला जोडला होता. इ. स. १९५७ नंतर हा भाग मोहोळला जोडण्यात आला. तो इ. स. २००९ पर्यंत कायम होता. इ. स. २००९ मध्ये हा भाग बार्शी तालुक्याला जोडण्यात आला व या भागाची होणारी परवड थांबली. अशा या राजकीय वाटचालीमध्ये वैराग भागाला दोन वेळेस आमदार होण्याची संधी मिळाली. वैराग भागातून इ. स. १९८०-८५ व इ. स. १९९०-९५ या काळात बार्शी तालुक्यातील पानगाव-वैराग येथील

इतिहासप्रसिध्द निंबाळकर घराण्यातील ' चंद्रकांत नाना निंबाळकर ' आमदार होते. या भागाच्या विकासासाठी नानांनी अथक प्रयत्न केले. [१३६]

संदर्भ साधने

१) महाराष्ट्र १९७०, प्रसिध्दी संचालनालय महाराष्ट्र शासन मुंबई-३२, जून १९७१, पृ.१७ ते १९.

२) गौतम कल्पना, भारतीय राज्य और केंद्रशासीत प्रदेश, इ. स. २००८, पृ.३९, ४०.

३) क्षीरसागर. व्हि. एस., असा हा महाराष्ट्र, इ. स. २००२, पृष्ठ क्र. १७.

४) देशमुख गोपाळराव, सोलापूर जिल्ह्याची बखर, इ. स. १९८१, पृ.३.

५) महाराष्ट्र स्टेट गॅझेटियर, सोलापूर जिल्हा, इ. स. १९७७, पृ.४ .

६) गॅझेटियर ऑफ बॉम्बे प्रेसिडेन्सी, सोलापूर जिल्हा, इ. स. १८८४, पृ.२७५ ते २९०.

७) देशमुख गोपाळराव, सोलापूर जिल्ह्याचा इतिहास, फेब्रुवारी २००९, पृ.७ ते ११.

८) भारताची जनगणना , जिल्हा जनगणना हस्तपुस्तिका, सोलापूर, इ. स. १९९१, पृ.१३, १४.

९) गॅझेटियर ऑफ बॉम्बे प्रेसिडेन्सी, सोलापूर जिल्हा, इ. स. १८८४, पृ.३०१, ३०३.

१०) भारताची जनगणना , जिल्हा जनगणना हस्तपुस्तिका, सोलापूर, इ. स. १९६१, पृ.३.

११) येवले. शं. भा., सोलापूर जिल्ह्यातील स्वातंत्र्य लढा, पृ.७.

१२) देशमुख गोपाळराव, पूर्वोक्त, पृ.२१४, २६९.

१३) गॅझेटियर ऑफ बॉम्बे प्रेसिडेन्सी, सोलापूर जिल्हा, इ. स. १८८४, पृ.१, ३०३.

१४) कित्ता, पृ.३९१.

१५) भारताची जनगणना , जिल्हा जनगणना हस्तपुस्तिका, सोलापूर, इ. स. १९६१, पृ.४८.

१६) महाराष्ट्र स्टेट गॅझेटियर, सोलापूर जिल्हा, इ. स. १९७७, पृ.२१.

१७) भालेराव. श. म., भारतीय सरीताकोश, खंड २, पृ.१०३७, १०३८.

१८) गॅझेटियर ऑफ बॉम्बे प्रेसिडेन्सी ,सोलापूर जिल्हा, सन १८८४, पृ.३४८, ३९१.

१९) महाराष्ट्र स्टेट गॅझेटियर, सोलापूर जिल्हा, इ. स. १९७७, पृ.२४५, १००३.

२०) सामाजिक -आर्थिक समालोचन, जिल्हा सोलापूर, इ. स. १९५८-५९, पृ.१२.

२१) भारताची जनगणना , जिल्हा जनगणना हस्तपुस्तिका, सोलापूर, इ. स. १९५१, पृ.१२०.

२२) कित्ता, इ. स. १९९१, पृ.६, १४.

२३) कित्ता, इ. स. १९५१, पृ.२, ३, ५.

२४) कित्ता, इ. स. १९९१, पृ.६.

२५) बिराजदार आप्पा, रामलिंग महिमा, इ. स. २००७, पृ.१२, १३.

२६) राम अवतार, जह जह राम चरण चली जाही, श्री राम शोध संस्थान न्यास दिल्ली,पृ.६१.

२७) लोमटे. सं. श., श्री क्षेत्र रामलिंग देवस्थान विशेषांक, इ. स. २००२, पृ.४, १९.

२८) देशपांडे. सु. व., श्री अंबरीष विजय, श्री भगवंत देवस्थान बार्शी, जून २००४.

२९) विकिपीडीया मुक्त विश्वकोश.

३०) बार्शी नगरपालिका शतकोत्तर रौप्य महोत्सव स्मरणिका, जून १९९०.

३१) भगवंत मंदिर दिंडी नियोजन नोंद वही.

३२) देशमुख गोपाळराव, पूर्वोक्त, पृ.५७३.

३३) कुलकर्णी . प. ना., संचार वर्तमानपत्रातील लेख, दि १८ ऑगस्ट १९९७,पृ.८.

३४) पुण्य नगरी, सोलापूर वृत्तवेध, मंगळवार २० ऑगस्ट २०१३, पृ.३.

३५) मुळे. शा. द., इये भगवंताचिये नगरी स्मरणिका, इ. स. २००७, पृ.२४,२५,२६.

३६) सुलाखे दिनुभाऊ, अक्षरपालखी स्मरणिका, इ. स. १९८०, पृ.७४ ते १०६.

३७) कित्ता, पृ.१२१, १२३.

३८) वेळापूरकर मठाधिपती गुरू मुक्तेश्वर शिवाचार्य महास्वामी यांचा बायोडाटा.

३९) तत्कालीन वर्तमानपत्रे.

४०) बार्शी नगरपालिका शतकोत्तर रौप्य महोत्सव स्मरणिका, जून १९९०.

४१) महाराष्ट्र स्टेट गॅझेटियर, सोलापूर जिल्हा, इ. स. १९७७, पृ.४.

४२) गॅझेटियर ऑफ बॉम्बे प्रेसिडेन्सी ,सोलापूर जिल्हा, सन १८८४, पृ.३८४.

४३) इंगळे. व. न., शिक्षण पंढरीचा वारकरी कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे, जुलै २००२, पृ.२५,६१

४४) महाराष्ट्र स्टेट गॅझेटियर, सोलापूर जिल्हा, इ. स. १९७७, पृ.८३७, ८३९.

४५) मुळे. शा. द., पूर्वोक्त, इ. स. २००७, पृ.६८.

४६) पाचकवडे लक्ष्मण, नाथगंध स्मरणिका, पृ.२५, २६.

४७) गॅझेटियर ऑफ बॉम्बे प्रेसिडेन्सी, सोलापूर जिल्हा, सन १८८४, पृ.२६१, २६२.

४८) देशमुख गोपाळराव, पूर्वोक्त, पृ.५७१ ते ५७३.

४९) बार्शी नगरपालिका शतकोत्तर रौप्य महोत्सव स्मरणिका, जून १९९०.

५०) डॉ. प्रभाकर देशमुख, भारताची अर्थव्यवस्था, नोव्हेंबर १९८७, पृ.९९, १००.

५१) गॅझेटियर ऑफ बॉम्बे प्रेसिडेन्सी, सोलापूर जिल्हा, सन १८८४, पृ.२६२, २६३, २७८.

५२) प्रभाकर देशमुख, पूर्वोक्त, पृ.१०७, १०८.

५३) भारताची जनगणना , जिल्हा जनगणना हस्तपुस्तिका, सोलापूर, इ. स. १९६१, पृ.५३,२३२,२३३

५४) कित्ता, इ. स. १९९१, पृ.४१.

५५) बार्शी नगरपालिका शतकोत्तर रौप्य महोत्सव स्मरणिका, जून १९९०.

५६) मुंबई पुराभिलेख, P.W.D. Filles No २६३४-I , इ. स. १९२२-२३, पृ.४३,४४, ५७.

५७) कित्ता, पृ.१३३, १३५.

५८) मुंबई पुराभिलेख, P.W.D. Filles No २६३४-II , इ. स. १९२२-२३, पृ.२४१,२४२, ३१९.

५९) बार्शी नगरपालिका शतकोत्तर रौप्य महोत्सव स्मरणिका, जून १९९०.

६०) सबकुछ सोलापूर, लोकमत मीडीया प्रा. लि. सोलापूर, फेब्रुवारी २०१४, पृ २१६.

६१) महाराष्ट्र राज्य गॅझेटियर, लातूर जिल्हा, भाग १, प्रथम अरवृत्ती (मराठी) पृ.५१२.

६२) महाराष्ट्र स्टेट गॅझेटियर, सोलापूर जिल्हा, इ. स. १९७७, पृ.५६८.

६३) देशपांडे. सु. व., पूर्वोक्त, जून २००४

६४) दातार आरती, महाराष्ट्रातील संतपरंपरा, पृ.७१.

६५) देशमुख गोपाळराव, पूर्वोक्त, पृ.५२, १६८, ५७१.

६६) बार्शी नगरपालिका शतकोत्तर रौप्य महोत्सव स्मरणिका, जून १९९०.

६७) स्वामी. भि. शि., सद्गुरूदर्शन, हिरक महोत्सव गौरव ग्रंथ, पृ.१,२,९०,९३.

६८) मुलाखत, श्रीमान. बाबासाहेब उध्दवराव मनगिरे, माजी नगराध्यक्ष बार्शी नगरपालिका.

६९) भारताची जनगणना , जिल्हा जनगणना हस्तपुस्तिका, सोलापूर, इ. स. १९६१, पृ.७, १२

७०) कित्ता, इ. स. १९७१, पृ.३०, ३१, ३८ ते ४०.

७१) मुलाखत, श्रीमान. बाबासाहेब उध्दवराव मनगिरे, माजी नगराध्यक्ष बार्शी नगरपालिका.

७२) येवले. शं. भा., पूर्वोक्त, पृ.७०, ७१, ७२, ८५, ८६.

७३) प्रभाकर गुप्ते, महाराष्ट्र प्रदेश स्वातंत्र्य सैनिक महासंघ सदस्य परिचय, पृ.७९, १३३, १३४.

७४) भारतीय राष्ट्रीय काँग्रेस जन्मशताब्दी महोत्सव स्मरणिका, २८ डिसेंबर १९८५

७५) महाराष्ट्र राज्य गॅझेटियर, लातूर जिल्हा, भाग १, प्रथम आवृत्ती (मराठी) पृ.११४ ते १२९.

७६) सुलाखे सुशाला, हैद्राबादेंतील जनतेचे बंड, इ. स. १९४७, पृ.

७७) महाराष्ट्र राज्य गॅझेटियर, लातूर जिल्हा, भाग १, प्रथम आवृत्ती (मराठी) पृ.१३२ ते १४४.

७८) वसंत पोतदार, हैद्राबाद स्वातंत्र्य संग्राम, तिसरी आवृत्ती, इ. स. २००६, पृ.२१९.

७९) महाराष्ट्र राज्य गॅझेटियर, लातूर जिल्हा, भाग १, प्रथम आवृत्ती (मराठी) पृ.१४४, १४५.

८०) वसंत पोतदार, पूर्वोक्त, पृ.२१५ ते २२२, २४२.

८१) येवले. शं. भा., पूर्वोक्त, पृ.७२, ७३.

८२) प्रभाकर गुप्ते, पूर्वोक्त, पृ.४५, ७७, ७८, १३४ ते १६०.

८३) भारतीय राष्ट्रीय काँग्रेस जन्मशताब्दी महोत्सव स्मरणिका, २८ डिसेंबर १९८५.

८४) महाराष्ट्र राज्य गॅझेटियर, लातूर जिल्हा, भाग १, प्रथम आवृत्ती (मराठी) पृ.१४८.

८५) देशपांडे. द. ग., हैद्राबाद वऱ्हाड मुक्तीसंग्राम, जानेवारी १९८७, पृ.१३२.

८६) प्रभाकर गुप्ते, पूर्वोक्त, पृ.१४३.

८७) भारतीय राष्ट्रीय काँग्रेस जन्मशताब्दी महोत्सव स्मरणिका, २८ डिसेंबर १९८५.

८८) येवले. शं. भा., पूर्वोक्त, पृ.७३.

८९) अत्रे त्रिं. ना., गावगाडा, पृ.१, २, ५.

९०) मुंबई पुराभिलेखागार, १९३३ चा मुंबई गावपंचायतीबाबतचा ॲक्ट, फाईल नं १९६९५/१, पृ.४.

९१) कुलकर्णी. प. ना, संचार वर्तमानपत्रातील लेख, दि १८ ऑगस्ट १९९७, पृ.८.

९२) महाराष्ट्र स्टेट गॅझेटियर, सोलापूर जिल्हा, इ. स. १९७७, पृ.९९७ ते ९९९.

९३) मुंबई पुराभिलेखागार, भारतीय जनगणना १९६१, फाईल नं आर-४००१६/२, पृ.२१६, २११.

९४) श्री. देशमुख गोपाळराव, पूर्वोक्त, पृ.५९४ ते ५९८.

९५) गॅझेटियर ऑफ बॉम्बे प्रेसिडेन्सी, सोलापूर जिल्हा, पृ.७६, ७७, २३१, २३२, ५०३.

९६) कृषी उत्पन्न बाजार समिती बार्शी, वार्षिक अहवाल, इ.स. १९५४-५५, पृ.२५.

९७) कित्ता, इ. स. १९५६-५७, पृ.२०.

९८) एकमत वर्तमान पत्रातील लेख, २५ फेब्रुवारी २०१२.

९९) मुलाखत, माजी आमदार चंद्रकांत नाना निंबाळकर,(लोकमत, ३ जुलै २०१२,पृष्ठ क्र ३)

१००) देशमुख गोपाळराव, पूर्वोक्त, पृ.५६२.

१०१) सरदेसाई. गो. स., मराठी रियासत, खंड ४, इ. स. २०१०, पृ.२२७ ते २५०.

१०२) देशमुख गोपाळराव, पृ.५६३ ते ५६५.

१०३) कित्ता, पृ.१०२, १०३, ४८९.

१०४) भालेराव. श. म., पूर्वोक्त, पृ.१०३७,१०३८.

१०५) कारी येथील महादेव मंदीरावरील शिलालेख.

१०६) डायमंड इतिहास माहितीकोश, जानेवारी २००९, पृ.३८२.

१०७) मुलाखत, प्रा. सौ. प्रमिला देशमुख, मराठी विभाग, श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालय बार्शी.

१०८) मुंबई पुराभिलेखागार, भारतीय जनगणना १९६१, फाईल नं आर-४००१६/२, पृ.२११.

१०९) मुलाखत, श्री. शरद हवेली, मु. पो. कारी, माजी सभापती कृषी उत्पन्न बाजार समिती बार्शी.

११०) मुळे. शा. द., पूर्वोक्त सन २००७, पृ.२१, २२.

१११) Rebecca Reuben, Bodhla of Dhamangaon, १९८९, पृ. ३.

११२) बोधले. भा. अ, श्री बोधलिलांबरी ग्रंथ, अध्याय १ व २, इ. स. १९९४, पृ.८ ते १३.

११३) कित्ता, अध्याय ३ व ४, पृ.२१, ३३.

११४) कित्ता, अध्याय २५ वा, पृ.२५०.

११५) खरे. ग. ह, विठ्ठल आणि पंढरपूर, पृ.१३.

११६) देशमुख गोपाळराव, पूर्वोक्त, ऐतिहासिक गावे पृ.३.

११७) मुंबई पुराभिलेखागार, भारतीय जनगणना १९६१, फाईल नं आर -४००१६/२, पृ.२१६.

११८) मुलाखत, श्री. विवेकानंद बोधले, संत माणकोजी बोधले यांचे वंशज, धामणगाव (बोधले)

११९) भालेराव. श. म, पूर्वोक्त, पृ.१०३८.

१२०) भारताची जनगणना , जिल्हा जनगणना हस्तपुस्तिका, सोलापूर, इ. स. १९५१, पृ.१५३.

१२१) महाराष्ट्र स्टेट गॅझेटियर, सोलापूर जिल्हा, इ. स. १९७७, पृ.१००७.

१२२) मुलाखत, श्री. पवार नवनाथ भगवान, निवृत्त मुख्याद्यापक, आगळगाव.

१२३) नाव नोंदणी रजिस्टर, जि. प. प्रा. केंद्र शाळा आगळगाव.

१२४) इंगळे. व. न., पूर्वोक्त, पृष्ठ क्र८२.

१२५) माहिती पत्रक व मुलाखत, अर्जुन किसन भगत, जानकोजी देवकर-भगत यांचे वंशज, बुऱ्हाणनगर.

१२६) सिमोल्लंघनाचे मिरवणूकीबद्दल तुळजाभवानी मंदीर संस्थान यांचे ठराव/पत्र, दि १३ सप्टेंबर १९६८.

१२७) लोकमत वर्तमान पत्रातील लेख, २३ ऑक्टोबर २०१२, पृ.४.

१२८) मुलाखत, श्री. पाठक अशोक, विठ्ठल मंदीराचे पुजारी, आगळगाव.

१२९) व्यंकटेश कामतकर, पूर्वोक्त, पृ.५, ६, ८४, १२१.

१३०) इंगळे. व. न., पूर्वोक्त, पृ.९८, ९९.

१३१) बार्शी नगरपालिका शतकोत्तर रौप्य महोत्सव स्मरणिका, जून १९९०.

१३२) पहिला महाराष्ट्र वित्त आयोग अहवाल, जानेवारी १९९७, पृ.२ व परिशिष्टे पृ.५३.

१३३) इंगळे. व. न., पूर्वोक्त, पृ.१०१, १०२.

१३४) महाराष्ट्र विधानसभाअधिवेशन, संक्षिप्त अहवाल, मार्च १९७२, पृ.३०, ६२.

१३५) मुलाखत, श्री. योगेश सोपल, नगराध्यक्ष बार्शी नगरपालिका.

१३६) मुलाखत, माजी आमदार चंद्रकांत नाना निंबाळकर, वैराग.

प्रकरण दुसरे

बार्शी तालुक्याचा कृषी विकास

अ.क्र	घटक
२.१	**बार्शी तालुक्यातील जमीन (मृदा)**
२.२	**तालुक्यातील शेतकरी व शेतमजूर**
२.३	**तालुक्यातील भूमीउपयोजन**
२.४	**तालुक्यातील बागायती व जिरायती क्षेत्र**
२.५	**तालुक्यातील पिकनिहाय क्षेत्र**
२.६	**तालुक्यातील जलसिंचन स्त्रोत**
	२.६.१ पाऊस
	२.६.२ नद्या
	२.६.३ बंधारे व कॅनॉल
	२.६.४ विहिरी
	२.६.५ पाझर तलाव
	२.६.६ तलाव
२.७	**तालुक्यातील जमीन महसूल**
२.८	**तालुक्यातील दुष्काळ**
२.९	**तालुक्यातील पशुपालन**
२.१०	**तालुक्यातील शेतीची अवजारे**
२.११	**पीक स्पर्धा**
२.१२	**बार्शी पंचायत समितीचे कृषी विकासातील योगदान**

बार्शी तालुक्याचा कृषी विकास

प्रस्तावना,

कृषी व्यवसाय हा समृध्द परंपरा लाभलेला जगातील अत्यंत प्राचीन असा व्यवसाय आहे. भारत हा कृषीप्रधान देश असल्यामुळे कृषी हा भारताच्या अर्थव्यवस्थेचा सर्वात महत्त्वाचा भाग आहे. भारताच्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नापैकी निम्मे उत्पन्न शेतीमधून येते. इंग्लंडसारख्या उद्योगप्रधान देशामध्ये हे प्रमाण खूप कमी आहे. आपल्या देशातील सत्तर टक्के लोक शेतीवर अवलंबून आहेत. इंग्लंड-अमेरिकासारख्या देशात केवळ पाच टक्के लोक शेतीत काम करतात. भारतामध्ये दर वीस माणसापैकी चौदा माणसाच्या पोटापाण्याचा प्रश्न शेतीवर अवलंबून आहे. याउलट इंग्लंडमधील दर वीस माणसापैकी केवळ दोन माणसे शेतीवर अवलंबून आहेत.[१] केवळ विकसनशिल नव्हे तर, विकसित देशाच्याही अर्थव्यवस्थेमध्ये कृषीचे स्थान खूप महत्वाचे असते. वाढत्या लोकसंख्येची अन्नधान्याची गरज, पशुपालनासाठी आवश्यक असणारे खाद्य, विविध उद्योगांना लागणारा कच्चा माल याच्या पुरवठ्यामध्ये या कृषी व्यवसायाची भूमिका खूप महत्वाची आहे. भारतासारख्या शेतीप्रधान अर्थव्यवस्था असणाऱ्या देशात शेती हा राष्ट्रीय उत्पन्नाचा सर्वात महत्त्वाचा स्त्रोत आहे. अमेरीका, इंग्लंड यासारखे विकसित देश विकासाच्या सुरूवातीच्या काळात प्रामुख्याने कृषीच्याच प्रगतीवर विसंबून होते. औद्योगिक क्रांतीबरोबरच हरीत क्रांती झाल्यामुळे अनेक देशाच्या इतर आर्थिक क्षेत्रात स्थैर्य निर्माण होण्यास मदत झाली. विकसनशिल देशातील विविध आर्थिक योजना यशस्वी होण्यासाठी हा कृषी व्यवसाय अर्थशास्त्राच्या दृष्टीकोनातून अपरिहार्य असतो.[२]

स्वातंत्र्योत्तर काळात राष्ट्रीय विकास कार्यक्रमांतर्गत प्रत्येक तालुक्यात राष्ट्रीय विकास योजना गट उघडण्यात आले. जिल्हा परिषदा स्थापन होईपर्यंत यामार्फतच शेती विकासाच्या विविध योजना गट पातळीवर राबविण्यात आल्या. ८-१० गावांना १ शेती विस्तार प्रशिक्षित ग्रामसेवक व शेती मदतनीस याप्रमाणे शेती विकासाचे तंत्रज्ञान खेडयापर्यंत पोहचविले जात होते. इ. स. १९६२ मध्ये जिल्हा परिषदेची स्थापना झाली व खेडे स्वायत्त करण्यासाठी कृषी योजनांचा ओघ खेडयाकडे सुरू झाला.[३] इ. स. १९६०-६१ पासून भारत सरकारने भारतातील अन्नधान्याची टंचाई दूर करण्यासाठी शेती विकासाच्या नव्या धोरणाचा स्वीकार केला. या नव्या धोरणानुसार शेती उत्पादन वाढविण्यासाठी उत्पादनाचे नवीन तंत्र वापरण्यात येऊ लागले. त्याचप्रमाणे शासनाकडून शेतकरी वर्गाला सुधारित बी-बियाने, वित्तपुरवठा होऊ लागला. इ. स. १९६६-६७ पासून उत्पादनवाढ वेगाने होण्यासाठी तांदूळ, गहू, बाजरी, मका, ज्वारी, इत्यादी अन्नधान्यांच्या अधिक उत्पादन देणाऱ्या संकरीत जातीचा उपयोग सुरू झाला. मोठ्या प्रमाणात खतांचा वापर केल्यामुळे उत्पादन वाढीस हातभार लागला. शेती व्यवसायामध्ये आधुनिक शेतकी अवजारांचा वापर

होऊ लागला. अन्नधान्याचे उत्पादन वाढावे म्हणून सरकारने अन्नधान्याच्या किमती स्थिर ठेवण्याचे धोरण स्वीकारले. मोठ्या व मध्यम पाटबंधाऱ्याच्या योजना आखून जास्तीत-जास्त प्रदेशाला पाणीपुरवठा करण्याचे धोरण स्वीकारल्यामुळे कित्येक लाख एकर जमीन पाण्याखाली आली. इंडियन कौन्सिल ऑफ ॲग्रीकल्चरल रिसर्च आणि भारतातील कृषी विद्यापीठे यांनी केलेल्या संशोधनामुळे व जास्त उत्पादन देणाऱ्या पिकांच्या जातीच्या निर्मितीमुळे शेती उत्पादन फार मोठ्या प्रमाणात वाढले.[४]

सोलापूर जिल्ह्याचे हवामान ऊष्ण व कोरडे आहे. भीमा, सीना, निरा व भोगावती या जिल्ह्यातून वाहणाऱ्या प्रमुख नद्याआहेत. हा जिल्हा सतत अवर्षणाच्या छायेत असतो. त्यामुळे जलसिंचनाच्या दृष्टीने जिल्हा परिषदेने अनेक ठिकाणी पाझर तलावाची कामे हाती घेतली. जमिनी सुधारण्यासाठी विविध योजनांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना प्रोत्साहन दिले.[५] शेती हा सोलापूर जिल्ह्यातील प्रमुख व्यवसाय आहे. जिल्ह्याच्या एकूण लोकसंख्येपैकी ६९.४९ टक्के लोक या व्यवसायामध्ये गुंतलेले आहेत. महाराष्ट्र राज्याप्रमाणेच सोलापूर जिल्ह्यामध्ये खरीप व रब्बी हे शेतीचे मुख्य हंगाम आहेत. बाजरी, भुईमुग, तूर, कापूस, तांदूळ ही खरीपाची मुख्य पिके आहेत तर ज्वारी, गहू, हरभरा, सूर्यफूल ही रब्बी हंगामातील मुख्य पिके आहेत. जिल्ह्यामध्ये खरीपापेक्षा रब्बीचे क्षेत्र जास्त आहे. इ. स. १९५९-६० मध्ये हे प्रमाण ८०:२० असे होते, मात्र बार्शी तालुक्यामध्ये हे प्रमाण साधारणत: समान आहे. ज्वारी हे पीक दोन्ही हंगामामध्ये येते परंतू जिल्ह्यामध्ये खरीप ज्वारीपेक्षा रब्बी ज्वारीचे क्षेत्र जास्त आहे.[६] जिल्ह्यामध्ये केवळ बार्शी आणि सांगोला तालुक्यामध्ये दोन्ही हंगामामध्ये ज्वारीचे पीक घेतले जाते.[७]

२.१. बार्शी तालुक्यातील जमीन (मृदा)

शेती व्यवसायामध्ये मृदा हा अत्यंत महत्वाचा घटक असतो. मृदेच्या गुणधर्माचा कृषी उत्पादनावर अधिक परिणाम होतो. दख्खनच्या पठारावरून वाहून आलेल्या मातीने सोलापूर जिल्ह्याचा प्रदेश व्यापलेला आहे. सोलापूर जिल्ह्यामध्ये सर्वसाधारणपणे काळी, बरड आणि तांबडी अशी तीन प्रकारची मृदा आढळते. याला बार्शी तालुका अपवाद आहे. बार्शी तालुक्यामध्ये मोठ्या प्रमाणावर काळी माती आढळते. याशिवाय जिल्ह्यामध्ये भीमा व सीना नद्याच्या संगमावर काळी माती आढळते. बार्शी माढा व करमाळा यांच्या ऊत्तर-पूर्व भगामध्ये १२ ते १५ इंच खोल काळया मातीचा थर आढळतो. बार्शी तालुक्यामध्ये नद्याच्या काठावर उताराने उच्च प्रतीची काळी माती आढळते. तालुक्यात ओसाड माळरानावर सुध्दा पावसाळयात चांगल्या प्रतीचे गवत येते. तालुक्यामध्ये बऱ्याच ठिकाणी आंब्याच्या आंमराया होत्या.[८]

बार्शी तालुक्यातील आगळगाव ते काटेगाव रस्त्यासाठी तत्कालीन जिल्हा लोकल बोर्डाने जी जमीन संपादन केली होती ती अतिशय काळीभोर होती. त्यापैकी सर्वे नं १४२ हा आगळगाव या गावालगत

होता. यामध्ये आंब्याची उत्तम २३ झाडे होती. त्यामुळे होणारे नुकसान टाळण्यासाठी केवळ रस्त्यापुरतीच जमीन घेऊन आमचे होणारे नुकसान टाळावे अशी आगळगाव येथील सर्वे नं १४२ मधील ११ शेतकऱ्यांनी तत्कालीन जिल्हा लोकल बोर्डाला विनंती केली होती.[९]

२.२. तालुक्यातील शेतकरी व शेतमजूर

शेतकरी व शेतमजूर हे शेती व्यवसायाचे अविभाज्य घटक आहेत. यातील शेतमजूर हा भारताच्या कृषी अर्थव्यवस्थेचा आणि ग्रामीण भागातील आर्थिक व सामाजिक जीवनाचा एक अभिन्न व बहुमूल्य असा घटक आहे. शेतमजूर म्हणजे शेतीमध्ये तात्पुरते किंवा कायम स्वरूपी काम करणारे लोक होय. काही शेतमजूरांना स्वत:च्या मालकीची थोडीशी जमीन असली तरी त्यातून मिळणारे उत्पन्न अतिशय कमी असल्यामुळे त्यांना दुसऱ्याच्या शेतावर शेतमजूर म्हणून काम करावे लागते. वर्षातून साधारणत: ३ ते ४ महिने शेतमजूरांना बेकार रहावे लागते. शेतमजूर चौकशीच्या अहवालानुसार १९५०-५१ मध्ये शेतीवर मजूर म्हणून काम करणाऱ्या पुरूषांना दररोज १०९ पैसे, स्त्रियांना ६८ पैसे मजुरी मिळत होती.[१०]

तक्ता क्र . ७

बार्शी तालुक्यातील शेतकरी व शेतमजूर

वर्ष	शेतकरी	शेतमजूर
१९६१	४४,६५८	३५,७१६
१९७१	३३,१०४	३७,८६२
१९८१	३९,८५३	३५,७४९
१९९१	४०,७९४	४२,३१०

(संदर्भ :- जनगणना कार्यालय,मोहता मार्केट मुंबई,सोलापूर जिल्ह्याची जनगणना)

बार्शी तालुक्यामध्ये १०० हेक्टर शेतीयोग्य क्षेत्रामागे शेतकरी व शेतमजूर यांची संख्या ६१ इतकी होती. इ. स. १९९१ च्या जनगणनेप्रमाणे तालुक्याच्या एकूण लोकसंख्येमध्ये शेतीशी निगडीत लोकसंख्या १,१९,१७९ होती. यामध्ये शेतकऱ्यांची संख्या ४०,७९४ इतकी होती. यांचे हे प्रमाण ३४.२३ % इतके होते. हे प्रमाण महाराष्ट्रातील तसेच सोलापूर जिल्ह्यातील एकूण शेतकऱ्यांच्या प्रमाणापेक्षा जास्त होते. बार्शी तालुक्यातील शेतमजूरांची संख्या ४२,३१० होती. हे प्रमाण ३५.५० इतके होते. हेही प्रमाण महाराष्ट्रातील तसेच सोलापूर जिल्ह्यातील एकूण शेतमजूरांच्या प्रमाणापेक्षा जास्त होते. थोडक्यात सोलापूर जिल्ह्यामध्ये

नव्हे तर अखिल महाराष्ट्रातील शेतकरी व शेतमजूर यांच्या एकूण प्रमाणाच्या तुलनेत बार्शी तालुक्यातील शेतकरी व शेतमजूर यांचे प्रमाण जास्त होते.[११]

२.३. तालुक्यातील भूमी उपयोजन

गावपत्रकानुसार भौगोलिक क्षेत्र हे ग्रामअधिकाऱ्यांनी महसूलाच्या कामाकरिता गोळा केलेल्या खेड्यातील माहितीवरून गणना केलेले क्षेत्र होय. यापैकी वने या प्रकारामध्ये वनाखली असलेले सर्व क्षेत्र येते. बिगरशेती वापराखालील जमीन म्हणजे इमारती, रस्ते, रेल्वे, नद्या, कालवे किंवा पाण्याखालील जमीन होय. पडीक आणि लागवडीस योग्य नसलेल्या जमिनीमध्ये पर्वत, वाळवंट यांचा समावेश होतो. कायम कुरणे व इतर चराऊ जमिनीचा चराऊ क्षेत्रामध्ये समावेश होतो. लागवडीलायक पड जमिनीमध्ये एकदा वापरलेली असेल व नंतर ती वापरात नसेल अशा जमिनीचा समावेश होतो. चालू वर्षी पडीक असलेल्या किंवा अधिक काळ पडीक असलेल्या जमिनीचा पडीक जमिनीमध्ये समावेश होतो.[१२] इ. स. १८४०-४१ मध्ये प्रथमच बार्शी व सोलापूर येथील भूसर्वेक्षण करण्यात आले. हे भूसर्वेक्षण ३३ फूटी साखळीच्या साहाय्याने करण्यात आले. यामध्ये ' एकर ' या इंग्रजी एककाचा वापर करण्यात आला. १२१ चौरस यार्डचा १ गुंठा व ४० गुंठयाचा १ एकर असे प्रमाण वापरण्यात आले. या सर्वेक्षणाच्या नोंदी ठेवण्यासाठी जिल्ह्यातील प्रत्येक उपविभागाला वेगवेगळे नंबर देण्यात आले.[१३] इ. स. १८८१-८२ मध्ये बार्शी तालुक्याचे क्षेत्रफळ ५९६ चौ. मै. इतके होते. यापैकी ५७२ चौ. मै. एवढया जमिनीचे सर्वेक्षण करण्यात आले होते. यापैकी ३,१९,४८८ एकर म्हणजेच ९०.११ टक्के जमीन शेतीयोग्य होती. १७,९५१ एकर म्हणजेच ५.०७ टक्के जमीन पडीक होती. १९२ एकर म्हणजेच ०.०६ टक्के जमीन गायरानव्याप्त होती. ७९९९ एकर म्हणजेच २.२६ टक्के जमीन जंगलव्याप्त होती आणि ८८८७ एकर म्हणजेच २.५० टक्के जमीन गाव, रस्ते, नद्या, नाले, ओढे यांनी व्यापलेली होती.[१४]

क्षेत्रफळाच्या दृष्टीने बार्शी तालुका जिल्ह्यामध्ये प्रथम क्रमांकावर होता. इ. स. १९५७-५८ मध्ये बार्शी तालुक्याचे भौगोलिक क्षेत्र ४,०८,७५६ एकर होते. यापैकी ७०५८ एकर क्षेत्र जंगलव्याप्त होते. १४,७७४ एकर जमीन बिगरशेती वापरासाठी होती. ४८३ एकर जमीन शेती शिवाय इतर बाबीसाठी वापरण्यात आलेली होती. तर पिकाखालील एकूण जमीन ३,७०,३३४ एकर इतकी होती. या वर्षी सोलापूर जिल्ह्यामध्ये लागवडीखालील जमिनीच्या संदर्भात बार्शी तालुक्याचा प्रथम क्रमांक होता.[१५] इ. स. १९६०-६१ पर्यंत तालुक्याच्या जंगलाच्या क्षेत्रात काहीही फरक पडला नव्हता. मात्र तालुक्यातील एकूण लागवडीखालील क्षेत्रात थोडीशी भर पडली.[१६] इ. स. १९६८-६९ मध्ये तालुक्याच्या एकूण भौगोलिक क्षेत्रापैकी लागवडीखालील क्षेत्र काहींसे कमी झाले.[१७]

इ. स. १९७१-७२ मध्ये बार्शी तालुक्याला भीषण दुष्काळाने घेरलेले होते. सोलापूर जिल्ह्याच्या मानाने बार्शी तालुक्यामध्ये खूपच वाईट परिस्थिती निर्माण झाली होती. याचा येथील शेतीवर फारच विपरित परिणाम झाला. या वर्षामध्ये तालुक्याच्या एकूण भौगोलिक क्षेत्रांपैकी जवळजवळ ७९,९८० एकर जमीन पडीक होती. इ. स. १९७०-७१ च्या तुलनेत पडीक जमिनीचे हे प्रमाण ६ पटीपेक्षा जास्त होते. पडीक जमिनीच्या संदर्भात इतकी विक्रमी वाढ सोलापूर जिल्ह्यातील इतर कोणत्याही तालुक्यात दिसत नाही.[१८]

तक्ता क्र. ८

बार्शी तालुक्यातील भूमीउपयोजन (प्रमाण हेक्टरमध्ये)

इ. स.	एकूण भौगोलिक क्षेत्र	जंगल व्याप्त क्षेत्र	शेतीला उपलब्ध नसलेले क्षेत्र	पडीक जमिनी व्यतिरिक्त लागवड न केलेले क्षेत्र	पडिक क्षेत्र	लागवडी खालील एकूण क्षेत्र
१९६०-६१	१६५४००	२८००	४४००	२५००	७०००	१४८७००
१९६५-६६	१६५३६२	२८५६	६०७०	९२४१	४२२७	१४२९६८
१९७०-७१	१६५४२४	२५६६	२०७	४४७८	५९६०	१५२२१३
१९७६ ७७	१६५४००	२६००	३८००	८४००	७०००	१४३६००
१९८०-८१	१६५४००	२६००	४०००	८४००	८५००	१४२१००
१९८४-८५	१५२३००	२२००	५८००	६५००	१०८००	१२७०००
१९८८-८९	१५२३००	२२००	५८००	५९००	२८६००	१०९८००

(संदर्भ :- सामाजिक-आर्थिक विवेचन, जिल्हा सोलापूर, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई.)

दुष्काळातून कायमची मुक्तता होण्याच्या दृष्टीकोणातून शासनाने अनेक जलसिंचनाची कामे केली. याचा बार्शी तालुक्यालाही मोठा फायदा झाला. यामुळे कालांतराने या अवर्षणग्रस्त स्थितीमध्ये बदल होऊन जिल्ह्यातील लागवडीखालील क्षेत्र झपाट्याने वाढले. इ. स. १९८०-८१ मध्ये सोलापूर जिल्ह्यामधील एकूण क्षेत्रापैकी ८६.४५ टक्के क्षेत्र लागवडीखाली होते. यापैकी सर्वात जास्त क्षेत्र बार्शी तालुक्यात होते. इ. स. १९८१ च्या जणगणनेनुसार बार्शी तालुक्यातील ८ गावे उस्मानाबाद जिल्ह्याला जोडल्यामुळे तालुक्यातील जंगल क्षेत्र झपाट्याने कमी झाले. कारण ही गावे बार्शी तालुका व उस्मानाबाद जिल्हा यांच्या सीमेवरील बालाघाट डोंगररांगामधील होती.[१९] इ. स. १९९१ अखेर सोलापूर जिल्ह्यामध्ये शेतीयोग्य जमिनीच्या संदर्भात बार्शी तालुक्याचा प्रथम क्रमांक होता. शासनाच्या विविध योजना व इ. स. १९७२ च्या दुष्काळामध्ये तालुक्यामध्ये झालेल्या विविध सिंचन कामांचा परिणाम होता.[२०]

२.४. तालुक्यातील बागायती व जिरायती क्षेत्र

इ. स. १८४० पर्यंत बार्शी तालुक्यातील पाण्याखालील जमिनीचे प्रमाण केवळ १/४ इतके होते. हे प्रमाण वाढविण्यासाठी मोहोळ, माढा व सोलापूर या ठिकाणच्या बागांना पाणी देण्यासाठी वापरण्यात येणारी पध्दत बार्शी तालुक्यासाठी वापरण्याचा प्रस्ताव ' विंगेट ' या इंग्रज अधिकाऱ्याने मांडला. त्यामुळे तालुक्यातील जलसंधारणाचे प्रमाण वाढविण्यासाठी निश्चित अशी मूल्यमापन पध्दती स्वीकारण्यात आली. त्यामुळे बार्शी तालुक्यातील जलसिंचनाचे प्रमाण वाढून बागांच्या माध्यमातून मिळणारा महसूल वाढला. यापूर्वी बार्शी तालुक्यामध्ये बागायती जमीनीचे प्रमाण कमी होते. बार्शी तालुक्यामध्ये कालव्याच्या माध्यमातून भिजवली जाणारी जमीन खूपच कमी होती व ती वाढण्याचीही शक्यता नव्हती. विहिरीच्या सहाय्याने सिंचनाखाली येणाऱ्या शेतीला खूप महत्व देणे अशक्य होते. मात्र विहिरीच्या साहाय्याने बागांचे प्रमाण वाढविण्यासाठी विंगेट प्रयत्नशील होता. कारण यामुळे अपुऱ्या व अनिश्चित पावसावर अवलंबून असणारी खेडी स्वतंत्र होण्यास मदत होणार होती. विंगेटचा हा प्रस्ताव नोव्हेंबर १८४० मध्ये सरकारने मान्य केला. बार्शी तालुक्यामध्ये दख्खनच्या इतर भागाप्रमाणेच कोरडवाहू जमीन ४ ते ५ वर्षामध्ये एखाद्यावेळेस नांगरली जायची. मधल्या कालावधीमध्ये जमिनीचा वरचा भाग कुळविला जायचा. मात्र बागायती जमिनीमध्ये प्रत्येकवर्षी नांगरण कुळवन होत असे. कधी कधी कोरडवाहू जमिनीमध्ये खत घातले जायचे.[२१]

इ. स. १८४०-४१ मध्ये प्रथमच सोलापूर व बार्शी येथील भूसर्वेक्षण करण्यात आले. यामध्ये जमिनीचे प्रामुख्याने बागायती जमीन व कोरडवाहू जमीन असे वर्गिकरण करण्यात आले. हे वर्गिकरण मातीचा पोत, मातीची खोली, त्यातील नष्ट होणारे घटक व त्याचे फायदे-तोटे यांच्या आधारे करण्यात आले. या वर्गिकरणाचे मूल्य आण्यामध्ये करण्यात आले. त्यवेळी १६ आणे हा सर्वश्रेष्ठ दर्जा समजला जात असे. इ. स. १९३९ पूर्वी सरकारचा प्रशासकीय विभाग जमीन महसूल कायद्याद्वारे जमिनीचे मूल्यमापन करत होता. पुढे इ. स. १९३९ च्या जमीन महसूल कायद्याद्वारे यामध्ये बदल झाले.[२२]

हिंदूस्थानमधील शेती उत्पादनाचे परंपरागत तंत्र व शेतमालाचा निकृष्ट दर्जा यामुळे येथील शेती उत्पादन किफायतशीर नव्हते. त्यामुळे भारत सरकारने ग्रामीण विकासाचा जो देशव्यापी कार्यक्रम सुरू केला, त्यामध्ये शेती विकासाला प्राधान्यक्रम देण्यात आला. यादृष्टीने शेतकऱ्यांना सुधारित बियाणे, रासायनिक खते, शेतीची विविध अवजारे यांचे वाटप करण्यात आले. पाण्याची समस्या सोडविण्यासाठी बांध-बंदिस्तीचा कार्यक्रम हाती घेण्यात आला. या अंतर्गत बार्शी तालुक्यामध्ये जुलै १९६० अखेर विविध धान्याचे सुधारित असे ६,६८४ मण ९५ शेर बियाणे वाटप केले गेले. ३,१९० मण विविध रासायनिक खतांचे वाटप केले. याशिवाय भुईमुंग पेंड १,५७० मण, मिश्र खते २,३३८ मण, शहरी कुजविलेले खत

५७,००८ गाड्या तालुक्यामध्ये वाटप करण्यात आले. तर हिरवळीचे खत २७० एकरावर गाडले गेले. तालुक्यामध्ये वाटप करण्यात आलेल्या सुधारित अवजारामध्ये लोखंडी नांगर ७२, फवारायचे पंप १०, तिपनी ८९ व ५८ ऑईल इंजिनचा समावेश होता. याशिवाय १०३ नवीन विहीरी मंजूर झाल्या तर १५० जुन्या विहिरींची दुरूस्ती मंजूर झाली.[२३]

तक्ता क्र . ९

तालुक्यातील बागायती व जिरायती क्षेत्र

वर्ष	बागायती	जिरायती
१९५१	६,८०० एकर	३,०५,४०० एकर
१९६१	१८,७८० एकर	३,०९,६८० एकर
१९७१	२०,२५१ एकर	३,३२७८२ एकर
१९८१	२१,०७८ एकर	३,५९,९४३ एकर
१९९१	२५,९४१ एकर	३,०९,१४८ एकर

(संदर्भ :- जनगणना कार्यालय, मोहता मार्केट मुंबई, सोलापूर जिल्ह्याची जनगणना)

सदर टेबलवरून असे दिसून येते की, इ. स. १९५१ पासून बार्शी तालुक्यातील सिंचनाखालील क्षेत्र सातत्याने वाढले आहे. त्यातही इ. स. १९५१ ते इ. स. १९६१ या दहा वर्षाच्या कालावधीमध्ये तालुक्यातील बागायती क्षेत्र जवळजवळ तिपट्टीने वाढले. कारण स्वातंत्र्योत्तर काळात भारत सरकारने कृषी विकासाचा पायाभूत घटक या दृष्टीकोनातून विविध जलसिंचनाच्या योजना हाती घेतल्या. त्यामुळे सिंचनाखालील क्षेत्राचे प्रमाण झपाट्याने वाढले. अर्थात लागवडीखालील क्षेत्राच्या तुलनेत तालुक्यातील सिंचनक्षेत्राचे हे प्रमाण खूपच कमी आहे. बार्शी तालुक्यातील तलावाच्या वाढत्या प्रमाणामुळे येथील जलसिंचनाखालील क्षेत्र हळूहळू वाढू लागले.जलसिंचनासाठी इंधनावर चालणाऱ्या इंजिनचा मोठ्या प्रमाणावर वापर वाढला.[२४]

इ. स. १९५१-५२ मध्ये बार्शी तालुक्यातील केवळ ६,८०० एकर क्षेत्र सिंचनाखाली होते. पुढे इ. स. १९५२-५३ मध्ये यात अमुलाग्र बदल होऊन तालुक्यातील सिंचनाखालील क्षेत्र १८,८०० एकर झाले. तर इ. स. १९५५-५६ मध्ये ते २३,३०० एकर इतके झाले.[२५] पुढील पाच वर्षामध्ये यात उल्लेखनीय बदल झाले नाहीत. इ. स. १९६०-६१ मध्ये ते २४,९८४ एकर झाले.[२६] इ. स. १९७२ पर्यंत ही वाढ धिम्या गतीने चालूच होती. मात्र इ. स. १९७२-७३ मध्ये पडलेल्या तीव्र दुष्काळामुळे या काळात तालुक्यातील केवळ १,७६९ एकर जमीन सिंचनाखली होती.[२७] पुढील काळात दुष्काळामध्ये झालेल्या सिंचन कामामुळे तालुक्यतील सिंचनाखालील क्षेत्र हळूहळू वाढून इ. स. १९८०-८१ मध्ये ते ४२,२५० एकरवर पोहोचले.[२८]

यानंतर कमी पावसामुळे तालुक्यामध्ये पडलेल्या अवर्षणामुळे तालुक्यातील सिंचनाखालील क्षेत्रात सातत्याने घसरण झाली. यातून मार्ग काढण्यासाठी इ. स. १९८५-८६ मध्ये बार्शी तालुक्यातील अवर्षणप्रवण क्षेत्रासाठी विशेष कार्यक्रम राबविण्यात आला. यासाठी तालुक्यातील चुंब, कोरेगाव, कळंबवाडी, भानसळे, मांडेगाव व चारे या जलप्रदाय क्षेत्राची निवड केली होती. यासाठी जिल्हा परिषदेकडून ७३,१६३ रू अर्थसहाय्य देण्यात आले. या कार्यक्रमामध्ये खरीप हंगामात ७५ तर रब्बी हंगामासाठी १५५ शेतकरी सहभागी झाले.[२९] याचा पुढील काळामध्ये तालुक्यातील सिंचन क्षेत्र वाढीवर सकारात्मक परिणाम होऊन इ. स. १९८८-८९ मध्ये सिंचन क्षेत्र ३३,६५० एकर इतके झाले. यामध्ये तालुक्यातील विविध सिंचन प्रकल्पांचेही योगदान उल्लेखनीय होते.[३०]

सोलापूर जिल्ह्यातील जमीन-हवामान फळबाग लागवडीस योग्य नाही. त्यामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांना फळबाग लागवडीस प्रोत्साहन देण्यासाठी फलोत्पादन विकास कार्यक्रम आखण्यात आला. या अंतर्गत शेतकऱ्यांना फलोत्पादन व मृदा संधारणाची माहिती देण्यासाठी स्वतंत्र कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली होती. यामध्ये जिल्ह्यात सर्वाधिक कर्मचाऱ्यांची नियुक्ती बार्शी तालुक्यामध्ये करण्यात आली होती. या कार्यक्रमा अंतर्गत जिल्ह्यामध्ये एकूण १४,६३१ एकर क्षेत्रावर फळबागांची लागवड झाली. सर्वात जास्त लाभार्थी व सर्वात जास्त क्षेत्रावर लागवड या दृष्टीने सोलापूर जिल्हा महाराष्ट्रात प्रथम क्रमांकावर होता. यात बार्शी तालुक्याचे योगदान उल्लेखनीय होते.[३१]

२.५ तालुक्यातील पिकनिहाय क्षेत्र

सोलापूर हा दुष्काळी जिल्हा म्हणून ओळखला जातो. जिल्ह्याच्या तुलनेत सर्वात चांगली मृदा बार्शी तालुक्यामध्ये आढळते. साहजिकच शेती हा पूर्वीपासूनच या तालुक्याचा प्रधान व्यवसाय आहे. ज्वारी, तूर व भुईमुग ही या तालुक्यातील सर्वात महत्वाची पिके आहेत. याशिवाय तालुक्यामध्ये बाजरी, तांदूळ, गहू, मका, मुग, सुर्यफूल, करडी, जवस, हरबरा, ऊस, मीरची, कापूस, विविध मसाल्याचे पदार्थ अशा विविध पिकांची लागवड करण्यात येते. इ. स. १८८१-८२ मध्ये बार्शी तालुक्यातील एकूण लागवडीखालील क्षेत्रापैकी १,३४,००० एकरमध्ये ज्वारीचे पिक होते. तर ३२,८८१ एकरमध्ये विविध कडधान्याची लागवड करण्यात आलेली होती. शिवाय ३२,२०६ एकरमध्ये विविध तेलबियांची लागवड करण्यात आलेली होती.[३२] इ. स. १९५१-५२ मध्ये बार्शी तालुक्यामधील २,४६,३०० एकर क्षेत्रामध्ये विविध तृणधाण्यांची लागवड करण्यात आलेली होती. यामध्ये ज्वारीचे प्रमाण सर्वाधिक होते. तर २८,३०० एकर क्षेत्रामध्ये विविध कडधाण्यांची लागवड करण्यात आलेली होती. यामध्ये तुरीचे प्रमाण सर्वधिक होते. सिंचनाच्या कमतरतेमुळे तालुक्यामध्ये नगदी पिकांचे प्रमाण खूप कमी होते. असे असले तरी तालुक्यामध्ये

३१,४०० एकरमध्ये विविध गळीतांच्या धान्यांची लागवड झालेली होती. इ. स. १९५९-६० मध्ये बार्शी तालुक्यामध्ये १,६८,००० एकर तृणधाण्य होती. इ. स. १९५१ ते १९६१ या दहा वर्षातील तालुक्यामधील तृणधाण्य पिकाखालील क्षेत्राचे हे सर्वात कमी प्रमाण होते. असे असले तरी या दहा वर्षात तालुक्यातील ज्वारीचे क्षेत्र झपाट्याने कमी झाले. मात्र तेलबियाचे क्षेत्र सातत्याने वाढत राहिले. विशेषत: १९५९-६० मध्ये तेलबियाखालील क्षेत्र अमुलाग्र वाढले. या वर्षामध्ये तालुक्यातील १,१६,१०० एकर क्षेत्र विविध तेलबियाखालील होते. यात केवळ भुईमुग या पिकाखालील क्षेत्र १,०९,८०० एकर होते. यामुळे तालुक्यातील तेल उद्योग भरभराटीस आला.[३३]

तक्ता क्र. १०

बार्शी तालुक्यातील गळीताचे पीक क्षेत्र (प्रमाण हेक्टरमध्ये)

वर्ष	भूईमुग	जवस	करडी	इ. गळीताची पिके	एकूण गळीताची पिके
१९६०-६१	१९२६९	-	-	२६६१	२१९३०
१९६५-६६	१४७१४	-	-	२१५४	१६८६८
१९७०-७१	१५९९९	-	२४६४	९२९	१९३९२
१९७६-७७	७९८६	-	३६९५	२९१	११९७२
१९८०-८१	४६००	४६०	२०१४	८१३	७८८७
१९८४-८५	४२१२	२३५	१३८४	९८३८	१५६६९
१९८९-९०	१२१९	१३८	९३३	१०८३१	१३१२१

(संदर्भ :- सामाजिक-आर्थिक विवेचन, सोलापूर जिल्हा, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई.)

पुढे इ. स. १९५७-५८ मध्ये तालुक्यात तृणधाण्यांच्या लागवडीसंदर्भात उल्लेखनीय बदल घडून आले नाहीत. तृणधान्या अंतर्गत ज्वारी या पिकाखालील क्षेत्राच्या संदर्भात सोलापूर जिल्ह्यामध्ये बार्शी तालुक्याचा द्वितीय क्रमांक होता. मात्र मागील पाच-सहा वर्षाच्या तुलनेत या वर्षामध्ये तालुक्यातील कडधान्य पिकांच्या क्षेत्रामध्ये विक्रमी वाढ होऊन या पिकाखालील क्षेत्र ४५,८७७ एकर पर्यंत पोहोचले. गळीतांच्या पिकाखालील क्षेत्र जवळजवळ दुप्पट वाढले. यामध्ये केवळ भूईमुंग या पिकाखालील क्षेत्र ५१,३६२ एकर इतके होते. स्वातंत्र्योत्तर काळामध्ये तालुक्यातील जलस्त्रोतांची संख्या वाढल्यामुळे हा बदल घडून आला. याचा तालुक्यातील डाळ व तेल उद्यागावर चांगला परिणाम झाला. याशिवाय या वर्षात ३,५१० एकर बाजरी, ४,४०१ एकर तांदूळ, ७,३४९ एकर गहू, ४,९७४ एकर सूर्यफूल या पिकाची लागवड करण्यात आली होती.[३४]

तक्ता क्र. ११

तालुक्यातील तृणधान्ये पीक क्षेत्र (प्रमाण: हेक्टरमध्ये)

वर्ष	तांदूळ	गहू	ज्वारी	बाजरी	मका	इतर तृणधान्ये	एकूण तृणधान्ये
१९६०-६१	२३१४	२४३३	९८०३७	१६६९	२९८	६२३	१०५३७४
१९६५-६६	२२०१	२३४९	९१८५०	१३१६	-	११३७	९८८५३
१९७०-७१	१५७९	३५१०	८४५६०	२५५२	-	१७९९	९४०००
१९७६-७७	१५१४	७३१९	१०११६०	७९६	-	२६९३	११३४८२
१९८०-८१	१३२०	८२२१	९४१३४	६७४	१५५२	१०४९	१०६९५०
१९८४-८५	६४५	३९९५	७९६१५	३५१	५०६	८८०	८५९९२
१९८८-८९	६१५	१३४२	७४९२१	४९६	५४७	४६९	७८३९०

(संदर्भ:-सामाजिक-आर्थिक विवेचन,सोलापूर,अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई)

इ. स. १९६०-६१ मध्ये बार्शी तालुक्यातील २,६०,३८२ एकर क्षेत्र विविध तृणधान्य पिकाखाली होते. यामध्ये ज्वारीचे प्रमाण सर्वाधिक होते. या वर्षामध्ये ८५,३७२ एकर क्षेत्र विविध कडधान्य पिकाखाली होते. यामध्ये तूर, हरभरा यांचे प्रमाण उल्लेखनीय होते. शिवाय तालुक्यातील विविध गळीतांच्या पिकाखालील एकूण क्षेत्र ५४,१८८ एकर इतके होते. यामध्ये केवळ भूईमुंगाची ४७६१५ एकर क्षेत्रामध्ये लागवड करण्यात आलेली होती. [३५]

स्वातंत्र्योत्तर काळामध्ये इ. स. १९६५ नंतर भारतामध्ये शेतीच्या क्षेत्रामध्ये अनपेक्षितपणे व वेगाने घडून आलेल्या मूलभूत स्वरूपांच्या बदलांच्या श्रृंखलेला हरित क्रांती असे म्हणतात. ही घटना भारतीय शेतकऱ्यांच्या दृष्टीने एका नवीन युगाची नांदी ठरली. यापूर्वी भारतीय शेतकरी परंपरागत पध्दतीनेच शेती करत होता. शेती ही खऱ्या अर्थाने जीवन जगण्याची प्रणाली होती. पिढ्यानपिढ्या शेतकऱ्यांच्या जीवनात अविरत परिश्रम, दारिद्रय, कर्जबाजारीपणा याशिवाय दुसरे काही नव्हते. हरित क्रांतीमुळे ही परिस्थिती बदलली. हरीत क्रांतीमुळे शेतीच्या क्षेत्रामध्ये अनपेक्षितपणे व वेगाने बदल घडून आला. पिकांच्या नवीन संकरीत जाती निर्माण झाल्या. रासायनिक खते व कीटकनाशकांचा मोठ्या प्रमाणावर उपयोग करण्यात येऊ लागला. वर्षातून दोन-तीन पिके घेण्यात येऊ लागली. त्यामुळे शेती उत्पादनामध्ये वेगाने वाढ झाली. [३६] याचा बार्शी तालुक्याच्या शेती विकासावर चांगला परिणाम झाला. इ. स. १९७१-७२ मध्ये बार्शी तालुक्यामध्ये २,२७,३४४ एकर मध्ये एकूण तृणधान्य पिकांची लागवड झाली होती. यामध्ये सर्वाधिक २,०३,२६३ एकर ज्वारीचे पिक होते. याशिवाय विविध कडधान्ये व तेलबिया पिकांची लागवड चांगली

होती. तसेच तालुक्यामध्ये नेहमीप्रमाणेच ऊस, मिरची, मसाल्याचे पदार्थ, फळे व भाजीपाला, कापूस, अशा विविध पिकांची काही प्रमाणामध्ये लागवड झालेली होती.[३७]

तक्ता क्र. १२

बार्शी तालुक्यातील कडधान्ये पीक क्षेत्र (प्रमाण हेक्टरमध्ये)

वर्ष	हरभरा	तूर	मुग	इतर कडधान्ये	एकूण कडधान्ये
१९६०-६१	२७६३	२२३५	-	८९८३	१३९८१
१९६५-६६	२०८२	१३७७४	-	६३११	२२१६७
१९७०-७१	३२७७	२५५३४	१६००	४०७१	३४४८२
१९७६-७७	४८१२	१४५७९	५२६	५५६५	२५४८२
१९८०-८१	४५००	१९७८०	९००	५१७०	३०३५०
१९८४-८५	५१४८	१५४८३	१२४३	३१९४	२५०६८
१९८९-९०	११९८	१४९६४	६०६	१७१६	१८४८४

(संदर्भः-सामाजिक-आर्थिक समालोचन, सोलापूर, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई)

इ. स. १९७५-७६ मध्ये जिल्ह्यामध्ये खरीप ज्वारीची सर्वात जास्त लागवड बार्शी तालुक्यामध्ये झाली होती, तर इ. स. १९७६-७७ मध्ये जिल्ह्यात रब्बी ज्वारीची सर्वात जास्त लागवड बार्शी तालुक्यामध्ये २,४३,८३३ एकर इतकी झाली होती. इ. स. १९७७-७८ मध्येही ही स्थिती कायम होती.[३८] इ. स. १९८०-८१ मध्ये जिल्ह्यामध्ये तृणधान्य पिकाची सर्वाधिक व विक्रमी लागवड बार्शी तालुक्यात झाली.[३९] इ. स. १९८२-८३ मध्ये कडधान्य पिकाच्या लागवडीमध्ये बार्शी तालुक्याचा जिल्ह्यामध्ये प्रथम क्रमांक होता.[४०]

इ. स. १९८५-८६ मध्ये अधिक उत्पादन देणाऱ्या जातीच्या कार्यक्रमांर्तगत बार्शी तालुक्यात खरीप व रब्बी हंगामात संकरीत ज्वारी, तांदूळ, संकरीत बाजरी, संकरीत मका, संकरीत गहू, सूर्यफूल, करडी व विविध कडधान्य पिकांचे जे अपेक्षित लक्ष होते, ते अपेक्षेपेक्षा जास्त साध्य झाले. याच वर्षामध्ये १.५० हेक्टरमध्ये नारळाची रोपे लावण्यात आली होती. यासाठी तालुक्यातील ५१५ लोकांना शासनाकडून नारळ, आंबा यांच्या कलमाचे वाटप करण्यात आले होते.[४१] इ. स. १९८५-८६ मध्ये बार्शी तालुक्यामध्ये शेती विकास कार्यक्रमाखाली संकरीत व जादा उत्पादन देणाऱ्या जातीच्या पिकांची लागवड अनुक्रमे ७,४३७ एकर व २३,३९१ एकर क्षेत्रामध्ये झाली होती. उन्हाळी हंगामामध्ये ३०८ एकर क्षेत्रात भूईमुंगाची लागवड करण्यात आली होती.[४२] याप्रमाणे स्वातंत्र्योत्तर काळामध्ये हरीत क्रांतीमुळे व शासनाच्या विविध योजनेतून तालुक्यातील शेतीचा सातत्यपूर्ण विकास होत राहिला. बार्शी तालुक्यातील विविध जलसिंचन प्रकल्पामुळे

तालुक्यातील विविध पिक लागवडीखालील क्षेत्रात सातत्याने अमुलाग्र वाढ झाली. यातूनच तालुक्यातील कृषी क्षेत्र समृध्द बनत गेले.

२.६. तालुक्यातील जलसिंचन स्त्रोत

भारतातील पाऊस अत्यंत लहरी आहे. त्यामुळे पावसावरील जुगार असे भारतीय शेतीचे स्वरूप आहे. भारतातील शेती मुख्यत: पावसावर अवलंबून आहे. उत्तम जमीन, बियाणे, खते व शेतीकरीता आवश्यक असणारी इतर साधने जरी मिळविता आली तरी पाण्याशिवाय ती निरूपयोगी ठरतात. जमिनीच्या प्रतीपेक्षा पाणी महत्वाचे आहे. भारतात ज्या ठिकाणी पावसाचे प्रमाण फार मोठे आहे त्या ठिकाणी नद्यांना पूर येऊन शेतीचे फार मोठे नुकसान होते. इ. स. १९५०-५१ मध्ये केलेल्या सर्वेक्षणानुसार भारतातील उपलब्ध पाण्यापैकी केवळ ५.६ टक्के पाणी वापरात आले बाकीचे समुद्राला जाऊन मिळाले. त्यामुळे कृत्रिम पाणीपुरवठ्याच्या योजना शेतीसाठी खूप महत्वाच्या ठरतात.[४३]

महाराष्ट्रामध्ये जिल्हा परिषदेकडील ११५०० लघुपाटबंधारे प्रकल्पांद्वारे २.५५ लाख हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आलेले आहे. यामध्ये सुमारे १२०० लघुपाटबंधारे तलाव, ४,१०० कोल्हापूर पद्धतीचे बंधारे, ३९०० कच्चे बंधारे व २३०० उपसा सिंचन योजनेचा समावेश आहे. राज्यामध्ये दरवर्षी जवळपास १४०० ते १५०० लघूपाटबंधारे प्रकल्प जिल्हा परिषदांतर्गत पूर्ण करण्यात येतात व त्यापासून सुमारे ०.३५ लक्ष हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येते. याशिवाय जिल्हा परिषदाअंतर्गत १२,३०९ पाझर तलाव आहेत.[४४]

२.६.१ पाऊस

पावसाच्या प्रमाणानुसार सोलापूर जिल्ह्याचे पूर्व, मध्ये, उत्तर असे तीन विभाग पडतात. यापैकी पूर्व विभागामध्ये खात्रीशीर पाऊस पडणाऱ्या क्षेत्रात बार्शी तालुक्याचा समावेश होतो. सोलापूर जिल्ह्याच्या पावसाच्या एकूण सरासरीपेक्षा बार्शी तालुक्यातील पावसाचे सरासरी प्रमाण जास्त होते. इ. स. १८७१ या कोरड्या वर्षातसुद्धा नद्यांच्या भोवती हिरवे गवत आणि झाडी वाढलेली होती. बालाघाट डोंगररांगापासून १३ मैलावर बार्शी हे शहर वसलेले आहे. कर्नल विडिंग्टनच्या मते बार्शी शहर आणि डोंगररागांच्या मधल्या भागामध्ये बार्शी शहरापेक्षा पावसाचे प्रमाण जास्त होते.[४५] सोलापूर जिल्ह्यामध्ये पावसाची वार्षिक सरासरी ६२५ मि. मी. इतकी आहे. केवळ बार्शी तालुक्यात बालाघाटाच्या डोंगररांगा जवळील प्रदेशात सरासरी ७२५ मि. मी. पाऊस पडतो. सोलापूर जिल्ह्यामध्ये पडणारा पाऊस हा दक्षिण-पश्चिम आणि उत्तर-पूर्व मान्सून वाऱ्यापासून पडतो.[४६]

बार्शी तालुक्यातील पाऊस (प्रमाण मि.मी.)

वर्ष	पावसाचे दिवस	पाऊस	वर्ष	पावसाचे दिवस	पाऊस
१९५७	७६	८५२.२	**१९७६**	३३	३६८.०
१९५८	७३	७३७.६	**१९७७**	४३	७१२.०
१९६१	४३	६८२.६	**१९७८**	४६	८३०.०
१९६२	३८	६३८.१	**१९७९**	३७	७३४.०
१९६३	६७	७२७.५	**१९८०**	४६	७४४.०
१९६४	४८	१००३.०	**१९८१**	३८	५७४.२
१९६५	३०	६०३.२	**१९८२**	३६	५१०.९
१९६६	४१	७६१.०	**१९८३**	४२	८२९.९
१९६७	३६	६००.००	**१९८४**	३४	५६३.२
१९६९	५१	७००.००	**१९८५**	३४	३३६.६
१९७०	५५	९३३.०	**१९८६**	२७	३३०.२०
१९७१	४०	८४८.२	**१९८७**	४३	४८८.०
१९७२	२३	२६८.६	**१९८८**	५०	५४६.०
१९७३	४६	६७८.५	**१९८९**	४३	६४५.०
१९७४	५०	७३५.०	**१९९०**	५०	७८८.०
१९७५	५४	९०१.०	-	-	-

(संदर्भः- सामाजिक -आर्थिक समालोचन, जिल्हा सोलापूर, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई.)

पावसामुळे तालुक्यातील लागवडीखालील जमीन व एकूण शेती उत्पादन वाढण्यास मदत झाली. पाण्याच्या उपलब्धतेमुळे तालुक्यातील शेतकरी वर्षातून एकापेक्षा अधिक पिके घेऊ लागला. शिवाय माणसांची व पशुपक्षांचीही पिण्याच्या पाण्यासंदर्भात जास्त परवड झाली नाही. पावसामुळे तालुक्यामध्ये जनावरांना आवश्यक असणाऱ्या चाऱ्याची अवर्षणग्रस्त स्थितीचा अपवाद वगळता कधीच कमतरता भासली नाही. पावसामुळे तालुक्यातील नद्या, नाले, ओढे बारमाही वाहत असायचे. त्यामुळे विहीरींना यांचा चांगलाच पाझर मिळाला. तसेच नद्यांमधून कच्च्या पाटाद्वारे शेतीला पाणीपुरवठा केला जात. तालुक्यातील भूमिगत पाण्याची पातळी वाढली. त्यामुळेच तालुक्यातील बहुसंख्य शेती विहीरीच्या सहाय्याने सिंचनाखाली आलेली होती. तालुक्यामध्ये शेतकऱ्यांना नगदी पिके घेण्यास प्रोत्साहन मिळाले. पावसामुळे

तालुक्यातील तलाव सतत भरलेले असायचे. त्यामुळे तालुक्यामध्ये छोट्या स्वरूपातील मासेमारी व्यवसायाला प्रोत्साहन मिळाले.

२.६.२. नद्या

सोलापूर जिल्हा हा भीमा, सीना व त्यांच्या उपनद्यांच्या क्षेत्रामध्ये वसलेला आहे. बार्शीच्या उत्तर-पूर्वेला बालाघाट डोंगररांगामध्ये उगम पावणारी भोगावती ही बार्शी तालुक्यातील प्रमुख नदी आहे. भोगावती नदी दक्षिण-पश्चिम वळसा घेऊन बार्शी तालुक्यातून ४० मैल वाहत जावून मोहोळच्या उत्तरेला ४ मैलावर सीना नदीला मिळते. भोगावती नदीचे पात्र १०० फूटरूंद असून उन्हाळ्यामध्ये नदीच्या पाण्याचे प्रमाण कमी होते. तालुक्यामध्ये भोगावती नदी सोडल्यास इतर मोठ्या नद्या नाहीत. चांदणी, बेडकी, झरीना, नागझरी आणि राम या काही छोट्या प्रमुख नद्या आहेत. बेडकी, नागझरी आणि सिरा या नद्या बालाघाटच्या डोंगररागांमध्ये उगम पाऊन उत्तरेकडे - पूर्वेकडे ३० मैल वाहत जावून भोगावती नदीस मिळतात. याचबरोबर सीनेची उपनदी चांदणी १२ मैल उत्तरेकडून वाहते. या सर्व नद्या बारमाही होत्या. नद्यांमधून कच्च्या पाटाद्वारे व विहिरीद्वारे शेतीला पाणीपुरवठा केला जायचा.[४७]

१) चांदनी नदी

ही नदी येरमाळा गावाच्या पश्चिमेस उगम पावते. येरमाळा हे गाव उस्मानाबाद व बार्शी तालुक्याच्या सीमेवर आहे. येरमाळा येथे उगम पावल्यानंतर ही नदी वालवड येथे बार्शी तालुक्यात प्रवेश करते. पुढे चारे- बोरगाव - बाभुळगांव - आगळगांव - बेलगांव -मांडेगाव- खडकलगाव- धस पिंपळगांव- देवगाव अशी बार्शी तालुक्यातून वाहत जावून ती परांड्याच्या नैऋत्येस डावीकडून सीना नदीला मिळते. या नदीवर बार्शी तालुक्यामध्ये ' बाभुळगांव ' हा प्रकल्प आहे.

२) भोगावती नदी

ही नदी बार्शी तालुक्याच्या ईशान्य भागातील बालाघाटाच्या डोंगरामध्ये कारी या गावाजवळ उगम पावते. या नदीची एकूण लांबी ६५ कि.मी. आहे. ही नदी बार्शी तालुक्यातून पुढे माढा व मोहोळ तालुक्यातून वाहत जाऊन मोहोळच्या उत्तरेस ७ कि. मी. अंतरावर भोईरा या गावाजवळ सीना नदीला डावीकडून मिळते. या नदीवर हिंगणी - पानगाव प्रकल्प, हिंगणी-हत्तीज प्रकल्प, कारी प्रकल्प आहे. वराई, नागझरी, बोडकी, सीरा या भोगावतीच्या प्रमुख उपनद्या आहेत.

३) वराई नदी

ही नदी बालाघाटच्या डोंगररागांमध्ये येरमाळा गावाच्या आग्नेयेस उगम पावते. पुढे वैरागच्या उत्तरेस भोगावती नदीला उजव्या काठावर येऊन मिळते. या नदीवर तालुक्यातील पिंपळगाव प्रकल्प आहे.

४) नागझरी नदी

ही नदी उस्मानाबादजवळ उगम पावते. व पुढे थोड्याच अंतरावर ती बार्शी तालुक्यात प्रवेश करते व सामान्यत: पश्चिम दिशेने वाहत जाऊन भोगावतीला मिळण्यापूर्वी काही अंतर ती नैऋत्यवाहीनी होते. या नदीवर रघुची वाडी, जवळगाव व नागझरी हे प्रकल्प आहेत.[४८]

२.६.३. बंधारे व कालवे

बंधारे व कालव्यांच्या माध्यमातून बार्शी तालुक्यातील बरीचशी जमीन सिंचनाखाली आली आहे. आंबेजवळगे व कौडगाव येथील बंधाऱ्यामुळे प्रत्येकी २०० एकर, तर कव्हे येथील बंधाऱ्यामुळे २५० एकर क्षेत्र सिंचनाखाली येणार होते.[४९] सोलापूर जिल्हा परिषदेने इ. स. १९७५-७६ सालच्या आपल्या अर्थसंकल्पामध्ये बार्शी तालुक्यातील कौडगाव व आंबेजवळगे या ठिकाणच्या बंधाऱ्यासाठी प्रत्येकी ०.१५ लाख रूपयांची तरतूद केली होती.[५०] इ. स. १९७६-७७ च्या सोलापूर जिल्हा परिषदेच्या अंदाजपत्रकातही अंबेजवळगे, कौडगाव व कव्हे येथील बंधाऱ्याच्या कामासाठी ०.९९ लाख रूपयांची तरतूद करण्यात आलेली होती. या बंधाऱ्यामुळे तालुक्यातील भूमिगत पाण्याची पातळी वाढण्यास मदत झाली.[५१]

कोल्हपूर बंधारा हा सामान्यत: ओढा, नाला यासारख्या लहान जलप्रवाहावर बांधला जातो. या बंधाऱ्याचे वैशिष्ट्य म्हणजे पाण्याच्या प्रवाहाला आडवे आणि एका सरळ ओळीत लोखंडी खांब ठराविक अंतरावर उभे केले जातात. या लोखंडी खांबांना खाचा असतात. खांबातील खाचामध्ये एकावर एक लाकडी फळ्या दोन समांतर ओळीत रचल्या जातात. त्यामध्ये चिकण माती भरली जाते. त्यामुळे लाकडी फळ्याची एक मजबूत भिंतच तयार होते. चिकण मातीमुळे भिंतीतून पाणी झिरपू शकत नाही. पावसाळ्याच्या सुरूवातीला ही भिंत काढली जाते. तर पावसाळा संपण्याच्या सुमारास तयार केली जाते. महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांनी दुष्काळी परीस्थितीवर मात करण्यासाठी पाणी आडवा पाणी जिरवा ही मोहिम हाती घेतली. याच मोहिमेचा एक भाग म्हणजे हे कोल्हापूर पध्दतीचे बंधारे होय. वसंतदादा पाटील यांनी या बंधाऱ्याची कल्पना काढल्यामुळे या बंधाऱ्यांना ' वसंत बंधारे ' असे नाव पडले. अशा प्रकारचे बंधारे सुरूवातीला कोल्हापूर जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात बांधण्यात आल्यामुळे या बंधाऱ्यांना कोल्हापूर बंधारे असे म्हटले जाते.[५२]

इ. स. १९८५ नंबर बार्शी तालुक्यामध्ये कोल्हापूर पद्धतीचे १०९ बंधारे झाले. या बंधाऱ्यात पाणी साठवण क्षमता २८२.८४ द. ल. घ. फू. इतकी असून या बंधाऱ्यांच्या कामावर ५७६-५८ लक्ष रूपये खर्च झाला. जिल्हा परिषदेच्या लघुपाटबंधारे विभागामार्फत १ ते १०० हेक्टर सिंचन क्षमतेचे कोल्हापूर पद्धतीच्या बंधारे, पाझर तलाव, गाव तळे, सिमेंट बंधारे व रोजगार हमी योजनेअंतर्गत जवाहर विहीरींचे कामे करण्यात आली. त्यामुळे आजूबाजूच्या विहिरींच्या पाणीसाठ्यामध्ये वाढ होऊन तालुक्यातील सिंचन क्षेत्र वाढण्यास मदत झाली.[५३]

इ. स. १९५९-६० मध्ये बार्शी, माढा, करमाळा, मोहोळ या तालुक्यामध्ये कालव्याद्वारे जास्त पाणीपुरवठा केला जात होता. बार्शी व माढा तालुक्यातील कांही भाग खाजगी कालव्याद्वारे सिंचनाखाली आणलेला होता. इ. स. १९५५-५६ व इ. स. १९५९-६० मध्ये बार्शी तालुक्यामध्ये सरकारी कालव्याद्वारे सिंचनाखाली आलेले क्षेत्र नव्हते. मात्र खाजगी कालव्याद्वारे १०० एकर क्षेत्र सिंचनाखाली आलेले होते.[५४] इ. स. १९६०-६१ मध्ये बार्शी तालुक्यातील ८४ एकर जमीन खाजगी कालव्याद्वारे सिंचनाखाली आली होती.[५५] इ. स. १९८१ मध्ये बार्शी तालुक्यातील एकूण सिंचनयुक्त जमिनीपैकी सरकारी कालव्याद्वारे २६४ हेक्टर जमीन सिंचनाखाली आलेली होती.[५६] इ. स. १९९१ अखेर तालुक्यातील २५,९४१ एकर क्षेत्र सिंचनाखाली होते. यापैकी ५४८ एकर क्षेत्र सरकारी कालव्याद्वारे सिंचनाखाली आलेले होते.[५७]

२.६.४. विहिरी

जलसिंचनासाठी हा पूर्वीपासून उपयोगी ठरलेला आणि आजही उपयुक्त असा मार्ग आहे. विहीर खोदण्यासाठी फार मोठा खर्च येत नाही. शेतकऱ्यांना स्वतःच्या खर्चाने विहिरी बांधणे शक्य असते. शिवाय यासाठी सरकारकडून मदतही मिळते. विहिरीपासून कमीत-कमी ६ हेक्टर जमीन ओलीताखाली येते. भारतातील जवळ-जवळ ३० टक्के जमिनीला विहिरीच्या साहाय्याने पाणीपुरवठा केला जातो. महाराष्ट्रात सिंचनासाठी विहिरीचा मोठ्या प्रमाणात वापर केला जातो.[५८]

इ. स. १८४० मध्ये बार्शी तालुक्यामध्ये १७७६ विहिरी होत्या. तर इ. स. १८७२ मध्ये विहिरींची संख्या ३९४७ इतकी झाली. यापैकी २८४४ विहिरींचा शेतीसाठी वापर केला जात असे.[५९] बार्शी तालुक्याच्या उत्तरेला अनेक बारमाही वाहणारे ओढे आहेत. त्यामुळे त्या ठिकाणची भूमिगत पाण्याची पातळी उथळ बनल्याने येथील विहिरींना याचा पाझर मिळतो.[६०] इ. स. १९५५-५६ मध्ये तालुक्यातील विहिरींची संख्या ४१८४ होती. यामुळे १८,२०० एकर सिंचनाखाली आले. इ. स. १९५९-६० पर्यंत या परिस्थितीत उल्लेखनीय असा बदल घडून आला नाही.[६१] इ. स. १९६०-६१ मध्ये विहिरीच्या माध्यमातून तालुक्यामधील १९,१२८ एकर क्षेत्र सिंचनाखाली होते.[६२] जिल्ह्यातील मागासवर्गीय शेतकऱ्यांना विहीरदुरूस्तीसाठी जिल्हा परिषदेने ४५,००० रू तरतूद केली. अनुदान मंजूर झालेल्या प्रत्येक मागासवर्गीय शेतकऱ्यास जुनी विहिर दुरूस्तीसाठी ५०० रू तरतुद होती. शिवाय हे पैसे एकाच हप्त्यात व योग्य नमुन्यात पंचायत समितीमार्फत आलेल्या अर्जदारांना विचार करून द्यावे असा ठराव मंजूर झाला होता.[६३]

तक्ता क्र . १४

बार्शी तालुक्यातील विहिरी

वर्ष	विहिरी

१९६१-६२	४३३१
१९६५-६६	४३३३
१९७०-७१	४३७०
१९७५-७६	४७९४
१९८०-८१	४७६३
१९८४-८५	४०८४
१९९०-९१	४०१९

(संदर्भ :- सामाजिक -आर्थिक समालोचन, जिल्हा सोलापूर.)

दांडेकर समितीच्या अहवालाप्रमाणे ३१ मार्च १९८५ पर्यंत नाशिक जिल्ह्यामध्ये ८० हजार शेती पंप्स बसविण्यात आले. धुळे जिल्ह्यात ४३ हजार, जळगाव ६० हजार, अहमदनगर ९६ हजार, सांगली ४३ हजार, कोल्हापूर ५१ हजार, औरंगाबाद ५४ हजार बुलढाणा ४२ हजार आणि अमरावती ४८ हजार. यातील अनेक जिल्हे क्षेत्रफळाच्या दृष्टीने सोलापूर जिल्ह्यापेक्षा लहान आहेत. तरीही सोलापूर जिल्ह्याला केवळ ४२ हजार शेती पंप्स बसविण्यात आले होते. सोलापूर जिल्हा हा जास्तीत-जास्त विहीर बागायतीवर अवलंबून असलेला जिल्हा आहे. सगळ्या जिल्ह्याच्या मानाने सोलापूर जिल्ह्यामध्ये विहिरींची संख्या जास्त आहे. तरीही शासनाने शेतीपंपाच्या संदर्भात सोलापूर जिल्ह्याकडे दुर्लक्ष केले.[६४]

इ. स. १९९१ अखेर बार्शी तालुक्यातील २५,९४१ एकर क्षेत्र सिंचनाखाली होते. यापैकी २१,१९१ एकर क्षेत्र विहिरीच्या माध्यमातून सिंचनाखाली आले होते. तर ६१ एकर क्षेत्र कुपनलिकेच्या माध्यमातून सिंचनाखाली आले होते.[६५]

२.६.५. पाझर तलाव

सोलापूर जिल्ह्यातील बहुतांशी पाझर तलाव ' बार्शी ' आणि ' सांगोला ' या तालुक्यामधील डोंगररांगाच्या उतारावर बांधलेले आहेत. सोलापूर जिल्हा कमी पावसाच्या क्षेत्रात मोडत असल्यामुळे तिसऱ्या पंचवार्षिक योजनेमध्ये जिल्ह्यातील ५.९१ लाख एकर क्षेत्रावर भूमीसंवर्धन योजना राबविण्यात आली. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेमध्ये हाती घेतलेल्या काही छोट्या तलावाची कामे तिसऱ्या पंचवार्षिक योजनेमध्ये पूर्ण झाली. यामध्ये बार्शी तालुक्यातील 'वैराग' येथील तलावाचा समावेश होता.[६६] या वैराग तलावाचे सिंचन क्षेत्र ८९० एकर इतके होते. इ. स. १९५८-५९ मध्ये या तलावाच्या माध्यमातून २०० एकर क्षेत्र सिंचनाखाली आले.[६७] इ. स. १९६८-६९ मध्ये बार्शी तालुक्यात राज्य सरकारची ३ लहान जलसिंचन प्रकल्पाची कामे चालू होती. यामुळे २,१३७ एकर क्षेत्र सिंचनाखाली आले.[६८]

इ. स. १९७१-७२ मध्ये बार्शी तालुक्यात जिल्हा परिषदेचे २, राज्य सरकारचे ३, तर खाजगी २ असे एकूण ७ जलसिंचन प्रकल्पाची कामे पूर्ण झाली होती. यामुळे तालुक्यातील सुमारे २,३९९ एकर क्षेत्र पाण्याखाली आले. यापैकी जिल्हा परिषदेच्या प्रकल्पामुळे ४०० एकर, राज्य सरकारच्या प्रकल्पामुळे १,९५७ एकर, तर खाजगी प्रकल्पामुळे ४२ एकर क्षेत्र सिंचनाखाली आले होते.[६९] इ. स. १९७४-७५ मध्ये बार्शी तालुक्यामध्ये जलसिंचनाचे ५ प्रकल्प पूर्ण झाले. यापैकी ४ जिल्हा परिषदेचे तर १ खाजगी प्रकल्प होता. या प्रकल्पांच्या माध्यमातून ३,९९८ एकर क्षेत्र सिंचनाखाली आले.[७०]

इ. स. १९७४-७५ मध्ये सोलापूर जिल्हा परिषदेच्या बांधकाम खात्याने, लघुपाटबंधारे या योजनेअंतर्गत सोलापूर जिल्ह्यामध्ये सर्वत्र कामे हाती घेतली. या योजनेअंतर्गत बार्शी तालुक्यातील पांढरी, मालेगाव, रातंजन, शेळगाव या ठिकाणी पाझर तलावाची कामे हाती घेण्यात आली. या पाझर तलावांसाठी ०.४० लक्ष रूपयांची तरतूद करण्यात आली होती. इ. स. १९७४-७५ मध्ये सोलापूर जिल्हा परिषदेच्या लघु पाटबंधारे विभागाने लघु पाटबंधारे योजने अंतर्गत जिल्ह्यामध्ये दुष्काळी कामे म्हणून पाझर तलावाची कामे हाती घेतली होती. यामध्ये बार्शी तालुक्यातील येडशी, उपळाई, पानगाव, नागोबाची वाडी, राऊत ओढा, गाडेगांव, बावी, आगळगांव, सुलाखे वस्ती या ठिकाणच्या दुष्काळी पाझर तलावांच्या कामांचा समावेश होता. या कामासाठी सोलापूर जिल्हा परिषदेने इ. स. १९७४-७५ च्या अंदाजपत्रकामध्ये १.१६ लक्ष रूपयांची तरतूद केली होती.[७१]

इ. स. १९७५-७६ मध्ये जिल्हा परिषदेच्या लघु पाटबंधारे विभागाने बार्शी तालुक्यातील लघुपाटबंधारे योजनेतील मालेगाव, पांढरी, रांतजन, शेळगाव, राऊत ओढा, सुलाखे वस्ती पाझर, आगळगांव, गाडेगाव, उपळाई (ठों), नागोबाची वाडी व बावी येथील पाझर तलावासाठी एकूण १.५७ लाख रूपयांची तरतूद केली होती. इ. स. १९७५-७६ मध्ये सोलापूर जिल्हा परिषदेने बार्शी तालुक्यातील जिल्हा परिषद रोजगार हमी योजनेअंतर्गत ८ पाझर तलावाच्या भूमी संपादनाकरीता ०.८० लाख रूपयांची तरतूद केली होती. यामध्ये उंबरगे, गाडेगाव, शेंद्री, कोरेगाव, कोंबडवाडी, गोपाळवाडी, आगळगाव, ढेंबरेवाडी येथील पाझर तलावांचा समावेश होता.[७२]

तक्ता क्र . १५

बार्शी तालुक्यातील महत्वाचे पाझर तलाव

अ. क्र.	पाझर तलावाचे नांव	अंदाजपत्रक रक्कम लक्ष	पूर्ण झालेले वर्ष	झालेला एकूण खर्च रू. लक्ष	साठवण क्षमता द.ल.घ.फू	सिंचन क्षमता हे.
१)	**तांदुळवाडी - २**	३.७९	१९८५	२.०६	३.०१	१८

२)	**पांढरी - १**	६.२३	१९८५	१.७०	४.००	१२
३)	**पाथरी - ५**	४.०६	१९८६	२.०७	४.०८	२४
४)	**श्रीपतपिंपरी - ३**	२.१७	१९८६	१.०८	१.७२	१२
५)	**पिंपळवाडी - ३**	७.०१	१९८६	७.०१	५.४२	२१
६)	**भानसाळे - १**	६.०५	१९८७	२.५२	३.८३	१५
७)	**कासारवाडी - १**	५.९३	१९८७	२.१२	३.८८	१९
८)	**पांगरी - १**	६.०९	१९८७	६.०९	४.०८	२८
९)	**मळेगाव**	४.२९	१९८७	४.२९	३.४९	२०
१०)	**महागाव - १**	४.४९	१९८७	१.९६	४.०८	२४
११)	**तांदुळवाडी - १**	३.५३	१९८७	१.८४	२.४६	१२
१२)	**नागोबाचीवाडी २**	३.१५	१९८७	१.०६	२.४३	१४
१३)	**उक्कडगाव - २**	४.०८	१९८७	३.८५	४.६८	३०
१४)	**उक्कडगाव**	४.५०	१९८७	४.५०	१.३५	२०
१५)	**वानेवाडी**	८.५९	१९८७	६.०९	६.५०	२०

(संदर्भ :-घाणेगांवकर सो.म. बार्शी तालुक्याची बार्शी तालुक्याची विकासगाथा इ. स. १९८५ पासून, १६ ऑगष्ट २००८,)

इ. स. १९७६-७७ मध्ये सोलापूर जिल्हा परिषदेने बार्शी तालुक्यातील पाझर तलावाच्या भूमी संपादनासाठी एकूण १.५० लाख रूपयांची तरतूद केली होती. यामध्ये पानगाव, गाडेगाव, उंबरगे, शेंद्री, गोपाळवाडी, आगळगांव, ढेंबरेवाडी, पांगरी, पाथरी, गिरले, कारी येथील पाझर तलावांचा समावेश होता.[७३]

इ. स. १९७६-७७ मध्ये तालुक्यामध्ये जिल्हा परिषदेचे १७ व राज्य सरकारचे ३ असे एकूण २० लघुसिंचन प्रकल्पामुळे २,१०५ एकर क्षेत्र सिंचनाखाली आले होते. इ. स. १९७७-७८ मध्ये जिल्हा परिषदेचे २१ व राज्य सरकारचे ५ असे मिळून २६ लघुसिंचन प्रकल्पामुळे तालुक्यातील २,४५३ एकर क्षेत्र सिंचनाखाली आली.[७४] इ. स. १९८०-८१ मध्ये तालुक्यातील ५ लघुसिंचन प्रकल्पांचा तालुक्यातील एकूण ४,६०६ एकर क्षेत्राला लाभ झाला.[७५] इ. स. १९८२-८३ मध्ये तालुक्यातील १० लघुसिंचन प्रकल्पामुळे ४,८३० एकर क्षेत्र ओलिताखाली आले.[७६] इ. स. १९८४-८५ मध्ये तालुक्यामध्ये राज्य सरकारची १० व खाजगी १ अशी एकूण ११ लघुपाटबंधाऱ्याची कामे उपयोगात होती. यामुळे ५,६८३ एकर क्षेत्र ओलिताखाली आले.[७७]

इ. स. १९८५-८६ पर्यंत सोलापूर जिल्हा परिषदनेने ९६१ पाझर तलावाच्या कामापैकी ६६३ पाझर तलावाची कामे पूर्ण केली होती. इ. स. १९८५-८६ मध्ये सोलापूर जिल्हा परिषदने ८२ पाझर तलावाची कामे पूर्ण केली. यामुळे जिल्ह्यातील १०,५५८ एकर क्षेत्र सिंचनाखाली आले. याशिवाय उपसा सिंचनाची १० पैकी ८ कामे पूर्ण झाली होती. त्यामुळे व बंधाऱ्यामुळे १,८२१ एकर जमीन सिंचनाखाली आली.[७८]

इ. स. १९८६-८७ मध्ये बार्शी तालुक्यामध्ये राज्य सरकारचे १० व सहकारी १ असे ११ प्रकल्पामुळे २,२१४ एकर क्षेत्र ओलिताखाली आले.[७९] इ. स. १९८७-८८ मध्ये तालुक्यातील १२ लघु पाटबंधाऱ्यामुळे ३,७२८ एकर क्षेत्र सिंचनाखाली आले.[८०] इ. स. १९८८-८९ मध्ये तालुक्यातील ११ लघु पाटबंधाऱ्यामुळे ३,१०६ एकर क्षेत्र सिंचनाखाली आले.[८१] इ. स. १९८५ पासून इ. स. २००८ अखेर बार्शी तालुक्यामध्ये ४५ पाझर तलाव पूर्ण झाले. त्यांची एकूण पाणी साठवण क्षमता १६५.६० द. लक्ष. फूट इतकी असून यावर एकूण १३८.०८ लक्ष रू. खर्च झाला. या ४५ पाझर तलावांपैकी ३९ कामे इ. स. १९९० पर्यंत पूर्ण झाली होती. या कामासाठी २६७.६३ लाख रू. तरतूद होती. मात्र यावर १३८.०८ लक्ष रू. प्रत्यक्ष खर्च झाला. यांची पाणीसाठवण क्षमता १६५.३० द. ल. घ. फू. होती. तर यामुळे १,७९३ एकर क्षेत्र सिंचनाखाली आले.

इ. स. १९८५ नंतर बार्शी तालुक्यामध्ये गावतळ्यांची ५ कामे पूर्ण झाली. या कामावर ४३२ लाख रू. खर्च झाला.[८२]

इ. स. १९९०-९१ मध्ये तालुक्यातील १२ लघुपाटबंधाऱ्यामुळे ४,००३ एकर क्षेत्र सिंचनाखाली आले.[८३]

२.६.६ तलाव

बार्शी तालुक्यामधील जलसिंचनामध्ये तलावांची भूमिका फार महत्वाची आहे. बार्शी तालुक्यामध्ये १०० वर्षापेक्षा जास्त जूने तलाव असून ते आजही सुस्थितीत आहेत. तालुक्यातील या तलावांनी कृषी विकासास फार मोठा हातभार लावला आहे. तालुक्यामधून एकही मोठी नदी जात नाही. त्यामुळे तालुक्यातील नद्यांवर तलाव बांधून जलसाठा करण्याचे काम तालुक्यामध्ये मोठ्या प्रमाणावर झाले. त्यामुळेच या तालुक्यामध्ये तलावांची संख्या जास्त आहे.

१) कोरेगाव

बार्शीच्या उत्तर-पूर्वेला १३ मैलावर कोरेगाव तलाव आहे. दोन दऱ्यांमध्ये मातीची दोन धरणे बांधून हा तलाव बांधलेला आहे. यातील पश्चिमेकडील मोठे धरण ९९५ फूट लांब व ७१ फूट उंच आहे. तर छोटे धरण दक्षिण-पूर्व असून ते ३०० फूट लांब व १२ फूट उंच आहे. तळ्याच्या पाण्याचे क्षेत्र ४.४ चौ. मैल. आहे. इ. स. १८५५-५८ च्या दरम्यान जिल्हाधिकाऱ्याच्या आदेशानुसार लहान धरणाची उंची ९ फूट

वाढविली होती. मात्र यासाठी वापरलेले साहित्य निकृष्ट दर्जाचे असल्यामुळे धरणाच्या पाण्याची पातळी वाढून धरणाला गळती लागली. इ. स. १८६४-६५ मध्ये धरणाची गळती थांबविण्यासाठी लहान धरणाच्या कडेने १२ फूटखोल व ३ फूट रूंदीचा खंदक बनविण्यात आला. सप्टेंबर १८७० मध्ये लहान धरणाला तडा गेल्याने या धरणाच्या चाललेल्या कामामध्ये अडथळा निर्माण झाला होता. इ. स. १८७८ मध्ये मोठ्या धरणाच्या पुनर्बांधणीचे काम हाती घेण्यात आले. याशिवाय लहान धरणाच्या बाजूने ४३५ फूट लांब नवीन सांडव्याची निर्मिती करण्यात आली. सांडव्यापासूनची धरणाची खोली १४ फूट ठेवण्यात आली. पुनरबांधणीसाठी १२,००० रू खर्च झाला. कोरेगाव तलाव पूर्ण क्षमतेने भरल्यास ९७० एकर जमीन सिंचनाखाली येते.[८४] या तलावाचे काम सन १८९० मध्ये पूर्ण झाले. या कोरेगाव तलावाचे सिंचन क्षेत्र १०५० एकर इतके होते. इ. स. १९५८-५९ मध्ये या तलावाद्वारे ४९८ एकर क्षेत्र सिंचनाखाली आले.[८५]

तलावास डावा कालवा ५ कि. मी. व उजवा कालवा ५ कि. मी. लांबीचा असून या कालव्याद्वारे कोरेगाव, चुंब, खडकोणी, भानसळे या चार गावांच्या हद्दीतील क्षेत्र सिंचनाखाली येते. तलाव पूर्णत: माती, मुरूमाचा आहे. सन १९९३-९४ मध्ये झालेल्या भूकंपामुळे तलवातून ८ ते १० ठिकाणाहून पाण्याची गळती सुरू होऊन धरणास धोका निर्माण झाला होता. त्यामुळे संपूर्ण धरणाचे इ. स. १९९५-९६ मध्ये मजबुतीकरण करण्यात आले. यावर १ कोटी ३० लक्ष एवढा खर्च झाला.

२) पाथरी

लघु पाटबंधारे तलाव पाथरी हा बार्शीच्या पूर्वेस १८ कि. मी. अंतरावर आहे. तलावाचे काम सन १९०५ मध्ये पूर्ण झाले. तलावास १२ कि. मी. लांबीचा डावा कालवा आहे. या तलावामुळे मौजे शिराळे, पाथरी, घारी, ममदापूर, झानपूर, पिंपळगांव, खामगांव, पांगरी अशा आठ गावांचा एकूण १,५९८ एकर क्षेत्र सिंचनाखाली आले. तलावाचा एकूण पाणीसाठवण क्षमता ४१९ द.ल.घ.फू इतकी असून ४१० द.ल.घ.फू हा उपयुक्त साठा आहे. हा तलाव पूर्णत: माती व मुरूमाचा आहे. इ. स. १९९३-९४ मध्ये झालेल्या भूकंपामुळे तलावास बऱ्याच ठिकाणी भेगा पडून तो खचला होता. त्यामुळे संपूर्ण धरणाचे मजबुतीकरण सन १९९५-९६ मध्ये करण्यात आले आहे. त्यास रू.५५ लक्ष एवढा खर्च झाला. प्रकल्पावरून बार्शी शहर, कुसळंब, धोत्रे, घारी, खामगाव या गावांच्या पाणी पुरवठा योजना चालू होत्या.[८६]

३) हिंगणी प्रकल्प

बार्शी तालुक्यामधील हिंगणी या ठिकाणी मध्यम आकाराच्या तलावाचा प्रकल्प हाती घेण्यात आला. याचा अंदाजित खर्च १६७.९७ लाख इतका होता. एकूण खर्चापैकी चौथ्या पंचवार्षिक योजने अंतर्गत या तलावासाठी ४३.९० लाख रूपयांची तरतूद करण्यात आली. ५ व्या पंचवार्षिक योजनेमध्ये १२० लाख रूपयांची तरतूद करण्यात आली.[८७] हा प्रकल्प पूर्ण होण्याचे नियोजित वर्ष सन १९७६ होते. या

कामासाठी १६७ लाख रूपये खर्च अपेक्षित होता. या तळ्याची नियोजित उंची २४.५१ मीटर इतकी होती. इ. स. १९७२ मध्ये ती १.५ मीटर इतकी पूर्ण झाली होती. या तळ्याच्या कालव्याची लांबी ३१ कि. मी. इतकी होती. या तलावाने एकूण १६,०३७ एकर क्षेत्र व्यापलेले होते.[८८] इ. स. १९७६ मध्ये हे काम पूर्ण होण्याची शक्यता होती. मात्र या प्रकल्पाच्या सुधारित वाढीनुसार नंतर हे काम इ. स. १९८०-८१ मध्ये पूर्ण होण्याची शक्यता वर्तविली. यामुळे खर्चाचे बजेट १६७ लाख रूपयांवरून २७९-१० लाख रूपये इतके झाले. या वर्षापर्यंत तलावाचे क्षेत्र १६,०३७ एकर वरून १७,८१८ एकर इतके झाले. तसेच कालवा देखील ३१ कि. मी. वरून ३३ कि. मी. इतका झाला.[८९]

३० जून १९८१ अखेर या धरणाचा डावा कालवा पूर्ण झाला. या तलावामुळे ३१ मार्च १९८१ अखेर ५,४५८ एकर क्षेत्र ओलिताखाली आले.[९०]

३० जून १९८५ अखेर या तलावाच्या नियोजित डाव्या व उजव्या कालव्याचे एकूण ३३ कि. मी. काम पूर्ण झाले होते.[९१] ३० जून १९९१ अखेर हिंगणी प्रकल्पाचा सुधारित खर्च ६१८.४५ लाख रू. इतका होता. ३१ मार्च १९९१ अखेर या प्रकल्पामुळे ३,७६३ एकर क्षेत्र सिंचनाखाली आले.[९२] हिंगणी पानगाव प्रकल्पाच्या संदर्भातील कालवे बांधणी, पाणीवापराचे नियोजन यासंदर्भात तत्कालीन आमदार दिलीप सोपल यांनी शासनाकडे सतत पाठपुराठा केला.[९३]

४) जवळगाव

हा तालुक्यातील एक महत्वाचा प्रकल्प होय. तालुक्यातील जवळगाव तलाव या प्रकल्पाचा नियोजित खर्च ३८३.०० लाख रूपये इतका होता. या तलावाची नियोजित उंची २१.६६ मीटर होती. या तलावाच्या एकूण कालव्याची लांबी ३१.०० कि. मी. होती. या तलावाचे एकूण सिंचन क्षेत्र १५,३०० एकर इतके होते. या तलावामुळे वैराग भागातील सिंचन क्षेत्रामध्ये वाढ झाली.[९४]

तालुक्यातील मांडेगाव, कळंबवाडी व धनगरवाडी या लघुपाटबंधारे या योजनेस अनुक्रमे १० आक्टोबर १९७५ व १४ जून १९८० रोजी प्रशासकीय मान्यता मिळाली.[९५]

५) मांडेगाव

लघु पाटबंधारे तलाव मांडेगाव हा बार्शीच्या उत्तरेस १२ कि. मी. अंतरावर आहे. या तलावास उजवा कालवा ४ कि. मी. लांबीचा असून जलाशय व कालव्याद्वारे उंबर्गे, देवळाली, मांडेगाव या गावांचे एकूण ५१६ एकर क्षेत्र सिंचनाखाली आले. संपूर्ण धरण व कालवा तयार करण्याचा खर्च ११७ लक्ष रूपये इतका आला आहे. या तलावाच्या लाभक्षेत्रामध्ये शेतकरी प्रामुख्याने ज्वारी हे पीक घेत असल्याने रब्बी हंगामाध्ये सिंचनासाठी पाणी सोडण्यात येते.

६) कारी

हा तलाव बार्शीच्या पूर्वेस ३० कि.मी. अंतरावर असून तलावाचे काम सन १९७१ मध्ये पूर्ण झाले. हा तलाव पूर्णत: माती व मुरूमाचा असून, त्यास ४.५ कि. मी. लांबीचा उजवा कालवा आहे. इ. स. १९९३-९४ मध्ये भूकंपामुळे या तलावाचे नुकसान झाले होते. पुढे या तलावाच्या मजबुतीकरणासाठी ०.४५ लक्ष रूपये एवढा खर्च झाला. या तलावावरून कारी या गावाचा पाणीपुरवठा चालू आहे. या प्रकल्पामुळे कारी, भानसगाव, घोळवेवाडी परिसरातील ६२७ एकर क्षेत्र सिंचनाखाली आले.

७) ममदापूर

हा तलाव हा बार्शीच्या पूर्वेस २१ कि. मी. अंतरावर असून तलावाचे काम सन १९७८ मध्ये पूर्ण झाले. तलावास ६.२० कि. मी. लांबीचा आहे. हा तलाव पूर्णत: माती व मुरूमाचा आहे. सन १९९३-९४ मध्ये झालेल्या भूकंपामुळे याचे नुकसान झाले होते. पुढे इ. स. १९९५-९६ मध्ये या तलावाच्या मजबुतीसाठी ०.४८ लक्ष रूपये एवढा खर्च झाला. या तलावावरून मौजे पांगरी, झानपूर या गावाचा पाणीपुरवठा चालु आहे. या प्रकल्पामुळे झानपूर, ममदापूर, येळंब परिसरातील ८८९ एकर क्षेत्र सिंचनाखाली आले.

८) गोरमाळे

लघु पाटबंधारे तलाव गोरमाळे हा बार्शीच्या पूर्वेस २२ कि. मी. अंतरावर आहे. तलावाचे काम सन १९७६ मध्ये पूर्ण झाले. तलावास ६.५० कि. मी. लांबीचा डावा कालवा आहे. या तलावावरून मौजे गोरमाळे, येळंब, चिखर्डे या गावाचा पाणीपुरवठा चालु आहे. धरण माती व मुरूमाचे आहे. या प्रकल्पामुळे गोरमाळे, येळंब, चिखर्डे परिसरातील ६९९ एकर क्षेत्र सिंचनाखाली आले.[९६]

९) कळंबवाडी

लघु पाटबंधारे तलाव कळंबवाडी हा बार्शीच्या उत्तरेस १८ कि. मी. अंतरावर आहे. तलावास ६ कि. मी. लांबीचा उजवा कालवा आहे. या प्रकल्पाचा एकूण खर्च रू. ९० लाख इतका झाला. तलावाच्या जलाशयावरून व कालव्यावरून कळंबवाडी, काटेगाव, उंबर्गे, आगळगाव या चार गावांचे एकूण १,१९८ एकर क्षेत्र सिंचनाखाली आले. या तलावावरून उंबर्गे व आगळगाव या गावांना पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी जीवन प्राधिकरणाद्वारे पाणी पुरवठा योजना कार्यान्वित आहे.

१०) तावडी

लघु पाटबंधारे तलाव तावडी हा बार्शीच्या पूर्वेस ७ कि. मी. अंतरावर आहे. तलावाचे काम सन १९८० मध्ये पूर्ण झाले आहे. तलावास ४ कि. मी. लांबीचा डावा कालवा आहे. तलाव माती व मुरूमाचा आहे. या प्रकल्पामुळे तावडी, शेळगांव परिसरातील ५२१ एकर क्षेत्र सिंचनाखाली आले.

११) काटेगाव

हा तलाव बार्शीच्या उत्तरेस १८ कि. मी. अंतरावर आहे. याचे काम सन १९८१ मध्ये पूर्ण झाले असून, त्यास २७ लक्ष रू. इतका खर्च झाला. तलावास ५.५० कि. मी. लांबीचा उजवा कालवा आहे. या तलावामुळे धामणगाव, काटेगाव, बोरगाव, कळंबवाडी या गावांचे एकूण ५२३ एकर क्षेत्र सिंचनाखाली आले.

१२) चारे

चारे तलाव हा बार्शीच्या उत्तरेस २५ कि. मी. अंतरावर आहे. तलावाचे काम सन १९८३ मध्ये पूर्ण झाले. तलावास ५ कि. मी. लांबीचा उजवा कालवा आहे. कालव्याद्वारे मौजे चारे, काटेगाव, बोरगाव या गावांचे ७२६ एकर क्षेत्र सिंचनाखाली येते. तलाव पूर्णत: माती - मुरूमाचा आहे. सन १९९३ -९४ मध्ये झालेल्या भूकंपानंतर या तलावाच्या मजबुतीकरणास इ. स. १९९५-९६ मध्ये ५० लक्ष रूपये इतका खर्च झाला. या जलाशयामधून मौजे काटेगाव, चारे, बोरगाव या गावांना पिण्यासाठी पाणी पुरवठा चालू आहे.

१३) वालवड

वालवड हा तलाव बार्शीपासून २५ कि. मी. अंतरावर आहे. तलावाचे काम सन १९८३ मध्ये पूर्ण झाले आहे. तलावास एकूण रू. ३० लक्ष इतका खर्च झाला आहे. तलावास ४.५० कि. मी. लांबीचा उजवा कालवा आहे. या तलावामुळे मौजे बांगरवाडी, वालवड, चारे या गावांची एकूण ५०१ एकर जमीन सिंचनाखाली येते. धरण हे डोंगराळ भागात असल्याने धरणात पाणीसाठा लवकर होतो. या धरणाच्या लाभक्षेत्रात ज्वारी हे मुख्य पीक येत असल्याने रब्बी हंगामामध्ये धरणातील पाणी पिकास दिले जाते. यामुळे उत्पन्नात बरीच वाढ झाली आहे.[९७]

१४) पिंपळगाव (ढाळे)

तालुक्यातील पिंपळगाव तलावाचा अंदाजित खर्च ९२०.१५ लाख रू. होता. उंची १४.५३ मीटर तर कालव्याची लांबी ३० कि. मी. होती. या तलावाचे एकूण लाभक्षेत्र ८,२११ एकर इतके होते.[९८] या प्रकल्पाचा भूमीपूजन समारंभ २० ऑगस्ट १९८७ रोजी झाला. या प्रकल्पास मूळ प्रशासकीय मान्यता शासन निर्णय क्र. पिंपळगाव /१०९३/(३/९३) ज.सं.अ. दिनांक ३० जून १९९४ अन्वये रू. १० कोटी इतक्या अंदाजित रकमेस मिळाली. त्यानंतर दिनांक २ सप्टेंबर ९९ रोजी प्रथम सुधारित मान्यता रू. ४२.७८ कोटी इतक्या रकमेस मान्यता मिळाली. या कामावर इ. स. २००८ पर्यंत झालेला खर्च ३५ कोटी इतका आहे. या कामाच्या द्वितीय सुधारित अंदाजपत्रकास ३ फेब्रुवारी २००४ रोजी मान्यता मिळाली. त्यातील मंजूर अंदाजपत्रकीय किंमत रू ६३,३० कोटी इतकी होती. सध्या हा प्रकल्प पूर्ण झालेला आहे.

बुडीत क्षेत्र : या प्रकल्पाअंतर्गत बुडीत क्षेत्रात १) पिंपळगाव २)बावी ३) महागाव ४) तांदुळवाडी ५) चिखर्डे ही गावे येतात. तर प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रात १) महागाव २) तांदुळवाडी या गावांची गावठाणे येतात

लाभक्षेत्र : या प्रकल्पास ३० कि. मी. लांबीचा उजवा कालवा आहे. त्यामुळे बार्शी तालुक्यातील पिंपळगाव, साकत, उंडेगाव, पानगाव, इर्ले, यावली ही सहा गावे सिंचनाखाली येतात.

भू-संपादन : प्रकल्पाच्या अंतर्गत बुडीत क्षेत्रात येणाऱ्या पिंपळगाव, बावी, चिखर्डे, तांदुळवाडी येथील क्षेत्राचे भू-संपादन प्रक्रिया पूर्ण झाली आहे. बाधीत खातेदारास भूसंपादन रकमेचे वाटपही पूर्ण झाले आहे.

पुनर्वसन : या प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रात येणाऱ्या दोन गावांपैकी मौजे तांदुळवाडी येथील पुनर्वसनाचे काम पूर्ण झाले आहे व तांदुळवाडी येथील बाधीत खातेदार पुनर्वसित गावठाणात स्थलांतरित झाले आहेत. मौजे महागाव येथील पुनर्वसनाचे काम प्रगतीपथावर आहे. तेथील प्लॉट तयार करण्याचे काम पूर्ण झाले असून प्लॉट वाटपही चालू आहे. या प्रकल्पाचे ठळक वैशिष्ट्ये..

पाणी क्षेत्र :- २८८ चौ. कि. मी.

धरणाची लांबी :- २३२० मीटर

भिजणारे क्षेत्र :- ५,९३० एकर.

१५) बाभूळगांव

या प्रकल्पास शासनाने नोव्हेंबर १९८९ मध्ये प्रशासकीय मान्यता दिली. या प्रकल्पाचा खर्च ३७१.५१ इतका असून या प्रकल्पामुळे बार्शी तालुक्यातील सुमारे १२८० हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आले. शिवाय पिण्याच्या पाण्याचीही तरतूद प्रकल्पांतर्गत केलेली आहे. अशी माहिती पाटबंधारे राज्यमंत्री भारत बोंद्रे यांनी ५ डिसेंबर १९८९ रोजी आ. दिलीप सोपल यांना पाठविलेल्या पत्रावरून मिळते. या बाभुळगाव प्रकल्पास शासन निर्णय क्र. १०९२/९९ (१४९/९२) दिनांक १४ मे ९२ अन्वये रूपये ३.८३ कोटी इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता मिळाली होती. त्यानंतर प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यतेनूसार २२ फेब्रुवारी २००० रोजी ११.७३ कोटी रूपये मिळाले. या तलावाचे काम सन १९९९ मध्ये पूर्ण झाले. या कामावर १०.५० कोटी खर्च झाला. या तलावामुळे ३,१६२ एकर जमीन सिंचनाखाली आली. या तलावाच्या पाण्याचा लाभ बाभुळगाव, बोरगाव, आगळगांव, उंबरगे, बेलगाव, ताडसौदणे या गावांना होतो.[९९]

राज्यातील जलसिंचन विकासाचा आढावा घेतल्यास असे दिसून येते की, पहिल्या पंचवार्षिक योजनेत जलसिंचन विकासावर केवळ ०८ कोटी रूपये खर्च करण्यात आले. याउलट आठव्या पंचवार्षिक योजनेमध्ये मोठ्या व मध्यम जलसिंचन प्रकल्पावर ३७७३ कोटी रूपये खर्च करण्यात आले. तर लघुपाटबंधारे प्रकल्पावर १५५४ कोटी रूपये खर्च करण्यात आले. इ. स. १९६० मध्ये महाराष्ट्र शासनाने सं. गो. बर्वे यांच्या अध्यक्षतेखाली पहिल्या सिंचन आयोगाची स्थापना केली. या आयोगाने इ. स. १९६२ मध्ये आपला अहवाल शासनाला सादर केला. पुढे बदलत्या काळातील सर्व बाबींचा विचार करून सिंचनविषयक प्रश्नाच्या अभ्यासासाठी महाराष्ट्र शासनाने डिसेंबर १९९५ मध्ये दुसऱ्या सिंचन आयोगाची

स्थापना केली.[१००] सद्यःस्थितीत महाराष्ट्र राज्यामध्ये जिल्हा परिषदेच्या ११,५०० लघुपाटबंधारे प्रकल्पाव्दारे २.५५ लाख हेक्टर क्षेत्र सिंचनाखली आलेले आहे. यामध्ये सुमारे १२०० लघुपाटबंधारे तलावाच्या माध्यमातून ८०,००० हेक्टर क्षेत्र, कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्याच्या माध्यमातून १,०७,००० हेक्टर क्षेत्र, ३९०० कच्चे बंधाऱ्याच्या माध्यमातून ४०,००० हेक्टर क्षेत्र व २३०० उपसा सिंचन योजनेच्या माध्यमातून २८,००० हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आले आहे. राज्यामध्ये दरवर्षी जवळपास १४०० ते १५०० लघुपाटबंधारे प्रकल्प जिल्हा परिषदेमार्फत पूर्ण करण्यात येतात.[१०१]

२.७ बार्शी तालुक्यातील जमीन महसूल

इ. स. १८४० मध्ये ले. विंगेट असे म्हणाला होता की, ब्रिटिशामुळे बार्शी व बार्शीचे व्यवस्थापन गंभीररित्या विस्कळीत झाले. याचे कारण असे की जरी वस्तूच्या किमती कमी झाल्या असल्या तरी ब्रिटिश सरकारकडून त्या वस्तूच्या पूर्वीच्या कीमतीवरील महसूला एवढाच महसूल गोळा करत असे. यामुळेच बार्शी तालुक्यामध्ये शेती कसण्याचे प्रमाण कमी झाले. इ. स. १८२१-२२ पर्यंत वस्तूच्या किमती वाढत होत्या व नियमितपणे कर गोळा केला जाई. पुढे वस्तूंच्या किमती वेगाने खाली आल्यानंतर काही वर्षे करमाफ केल्यामुळे शेतकरी स्वतंत्रपणे जमीन कसू लागल्याने इ. स. १८२६-२७ मध्ये अनपेक्षिपणे कराची रक्कम प्रचंड प्रमाणात वाढली. विंगेटच्या मते इ.स. १८२६-२७ पासून बार्शी हा उपविभाग अधिक करामुळे त्रस्त झाला आहे. काही अपवाद वगळता ही अधोगती इ. स. १८३५-३६ पर्यंत कायम होती. याचा परिणाम शेती आणि जमीन महसूलाचे प्रमाण कमी होण्यामध्ये झाला. इ. स. १८३० च्या सुमारास मि. प्रिंगले यांची बार्शीमध्ये नियुक्ती झाली. नंतर पुढील १० वर्षामध्ये शेती व जमीन महसूलामध्ये चढ-उतार होतच गेले, याला अपवाद इ. स. १८३२-३३ चा दुष्काळ. ज्यावेळी खूपच कमी जमीन महसूल गोळा झाला. यापूर्वीच्या ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या महसूल पद्धतीपेक्षा प्रिंगलेची जमीन महसूल पद्धत अधिक चांगली होती. जमिनीवरील महसूल योग्य पद्धतीने मिळविण्यासाठी त्या जमिनीवरील उत्पादनाचे मूल्यमापन महत्त्वाचे आहे असे याचे मत होते. प्रिंगलेच्या १० वर्षाच्या काळामध्ये जमीन महसूल प्रत्येक एकरला १ रू. एवढा वाढला. इ. स. १८३९-४० मध्ये शेती कसण्याचे प्रमाण जास्त होते. कारण त्यावेळी पडीक जमिनीसाठी कमी दराने अनुदान उपलब्ध केले होते.[१०२]

तक्ता क्र . १६

बार्शी तालुक्यातील जमीन - महसूल

वर्ष	मागणी	जमा	वर्ष	मागणी	जमा
१९५०-५१	-	२,८०,८९०	**१९७१-७२**	५,२४,९६०	२,५८,९३१
१९५१-५२	-	२,८४,११५	**१९७२-७३**	५,४७,४७७	-

१९५२-५३	-	२,९२,८२०	**१९७३-७४**	६,८८,०६४	२,९१,४८५
१९५३-५४	-	३,०६,२८०	**१९७४-७५**	५,६६,९५८	३,७६,५६३
१९५४-५५	-	३,१२,४१९	**१९७५-७६**	६,००,०००	५०,०००
१९५५-५६	-	३,५७,१७३	**१९७६-७७**	५,५९,०००	२,७६,०००
१९५६-५७	-	३,३३,५९३	**१९७७-७८**	५,२४,०००	१,७५,०००
१९५७-५८	-	३,४४,७४२	**१९७८-७९**	५,१५,०००	२,६०,०००
१९५८-५९	-	३,४८,२९१	**१९७९-८०**	२,८२,०००	२,८०,०००
१९५९-६०	-	३,५१,०४४	**१९८०-८१**	६,९९,०००	३,८०,०००
१९६०-६१	३.२६.०४२	३,२६,०४२	**१९८१-८२**	५,२४,०००	२,०८,०००
१९६१-६२	३.३३.७३८	३,३३,७३८	**१९८२-८३**	७,०४,०००	३,७३,०००
१९६२-६३	-	-	**१९८३-८४**	६,४०,०००	५,३३,०००
१९६३-६४	५४९५८६	५,४९,२३२	**१९८४-८५**	७,२२,०००	५,९३,०००
१९६४-६५	५७०३९९	५,७०,१६४	**१९८५-८६**	७,१८,०००	१,६९,०००
१९६५-६६	५७०३९९	५,७०,१६४	**१९८६-८७**	६,२३,०००	१,४२,०००
१९६६-६७	५७३७९९	५,६४,१५३	**१९८७-८८**	१०,१०,०००	५,३०,०००
१९६७-६८	५४३५१५	५,३४,३०६	**१९८८-८९**	३,९५,०००	४,२०,०००
१९६८-६९	५४६९९८	५,६९,५७३	**१९८९-९०**	-	-
१९६९-७०	५३६००६	५,६५,०८८	**१९९०-९१**	५,७६,०००	४,७६,०००
१९७०-७१	२७१८९४	२३,७६३	**-**	-	-

(संदर्भ :- सामाजिक आर्थिक समालोचन अहवाल व जनगणना इ. स. १९६१, सोलापूर जिल्हा)

ब्रिटीशांच्या सुरूवातीच्या कालखंडामध्ये बार्शी हा विभाग भरभराटीस आला होता. जवळपास संपूर्ण जमीन लागवडीखाली होती. इ. स. १८३५-३६ मध्ये वस्तूंच्या किंमती कमी झाल्यामुळे जमीन महसूल ९ वर्षापूर्वीच्या जमीन महसूलापेक्षा दिडपट वाढला. सर्वेक्षणाच्या पहिल्या वर्षी बार्शीतील खेड्यांनी अचानक प्रगती केली. परंतू इ .स. १८४५-४६ च्या वाईट हंगामामुळे व सातत्याने बदलणाऱ्या महसूलामुळे प्रगती खुंटली. १८५३-५४ मध्ये हळूहळू तेजी आली व १८६० च्या सुमारास पूर्णपणे महसूल गोळा होऊ लागला. इ. स. १८६१ ते १८७२ च्या दरम्यान कोणतीही सूट न देता महसूल गोळा होऊ लागला. वसाहतीच्या चालू मूल्यमापनानुसार विहिरी आणि कालव्यांद्वारे पाणी दिलेल्या जमिनीचा महसूल ८३१० रूपये होता. विहिरी आणि कालव्यांद्वारे किती जमीन पाण्याखाली आली याचे प्रमाण न सांगता हा

महसूल लादला गेला. पुर्नपरिक्षण असे दर्शविते की, विहिरीद्वारे १४,१३३ एकर, तर कालव्याद्वारे १०५८ एकर जमीन पाण्याखाली आली होती. त्यामुळे जमीन - महसूल कमी करावा असा प्रस्ताव मांडण्यात आला. त्याला पुर्नपरिक्षण अधिकाऱ्याने संमती दिली. इ. स. १८८२ मध्ये बार्शी तालुक्याचा जमीन महसूल २,५६,८२० रूपये इतका होता.[१०३]

जिल्ह्यातील वेगवेगळ्या तालुक्याची मूळ जमीन महसून व्यवस्था १८३९ ते १८७१ या दरम्यान तयार झाली होती. जमीन महसूल व्यवस्थेची पहिली पुनर्रचना १८७१-१९०९ या दरम्यान, दुसरी पुनर्रचना १९०४-१९२६ या दरम्यान करण्यात आली. तर तिसरी महसूल पुनर्रचना १९४७-४८ मध्ये केवळ करमाळा, माळशिरस, माढा आणि उत्तर सोलापूर या तालुक्यासाठी करण्यात आली. बार्शी तालुक्याची मूळ जमीन महसूल व्यवस्था इ. स. १८४० मध्ये तयार झाली होती. या जमीन महसूल व्यवस्थेची इ. स. १८७१-७२ मध्ये पहिली पुनर्रचना करण्यात आली. या पुनर्रचनेमध्ये १११ गावे होती तर दर एकराला सरासरी शेतसारा ६३ पैसे इतका होता. इ. स. १९०५-०६ मध्ये तालुक्यातील जमीन महसूल व्यवस्थेची दुसरी पुनर्रचना करण्यात आली. याही पुनर्रचनेमध्ये १११ गावे होती. तर दर एकराला सरासरी शेतसारा ६९ पैसे इतका होता. या दोन्ही पुनर्रचना ३० वर्षासाठी होत्या. इ. स. १८४० मध्ये तयार झालेल्या मूळ जमीन महसूल व्यवस्थेत १११ गावांचा समावेश होता. तर दर एकराला सरासरी शेतसारा ६४ पैसे इतका होता. यावरून असे दिसून येते की, बार्शी तालुक्याच्या जमीन महसूल व्यवस्थेत १९०५-०६ पर्यंत गावांच्या संख्येत बदल झाला नाही. मात्र सरासरी शेतसाऱ्याच्या प्रमाणामध्ये नाममात्र बदल झाल्याचे दिसून येते. पुढे तलाठी व ग्रामपंचायतीच्या माध्यमातून गावचा शेतसारा विभाग जिल्हा परिषदेकडे सोपविण्यात आला. जमीन महसूल आणि जमीन मालकीच्या नोंदी महसूल अधिकाऱ्यांच्या देखरेखेखाली केल्या जातात.[१०४]

सोलापूर जिल्ह्यामध्ये शेतसाऱ्याची रयतवारी पद्धत होती. या पद्धतीमध्ये राज्यसरकार प्रत्यक्षपणे शेतकऱ्यांकडून महसूल गोळा करते. याचे दोन प्रकार होते. १) जुनी पद्धती २) नवी पद्धत. जुन्या पद्धतीनुसार जमीन ही वारसा हक्काने मिळवावी आणि हस्तांतरीत करता येत होती. परंतू १९०१ च्या नव्या पद्धतीनुसार विशिष्ठ भागातील जमीन जिल्हाधिकाऱ्याच्या पूर्व परवानगीशिवाय हस्तांतरीत करता येत नाही, असा बदल करण्यात आला. याशिवाय इनामी जमिनीसाठी एक वेगळी पद्धत होती. यामध्ये सरकारकडून चांगली सेवा करणाऱ्यांना जमिनी भेट अथवा अनुदानाच्या स्वरूपात दिल्या जायच्या यात सरकार किंवा स्थानिक खेड्याला त्या सेवेचा उपयोग होणे बंधनकारक होते. अशा प्रकारच्या इनामी जमिनीवर महसूल आकारला जात नव्हता. इ. स. १९५९ चा अपवाद वगळता, इ. स. १९५१ ते १९६० या कालावधीमध्ये बार्शी तालुक्याचा जमीन महसूल नियोजित मागणीनुसार अगदी तंतोतंत गोळा झाला. सोलापूर जिल्ह्यामध्ये मागणी व जमा या संदर्भात बार्शी तालुका या दहा वर्षांमध्ये आघाडीवर होता.[१०५]

सोलापूर जिल्ह्यामध्ये बार्शी तालुक्याचा जमीन महसूलासंदर्भात द्वितीय क्रमांक लागत असला तरी मागणी व जमा यासंदर्भात जिल्ह्यामध्ये बार्शी तालुक्याचा प्रथम क्रमांक लागतो. स्वातंत्र्योत्तर काळातील तालुक्याच्या कृषी व आर्थिक समृध्दीचे हे द्योतक होते.[१०६]

तालुक्यामध्ये १९७०-७१ मध्ये २,७१,८९४ रू. शेतसारा जमा होणे अपेक्षित होते. मात्र दुष्काळग्रस्त परिस्थितीमुळे तो खूपच कमी म्हणजे २३,७६३ रू. इतका जमा झाला.[१०७]

इ. स. १९७२-७३ च्या दुष्काळामुळे सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांची परिस्थिती अतिशय गंभीर झाली होती. या जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्याची आणेवारी चार आण्याच्या आत लागली. त्यामुळे शासनाने जमीन महसूलाची वसुली तहकूब केली. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ चे कलम १४४ व १५१,१५२ अन्वये जमीन महसुलाच्या प्रत्येक रूपयावर २० पैसे उपकर बसविला. तसेच कलम १४५ अन्वये हा उपकर सोलापूर जिल्हा परिषदेने ६० पैशांनी वाढविला होता. मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम १२७ अन्वये जमीन महसूलाच्या प्रत्येक रूपयावर २० पैसे उपकर बसविला. मात्र १९७२ च्या दुष्काळी परिस्थितीमुळे हे उपकर वसूल करू नये. मात्र त्यामुळे जिल्हा परिषदेच्या उत्पन्नात येणारी घट खास अनुदान देऊन भरून काढावी अशी शासनास विनंती करण्याचा ठराव पास झाला.[१०८] दुष्काळग्रस्त स्थितीचा अपवाद वगळता तालुक्यामध्ये वेळोवेळी चांगल्या प्रमाणात जमीन महसूल गोळा झाल्याचे दिसते.

२.८. बार्शी तालुक्यातील दुष्काळ

इ. स. १८१८ मध्ये दुष्काळामुळे बार्शी, पंढरपूर, तुळजापूर ही ठिकाणे त्रस्त झाली. याचबरोबर प्लेग, कॉलरा, यासारख्या साथीच्या रोगामुळे हजारो लोक मृत्यूमुखी पडले. १ शेर धान्याची किंमत ३ ते ४ रूपये झाली. अशा परिस्थितीमध्ये बार्शी तालुक्यातील वैराग येथील ' घोंगडे ' या सावकाराने अनेक ठिकाणी मोफत अन्नछत्रे सुरू केली. याशिवाय सोलापूरमधील ब्राम्हण सावकार ' महादेव बापू कुलावदेव ' यांनीही अन्नछत्र सुरू केली. सोलापूरमधील ७ विभागांपैकी बार्शी व माळशिरस येथील पिके वाईट अवस्थेत होती तर इतर ५ विभागाची अवस्था अतिशय वाईट होती. इ. स. १८७६-७७ च्या दुष्काळामुळे लोकांची उपासमार होऊ लागली. गावे रिकामी होऊ लागली. यामुळे जिल्ह्याची ५० हजार लोकसंख्या कमी झाली, तर केवळ बार्शी तालुक्यातील ४००० एकर जमीन पडीक बनली.[१०९]

इ. स. १८७६-७७ मध्ये दुष्काळामुळे सरकारने बार्शी तालुक्यातील पानगाव येथे एका तलावाचे बांधकाम सुरू केले होते. त्यामुळे १०,००० लोकांना काम मिळाले. इ. स. १८७६ मध्ये सुरूवातीची पिके पूर्णपणे वाया गेली. खरीपासाठी जमिनी तयार होऊ शकल्या नाहीत. यातच बार्शी व सोलापूरमध्ये कॉलऱ्याची साथ पसरली. या दुष्काळामुळे नागरी भागामध्ये ५८८०९ व सार्वजनिक ठिकाणी काम करणारे

२७७३० लोक बेकार झाले. इ. स. १८७६ च्या या दुष्काळामुळे सोलापूर जिल्ह्यातील सातही विभागामध्ये दुष्काळी छावण्या बरोबरच विशेष ५ छावण्या उघडण्यात आल्या. या ५ विशेष छावण्यांपैकी एक बार्शी रोड स्टेशन व दुसरी पानगाव या ठिकाणी उघडण्यात आली. या दोन छावण्या नोव्हेंबर १८७६ मध्ये उघडण्यात आल्या होत्या व त्या नोव्हेंबर १८७७ पर्यंत चालू होत्या. बार्शी तालुक्यातील या छावण्यांचा खर्च १५,४१९ रूपये इतका झाला. डिसेंबर १८७६-७७ च्या दुष्काळामुळे या कालावधीमध्ये बार्शीमध्ये एका बैलगाडीला प्रतिदिन २ रू. इतके भाडे द्यावे लागत होते.[११०]

बार्शी तालुक्याचे एकूण पाच विभाग होते. **१)** आगळगांव विभागामध्ये ३१ गावे **२)** बार्शी विभागामध्ये १८ गावे **३)** वैराग विभागामध्ये २७ गावे **४)** उपळे (दु.) विभागामध्ये २६ गावे **५)** पानगाव विभागामध्ये २७ गावे होती. इ. स. १९७० ते १९७३ या काळात पाचही विभागातील सर्व गावे दुष्काळग्रस्त होती.[१११] इ. स. १९७२-७३ मध्ये बार्शी तालुक्यातील सर्व गावे दुष्काळग्रस्त होती. यातून मार्ग काढण्यासाठी शासनाने ९४१ दुष्काळी कामे सुरू केली. यामधून ३८५०८ लोकांना रोजगार मिळाला. या काळामध्ये शासनाने चाऱ्यासाठी ४,७५,००० रू. तर बैल घेण्यासाठी ९,१६,००० रू. कर्जवाटप केले.[११२] या काळात तालुक्यातील बरेचसे लोक उजणी धरणावर कामाला गेले होते. कारण त्या ठिकाणी गड्याला ३.०० रूपये तर बाईला २.५० रूपये रोजगार होता.[११३]

बार्शी तालुका महाराष्ट्रामध्ये बांध बंदिस्तीच्या कामामध्ये आघाडीवर होता. या तालुक्यातील बांध बंदिस्तीचे काम पाहण्यासाठी भारताचे पंतप्रधान श्री. पंडित जवाहरलाल नेहरू यांनी ११ एप्रिल १९६० रोजी बार्शी तालुक्यास भेट दिली होती. यावेळी त्यांनी पानगाव, राळेरास, शेळगाव व सासुरे या गावांना भेटी दिल्या. सप्टेंबर १९६० अखेर या तालुक्यातील २६,००० एकर जमिनीची बांध बंदिस्ती करण्यात आली होती. त्यावेळी शेतकरी वर्गाची व्यावसायिक संघटना स्थापन करून या बांध बंदिस्तीच्या कामास गती देण्यात आली होती. तत्कालीन बार्शी तालुक्यातील १२९ गावामध्ये शेतकरी संघ स्थापन झाले होते. यातील सभासदांची संख्या ९,१८२ इतकी होती.[११४] इ. स. १९६५-६६ मध्ये बार्शी तालुक्यातील ३३ गावामध्ये टंचाईग्रस्त परिस्थिती होती. त्यामुळे शासनाने तालुक्यामध्ये ३३ बंडकामे (दुष्काळी कामे) सुरू केली. त्यात २९५८ लोकांना रोजगार मिळाला. शिवाय शासनाने तालुक्यामध्ये या काळात १,८५,००० रू. तगाई म्हणून पैसे वितरीत केले.[११५] इ. स. १९७१-७२ मध्ये संपूर्ण तालुका दुष्काळाच्या छायेत होता. या कालावधीमध्ये तालुक्यामध्ये १६ दुष्काळी कामे हाती घेण्यात आली. यामुळे १४७३ लोकांना रोजगार मिळाला.[११६]

इ. स १९७२-७३ मध्ये सोलापूर जिल्ह्यामध्ये २,३३,००० लोक दुष्काळी कामावर काम करीत होते. या दुष्काळामध्ये सोलापूर जिल्हा परिषदेने प्रयत्नाची पराकाष्ठा करून दुष्काळी परिस्थिती निवारण्याचा प्रयत्न केला. दुष्काळी फंडातून खर्च करून नद्यांवर मातीचे कच्चे बंधारे घालुन पाणी

साठवावे. त्यामुळे नदीकाठच्या गावांना तरी पाणी मिळेल असे सहकारमहर्षी शंकरराव मोहिते पाटील यांनी सुचविले, तर एस. एच. पाटील यांनी जमिनीमध्ये किती खोलवर पाणी आहे याचे शोधन व्हावे असे सुचविले. शेतकऱ्यांना कर्ज म्हणून दिलेले बियाणे परत करण्याची शेतकऱ्यांची दुष्काळग्रस्त परिस्थितीमुळे ऐपत नसल्याने त्यातून शेतकऱ्यांना सूट देण्याची विनंती श्री पी. जे. गोमे यांनी केली होती. मजूरांना वेळेवर मजूरी मिळावी, जनावरांसाठी छावण्या काढाव्यात, भीमा नदीचे पाणी जिल्ह्यातील इतर नद्या, नाले, ओढे यात वळवावे, साखर कारखाण्याच्या ऊसातून जनावरे जगवावीत असे वसंतराव पाटील यांनी सुचविले. तर गतवर्षीप्रमाणे मजुरांना सुट्टीच्या दिवशीही पगार मिळावा असे आनंदराव देवकाते यांनी सुचविले. बोरींग व ब्लास्टींगद्वारे विहिरी खोदण्याची योजना त्वरीत अंमलात आणावी, दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांची फी माफ करावी तसेच त्यांच्या जेवणाचीही व्यवस्था करावी असे श्री. एम. एस. पाटील यांनी सुचविले. हे सर्वजण तत्कालीन जिल्हा परिषदेचे सदस्य होते. साखर कारखान्यावर येणाऱ्या प्रत्येक गाडीमागे ऊसाच्या वाड्याची एक मोळी दुष्काळग्रस्त जनावरासाठी देण्याची सूचना तत्कालीन जिल्हा परिषद अध्यक्षानी केली होती. त्यामुळे ६०,००० जनावराच्या चाऱ्याचा प्रश्न सुटला. यातील बहुसंख्य सूचनांना जिल्हा परिषदेने ठरावान्वये मान्यता दिली.[११७]

यशवंत सहकारी साखर कारखाण्याने या दुष्काळामध्ये जिल्ह्यासाठी १२ टँकर दिले. तसेच कारखाण्यात येणाऱ्या ऊसाच्या प्रत्येक गाडीमागे ऊसाच्या वाड्याच्या दोन मोळ्या शेतकऱ्यांना देण्याची योजना सुरू केली. हे कार्य संपूर्ण जिल्ह्याला अभिमानास्पद होते. इ. स. १९७२-७३ च्या दुष्काळामध्ये सोलापूर जिल्ह्यातील लोकांना काम उपलब्ध करून देण्यासाठी पंढरपूर-मंगळवेढा-तिऱ्हे-सोलापूर-बार्शी ते औरंगाबाद अशी नवी रेल्वे लाईन टाकण्याची योजना हाती घ्यावी अशी शासनाला विनंती करण्याची सूचना विजयसिंह शंकरराव मोहिते-पाटील यांनी मांडली होती. इ. स. १९७२-७३ च्या दुष्काळामुळे जिल्हा परिषदेने विहिरीमधील गाळ काढण्याची कामे सुरू करावीत. त्यामुळे विहिरींचे पाणी वाढून त्या पाण्यावर निदान वैरणीची तरी सोय होईल. शिवाय पिण्याच्या पाण्याचा प्रश्न थोडयाफार प्रमाणात कमी होईल. अशी सूचना कृषी समितीचे तत्कालीन सभापती श्री. ढवळे यांनी केली. याला सर्वानुमते मंजूरी देण्यात आली. या काळात जागतिक बँकेकडून जिल्ह्याच्या काही भागातच कर्ज वाटप सुरू होते. जर ते कर्ज वाटप संपूर्ण जिल्ह्यामध्ये झाले तर खूप फायदा होईल. तसेच १००० फुटाच्या आत दुसरी विहीर घ्यायची नाही ही अट देखील काढून टाकणे गरजेचे होते. त्यामुळे या आशयाची शिफारस महाराष्ट्र शासनाला व भूविकास बँकाना करण्याचा ठराव इ. स. १९७२ मध्ये सोलापूर जिल्हा परिषदेने मंजूर केला.[११८]

सोलापूर जिल्ह्यामध्ये नेहमीच कमी व अनियमीत पाऊस पडतो. श्री परदासनी व श्री सुखटनकर यांच्या समितीने हा जिल्हा नेहमीच दुष्काळी जिल्हा म्हणून जाहिर केला. इ. स. १९७२-७३ च्या दुष्काळाची

झळ संपूर्ण सोलापूर जिल्ह्याला बसली. दुष्काळामुळे खरीप व रब्बी या दोन्ही हंगामातील पिके गेली. या काळात जिल्हा परिषदेने लोकांना त्याच्या गावापासून ३ कि. मी. अंतराच्या आतच कामे दिली. या काळात मोठमोठ्या शेतकऱ्यांना देखील रस्त्यावर खडी फोडण्यासाठी जावे लागले. एके काळी हे काम गुन्हेगारामार्फत करून घेतले जात होते. मात्र दुष्काळामध्ये हेच काम निष्पाप जनतेला करावे लागले. या दुष्काळाच्या निमित्ताने जिल्हा परिषदेचा जनतेशी अत्यंत निकटचा व जिव्हाळयाचा संबंध आला. जिल्हा परिषदेने प्रयत्नाची पराकाष्ठा करून या दुष्काळग्रस्त जनतेची उपासमार होऊ दिली नाही. सोलापूर जिल्हा परिषदेने दुष्काळी कामाशिवाय ग्रामीण भागात पाणी पुरविण्याचे महत्वाचे कार्य केले. अवर्षणामुळे जिल्ह्यातील ४३५ खेडयांना तीव्र पाणी टंचाई जाणवत होती. त्यामुळे जिल्हा परिषदेने जुन्या विहिरीतील गाळ काढणे, ब्लास्टिंग बोरींग करणे या योजना अंमलात आणल्या. ज्या ठिकाणी या योजना अंमलात आल्या नाहीत त्या ठिकाणी टँकरने व बैलगाडीने पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केली. सामुदायिक विहिरीची योजना अमलात आणली. अनेक ठिकाणी रस्त्याची कामे करून दळणवळण सुधारले.[११९]

इ. स. १९७२-७३ च्या दुष्काळामध्ये लोकांना अन्नधान्य मिळत नव्हते. लोक सुकडी खाऊन जगत होते. रोजगार १० आणे ते १२ आणे होता. या दुष्काळामध्ये वैराग येथे चंद्रकांत नाना निंबाळकर यांनी १०,००० लोकांसह तेथील शासकीय गोडाऊनवर मोर्चा काढला. (याच काळात त्यांनी दोन वेळा बार्शीला मोर्चा नेला होता.) लोकांना काम मिळावे व धान्य मिळावे हा यामागील उद्देश होता. जिल्हाधिकाऱ्याने याची दखल घेतली नाही. त्यामुळे नानांनी त्या ठिकाणी एक सभा घेऊन गोडाऊनला घेराव घातला. जिल्हाधिकारी जोपर्यंत भेटून यासंदर्भात आश्वासन देत नाहीत तोपर्यत घेराव न उठण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर तत्कालीन तहसिलदाराने कोणतीही पूर्वसूचना न देता मोर्चावर गोळीबार सुरू केला. यामध्ये ८ जण मृत्यूमुखी पडले तर ६५ जण जखमी झाले. यावेळी नानांच्या दिशेने गोळी झाडण्यात आली मात्र सुंदराबाई या स्त्रीने नानांना कवठाळले, त्यामुळे नाना थोडक्यात बचावले. मात्र नानासाठी या स्त्रीने स्वतःचा जीव दिला. तत्कालीन डी. वाय. एस. पी. ढेबला याने या गोळीबाराचा आदेश दिला होता. [१२०]

इ. स. १९८५ मध्ये बार्शी तालुक्यात अवर्षणप्रवन परिस्थिती निर्माण झाली. त्यामुळे खास बाब म्हणून ज्याप्रमाणे कोपरगावला दुष्काळी परिस्थितीमध्ये ' ब ' वर्ग नगरपालिका असतानासुध्दा शासकीय खर्चाने तेथे पिण्याच्या पाण्याची टँकरने व्यवस्था केली होती त्याचप्रमाणे शासकीय खर्चाने बार्शीसाठी टँकर उपलब्ध करून देण्याची मागणी तत्कालीन आमदार दिलीप सोपल यांनी केली होती.[१२१]

इ. स. १९७२ च्या दुष्काळात तालुक्यामध्ये दुष्काळ निवारण्याच्या कार्यामध्ये श्री. रामचंद्रभाऊ सोमाणी यांच्या अध्यक्षतेखाली रोटरी क्लबने चांगला पुढाकार घेतला होता. याचाच एक भाग म्हणजे या

क्लबने तालुक्यातील झानपूर हे गाव दत्तक घेतले. त्यांनी व शासनाने या गावाला जीवनावश्यक वस्तूपासून ते पशुधनापर्यंतच्या केलेल्या सर्वांगीण मदतीमुळे या गावाचा कायापालट झाला. गाईंच्या संरक्षणासाठी स्थापन झालेल्या गोरक्षण मंडळाचे अध्यक्षपद भूषविले. तसेच या मंडळाला लोकाश्रय मिळवून दिला. गाईंची संख्या वाढविली. बाजार समितीतून या गाईंना धान्याचा भरडा मिळविण्याची सोय केली. या मंडळाला मिळालेल्या जमिनीमध्ये हिरवा चारा पिकवून तो पशूधनापर्यंत पोहचेल अशी व्यवस्था केली.[१२२]

सोलापूर जिल्ह्यात केंद्र पुरस्कृत १० व राज्य पुरस्कृत १ या प्रमाणे जिल्ह्यातील सर्व तालुके अवर्षणप्रवण कार्यक्रमासाठी निवडले. यासाठी इ. स. १९८६-८७ मध्ये १५६.१३ लाख रूपये आर्थिक तरतूद होती. आणि त्यांपैकी १५५.६ लाख रूपये खर्च करण्यात आला. या खर्चांपैकी सर्वात जास्त म्हणजे ४१.२५% खर्च लघुपाटबंधारे या बाबीवर झाला. या कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यामध्ये ११ लघुपाटबंधारे तलाव व ३ कोल्हापूर पद्धतीचे बंधारे यांची कामे पूर्ण करण्यात आली.[१२३]

पुढे याच कार्यक्रमांतर्गत इ. स. १९८७-८८ मध्ये १६३ लक्ष रूपयांची आर्थिक तरतूद केली. मार्च १९८८ अखेर १६४ लक्ष रू. खर्च झाले. याही वर्षी सर्वात जास्त खर्च लघुपाटबंधारे कार्यक्रमावर करण्यात आला. वृक्षसंवर्धणाच्या दृष्टीकोनातून १४६ हेक्टर क्षेत्रात वृक्ष लागवड करण्यात आली.[१२४] इ. स. १९८८-८९ मध्ये याच कार्यक्रमांतर्गत १९१ लक्ष रूपयांची तरतूद केली होती. मार्च १९८९ अखेर १९५ लक्ष रू. खर्च झाले.[१२५] इ. स. १९८९-९० या वर्षामध्ये १८९ लाख रूपयांची तरतूद केली होती. त्यापैकी मार्च १९९० अखेर १७५ लाख रूपये खर्च झाले. यामध्ये कृषी विकासावर सर्वात जास्त खर्च झाला.[१२६] इ. स. १९९०-९१ मध्ये अवर्षणप्रवण कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यामधील सर्व तालुक्यासाठी एकूण २०५.२४ लक्ष रूपयांची आर्थिक तरतूद करण्यात आली होती. मार्च १९९१ अखेर २०५.२४ लक्ष रू. खर्च झाले. दुष्काळामध्ये लोकांचे पिण्याच्या पाण्यावाचून खूप हाल होतात. यामुळे अशा समस्येवरील भविष्यकालीन उपाय या दृष्टीने सदर रक्कमेपैकी सर्वात जास्त रक्कम ग्रामीण पाणीपुरवठा कार्यक्रमावर खर्च करण्यात आली.[१२७] अशा प्रकारे सरकार व लोकसहभागातून बार्शी तालुक्यातील दुष्काळ निवारण्याचे प्रयत्न झाले.

२.९. तालुक्यातील पशुपालन

इ. स. १८७६ च्या दुष्काळामध्ये चांगल्या जनावरांची संख्या कमी झाली. सोलापूर जिल्ह्यातील बार्शी, पंढरपूर यासारख्या मोठ्या शहरांमधून प्राण्यांचा उपयोग प्रवासासाठी व ओझी वाहून नेण्यासाठी केला जात असे. त्यावेळी सर्वसामान्य खेचरांची किंमत १० ते ३० रूपये तर चांगल्या खेचराची किंमत ५० ते १०० रूपये होती. इ. स. १८८२-८३ मध्ये चांगल्या खेचराचा मासिक खर्च २ ते ८ रूपये होता, तर एका घोड्याचा वार्षिक खर्च सरासरी २३० रूपये होता. पंढरपूर येथे चैत्र, आषाढ, कार्तिक या वाऱ्याच्या वेळी

मोठ्या प्रमाणावर खेचरांची खरेदी विक्री होत असे. एका शेळीची किंमत २.५० ते ३ रूपये होती, तर झुंजीसाठी बळकट अशा एडक्याची किंमत २० रू. पर्यंत होती.[१२८]

इ. स. १९७८ च्या पशुगनणेनुसार जिल्ह्यात एकूण १४,७७,५०४ पशूधन होते. एकूण पशुधनापैकी ३१.९५% गाई बैल, ११.८४% म्हशी रेडे, ५४.८४% शेळ्या मेंढ्या व १.३७% इतर पशूधन होते. दर चौ. कि. मी. मध्ये पशुधनाची संख्या ९८ होती. इ. स. १९७२ च्या पशुगणनेशी तुलना करता १९७८ मध्ये एकूण पशुधनाच्या संख्येत १२.९५% वाढ झाली होती. तर कोंबडी व बदके यांच्या संख्येत ४९.८०% वाढ झाली होती. कुक्कुटपालनातील वाढ ही शास्त्रीय पद्धतीने जोपासना केल्यामुळे झाली.[१२९]

इ. स. १९८२-८३ अखेर बार्शी तालुक्यात १ इस्पितळ, १ दवाखाना ५ मदत केंद्र, २ डॉक्टर, ५ पर्यवेक्षक पशुवैद्यकीय सोयीसाठी उपलब्ध होते. पशुवैद्यकीय इस्पितळामध्ये ६३४४ जनावरांवर, दवाखान्यात ८३११ जनावरांवर तर मदतकेंद्रामध्ये २००४४ जनावरांवर उपचार करण्यात आला. इ. स. १९८३-८४अखेर बार्शी तालुक्यामध्ये पशुवैद्यकीय सोयीसाठी ६ मदत केंद्र व ६ पर्यवेक्षक उपलब्ध होते. यांच्या माध्यमातून एकूण ४०,६५२ जनावरावर उपचार करण्यात आले, तर ८ कृत्रिम गर्भधारणा केंद्रातून १६१७ जनावरांना कृत्रिम गर्भधारणा करण्यात आली. इ. स. १९८४-८५ मध्ये ४३५१० जनावरांवर उपचार करण्यात आले. तर ८ कृत्रिम गर्भधारणा केंद्रातून १७३३ जनावरांना कृत्रिम गर्भधारणा करण्यात आली.[१३०]

इ. स. १९८५-८६ मध्ये बार्शी तालुक्यात पशुवैद्यकीय सेवेत ३ दवाखाने, ९ मदतकेंद्रे, ३ डॉक्टर, १० पर्यवेक्षक होते. यांच्या माध्यमातून ४५,५०४ जनावरांवर उपचार करण्यात आले. बार्शी तालुक्यातील पशुवैद्यकीय सोयीमध्ये काळानुसार बरीच वाढ झालेली दिसते. सहाजिकच तालुक्यातील पशुधनही मोठ्या प्रमाणावर वाढले.[१३१] सोलापूर जिल्ह्यामध्ये सोलापूर जिल्हा दुग्ध उत्पादक संघ सोलापूर व शिवामृत दुग्ध उत्पादक संघ अकलूज या प्रमुख दोन संस्था आहेत. तसेच जिल्ह्यात एकूण ६१९ सहकारी दुग्ध संस्था होत्या. इ. स. १९८५-८६ मध्ये गायीचे ३५२.०० लाख लिटर व म्हशीचे ६०.५४ लाख लिटर दुध संकलित झाले होते. इ. स. १९८४-८५ नंतर दुग्धसंकलनात उल्लेखनीय वाढ झाली. याचे मुख्य कारण म्हणजे " दुधाचा महापूर " ही योजना होय.[१३२]

तक्ता क्र . १७

बार्शी तालुक्यातील पशुधन

वर्ष	गाई - बैल	म्हशी-रेडे	शेळ्या	मेंढ्या	घोडे-शिंगरे	इतर	एकूण पशुधन
१९६१	८१९५५	१८२२८	४४३४२	४७६८	२८७	१७३७	१५१३१७
१९६६	६७२६१	१५९९४	३४४३७	८४६१	-	३०६८	१२६२२१

१९७२	६३०१३	१५७५६	३६८८९	७४१६	-	१५३१	१२४६०५
१९७८	६३७३०	२३८७	६०७१७	७४३२	-	२४४८	१५८१७४
१९८२	६१५७९	१९२७१	५०२७०	७२५०	१३६	८४३४	१४६९४०
१९८७	५५९८६	१९६५६	६०५८६	९२६१	४२	७६३४	१५३१६५

(संदर्भ :- सामाजिक-आर्थिक विवेचन, सोलापूर जिल्हा, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई.)

१८ ऑक्टोबर १९८५ रोजी झालेल्या सोलापूर जिल्हा परिषदेच्या सभेमध्ये बार्शी तालुक्यातील पांगरी व बोरगाव येथील पशुसहाय्यक केंद्राचा दर्जा वाढविण्याचे ठरले. यासाठी ३५,००० रू. प्रमाणे जो जादा खर्च येणार होता त्यास जिल्हा परिषदेने सर्वानुमते प्रशासकीय दिली. इ. स १९८५-८६ मध्ये तालुक्यामध्ये ३५० गोबर गॅस प्लँट निश्चित केले होते. यापैकी वर्षाखेर २५५ पूर्ण झाले होते.[१३३] इ. स. १९८६-८७ मध्ये बार्शी तालुक्यातील विविध पशुवैद्यकीय संस्थांनी ७१८७५ जनावरांवर उपचार केले. तर १४१८१३ जनावरांना विविध प्रकारच्या लसी टोचल्या.[१३४]

सोलापूर जिल्ह्यामध्ये ५ दूधशीतकरण केंद्रे आहेत. ती बार्शी, सोलापूर, पंढरपूर, अकलुज आणि सांगोला या ठिकाणी असून त्यांची क्षमता ८२ हजार लिटर्स प्रतिदिन आहे. १९८७-८८ मध्ये एकूण ६५९ सरकारी दुग्ध संस्था होत्या. या वर्षात जिल्ह्यामध्ये ५०९ लक्ष लिटर्स गाईचे व २४ लक्ष लिटर्स म्हशीचे या प्रमाणे एकूण ५३३ लक्ष लिटर्स दूधाचे संकलन झाले. १९८६-८७ मधील दूधसंकलनाशी तुलना करता हे प्रमाण ४५ टक्क्यांनी जास्त आहे.[१३५]

इ. स. १९८७ च्या पशुगणनेनुसार गायी-बैल यांच्या संख्येत बार्शी तालुक्याचा सोलापूर जिल्ह्यात द्वितीय क्रमांक लागतो. इ. स. १९८८-८९ मध्ये बार्शी तालुक्यातील विविध पशुवैद्यकीय संस्थांनी ६३९१७ जनावरांवर उपचार केले. तर १४१९९६ जनावरांना लसी टोचल्या.[१३६] बार्शी तालुक्यातील विविध पशुवैद्यकीय संस्थांनी इ. स. १९८९-९० या वर्षामध्ये ६३६४४ जनावरांवर उपचार केले. तर १४१२१७ जनावरांना विविध प्रकारच्या लसी टोचल्या.[१३७] इ. स. १९९०-९१ मध्ये बार्शी तालुक्यातील विविध पशु वैद्यकीय संस्थांनी ५०२८६ जनावरांवर उपचार केले. ३४४०जनावरांना कृत्रिम गर्भधारणा केली. शिवाय १६५९३१ जनावरांना विविध प्रकारच्या लसी टोचल्या.[१३८]

थोडक्यात बार्शी तालुक्यामध्ये पशुपालानचा व्यवसाय खूप मोठ्या प्रमाणावर केला जात होता. त्यामुळेच या तालुक्यामध्ये पशुवैद्यकीय सोयीसुविधांची सातत्याने वाढ झालेली दिसून येते.

२.१०. बार्शी तालुक्यातील शेतीची अवजारे

शेतीसाठी नांगर, कुळव, बैलगाडी ही पूर्वीपासूनच अत्यावश्यक अवजारे होती. मात्र पूर्वी त्यांचे स्वरूप पारंपरिक होते. सध्याच्या आधुनिक युगात अशाच स्वरूपाची मात्र यंत्रयुक्त साधणे प्रामुख्याने वापरली जातात. बार्शी तालुक्यातील विविध कृषी अवजारांची माहिती पुढीलप्रमाणे.

तक्ता क्र . १८

बार्शी तालुक्यातील कृषि अवजारे

वर्ष	नांगर		बैलगाड्या	सिंचनासाठीचे पंप		ट्रॅक्टर्स
	लाकडी	लोखंडी		इंधन	विद्युत	
१९५१	१९०	२६२८	५३६३	-	-	१
१९५६	५०	२७९१	४१२२	१९३	३	२
१९६१	१३७	३१८९	५७१८	३९०	५	२
१९६६	११४	३०७८	५६३०	९६८	३९	४
१९७२	६३५	३८९३	६८०९	१८६३	४९०	११
१९७८	१९४	३९६८	७१७१	१९०८	२४७३	३५
१९८२	१९२	३३०५	६७१०	१४०२	३०९५	४१
१९८७	१९४	४२५९	३२८	११२९	३२३०	५४

(संदर्भ :- सामाजिक-आर्थिक विवेचन व जनगणना इ. स. १९६१, सोलापूर जिल्हा,)

पूर्वी शेतीचे स्वरूप केवळ उदरनिर्वाहासाठी असे होते. त्यामुळे अशा आधुनिक साधनांची गरज भासली नाही. आधुनिक काळामध्ये वाढत्या लोकसंख्येमुळे अन्नधान्याची मागणी वाढल्यामुळे शेतीतील उत्पादन वाढीसाठी आधुनिक पध्दतीच्या मार्गाचा किंवा साधनांचा शोध घेणे भाग पडले. यातूनच ट्रॅक्टर्स, विद्युत पंप अशा आधुनिक अवजारांचा शेतीसाठी मोठ्या प्रमाणावर वापर करण्यात येऊ लागला. अशा साधनांच्या वापरासाठी शेतकऱ्यांना शासनाकडून मदत मिळू लागली. यातून शेतकऱ्यांना शेती सुधारण्यासाठी प्रोत्साहन मिळाले. इ. स. १९७४-७५ मध्ये सोलापूर जिल्हा परिषदेने बार्शी तालुक्यासाठी शेतीसाठीची हत्यारे व अवजारे या बाबींसाठी ३०,००० रू. तरतूद केली होती.[१३९]

इ. स. १९५१ च्या गणनेप्रमाणे बार्शी तालुक्यामध्ये शेतीसाठी वापरात असणारी अवजारे ही प्रामुख्याने पारंपरिक पध्दतीची असल्याचे दिसते. पूर्वी शेतीला पाणी देण्यासाठी मोटांचा वापर केला जात होता. आधुनिक काळात याची जागा इंधनयुक्त व विद्युत पंपानी घेतली. असे असले तरी इ. स. १९७२ पर्यंत यामध्ये उल्लेखनीय असे बदल घडून आले नाहीत. मात्र इ. स. १९७२ ते इ. स. १९७८ या सहा वर्षाच्या काळामध्ये तालुक्यातील आधुनिक शेतीच्या अवजारामध्ये अमुलाग्र बदल झाले. इ. स. १९८२

नंतर बैलगाडयांची संख्या झपाट्याने कमी झाली. अशा रीतीने यातूनच पुढे हळूहळू तालुक्यातील शेतीला आधुनिक स्वरूप येऊ लागले.

२.११. पीक स्पर्धा

प्रती एकरी उत्पन्नामध्ये व पर्यायाने एकूण कृषी उत्पादनामध्ये वाढ होण्याच्या दृष्टीने शासन निरनिराळ्या पातळीवर निरनिराळ्या पिकांच्या स्पर्धा आयोजित करते. त्यांना पूरक किंवा अनुसरून जिल्हा परिषदा निरनिराळ्या पातळीवर विविध पिकांच्या स्पर्धा आयोजित करून विजेत्यांना शेतीनिष्ठ व कृषी पंडित असे पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान करतात. इतर शेतकऱ्यांनी सुधारित पद्धतीचा अवलंब करून एकूण कृषी उत्पादनामध्ये सातत्याने वाढ करण्याचा प्रयत्न करावा हा या मागील उद्देश असतो. सोलापूर जिल्हा परिषदेने जिल्हा पातळीवर घेतलेल्या या पीक स्पर्धेमध्ये सन १९७५-७६, सन १९७६-७७, सन १९७७-७८ या वर्षामध्ये बार्शी तालुक्याने निर्विवाद वर्चस्व मिळविले. रब्बी ज्वारी जिल्हा पीकस्पर्धेचे पहिले बक्षीस ७५० रू. हे बार्शी तालुक्यातील गौडगाव येथील रहिवासी श्री. श्रीपतराव गणपतराव गरड यांना सलग तीन वर्षे मिळाले. तर याच स्पर्धेचे दुसरे बक्षीस बार्शी तालुक्यातील गौडगाव येथीलच रहिवासी श्री. आगतराव आप्पा पाटील यांना रोख रक्कम रू. ५००/- सलग ३ वर्षे मिळाले. गहू जिल्हा पीकस्पर्धेचे पहिले बक्षीस रू. ७५०/- हे बार्शी तालुक्यातील गौडगाव येथील रहिवाशी श्री. विनायकराव गणपतराव गरड यांना सलग ३ वर्षे मिळाले. तर याच स्पर्धेचे दुसरे बक्षीस बार्शीचे रहिवाशी श्री. उत्तरेश्वर शंकर रूद्रके यांना सलग तीन वर्षे रोख रक्कम ५००/- सह मिळाले. बार्शी तालुक्याने हा पराक्रम करून संपूर्ण सोलापूर जिल्ह्यामध्ये कृषी विकासामध्ये आपला दबदबा निर्माण केला होता.[१४०]

इ. स. १९७९-८० मध्ये जिल्हा पातळीवर रब्बी पीक स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेमध्ये बार्शी तालुक्यातील श्री. महादेव लिंबाजी पंके रा. राळेरास व श्री. पंडीत ज्ञानेश्वर पाटील रा. कासारवाडी यांनी भाग घेतला होता. पूर्वी या पीक स्पर्धेसाठी बार्शी पंचायत समितीमध्ये १२०० रूपयांची तरतूद होती. मात्र पुढे ती ४८०० रू. करण्यात आली.[१४१]

इ. स. १९८२ पासून शासनाने गाव पातळीवर पीक स्पर्धा घेणे बंद केले. त्यामुळे या स्पर्धा तालुका पातळीवर घेण्यात येऊ लागल्या. इ. स. १९८५-८६ मध्ये बार्शी तालुक्यामध्ये विविध पिकांच्या पीक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या वर्षामध्ये बार्शी तालुक्याने जिल्हा पातळीवर १४ तर राज्यपातळीवर ४ स्पर्धक पाठविले.[१४२] अशा प्रकारे बार्शी तालुक्यातील शेतकऱ्यांनी पीकस्पर्धेच्या माध्यमातून कृषी विकासाची प्रचिती दिली.

२.१२. बार्शी पंचायत समितीचे कृषी विकासातील योगदान

इ. स. १९७३-७४ मध्ये सोलापूर जिल्हा परिषदेने बार्शी पंचायत समितीला २,०७,३९५ रूपये अनुदान दिले होते. यापैकी सर्वाधिक रक्कम पंचायत समितीने कृषी विकासावर खर्च केली.[१४३] इ. स. १९७९-८० मध्ये पंचायत समितीने शेतकऱ्यांना ७० क्विंटल मालदांडी ज्वारी बियाणे वाटप केले. बियाण्यावरील अनुदान म्हणून ९६७४ रू. वाटप करण्यात आले. [१४४]

इ. स. १९८५-८६ मध्ये तालुक्यामध्ये विशेष घटक योजनेअंतर्गत बार्शी पंचायत समितीने शेतकऱ्यांना एकूण ७०,००० रू. वाटले. गोबरगॅस, ब्लास्टिंग बोअरींग या करीता शेतकऱ्यांना सबसिडी दिली. इ. स. १९८५-८६ मध्ये मूळ अंदाजपत्रकामध्ये बोअरींग, ब्लास्टिंग यासाठी अनुक्रमे २००० रू. ची तरतूद केली होती. याचा तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांनी लाभ घेतला. यातून तालुक्यातील सिंचन क्षेत्र वाढण्यास मदत झाली.[१४५] इ. स. १९८५-८६ मध्ये तालुक्यामध्ये पंचायत समितीच्या अनुदानातून ४८ नवीन कुपनलिका झाल्या. तर २५० क्विंटल संकरीत ज्वारी बियाणे वाटप झाले. त्याची परिणिती तालुक्यातील ज्वारीच्या एकूण उत्पादनात वाढ होण्यामध्ये झाली.[१४६] इ. स. १९८९-९० मध्ये जिल्ह्यामध्ये शेती विभागावर बार्शी पंचायत समितीने सर्वाधिक खर्च केला. यावरून पंचायत समितीचे तालुक्याच्या कृषी विकासातील योगदान कळण्यास निश्चितच मदत होईल.[१४७]

अशा प्रकारे बार्शी पंचायत समितीने तालुक्यातील कृषीच्या विविध गरजा आपल्या माध्यमातून पूर्ण करण्याचा प्रयत्न करून तालुक्यातील कृषी विकासाला भरीव चालना दिली.

संदर्भ साधने

१) देशपांडे. स. ह., भारतीय शेती, फेब्रुवारी १९६२, पृ. १, २.

२) प्रा. सौ. पंडित शांता व डॉ. पाटिल लिला, कृषी अर्थशास्त्राची मूलतत्त्वे, इ. स. १९८६, पृ. १, २.

३) सोलापूर जिल्हा परिषद, रौप्य महोत्सव स्मरणिका, इ. स. १९८७, पृ. ४.

४) गोखले. आर. एम., स्वातंत्र्योत्तर भारतीय अर्थव्यवस्था, इ. स. १९७८, पृ. २८ ते ३०.

५) महाराष्ट्र स्टेट गॅझेटियर, सोलापूर जिल्हा, इ. स. १९७७, पृ. ४, ५.

६) भारताची जनगणना , जिल्हा जनगणना हस्तपुस्तिका, सोलापूर, इ. स. १९६१, पृ. ३३ .

७) सामाजिक -आर्थिक समालोचन, जिल्हा सोलापूर, इ. स. १९६८-६९ व १९६९-७०, पृ. २०, २१

८) गॅझेटियर ऑफ बॉम्बे प्रेसिडेन्सी, सोलापूर जिल्हा, इ. स. १८८४, पृ. २१९, २२१, ३९२.

९) मुंबई पुराभीलेखागार, आर. डी. फाईल नं - ९४०५ / ४९ - G .

१०) गोखले. आर. एम, पूर्वोक्त, पृ. १२४, १२७ .

११) भारताची जनगणना , जिल्हा जनगणना हस्तपुस्तिका, सोलापूर, सन १९९१, पृ. ३८, ३९, ४०.

१२) महाराष्ट्र राज्य सांखिकीय गोषवारा, २०००-२००१, पृ. २८७.

१३) महाराष्ट्र स्टेट गॅझेटियर, सोलापूर जिल्हा, इ. स. १९७७, पृ. ६८८ .

१४) गॅझेटियर ऑफ बॉम्बे प्रेसिडेन्सी, सोलापूर जिल्हा, इ. स. १८८४, पृ. ३९१.

१५) सामाजिक -आर्थिक समालोचन, जिल्हा सोलापूर, इ. स. १९५८-५९, पृ. १२,२३ .

१६) कित्ता, इ. स. १९६१-६२,पृ. १५ ,१६ .

१७) कित्ता, इ. स. १९६८-६९ व इ. स. १९६९-७०, पृ. १८, १९ .

१८) कित्ता, इ. स. १९७२-७३, पृ. २२, २४, २६.

१९) कित्ता, इ. स. १९८५-८६, पृ. ५.

२०) भारताची जनगणना , जिल्हा जनगणना हस्तपुस्तिका, सोलापूर, इ. स. १९९१, पृ. ४०, ८७ .

२१) गॅझेटियर ऑफ बॉम्बे प्रेसिडेन्सी, सोलापूर जिल्हा, इ. स. १८८४, पृ. ३२०, ३२१, ३५०.

२२) महाराष्ट्र स्टेट गॅझेटियर, सोलापूर जिल्हा, स. न १९७७, पृ. ६८८.

२३) कृषी उत्पन्न बाजार समिती बार्शी, वार्षिक अहवाल, इ. स. १९५९-६०, पृ. ५, ६

२४) भारताची जनगणना , जिल्हा जनगणना हस्तपुस्तिका, सोलापूर, इ. स. १९६१, पृ. ३९, ४०.

२५) कित्ता, पृ.२०८, २१०.

२६) सामाजिक -आर्थिक समालोचन, जिल्हा सोलापूर, इ. स. १९६१-६२, पृ. १७ ते २०.

२७) कित्ता, इ. स. १९७३-७४, पृ. ३३ ते ३५ .

२८) कित्ता, इ. स. १९८१-८२, पृ. ४७.

२९) वार्षिक प्रशासन अहवाल, जिल्हा परिषद सोलापूर, इ. स. १९८५-८६, प्रकरण ७, पृ. ३५, ३६.

३०) सामाजिक-आर्थिक विवेचन, सोलापूर जिल्हा, इ. स. १९८८-८९, पृ. ३४ ते ३६.

३१) महाराष्ट्र शासन कृषी खाते, कृषी अधिकारी प्रशिक्षण व भेट योजना, जिल्हा सोलापूर, पृ. १, ३.

३२) गॅझेटीयर ऑफ बॉम्बे प्रेसिडन्सी, सोलापूर जिल्हा, इ. स. १८८४, पृ. ३९२, ३९३.

३३) भारताची जनगणना , जिल्हा जनगणना हस्तपुस्तिका, सोलापूर, सन १९६१, पृ. २०३.

३४) सामाजिक -आर्थिक समालोचन, जिल्हा सोलापूर, इ. स. १९५८-५९, पृ. १४ ते २२

३५) कित्ता, इ. स. १९६१-६२, पृ. २१ ते २४.

३६) डॉ. देशमुख प्रभाकर, भारताची अर्थव्यवस्था, नोव्हेंबर १९८७, पृ. ७१, ७३.

३७) सामाजिक -आर्थिक समालोचन, जिल्हा सोलापूर, सन १९७२-७३, पृ. २८ ते ३४.

३८) कित्ता, सन १९७७-७८ व १९७८-७९, पृ. २८, ३०, ३२, ३४.

३९) कित्ता, सन १९८१-८२, पृ. २९ ते ३९ .

४०) कित्ता, सन १९८७-८८,पृ. ३१ ते ३४.

४१) वार्षिक प्रशासन अहवाल, जिल्हा परिषद सोलापूर, इ. स. १९८५-८६, प्र. ७ वे, पृ. १२ ते ३०.

४२) कित्ता, पंचायत समिती प्रकरण पहिले, पृ. ३, ४.

४३) गोखले. आर. एम., पूर्वोक्त, पृ. ५७, ५८.

४४) पहिला महाराष्ट्र वित्त आयोग अहवाल, जानेवारी १९९७, प्रकरण ७ वे , पृ. १२९.

४५) गॅझेटियर ऑफ बॉम्बे प्रेसिडेन्सी, खंड २०, सोलापूर जिल्हा, इ. स. १९८४, पृ. ६, ३४८.

४६) भारताची जनगणना , जिल्हा जनगणना हस्तपुस्तिका, सोलापूर, सन १९६१, पृ. २.

४७) गॅझेटियर ऑफ बॉम्बे प्रेसिडेन्सी, सोलापूर जिल्हा, इ. स. १९८४, पृ. ४, ३४८, ३९१, ३९२.

४८) भालेराव. श. म., भारतीय सरिताकोश, खंड-२, नोव्हेंबर २००७, पृ. १०३७, १०३८.

४९) वार्षिक प्रशासन अहवाल, जिल्हा परिषद सोलापूर, सन १९७२-७३, पृ. ९७, ९८.

५०) अर्थ संकल्प, सोलापूर जिल्हा परिषद, सोलापूर, सन १९७५-७६ पृ. २२५.

५१) कित्ता, सन १९७६-७७ पृ. १४८.

५२) क्षीरसागर. व्ही. एस., असा हा महाराष्ट्र, सन २००२, पृ. ३९६, ३९७.

५३) घाणेगांवकर सो. म., बार्शी तालुक्याची विकासगाथा इ. स. १९८५ पासून, १६ ऑगष्ट २००८, पृ. १८, १०१.

५४) भारताची जनगणना , जिल्हा जनगणना हस्तपुस्तिका, सोलापूर, सन १९६१, पृ. ३९, ४०, २०८.

५५) सामाजिक -आर्थिक समालोचन, जिल्हा सोलापूर, इ. स. १९६१-६२, पृ. १७ ते २०.

५६) भारताची जनगणना , जिल्हा जनगणना हस्तपुस्तिका, सोलापूर, सन १९८१, पृ. ४४ ते ४७.

५७) कित्ता, सन १९९१, पृ. ४८, ४९.

५८) गोखले. आर. एम., पूर्वोक्त, पृ. ५८, ५९.

५९) गॅझेटियर ऑफ बॉम्बे प्रेसिडेन्सी, सोलापूर जिल्हा, इ. स. १९८४, पृ. ३४८, ३५०.

६०) महाराष्ट्र स्टेट गॅझेटियर, सोलापूर जिल्हा, इ. स. १९७७, पृ. ९.

६१) भारताची जनगणना , जिल्हा जनगणना हस्तपुस्तिका, सोलापूर, इ. स. १९६१, पृ. २०८.

६२) सामाजिक -आर्थिक समालोचन, जिल्हा सोलापूर, इ. स. १९६१-६२, पृ. १७ ते २०.

६३) वार्षिक प्रशासन अहवाल, जिल्हा परिषद सोलापूर, इ. स. १९७२-७३, पृ. ७८, ८२.

६४) घाणेगांवकर सो. म., पूर्वोक्त, पृ. २५, २६.

६५) भारताची जनगणना , जिल्हा जनगणना हस्तपुस्तिका, सोलापूर, इ. स. १९९१, पृ. ४८, ४९.

६६) महाराष्ट्र स्टेट गॅझेटियर, सोलापूर जिल्हा, इ. स. १९७७, पृ. ९.

६७) सामाजिक -आर्थिक समालोचन, जिल्हा सोलापूर, इ. स. १९५८-५९, पृ. ८०.

६८) कित्ता, इ. स. १९६८-६९ व १९६९-७०, पृ. ३२,३३

६९) कित्ता, इ. स. १९७१-७२, पृ. २५.

७०) कित्ता, सन-१९७५-७६, पृ. ३३, ३५, ३६.

७१) अर्थ संकल्प, सोलापूर जिल्हा परिषद, इ. स. १९७४- ७५, पृ. २१४, २१५.

७२) कित्ता, इ. स. १९७५-७६, पृ. २२२, २२५ ते २२६.

७३) कित्ता, इ. स. १९७६-७७, पृ. १४८.

७४) सामाजिक-आर्थिक समालोचन, जि. सोलापूर, इ. स. १९७७-७८, १९७८-७९, पृ. ४८ ते ५०.

७५) कित्ता, इ. स. १९८१-८२, पृ. ४९ ते ५३

७६) कित्ता, इ. स. १९८२-८३ व १९८३-८४, पृ. ६२.

७७) कित्ता, इ. स. १९८५-८६, पृ. ४४.

७८) वार्षिक प्रशासन अहवाल, सोलापूर जिल्हा परिषद, इ. स. १९८५-८६, प्रकरण पहिले.

७९) सामाजिक -आर्थिक समालोचन, जिल्हा सोलापूर, इ. स. १९८६-८७, पृ. ४०, ४१.

८०) कित्ता, इ. स. १९८७-८८, पृ. ४२ ते४५.

८१) कित्ता, इ. स. १९८८-८९, पृ. ३९, ४१, ४२.

८२) घाणेगांवकर सो. म., पूर्वोक्त, पृ. १०८, १०९.

८३) सामाजिक -आर्थिक समालोचन, जिल्हा सोलापूर, इ. स. १९९०-९१, पृ. ४९, ५०.

८४) गॅझेटियर ऑफ बॉम्बे प्रेसिडेन्सी, सोलापूर जिल्हा, सन १८८४, पृ. २२२, २२३.

८५) सामाजिक -आर्थिक समालोचन, जिल्हा सोलापूर, इ. स. १९५८-५९, पृ. ८०.

८६) घाणेगांवकर सो. म., पूर्वोक्त, पृ.११२.

८७) महाराष्ट्र स्टेट गॅझेटियर, सोलापूर जिल्हा, इ. स १९७७, पृ. ६४०.

८८) सामाजिक -आर्थिक समालोचन, जिल्हा सोलापूर, इ. स. १९७१-७२, पृ. २६, २७.

८९) कित्ता, इ. स. १९७७-७८ व १९७८-७९, पृ. ५१, ५२.

९०) कित्ता, इ. स. १९८१-८२, पृ.५४, ५५.

९१) कित्ता, इ.स. १९८२-८३, १९८३-८४ व १९८४-८५, पृ. ६५, ६६.

९२) कित्ता, इ. स १९९०-९१, पृ.५१, ५३.

९३) घाणेगांवकर सो. म., पूर्वोक्त, पृ. २३.

९४) सामाजिक -आर्थिक समालोचन, जिल्हा सोलापूर, कित्ता, इ. स १९९०-९१, पृ. ५२, ५३, ५४.

९५) घाणेगांवकर सो. म., पूर्वोक्त, पृ. १.

९६) कित्ता, पृ. ११०.

९७) कित्ता, पृ. ११३.

९८) सामाजिक -आर्थिक समालोचन, जिल्हा सोलापूर, इ. स, १९९०-९१, पृ. ५२, ५४.

९९) घाणेगांवकर सो. म, पूर्वोक्त, पृ. ६८, ११४, ११५.

१००) क्षीरसागर. व्ही. एस, असा हा महाराष्ट्र, इ. स २००२, पृ. १४३, १४४, १४५.

१०१) पहिला महाराष्ट्र वित्त आयोग अहवाल, जानेवारी १९९७,प्रकरण ७ वे, पृ. १२९.

१०२) गॅझेटियर ऑफ बॉम्बे प्रेसिडेन्सी, सोलापूर जिल्हा, इ. स १८८४, पृ. ८१, ३१८, ३१९.

१०३) महाराष्ट्र स्टेट गॅझेटियर, सोलापूर जिल्हा, पृ. ३४९, ३५२, ३९१.

१०४) भारताची जनगणना , जिल्हा जनगणना हस्तपुस्तिका, सोलापूर, इ. स १९६१, पृ. ४, ५, ९.

१०५) कित्ता, पृ. ४२, ४३, २२९.

१०६) सामाजिक -आर्थिक समालोचन, जिल्हा सोलापूर, इ. स. १९६१-६२, पृ. ७६.

१०७) कित्ता, इ. स १९७०-७१, पृ. १६५.

१०८) वार्षिक प्रशासन अहवाल, जिल्हा परिषद सोलापूर, इ. स १९७२-७३, पृ. ६६, ६७.

१०९) गॅझेटियर ऑफ बॉम्बे प्रेसिडेन्सी, सोलापूर जिल्हा, इ. स. १९८४, पृ. २१७, २३१, २३२.

११०) महाराष्ट्र स्टेट गॅझेटियर, जि. सोलापूर, इ. स. १९७७, पृ. २३३, २३४, २३७, ३१९,३२२,३२४.

१११) सामाजिक -आर्थिक समालोचन, जिल्हा सोलापूर, इ. स. १९७२-७३, पृ. ५२.

११२) कित्ता, इ. स १९७३-७४, पृ. ४४.

११३) मुलाखत, श्री. मसाजी गेनू जाधव, आगळगाव.

११४) कृषी उत्पन्न बाजार समिती बार्शी, वार्षिक अहवाल, इ. स. १९५९-६०, पृ. ६.

११५) सामाजिक -आर्थिक समालोचन, जिल्हा सोलापूर, इ. स. १९६५-६६, पृ. ४३.

११६) कित्ता, इ. स. १९७१-७२, पृ. ३२, ३४.

११७) वार्षिक प्रशासन अहवाल, जिल्हा परिषद सोलापूर, इ. स १९७२-७३, पृ. ५३ ते ५६.

११८) कित्ता, पृ. ५९, ६३, ६५, ६६.

११९) कित्ता, पृ. अ, ब.

१२०) मुलाखत, श्री. चंद्रकांत नाना निंबाळकर, मा आमदार , वैराग-मोहोळ.

१२१) घाणेगांवकर. सो. म., पूर्वोक्त, पृ. २०.

१२२) दैनिक जनता दरबार, ११ ऑगस्ट २०१०, पृ. ३.

१२३) सामाजिक -आर्थिक समालोचन, जिल्हा सोलापूर, इ. स. १९८६-८७, पृ. १७, १८.

१२४) कित्ता, इ. स. १९८७-८८, पृ. १५.

१२५) कित्ता, इ. स. १९८८-८९, पृ. १५.

१२६) कित्ता, इ. स. १९८९-९०, पृ. १५.

१२७) कित्ता, इ. स. १९९०-९१, पृ. १६.

१२८) गॅझेटियर ऑफ बॉम्बे प्रेसिडेन्सी, खंड २०, सोलापूर जिल्हा, सन १९८४, पृ. २३७.

१२९) सामाजिक -आर्थिक समालोचन, जिल्हा सोलापूर, इ. स. १९८२-८३ ते १९८४-८५, पृ. ९, १०.

१३०) कित्ता, इ. स १९८६-८७, पृ. ८६.

१३१) कित्ता, इ. स १९८५-८६, पृ. ५८, ६०.

१३२) कित्ता, इ. स १९८५-८६, पृ. ८.

१३३) वार्षिक प्रशासन अहवाल, जिल्हा परिषद सोलापूर, इ. स. १९८५-८६, प्र.७ वे, पृ. १०, ११.

१३४) सामाजिक -आर्थिक समालोचन, जिल्हा सोलापूर, इ. स. १९८६-८७, पृ. ५८, ६०.

१३५) कित्ता, इ. स. १९८७-८८, पृ. ९.

१३६) कित्ता, इ. स. १९८९-९०, पृ. ५१ ते ५४, ५७, ५९.

१३७) कित्ता, इ. स. १९८९-९०, पृ. ५७.

१३८) कित्ता, इ. स. १९९०-९१, पृ. ६९.

१३९) अर्थ संकल्प, सोलापूर जिल्हा परिषद, इ. स. १९७४-७५ पृ. १७३.

१४०) कृषी विभाग कार्यक्रम, अंदाज पत्रक, जिल्हा परिषद सोलापूर, इ. स. १९७७-७८, पृ. ७३.

१४१) कित्ता, सन १९८५-८६, प्रकरण १५ वे, पृ. ७, २०.

१४२) वार्षिक प्रशासन अहवाल, जिल्हा परिषद सोलापूर, इ. स. १९८५-८६, प्र. ७ वे, पृ. ४६, ४७.

१४३) कित्ता, इ. स. १९७२-७३, पृ. २८.

१४४) कित्ता, इ. स. १९८५-८६, प्रकरण १५ वे, पृ. ५ ते ७.

१४५) कित्ता, इ. स. १९८५-८६, प्रकरण १ ले, ४ थे व ५ वे, पृ. २, ३, ४, ५.

१४६) कित्ता, इ. स. १९८५-८६, पं. स. प्र. ७ वे, पृ. १३.

१४७) कित्ता, अर्थ विभाग, इ. स. १९८८-८९, १९८९-९०, पृ. १२.

प्रकरण तिसरे

कृषी उत्पन्न बाजार समिती, बार्शी

अ.क्र	घटक
३.१	**कृषी बाजार**
३.२	**नियंत्रित बाजार**
	३.२.१ नियंत्रित बाजाराचा पूर्वेतिहास
	३.२.२ बाजार नियंत्रणाची पूर्वतयारी
	३.२.३ बाजार आवार जाहीर करणे
	३.२.४ नियंत्रित बाजारपेठांचे उद्देश
	३.२.५ नियंत्रित बाजारपेठांचे कार्य
	३.२.६ नियंत्रित बाजारपेठांची व्याप्ती
३.३	**कृषी उत्पन्न बाजार समिती, बार्शी**
	३.३.१ प्रतिनिधी मंडळे
	३.३.२ बाजार व्यवसायी
	३.३.३ मुख्य बाजार आवार
	३.३.४ दुय्यम बाजारतळ वैराग, येडशी, कसबे तडवळे
	३.३.५ शेतमालाचे नियमन व विक्रीची पध्दत
	३.३.६ शेतमालाची प्रतवारी व तोलाई
	३.३.७ गोदामे / गोडाऊन
	३.३.८ बाजार भाव प्रसारण
	३.३.९ नियमित मालाची आवक व किंमत
	३.३.१० जनावरांचा बाजार
	३.३.११ बाजार समितीचे प्रशासन व कार्य
३.४	**बार्शी तालुक्याच्या आर्थिक विकासातील योगदान**

प्रकरण तिसरे

कृषी ऊत्पन्न बाजार समिती, बार्शी

प्रस्तावना,

शेती हा जगातील अतिप्राचीन व्यवसाय आहे. औद्योगिक क्रांतीनंतर जगातील अनेक देशांत कारखानदारी झपाट्याने वाढली, तरी पण शेती व्यवसायाचे मूलभूत महत्व कमी झाले नाही. कोणत्याही देशाची साधनसंपत्ती पाहिली असता त्यामध्ये मानवी संपत्ती नंतर भू-संपत्तीचा क्रम लागतो. जीवनोपयोगी जिनसा तसेच उद्योगधंद्यांना लागणारा कच्चा माल यांची पैदास प्रामुख्याने शेतीतच होते. हिंदुस्थानच्या अर्थव्यवस्थेमध्ये शेतीला अनन्यसाधारण असे महत्व आहे. अशा या शेतीचे बाजारविधी हे अविभाज्य अंग आहे.[१] पूर्वीच्या काळी भारतात शेतमालाच्या विक्रीसंबंधी समस्या नव्हती. आपल्या कुटुंबाला आवश्यक असणारा शेतमाल उत्पादित करण्याचे उद्दिष्ट समोर असल्याने विक्री करण्यासाठी फारच थोडा माल शिल्लक राहत असे. शिवाय वस्तुविनिमय प्रचलीत असल्यामुळे पैशाला जास्त महत्व नव्हते. शिल्लक शेतमाल साधारणत: जत्रेच्या ठिकाणी नेऊन विकण्याची पध्दत होती. अशा जत्रा नेहमीच भरत असल्यामुळे शेतमालाची विक्री करण्यासाठी विशेष उपाययोजना करण्याचा प्रश्नच नव्हता.[२] बार्शी तालुक्यामध्ये अनेक ठिकाणी यात्रा भरत असत. इ. स. १९६१ च्या दरम्यान मोठ्या स्वरूपाच्या ९ जत्रा भरायच्या [३]

शेतीमालाचे उत्पादन आणि त्याचा बाजारविधी या शेती व्यवसायाच्या दोन शाखा आहेत. केवळ शेतीमालाचे उत्पादन वाढविल्याने शेती व्यवसाय किफायतशीर होणार नाही. कारण त्यामुळे फार तर या व्यवसायाच्या एका शाखेची सुधारणा केल्यासारखे होईल. या व्यावसायाची दुसरी शाखा बाजारविधी ही खूप महत्वाची आहे. ही शाखा पिकविलेल्या शेतमालाचा मोबदला मिळवून देते. त्यामुळे या शाखेमध्ये परिवर्तन झाल्याशिवाय शेती व्यवसायाचा खऱ्या अर्थाने विकास विकास होणार नाही. यामुळेच शेतीच्या पुनर्रचनेच्या योजनेमध्ये बाजार व्यवस्थेची सुधारणा करण्याच्या कार्यक्रमांना महत्वाचे स्थान देण्यात आले. शेतीमालाच्या बाजार व्यवस्थेची व्याप्ती अत्यंत विस्तीर्ण आहे. म्हणून बाजारव्यवस्थेच्या निरनिराळ्या टप्प्यात व क्षेत्रात परिवर्तन घडवून आणण्यासाठी अनेक कार्यक्रमांची, कायद्याची व यंत्रणेची गरज भासली. शेतीमालाची बाजार व्यवस्था अत्यंत किचकट व दीर्घसूत्री आहे. त्यामानाने औद्योगिक मालाची बाजार व्यवस्था साधी सरळ आहे. शेतमाल व औद्योगिक माल यामधील फरक यास कारणीभूत आहे. औद्योगिक मालाचे उत्पादन एका केंद्रात होते तर शेतमालाचे उत्पादन विखूरलेले असते. औद्योगिक माल टिकाऊ असतो तर शेतमाल कमी अधिक प्रमाणात नाशवंत असतो. त्यामुळे शेतमालाच्या बाबतीत

उत्पादन ते विक्री हा कालखंड औद्योगिक मालापेक्षा लहान असतो. कारखानदार आपल्या मालाच्या वितरणाची व्यवस्था आपल्या सामर्थ्यानुरूप करतो. परंतू अल्प उत्पादन व मर्यादित साधनसामुग्री यामुळे शेतकऱ्याला मध्यस्थावर अवलंबून रहावे लागत असल्याने शेतमाल व औद्योगिक माल यांच्या बाजार व्यवस्थेची जडण-घडण वेगवेगळया धर्तीने झाली.[४]

३.१. कृषी बाजार

आधुनिक काळात कृषी व्यवसायामध्ये अमूलाग्र बदल घडून आलेले आहेत. पूर्वीचे शेतीचे उदरनिर्वाहासाठी उत्पादन हे स्वरूप नष्ट होऊन तिला ग्राहकाकरिता उत्पादन असे स्वरूप प्राप्त झाले आहे. पूर्वी अर्थव्यवस्थेमध्ये विनिमय केवळ नैमित्तिक होता, तो आता नित्य स्वरूपाचा झाला आहे. चलन-पैसा पध्दती अस्तित्वात आल्यामुळे तर विनिमय अधिकच सुलभ झाले आहे. दळणवळणच्या विकासामुळे विनिमयाचे क्षेत्र वाढत गेले. त्यामुळे उत्पादक व ग्राहक या दोघांचा पूर्वी जो सरळ व प्रत्यक्ष संबंध येत होता तो येईनासा झाला. त्यातूनच या विस्तीर्ण विनिमय क्षेत्रामध्ये उत्पादक व ग्राहक यांच्यात विनिमय घडवून आणण्याचे काम करणारी एक नवी व्यवस्था निर्माण झाली. या व्यवस्थेला बाजारव्यवस्था असे म्हणतात.[५]

३.२ नियंत्रित बाजार

भारतीय शेतीचे अधिक तुकडीकरण झाल्याने शेती उत्पन्न विखुरलेले असून, त्याचे प्रमाण व दर्जा यामध्ये मोठी तफावत आढळते. शिवाय शेतकऱ्यांना सततच्या कर्जबाजारीपणामुळे येईल त्या किंमतीस आपल्या शेतमालाची विक्री करणे भाग पडते. त्यामुळे मागणीत वाढ होऊन किंमती वाढेपर्यंत तो विक्रीसाठी थांबू शकत नाही. या शेतकऱ्याच्या असहाय्यतेचा फायदा व्यापारी घेतात. शिवाय वजन, मालाचा दर, इतर बेकायदेशीर पध्दतीच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे खूप शोषण होते. त्यामुळे शेतकऱ्याच्या श्रमाला न्याय मिळण्यासाठी त्याने पिकविलेल्या शेतमालाला योग्य किंमत मिळण्यासाठी नियंत्रित बाजारांची आवश्यकता भासली.[६] भारतातील शेतकरी खेडेगावामध्येच आपला शेतमाल दलालांना व व्यापाऱ्यांना विकत असल्यामुळे आणि कित्येक वेळा शेतकरी त्यांच्याकडूनच कर्ज घेत असल्यामुळे शिवाय पीक निघताच सर्वच शेतकरी मोठ्या प्रमाणात माल विकत असल्यामुळे त्यांना त्या शेतमालाची योग्य किंमत मिळत नसे. परंतू या मध्यस्थांना मात्र खूप फायदा होत असे. त्यामुळेच खऱ्या अर्थाने नियंत्रित बाजारपेठांची गरज निर्माण झाली. शेतकऱ्यांना आपला शेतमाल अयोग्य ठिकाणी, अयोग्य वेळी, कमी दराने विकावा लागतो. असे मत अखिल भारतीय ग्रामीण कर्जविषयक पाहणी समितीने व्यक्त केले. ही परिस्थिती बदलण्यासाठी सरकारने जे उपाय योजले त्यापैकी नियंत्रित बाजारपेठा हा एक महत्वाचा उपाय होय.[७]

३.२.१ नियंत्रित बाजाराचा पूर्वेतिहास

राज्य सरकारने विशिष्ट कायद्यान्वये निर्माण केलेल्या यंत्रणेमार्फत ज्या बाजारपेठांचे कामकाज चालते त्यांना नियंत्रित बाजारपेठा असे म्हणतात. तर ज्या बाजारपठांचे व्यवहार कायद्याने चालत नाहीत अशा बाजारपेठांना अनियंत्रित बाजारपेठा असे म्हणतात. स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये भारतात बहुसंख्य बाजारपेठा या अनियंत्रित स्वरूपाच्या होत्या. अशा बाजारपेठांमध्ये विक्री व्यवहारासंबंधी अनेक अनुचित पध्दती होत्या. [८] नियोजन व नियमन हे आजचे परवलीचे शब्द आहेत. कोणतेही कार्य यशस्वी होण्यासाठी या दोन सूत्रांचा अवलंब केल्याखेरीज भागत नाही. कोणतीही वाढ नियोजनबध्द व नियंत्रित असेल तरच ती निकोप असते. कृषी उत्पन्नालाही हाच न्याय लागू पडतो. [९]

भारतातील बाजार नियंत्रणाची सुरूवात फार जुनी आहे. भारतात सर्वप्रथम इ. स. १८८६ मध्ये हैद्राबाद रेसिडेन्सी आदेशान्वये विदर्भातील ' कारंजा ' येथील कापसाचा बाजार नियंत्रित केला गेला. इ. स. १८९७ मध्ये "बेरार कॉटन ग्रेन्स मार्केट लॉ " विदर्भाला लागू करण्यात आला. इ. स. १९१७ च्या " भारतीय मध्यवर्ती कापूस समितीच्या शिफारशीनुसार " इ. स. १९२७ मध्ये मुंबई प्रांतात " बॉम्बे कॉटन मार्केट ॲक्ट " अंमलात आला. मुंबई प्रांत बँकिंग चौकशी समिती १९२९-३० आणि भारतीय मध्यवर्ती चौकशी समिती या दोन समित्यांनी तत्कालीन बाजारपेठांच्या कार्यातील दोष दाखवून कृषी उत्पादनासाठी प्रमुख ठिकाणी नियंत्रित बाजारपेठांची स्थापना करण्याचे सुचविले. [१०]

इ. स. १९२८ मध्ये रॉयल कमिशन ऑन ॲग्रीकल्चरल मुळे बाजार नियंत्रणास जोरदार चालना मिळाली. पुढे कापसा व्यतिरिक्त इतर शेतमालाच्या बाजारपेठा नियंत्रित करता याव्यात म्हणून इ. स. १९३५ मध्ये मध्य प्रांतात " सेंट्रल प्रॉव्हिन्सेस ॲग्रीकल्चरल प्रोडयूस मार्केट ॲक्ट " करण्यात आला. इ. स. १९३८ मध्ये सेंट्रल मार्केटिंग डिपार्टमेंटने बाजार नियंत्रणाचे एक नमुनेदार विधेयक तयार केले. या विधेयकाच्या धर्तीवर बऱ्याच प्रांतांनी आपापली विधेयके तयार केली. मुंबई सरकारने इ. स १९३९ मध्ये " बॉम्बे ॲग्रीकल्चरल प्रोडयूस मार्केट ॲक्ट १९३९ " मंजूर केला. या कायद्यान्वये पूर्वीचा बॉम्बे कॉटन मार्केट ॲक्ट १९२७ रद्द करण्यात आला. इ. स. १९६२ अखेर हिंदुस्थानमधील १८०० घाऊक बाजारपेठांपैकी मोठ्या ७३० व छोटया १७९ बाजारपेठा नियंत्रित झाल्या होत्या. इ. स. १९३२ पासून बाजार नियंत्रणासाठी जे कायदे करण्यात आले होते ते त्या त्या परिस्थितीनुसार ठिक होते. पुढे बदलत्या परिस्थितीनुसार प्रचलित कायद्यामध्ये सुधारणा करणे आवश्यक होते. या पार्श्वभूमीवर श्री. लाड व श्री. शिरणामे समितीची नेमणूक करण्यात आली. १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाल्यानंतर राज्यातील कायद्यांचे राज्यकारभाराच्या दृष्टीने एकीकरण करण्याचे काम सूरू झाले व त्यानुसार राज्यातील वेगवेगळया मार्केट

कायदयाचे एकत्रिकरण करून महाराष्ट्रासाठी एकच कायदा विधेयक रूपात इ. स. १९६३ मध्ये प्रसिध्द करण्यात आला. कायदेमंडळाच्या सर्व चाकोरीतून जाऊन ५ मे १९६४ रोजी त्याला कायद्याचे स्वरूप देण्यात आले व २५ मे १९६७ रोजी त्याची अंमलबजावनी सुरू झाली.

३.२.२ बाजार नियंत्रणाची पूर्वतयारी

बाजार नियंत्रणाचा कायदा मंजूर केला म्हणजे सर्व बाजारपेठा नियंत्रित झाल्या असे होत नाही.विशिष्ट बाजारपेठेला सरकारने कायदा लागू केल्याचे जाहीर केल्यानंतर ती बाजारपेठ कायद्याने नियंत्रित होते. सरकारने एखादी बाजापेठ नियंत्रित करण्याचे ठरविल्यानंतर सरकार प्रथम आपला मनोदय जाहीर करते. बाजार नियंत्रणाबाबतच्या जनतेच्या काही हरकती व सूचना असतील त्या ठराविक तारखेपर्यंत मांडण्याची संधी देते.[११] त्यानंतर येतील त्या हरकती व सूचना यांचा विचार केल्यानंतर आवश्यक ती चौकशी करून राज्य शासन सरकारी गॅझेटमध्ये अधिसूचना प्रसिध्द करते. अशी अधिसूचना सदरहू क्षेत्रातील प्रादेशिक भाषेतून किंवा राज्य सरकारास योग्य वाटेल अशा रीतीने प्रसिध्द करण्याचा अधिकार राज्य सरकारास आहे. मात्र संबंधित नगरपालिकेच्या सल्ल्याशिवाय नगरपालिकेच्या हद्दीमधील कोणताही प्रदेश अशा अधिसूचनेत समाविष्ट करता येत नाही. यानंतर राज्य सरकार १९३९ च्या मुंबई शेती उत्पन्न कायद्याच्या कलम ३ अन्वये अधिसूचनेत निर्दिष्ट केलेले क्षेत्र मार्केटचे क्षेत्र म्हणून जाहीर करते.[१२]

मराठवाडा व विदर्भ विभागात प्रचलित असलेल्या हैद्राबाद व मध्य प्रदेश कायद्यान्वये सरकारवर अशा रीतीने मनोदय जाहीर करण्याचे बंधन नाही. मात्र मुंबई कायद्याप्रमाणे नगरपालिकेच्या कक्षेतील क्षेत्र त्या संस्थेशी विचारविनिमय केल्याशिवाय बाजारपेठ नियंत्रित करता येत नाही.

३.२.३ बाजार आवार जाहीर करणे

प्रत्येक मार्केट क्षेत्रासाठी एक मार्केट आवार व आवश्यक असतील त्याप्रमाणे एक अथवा अनेक दुय्यम आवार असतील. राज्य सरकारास सरकारी गॅझेटमध्ये अधिसूचना प्रसिध्द करून कोणत्याही मार्केटच्या क्षेत्रासाठी सदरहू क्षेत्रातील मुख्य विभाग मुख्य मार्केट आवार म्हणून आणि इतर विभाग त्या क्षेत्रासाठी दुय्यम मार्केट आवार म्हणून जाहीर करण्याचा अधिकार आहे. बाजार समितीच्या नियंत्रणाचे क्षेत्र कायम करणे हा बाजार क्षेत्राचा जाहिरनामा काढण्यामागील उद्देश असतो. ज्या क्षेत्रातून स्वाभाविकरित्या व भरपूर प्रमाणात विकाऊ शेतमाल येतो असे क्षेत्र बाजारक्षेत्र म्हणून जाहीर केले जाते. शिवाय अन्य खाजगी व्यक्ती अथवा स्थानिक संस्था यांना त्या क्षेत्रात बाजार स्थापन करता येऊ नये हा यामागील खरा उद्देश असतो. पश्चिम महाराष्ट्रात बाजारक्षेत्र सामान्यत: एक किंवा दोन तालुक्याचे असते. मराठवाड्यामध्ये

बाजारापासून ५ किंवा १० मैल त्रिज्येतील क्षेत्र हे बाजार क्षेत्र असते. मद्रास राज्यात बाजार क्षेत्राचा विस्तार हा एका जिल्ह्याच्या सरहद्दीपर्यंत असतो. विदर्भात हैद्राबादप्रमाणेच बाजार केंद्रापासून ठराविक त्रिज्येत येणारे क्षेत्र हे बाजार क्षेत्र असते. यावरून असे दिसून येते की, बाजारक्षेत्र किती असावे याविषयी एक ठराविक पध्दत नाही. बाजार क्षेत्राच्या या विविध पध्दतीत अनेक गुण-दोष आहेत. त्यामुळे बाजार-पेठेच्या सर्वांगिण विकासास केंद्रभूत मानून बाजारक्षेत्र निश्चित करणे आवश्यक ठरते. [१३]

३. २. ४ नियंत्रित बाजारपेठांचे उद्देश

१) बाजारपेठांतील अयोग्य पध्दती बंद करणे.

२) बाजारपेठांमध्ये शेतकऱ्यांना जी निरनिराळी देणी द्यावी लागतात ती निश्चित करून त्याचा विक्रीसाठी होणारा खर्च कमी करणे.

३) शेतकऱ्यांना त्याच्या शेतमालाची योग्य किंमत मिळवून देण्याचा प्रयत्न करणे.

४) बाजारपेठेमध्ये स्पर्धा निर्माण होऊन शेतकऱ्यांची उत्पादन क्षमता वाढविण्याचा प्रयत्न करणे.

५) शेतकऱ्याची फसवणूक न होऊ देणे.

३.२.५ नियंत्रित बाजारपेठांचे कार्य

ॲग्रिकल्चरल कमिशनच्या सूचनेवरून अनेक राज्यांमध्ये कायदे करून बाजारपेठा नियंत्रित करण्यात आल्या. इ. स. १९३५ मध्ये स्थापन झालेले "डायरेक्टोरेट ऑफ मार्केटिंग अँड इन्स्पेक्शन मंडळ" हे राज्य सरकारांना बाजारपेठांवरील नियंत्रणविषयक कायदे करणे व त्याची अंमलबजावणी करणे यासंदर्भात मार्गदर्शन करते. बाजारपेठेतील पध्दती आणि व्यवहार नियंत्रित करण्याच्या दृष्टीने ॲग्रिकल्चरल प्रोडयूस मार्केट ॲक्ट मान्य करण्यात आला. या कायद्यान्वये राज्य सरकारला बाजारपेठेत एक बाजार समिती स्थापन करता येते. या बाजार समित्यांची प्रमुख कामे खालीलप्रमाणे

१) बाजारात प्रमाणभूत मानलेली वजने आणि मापेच वापरली जातील हे पाहणे.

२) बाजारपेठेतील खरेदी-विक्रीच्या पध्दती आणि संकेत निश्चितपणे ठरवून देणे.

३) विक्रेत्याला जी निरनिराळी देणी द्यावी लागतात ती ठरवून देऊन त्यावर नियंत्रण ठेवणे.

४) एकाच व्यक्तीकडून खरेदीदार व विक्रेते हया दोहोंचे प्रतिनिधित्व केले जाणार नाही हे पाहणे.

५) वाद निर्माण झाल्यास मध्यस्थी करून तो मिटविणे.

६) दलाल व वजन करणारे लोक यांना परवाने देणे.

७) बाजार समितीच्या कायद्याच्या विरूध्द वर्तन करणाऱ्यांचा परवाना रद्द करणे

३.२.६. नियंत्रित बाजारपेठांची व्याप्ती

इ. स. १९५०-५१ पूर्वीच तत्कालीन मुंबई, मद्रास, म्हैसूर, मध्य प्रांत, पंजाब या राज्यांनी नियंत्रित बाजारपेठांच्या संदर्भात कायदे केले होते. सध्या नियंत्रित बाजारपेठांच्या विकासासाठी अनुदानाच्या स्वरूपात अर्थसहाय्य करण्यास भारत सरकारने मान्यता दिली.

३१ मार्च १९७४ पर्यंत भारत सरकारने तांदूळ, गहू, ताग, बाजरी या वस्तुंच्या ४८ नियंत्रित बाजारपेठांच्या विकासासाठी १ कोटी रू. अनुदान म्हणून दिले होते. पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या सुरूवातीला भारतात केवळ २६५ बाजारपेठा नियंत्रित होत्या. इ. स. १९६१ मध्ये ही संख्या १००० पर्यत वाढली. तर १९६९ मध्ये ही संख्या १८४० इतकी झाली. भारतातील एकूण ३४०६ प्रमुख बाजारपेठांपैकी २०७० बाजारपेठा मार्च १९७० पर्यंत नियंत्रित झाल्या. सप्टेंबर १९७१ मध्ये ही संख्या २३५६ इतकी झाली. पुढे ही पंचवार्षिक योजनेच्या माध्यमातून हे काम चालूच होते. [१४]

३.३. कृषी ऊत्पन्न बाजार समिती बार्शी


नियमित बाजारपेठांच्या अभावामुळे शेतकऱ्यांच्या होणाऱ्या नुकसानीकडे तत्कालीन ब्रिटिश राज्यकर्त्यांचे लक्ष वेधण्यात येऊन काही हालचालींना प्रारंभ झाला. याला स्वातंत्र्यप्राप्तीनंतर खरी गती मिळाली. इ. स. १९४७ नंतर भारत सरकारने या गैरप्रकाराकडे जाणीवपूर्वक लक्ष देऊन ठोक बाजारपेठेतून बाजार समित्यांची स्थापना केली व त्यांच्या कार्याचे स्वरूप विक्रेत्याभिमुख ठेवले.[१५]

बार्शी तालुक्यास दि. १ जुलै १९४७ पासून मार्केट ॲक्ट लागू करण्यात आला. दि. १७ जानेवारी १९४८ पासून प्रथम सरकार नियुक्त बाजार समिती अस्तित्वात आली. दि. ३ मार्च १९४८ रोजी पहिल्या सरकारनियुक्त समितीची सभा होऊन कै. श्री. गणपत रामलिंगअप्पा उर्फ काकासाहेब झाडबुके यांची सभापती म्हणून बिनविरोध निवड झाली. मार्केट ॲक्टच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीकरिता बाजार समितीच्या दि. ४ जानेवारी १९४८ च्या सभेत उपविधी तयार करण्यात आले. त्यानुसार बाजार समितीचे प्रत्यक्ष कामकाज दि. १५ नोव्हेंबर १९४९ पासून अंमलात आले.[१६]

बार्शी हे महाराष्ट्रातील एक सर्वोत्तम असे बाजार क्षेत्र आहे. शेतमालाच्या व्यापाराच्या संदर्भात बार्शीला मराठवाड्याचे प्रवेशव्दार म्हणतात. या बाजारपेठेमध्ये शेतमालाची प्रचंड आवक होते. दळणवळणाच्या सोयीमुळे शेतकरी व व्यापारी यांच्यासाठी ही बाजारपेठ महत्वाची मानली जाते. संपूर्ण बार्शी तालुका हे या बाजार समितीचे कार्यक्षेत्र आहे.[१७]

नकाशा क्र . ९

कृषी उत्पन्न बाजार समिती बार्शी मुख्य आवाराचा नकाशा.



(संदर्भ : स्मृतिगंध स्मरणिका, कृषी उत्पन्न बाजार समिती बार्शी, ७ जुलै १९७६)

३.३.१ प्रतिनिधी मंडळे

बार्शी बाजार समिती क्षेत्राकरिता १७ जानेवारी १९४८ रोजी सरकारने पहिली बाजार समिती नियुक्त केली. या सभासद मंडळाची पहिली सभा दिनांक ३ मार्च १९४८ रोजी भरून दिनांक ७ नोव्हेंबर १९४९ रोजी प्रत्यक्ष कामकाजास सुरूवात झाली. या सरकारनियुक्त मंडळाची मुदत संपल्यानंतर दिनांक २६ जून १९५० रोजी पहिली निवडणूक होऊन दिनांक १५ मे १९५१ रोजी लोकनियुक्त मंडळ अस्तित्वात आले. या मंडळाची मुदत १६ मे १९५४ रोजी संपली. [१८]

मार्केट कमिटीचे कामकाज सुव्यवस्थित चालावे म्हणून ही प्रतिनिधी मंडळे नियुक्त केलेली असतात. असे असले तरी या प्रतिनिधी मंडळातील निवडून आलेल्या अथवा नियुक्त केलेल्या कोणत्याही सभासदास काढून टाकण्याची शिफारस प्रांतिक सरकारकडे करण्याचा अधिकार मार्केट कमिटीला आहे. त्यासाठी पुढील बाबी जबाबदार ठरतात. **१)** आपले कर्तव्य पार पाडण्यामध्ये असमर्थ ठरल्यास. **२)** एखाद्या कोर्टाने ६ महिन्यापेक्षा जास्त कैदेची शिक्षा दिली असल्यास. **३)** कर्जातून मुक्त न झालेला नादार इसम असल्यास. **४)** मार्केट कमिटीच्या सभेस सतत ३ महिने गैरहजर राहिला असल्यास. अशा प्रकारच्या सभासदास काढून टाकण्याची शिफारस मार्केट कमिटीने कलेक्टर मार्फत केली पाहिजे. शिवाय कोणत्याही सभासदास काढून टाकण्याची शिफारस करणारा ठराव पास करण्यापूर्वी सदर सभासदाला, अशी शिफारस का करण्यात येऊ नये याचे कारण दर्शविण्याची संधी दिली पाहिजे. [१९]

महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यानंतर राज्यातील सर्व मार्केट कायद्यांचे एकत्रिकरण करून महाराष्ट्रासाठी एकच कायदा करण्यात आला. २५ मे १९६७ रोजी त्याची अंमलबजावणी सुरू झाली. पूर्वीच्या कायद्यान्वये बाजार समितीवर नेमलेल्या सभासदाची मूदत २ वर्षे होती. पुढे राज्य सरकारने आपले अधिकार वापरून ही मुदत १ वर्षाने वाढविली. त्या मुदतीत बाजार समितीच्या नव्या निवडणुका न झाल्यामुळे इ. स. १९७० साली एक वटहुकूम काढून ही मुदत आणखी एक वर्षाने वाढविली.[२०]

बार्शी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या प्रतिनिधी मंडळाने सातत्याने उत्तम कारभार करून मार्केट कमिटीच्या माध्यमातून तालुक्याच्या आर्थिक विकासाला हातभार लावला आहे.

३.३.२ बाजार व्यवसायी

मुंबई अधिनियम १९५३ नुसार मार्केट स्थापन करण्यात आल्यानंतर मार्केट कमिटीने नियमाप्रमाणे व्यापारी, कमिशन एजंट, दलाल, वजन करणारे मापाडे, सर्व्हेअर, वखारवाले आणि इतर संबंधित लोकांना बाजार आवारामध्ये व्यवहार करण्याचे परवाने दिले गेले.[२१] या परवान्यासाठी सदर व्यक्तीने मार्केट कमिटीने ठरविलेल्या नमुन्यात अर्ज व त्यासोबत आवश्यक ती संपूर्ण फी दिली पाहिजे. मार्केट कमिटीने सदर व्यक्तीला परवाना देण्याचे निश्चित केल्यानंतर संबंधित व्यक्तीने मार्केट कमिटीने सांगितल्याप्रमाणे कबुलायतीच्या संबंधातील सर्व रीतसर बाबी पूर्ण झाल्यानंतर मार्केट कमिटी सदर अर्जदाराला परवाना देते. सदर परवान्याची मुदत १ सप्टेंबर ते ३१ ऑगस्ट पर्यंत असते. त्यानंतर परवाना धारकांनी आपल्या परवान्याचे रीतसर फी भरून नुतनीकरण करून घेणे आवश्यक असते. परवानाधारकांनी भरलेली फी कोणत्याही कारणास्तव परत मिळत नाही. परवाना दिलेल्या व्यापाऱ्यांचे तीन वर्ग असतात.' अ ' वर्गाचे व्यापारी, ' ब ' वर्गाचे व्यापारी व ' किरकोळ' व्यापारी. ' अ ' वर्ग व्यापाराचा परवाना धारण करणाऱ्यास मार्केटच्या क्षेत्रात कोठेही शेतीचे उत्पादन खरेदी-विक्री करण्याचा अधिकार असतो. ' ब ' वर्ग व्यापाराचा परवाना धारण करणाऱ्यास मार्केटच्या बाहेरील क्षेत्रात शेतीचे उत्पादन खरेदी करण्याचा व ते मार्केटच्या क्षेत्रात विकण्याचा अधिकार असतो. तर ' किरकोळ ' व्यापाराचा परवाना धारण करणारे हे किरकोळ व्यापारी असतात. मार्केटच्या क्षेत्रातील किरकोळ व्यापाऱ्यांचा व्यवहार हा मार्केट कमिटीने या संदर्भात वेळोवेळी ठरविलेल्या आणि जिल्हाधिकारी मान्यता देईल अशा अटींना पात्र असतो. शिवाय व्यापाराचा परवाना धारण करणाऱ्या कोणत्याही जनरल कमिशन एजंटने ज्या शेतीच्या मालाच्या संदर्भात तो विकणाऱ्याच्या वतीने काम करीत असेल असा कोणताही माल स्वतःच्या नावाने अथवा इतराच्या भागिदारीत खरेदी करता कामा नये. असे आढळल्यास संबंधितांचा परवाना ताबडतोब रद्द होऊ शकतो.[२२]

खरेदीविक्रीच्या उलाढालीमध्ये विक्रीदार व खरेदीदार हे जरी दोन प्रमुख पक्ष असले तरी ही उलाढाल पूर्ण करण्याकरीता त्या दोघांना इतर अनेक व्यवसायींची मदत घ्यावी लागते. त्या प्रत्येकाजवळ असलेल्या कौशल्याचा उपयोग बाजारातील उलाढालीमध्ये होतो. बाजार व्यवसायींच्या सांघिक कार्यामुळेच बाजापेठेतील व्यवहार योग्यरित्या पार पडू शकतात. अशा या बाजार व्यवसायींची माहिती खालीलप्रमाणे.

१) अडत्या :- मोठ्या बाजारपेठेमध्ये अडत्याचे कच्चे व पक्के असे दोन वर्ग आढळून येतात. कच्चा अडत्या केवळ शेतकऱ्याच्या वतीने काम करतो. तर पक्का अडत्या हा कारखनदार, निर्यातदार, घाऊक व्यापारी यांच्या वतीने काम करतो. अडत्या म्हणजे जी दुसऱ्या व्यक्तीकरिता स्वत: कृषी उत्पन्नाची खरेदी किंवा विक्री करते. असे उत्पन्न आपल्या ताब्यात ठेवते आणि त्याची विक्री अथवा खरेदी होत असताना त्यावर नियंत्रण ठेवते. खरेदीदारांकडून रक्कम वसूल करून ती विक्रेत्यास देते. आणि त्या मोबदल्यात परिश्रम म्हणून जिला अशा प्रत्येक व्यवहारातील रकमेवर अडत (रक्कम) मिळते अशी व्यक्ती होय.[२३]

२) दलाल :- विक्रेते व ग्राहक यांना एकत्र आणण्याचे कार्य दलाल करीत असतो. घाऊक बाजारात दलाल हे कच्च्या अडत्याच्या वतीने काम करतात. शेतकऱ्यांनी आपला माल बाजारात आणल्यानंतर ते शेतकऱ्यांशी संपर्क साधतात.

४) तोलार :- घाऊक बाजारात विक्रीसाठी आलेल्या मालाचे व्यवस्थित माप करण्याकरीता अडत्यांनी किंवा बाजार समितीने नेमलेल्या व्यक्तींना तोलार (मापारी) असे म्हणतात.

५) हमाल :- गाडीमधून माल उतरविणे, माल स्वच्छ करणे अशी शारीरिक स्वरूपाची कामे करणाऱ्या व्यक्तींना हमाल (पल्लेदार) असे म्हणतात. [२४]

६) खरेदीदार :- बाजार व्यवसायींमध्ये हा सर्वात महत्वाचा घटक आहे. वेगवेगळया उद्देशाने खरेदीदार माल खरेदी करतात. आयात-निर्यातदार, कारखानदार, घाऊक व्यापारी वगैरे लोक यामध्ये येतात.

७) प्रक्रिया कारखानदार :- काही शेतमाल प्रक्रियाक्षम असतो. त्यामुळे शेतमालावर प्रक्रिया करणे हा एक स्वतंत्र व्यवसाय बनला आहे. प्रक्रिया कारखाने बाजारपेठेतच किंवा तिच्या आसपास असतात.

८) वखारप्रमुख :- राज्य सरकारच्या वखार कायद्याखाली परवाने घेऊन बाजारपेठेत वखारी चालविण्यात येतात. अशा परवानाधारक वखारीच्या प्रमुखाला वखारप्रमुख म्हणतात.

९) सर्व्हेअर :- दर्जानुसार शेतमालाचे वर्ग पाडण्याचे काम सर्व्हेअर करतात. सर्वसामान्य बाजापेठेमध्ये हा वर्ग अस्तित्वात नाही. केवळ विनिमय केंद्रातच तो आढळून येतो. [२५]

३.३.३ मुख्य बाजार आवार, बार्शी

आधुनिक प्रकारच्या नियंत्रित बाजारपेठांचे बांधकाम " इंडियन स्टँण्डर्ड इन्स्टिटयूट " या संस्थेने निश्चित केलेल्या बांधकाम आराखड्यानुसार केले जाते. अशा बाजारपेठा दोन ते दहा एकरापर्यंत विस्तृत क्षेत्रात वसविल्या जातात. या बाजारपेठांचा आकार आयताकृती ठेवलेला असतो. त्यात ओळीने व्यापाऱ्यांची दुकाने असतात. या ठिकाणी विक्रीसाठी आलेला कृषीमाल उतरविण्यासाठी, त्याची मांडणी करण्यासाठी तसेच त्या मालाचा लिलाव करण्यासाठी प्रशस्त आवार ठेवण्यात आलेले असते. या बाजार आवारात किंवा त्याच्या जवळच लोकांच्या संख्येचा विचार करून शेतकऱ्यांच्या वाहणांसाठी मैदान, उपहारगृहे, स्वच्छतागृहे या सोयी समितीच्या भावी विस्ताराचा विचार करून केल्या जातात. बाजारआवार म्हणजे नियंत्रित बाजारपेठेचा प्राण होय. कारण बाजार नियंत्रणाचे यश-अपयश मुख्यत्वे बाजारतळावर अवलंबून असते. बाजार समितीची बाजारतळावर दैनंदिन देखरेख असते. बाजारातील विविध उलाढाली बाजारतळावर केंद्रीत झालेल्या असतात. बाजारतळावर आवश्यक त्या सर्व सोयी-सुविधा बाजार समितीने उपलब्ध करून देणे आवश्यक असते.[२६]

बार्शी - लातूर रस्त्यावरील बाजार समितीच्या मालकीच्या जागेमध्ये नवीन बाजार आवार बांधले जाणार होते. या जागेचे एकूण क्षेत्र ३५ एकर ४ गुंठे इतके होते. या नवीन बार्शी मुख्य बाजार आवाराचा आराखडा कोल्हापूरचे इंजिनियर श्री. आर. एस. बेरी यांनी तयार केला होता. दिनांक २८ नोव्हेंबर १९५४ रोजी नवीन बाजार आवाराच्या बांधकामाचा पायाभरणी समारंभ तत्कालीन कृषी व महसूल मंत्री भाऊसाहेब हिरे यांचे शुभहस्ते करण्यात आला. या प्रसंगी तत्कालीन राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद, कृषी मंत्री डॉ. पंजाबराव देशमुख, यांचे शुभसंदेश आले होते.[२७]

पुढे नियोजित मार्केट यार्डची जागा शहरापासून दूर, असुरक्षित व गैरसोयीची आहे अशी व्यापारी वर्गाने तक्रार केली. याचा विचार करण्यासाठी एक समिती नेमण्यात आली. पुढे या समितीच्या अहवालावरून बाजार समितीने रेल्वे स्थानक, एस. टी. स्टँड व शहराच्या जवळ असलेली १७ हेक्टर क्षेत्रफळ असलेली जागा मुख्य बाजारासाठी बाजार आवार म्हणून घोषित केली. सदर जागेची किंमत म्हणून १८,६२८.५० रू ४ डिसेंबर १९५९ रोजी बार्शी ट्रेझरी मध्ये भरण्यात आले. त्यामुळे बाजार समितीच्या जागेचा प्रश्न कायमचा निकालात निघाला. या बाजार आवारामध्ये बाजार समितीने विविध सुखसोयीकरीता ११ लाखाची बांधकामे केली. यासाठी महाराष्ट्र शासनाकडून ६,५५,००० रू. कर्ज घेतले होते.[२८] मुख्य बाजार आवारामध्ये आडत बाजार हलविण्याच्या दृष्टीने बाजार समितीने बाजार आवारात प्लॉट्स पाडून इ. स. १९६५-६६ मध्ये सदर जागेचा भाडेपट्टा रजिस्टर करून घेतला. जनरल कमिशन एजंट यांना शेतमाल

विक्रीकरीता गैरसोय होऊ नये म्हणून मार्केट कमिटीने इ. स. १९६५-६६ मध्ये जनरल कमिशन एजंटच्या दुकानासमोर प्लॅटफॉर्म बांधले. या कामाकरिता बाजार समितीला १५,७७६.७३ रू. इतका खर्च आला. मुख्य बाजार आवारामध्ये आडत बाजार हालविण्याच्या दृष्टीने बाजार समितीने प्रवेशद्वार बांधणीचे काम इ. स. १९६४-६५ मध्ये हाती घेतले होते. हे काम इ. स. १९६५-६६ मध्ये पूर्ण झाले. या कामावर बाजार समितीने १५,५९१.६६ रू. खर्च केला.[२९]

तक्ता क्र . १९

बार्शी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या परवाना धारकांची माहिती

अनुज्ञप्ती प्रकार	व्यवहाराची व्याप्ती	वार्षिक परवाना फी	नुतनीकरण फी	परवाना धारक
वर्ग २ आडत्या(अ) प्र १	कितीही रकमेची खरेदी-विक्री करणारे	२००	२००	३३४
वर्ग २ आडत्या(ब) प्र २		२००	२००	०४
वर्ग १ व्यापार (अ) प्र२		२००	२००	३२२
वर्ग १ व्यापार (ब) प्र२		१००	१००	-
वर्ग १ व्यापार (क) प्र२	दैनिक रू १५००/- चा व्यापार करणारे	१००	१००	३९
वर्ग १ व्यापार (ड) प्र२		१००	१००	-
वर्ग १ व्यापार (ई) प्र२		६०	६०	११
वर्ग १ व्यापार (फ) प्र२		२०	२०	०७
वर्ग १ व्यापार (ग) प्र२		२०	२०	३७५
वर्ग ३ दलाल		२००	२००	०२
वर्ग ४ प्रक्रिया		६०	६०	२९
वर्ग ५ तोलार		२०	२०	८८
वर्ग ६ वखारवाले		२०	२०	०१
वर्ग ८ मदतनीस		०४	०४	२२३
वर्ग ९ बैलगाडीवान		१०	१०	५७
वर्ग १० हमाल		१०	१०	५६५
वर्ग १३ आडत्या फळे-भाजीपाला		२००	२००	४४
वर्ग १४ व्यापारी फळे..		२००	२००	३५
वर्ग १७ वारणी कामगार		१०	१०	३८

(संदर्भ :कृषी ऊत्पन्न बाजार समिती बार्शी ,वार्षिक अहवाल - सन २००२-०३)

७ जून १९६४ रोजी या बार्शी मुख्य बाजार आवाराला पंडित जवाहरलाल नेहरू मार्केट यार्ड असे नामकरण करण्यात आले. इ. स. १९६६-६७ पर्यंत या बाजार आवारामध्ये बांधकामासाठी खालीलप्रमाणे खर्च करण्यात आला.[३०]

१.	बाजार आवाराला तारेचे कुंपन	२७,१३१-३४
२.	मुख्य रस्ते	९३,५३१-६६
३.	जनावर बाजार मैदान	८,१७४-७७
४.	उघड लिलाव मैदान	६,३३५-३८
५.	जनावरासाठी पन्हाळी पत्र्याचे शेड	१२,९५२-६८
६.	शेतकरी निवास	२६,९५२-६८
७.	शौचालये	२१,२४६-३४
८.	४ वॉचमन शेड	३३,६४६-७५
९.	विहीरदुरूस्ती व पाईप कनेक्शन	३६,२११-८२
१०.	वृक्षारोपन	६५०-००
११.	प्लॅटफॉर्म	९५,७७६-७३
१२.	ऑफिस बिल्डिंग	२२,६४०-४२
१३.	पाण्याचा हौदा	७,९०९-०६

इ.स. १९८९-९० अखेर बार्शी येथील मुख्य बाजार आवारामध्ये आडत बाजारासाठी १४५ गाळे कार्यरत होते. [३१]

३.३.४ दुय्यम बाजार आवार

दुय्यम बाजारतळ स्थापन करण्याची तरतूद केवळ मुंबई कायद्यात आहे. बाजार क्षेत्रातील ज्या छोट्या व्यापारी केंद्रात नियमितपणे घाऊक व्यापार चालतो त्या ठिकाणी दुय्यम बाजारतळ स्थापन करून तेथील बाजार नियंत्रित केला जातो. बाजार समित्यांना ग्रामीण विक्रेत्यावर देखरेख ठेवता यावी म्हणून छोट्या बाजाराच्या गावी दुय्यम बाजारतळ स्थापन करण्याची शिफारस दांतवाला कमिटीने केली होती. त्यानुसार जुन्या मुंबई राज्यात बाजारक्षेत्रात शक्य त्या ठिकाणी दुय्यम बाजारतळ स्थापन करण्यात आले.[३२] बार्शी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या नियंत्रणाखाली असलेल्या तालुक्यातील दुय्यम बाजार आवाराची माहिती पुढीलप्रमाणे.

१) दुय्यम बाजार आवार वैराग

' वैराग ' हे बार्शी तालुक्यातील सर्वात मोठे गाव आहे. बार्शीच्या दक्षिण-पूर्वेला १६ मैलावर बार्शी-सोलापूर रस्त्यावर असणारे हे एक महत्वाचे व्यापारी ठिकाण आहे. इ. स. १८७२ मध्ये या गावाची लोकसंख्या ७,२८२ इतकी होती. ब्रिटिश साम्राज्याच्या सुरूवातीला वैराग हे सोलापूर जिल्ह्यातील एक खूप महत्वाचे व्यापारी केंद्र होते. इ. स. १८४० मध्ये निजामाच्या प्रदेशातील बसवंत, नांदेड आणि मोमिनाबाद या ठिकाणच्या मोठ्या बाजारामध्ये वैरागच्या व्यापाऱ्यांकडून विशेषत: लिंगायत व्यापाऱ्यांकडून वेगवेगळया मालाची निर्यात मोठ्या प्रमाणात केली जात असे. याचबरोबर सोलापूर व पुणे या जिल्ह्याकडेही माल पाठविला जात असे. वैरागमुळे बार्शी व सोलापूर येथील व्यापारामध्ये घट होत होती. यावरून वैरागच्या व्यापाराची कल्पना येते.[३३] वैरागचे हे व्यापारी महत्व लक्षात घेऊन बार्शी कृषी उत्पन्न बाजार समितीने वैराग येथे वैराग व आसपासच्या परिसरातील गावासाठी एक दुय्यम बाजार समिती स्थापन्याचे ठरविले. ' वैराग ' या गावी मुंबई सरकारच्या नोटिफिकेशन नं. पी. एम. ए. ३९५४ दिनांक २७/१२/१९५४ अन्वये दुय्यम बाजार आवार स्थापन करण्याचे अधिकार बार्शी बाजार समितीस मिळाले. परंतू ऑफिसची जागा ताब्यात न आल्याने इ. स. १९५४-५५ मध्ये याची अंमलबजावणी होऊ शकली नव्हती.[३४]

इ. स. १९५५-५६ मध्ये वैराग येथे दुय्यम बाजार आवार झाले. स्थानिक व्यापारी वर्गाने व विशेषत: तेथील मर्चंट असोशिएशनचे अध्यक्ष श्री. ध. आ. भूमकर व सेक्रेटरी श्री सोपल सि. म. यांनी उत्तम सहकार्य केले.[३५]

वैराग येथील दुय्यम बाजार आवारामध्ये परवाना धारकांचा व्यवहार कमी होत असल्याने परवाना फीचे दर कमी असावेत अशी या बाजार आवारामधील परवानाधारकांची मागणी होती. इ. स. १९५७-५८ मध्ये सदर मागणी मंजूर झाली.[३६] वैराग दुय्यम बाजार आवाराचा पद्धतशीर विकास करण्यासाठी बार्शी मुख्य बाजार समितीने इ. स. १९५८-५९ मध्ये एक पोटकमिटी नेमली होती. त्यामुळे या बाजार आवाराच्या विस्ताराला गती मिळाली.[३७]

वैराग दुय्यम बाजार आवाराचे एकूण क्षेत्रफळ २५ एकर आहे. सदर जागा ताब्यात देण्यासंदर्भात सोलापूर जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याकडे विनंती करण्यात आली. या विनंतीनुसार दि. ९ फेब्रुवारी १९६१ रोजी या जमिनीचा ताबा मार्केट कमिटीस मिळाला. या कामामध्ये वैराग मर्चंट असोसिएशनचे अध्यक्ष श्री. धन्यकुमार भूमकर यांनी खूप सहकार्य केले.[३८]

वैराग दुय्यम बाजार आवाराच्या कामकाजाचा शुभारंभ माजी खासदार मा. श्री. तुळशीदास जाधव यांच्या हस्ते २६ डिसेंबर १९५५ रोजी करण्यात आला.[३९]

दुय्यम बाजार आवार वैराग परवाना धारकाची माहिती

अनुज्ञप्ती प्रकार	व्यवहाराची व्याप्ती	वार्षिक परवाना फी	नुतनीकरण फी	परवाना धारक
वर्ग २ आडत्या(अ) प्र १	कितीही रकमेची खरेदी-विक्री करणारे	२००	२००	१७२
वर्ग २ आडत्या(ब) प्र २		२००	-	-
वर्ग १ व्यापार (अ) प्र२		२००	२००	५६
वर्ग १ व्यापार (क) प्र २	दैनिक रू १५००/-चा व्यापार करणारे	८०	८०	१८
वर्ग १ व्यापार (ग) प्र २		१०	१०	०३
वर्ग १ व्यापार (फ)		२०	२०	१०
वर्ग ४ प्रक्रिया करणारे		६०	६०	०१
वर्ग ५ तोलार		२०	२०	०४
वर्ग ६ वखारवाले		२०	२०	०२
वर्ग ८ मदतनीस		०४	०४	-
वर्ग १० हमाल		१०	१०	२५
वर्ग ११ गाडीवान		०४	०४	-

(संदर्भ : कृषी उत्पन्न बाजार समिती बार्शी ,वार्षिक अहवाल, सन २००२-०३)

वैराग दुय्यम बाजार आवाराला दिनांक २५ मे १९६१ रोजी मान्यता मिळाली. पुढे जमिनीस बिगर शेतीची परवानगी मिळाली व वैराग येथील जमिनीचा 'दुय्यम बाजार आवार' म्हणून जाहिरनामा झाला. याच वर्षामध्ये जनावरांचा बाजार व कडब्याचा बाजार यांचे स्थलांतर करण्यासाठी पाण्याचा हौद, वॉचमन शेड या बांधकामाचा आराखडा तयार करण्यात आला. तसेच या बाजार आवाराच्या जमिनीस तारेचे कुंपन घालण्याचे काम चालू केले.

वैराग बाजार आवाराचा पायाभरणी समारंभ दिनांक २० ऑगस्ट १९६२ रोजी महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री श्री. केशवरावजी सोनवणे यांच्या हस्ते झाला. दिनांक २७ जानेवारी १९६५ रोजी वैराग येथील दुय्यम बाजार आवारामध्ये जनावरांच्या व्यवहाराची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यात आली. सदरचा बाजार पूर्वी वैराग ग्रामपंचायतीच्या जागेत भरत होता. आता तो वैराग दुय्यम बाजार आवाराच्या क्षेत्रात भरू लागला. वैराग समितीने तेथे आवश्यक त्या सोयी उपलब्ध केल्या. इ. स. १९६३-६४ मध्ये वैराग बाजार

समितीने जनावरांना पाणी पिण्यासाठी हौद बांधला. वैराग ग्रामपंचायतीकडून पाईप कनेक्शन घेऊन हौदात पाणी सोडले. एक तात्पुरते पत्र्याचे शेड मारून या शेडचा सेस ऑफीस म्हणून बाजार दिवशी उपयोग करण्यात येऊ लागला.[४०]

इ. स. १९७३-७४ मध्ये वैराग येथील बाजार समितीने स्वत:च्या मालकीची २५ एकर जागा गावालगत घेतली. बाजार आवाराला तारेचे कुंपन घातले. सध्या त्या जागेमध्ये जनावरांचा बाजार दर बुधवारी भरविला जातो.[४१] इ. स. १९८५-८६ मध्ये वैराग येथे आडत बाजारासाठी २३ गाळे बांधले व तेथे आडत बाजार चालू केला.[४२]

२) दुय्यम बाजार आवार येडशी व कसबे तडवळे

बार्शी तालुक्यातील ' येडशी ' व ' कसबे तडवळे ' ही मराठवाड्याच्या सीमेवरील गावे होती. येथे साप्ताहिक बाजार व जनावरांचा बाजार मोठ्या प्रमाणात भरतो. तेथील ग्रामस्थांच्या मागणीनुसार या दोन्ही ठिकाणी दुय्यम बाजारतळ सुरू करण्यात आले. त्यामुळे या परिसरातील बऱ्याच गावातील लोकांचा कारकोळ खरेदी-विक्रीसाठी बार्शी शहराकडे येण्याचा त्रास व आर्थिक खर्च कमी झाला. याचा सारासार विचार करूनच बाजार समितीने तेथील जनावरांच्या बाजारांचेही नियमन केले.[४३]

येडशी या ठिकाणी ' सोमवारी ' तर कसबे तडवळे या ठिकाणी ' मंगळवारी ' आठवड्याचे बाजार भरतात.[४४] वैराग येथील जनावरांच्या बाजारापेक्षा येडशी- तडवळे येथील दुय्यम बाजार आवारातील बाजारामध्ये आलेल्या जनावरांना साधारणत: अधिक किंमत मिळत होती. हे येडशी-तडवळे येथील जनावराच्या बाजाराचे वैशिष्टय होय. अर्थात बार्शी मुख्य बाजार आवारामध्ये भरणाऱ्या जनावराच्या बाजारातील किंमतीपेक्षा ही किंमत कमी होती. [४५]

इ. स. १९७४-७५ मध्ये येडशी-तडवळे येथील दुय्यम बाजार आवारातील बाजारामध्ये आलेल्या जनावरांच्या माध्यमातून ४,४८,२०० रू. इतकी उलाढाल झाली. तर इ. स. १९७७-७८ मध्ये ही उलाढाल ९,७३,०७५ रू. इतकी झाली.[४६] या दुय्यम बाजारतळाची स्थापना ९ ऑक्टोबर १९६६ रोजी झाली. इ. स. १९७७-७८ अखेर येथील बाजार ग्रामपंचायतीच्या जागेत भरत होता. शेतकरी व व्यापारी यांच्या सोयीसाठी ग्रामपंचायतीच्या सहकार्याने लाईटची सोय करण्यात आली होती. [४७] इ. स. १९८१ च्या जणगणनेनंतर सदर दोन्ही गावे उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये सामाविष्ट करण्यात आली. [४८] इ. स १९६७-६८ मध्ये येडशी -तडवळे येथील दुय्यम बाजार आवारास जनावर बाजार व आडत बाजार यातून १,९३७.२८ रू. मिळाले, तर व्यापारी, प्रक्रिया करणारे, तोलणारे, अडत्या व व्यापारी यांचे मदतनीस आणि हमाल यांच्यापासून १,०७५ रू. प्राप्त झाले.[४९]

दुय्यम बाजार आवार येडशी-कसबे तडवळे उत्पन्न व खर्च

वर्ष	उत्पन्न	खर्च	बचत
१९७१-७२	२,१७६-१०	१,२७५-८९	९,००-२१
१९७३-७४	२,५७९-२३	१,८८८-७३	६,९०-५०
१९७४-७५	३,८९२-५९	१,८५९-३१	२,०३३-३८
१९७५-७६	४,०१२-८१	२,३०३-७४	१,७०९-०७
१९७७-७८	५,६७९-७०	२,३१९-०१	३,३६०-६९

(संदर्भ :- कृषी उत्पन्न बाजार समिती, बार्शी,वार्षिक अहवाल, संबंधित वर्ष)

इ. स. १९७४-७५ मध्य येडशी -तडवळे येथील दुय्यम बाजार आवारामध्ये विविध शेतमालाच्या व्यापारामधून ८,३२,२२० रू.आर्थिक उलाढाल झाली. तर इ.स १९७७-७८ मध्ये ही उलाढाल ६,५९,०८०रू. इतकी झाली.[५०] येडशी व कसबे-तडवळे येथील दुय्यम बाजार आवाराची व्याप्ती फार मोठी नसल्याने व मुख्य बाजारपेठ बार्शी जवळ असल्याने या ठिकाणी फार मोठी उलाढाल होत नव्हती.

३.३.५ शेतमालाचे नियमन व विक्रीची पध्दत

मराठवाड्यात एखाद्याबाजाराला हैद्राबाद कायदा लागू केला की शेतीमालाच्या व्याखेत येणाऱ्या सर्व शेतीमालाच्या खरेदी-विक्रीवर नियंत्रण येते. परंतु मुंबई कायदयाप्रमाणे बाजार नियंत्रित करण्यासाठी सुरूवातीला सरकार जो जाहिरनामा प्रसिध्द करते, त्यामध्येच ज्या शेतमालाच्या खरेदी-विक्रीवर नियंत्रण घातले आहे, त्यांची नावे नमूद करण्यात येतात.[५१]

शेतमालाचे नियमनाच्या पूर्वीच्या शेतमाल विक्री व्यवहारामध्ये अनेक अनिष्ट प्रथा अस्तित्वात होत्या. बाजार खर्चाचे दर व्यापाऱ्यांच्या लहरीनुसार आकारले जात असत. त्यामुळे शेतकऱ्यांचे खूप नुकसान होत असे. धर्मादाय, सूट, सांड, कडता, ढळता अशा अनेक अनिष्ट प्रथा शेतमालाच्या नियमनाबरोबर संपुष्टात आल्या.

बाजार समितीच्या स्थापने समयी फक्त चारच शेती मालाच्या नियमनाचे अधिकार बाजार समितीकडे होते. परंतु शेतकऱ्यांच्या आर्थिक हितास्तव आणि बाजार समितीचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने बाजार समितीने नियमनाच्या कामकाजाची व्याप्ती वाढविण्यास सुरूवात केली. यामुळेच नियमित शेतमालाची संख्या झपाट्याने वाढली.[५२]

तक्ता क्र . २२

शेतमालाचे नियमन

अ.क्र.	नियमित शेतमाल	सरकारी जाहिरनामा क्रमांक व तारीख	अंमलबजावणीची तारीख
१.	शेंगा, शेंगदाणे, कापूस, रूई	९४२२/३९ दि.०९/०७/१९४७	०७/११/१९४९
२.	तूर, मुग, उडीद, करडी	पी.पम.ए. ३९५१ सी. दि. ०१/०९/१९५१	०१/११/१९५१
३.	ज्वारी, बाजरी, गहू, जोड, हरभरा, जवस, तीळ, हळद, धने, सुकी मिरची	पी.एम.एम. ३९५४ दि.२५/०९/१९५४	२७/०५/१९५५
४.	गूळ, कडबा	पी.एम.ए. ३९५६ सी दि. २६/०६/१९५६	२२/४/१९५७
५.	चिंच, परंडी, अंबाडी, साळी, कारळे व जनावरे (गाय, बैल, म्हैस, रेडे-शेळ्या, मेंढ्या)	पी.एम.ए. १४ बार्शी दि. १५/०७/१९५९	१/१०/१९६० व ०४/०४/१९६४
६.	वरई (राळे), मका, सावा, हुलगा व कांदा	सीएमआर-आर ३२६९	२०/१०/१९६९
७.	बटाटा, लसूण, मटकी, मोहरी	सीएमआर-आर १२ बार्शी ७६ दि ०३/०५/१९७६	०१/०३/१९७७
८.	निंबोळी, निंबोळी बी, सुर्यफुल, चिंचोके	एपीएसआर १० बार्शी दि ०५/०४/१९८३ दि ३०/०५/१९८३	०५/११/१९८३

(संदर्भ :-कृषी उत्पन्न बाजार समिती बार्शी ,वार्षिक अहवाल,सन १९८९-९०)

अ) शेतमालाचे नियमन

बार्शी कृषी उत्पन्न बाजार समितीसाठी शेंगा, शेंगदाणे, कापूस, रूई यांच्या व्यवहाराचे १ ऑगस्ट १९४७ पासून नियमन करण्यात आले. या नियमनाची प्रत्यक्ष अंमलबजावणी दिनांक ०७ जानेवारी १९४९ पासून करण्यात आली. तर दिनांक १ नोव्हेंबर १९५१ पासून तूर, मुग, उडीद व करडी या शेतमालाचे नियमन करण्यात आले. इ. स. १९५६ मध्ये गूळ व कडबा या दोन जिनसांच्या व्यवहाराचे नियमन करण्याचे अधिकार बार्शी बाजार समितीस मिळाले. मात्र नियमनाची प्रत्यक्ष अंमलबजावणी दि. २४ एप्रिल १९५७ पासून प्रत्यक्ष व्यवहारामध्ये लागू झाली. इ. स. १९५६-५७ पर्यंत बाजार समितीने २० विविध शेतमालाचे नियमन केले.[५३] शेतमालाच्या नियमनामुळे शेतमाल नियमनापूर्वीच्या खरेदी-विक्रीच्या जुन्या पध्दतीनुसार शेतकऱ्यांची होणारी फसवणूक बंद झाली. शिवाय बाजार समितीलाही निश्चित उत्पन्न मिळू

लागले. मराठवाड्याच्या सीमेवर वसलेली बार्शी बाजारपेठ ही मराठवाड्याची प्रमुख उतारपेठ म्हणून ओळखली जाते. त्यामुळे या पेठेमध्ये फार मोठ्या प्रमाणावर शेतमालाची आवक होते. मोठ्या प्रमाणावर आवक होणाऱ्या शेतमालाचा या कमिटीने क्रमाक्रमाने नियमनामध्ये समावेश केला. मार्केट कमिटीच्या प्रभावी नियमनामुळे सुरूवातीपासून जिनसांची व्याप्ती वाढत गेली.

तक्ता क्र . २३

नियमनामुळे मार्केट चार्जेस मध्ये झालेली कपात व शेतकऱ्यांची झालेली बचत

जिनसाचे नाव	परिमाण	नियमनापूर्वीचे मार्केट चार्ज			नियमनानंतरचे मार्केट चार्ज			शेतकऱ्यांची झालेली बचत		
		रू.	आणे	पै.	रू.	आणे	पै.	रू.	आणे	पै.
शेंगा	मालाच्या किंमतीच्या प्रत्येकी १०० रूपयास	२	००	००	१	०५	००	०	११	००
शेंगदाणे		१	१५	००	१	०४	०९	०	१०	०३
कापूस		२	०४	००	१	०१	००	१	०३	००
तूर		२	०४	००	१	०८	०६	०	११	०६
मुग		२	०४	००	१	०८	०६	०	११	०६
उडीद		२	०४	००	१	०८	०६	०	११	०६
करडी		२	०४	००	१	०८	०६	०	११	०६
ज्वारी		२	०९	००	१	१३	००	०	१२	००
बाजरी		२	०९	००	१	१३	००	०	१२	००
गहू		१	१५	००	१	०६	०३	०	०८	०९
हरभरा		२	०९	००	१	१३	००	०	१२	००
तीळ		१	१५	००	१	०६	०३	०	०८	०९
जवस		१	१५	००	१	०६	०३	०	०८	०९
हळद		२	०७	००	०	१४	०६	१	०८	०९
धने		१	०८	००	१	०	०९	०	०७	०३
मिरची		३	१२	००	१	१४	०३	१	१३	०९

(संदर्भः कृषी उत्पन्न बाजार समिती, बार्शी, वार्षिक अहवाल, सन १९५४-५५,पृष्ठ- २२)

इ. स. १९९० अखेर बार्शी कृषी उत्पन्न बाजार समितीने ४१ कृषी मालाचे व गाय, बैल, म्हैस, रेडे, शेळया, मेंढया व बोकडे या जनावरांचे नियमन केले आहे. याचा शेतकऱ्यांना तसेच बाजार समितीलाही खूप फायदा झाला. या नियमनामुळे शेतकऱ्यांना आपल्या शेतमालाच्या विक्रीवर द्याव्या लागणाऱ्या विविध करांची माहिती निश्चित झाली. त्यामुळे शेतकऱ्यांच्या होणाऱ्या फसवणूकीवर मोठ्या प्रमाणात प्रतिबंध बसला.[५४]

ब) माल विक्री पध्दत

शेतमालाचे स्वरूप, मागणी व ठिकाण इत्यादी घटकावर मालाची विक्री अवलंबून असते. मालविक्रीच्या तीन पध्दती आहेत. **१)** मालाची तपासणी करून **२)** मालाचा नमुना दाखवून **३)** मालाचे वर्णन देऊन. प्राथमिक, दुय्यम व मध्यवर्ती बाजारपेठेमध्ये शेतमालाची पाहणी करूनच पण अनेक उपपध्दतीने मालविक्री होते. मालविक्रीचा व्यवहार शेतकऱ्याला किती लाभदायक होईल हे बऱ्याचअंशी त्या त्या बाजारपेठेमध्ये प्रचलित असणाऱ्या मालविक्रीच्या पध्दतीवर अवलंबून असते. शेतीमालाच्या बाजारपेठेमध्ये मालविक्रीच्या खालील पध्दती प्रचलित असल्याचे दिसते.

१) खुल्या वाटाघाटीची पध्दत : या पध्दतीमध्ये अडत्या व खरेदीदार यांच्यात भावासंबंधी खुल्या वाटाघाटी होऊन भाव ठरतो. असंघटित बाजारपेठेमध्ये किंवा खरेदीदाराची संख्या कमी आहे अशा बाजारपेठेमध्ये बहुदा ही पध्दत आढळून येते.

२) मोघम पध्दत : या पध्दतीमध्ये भावाबाबत मोघमपणा ठेऊन मालाची विक्री होते. आगाऊ पैसे उचलणारे शेतकरी किंवा बाजारपेठेपासून दूर असणारे शेतकरी यांचा माल विकताना ही पध्दत वापरतात.

३) हत्ता पध्दत : या पध्दतीमध्ये अडत्या आपल्या हातावर कसलेतरी आच्छादन टाकतो आणि खरेदीदार अडत्याच्या अच्छादनाखालील हातांच्या बोटांना स्पर्श करून सांकेतिक पध्दतीने आपली मागणी सांगतात. मग त्यापैकी जी कमाल मागणी असेल ती अडत्या संबंधित शेतकऱ्याला सांगतो व त्याच्या विचाराने सवदा कायम होतो. या पध्दतीमध्ये खरेदीदारानी मागितलेले भाव शेतकऱ्याला समजत नाहीत. त्यामुळे शेतकऱ्याची भावात फसवणूक होण्याची शक्यता असते.

४) उघड लिलाव पध्दत व हत्ता यांची संमिश्र पध्दत : या पध्दतीत हत्ता पध्दतीने मिळालेला कमाल भाव जाहीर केल्यानंतर तेथून त्या मालाच्या उघड विक्रीस सुरूवात होते.

५) फर्दी पध्दत : मराठवाड्यातील काही बाजारपेठेमध्ये कापूस, शेंगा या नगदी पिकांची विक्री या पध्दतीने होते. या पध्दतीत बाजारपेठेतील अडत्यांच्या दुकानांचे गट केलेले असतात. प्रत्येक गटाकरीता लिलावाचा दिवस आगोदरच ठरवून दिलेला असतो. एका गटात जितकी दुकाने असतील त्या सर्व दुकानी आलेल्या मालाची यादी (फर्दी) करून त्या सर्व मालाचा लिलाव त्या दिवशी एकदम करण्यात येतो. बाजारपेठेमध्ये येणारा माल सर्वसाधारण दर्जाचा व एकाच प्रकारचा आहे या समजूतीवर फर्दी पध्दतीचे कामकाज आधारलेले आहे. त्यामुळे मालाला सरसकट एकच भाव दिला जातो.

६) दर पत्रकाची पध्दत : मद्रास राज्यात साऊथ अर्काट जिल्ह्यातील मार्केट कमिटीने ही पध्दत शोधून काढली व यशस्वीरित्या रूढ केली. शेतकऱ्याच्या मालाला योग्य किंमत यावी, त्याची फसवणूक होऊ नये म्हणून लोकांनी ऊघड लिलाव व दर पत्रक या पध्दतींचा स्वीकार केला.

७) उघड लिलाव पध्दत : या पध्दतीत मालाचा भाव चढा-ओढीने ठरत असल्याने मालास चांगला भाव मिळतो. व्यवहार शेतकऱ्यांसमोर पार पडत असल्यामुळे त्याची भावात फसवणूक होण्याची शक्यता राहत नाही. मात्र हंगामामध्ये आवक मोठ्या प्रमाणात होत असल्याने शेतकऱ्यांना मालविक्रीसाठी बाजारपेठेमध्ये अनेक दिवस तिष्ठत बसावे लागते. कारण मालाची आवक भरपूर असल्याने बाजारपेठेतील सर्व अडत्यांना दररोज लिलावाची संधी मिळत नाही. ही पध्दत शेतकऱ्यांच्या फायद्याची मानली जाते.[५५]

जेव्हा जाहीर केलेल्या शेतमालाची विक्री उघड लिलावाने होते, त्यावेळी अधिकाधिक बोली करणाऱ्यास तो माल विकला पाहिजे. तथापी, विक्रेत्यास आपल्या शेतमालाची विक्री पुढे ढकलण्याचा अधिकार आहे. परंतू विक्रेत्याने आपल्या वैकल्पिक अधिकाराचा हा निर्णय संबंधित अडत्यास बाजार समितीने बाजारात ठरविलेली वेळ संपण्यापूर्वी दिला पाहिजे असा या पध्दतीचा नियम आहे.[५६]

कृषी उत्पन्न बाजार समिती बार्शी याठिकाणी आलेल्या मालाची विक्री उघड लिलाव पद्धतीने होते. सौद्याची वेळ सकाळी १०.३० ते सायंकाळी ६.०० पर्यंत ठेवलेली आहे. मालाची उघड लिलाव पद्धतीने विक्री होत असताना त्याठिकाणी बाजार समितीचा प्रतिनिधी हजर असतो.[५७]

कृषी उत्पन्न बाजार समिती बार्शी या ठिकाणी सर्व कारखानदार व व्यापारी यांना पाहिजे त्या प्रतीचा आवश्यक तेवढा माल खरेदी करता यावा आणि प्रतवारी केलेला माल योग्य स्पर्धा होऊन विकला जावा म्हणून आडत्यांचे उपगट पाडलेले आहेत. हंगामामध्ये आवकेनुसार सर्व शेतमालाची विक्री एक किंवा दोन गटात केली जाते. प्रतवारीचे काम सकाळी ०९.०० ते दुपारी ०२.०० पर्यंत चालू असते. प्रत निश्चितीसाठी पोत्यावर रंगाने खुणा केल्या जातात. शिवाय बाजार समितीकडून चिट्ठी दिली जाते. प्रतवारीचे काम संपल्यानंतर सर्व आडते व खरेदीदार व मालधनी एका विशिष्ट ठिकाणी लिलावासाठी जमतात. नंतर संबंधित शेतमालाचे लिलाव होतात. लिलाव संपल्यानंतर त्वरीत डिलिव्हरीचे काम सुरू होते.[५८]

सन १९३९ च्या मुंबई कृषी उत्पन्न मार्केट ॲक्ट नुसार व्यापाऱ्याने मार्केटमध्ये आलेला शेतमाल सर्वात जास्त किंमत देऊ करणाऱ्यास विकला पाहिजे. तथापी, शेतमालाच्या मालकास आपला शेतमाल सर्वात जास्त किंमत देऊ करणाऱ्यास विकण्याची, नाकारण्याची व त्याहून कमी किंमत स्वीकारण्याची किंवा आपला शेतमाल काही वेळ किंवा काही दिवस तहकूब करण्याची परवानगी आहे.[५९]

३.३.६ शेतमालाची प्रतवारी व तोलाई

शेतमालाची प्रतवारी व तोलाई या दोन बाबी शेतकऱ्याच्या दृष्टीने खूप महत्वाच्या आहेत. अशा या दोन बाबींची माहिती पुढीलप्रमाणे.

अ) शेतमालाची प्रतवारी

शेतमालाला योग्य किंमत येण्यासाठी उत्पादित शेतमालाची प्रतवारी करणे आवश्यक असते. कारण उत्पादित शेतमाल एकाच प्रकारचा असू शकत नाही. त्यामुळे सर्वच शेतमाल एकाच भावाने विकला जातो. साहजिकच उत्तम मालाल योग्य किंमत मिळत नाही. शेतमालाची योग्य प्रतवारी झाल्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतमालाला योग्य किंमत येते. तसेच बाजारपेठेमध्ये उत्तम प्रतीचा शेतमाल आणण्यास शेतकऱ्यांना प्रोत्साहन मिळते. यासाठी ही प्रतवारी आवश्यक असते.[६०] शेतकऱ्यांना आपल्या मालाचा दर्जा कोणता आहे हे कळावे आणि त्यानुसार त्याची किंमत ठरावी यासाठी सरकारने "ॲग्रिकल्चरल प्रोडयूस ॲक्ट इ. स. १९३७" (ग्रेडिंग अँड मार्केटींग) केला. या कायदयान्वये शेतकी खात्याकडून शेतमालाची प्रत ठरविली जाते व प्रतीनुसार त्यावर शिक्का मारला जातो. त्यामुळे शेतमालाला जास्त मागणी येऊन जास्त किंमतही मिळू शकते.[६१] " व्यापारात परंपरेने चालत आलेली किंवा सरकारने ठरवून दिलेली अथवा ग्राहकाच्या मागणीनुसार प्रचारामध्ये असलेली जी काही निरनिराळी प्रमाणे आहेत त्यानुसार मालाची निवडानिवड करणे किंवा प्रकार पाडणे याला प्रतवारी म्हणतात."

प्रतवारीचे फायदे

१) चांगल्या मालास चांगला भाव मिळतो. यामुळे उच्च दर्जाचा शेतमाल पिकविण्यासाठी प्रोत्साहन मिळाले.

२) कारखानदार व ग्राहक यांना गरजेनुरूप माल निवडणे सोयीचे होऊन बाजारविधी सुलभ झाला.

३) प्रतवारीमुळे ग्राहकांची मालामध्ये व किंमतीमध्ये होणारी फसवणूक मोठ्या प्रमाणात कमी झाली.

४) प्रतवारीमुळे मालाच्या किंमतीचा चोख अंदाज करता येऊ लागला. त्यामुळे वखारप्रमुखाला व बँकांना तारण कर्ज देणे सुलभ झाले.

५) प्रतवारीमुळे वायद्याचे सौदे करणे शक्य झाले.

६) खरेदीदारांना माल पाहण्याची अथवा तपासण्याची गरज राहिली नाही. मालाच्या प्रतीचा उल्लेख करून फोन, तार, पत्र याद्वारे मालाची विक्री करता येऊ लागली.

७) प्रतवारीमुळे देशाला व्यापारी ख्यातीचा लाभ झाला.

शेतमालातील अशुध्दतेमुळे भारतीय शेतमालाला देशात व परदेशात कुप्रसिध्दी मिळाली होती. म्हणूनच प्रतवारीचा अवलंब करून भारतीय शेतमालाला व्यापारी ख्याती मिळवून दयावी या उद्देशाने सरकारने अखिल भारतीय पातळीवर प्रतवारीचा एक सुसंघटित उपक्रम कार्यान्वित केला. "ॲग्रिकल्चरल प्रोडयूस ॲक्ट इ. स. १९३७"(ग्रेडिंग अँड मार्केटींग) हे या उपक्रमाचे दृश स्वरूप होय. राज्य सरकारशी विचारविनिमय करून भारत सरकारने अनेक जिनसासाठी प्रत गुणधर्म ठरवून दिलेले आहेत. [६२]

बार्शी पेठेत शेंगा, तूर, मुग, ज्वारी यांची मोठ्या प्रमाणात आवक होते. त्यामुळे या शेतमालांचा जलद उठाव होणे आवश्यक असते. हंगामामध्ये शेतमालाची विक्री लवकरात लवकर व्हावी यासाठी बाजार समितीने इ. स. १९६०-६१ मध्ये व्यापारी प्रतवारीचा अभिनव उपक्रम सुरू करून त्यामध्ये वेळोवेळी सुधारणाही केल्या. बाजार आवारात दि. ४ नोव्हेंबर १९६५ पासून शेंगाची प्रतवारी सुरू करण्यात आली. नव्या विक्रीव्यवस्थेमुळे बाजारामध्ये विक्रीस येणाऱ्या शेतमालाचा थोड्या वेळात जास्त उठाव होऊ लागला. उघड लिलाव पद्धतीला प्रतवारीची जोड मिळाल्यामुळे शेतमाल विक्रीचा व्यवहार अत्यंत अल्पवेळात आणि कार्यक्षमरीत्या होऊ शकतो याचे हे प्रात्यक्षिक होते. व्यापारी व शेतकरी यांच्या सहकार्यामुळेच प्रतवारी पद्धतीची विक्री व्यवस्थेची अंमलबजावणी यशस्वी झाली. शेंगाशिवाय तूर, मुग, उडीद या शेतमालाचीही बार्शी बाजार समितीने प्रतवारी केली. [६३]

प्रतवार प्रयोगशाळा

सरकारी धोरणानुसार बार्शी बाजार समितीने स्वतंत्र प्रतवार विभाग सुरू केला. शेतमालाची शास्त्रीय पद्धतीने प्रतवारी व्हावी यासाठी आधुनिक शास्त्रीय उपकरणांनी सुसज्ज अशी प्रतवार प्रयोगशाळा उघडण्यात आली. या प्रयोग शाळेस महाराष्ट्र सरकारने उपयुक्त अशी उपकरणे पुरविली आहेत. तसेच बाजार समितीनेही आवश्यक ते फर्निचर व साहित्य खरेदी करून या प्रयोगशाळेस देऊ केले आहे. या प्रयोगशाळेत प्रतवार केलेल्या चार ते सहा, नमुन्यांचे पृथःकरण जनरल कमिशन एजंट, मालधनी व खरेदीदार यांचे समक्ष केले जाऊन त्यासंबंधीचा निर्णय दिला जातो. [६४]

बाजारपेठेमध्ये हळदीची आवक वाढल्याने हळदीचा व्यापार जलद व्हावा म्हणून बार्शी बाजार समितीने हळदीची प्रतवारी करण्याचा उपक्रम सुरू केला. हा महाराष्ट्रातील पहिला उपक्रम होता. प्रतवारीच्या प्रभावी नियमनामुळे व शासनाच्या आग्रहावरून प्रतवार पोटकमिटीने ' हळद ' या शेतमालाची प्रतवारीमुळे निवड केली. ही प्रतवारी सुरू करण्यापूर्वी प्रतवारीकांनी हळद या शेतमालाचा पूर्ण अभ्यास केला. तसेच व्यापारी शेतकरी यांच्याशी विचार विनिमय करून डायरोक्टोरेट ऑफ मार्केटिंग अँड इन्स्पेक्शन नागपूर यांनी ठरवून दिलेल्या प्रमाणबद्ध प्रतीच्या आधारावर हळदीची प्रतवारी सुरू केली.

प्रतवारकरांनी हळदीच्या १०० नमुन्याचे पृथ:करण करून थोड्याफार बदलासाठी ते सांगलीला पाठविले. नंतर त्याप्रमाणे यातील सर्व घटकांशी चर्चा करून खात्याकडून बदल मंजूर होऊन आले.[६५]

तक्ता क्र . २४

बाजार समितीस मिळालेली प्रतवार फी

वर्ष	फी (रू)
१९७५-७६	२६,६३३-८२
१९७७-७८	४३,१६२-१८
१९८५-८६	६०,०५३-६०
१९८७-८८	१,१६,५२०-६०
१९८८-८९	८८,३९९-९६
१९८९-९०	९१,६८१-२५

(संदर्भ :- कृषी उत्पन्न बाजार समिती, बार्शी, वार्षिक अहवाल, संदर्भ नियमावली)

प्रतवारीमुळे परपेठेतील खरेदीदारांना फोन तसेच टपालाव्दारे बार्शी पेठेतील व्यापाऱ्याशी संपर्क साधून शेतमालाच्या प्रतीनुसार भाव ठरवून मालाची खरेदी करणे सोयीचे झाले. या प्रतवार कार्यक्रमाची प्रतवारीकांनी बार्शी तालुक्यातील गावो-गावी जाऊन ग्रामपंचायती व सहकारी सोसायट्या यांच्या सभा आयोजित करून शेतकऱ्यांना या प्रतवारीची माहिती देण्याचा उपक्रम राबविला. त्यामुळे भेसळ करण्यास आळा बसला. बाजारातील खरेदी-विक्री प्रक्रिया सुलभ झाली. शिवाय व्यापारवृध्दीस चालना मिळाली. बार्शी कृषी उत्पन्न बाजार समितीस मिळालेल्या या प्रतवार फी मुळे आर्थिकदृष्टया मोठ्या प्रमाणात फायदा झाला. याशिवाय मार्केट कमिटीने डायरेक्टरची आगाऊ मंजूरी घेऊन जनरल कमिशन एजंट, दलाल, तोलणारे, मापणारे व सर्व्हेअर यांच्या सेवेबद्दल व शेती उत्पन्नाच्या खरेदी-विक्रीच्या संदर्भात केलेल्या इतर कामाबद्दल आकारावयाचे कमाल दर ठरविले पाहिजेत असा आदेश काढला.[६६] १० ते १२ वर्षे बाजार समितीने प्रतवारीची सेवा मोफत दिल्यानंतर बाजार समितीने इ. स. १९७४-७५ मध्ये प्रतवारीच्या दराचा पोटनियम करून तो शासनाकडे मंजूरीसाठी पाठविला. त्याला शासनाने १० सप्टेंबर १९७४ रोजी मंजूरी दिली. पुढे इ. स. १९७५-७६ मध्ये त्याच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीस सुरूवात झाली. [६७]

ब) शेतमालाची तोलाई

आपल्या देशामध्ये वजन व मापे यांच्यातील विविधता शेतमालाच्या विक्रीमध्ये गोंधळ करण्यास बऱ्याच अंशी करणीभूत आहे. भारतातील बहुसंख्य शेतकरी अडाणी असल्यामुळे या गोंधळात अधिकच

भर पडली. मात्र या गोंधळाचा केवळ शेतकऱ्यांनाच तोटा झाला. शेतकऱ्यांच्या अज्ञानीपणाचा फायदा घेऊन व्यापाऱ्यांनी व मध्यस्थांनी सातत्याने शेतकऱ्याची फसवणूक केली. पूर्वीच्या वजनाचे आकार निश्चित नव्हते. तसेच तराजूमध्येही दोष होते. या परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी शासनाने १ ऑक्टोबर १९५८ पासून दशमान पध्दतीची वजन व मापे सुरू केली.[६८]

परवाना दिलेल्या तोलणाऱ्याचे व मापणाऱ्याचे ' अ ' व ' ब ' असे दोन वर्ग असतात. यापैकी ' अ ' वर्ग परवानाधारकांना केवळ मार्केटच्या क्षेत्रातच आपले व्यवहार करू शकतात. तर ' ब ' वर्ग परवानाधारक मार्केटच्या क्षेत्रात मार्केटाबाहेरील कोणत्याही ठिकाणी आपले व्यवहार करू शकतात. शिवाय या दोघांना मार्केट कमिटीने केलेल्या नियमात वागणे बंधणकारक होते. कोणताही दलाल, व्यापारी किंवा कमिशन एजंटला परवानाधारक तोलणार, मापणार यांना आपल्या नोकरीत घेता येत नाही. प्रत्येक तोलणाऱ्यास व मापणाऱ्यास परवान्याबरोबर एक बिल्ला दिला जातो. हा बिल्ला हरविल्यास किंवा खराब झाल्यास पुन्हा बिल्ला तयार करण्यासाठी येणारा खर्च मार्केट कमिटी संबंधिताकडून वसूल करते. शिवाय त्या बिल्ल्यावर दुसरी प्रत असा शब्द लिहिला जातो. हा बिल्ला मिळेपर्यंत मार्केट कमिटीच्या चेअरमनची लेखी परवानगी घेऊन तोलणाऱ्यास व मापणाऱ्यास आपले व्यवहार करता येतात. परवाना धारण करणाऱ्या व्यक्तिनेच हा बिल्ला वापरला पाहिजे. तो दुसऱ्याने वापरल्यास सदर परवाना रद्द अथवा स्थगित करण्याचा अधिकार मार्केट कमिटीस आहे.[६९]

मध्यवर्ती सरकारने इ. स. १९५८ मध्ये वजने आणि मापे प्रमाणभूत करण्याच्या दृष्टीने एक कायदा करून प्रमाणभूत अशीच वजने वापरली जातील अशी व्यवस्था केली. भारतातील निरनिराळया प्रदेशात निरनिराळया प्रकारची निरनिराळया आकाराची वजन मापे अस्तित्वात असल्यामुळे शेतकऱ्यांची फसवणूक होई. परंतू शासनाच्या वरील धोरणामुळे शेतकऱ्यांच्या फसवणुकीचे प्रमाण कमी झाले.[७०] तोलणाराने तोललेला शेतमाल ठेवण्यासाठी वापरलेल्या इतर कोणत्याही वस्तूंचे वजन त्याच्या तोल-चिठ्ठीत स्पष्टपणे नमूद करणे अनिवार्य आहे. शिवाय एकदा व्यवहार पूर्ण झाल्यानंतर हिशोब करून विक्रीची रक्कम ताबडतोब संबंधित मालधन्याला देण्याची व्यवस्था केली पाहिजे.[७१]

शेतमालाची तोलाई चोख होण्याच्या दृष्टीने बाजार समिती खूप दक्ष असते. बाजार समितीचे परवानाधारक निरीक्षक वेळोवेळी बाजारामध्ये फिरून मालाच्या तोलाईवर देखरेख करीत असतात. बाजार समिती व्यापाऱ्यांना काटापट्टी बुके मोफत पुरविते व त्या काटापट्टी बुकांची / पुस्तकांची तपासणी करते.[७२] तोलण्याचे दोन प्रकार आहेत. ते म्हणजे शेवटचे वजन लावून तोल करणे व दुसरे म्हणजे ' भरती ' पद्धतीने तोल करणे. बार्शी बाजार आवारात भरती पद्धतीने तोलाई होते. या पद्धतीत शेतमाल अत्यंत तंतोतंत तोलला जावून शेतकऱ्यांचा फायदा होतो व पुन्हा ठराविक वजनाची भरती करणेची जरूरी नसल्याने फेर

तोलाईचा खर्च वाचून खरेदीदाराचाही फायदा होतो. इ. स. १९५६-५७ मध्ये तोलाईचा दर मंजूर होऊन आला व त्यामुळे काटेवाल्यांची याबाबत असलेली फार दिवसाची तक्रार संपली.[७३] मालाचे वजन चोख व्हावे यासाठी बाजार समितीने तोलारांची फिरती गट पद्धती ३ ऑक्टोबर १९५७ पासून अंमलात आणली. सदर गटपद्धतीसाठी जनरल कमिशन एजंट यांचे ४ गट पाडले व एका गटातील तोलार तोलाईचे काम करीत होते. प्रत्येक आठवड्यास राऊंड पद्धतीने तोलारांचे ४ गट बदलले जात असत. ५ वा राखीव गट ज्या गटात तोलार किंवा गैरहजर असतील तेथे त्या जागा भरून काढत. इ. स. १९५७-५८ मध्ये काट्यावाल्याच्या गटपद्धतीची अंमलबजावणी समाधानकारक झाली. दैनंदिन कामावर काटेवाला संघाने देखरेख केली. काटेवाला संघाचे अध्यक्ष श्री. बारंगुळे व इतर कार्यकर्ते यांनी परिश्रमपूर्वक गट पद्धतीच्या योजनेचे काम व्यवस्थितरित्या पार पाडले.[७४]

आपली स्वत:ची वजने, मापे आणि वजन करण्याची व मापण्याची साधने ही मार्केट कमिटीने ठेवलेली वजने, मापे आणि वजन करण्याच्या व मापण्याच्या साधनांच्या संचाशी पडताळून पाहण्याची इच्छा असलेल्या लोकांना कार्यालयीन वेळेत सेक्रेटरीची भेट घेऊन आपल्या शंकेचे निरसन करता येत होते.[७५]

सन १९३४ च्या मुंबईचे वजने व मापे याबाबतच्या नियमानुसार यार्ड चे माप वगळून इतर सर्व वजन-मापे कशी असावीत व त्यामध्ये कोणत्या धातूचे प्रमाण किती असावे हे निश्चित केलेले आहे. शिवाय दर पाच वर्षांनी डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रिज्, मुंबई यांच्याकडून ही मापे बरोबर आहेत की नाहीत ते मूळ प्रमाणाशी ताडून पाहण्याचा दंडक घातलेला होता. सरकारी इन्स्पेक्टरने दर सहा महिन्यात किमान एकदा तरी लोकांची वजने व मापे चालू प्रमाणाशी ताडून पाहिली पाहिजेत व ती पडताळून पाहिल्याच्या तारखेचा शिक्का त्यावर मारला पाहिजे. याशिवाय संबंधित लोकांनीच या वजन-मापांचा व्यवस्थित वापर केला पाहिजे. ती सुरक्षित स्थळी ठेवली पाहिजेत. धान्य मोजन्याची मापे लोखंड, पोलाद, टिन प्लेट, पितळ, ब्राँझ, तांबे, निकल, ॲल्युमिनीयम किंवा डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रिज् यांनी पसंत केलेले इतर पदार्थ यांच्या धातूपासून करण्यात आली पाहिजेत. या सर्व मापांचा वरील पृष्ठभाग एकाच पातळीत असला पाहिजे. मापांचा तळ सपाट असला पाहिजे. असा दंडक घालण्यात आला. यावरून तत्कालीन धान्य मोजण्याच्या साधनांची कल्पना येऊ शकते.[७६]

बार्शी बाजार आवारातील तोलाईचे काम अधिक सुरळीत चालण्यासाठी पूर्वीच्या गट पद्धतीच्या तोलाईमध्ये दि. १ जुलै १९६० पासून बदल करून, नविन युनिट पद्धत अंमलात आणली. यानुसार-

१) जनरल कमिशन एजंट यांच्या व्यवहारानुसार १ ते ३ दुकानांचे युनिट समजण्यात आले.

२) सर्व युनिटना नंबर देण्यात आले.

३) एका युनिटमधील तोलाराचे काम एका तोलाराकडे देण्यात आले.

४) युनिटवर जाणाऱ्या तोलाराची माहिती दररोज बाजार समितीच्या फलकावर प्रसिद्ध केली जात असे.

५) तोलाराचे युनिट रोज बदलले जात.

६) तोलार राखीव म्हणून आवश्यकतेनुसार काम करत.

७) सर्व तोलार दैनिक तोलाईचा रिपोर्ट / अहवाल दुसऱ्या दिवशी कार्यालयात सादर करत.[७७]

३.३.७ गोदामे / गोडाऊन

शेतमालाचे उत्पादन व खप यांच्या वेळा कधीच एक अथवा समांतर असत नाहीत. अशा परीस्थितीमध्ये उत्पादन व खप यांचा समन्वय केवळ साठवणुकीमुळेच घडून येतो. साठवणुकीमुळे शेतकऱ्यांचा खूप फायदा होतो. शेतकऱ्याला साठवलेल्या मालावर कर्ज मिळते. शिवाय योग्य भाव आल्यावरच शेतकरी आपला माल विकून भरपूर फायदा मिळवितात.

अ) साठवण काळातील जोखीम : साठवण काळात मालाचा दर्जा बिघडणार नाही, किड लागणर नाही याची काळजी घ्यावी लागते. साठवणीच्या काळात शेतकरी, मध्यस्थ, व्यापारी, पेढया, बँका, कारखानदार यांचे भांडवल गुंतुन पडते. त्यामुळे मालाची चोरी झाल्यास अथवा दर्जा बिघडल्यास मालात पैसे गुंतविणाऱ्यांना नुकसान होण्याची शक्यता असते.

ब) साठवणीच्या जागा : उत्पादक, मध्यस्थ, कारखानदार आणि ग्राहक या सर्वांची सोय होईल अशा ठिकाणी मालाची साठवणूक करणे अधिक फायदेशीर असते. तसेच बाजारपेठेच्या सान्निध्यात साठवण करणे अधिक चांगले. याकामी वाहतुकीच्या सोयींचाही विचार करणे आवश्यक असते. शिवाय शेतमाल दोन पध्दतीने साठविता येतो. १) मोकळया अवस्थेत २) पोत्यात भरून

क) साठवणीचे प्रकार : साठवणीच्या प्रकारामध्ये स्थलपरत्वे फरक पडतो. खेड्यामध्ये मडकी, झुडपांच्या फोकापासून बनविलेली कणगुली साठवणुकीकरीता उपयोगात येतात. लहान शहरात पक्क्या विटांनी बांधलेल्या कोठयात मोकळा किंवा पोत्यात भरून माल साठविता येतो.

सोलापूर, पुणे, सातारा या जिल्ह्यामध्ये सर्वत्र आढळून येणारा ' पेव ' हा साठवणीचा एक प्रकार आहे. पेव जमिनीखाली असते. पेवाचे तोंड चौकोनी अथवा गोलाकार असते. पेवात माल भरल्यानंतर पेवाचे तोंड मातीने बंद करण्यात येते. काही ठिकाणी साठवणीसाठी जमिनीखाली तळघरे बांधलेली असतात. हे सर्व साठवणुकीचे जुने प्रकार आहेत. साठवणीचा अद्यावत व उपयुक्त असा प्रकार म्हणजे शीतग्रह होय. नाशवंत स्वरूपाचा माल शितग्रह/वखार/गोडावूनमध्ये दीर्घकाळ टिकून राहतो.[७८]

ड) वखारीचे प्रकार

१) खाजगी वखार : या वखारी मोठ्या कंपन्यांच्या खाजगी मालकीच्या असतात. या वखारीमध्ये संबंधित कंपन्या आपला माल साठवितात.

२) जकात दिलेल्या मालासाठी सार्वजनिक वखारी : गोदी अधिकारी मंडळ, बंदर अधिकारी मंडळ इत्यादी जकात वसूल करणाऱ्या संस्थांच्या अशा वखारी असतात.

३) बंदिस्त वखारी : जकात अधिकाऱ्याच्या नियंत्रणाखाली बंदिस्त वखारीचे काम चालते. करपात्र मालाच्या साठवणीकरीताच मुख्यत: बंदिस्त वखारीचे काम चालते. ज्या मालाची जकात भरलेली नसते असा माल या वखारीमध्ये ठेवतात. त्यानंतर ज्या प्रमाणात कर भरला जातो त्या प्रमाणात माल सोडला जातो. करदात्याची सोय व्हावी व करही बुडू नये अशा दुहेरी उद्देशाने या वखारी चालविण्यात येतात.

४) परवानाधारक वखारी :- राज्य सरकारच्या वखार कायदयान्वये परवाना घेऊन ज्या वखारी चालविण्यात येतात त्यांना परवानाधारक वखारी असे म्हणतात. अशा वखारीमध्ये ठेवलेल्या मालावर संबंधित ठेवीदाराला कर्ज मिळू शकते. कोणताही शेतमाल मार्केट कमिटीच्या ऑफिसमध्ये साठविण्याच्या कारणासाठी नोंदविल्या शिवाय मार्केटमधील कोणत्याही गोदामामध्ये किंवा इतर खुल्या आवारामध्ये साठवून ठेवता येत नाही. शिवाय गोदामाचीही शेतीचे उत्पन्न साठवून ठेवण्याची जागा म्हणून रीतसर मार्केट कमिटीकडे नोंदणी करणे आवश्यक असते. मार्केट कमिटीस मार्केटमधील शेतमाल साठवून ठेवण्याचे नियमन करण्यासाठी आवश्यक वाटतील असे हुकूम काढण्याचा अधिकार आहे.[७९]

बाजारातील किंमत योग्य नाही असे शेतकऱ्यास वाटल्यास त्याला आपला शेतमाल बाजारपेठेत ठेवण्यासाठी शासनाने पेठेच्या ठिकाणी गोदामे बांधण्यास सुरूवात केली. याचा शेतकऱ्यांना खूप फायदा झाला. शेतमालाला भाव नसल्यास त्याच्या पूर्नवाहतूकीचा खर्च या गोदामामुळे वाचला. शिवाय शेतकरी आपला शेतमाल चांगला भाव आल्यावरच विकू लागले. अशा प्रकारे शेतकऱ्याचा फायदा होऊ लागला.[८०]

इ. स. १९५७ मध्ये मध्यवर्ती कोठार महासंघ अस्तित्वात आला. बहुतेक राज्यात आता राज्य कोठार संघ स्थापन झाले आहेत. इ. स. १९५७ मध्ये विशाल मुंबई राज्याकरीता " दि बॉम्बे स्टेट वेअर हाऊसिंग कार्पोरेशन " या नावाने कोठारसंघ स्थापन झाला. परंतू पुढे मुंबई राज्याच्या विभाजनानंतर त्याचे विसर्जन झाले आणि महाराष्ट्र राज्याकरीता " महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ " स्थापन करण्यात आले. शेतमालाच्या साठवणुकीमध्ये या महामंडळाचा फार मोठा वाटा आहे. शेतमालाच्या वखार भाड्यात हे महामंडळ शेतकऱ्यांना १५ टक्के सूट देते. शिवाय त्याच्या मालाची देखभाल अतिशय काळजीपूर्वक केली

जाते. रॉयल कमिशनने वखारी स्थापन करण्यावर भर दिला होता. पुढे सेंट्रल बँकिंग इन्क्वायरी कमिटी, दि मार्केटिंग सब कमिटी, दि ॲग्रीकल्चरल फायनान्स सब कमिटी आणि दि को-ऑपरेटिव्ह प्लॅनिंग कमिटी इत्यादी कमिट्यांनी वखारी स्थापन करण्याच्या उपक्रमाचा जोरदार पुरस्कार केला. धंदा म्हणून वखारी स्थापन करण्याची कल्पना रिझर्व बँकेच्या प्रयत्नाने मूर्त स्वरूपात आली. इ. स. १९४४ मध्ये या आशयाचे परिपत्रक रिझर्व बँकेने सर्व राज्यांना पाठविले होते. [८१]

इ. स. १९५६-५७ मध्ये बार्शी बाजार समितीच्या आवारात शेतमालाचा साठा करण्याकरिता सर्वसाधारणत: जनरल कमिशन एजंटच्या सुमारे ६१ गोदामांचा बाजारात येणाऱ्या शेतकऱ्यांकडून वापर केला जात होता. या सर्व गोदामामध्ये अंदाजे ६०,००० पोती माल साठविला जातो. ही सर्व गोदामे बाजार समितीने रजिस्टर केली आहेत. प्रत्येक गोदामामध्ये असणाऱ्या शेतमालाच्या व व्यापाऱ्यांच्या मालाच्या साठ्यासंबधीचे पत्रक बाजार समितीस जनरल कमिशन एजंटकडून प्रत्येक आठवड्यास सादर केले जाते.[८२]

शेतीमालाचा शास्त्रीय पद्धतीने साठा करण्याची आणि त्याच्या तारणावर माफक दराने कर्ज मिळण्याची सोय शेतकऱ्यांना उपलब्ध करून अनुकूल किंमतीचा फायदा घेता यावा यासाठी दिनांक १० मार्च १९५९ पासून ' बॉम्बे स्टेट वेअरहाऊसिंग कॉर्पोरेशन, मुंबई ' या संस्थेचे वखार केंद्र गोरक्षक मंडळ यांच्या इमारतीत उघडण्यात आले. याचा लाभ शेतकऱ्यांनी घ्यावा यासाठी बाजार समितीने बराच प्रचार केला. हे वखार केंद्र बार्शी बाजार आवारात उघडले जावे यासाठी बाजार समितीने संशोधनात्मक प्राथमिक जागेची सोय करून देण्यासाठी कार्पोरेशनला सक्रिय सहकार्य दिले. याशिवाय शेतमालाचा साठा करण्याकरिता जनरल कमिशन एजंट व व्यापारी यांनी कच्च्या व पक्क्या अशा एकूण सुमारे १५० गोदामांचा वापर केला. अशी सर्व गोदामे बाजार समितीने रजिस्टर केली. बार्शी तालुक्यातील ग्रामीण भागातील काही सहकारी सोसायट्यांनी माल साठविण्यासाठी गोदामे बांधण्याच्या योजना हाती घेतल्या. शेळगांव, गाडेगाव, बाभुळगाव, श्रीपतपिंपरी, खामगाव, बावी, पांगरी, वैराग या ठिकाणच्या सोसायट्यांना गोदामे बांधण्यास परवानगी मिळाली. यापैकी शेळगाव बृहत सोसायटीचे गोदाम पूर्ण झाले. तर बाकीच्या गावी गोदाम बांधण्याचे काम चालू होते. शिवाय काही सहकारी सोसायट्यांनी गोदामे भाड्याने घेऊन माल साठविण्याचा व्यवसाय चालू केला होता.[८३]

बार्शी बाजार समितीच्या मुख्य बाजार आवारामध्ये " महाराष्ट्र स्टेट वेअर हौसिंग कार्पोरेशन " ची ३ गोदामे आहेत. या गोदामांची माल साठविण्याची क्षमता ५७२० मे. टन आहे. या गोडाऊनमुळे बार्शी तालुक्यातील शेतकऱ्यांचा खूप फायदा झाला. तसेच वैराग येथील दुय्यम बाजार आवारामध्ये शासकीय योजनानुसार १ गोदाम बांधण्यात आले [८४] इ. स. १९८९-९० अखेर वैराग येथील दुय्यम बाजार आवारामध्ये

महाराष्ट्र स्टेट वेअर हाऊसिंग कार्पोरेशनची दोन गोदामे होती. या गोदामाची माल साठविण्याची क्षमता २००० मे. टन आहे.[८५]

३.३.८ बाजार भाव प्रसारण

शेतकरी पीक तयार झाल्याबरोबर लगेच विक्रीला बाजारात आणतो. शेतकऱ्यांच्या आर्थिक गरजा तर सर्वश्रुत आहेतच. शेतकऱ्यांना शेतमालाच्या भावाची काहीच माहिती नसते. शिवाय केवळ बाजारभावाची माहिती घेण्यासाठी तालुक्याच्या गावाला जाणे त्याला परवडत नाही. त्यामुळे साधारणत: एकाच वेळी बाजारामध्ये प्रचंड माल येतो. सहाजिकच शेतमालाचे भाव आपोआपच उतरतात. त्यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या मालाची योग्य किंमत मिळत नाही. शिवाय बाजारात आणलेला माल पुन्हा परत घेऊन जाणे शेतकऱ्याला सायीचे असत नाही. यातून शेतकऱ्याचे प्रचंड नुकसान होत आलेले आहे.[८६]

शेतमालाचे उत्पादन आणि बाजारव्यवस्था यांच्या दृष्टीने बाजार भाव ही अत्यंत महत्वाची बाब आहे. कारण परिपूर्ण व अद्ययावत बाजारभावाशिवाय शेतीमालाचे उत्पादन आणि बाजारविधीचे कार्य योग्यरित्या होत नाही. बाजारभावाच्या प्रसारामुळे बाजारात चढाओढ निर्माण होते. बाजारातील उलाढाली योग्यरित्या होण्यास मदत होते. बाजारभावासंदर्भात सामान्य लोकांमध्ये एक असा गैरसमज आढळून येतो की व्यापारी, मध्यस्थ वगैरे लोकच मालाचा भाव ठरवतात. परंतू वस्तूस्थिती मात्र तशी नाही. हे लोक केवळ बाजारभावाचे अग्रदूत आहेत. बाजारभावावर ज्या शक्तीचे नियंत्रण असते त्यांच्या हालचालीची चाहूल सर्वप्रथम या लोकांना लागते. मागणी, पुरवठा व अन्य आर्थिक शक्ती यांचेच बाजार भावावर खरेखुरे नियंत्रण असते. या घटकशक्तीच्या प्रक्रियेतून बाजारभाव ठरले जातात. याशिवाय आयात-निर्यात, व्यापारी करार, कर्जपुरवठा, कर्जनिर्बंध, नैसर्गिक आपत्ती यांचाही बाजारभावावर परिणाम होतो.[८७]

शेतकऱ्यांना निरनिराळया बाजारपेठेतील वस्तूच्या मागणी, पुरवठा व किंमत यासंदर्भात माहिती नसल्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होते. हे लक्षात घेऊन सरकारने " डायरेक्टर ऑफ मार्केटिंग अँड इन्स्पेक्शन " ची स्थापना केली. हे मंडळ मागणी, किंमत यासंदर्भात शेतकऱ्यांना माहिती देते. आकाशवाणीच्या निरनिराळया केंद्रातून शेतमालाचे भाव, पुरवठा इत्यादी माहिती सांगण्यात येते.[८८]


मार्केट यार्डमध्ये माल विक्रीस आणणाऱ्या शेतकरी व व्यापारी यांना बाजार भावाची योग्य कल्पना यावी यासाठी मार्केट कमिटीच्या प्रसिद्धी फलकावर प्रत्येक दिवशी चालू बाजारभाव प्रसिद्ध केले जातात. याशिवाय मार्केट क्षेत्रातील ' एकजूट ' व ' गोफण ' इत्यादी वृत्तपत्रातून बाजार पेठेतील आवक व बाजारभाव यांचे साप्ताहिक समालोचन केले जाते. इ. स. १९५४-५५ मध्ये मार्केट क्षेत्रात बार्शी तालुक्यातील दोन लायसेन्स इन्स्पेक्टर्स नेमले होते. त्यांनी प्रत्येक गावास भेटी देऊन बाजार समितीच्या

कामकाजाविषयी शेतकरी व व्यापारी लोकांना माहिती दिली. १ मे १९५७ पासून सांगली बाजार पेठेतील दैनंदिन बाजारभाव, आवक व वायदे बाजारभाव तारेने मागवून सदर भावाचा बार्शी पेठेतील बाजार भावाशी तुलनात्मक तक्ता रोज प्रसिद्ध केला जात होता. इ. स. १९५६-५७ मध्ये बार्शी बाजार समितीने शेतकऱ्यांना दररोज या पेठेतील, इतर पेठेतील व मुंबई बाजारभाव यांची माहिती रेडिओ व दूरध्वनीक्षेपक यांचेद्वारे बार्शी वैराग येथे प्रस्तुत करण्याचा निर्णय घेतला. बहुतेक प्रत्येक खेड्यातील ग्रामपंचायतीकडे रेडिओ होता. त्यामुळे मुंबई राज्यातील प्रमुख बाजारपेठेतील दैनंदिन भाव भारतीय नभोवाणीच्या पुणे केंद्रावरून जाहिर करण्याची योजना सरकारने आखली. या योजनेअंतर्गत प्रमुख पेठ म्हणून बार्शी बाजार समितीचा अंतर्भाव केला.[८९]

बार्शी बाजार आवारातील बाजार भाव रोजच्या नभोवाणीच्या, पुणे केंद्रावरील ग्रामीण कार्यक्रमांतर्गत इतर काही पेठेतील भावाबरोबर सांगितले जात होते. सदर भाव ६ डिसेंबर १९५७ पासून बाजार समितीतर्फे रेडिओ प्रसिद्धीकरता पाठविले जात. बार्शी तालुक्यातील शेतकऱ्यांनी या योजनेचे स्वागत केले. या योजनेशी समन्वय घालून बार्शी बाजार समितीने आपला स्वतंत्र भाव प्रसिद्धी कार्यक्रम इ. स. १९५७-५८ मध्ये अंमलात आणला. या कार्यक्रमाकरिता आवश्यक म्हणून रेडिओ ध्वनिक्षेपण यंत्र इत्यादी साहित्याची बाजार समितीने खरेदी केली. मुंबई केंद्रावरील इतर बाजार पेठांचे भाव स्थानिक बाजार भाव पेठेतील आवक व भाग, विकास योजना, अल्पबजत योजना, नवीन दशमान पद्धतीची वजनमापे तसेच नियंत्रित बाजाराचे शेतकऱ्यांना होणारे फायदे, इत्यादी माहिती ध्वनी क्षेपकावरून प्रक्षेपित केली जाते. रेडिओवर जाहीर झालेले मुंबई पेठेतील भावांची नोंद करून ते व्यापारी वर्गांसाठी पुन्हा ध्वनीक्षेपित केले जात. हा कार्यक्रम रोज सायंकाळी ७.३० पर्यंत चालतो. वैराग दुय्यम बाजार आवारामध्ये अशाच तऱ्हेने भाव प्रसिद्धीचा कार्यक्रम चालू होता. याशिवाय स्थानिक बाजार भाव, मुंबई भाव, काटेवाल्यांचा गटाचा क्रम, सौद्याची सुरूवात यासारख्या बाबींची माहिती शेतकरी व व्यापारी यांना जरूरीनुसार केंव्हाही उपलब्ध व्हावी.यासाठी कार्यालयाच्या आवारात ८ x ६ चा पेठ वार्ता प्रसिद्धी फलक उभा करण्यात आला आहे. याशिवाय इ. स. १९५७-५८ पासून विशाल सह्याद्री, तरूण भारत, सकाळ या दैनिक वृत्तपत्रांतून भाव प्रसिद्ध केले जात होते. सोलापूर समाचार या वृत्तपत्रात या बाजार आवाराचे विस्तृत साप्ताहिक समालोचन प्रसिद्ध केले जात होते.[९०] मार्केट कमिटीने डायरेक्टर ऑफ रूरल डेव्हलप्मेंट किंवा त्यांनी अधिकार दिलेला इतर कोणताही अधिकारी, अंमलदार यांच्या आगाऊ संमतीने ठरविले असतील अशा परिमाणांना अनुसरूनच आपले बाजारभाव परवाना धारक सर्व व्यापारी, जनरल कमिशन एजंट व दलाल यांनी सांगितले पाहिजेत.[९१]

नकाशा क्र . १०

बार्शी बाजार समितीची ग्रामीण भावप्रसिध्दी योजना



संदर्भ : :-कृषी उत्पन्न बाजार समिती, बार्शी, वार्षिक अहवाल, सन इ.स १९५८-५९

बार्शी बाजार समितीचे भावप्रसिद्धी कार्य आतापर्यंत प्रामुख्याने मुख्य व दुय्यम बाजार आवार येथे केंद्रित झाले होते. त्यामुळे शेतकऱ्यांना बाजारभावाची माहिती घेण्यासाठी बार्शीला यावे लागत. त्यामुळे होणारा वेळ व पैसा यांचा अपव्यय टाळण्यासाठी बाजार समितीने इ. स. १९५८-५९ मध्ये भाव प्रसिद्धीची नवी योजना सुरू केली. यासाठी बाजार समितीने तालुक्यातील आठवडी बाजाराची तसेच मध्यवर्ती असणारी आगळगाव, पांगरी, कसबे तडवळे, पानगाव, भातंबरे, गौडगाव, कारी, मालवंडी, मौजे तडवळे, येडशी ही दहा गावे निवडली. या खेडेगावात सहकारी सोसायटी अथवा ग्रामपंचायत यापैकी एकाकडे भावप्रसिद्धीची जबाबदारी सोपविण्यात आली. त्यांना मजबूत लाकडी फलक दिले. बार्शी पेठेतील दैनिक भाव रोज त्याच्यांकडे पोस्टाने पाठविण्यात येतात व ते रोज संबंधित खेडेगावात प्रसिद्ध केले जात होते. हा कार्यक्रम १५ ऑगस्ट १९५९ पासून सुरू करण्यात आला. [९२]

शिवाय मार्केट कमिटीने ' बाजाराची वाटचाल ' नावाचे पाक्षिक इ. स. १९६२ मध्ये सुरू केले होते. सदर पाक्षिक तालुक्यातील सहकारी संस्था, ग्रामपंचायती, स्थानिक व्यापारी यांना विनामूल्य पाठविले जात होते. बार्शी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या बाजारभाव प्रसिध्द करण्याच्या या सर्व प्रयत्नांचा शेतकऱ्यांना तसेच व्यापाऱ्यांना खूप फायदा झाला. याचा बाजार समितीलाही आर्थिक फायदा झाला. [९३]

३.३.९ नियमित मालाची आवक व किंमत

इ. स. १८५६ पूर्वीच्या बार्शीमधील धान्याच्या किंमती उपलब्ध नाहीत. सर्वेक्षण अधिकाऱ्याच्या मतानुसार बार्शीच्या शेजारील इतर उपविभागाएवढीच बार्शीमध्ये धान्याच्या किंमतीमध्ये वाढ झाली होती. इ. स. १८५६-७२ या कालावधीमध्ये १ रूपयामध्ये जास्तीत-जास्त ५२ शेर आणि कमीत-कमी १२ शेर बाजरी मिळत होती. याच कालावधीमध्ये १ रूपयामध्ये जास्तीत जास्त ४४ शेर तर कमीत-कमी ६ शेर गहू मिळायचे. इ. स. १८५६-६१ या काळामध्ये असणाऱ्या ज्वारी आणि बाजरीच्या किंमती इ. स. १८६६-७२ मध्ये तिपटीने वाढल्या. गव्हाच्या किंमती मधील वाढ यापेक्षा अधिक होती. इ. स. १८७१ च्या पूर्वी १ रूपयाला जास्तीत जास्त ६१ शेर ज्वारी मिळायची तर कमीत-कमी १३ शेर ज्वारी मिळत असे. तर याच कालावधीमध्ये १ रूपयाला सरासरी ३३ शेर ज्वारी मिळायची. [९४]

इ. स. १९५४-५५ मध्ये समाधानकारक पाऊस झाल्यामुळे पिकांची स्थिती चांगली होती. शिवाय हैद्राबाद राज्यात कस्टम व सरचार्ज रद्द झाल्यामुळे तेथून बार्शी येथील बाजार आवारामध्ये मोठ्या प्रमाणात आवक झाली. त्यामुळे नियमित जिनसाची आवक अंदाजपत्रकापेक्षा जास्त झाली. विशेषत: शेंगा व कापूस या शेतमालाची आवक मोठ्या प्रमाणात झाली. यामुळे बाजार समितीच्या उत्पन्नात फारच भर पडली. इ. स. १९५४-५५ मध्ये कापसाचे भाव प्रथम तेजीत होते. परंतू ते सुद्धा पुढे मंदीकडे झुकू लागले. मुग, उडीद, करडी या जिनसाचे भाव मोसमाच्या सुरूवातीपासूनच मंदीत होते. तुरीचे भाव मंदीत होते. तेलास निर्यात न मिळाल्यामळे व रेल्वे वॅगन्सचा मागणीप्रमाणे पुरवठा न झाल्यामुळे तेलाचेही भाव घसरले. अन्नधान्याचे विनियंत्रण झाल्यामुळे ज्वारी, बाजरी, गहू या धान्याच्या किंमती मोठ्या प्रमाणात उतरल्या. पुढे सरकारने भावासंबंधी आपले धोरण जाहीर केल्यानंतर या धान्याच्या किंमती स्थिर झाल्या. हळद, मिरची व धने या जिनसाचे भाव इ. स. १९५३-५४ च्या भावाशी तुलना करता मंदीतच होते. एकूणच इ. स. १९५४-५५ मध्ये सर्व नियमित मालाच्या किंमती मंदीतच होत्या. उशीरा पेरण्या, जादा पाऊस, पिकावरील रोग व हैद्राबाद राज्यातील पिकाची नासाडी यामुळे इ. स. १९५६-५७ मध्ये बार्शी बाजार समितीमध्ये नियमित शेतमालाची आवक कमी झाली. विशेषत: शेंगा, कापूस, मुग, उडीद, करडी, ज्वारी या शेतमालाची आवक विशेष कमी जाणवली. हळदीची आवक मात्र जास्त झाली. [९५]

इ. स. १९५५-५६ मध्ये बाजार समितीने हळदीच्या सूट, सांड वगैरे अनिष्ट पद्धती बंद केल्या.त्यामुळे शेतकऱ्यांच्या मनामध्ये बाजार समितीबद्दल विश्वास व समाधान निर्माण झाल्याने बार्शी बाजार आवारात हळदीची आवक मोठ्या प्रमाणात वाढली. यापूर्वी हळदीचे सौदे गुप्त पद्धतीने होत असत.लहान चुंगड्याचा भाव १ रू. कमी धरत असत.परंतू बाजार समितीने या पद्धती बंद केल्या. हळदीच्या भावाची कल्पना शेतकऱ्यांना मिळण्यासाठी सांगलीहून रोजची आवक पेठेतील भाव व वायदा भाव दिनांक १ मे १९५५ पासून मागविण्यात येऊ लागले व त्याची प्रसिद्धी रोजच्या रोज बाजार समितीच्या

प्रसिद्धी फलकावर केली जात होती. इ. स. १९५६-५७ मध्ये गूळाच्या नियमनाची अंमलबजावणी झाल्याने इतर बाजार पेठेतील गूळ विक्रीच्या पद्धतीचा अभ्यास करण्यासाठी बाजार समितीने लिपिक श्री. सुपेकर यांना सांगली व कोल्हापूर येथे पाठविले होते.[९६]

हंगामामध्ये शेंगा, ज्वारी, तूर यांची जावक जादा झाल्याने सौदे पूर्ण होण्यासाठी २ ते ३ दिवस शेतकऱ्यास मुक्काम करावा लागे व जनरल कमिशन एजंट कडे माल तंबूत असे. त्यामुळे शेतकरी व अडते यांची कुचंबना होई. ही समस्या लक्षात घेऊन बाजार समितीने सौद्याची वेळ सकळी ८.३० पासून ५ वाजेपर्यंत अखंड ठेवली. उपस्थितीच्या संदर्भात खरेदीदारासाठी कडक नियम केले. त्यामुळे शेतकरी दुपारी ४ वाजण्याच्या आत आपले माल विक्रीचे पैसे घेऊन घरी जाऊ लागले. ४ नोव्हेंबर १९५७ रोजी बैलगाडीवान संघाने रेल्वे स्टेशनपर्यंत माल वाहून नेण्याचे दर वाढवून मिळावेत अशी मागणी सर्व खरेदीदाराकडे केली. मात्र ही मागणी मान्य न झाल्यामुळे गाडीवान संघाने माल वाहण्याचे काम बंद ठेवले. यावर बाजार समितीने मध्यस्थी करून समझोता घडवून आणला व पेठेचे काम पूर्ववत चालू केले.[९७]

इ. स. १९५७-५८ मध्ये ज्वारी व हळद यांची आवक वाढली. लातूर पेठेतील जास्त भावामुळे मराठवाड्यातून होणारी मुग व उडदाची आवक कमी झाली. सौराष्ट्र, मद्रास या ठिकाणचे शेंगाचे पीक अतिवृष्टीमुळे व्यवस्थित पदरात न पडल्याने इ. स. १९५७-५८ मध्ये गेल्यावर्षीपेक्षा शेंगाची आवक घटली. स्थानिक व्यापाऱ्यांनी मद्रास, म्हैसूर व स्थानिक खरेदीदार व्यापारी यांच्याबरोबर तूर डाळीचे वायद्याचे सौदे पीक हाती पडण्यापूर्वीच मंदीत गेले होते. शिवाय इ. स. १९५७-५८ मध्ये तूरीचे पीक समाधानकारक नसल्याने या वर्षामध्ये तुरीची आवक कमी झाली. हळद व गूळ यांची नेहमीपेक्षा जास्त आवक झाली. करडीची आवक विशेष झाली नाही. इ. स. १९५८-५९ मध्ये बार्शी बाजार आवारामध्ये मुग, उडिद, गहू, ज्वारी व गूळ यांचा व्यापार समाधानकारक झाला. यावर्षी मुगाला आवकेच्या मानाने मागणी जास्त होती. ऑक्टोंबर १९५८ मध्ये उडदाच्या आवकेने उच्चांक गाठला. ज्वारीचीही आवक मोठ्या प्रमाणावर झाली. मात्र तूर व हरभरा या शेतमालाची आवक फारच कमी झाली. यापूर्वी कधीच झाला नव्हता एवढा गूळाचा व्यापार या वर्षी बार्शी बाजारामध्ये झाला. तर मागणी अभावी व लोकांनी सरकारी धान्य दुकानातून मिळणाऱ्या अमेरिकन गव्हाचा वापर केल्यामुळे तसेच गव्हाचे या वर्षी पीक समाधानकारक नसल्याने गव्हाची पेठेतील आवक घटली होती. भारत सरकारने परकीय चलनासठी हंगाम सुरू होताच निर्यात परवाने दिले. त्यामुळे शेंगदाण्याच्या किंमती सुरूवातीपासून मजबूत राहिल्या. यावर्षी बार्शी पेठेमध्ये शेंगाची आवक घटली. कारण पिकांनी कमी उतार दिल्याने व ज्या पूरक पेठेतून शेंगाची आवक होते त्यास पेठेतच ऑईल मिलनी चढत्या भावात शेंगाची खरेदी केली.

इ. स. १९५९-६० मध्ये मुग व उडीद यांची चांगल्या प्रमाणात आवक झाली तर कापसाची आवक फारच कमी झाली. खरीप ज्वारीची आवक यावर्षी खूपच घटली. तूर व हरभरा यांची आवक मोठ्या प्रमाणात झाली. कारण तूर डाळीचे भाव कडाडले व मागणीही वाढली. तूर डाळीस शिमोगा, हुबळी, कोल्हापूर व कऱ्हाड या ठिकाणाहून मागणी वाढली तर स्थानिक पीक कमी आल्याने व स्थानिक डाळीचा खप वाढल्याने पंजाब हरभऱ्याची आवक पेठेत फार मोठ्या प्रमाणात झाली. याचबरोबर स्थानिक हरभऱ्याचेही भाव वाढले. रब्बी पांढरी ज्वारीचे बार्शी महत्त्वाचे केंद्र होते. मात्र या वर्षी ज्वारीचे पीक समाधानकारक नसल्यामुळे पेठेत ज्वारीची आवक बेताची राहिली. यावर्षी बार्शी बाजारामध्ये गूळाची फारशी आवक झाली नाही. १०,००० रवे गूळ गिऱ्हाईकाअभावी पडून राहिले. कारण उत्तर प्रदेश, पंजाब या राज्यात मोठ्या प्रमाणावर गूळ उत्पादन झाले व तो गूळ महाराष्ट्रात आला. त्याचा परिणाम येथील गूळ व्यापाऱ्यावर झाला. इ. स. १९६०-६१ मध्ये भूईमुंग, करडी, खरीप व रब्बी ज्वारी, कापूस, तूर, गूळ व हळद या शेतमालाचा व्यापार समाधानकारक झाला. ज्वारीने आपला आवकेचा ओघ वर्षभर कायम टिकवला. शेंगा व रब्बी ज्वारी यांची आवक थोड्या फार फरकाने टिकून राहिली.[९८]

इ.स. १९५८-५९ मध्ये संपूर्ण सोलापूर जिल्ह्यामध्ये ज्वारीला सर्वाधिक भाव बार्शी तालुक्यामध्ये १२.५८ रू. इतका होता. बाजरी १४.९६ रू. तर गव्हाचा भाव २४.५८ रू. इतका होता. इ. स.१९५७-५८ मध्ये बार्शीमध्ये ज्वारीचा भाव १५.३९ रू. इतका होता. बाजरी १४.८९रू.तर गव्हाचा भाव २१.३५ रू.इतका होता. यावरून असे दिसून येते की इ. स. १८५८ मध्ये बार्शी तालुक्यामध्ये ज्वारीचा भाव कमी झाला. तर गहू व बाजरी यांचा भाव वाढल्याचे दिसते.[९९]

इ. स. १९६१-६२ मध्ये मुग, उडीद, गूळ, भूईमुंग, रब्बी ज्वारी व हळद या शेतमालाची उलाढाल समाधानकारक झाली. रब्बी ज्वारी व भूईमुंग या शेतमालाची आवक वर्षभर सातत्याने कमी-जास्त प्रमाणात टिकून होती. पांढऱ्या ज्वारीची आवक सातत्याने होत असल्यामुळे पिवळ्या ज्वारीची आवक बेताचीच होती. इ. स. १९६३-६४ मध्ये मुग, उडीद, शेंगा, तूर, करडी, साळी या शेतमालाचा व्यापार समाधानकारक झाला. या वर्षात हंगामानंतर वरील शेतमालाचे भाव दीडपट वाढले. तर शेंगाचे भाव दुप्पट वाढले. इ. स. १९६५-६६ मध्ये शेंगा, मुग, उडीद, तूर या शेतमालाची आवक मोठ्या प्रमाणात झाली. यामध्ये शेंगाचा भाव चांगला होता तर इतर शेतमालाचा भाव सर्वसाधारण होता. इ. स. १९६६-६७ मध्ये भूईमुंग, गूळ, मुग, रब्बी, ज्वारी, कडबा व हळद या शेतमालाची उलाढाल समाधानकारक झाली. शेंगा व गूळ यांचे व्यवहार सातत्याने वर्षभर टिकून राहिले. उन्हाळी भूईमुगाची लागवड जास्त झाल्याने किंमतीच्या चढ-उताराप्रमाणे वर्षभर शेंगाची विक्री झाली. या वर्षाचे वैशिष्ट्य म्हणजे शेतमालाच्या किंमती भरमसाठ वाढत राहिल्या. ह्या किंमती म्हणजे भावामधील एक उच्चांक होय. या भाववाढीचा फायदा शेतकऱ्यांनासुद्धा

झाला. इ. स. १९६७-६८ च्या सुरूवातीस मुग व उडीद या शेतमालाचा हंगाम भरात होता. तसेच उन्हाळी शेंग व गूळ यांची उलाढाल समाधानकारक होती. मात्र खरीप पिकाच्या शेंगाची आवक जेमतेम राहिली. तूर, गहू, हरभरा यांची आवक चांगली झाली तर करडीची आवक कमी झाली. गूळाची म्हणावी तशी आवक झाली नाही. सर्व शेतमालाचे भाव एकदम भडकले. एकंदर या वर्षामध्ये भूईमुगाची आवक उत्कृष्ट राहिली तर इतर शेतमालाची आवक दर वर्षासारखीच झाली.[१०१]

इ. स. १९७०-७१ मध्ये मुग, उडीद या शेतमालाची आवक घटली. कारण ऑगस्ट १९७० मध्ये पडलेला पाऊस खरीप पिकास हानिकारक झाला. साधारणत: खरीप धान्य वगळता इतर शेतमालाची आवक बरी झाली. महाराष्ट्र सरकारने मे १९७१ पासून दुष्काळी परिस्थितीमुळे ज्वारी एकाधिकार खरेदी विक्रीवरील बंधने रद्द केल्यामुळे राजस्थान व मध्यप्रदेश या राज्यांतून मोठ्या प्रमाणावर ज्वारीची आवक झाली. याचबरोबर बाजरी, राळा, गहू, गूळ यांची आवक चांगली झाली. मुख्य बाजार आवारामध्ये मिरची व कांदा यांचा व्यापार सुरू झाल्याने या शेतमालाची आवक मोठ्या प्रमाणात झाली. इ. स. १९७१-७२ मध्ये भुईमुंगाची आवक घटली तर करडीची आवक मोठ्या प्रमाणावर झाली. प्रतिकुल परिस्थितीमुळे हळद, गूळ, गहू यांची चांगली आवक होऊ शकली नाही. शासनाच्या एकाधिकार, खरेदी-विक्री धोरणामुळे ज्वारीची आवक होऊ शकली नाही. पुढे ऑगस्ट १९७२ मध्ये ही बंधने शासनाने काढून घेतल्याने ज्वारीची विक्री मोठ्या प्रमाणात झाली. धने, कांदा, हळद, यांची आवक मोठ्या प्रमाणात झाली तर गूळाची आवक संमिश्र राहिली. इ. स. १९७५-७६ मध्ये गहू, जोड, मका, हरभरा, तूर, मुग, शेंग, हळद, धने व कांदा या शेतमालाची आवक मोठ्या प्रमाणात झाली. उत्तर प्रदेशातून मक्याची आवक मोठ्या प्रमाणात झाली. गुजरातमधून बाजरी आली. चित्रदुर्ग, म्हैसूर येथून ज्वारी आली. इ. स. १९७७-७८ मध्ये मुग, उडीद यासह खरीप पिकांची आवक खूप कमी झाली. शेंगाची आवक समाधानकारक होती, तर ज्वारी, गहू, मिरची, कांदा यांची आवक चांगली झाली. कडधान्याची आवक खूपच कमी झाल्याने डाळीचे भाव खूपच वाढले. हळदीची आवकही कमीच झाली. [१०१]

इ. स. १९८५-८६ मध्ये मागील वर्षापेक्षा धान्याची आवक कमी झाली. अन्नधान्यामध्ये गहू, ज्वारी यांची आवक कमी झाली. कडधान्यामध्ये तुरीच्या आवकेमध्ये थोडीशी वाढ झाली. गळीत धान्यामध्ये शेंगाची आवक फारच कमी झाली. सुर्यफुलाचीही हीच परिस्थिती होती. मागील वर्षापेक्षा कांद्याची आवक वाढली. पावसाच्या कमी प्रमाणामुळे पाण्याचे प्रमाण घटले. साहजिकच उसाचे क्षेत्र कमी झाले. त्यामुळे गूळाची आवक कमी झाली. धने व कडब्याची आवक वाढली.

इ. स. १९८७-८८ मध्ये मागील वर्षापेक्षा काही प्रमाणात आवक जास्त झाली. अन्नधान्यामुळे ज्वारी, गहू या शेतमालाची आवक जास्त झाली. तसेच तुरीचीही आवक मोठ्या प्रमाणावर झाली. एकंदर

पाऊस जास्त झाल्यामुळे आवक वाढली. मात्र तेलबियांची आवक कमी झाली. धने, चिंच, कांदा यांचाही व्यापार कमी झाला. इ. स. १९८८-८९ मध्ये मागील वर्षापेक्षा शेतमालाची आवक २२ हजार क्विंटलने वाढली. यामध्ये अन्नधान्याची आवक खूप वाढली. तेलबिया, धने, गूळ, चिंच यांचा व्यापार खूप वाढला तर तुरीची आवक कमी झाली. मात्र हरभऱ्याची आवक वाढली. यावर्षी कांद्याची आवक वाढल्याने व भाव मंदीत निघाल्याने शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून १०० रू. दराने महाराष्ट्र शासनाने कांद्याची खरेदी केली. या कामी बार्शी बाजार समितीने सर्व व्यवस्था चोख केली होती. इ. स. १९८९-९० मध्ये शेतमालाची जास्त आवक झाली. विशेषत: हळद, चिंच, धने या शेतमालाची आवक जास्त झाली. मात्र तूर, तेलबिया यांची आवक कमी झाली.[१०२]

बार्शी बाजारपेठेमध्ये शेतमालाची मोठ्या प्रमाणात आवक होण्याचे प्रमुख कारण रेल्वे वाहतुकीची सोय हे असल्याचे दिसून येते. रेल्वेमुळे बार्शी बाजारपेठ भारतातील मुख्य बाजारपेठांना जोडलेली होती. त्यामुळेच येथील व्यापाराने विशाल स्वरूप धारण केले. बार्शी बाजारपेठेच्या जवळ असलेल्या मराठवाड्यातील १५० मैल परिसरामध्ये लातूर शिवाय शेतमालाची बाजारपेठ नव्हती. शिवाय या मराठवाड्याच्या परिसरामध्ये औद्योगिक कारखान्यांचाही अभाव होता. त्यामुळे मराठवाड्याच्या या मोठ्या प्रदेशातील शेतमाल विक्रीसाठी बार्शी बाजारपेठेमध्ये येत होता. तसेच बार्शी बाजार समितीच्या प्रभावी नियंत्रणाची व नियोजनाची या परिस्थितीला जोड लाभली. मराठवाड्यातील बीड, भूम, कळंब, तुळजापूर, उस्मानाबाद, नांदेड, परळी, परंडा, उदगीर या पेठातून बार्शी बाजारपेठेमध्ये मोठ्या प्रमाणात शेतमालाची आवक होत असे. वाहतुकीच्या उपलब्ध असलेल्या सुलभ सोयीमुळे या शेतमालाची आवक होण्यास चालना मिळाली. लातूर, उदगीर, अहमदपूर, निलंगा, कळंब या ठिकाणाहून विविध प्रकारचा शेतमाल बार्शी बाजारपेठेमध्ये मोठ्या प्रमाणात येतो.[१०३] इ. स. १९६१-६२ मध्ये मार्केटमध्ये शेतमालाची सर्वाधिक आवक झाली. कारण या वर्षामध्ये पाऊस भरपूर पडला. त्यामुळे शेतीच्या उत्पन्नात प्रचंड वाढ झाली. मात्र या वर्षी आवक जास्त झाल्याने शेतमालाच्या किंमती कमी असल्याचे दिसते.[१०४]

याउलट इ. स. १९७४-७५ मध्ये शेतमालाची आवक कमी होती, मात्र शेतमालाच्या आवक होण्याच्या मानाने मालाला आलेली किंमत सर्वाधिक होती. इ. स १९७२-७३ पूर्वी शेतमालाची आवक व किंमत यांच्या प्रमाणात फारसा फरक दिसून येत नाही. मात्र त्यानंतर आवक व किंमत यांच्या प्रमाणात अमुलाग्र बदल झाल्याचे दिसते. साधारणत: शेतमालाच्या किंमती वाढल्याचे दिसून येते. कारण दुष्काळी परिस्थितीने शेतीउत्पादन कमी झाले होते. साहजिकच शेतमालाची भाववाढ अपेक्षितच होती.[१०५]

३.३.१०. जनावरांचा बाजार

प्रत्येक आठवड्यात एखाद्या विशिष्ट दिवशी नियमितपणे जनावरांचे बाजार भरतात. याशिवाय जत्रा, उत्सव, उरूस याप्रसंगी दरवर्षी काही ठिकाणी जनावरांचे बाजार भरतात. जनावरांच्या बाजारांचे वैशिष्टय म्हणजे विक्रीदार व खरेदीदार हे दोघेही एकमेकांना बनविण्याचा प्रयत्न करतात. जनावरांच्या अंगावरील अशुभ चिन्हे, त्यांच्या खोडी, व्यंगे या बाबी लपविण्याकरीता नानात-हेच्या क्लृप्त्या योजतात. बहुतेक बाजारपेठांमध्ये जनावरांच्या किंमती गुप्त पध्दतीने किंवा सांकेतिक भाषेमध्ये ठरविल्या जातात. जनावरांच्या बाजारात शेतकरी हा बहुदा खरेदीदारच असतो. क्वचित प्रसंगी तो विक्रेताही असू शकतो. जनावरे सांभाळून त्यांची योग्यवेळी विक्री करण्याचा धंदा करणारा एक वर्ग बहुदा सर्वत्र आढळून येतो. जनावरांच्या बाजारातील एक महत्वाचा घटक म्हणजे ' दलाल ' होय. त्यांचे जनावरांच्या बाजारावर मोठे प्रभूत्व दिसून येते. जुन्या मुंबई राज्यातील शहादा, पाटण, शिरपूर आणि आंध्र प्रदेशातील नारशिंगी, येरगड्डा या बाजारांपासून भारतामध्ये जनावरांच्या बाजार नियंत्रणास सुरूवात झाली. सध्या या कार्यास गती आलेली आहे. यामध्ये महाराष्ट्र आघाडीवर आहे. [१०६]

१५ जुलै १९५९ रोजी बार्शी बाजार समितीला जनावरांच्या बाजाराचे नियमन करण्याची परवानगी मिळाली. परंतू जागेच्या अभावी त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी पुढे सहा महिन्यानंतर झाली. सदरचा बाजार पूर्वी नगरपालिकेच्या जागेत भरत होता. पुढे तो बार्शी बाजार समितीच्या जागेत भरू लागला. त्यासाठीच्या आवश्यक त्या सोयी - सुविधा बाजार समितीने निर्माण केल्या. ४ एप्रिल १९६४ रोजी बार्शी कृषी उत्पन्न बाजार समितीचे चेअरमन श्री. कल्याणराव रामराव पाटील यांच्या हस्ते गाईची पूजा करून जनावराच्या बाजाराच्या नियमनाच्या कार्यास प्रारंभ झाला. त्यावेळी तेथे वीज नव्हती म्हणून तात्पुरत्या स्वरूपाची लाईटची व्यवस्था करण्यात आली. पुढे या बाजारातील वाढत्या उलाढालीमुळे जनावरांच्या बाजारामध्ये लाकडी खांब टाकून लाईटची सोय केली. जनावरांना व माणसांना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था व्हावी म्हणून बाजार समितीने तेथे दोन विहिरी खोदल्या. शिवाय पावसाळयात जनावरांना त्रास होऊ नये म्हणून १०० फूट x १८ फूट आकारांचे मोठे शेड उभारले. त्यामुळे शेतकरी व जनावरांचे व्यापारी यांना पावसाळ्यात निवारा झाला.[१०७]

तक्ता क्र . २५

जनावरांच्या बाजारातील भाषा

संख्या	भाषा	संख्या	भाषा	संख्या	भाषा
१	कैला	७०	उना बट	४०००	गंडा ठोकन
२	जोड कैला	८०	बट	५०००	खंमस ठोकन

३	धला	९०	उनी	६०००	सबई ठोकन
४	गंडा	१००	शिकारा	७०००	उना बट ठोकन
५	खंमस	२००	डुबरा	८०००	बट ठोकन
६	सबई	३००	धला	९०००	उनी ठोकन
७	उना बट	४००	नाकी / गंडा	१००००	अस्सर ठोकन
८	बट	५००	खंमस / कप	२००००	सुती ठोकन
९	उनी	६००	सबई	३००००	मेटा ठोकन
१०	अस्सर	७००	उना बट	४००००	नाकी ठोकन
११	एक्कन	८००	बट	५००००	निमती ठोकन
२०	सुती	९००	उनी	६००००	सबई ठोकन
३०	मेटा	१०००	ठोकन	७००००	उना बट ठोकन
४०	नाकी	११००	एक्कम	८००००	बट ठोकन
५०	निमती	२०००	जोड कैला ठोकन	९००००	उनी ठोकन
६०	सबई	३०००	धला ठोकन	१०००००	शिकारा ठोकन

(संदर्भ : मुलाखत, सुरेश दत्तात्रय कांबळे, जनावरांचे व्यापारी, मु. पो. आगळगाव)

(यामध्ये काही संख्यासाठीचे शब्द समान असले तरी जनावरांचे व्यापारी हाताच्या व बोटाच्या विशिष्ट हालचालीवरून योग्य तो अर्थ घेतात.)

इ. स. १९६६-६७ मध्ये जनावरांच्या बाजाराकडे अधिक लक्ष केंद्रीत केल्याने आठवडे बाजारात जनावरांची आवक मोठ्या प्रमाणात होऊन मोठ-मोठे व्यवहार घडले. बाजारात जनावर विक्रीसाठी आणणाऱ्या शेतकरी व व्यापारी वर्गाच्या खरेदी विक्री वगैरे सुखसोयीसाठी, जनावरांच्या पिण्याच्या पाण्याची व निवाऱ्याची उत्कृष्ट सोय केल्यामुळे हा जनावरांचा बाजार खूपच नावारूपाला आला. हा बाजार शुक्रवार ते रविवारपर्यंत असतो. मात्र मुख्यत्वेकरून व्यवहार शनिवारी घडतात.[१०८] बार्शी मध्ये प्रत्येक शनिवारी आठवडी बाजार भरतो. हा या तालुक्यातील सर्वात मोठा आठवडी बाजार आहे. यामध्ये जनावरांचा बाजार खूप मोठ्या स्वरूपात भरतो. शिवाय तालुक्यातील वैराग येथे प्रत्येक बुधवारी जनावरांचा बाजार मोठ्या स्वरूपात भरतो. [१०९]

तक्ता क्र . २६

बार्शी जनावराच्या बाजारातील आर्थिक उलाढाल

वर्ष	बार्शी मुख्य आवार	वैराग दुय्यम आवार
१९६६-६७	३४,०२,१६०.००	-
१९६७-६८	४६,७०,६००.००	७,५८,३३०.००
१९७३-७४	९८,४४,९९५.००	१९,३१,४६०.००
१९७४-७५	१,१०,६१,३४७.००	१६,२३,०४०.००
१९७५-७६	१,१५,८४,७५३.००	१०,२२,३०१.००
१९७७-७८	१,६६,९३,५०१.००	२२,३८,२८०.००
१९८५-८६	१,०४,१८,५४२.००	३४,४५,४००.००
१९८७-८८	१,८७,०९,५००.००	६१,०२,१५०.००
१९८८-८९	१,८०,६४,७००.००	६१,३५,९००.००
१९८९-९०	१,२६,९०,६००.००	७०,५१,३००.००
१९९०-९१	३,००,१४,१००.००	४४,८७,०००.००
१९९१-९२	२,०६,३६,४२१.००	६१,७२,८००.००

(संदर्भ : कृषी उत्पन्न बाजार समिती बार्शी, जि. सोलापूर, वार्षिक अहवाल, संबंधित वर्ष)

वरील टेबलवरून असे लक्षात येते की, बार्शी व वैराग येथील जनावरांच्या बाजाराच्या माध्यमातून बार्शी तालुक्यामध्ये फार मोठी आर्थिक उलाढाल होते. मात्र सध्या बार्शी तालुक्यातील काही खेडेगावात भरणारे जनावरांचे बाजार बंद झालेले आहेत. केवळ बार्शी व वैराग येथे भरणारेच जनावरांचे बाजार अस्तित्वात आहेत. अर्थात त्यातून होणारी आर्थिक उलाढाल मात्र निश्चितच चांगली आहे.

३.३.११. बाजार समितीचे कार्य व प्रशासन

शेतकऱ्यांच्या मालास योग्य भाव मिळण्यासाठी बार्शी बाजार पेठेमध्ये विक्रीस येणाऱ्या मालाची विक्री उघड लिलावाने बाजार समितीच्या अधिकृत प्रतिनिधीच्या देखरेखेखाली होते. त्यामुळे खरेदी विक्रीवर नियंत्रण राहून माती, सूट, सांड अशा बाबीस कायमचा आळा बसला आहे. याचा शेतकऱ्यांना खूप फायदा झाला आहे. शेतमालाची तोलाई चोख होण्याच्या दृष्टीने दक्षता बाळगली जाते. बाजार समितीचे लायसेन्स इन्स्पेक्टर्स वेळोवेळी मार्केटमध्ये फिरून मालाच्या तोलाईवर देखरेख करीत असतात. मार्केट कमिटी / बाजार समिती काटापट्टी बुके मोफत पुरविते व त्या काटापट्टीची तपासणी करते. शिवाय दैनंदिन व्यवहारामध्ये येणाऱ्या अडचणींचा विचार करून परस्पर सहकार्याने व समजुतीने मार्ग काढण्यासाठी व्यापारी व बाजार समिती सतत प्रयत्नशील असतात.

बार्शीमधील व्यापाऱ्यांनी रेल्वे वॅगन्सचा पुरवठा योग्य प्रमाणात व्हावा म्हणून कृषी ऊत्पन्न बाजार समितीच्या माध्यमातून प्रयत्न केले. त्यामुळे मार्केट कमिटीने व्यापाऱ्यांच्या रेल्वे कमिटीवर श्री. बाळासाहेब कथले यांची नेमणूक केली. साधारण: शेतमालाची आवड प्रचंड झाल्यामुळे बार्शी पेठेमध्ये लिलाव रोजचे रोज पूर्ण होत नव्हते. त्यामुळे दिनांक ५ फेब्रुवारी १९६० रोजी बार्शी बाजार समितीने व्यापाऱ्याबरोबर चर्चा करून यावर तोडगा काढून शेतकऱ्यांची सोय केली. प्रचलित कडबातळाची जागा बार्शी नगरपालिकेची होती. नगरपालिका प्रत्येक गाडीस २५ नये पैसे तळभाडे वसूल करत, मात्र त्या शेतकऱ्यांना कोणत्याच सोयी उपलब्ध करून देत नव्हती. त्यामुळे बार्शी बाजार समितीने २४ जानेवारी १९६० रोजी नारळी बागेची सरकारी मालकीची जागा कडबा तळासाठी घेण्याचे ठरविले व त्यासाठी कलेक्टरकडे विनंती केली. याच वर्षामध्ये नवीन दशमान वजनाचा संच समितीने खरेदी केला. शेतकरी व व्यापारांना तो माहित व्हावा म्हणून ऑफिसमध्ये मांडला. शिवाय मेट्रीक पद्धतीच्या वजनाची संपूर्ण माहिती दर्शविणारी संक्षिप्त पत्रके बाजार समितीने प्रसिद्ध केली.[११०]

इ. स. १९६२-६३ मध्ये मुग व उडीद या शेतमालाची विक्री बाजार समितीने टेंडर पद्धतीने सुरू केली. त्यामुळे शेतकऱ्यांच्या मालाची विक्री रोजच्या रोज होऊ लागली. अशा पद्धतीने अंमलबजावणी करणारी बार्शी बाजार समिती ही महाराष्ट्र राज्यातील पहिली बाजार समिती होय. इ. स. १९६०-६१ मध्ये व्यापारी प्रतवारीचा अभिनव उपक्रम बाजार समितीने सुरू केला. पुढे त्यात आवश्यकतेनुसार सुधारणाही केल्या. ज्वारी खरेदी करण्यापूर्वी सदर ज्वारीच्या प्रतवारीचे प्रमाणपत्र बाजार समितीच्या ग्रेडरकडून घेतले जात व नंतर त्यानुसार ज्वारीची खरेदी केली जात होती. यासाठी आधुनिक साधनाने सुसज्ज असे प्रतवार केंद्र या बाजार समितीने सुरू केले होते व प्रतवारीचे प्रशिक्षण घेतलेले श्री. सुपेकर हे प्रतवारीचे काम पाहत होते. ७ जून १९६४ च्या बाजार समितीच्या सभेत बार्शी बाजार समितीच्या मुख्य बाजार आवाराला " पंडीत जवाहरलाल नेहरू मुख्य बाजार आवार " हे नाव देण्याचा ठराव सर्वानुमते पास करण्यात आला.[१११]

२० ऑक्टोबर १९६९ रोजी बाजार पेठेचे मुख्य बाजार आवारामध्ये स्थलांतर झाले. एकाच ठिकाणी सर्व बाजारपेठ आल्यामुळे बाजार समितीस बाजार पेठेवर नियंत्रण ठेवणे सुलभ झाले. बाजार समितीच्या कार्यालयाची इमारत पूर्ण करण्यासाठी ७२३०.४८ रू.खर्च आला. कांदा व मिरचीच्या व्यापाराकरिता बाजार समितीने ७ गाळे काढून ते १५ रू. भाड्याने दिले. यासाठी बाजार समितीला १९१०१.३० रू. खर्च आला. शिवाय बाजार समितीने गाडीतळाची व्यवस्था केली.[११२]

सहकारी कर्जवसुलीचे काम महाराष्ट्र शासनाने बाजार समित्यावर टाकल्याने इ. स. १९७५-७६ मध्ये बार्शी बाजार समितीने एकूण १६१५९.४८ रूपये वसुली केली. सदर वसुलीची रक्कम बँकाच्या त्या-त्या शाखांना वर्ग केली. ७ जुलै १९७६ रोजी बार्शी बाजार समितीने महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. शंकरराव

चव्हाण यांच्या शुभहस्ते बाजार समितीचा रौप्य महोत्सव साजरा केला. याप्रसंगी एक स्मरणिका शंकरराव मोहीते-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली प्रकाशित करण्यात आली. या कार्यक्रमास तत्कालीन महाराष्ट्राचे सहकार मंत्री,कृषी मंत्री, समाजकल्याण मंत्री, जिल्ह्यातील आमदार, पंचायत समितीचे सभापती व सरकारी अधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते.[११३] शेतकऱ्यांनी आपला शेतमाल जास्तीत जास्त प्रमाणात मार्केट यार्डवर आणावा व खेडयातून मालविक्री टाळावी यासंबंधी माहिती देणारे पोस्टर तयार करून ते मार्केट क्षेत्रातील ग्रामपंचायती, सहकारी सोसायट्या व गावकामगार यांच्यामार्फत प्रसिध्द केले होते.

शेतकरी निवास व शेतकरी मेळावा : इ. स. १९६५-६६ मध्ये मुख्य बाजार आवारामध्ये एक शेतकरी निवास बांधण्याचे काम घेतले होते ते पूर्ण झाले. या कामावर बाजार समितीने २५,६५२.२३ रू खर्च केला. या निवासाचा शेतकऱ्यांना व व्यापारांना चांगला उपयोग होतो. दि १७ फेब्रुवारी १९६६ रोजी बाजार समितीची सभा गूळ खांडसरी सहकारी सोसायटी पांगरी येथे भरली होती. बाजार समितीचे तत्कालीन चेअरमन श्री कल्याणराव रामराव पाटील यांनी बार्शी तालुक्यातील शेतकऱ्यांना बाजार कायदे, नियम, पोटनियम व बाजार समितीचे कामकाज याची माहिती दिली. तसेच शेतकऱ्यांच्या अडीअडचणी संदर्भात उपस्थित शेतकऱ्यांशी चर्चा केली.

प्लॅटफॉर्मस : मुख्य बाजार आवारामध्ये आडत बाजार हालविण्याच्या दृष्टीने बाजार समितीने बाजार आवारात प्लॉटस् पाडून इ. स. १९६५-६६ मध्ये सदर जागेचा भाडेपट्टा रजिस्टर करून घेतला. जनरल कमिशन एजंट यांना शेतमाल विक्रीकरीता गैरसोय होऊ नये म्हणून मार्केट कमिटीने इ. स. १९६५-६६ मध्ये जनरल कमिशन एजंटच्या दुकानासमोर प्लॅटफॉर्मस् बांधले. या कामावर बाजार समितीचा ९५,७७६.७३ रू. इतका खर्च झाला.[११४]

प्रशासन : सुयोग्य प्रशासन हा बाजार व्यवस्थेचा कणा असतो. बाजार समितीला बाजाराच्या व्यवस्थापनेसाठी, पिके, आकडेवारी व बाजार वृत्त यासंबंधीची माहिती गोळा करण्यासाठी, व्यवस्थित ठेवण्यासाठी व तिचा प्रसार करण्यासाठी शिवाय आपली कर्तव्ये योग्यरित्या पार पाडण्यासाठी चिटणीस (सचिव) व आवश्यक असे इतर अधिकारी व कर्मचारी नियुक्त करण्याचा अधिकार आहे. धोरण ठरविणे व त्याची अंमलबजावणी करणे ही कोणत्याही कारभाराची दोन वेगवेगळी अंगे असतात. एकाशिवाय दुसऱ्याचे चालणार नाही.[११५] बार्शी बाजार समितीची प्रशासकीय बाजू बाजार समितीचा कर्मचारी वर्ग सांभाळत असतो. कर्मचारी वर्ग हा बाजार समितीचा खूप महत्वाचा घटक आहे. बाजार समितीच्या अधिकारी या वर्गामध्ये सचिव, सहसचिव, उपसचिव, सहाय्यक सचिव व हिशेबनीस यांचा समावेश होतो. याशिवाय इतर विविध कर्मचारीही प्रशासनासाठी महत्त्वाचे असतात.[११६]

सचिव हा बाजार समितीचा मुख्य कार्यकारी अधिकारी असतो. हा बाजार समितीचे वेगवेगळे ठराव अंमलात आणतो. सर्व प्रकारचा पत्रव्यवहार, हिशोब व पत्रके यास तो जबाबदार असतो. [११७] बार्शी कृषी उत्पन्न बाजार समितीला लाभलेल्या सचिवापैकी श्री. कुलकर्णी. डि. पी. यांचा कार्यकाल सर्वात जास्त आहे. शिवाय तो केवळ कालावधीच्या दृष्टीकोणातून जास्त नसून, बार्शी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने त्याचा कार्यकाळ ऐतिहासिक मानला जातो.

बाजार समितीकडून प्रतवारीकार या अधिकाऱ्याची नियुक्ती होते. याच्यावर मालाची योग्य प्रतवारी करण्याची खूप महत्वाची जबाबदारी असते. इ. स. १९६२ पासून बार्शी कृषी उत्पन्न बाजार समितीने प्रतवार योजना अंमलात आणली. बार्शी बाजार आवारात दोन प्रतवारीकार कर्मचारी आहेत तर वैराग येथे एक प्रतवारीकार कर्मचारी आहे. तसेच बार्शी व वैराग येथे शासनामार्फत प्रत्येकी एक प्रतवारीकार प्रतवारीचे काम करत होते.[११८] बाजार समितीच्या विविध महत्वाच्या अधिकाऱ्यापैकी निरिक्षक हा एक महत्वाचा अधिकारी होय. बाजारात वापरात असणारी वजने व मापे निरिक्षकाने सहा महिण्यातून किमान एकदा प्रमाणभूत वजनाबरोबर तपासून पाहून त्यावर योग्य ती निशाणी करणे ही या अधिकाऱ्याकाऱ्याची महत्वाची जबाबदारी असते. या निरीक्षकाच्या ताब्यातील वजन करण्याची साधने बरोबर आहेत किंवा नाहीत ते डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रीज यांच्याकडून वेळोवेळी तपासून पाहिले जाते. यामुळे त्याच्या कामात पारदर्शकता व शेतमालाच्या तोलाईमध्ये शेतकऱ्यांची फसवणूक होत नाही.[११९]

३. ४. तालुक्याच्या आर्थिक विकासातील बाजार समितीचे योगदान

बार्शी हा प्रामुख्याने कृषीप्रधान तालुका आहे. सोलापूर जिल्ह्यामध्ये सर्वात उत्तम प्रतीची मृदा प्रामुख्याने बार्शी तालुक्यात आढळते. साहजिकच बार्शी तालुका शेतीउत्पादनात अग्रेसर आहे. बार्शी तालुक्याच्या आर्थिक विकासामध्ये शेतीचा मोलाचा वाटा आहे. या शेतीउत्पादनाला योग्य आर्थिक न्याय देण्याचे काम कृषी उत्पन्न बाजार समितीने केले आहे. शेतमालाला चांगला भाव मिळाल्यामुळे शेतकरी पडीक जमीन मोठ्या प्रमाणात लागवडीखाली आणू लागला. त्यामुळे तालुक्याच्या एकूण कृषी उत्पादनामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली. थोडक्यात या शेतीच्या माध्यमातून बार्शी तालुक्याच्या आर्थिक विकासामध्ये बाजार समितीचे योगदान महत्वपूर्ण आहे. कृषी उत्पन्न बाजार समितीमुळेच बार्शीमध्ये वखार व्यवसायाला चालना मिळाली. शेतमालावर प्रक्रिया करण्याच्या उद्योगास चालना मिळाली. बार्शीची डाळ संपूर्ण भारतात प्रसिध्द आहे. या ठिकाणी जवळ-जवळ २५ पेक्षा अधिक डाळ कारखाने आहेत.

शेती विकासामुळे बँका, पतसंस्था यांचे जाळे निर्माण झाले. त्यांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना मुबलक प्रमाणात पैसा उपलब्ध झाला. शेतकऱ्यांची पत वाढू लागली. आर्थिक पाठबळामुळे शेतकरी

आधुनिक तंत्राने शेती करू लागला. साहजिकच शेतीउत्पादन प्रचंड वाढले. आधुनिक तंत्राच्या सहाय्याने बार्शी तालुक्यातील शेतकरी निर्यातक्षम उत्पादन घेऊ लागला. थोडक्यात त्याचा शेतीकडे पाहण्याचा दृष्टीकोणच बदलला. शेतीच्या या विकासामुळे बार्शी तालुक्यात शेतीपूरक उद्योगधंदे मोठ्या प्रमाणात वाढले. उदा. खते, बी-बियाणे, किटकनाशके, शेतीपूरक अवजारे निर्मिती इत्यादी व्यवसाय भरभराटीस आले. रेल्वे, रस्ते अशा दळणवळणाच्या प्रभावी सोयीमुळे बार्शी बाजार आवारात मोठ्या प्रमाणात शेतमालाची आवक वाढली. या माध्यमातून येथे फार मोठी आर्थिक उलाढाल घडून येते. याचा बार्शी तालुक्याच्या आर्थिक विकासाशी जवळचा संबंध आहे. थोडक्यात बाजार समितीने बार्शी तालुक्याच्या आर्थिक विकासामध्ये अनन्यसाधारण योगदान आहे.

संदर्भ साधने

१) कुलकर्णी. डी. पी., शेतीमालाची बाजारव्यवस्था, ८ऑक्टोबर १९६२ ,पृ. १ .

२) गोखले. आर. एम., स्वातंत्र्योत्तर भारतीय अर्थव्यवस्था, इ. स. १९७८, पृ. १५८.

३) मुंबई पुराभिलेखागार, भारतीय जनगणना १९६१, फाईल नं आर-४००१६/२, पृ. २१६.

४) कुलकर्णी. डी. पी., पूर्वोक्त, पृ. ३, ४.

५) कित्ता, पृ. ९.

६) प्रा. काळे शिवाजीराव, विपणन आणि विक्रय व्यवस्थापन, फेब्रुवारी १९९३, पृ. १०१.

७) गोखले. आर. एम., पूर्वोक्त, पृ. १५०, १७३, १७५.

८) डॉ. प्रभाकर देशमुख, भारताची अर्थव्यवस्था, नोव्हेंबर १९८७, पृ. १०४.

९) जोशी. व. श., महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदीविक्री अधिनियम १९६३ व १९६७, पृ. ५.

१०) प्रा. काळे शिवाजीराव, पूर्वोक्त, पृ. १०१, १०२.

११) कुलकर्णी. डी. पी., पूर्वोक्त, पृ. ६, ७, १०७, १०८.

१२) खांडेकर. द. ग., सन १९३९ चा मुंबई शेती उत्पन्न मार्केट अधिनियम, सन १९५९, पृ. ५, ६.

१३) कुलकर्णी. डी. पी., पूर्वोक्त, पृ. १०८, १०९, ११०.

१४) गोखले. आर. एम., पूर्वोक्त, पृ. १७६, १७७.

१५) शिंदे. जी .के, महाराष्ट्रातील बाजार समित्या आणि त्यांचे नियमन कार्य, पृ. (च).

१६) स्मृतिगंध स्मरणिका, कृषी उत्पन्न बाजार समिती बार्शी, ७ जुलै १९७६, पृ. २.

१७) महाराष्ट्र स्टेट गॅझेटियर, सोलापूर जिल्हा, इ. स. १९७७, पृ. ४८९.

१८) कृषी उत्पन्न बाजार समिती बार्शी, वार्षिक अहवाल, इ. स. १९५४-५५, पृ. १, २.

१९) मुंबई पुराभिलेख, फाईल नं आर-१९६९५/३, पृ. ३.

२०) जोशी. व. श., पूर्वोक्त, पृ. ७, ८.

२१) खांडेकर. द. ग., पूर्वोक्त, पृ. ८.

२२) मुंबई पुराभिलेख, फाईल नं आर-१९६९५/३, पृ. ९, १०, ११, १२.

२३) जोशी. व. श., पूर्वोक्त, पृ. २६, २७.

२४) डॉ. प्रभाकर देशमुख, पूर्वोक्त, पृ. १०२, १०३, १०४.

२५) कुलकर्णी. डी. पी., पूर्वोक्त, पृ. ९३ ते ९५.

२६) प्रा. काळे शिवाजीराव., पूर्वोक्त, पृ. ११०, १११.

२७) कृषी उत्पन्न बाजार समिती बार्शी, वार्षिक अहवाल, इ. स. १९५४-५५, पृ. २५.

२८) स्मृतिगंध, कृषी उत्पन्न बाजार समिती बार्शी, १० जुलै १९७६, पृ. ६, ७.

२९) कृषी उत्पन्न बाजार समिती बार्शी, वार्षिक अहवाल, इ. स. १९६५-६६, पृ. १८.

३०) कित्ता, इ. स. १९६६-६७, पृ. २७, २८.

३१) कित्ता, इ. स. १९८९-९०, पृ. ९, १०.

३२) कुलकर्णी. डी. पी., पूर्वोक्त, पृ. १११.

३३) गॅझेटियर ऑफ बॉम्बे प्रेसिडेन्सी, सोलापूर जिल्ह , इ. स. १८८४, पृ. ५०३.

३४) कृषी उत्पन्न बाजार समिती बार्शी, वार्षिक अहवाल, इ. स. १९५४-५५, पृ. २५.

३५) कित्ता, इ. स. १९५६-५७, पृ. २०.

३६) कित्ता, इ. स. १९५७-५८, पृ. २४, २५.

३७) कित्ता, इ. स. १९५८-५९, पृ. २६.

३८) कित्ता, इ. स. १९६०-६१, पृ. ४.

३९) स्मृतिगंध, कृषी उत्पन्न बाजार समिती बार्शी, ७ जुलै १९७६,

४०) मुलाखत, श्री. चंद्रकांत नाना निंबाळकर, मा आमदार, वैराग-मोहोळ.

४१) कृषी उत्पन्न बाजार समिती बार्शी, वार्षिक अहवाल, इ. स. १९७४-७५, पृ. १३.

४२) कित्ता, इ. स. १९८५-८६, पृ. ११.

४३) स्मृतिगंध, कृषी उत्पन्न बाजार समिती बार्शी, ७ जुलै १९७६, पृ. ८, ९.

४४) मुंबई पुराभिलेखागार, भारतीय जनगणना १९६१, फाईल नं आर-४००१६/२, पृ. २११.

४५) कृषी उत्पन्न बाजार समिती वार्षिक अहवाल, इ. स. १९७०-७१,जनावरांची आवक-किंमत तक्ता

४६) कित्ता, इ. स. १९७४-७५, १९७७-७८, संख्यात्मक विभाग, तक्ता नं. ४.

४७) कित्ता, इ. स. १९७७-७८ पृ. ११.

४८) भारताची जनगणना , जिल्हा जनगणना हस्तपुस्तिका, सोलापूर, इ. स. १९९१, पृ. ६, १४.

४९) कृषी उत्पन्न बाजार समिती अहवाल, इ. स. १९६७-६८, संख्यात्मक विभाग, उत्पन्न व खर्च तक्ता.

५०) कित्ता, इ. स. १९७४-७५, १९७७-७८, तक्ता नं. ४.

५१) कुलकर्णी. डी. पी., पूर्वोक्त, पृ. १०९.

५२) स्मृतिगंध, कृषी उत्पन्न बाजार समिती बार्शी, ७जुलै १९७६, पृ. ४, ९.

५३) कृषी उत्पन्न बाजार समिती बार्शी, वार्षिक अहवाल, इ. स. १९५४-५५ व १९५६-५७, पृ. १.

५४) कित्ता, इ. स. १९८९-९०, पृ. २.

५५) कुलकर्णी. डी. पी., पूर्वोक्त, पृ. २६ ते ३०

५६) जोशी. व. श, पूर्वोक्त, पृ. १३४

५७) कृषी उत्पन्न बाजार समिती बार्शी, वार्षिक अहवाल, इ. स. १९५४-५५, पृ. १९.

५८) कित्ता, इ. स. १९६७-६८, पृ. १९.

५९) मुंबई पुराभिलेख, फाईल नं आर-१९६९५/३, पृ. १४.

६०) प्रा. सौ. पंडित शांता व डॉ. पाटिल लिला, कृषी अर्थशास्त्राची मूलतत्त्वे, इ. स. १९८६, पृ. ३२५.

६१) गोखले. आर. एम., पूर्वोक्त, पृ. १७४.

६२) कुलकर्णी. डी. पी., पूर्वोक्त, पृ. १८ ते २१.

६३) कृषी उत्पन्न बाजार समिती बार्शी, वार्षिक अहवाल, इ. स. १९६५-६६, पृ. १२ ते १४.

६४) कित्ता, इ. स. १९६६-६७, पृ. २४.

६५) कित्ता, इ. स. १९७१-७२, पृ. ११, १९.

६६) कित्ता, इ. स. १९७४-७५, पृ. १३, १४.

६७) कित्ता, इ. स. १९७५-७६, पृ. ९, १०.

६८) प्रा. सौ. पंडित शांता व डॉ. पाटिल लिला, पूर्वोक्त, पृ. ३२६.

६९) मुंबई पुराभिलेख, फाईल नं आर-१९६९५/३, पृ. ११, १२, १३.

७०) गोखले. आर. एम, पूर्वोक्त, पृ. १७४.

७१) मुंबई पुराभिलेख, फाईल नं आर-१९६९५/३, पृ. १४.

७२) कृषी उत्पन्न बाजार समिती बार्शी, वार्षिक अहवाल, इ. स. १९५४-५५, पृ. २३.

७३) कित्ता, इ. स. १९५६-५७, पृ. १५.

७४) कित्ता, इ. स. १९५७-५८, पृ. १५, १६.

७५) मुंबई पुराभिलेख, फाईल नं आर-१९६९५/३, पृ. १८.

७६) मुंबई पुराभिलेख, फाईल नं आर-२२१६१/६३, पृ. ३ ते ६, व १३.

७७) कृषी उत्पन्न बाजार समिती बार्शी, वार्षिक अहवाल, इ. स. १९५९-६०, पृ. २१.

७८) कुलकर्णी. डी. पी., पूर्वोक्त, पृ. ५८ ते ६०.

७९) कित्ता, पृ. ६१, ६२.

८०) गोखले. आर. एम., पूर्वोक्त, पृ. १७४.

८१) सहकारी महाराष्ट्र, रौप्य महोत्सवी वर्ष, नोव्हेंबर १९८६, पृ. १६५ ते १६८.

८२) कृषी उत्पन्न बाजार समिती बार्शी, वार्षिक अहवाल, इ. स. १९५६-५७, पृ. १२, १३.

८३) कित्ता, इ. स. १९५७-५८, १९५८-५९, १९५९-६०, पृ. १६ ते १९.

८४) कित्ता, इ. स. १९८५-८६, पृ. ६.

८५) कित्ता, इ. स. १९८९-९०, पृ. ५.

८६) देशपांडे. स. ह., भारतीय शेती, फेब्रुवारी १९६२, पृ. १, २.

८७) कुलकर्णी. डी. पी., पूर्वोक्त, पृ. ६७, ९६ ते ९९.

८८) गोखले. आर. एम., पूर्वोक्त, पृ. १७४, १७५.

८९) कृषी उत्पन्न बाजार समिती बार्शी, वार्षिक अहवाल, इ. स. १९५४-५५, पृ. २४.

९०) कित्ता, इ. स. १९५७-५८, पृ. १८, १९, २०.

९१) मुंबई पुराभिलेख, फाईल नं आर-१९६९५/३, पृ. १४.

९२) कृषी उत्पन्न बाजार समिती बार्शी, वार्षिक अहवाल, इ. स. १९५८-५९, पृ. २०, २१.

९३) कित्ता, इ. स. १९६२-६३ व १९६३-६४, पृ. १५, १६.

९४) गॅझेटियर ऑफ बॉम्बे प्रेसिडेन्सी, खंड २०,सोलापूर जिल्ह, इ. स. १८८४, पृ. ३४९.

९५) कित्ता, इ. स. १९५४-५५, १९५६-५७, पृ. ४, ५, १०.

९६) कृषी उत्पन्न बाजार समिती बार्शी, वार्षिक अहवाल, इ. स. १९५६-५७, पृ.१३ ते १५.

९७) कित्ता, इ. स. १९५७-५८, पृ.१४ ते १६.

९८) कित्ता, इ. स. १९५७-५८, १९५८-५९, १९५९-६०, १९६०-६१, पृ. ६ ते १२.

९९) सामाजिक-आर्थिक विवेचन, सोलापूर जिल्हा, इ. स. १९५८-५९, पृ. ७५.

१००) कृषी उत्पन्न बाजार समिती बार्शी, वार्षिक अहवाल, इ. स. १९६१-६२, १९६४-६५, १९६५-६६, १९६६-६७, १९६७-६८, पृ. ४ ते १०.

१०१) कित्ता, इ. स. १९७०-७१, १९७१-७२, १९७५-७६, १९७७-७८, पृ. ४ ते ११.

१०२) कित्ता, इ. स. १९८५-८६, १९८७-८८, १९८८-८९, १९८९-९०, पृ. ३ ते ५.

१०३) महाराष्ट्र राज्य गॅझेटियर, लातूर जिल्हा भाग-१, प्रथम आवृत्ती (मराठी) सन २००८, पृ. ४८४

१०४) कृषी उत्पन्न बाजार समिती बार्शी, वार्षिक अहवाल, इ. स. १९६१-६२, पृ. ७.

१०५) महाराष्ट्र स्टेट गॅझेटियर , सोलापूर जिल्हा, इ. स. १९७७, पृ. ५४४, ५४५.

१०६) कुलकर्णी. डी. पी., पूर्वोक्त, पृ. १४७, १४८.

१०७) कृषी उत्पन्न बाजार समिती बार्शी, वार्षिक अहवाल, इ. स. १९६३-६४, पृ. १, २, १८, १९.

१०८) कित्ता, इ. स. १९६६-६७, पृ. ३, ४.

१०९) मुंबई पुराभिलेखागार, भारतीय जनगणना १९६१, फाईल नं आर-४००१६/२, पृ. २११.

११०) कृषी उत्पन्न बाजार समिती बार्शी, वार्षिक अहवाल, इ. स. १९५४-५५, पृ. २३, २४.

१११) कित्ता, इ. स. १९६२-६२ व १९६३-६४, पृ. १३, १४.

११२) कित्ता, इ. स. १९७०-७१, पृ. १९.

११३) कित्ता, इ. स. १९७५-७६, पृ. ९, ११.

११४) कित्ता, इ. स. १९६५-६६, पृ. १७ ते २२.

११५) जोशी. व. श., पूर्वोक्त, पृ. ७८

११६) बाजार समिती कर्मचारी सेवा नियम, ज्ञानदीप प्रकाशन पुणे, पृ. ३.

११७) जोशी. व. श., पूर्वोक्त, पृ. १८२, १८३.

११८) कृषी उत्पन्न बाजार समिती बार्शी, वार्षिक अहवाल, इ. स. १९८९-९०, पृ. ८.

११९) मुंबई पुराभिलेख, सन १९३४ चे मुंबईचे वजने व मापे याबाबत नियम, फाईल नं आर-२२१६१/६३, पृ. ६, ७.

प्रकरण चौथे

बार्शी तालुक्यातील प्राथमिक सहकारी शेती संस्था व बँका

अ.क्र	घटक
४.१	**सावकार**
४.२	**सहकार**
	४.२.१. भारतातील सहकारी चळवळीची वाटचाल
	४.२.२. सोलापूर जिल्ह्यातील सहकारी चळवळ
४.३	**प्राथमिक सहकारी शेती संस्थांचा इतिहास**
	४.३.१. उद्देश
	४.३.२. तालुक्यातील प्राथमिक सहकारी शेती संस्थांचा आरंभ व विकास
	४.३.३. तालुक्यातील काही महत्त्वाच्या प्राथमिक सहकारी शेती संस्था
४.४	**बँका**
	४.४.१. भारतातील आधुनिक बँकिंगची सुरूवात
	४.४.४. तालुक्यातील राष्ट्रीयीकृत बँका
	४.४.४.१. बँक ऑफ इंडिया
	४.४.४.२. स्टेट बँक ऑफ इंडिया
	४.४.४.३. सेंट्रल बँक ऑफ इंडिया
	४.४.४.४. युनियन बँक ऑफ इंडिया
	४.४.४.५. बँक ऑफ महाराष्ट्र
	४.४.५. तालुक्यातील सहकारी बँका
	४.४.५.१. बार्शी अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक
	४.४.५.२. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, सोलापूर
	४.४.५.३. सांगली नागरी सहकारी बँक, शाखा बार्शी
	४.४.५.४. सोलापूर जनता सहकारी बँक, शाखा बार्शी
	४.४.५.५. पंढरपूर नागरी सहकारी बँक, शाखा बार्शी

प्रस्तावना

बचत हा मानवाचा पूर्वीपासून चालत आलेला स्थायीभाव आहे. पूर्वी सावकार व पतपेढ्या बँक व्यवसायाचे काम करीत असत. परंतू बँकांच्या मानाने पैसा पुरविण्याची त्यांची कुवत कमी होती. आज सर्वसामान्यांची बचत करण्याची कुवत वाढलेली आहे. शिवाय प्रत्येक मिळवित्या व्यक्तीस भविष्यकालीन गरजा व संकटांना तोंड देण्यासाठी बचतीच्या रूपाने तरतूद करण्याची आवश्यकता निर्माण झालेली आहे. पूर्वीच्या काळीही लोकांना बचतीचे महत्व पटलेले होते. त्यांच्यामध्ये बचत करण्याची कुवत होती. परंतू त्या बचतीचा विनियोग करण्याची साधने उपलब्ध नसल्यामुळे ही बचत सोन्या-चांदीच्या अथवा इतर मौल्यवान वस्तूमध्ये अडकून राहत असे. आता ही परिस्थिती बदललेली असून बचत हे आर्थिकदृष्टया समाज प्रगत होण्यासाठी लागणाऱ्या गुंतवणुकीचे एक महत्त्वाचे साधन बनले आहे आणि यामध्ये बँका व तत्सम संस्था यांची भूमिका महत्वाची आहे.

भारतातील ग्रामीण कुटुंबाच्या आर्थिक स्थितीचा विचार केल्यास आपल्या असे लक्षात येते की, बहुसंख्य कुटुंबाच्या शिरावर कर्जाचा बोजा आहे. सर्वसाधारणपणे शेतकी कुटुंबामध्ये कर्जबाजारीपणा मोठ्या प्रमाणात दिसून येतो. यामध्ये मोठे, मध्यम तसेच छोटे असे सर्व प्रकारचे शेतकरी कर्जात असतात, मात्र यांचे प्रमाण भिन्न असते. साधारणत: जेव्हा एकंदर खर्च एकंदर प्राप्तीतून भागवणे शक्य होत नाही तेव्हा कर्ज काढले जाते. ग्रामीण कुटुंबाच्या अर्थव्यवहाराचा कौटुंबिक अर्थव्यवहार व व्यावसायिक अर्थव्यवहार यांचा स्वतंत्र विचार करून चालणार नाही. कारण कौटुंबिक खर्च व व्यावसायिक खर्च यांची सर्रास मिसळ होत असते. व्यावसायिक अर्थव्यवहारामध्ये शेतीतील लागवड, पडीक जमीन लागवडीखाली आणणे, विहिरीचे खोदकाम, विविध शेतकी अवजारांची व यंत्राची खरेदी, जनावरांची खरेदी, शेतमजूरी, बी-बियाणे, खते अशा विविध बाबींचा समावेश होतो. कौटुंबिक अर्थव्यवहारामध्ये घरे, दीर्घोपयोगी वस्तूंची खरेदी, विविध समारंभ, कोर्ट-कचेरी, जुन्या कर्जाची फेड तसेच विविध कौटुंबिक अडी-अडचणींचा समावेश होतो. व्यावसायिक अर्थव्यवहारासाठी काढलेल्या कर्जास उत्पादित कर्ज म्हणतात. तर कौटुंबिक अर्थव्यवहारासाठी काढलेल्या कर्जास अनुत्पादित कर्ज असे म्हणतात.[१]

शेती हा भारतातील मुख्य व्यवसाय असला तरी सततचे दुष्काळ तसेच असमान व अनिश्चित पाऊस यामुळे येथील शेतकऱ्यांना सतत पैशांची गरज भासते. ही गरज भागविण्यासाठी त्यांना साधारणत: सरकार, सावकार, व्यापारी, नातेवाईक, जमिनदार, सहकारी सोसायटया, बँका यांच्यावर विसंबून रहावे लागते. बार्शी तालुक्याच्या आर्थिक विकासामध्ये विविध वित्तीय संस्थांचा मोलाचा वाटा आहे. या प्रकरणाचे प्रमुख दोन भाग करण्यात आलेले आहेत. **अ)** प्राथमिक सहकारी शेती संस्था **ब)** बँका. प्राथमिक सहकारी शेती संस्था व बँका यांचा बार्शी तालुक्याच्या आर्थिक विकासावर झालेल्या परिणामाची माहिती

सदर प्रकरणामध्ये दिलेली आहे. तत्पूर्वी ग्रामीण तसेच शहरी भागामध्ये आर्थिक व्यवहाराशी अत्यंत जवळचा संबंध असणाऱ्या ' सावकार ' या घटकाची माहिती घेणे आवश्यक आहे.

४.१. सावकार

ऋणको आणि धनको यांचे अस्तित्व फार पूर्वीपासूनचे आहे. खेडयात कायमचे दुकान असलेल्या वाण्याचा धंदा एकंदरीत मंदीचा असला तरी त्याच्याजवळ रोकड रक्कम असल्यामुळे अडीअडचणीला शेतकऱ्यांना लागणारा रोख पैसा पुढे करून वाणी त्यावर सावकारी करीत होते. दुकानदारी व सावकारी या जोडधंदयाचे परस्परावलंबित्व यादवांच्या काळातही होते. शेतीच्या विविध कामानिमित्त शेतकऱ्याला कर्जासाठी गावाच्या वाण्याकडे जाणे भागच होते. धंदयातल्या अडचणी व रोजच्या प्रासंगिक गरजा भागविण्याकरिता दुकानात खरेदी केलेल्या सामानाची उधारीही साचत होती. सालउधारी व रोकड कर्ज यावर लावलेल्या व्याजबट्टयात भरपूर नफा काढण्यास वाव होता. किरकोळ सावकारी व्याजाचा दर साधारणपणे सवाई, दिडी, दुणी इतका होता. पण काही वेळा कुळाच्या अडचणीचा अंदाज घेऊन सावकार जास्त व्याजदर आकारत. काहीवेळा लोकांना आपली शेती, घर अशी मालमत्ता सावकाराकडे गहान ठेवावी लागे. असे गहानवटीचे व्यवहार सर्व लहान-मोठे सावकार करीत असत. अशा प्रकारची सावकारी केवळ वाणी किंवा अन्य दुकानदारच करत नव्हते तर ज्याला जेवढे शक्य होईल तेवढयाच भांडवलावर अगदी मामुली स्वरूपाच्या गहानवटीत सामान्य लोक देखील व्याजाच्या आशेने हा व्यवसाय करत. खेडेगावातील शेतकरी व शेतमजूर हे नेहमीच सावकाराकडून कर्ज घेत असल्यामुळे सावकार त्यांच्याकडून अव्वाच्या सव्वा व्याज घेत. परिस्थितीनुसार व्याजाचा दर वेगवेगळा असे. कर्जाऊ स्वरूपात दिलेल्या वस्तूंची परतफेड सवा व दिडीच्या स्वरूपात करावी लागे. रोख रकमेच्या कर्जासाठी घर, जमीन, दागिने, शेतमाल, भांडी यासारख्या वस्तू गहाण ठेवाव्या लागत. शेतकऱ्यांना पावसाळयाच्या सुरूवातीला कर्जाऊ स्वरूपात धान्य देऊन सावकार त्याची परतफेड पीक आल्यावर करून घेई. या व्यवहारात दिलेल्या कर्जाऊ धान्याच्या एक चतुर्थांश अधिक धान्य व्याज म्हणून आकारले जाई.[२]

शिवकाळात शेटे, महाजन, देशकुलकर्णी, देशमुख हे वतनदार लोक गरजूकडून कर्जकतबा (करारनामा) लिहून घेऊन व्याजाने पैसे देत. यासाठी ऋणकोला जामीन दयावा लागे. जामिनावरील कर्जावर १५ टक्के तर जामीन नसलेल्या कर्जावर ६० टक्के व्याज आकारले जाई. ब्राम्हणास इतरांपेक्षा कमी व्याजदराने कर्ज मिळे. विशिष्ट सरकारी पट्टी घेऊन सावकार व सोनार यांच्या पेढयांना नाणे पाडण्याची परवानगी मिळे.[३]

बार्शी तालुक्यामध्ये फार पूर्वीपासून सावकारी व्यवसायाचा उल्लेख आढळतो. इ. स. १८१८ मध्ये बाजीरावांच्या सैन्याने निजामाच्या बालाघाट प्रदेशातील पिकांच्या केलेल्या नुकसानीमुळे व दुष्काळामुळे बार्शी, पंढरपूर, तुळजापूर ही ठिकाणे त्रस्त झाली. याचबरोबर प्लेग, कॉलरा, यासारख्या साथीच्या रोगामुळे हजारो लोक मृत्युमुखी पडले. १ शेर धान्याची किंमत ३ ते ४ रूपये झाली. अशा परिस्थितीमध्ये बार्शी तालुक्यातील 'वैराग' येथील 'घोंगडे' या सावकाराने अनेक अन्नछत्रे सुरू केली. याशिवाय सोलापूरमधील ब्राम्हण सावकार 'महादेव बापू कुलावदेव' यांनीही अन्नछत्रे सुरू केली. अशा प्रकारे सामाजिक बांधिलकी जपणारे काही सावकार बार्शी तालुक्यामध्ये होते.[४]

तक्ता क्र. २७

तालुक्यातील परवानाधारक सावकार व त्यांचे व्यवहार

इ. स	सावकारांची संख्या	व्यापाऱ्यांना दिलेली कर्जे	इतरांना दिलेली कर्जे	एकूण
१९६०-६१	३८	१,४६,४५६	३,०३,९८०	४,५०,४३६
१९६५-६६	३४	२,४२,३६७	९,५३,९७५	११,९६,३४२
१९७०-७१	**४०**	**९२,६५,३०४**	**१८,३८,७७१**	**१,११,०४,०७५**
१९७५-७६	४३	३,९१,०००	६,९३,०००	१०,८४,०००
१९८०-८१	१२	-	१५,७९,०००	१५,७९,०००
१९८५-८६	१५	३,९८,०००	३३,११,०००	३७,०९,०००
१९९०-९१	**२१**	**१६,८४,०००**	**१,०४,२४,०००**	**१,२१,०८,०००**

(संदर्भ :- सामाजिक-आर्थिक विवेचन, सोलापूर जिल्हा, संबंधित वर्षाचे अहवाल.)

सावकाराच्या संख्येमध्ये व सावकारी व्यवहारामध्येही बार्शी तालुका जिल्ह्यामध्ये द्वितीय क्रमांकावर होता. इ. स. १९६०-६१ मध्ये बार्शी तालुक्यामध्ये ३८ परवानाधारक सावकार होते. या वर्षी त्यांनी व्यापाऱ्यांना व इतर लोकांना एकूण ४,५०,४३६ रूपये व्याजाने दिले होते. मात्र पुढच्याच वर्षी या रकमेमध्ये जवळजवळ आठ पटीने वाढ होऊन ही रक्कम ३५,५६,४०५ रूपये इतकी झाली.[५] इ. स. १९६० ते इ. स. १९९० या कालखंडामध्ये तालुक्यातील सावकारांनी दोन वेळेस १ कोटी रूपयापेक्षा अधिक रक्कम या व्यवसायामध्ये गुंतविली होती. इ. स. १९७०-७१ मध्ये तालुक्यातील परवानाधारक ४० सावकारांनी व्यापाऱ्यांना ९२,६५,३०४ रूपये, तर इतर लोकांना १८,३८,७७१ रूपये असे एकूण १,११,०४,०७५ रूपये

व्याजाने दिले होते.[६] इ. स. १९९०-९१ मध्ये परवानाधारक २१ सावकारांनी व्यापाऱ्यांना १६,८४,००० रूपये, तर इतर लोकांना १,०४,२४,००० रूपये असे एकूण १,२१,०८,००० रूपये व्याजाने दिले होते.[७]

यामध्ये वैशिष्टयपूर्ण बाब अशी होती की इ. स. १९७०-७१ पेक्षा इ. स. १९९०-९१ मध्ये सावकारांची संख्या जवळजवळ निम्म्याने कमी होती. शिवाय इ. स. १९७०-७१ मध्ये सावकारांनी एकूण कर्जापैकी जवळजवळ ८० टक्क्यापेक्षा अधिक कर्ज व्यापाऱ्यांना दिले होते. मात्र इ. स. १९९०-९१ मध्ये ८० टक्क्यापेक्षा अधिक कर्ज इतर लोकांना दिले. इ. स. १९७०-७१ चा अपवाद वगळता तालुक्यातील सावकारांनी व्यापाऱ्यांपेक्षा इतर लोकांनाच अधिक वित्तपुरवठा केला. स्वातंत्र्योत्तर काळामध्ये तालुक्यातील सावकारांची संख्या सातत्याने घटत गेली. मात्र त्यांचे आर्थिक व्यवहार अनेक पटीने वाढले.

शेतकऱ्याकडून गहानखत घेणे, त्यावर जास्त कर्जाची नोंद करणे, कर्जाच्या हप्त्याच्या परतफेडीचा पुरावा न देणे, व्यक्तीच्या तीव्र गरजेनुसार प्रचंड व्याजदर आकारणे अशा अनेक वाईट बाबी या व्यवसायाशी निगडीत होत्या. या व्यवसायातील अशा अनिष्ट प्रथा बंद करून सावकारीच्या व्यवहारांचे नियमन व त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी तत्कालीन मुंबई सरकारने आपल्या अधिपत्याखालील प्रदेशासाठी 'मुंबई सावकार अधिनियम, १९४६ ' हा कायदा लागू केला. तो आता संपूर्ण महाराष्ट्राला लागू आहे.[८] हा कायदा १७ नोव्हेंबर १९४७ पासून सोलापूर जिल्ह्यात अंमलात आला. [९]

या कायदयान्वये प्रत्येक सावकाराने या व्यवसायासाठी आपल्या क्षेत्रातील सहाय्यक निबंधकाकडून रीतसर परवाना घेतला पाहिजे. वर्षामध्ये या धंदयात जे एकूण भांडवल गुंतविले जाणार असेल त्या भांडवलाची नोंद या कार्यालयाकडे करणे, आपल्या धंदयाच्या संबंधीचे दस्तऐवज शासनाच्या संबंधित अधिकाऱ्यासमोर वेळोवेळी सादर करणे, ऋणकोकडून चक्रवाढ व्याजाच्या रूपाने कोणतीही रक्कम वसूल न करणे, ठरलेल्यापेक्षा अधिक व्याज न घेणे, कर्जासाठी ऋणकोच्या मालमत्तेत ढवळाढवळ न करणे, त्रासाच्या हेतूने ऋणकोच्या घरी न जाणे अशा विविध नियमांच्या माध्यमातून कायदयान्वये या व्यवसायाला बांधण्यात आले.[१०]

सध्या बँका व विविध सहकारी संस्थांचे जाळे खेडोपाडी पसरल्यामुळे सावकारी व्यवसायाचे प्राबल्य दिवसेंदिवस झपाट्याने कमी होत चालले आहे. सावकारी व्यवहार हा दिवसेंदिवस संस्थेच्या व्यवहाराप्रमाणे नियमबध्द व पध्दतशीर ठेवणे भाग पडत असल्यामुळे कायद्याच्या चौकटीत राहून नियमानुसार सावकारी व्यवहार करणे सावकारांना त्याच्या पूर्वीच्या अनिष्ट सवयीमुळे अडचणीचे झाले आहे. त्यामुळे बऱ्याच सावकारांनी आपला व्यवसाय बंद केला आहे.

४.२. सहकार

मानवाच्या जन्मापासूनच सहकारास सुरूवात होते. निर्धनांना व अपुरे भांडवल असणाऱ्यांना परंतू प्रमाणिक कष्ट करण्याची तयारी असणाऱ्यांना सहकार हा नवसंजीवनी देणारा एक मंत्र आहे. सेवावृत्तीने काम करीत राहून समाजहित साधणे हे सहकारात अपेक्षित आहे. शोषणविरहित समाजनिर्मिती हा सहकाराचा आत्मा आहे. आपले पारंपरीक जीवन हे सहकाराचे एक उत्तम उदाहरण आहे. यामध्ये विविध जातीजमातींकडून गावाचे काम परस्पर सहकार्याने उत्तमरित्या पार पाडले जाते. साहजिकच सहकार हे मानवी संस्कृतीचे फळ नसून ते तिचे मूळ आहे. सहकाराचे तत्व मानवी इतिहासाइतकेच पुरातन आहे. आर्थिक क्षेत्रात सहकार हा एक संघटन प्रकार आहे. देशात राजेशाही, लोकशाही, हुकूमशाही अशी कोणतीही शासनप्रणाली असली तरी सहकाराचे महत्व कमी होत नाही. सहकार हा आर्थिक व्यवहाराचा व सामाजिक प्रगतीचा कणा आहे. " एकमेकां सहाय्य करूं, अवघे धरू सुपंथ " हे वचन तर सर्वश्रुतच आहे.[११]

सहकार्याशिवाय मानवी जीवनाची कल्पनाच होऊ शकत नाही. संरक्षणासाठी लोकांनी गावाभोवती परस्पर सहकार्याने तटबंदी बांधली. त्याचप्रमाणे सर्व गावास उपयोगी पडतील अशी तळी, घाट व देवळे बांधली. मानवाच्या परस्परातील सहकार्याचा पुरावा म्हणून आजही जिकडे तिकडे या गोष्टी दिसतात. त्या पाहिल्यानंतर मानवजात ही परस्पराशी संघर्ष करण्यासाठी जन्माला आलेली नसून ती परस्पराशी सहकार्य करण्यासाठी जन्माला आलेली आहे असे वाटते. शिवाय तत्कालीन धर्मसंस्थापक, ऋषिमुनी यांच्या वचनाकडे व शिकवणीकडे पाहिले तर त्यांनीही मानवाला सुखी जीवन जगण्यासाठी एकमेकांशी सहकार्य करा असाच संदेश दिलेला आढळतो. [१२]

एकाच प्रकारचा उद्योगधंदा करणारांनी परस्परांशी सहकार्य करण्याची पध्दत फार पूर्वीपासून चालत आलेली आहे. एकमेकाच्या शेतीत ' सावड ' घालण्याचा म्हणजे मोबदला न घेता काम करण्याची किंवा बैल-बारदाना वापरण्यास देण्याची पध्दत प्राचीन काळापासून भारतात चालत आलेली आहे. परंतू प्राचीन काळातील हा सहकार, एक सद्‌गुण आणि परंपरा एढयापुरताच मर्यादित राहिला. जाणीवपूर्वक या पध्दतीने आर्थिक उपक्रमाची सुरूवात व संघटन करण्याचा विचार प्रथम सतराव्या शतकात मांडला गेला. पी. सी. प्लोकनाये या इंग्लंडमध्ये राहणाऱ्या डच माणसाने इ. स. १६५९ मध्ये एक पुस्तक लिहिले. उद्योगधंदा चालविण्यासाठी शेतकरी किंवा कारागीर यांचे संघ (असोसिएशन) स्थापन्याची कल्पना या पुस्तकातून त्याने मांडली. पुढे इ. स. १६९५ मध्ये जॉन बेलर्स याने या कल्पनेची सांगोपांग चर्चा करणारी एक पुस्तिका लिहिली. स्वावलंबन, परस्पर सहकार्य, आर्थिक उद्दिष्टासाठी लोकशाही व समतावादी पध्दतीने संघटना चालविणे, उत्पादक व उपभोक्ता यांचा प्रत्यक्ष संबंध प्रस्थापित करून मध्यस्थाला हटविणे अशा सहकारी चळवळीच्या मूळ कल्पना या पुस्तकात मांडल्या होत्या. परंतू प्रत्यक्षात या दृष्टीने काही

हालचाली झाल्या नाहीत. कालांतराने बेलर्सचे हे पुस्तक रॉबर्ट ओवेन यांच्या हातात पडले. हाच ओवेन सहकारी चळवळीचा जनक मानला जातो. ' सहकार ' हा शब्द सार्थपणे त्यांनीच प्रथम वापरला. स्पर्धेला हटवून त्याऐवजी सहकार सुरू केला पाहिजे असे प्रतिपादन करून त्यांनीच एका नव्या उपक्रमाचे व चळवळीचे नामकरण केले.[१३]

रॉबर्ट ओवेन यांचा जन्म १४ मे १७७१ मध्ये इंग्लंडमध्ये झाला. त्यांच्या वडिलांचा खोगीर तयार करण्याचा व धातुसामान विकण्याचा व्यवसाय होता. ओवेन हुशार होते मात्र बिकट कौटुंबिक आर्थिक परिस्थितीमुळे त्यांना वयाच्या नवव्या वर्षी शाळा सोडावी लागली. पुढे त्यांनी न्यू टाऊन, स्टँडफर्ड, लंडन येथे पडदे तयार करण्याच्या कारखाण्यात मजूर म्हणून काम केले. याच काळात त्यांना मजुराचे मानसशास्त्र समजले. आपल्या बुध्दिमत्तेच्या जोरावर ते चार्लस् येथील गिरणीत मुख्य व्यवस्थापक झाले. तेथेच त्यांनी सूतगिरणीच्या मालकाच्या मुलीशी प्रेमविवाह केला.या मालकाने ओवेन यांना नाममात्र किंमतीत सूतगिरणी दिली. या सूतगिरणीत त्यांनी आपले व्यवस्थापनाचे विचार प्रत्यक्ष राबविले. त्यांनी त्याकाळी मांडलेले विचार आज प्रत्यक्षात राबविले जातात. त्यांच्या व्यवस्थापनाच्या विचारामध्ये माणूस हा केंद्रस्थानी होता.[१४]

२४ आक्टोबर १८४४ रोजी रॉश्डेल या गावातील २८ विणकरांनी " दि रॉश्डेल सोसायटी ऑफ इक्वितक्तापायोनियर्स " या नावाने फ्रेंडली सोसायटीज ॲक्टखाली नोंदणी करून २१ डिसेंबर १८४४ रोजी कामास सुरूवात केली. यातूनच आधुनिक सहकारी चळवळीची मुहूर्तमेढ रोवली गेली.[१५] विणकरांनी या सहकारी ग्राहक भांडाराची स्थापना ' टोड ' या गल्लीत केली होती. समान परिस्थितीतील लोकांनी एकत्र येऊन एकमेकांच्या सहकार्याने आपल्या स्वत:च्या मिळकतीच्या पैशांतून स्वत:च्या कुटुंबाच्या गरजा भागवून व स्वत:चे व्यापाऱ्यापासून होणारे शोषण थांबविण्याचा प्रयत्न केला. याचे एक वैशिष्टय म्हणजे त्यांनी एक दुकान काढून ते किफायतशीर पध्दतीने चालविले. हे करत असताना त्यांनी सहकाराची जी तत्वे, व्यवहारपध्दती यांचे अनुकरण केले तीच पुढे सहकाराची मूलतत्वे म्हणून जगत्मान्य झाली.[१६]

४.२.१ भारतातील सहकारी चळवळीची वाटचाल

हिंदुस्थानवर इंग्रजांची सत्ता येण्यापूर्वी हिंदुस्थानमधील खेडी स्वतंत्र होती. गावातल्या गरजा गावातच भागविल्या जात. सरकारला द्याव्या लागणाऱ्या साऱ्याशिवाय पसाभरसुध्दा धान्य गावाबाहेर जात नव्हते. लोक एकमेकास मदत करणारे व शेजारधर्म पाळणारे होते. इंग्रजांच्या आगमनाने ही परिस्थिती पालटली. इंग्रजांच्या सत्तापिपासू वृत्तीमुळे येथील लोक परावलंबी व दरिद्री बनले. शेतकऱ्यांच्या जमिनी सावकाराकडे गहाण पडल्या. इ. स. १८५७ साली पुणे, अहमदनगर जिल्ह्यात शेतकऱ्यांनी सावकारांविरूध्द बंड करून त्याच्यादेखत कर्जरोखे जाळून टाकले. सरकारला लष्कराच्या मदतीने या बंडाचा सामना करावा लागला.

शेतकऱ्यांचे कर्ज कमी झाल्याशिवाय त्यांची आर्थिक स्थिती सुधारणार नाही ही गोष्ट सरकार व देशातील प्रमुख पुढाऱ्यांच्या लक्षात आली. यातूनच इ. स. १८८२ मध्ये न्यायमूर्ती रानडे यांनी शेतकऱ्यांना कमी व्याजदराने व योग्य अटीवर कर्ज देण्याकरीता पुण्याचे तत्कालीन डिस्ट्रिक्ट जज्ज सर विल्यम वेडरबर्न यांच्या मदतीने पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुक्यासाठी एक बँक काढण्याचा प्रयत्न केला. लोकमान्य टिळकांनी शेतकरी वर्गाची सुधारणा व्हावी यासाठी केसरीतून लेख लिहिले. नामदार गोखले यांनी सहकारी कायदा पास होण्यासाठी खूप प्रयत्न केले.[१७]

दख्खनच्या शेतकऱ्यांनी सावकाराच्या विरोधात केलेल्या दंगलीमुळे ब्रिटिश शासनाला जाग आली. त्यांनी इ. स. १८८० मध्ये शेतकऱ्यांच्या प्रश्नांचा व वारंवार पडणाऱ्या दुष्काळाचा अभ्यास करण्यासाठी एक समिती स्थापन केली. या समितीने शेतकऱ्यांच्या आर्थिक शोषणाला ब्रिटिश राज्य जबाबदार असून सद्यस्थितीला सावकाराविरूध्द असणारा असंतोष पुढील काळात ब्रिटिश शासनाच्या विरोधात निर्माण होण्याची शक्यता वर्तविली. त्यामुळे सर डॅनियल हॅमिल्टन यांनी शेतकऱ्यांना कर्जपुरवठा करणारी चांगली, शाश्वत यंत्रणा उभी करण्याची गरज प्रतिपादन केली. त्यामुळे " डेक्कन ॲग्रिकल्चरल रिलीफ ॲक्ट-१८७९" हा कायदा करण्यात आला. या कायदयान्वये शेतकऱ्यांच्या शेतजमिनी शेती व्यवसाय न करणाऱ्यांच्या मालकीच्या होण्याला प्रतिबंध घालण्यात आला.[१८] याचाच एक भाग म्हणजे सरकारने शेतकऱ्यांना कर्ज देण्यासाठी इ. स. १८८३ मध्ये " लँड इम्प्रूवमेंट लोन्स ॲक्ट " व इ. स.१८८४ मध्ये "ॲग्रिकल्चरल लोन्स ॲक्ट" असे दोन कायदे केले.[१९]

इ. स. १८८९ मध्ये बडोदा येथे २३ लोकांचा सहभाग असलेली सहकारी संस्था स्थापन करण्यात आली होती. श्री. विठ्ठल लक्ष्मण कवठेकर हे या संस्थेचे प्रवर्तक होते. अशा प्रकारे सहकारी संस्थांचे भारतातील जनकत्व महाराष्ट्रीयन व्यक्तीकडे जाते. इ. स. १८९२ मध्ये मद्रास सरकारने सर फ्रेडरिक निकोलसन यांना शेती विकासासाठी एका बँकेची स्थापना करण्याच्या उद्देशाने अभ्यास करण्यासाठी युरोपला पाठविले. त्याने आपल्या अहवालातून युरोप प्रमाणेच हिंदुस्थानमध्येही शेतकी पेढया स्थापन कराव्या असे सुचविले. मात्र पुढील कार्यवाही झाली नाही. इ. स. १९०० मध्ये डयूपरनेक्स नावाच्या उत्तर प्रदेशामधील सनदी अधिकाऱ्याने फ्रान्स व इटली येथील लोकप्रिय झालेल्या सहकारी बँकांचा अभ्यास करून " Peoples Bank of Northern India" हे पुस्तक लिहिले. इ. स. १८९८ मध्ये लॉर्ड कर्झन भारतात व्हाईसरॉय म्हणून आला होता. त्याला शेतीची पार्श्वभूमी होती. इंग्लंडमध्ये त्याच्या वडीलांची मोठी शेती होती. त्यामुळे त्याला शेतकऱ्याबद्दल थोडी सहानुभूती होती. शिवाय तत्कालीन शेतकऱ्यांच्या प्रश्नाने ब्रिटिशांची झोप उडविली होती. यावर मात करण्यासाठी शेती उत्पादन वाढविणे आवश्यक होते. मात्र शेतकऱ्यांना सुलभरित्या पतपुरवठा झाल्याशिवाय शेती उत्पादन वाढविणे शक्य नाही हे त्याच्या लक्षात

आले होते. या दोन्ही अधिकाऱ्यांचे अभिप्राय लॉर्ड कर्झन याच्या निदर्शनास आले तेव्हा त्याने या अधिकाऱ्यांना कलकत्ता येथे बोलावून त्यांच्याशी चर्चा केली.[२०]

मद्रास सरकारने निकोल्सन रिपोर्ट भारत सरकारकडे पाठविल्यानंतर सहकारी पतपुरवठा संस्था स्थापन करण्याच्या विचाराला गती मिळाली. लॉर्ड मेकडोनल यांच्या अध्यक्षतेखाली आणि सर फ्रेड्रिक निकोल्सन यांच्या सदस्यत्वाखाली सहकार कायद्यासंबंधी कच्चा मसूदा तयार करण्यात आला. सदर मसूदा तपासण्यासाठी श्री. हेन्री वोल्फ यांच्याकडे आल्यानंतर त्यांनी हा कायदा कंपनीच्या अखत्यारीत नसून तो इंग्लिश फ्रेंडली सोसायटीज् ॲक्टप्रमाणे स्वतंत्र असावा असे प्रतिपादन केले. डिसेंबर १९०३ मधील सर एडवर्ड लॉ यांच्या अध्यक्षतेखालील समितीपुढे बोलताना श्री. हेन्री वोल्फ यांनी सहकार कायदा विधेयक पतपुरवठा यंत्रणेपुरता मर्यादित ठेवण्याला तसेच शहरी आणि ग्रामीण वर्गिकरणाला विरोध दर्शवून शासकीय अर्थसहाय्यातून भ्रष्टाचार वाढीस लागून मुख्य उद्देश बाजूला पडण्याची भीती व्यक्त केली. याचा परिणाम म्हणजे सर डेन्झील इबेट्सन यांनी २३ आक्टोबर १९०३ रोजी कंपनी ॲक्ट पासून सहकार कायदा स्वतंत्र राखण्याला मान्यता दर्शवून, सहकार कायदयामध्ये बचत, परस्पर सहकार्य, कृषीविषयक पतपुरवठा, खूप महत्वाचा आहे असे प्रतिपादन केले. त्याचप्रमाणे सहकार चळवळ नियंत्रित करणाऱ्या यंत्रणेचे कामकाज मैत्रिपूर्ण सल्लागाराचे असावे व ते चौकशी करणाऱ्या यंत्रणेचे नसावे असे मत नोंदविले. २५ मार्च १९०४ रोजी लॉर्ड कर्झन याने सहकारी कायदा पास केला. त्यावेळी त्याने पुढीलप्रमाणे उद्‌गार काढले होते, "It is not primarly because the financial contributions that might have been required to assist any new institutions would be great, or because we grudge the money, that so little is said about grants - in - aid by the state, but because the best advice and the teaching of experience are at one in the conclusion that unrestricted government assistance is dangerous, and may be a fatal gift. " [२१]

इ. स. १९०४ च्या सहकारी कायद्‌याप्रमाणे जे. एम. मॅकनील यांची मुंबई इलाख्याचे पहिले रजिस्ट्रार म्हणून नेमणूक झाली. त्यांनी इ.स. १९०५ मध्ये धारवाड जिल्ह्यात कंगिनहल येथे एका शेतकी पतपेढीची स्थापना केल्याने मुंबई इलाख्यात सहकारी चळवळीचा उगम झाला.[२२] इ. स. १९०६ ते १९११ या दरम्यान सहकारी सोसायट्यांची संख्या व कार्यक्षेत्र यामध्ये बरीच वाढ झाल्यामुळे इ. स. १९०४ चा सहकारी कायदा या चळवळीच्या वाढत्या गरजा भागविण्यास अपुरा वाटू लागला. त्यामुळे येणाऱ्या सर्व अडचणींचा विचार करून इ. स. १९१२ चा कायदा करण्यात आला. या नवीन काद्‌यामुळे सहकारी चळवळीला जोरदार चालना मिळाली.[२३] इ. स. १९१९ च्या सुधारणा कायद्यान्वये सहकार हा प्रांतीय सरकारच्या अखत्यारीतील विषय बनला. त्यामुळे मुंबई प्रांताने इतर प्रांतांना आदर्श होईल असा एक स्वतंत्र

कायदा इ. स. १९२५ मध्ये केला. असा प्रांतीक कायदा करणारा मुंबई हा भारतातील पहिलाच प्रांत होता. हा कायदा इ. स. १९१२ च्या कायद्याला अनुसरूनच होता. मात्र मुंबई प्रांताच्या विशिष्ट परिस्थितीनुसार त्यात काही बदल करण्यात आले होते. [२४]

४.२.२ सोलापूर जिल्ह्यातील सहकारी चळवळ

सोलापूर जिल्ह्याच्या सहकारी चळवळीच्या इतिहासात बार्शी तालुक्याचे स्थान अनन्यसाधारण असेच आहे. जिल्ह्यातील सहकारी चळवळीची सुरूवात बार्शी तालुक्यापासून झाली. इ. स. १९०४ मध्ये तत्कालीन बार्शी तालुक्यातील ' कसबे तडवळे ' येथे एका सहकारी संस्थेची स्थापना झाली.[२५] तत्कालीन मुंबई प्रांतामध्ये प्रथम स्थापन झालेल्या सहकारी सोसायट्यांपैकी ही सहावी सहकारी सोसायटी होती. त्यानंतर माढा तालुक्यामध्ये कुर्डू सोसायटी, जगदंबा सोसायटी, शंकर बावी सोसायटी अशा सोसायट्या जिल्ह्याच्या ग्रामीण भागामध्ये स्थापन झाल्या. पुढे यांची संख्या झपाट्याने वाढली.[२६]

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सोलापूर जिल्ह्यामध्ये सहकारी चळवळीने अभूतपूर्व यश मिळविले. यामागे जिल्ह्यातील सामाजिक कार्यकर्त्यांचे फार मोठे योगदान आहे. सोलापूर जिल्ह्यातील शेतीवर आधारीत असलेल्या उद्योगांचा पाया सहकारी चळवळीनेच घातला. शेतीसाठी पतपुरवठा करण्यामध्ये सहकारी चळवळीने महत्वाची भूमिका पार पाडली. त्यामुळे शेती विकासाला चालना मिळाली.[२७] पुढे स्वातंत्र्यप्राप्तीनंतर महाराष्ट्र शासनाने इ. स. १९२५ च्या मुंबई प्रांताच्या कायद्यामध्ये ' इ. स. १९६० चा सहकारी कायदा ' व ' इ. स. १९६१ चे नियम ' अशा सुधारणा केल्या. यामध्ये सहकारी चळवळीत निर्माण झालेली नवीन क्षितिजे सामावण्याचा प्रयत्न करण्यात आला. [२८]

४.३. प्राथमिक सहकारी शेती संस्थांचा इतिहास

प्रत्येक संस्थेच्या इतिहासात असा एक काळ येतो की, त्यावेळी ती संस्था स्थापन करणारे मूळ लोक दिवंगत होतात. त्यापैकी केवळ संस्थापकाचेच नाव लोकांच्या दीर्घ काळ लक्षात राहते, बाकीचे कार्यकर्ते विसरले जातात. वास्तविक अशा कार्यकर्त्याचे कार्य देखील तितकेच महत्वाचे असते. यांच्या हयातीत लोकांना त्याच्या कार्याचे महत्व पटलेले असते, मात्र काळाबरोबर त्याच्या आठवणी नाहीशा होतात. अशा लोकांच्या कार्याला उजाळा देण्यासाठी प्रत्येक संस्थेचा इतिहास लिहिणे आवश्यक ठरते. अशा संस्थात ' प्राथमिक सहकारी शेती संस्था ' फार महत्वाच्या असतात. या संस्थांचा संबंध राष्ट्राचा अगदी प्रारंभीचा घटक असलेला ' खेडेगाव ' याच्याशी असतो. ज्याप्रमाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका ही राज्य सहकारी बँक व प्राथमिक सहकारी सोसायट्या यामध्ये मध्यस्थाची भूमिका पार पाडतात,

त्याचप्रमाणे या प्राथमिक सहकारी सोसायट्या जिल्हा मध्यवर्ती बँक व शेतकरी यांच्यामधील मध्यस्थांची भूमिका पार पाडतात. बार्शी तालुक्याच्या आर्थिक विकासामध्ये या प्राथमिक सहकारी शेती संस्थांचे कार्य खूप महत्वपूर्ण आहे.

इंग्रजांच्या भारतातील आगमनापूर्वी सामान्यत: भारतीय खेडी स्वावलंबी होती. गावच्या बहुतेक सर्व प्रकारच्या गरजा गावातच भागविल्या जात होत्या. त्यामुळे शेतसाऱ्याशिवाय पैसा गावाबाहेर जात नव्हता. गावचा कारभार ग्रामपंचायतीमार्फत चालायचा. धार्मिक वृत्ती, प्रामाणिकपणा, सचोटी व परस्पर सहकार्य करण्याची भावना गावकऱ्यांमध्ये विशेषत: दिसून येत होती. मात्र इंग्रजांच्या आगमनाने ही परिस्थिती पूर्णपणे बदलली. ग्रामपंचायती बुडाल्या. शेतात उत्पन्न येवो अथवा न येवो, शेतसाऱ्याची रक्कम रोखीने सरकारात भरणे कायद्याने बंधनकारक झाले. शेतीस व प्रपंचास लागणाऱ्या सर्व प्रकारच्या वस्तू परदेशातून आयत्या व स्वस्त मिळू लागल्या. यातून गावातील पैसा बाहेर जाऊ लागल्यामुळे ग्रामीण भागातील लहान-मोठे उद्योगधंदे नामशेष झाले. उद्योगधंदे बंद पडल्यामुळे शेतीवरील ताण वाढून भारतीय शेतीला प्रचंड उतरती कळा लागली. यातून मार्ग काढण्यासाठी शेवटी सरकारने शेतकऱ्यांना कमी व्याजदराने तगाईकर्ज देण्यास सुरूवात केली. याचा प्रभावी असा परिणाम घडून आला नाही. शेवटी इंग्लंड, जर्मनी या देशांतील सहकारी पतपेढयांप्रमाणे भारतातही सहकारी कायदा करून पतपेढ्या स्थापन केल्या तर त्याचा शेतकऱ्यास फायदा होईल असे सरकारला अभ्यासांती दिसून आले. यातूनच सरकारने हिंदुस्थानसाठी इ. स. १९०४ चा सहकारी कायदा केला. या कायद्यान्वये हिंदुस्थानमध्ये पतपेढ्यांची स्थापना होऊन सवलतीच्या व्याजदराने शेतकऱ्यास कर्जे मिळू लागली. हा कायदा प्रयोगावस्थेतच असल्यामुळे प्रत्यक्ष अनुभवाने त्यात बऱ्याच उणिवा आढळल्या. त्यामुळे इ. स. १९१२ मध्ये त्यात सुधारणा करण्यात आल्या. पुढे प्रांतांना याबाबातचा कायदा करण्याची परवानगी मिळाली. यामुळे इ. स. १९२५ मध्ये मुंबई प्रांताने स्वतंत्र कायदा केला.[२९]

प्राथमिक सहकारी सोसायट्या आपल्या सभासदांना खेळत्या भांडवलातून पैसा देत होत्या. मात्र त्यांचे खेळते भांडवल फारच कमी असल्यामुळे त्यांच्या समोर फार मोठी समस्या निर्माण झाली. या पतपेढ्यांना भांडवल पुरविण्यासाठी मध्यवर्ती प्रांतिक पेढी असणे आवश्यक होते. यासाठी ११ ऑक्टोबर १९११ रोजी मुंबई येथे " मुंबई सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक " स्थापन करण्यात आली. संपूर्ण मुंबई इलाखा तिच्या कार्यक्षेत्रामध्ये येत होता. लोकांनी या बँकेत पैसे ठेवावेत म्हणून सरकारने या बँकेची हमी घेतली. इ. स. १९२३ पासून या बँकेला " मुंबई प्रांतिक सहकारी बँक" हे नाव मिळाले. तर इ. स. १९५२ पासून ती " मुंबई स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक" या नावाने ओळखण्यात येऊ लागली. सभासदांना दिलेल्या कर्जाचा योग्य विनियोग झाला की नाही हे जवळून पाहता यावे व प्रांतिक बँकांचा ताण कमी करावा यासाठी

इ. स. १९१७ पासून प्रत्येक जिल्ह्यामध्ये जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका निघू लागल्या. त्या प्रांतिक बँकेच्या सभासद झाल्या. त्यामुळे त्यांना कमी पडणारा पैसा प्रांतिक बँक पुरवू लागली. [३०]

या " मुंबई प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह बँके " चे आद्यप्रवर्तक सर विठ्ठलदास ठाकरसी, सर लल्लूभाई सामळदास व नामदार गोपाळकृष्ण गोखले हे होते. ही बँक मुंबईसारख्या मोठ्या व्यापारी शहरामध्ये असल्यामुळे तिच्याकडे भांडवलाची कमतरता नव्हती. या बँकेने सोसायट्यांच्या केंद्रस्थानी देखरेखीस सोयीस्कर अशा ठिकाणी आपल्या शाखा काढून सहकारी पतपेढ्यांना मोठ्या प्रमाणात वित्तपुरवठा केला. त्यामुळे अल्पावधीतच मुंबई प्रांतातील शेतकी पतपेढ्यामध्ये झपाट्याने वाढ झाली.[३१]

या सहकारी शेतकी सोसायट्या आपल्या सभासदांना माफक दराने कर्ज पुरवितात. हेच त्यांचे मुख्य काम होते. शेतकऱ्यांच्या इतर गरजा भागविण्याच्या दृष्टीने या संस्थेचे उद्देश अपुरे पडले. सभासदांना अल्प मुदतीची कर्जे देणे, त्यांना लागणाऱ्या निरनिराळया वस्तूंचा पुरवठा करणे, त्यांच्या शेतमालाची विक्री करणे वगैरे विशेष प्रकारचे व जबाबदारीचे व्यवहार करण्यासाठी या प्राथमिक सहकारी सोसायट्यांपेक्षा विविध कार्यकारी सहकारी सोसायट्या काढाव्यात अशी शिफारस मेथा-भन्साळी कमिटीने केली. त्यानुसार या प्राथमिक सहकारी सोसायट्यांनी आपले पोटनियम दुरूस्त करून विविध कार्यकारी सहकारी सोसायट्यांचे नियम पत्करावेत अशी सूचना नानावटी कमिटीने केली. त्यानुसार बहुतेक सोसायट्यांनी आपल्या पोटनियमात दुरूस्ती करून विविध कार्यकारी सहकारी सोसायट्यांचे स्वरूप धारण केले.

नावाप्रमाणेच या सोसायट्या अनेक प्रकारची कामे करतात. या सोसायट्या म्हणजे शेतकी पतपेढ्यांची पुढची पायरी होय. विविध कार्यकारी सहकारी सोसायट्यामार्फत शेतकऱ्यांना खते, बी-बियाणे, अवजारे, औषधे याचबरोबर जमीन सुधारणा, विहीर खोदणे, पंप बसविणे यासारख्या बाबीसाठी मध्यम मुदतीचे कर्ज मिळते. पेरणीच्या वेळी लागणारा पैसा अल्प मुदतीचे कर्ज म्हणून शेतकऱ्यांना मिळतो. या विविध कार्यकारी सहकारी सोसायटीला भारतात विविध उद्दिष्ट सहकारी संस्था, सर्व सेवा सहकारी सोसायटी, सेवा प्रबंध सोसायटी अशी वेगवेगळी नावे आहेत. [३२]

४.३.१ उद्देश

विविध कार्यकारी सेवा संस्था स्थापनेच्या कल्पनेचा उगम इ. स. १९५९ च्या नागपूर येथे भरलेल्या अखिल भारतीय कॉग्रेस कमिटीच्या अधिवेशनात झाला. या अधिवेशनामध्ये विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांच्या बाबतचा ठराव संमत करण्यात आला. अशा या विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांचे उद्देश पुढीलप्रमाणे

१) जमीन अथवा पीक तारण घेऊन सभासदांना अल्प व मध्यम मुदतीची कर्जे देणे.

२) सभासदांना जीवनोपयोगी वस्तूंचा पुरवठा करणे.

३) सभासदांच्या शेतमालाची सहकारी पध्दतीने विक्री करण्यासाठी त्यांना उत्तेजन देणे.

४) सभासदांत परस्पर सहकाराची भावना वाढीस लावणे.

५) शेतीकरिता आवश्यक असणाऱ्या अवजारे, बी-बीयाणे, खते यांची खरेदी करून सभासदांना त्याचा पुरवठा करणे. [३३]

६) सभासदांमध्ये काटकसर, स्वावलंबन, सहकार यांचा प्रसार होण्यास उत्तेजन देणे.

७) सोसायटीतील सभासदांचा शेतमाल गोळा करणे, त्याच्या वाहतुकीची व विक्रीची व्यवस्था करणे.

८) सोसायटीतील सभासदांच्या दुभत्या जनावरांचे दूध एकत्र करून त्याच्या वाहतुकीची व विक्रीची व्यवस्था करणे.

९) सोसायटीतील सभासदांचा शेतमाल साठविण्यासाठी गोदामे बांधणे किंवा भाड्याने घेऊन ती सभासदांना भाड्याने देणे.

१०) सभासदांसाठी धान्यभांडार चालविणे.

११) भाग, कर्जे, देणग्या, प्रवेशशुल्क इ. च्या रूपाने भांडवल जमा करणे.

१२) शेती व शेतीपुरक व्यवसायासाठी कर्जपुरवठा करणे व या व्यवसायातील सुधारित ज्ञानाचा सभासदांमध्ये प्रसार करणे व ते उपयोगात आणण्यासाठी सभासदांना उत्तेजन देणे.

१३) सरकारसाठी आवश्यक तेव्हा धान्य गोळा करणे व ते सरकारास पुरविणे.

१४) जमीन सुधारणेसाठी लँड मॉर्गेज बँकेकडून सभासदांना कर्ज मिळविण्यासाठी अर्ज मागविणे व ते मिळवून देण्यासाठी पुढाकार घेणे. [३४]

४.३.२ तालुक्यातील प्राथमिक सहकारी शेती संस्थांचा आरंभ व विकास

बार्शी तालुक्यामध्ये सहकारी चळवळीचा आरंभ करण्याचे श्रेय रामचंद्र मोरेश्वर साने यांना जाते. त्यांचा जन्म ९ ऑक्टोबर १८५९ रोजी झाला. मॅट्रिकपर्यंत शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांनी पुण्याच्या न्यू

इंग्लिश स्कूलमध्ये इ. स. १९८० मध्ये शिक्षकाची नोकरी पत्करली. पुढे ते ' ज्ञानप्रकाश ' या वृत्तपत्राचे संपादक झाले. त्यांच्या अभ्यासपूर्ण लेखनामुळे त्यांना १० वर्षे हे काम करण्याची संधी मिळाली. हे कार्य करत असतानाच इ. स. १८९२ मध्ये त्यांनी आपले वकीलीचे शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर दोन वर्षे पुण्यामध्ये वकीली करून ते पुढे वकीलीच्या व्यवसायानिमित्त बार्शी येथे आले. सर्वसामान्य शेतकऱ्यांचे जीवन त्यांना पत्रकार असताना समजले होते. मात्र बार्शीसारख्या लहान ठिकाणी त्यांना या शेतकऱ्यांचे जीवन फारच जवळून पहावयास मिळाले. त्यामुळे त्यांनी सहकारी कायदा होण्याच्या आगोदर दोन वर्षे संपूर्ण तालुक्यात फिरून शेतकऱ्यांमध्ये स्वावलंबन, काटकसर, सहकार या भावना वाढविण्यासाठी जनजागृती केली. पुढे सहकार कायदा होताच त्यांनी तालुक्यामध्ये सहकारी पतपेढ्या स्थापन करण्याचा उद्योग सूरू केला. पुढे हेच त्यांचे जीवनकार्य बनले. त्यांनी बार्शी तालुक्यातील " कसबे तडवळे " या ठिकाणी मे १९०५ मध्ये पहिली सोसायटी स्थापन केली. ही बार्शी तालुक्यातीलच नव्हे तर सोलापूर जिल्ह्यातील पहिली सोसायटी होय. या कामामध्ये त्यांना या गावातील नारायणराव देशपांडे यांचे खूप सहकार्य लाभले. त्यानंतर त्यांनी इ. स. १९०६ मध्ये बार्शी येथे प्रमुख व्यापारी व शेतकरी यांच्या साहाय्याने सहकार पतपेढी स्थापन केली. पुढे त्यांनी तालुक्यात तसेच संपूर्ण जिल्ह्यामध्ये फिरून शेतकऱ्यांच्या बैठका घेऊन त्यांना सहकारी पतपेढ्यांचे महत्व पटवून दिले. त्यामुळे तालुक्यामध्ये तसेच आसपासच्या प्रदेशामध्ये सहकारी सोसायट्यांची संख्या झपाट्याने वाढू लागली. पुढे या सोसायट्यांना पैसे पुरविण्याची गरज निर्माण झाल्याने बार्शी पतपेढीचे रूपांतर बार्शी युनियनमध्ये करण्यात आले. सहकारातील त्यांच्या या योगदानामुळे त्यांना सरकारने १० जिल्ह्यासाठी 'ऑर्गनायझर ' म्हणून नेमले.

इ. स. १९२० मध्ये बार्शी युनियनचे रूपांतर बार्शी बँकेत झाले. या बँकेची व्याप्ती वाढल्यानंतर अशा स्वरूपाची बँक सोलापूर जिल्ह्याकरिता असावी या हेतूने इ. स. १९१८ मध्ये जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक स्थापन झाली. यामध्येही रामचंद्र मोरेश्वर साने यांचा पुढाकार होता. पुढे दोन वर्षात या बँकेला भरपूर कार्यक्षेत्र मिळावे या हेतूने बार्शी युनियनमध्ये सामील झालेल्या सोसायट्या या जिल्हा बँकेस जोडण्यात आल्या. [३५]

बार्शी तालुक्यामध्ये इ. स. १९५३ पर्यंत तडवळे, कारी, रातंजन, साकत, मळेगाव, येडशी, रूई, उपळे, उक्कडगाव, ममदापूर, महागाव, कोरफळे, चिंचोली, घाणेगाव, पिंपरी, आगळगाव, काटेगाव, घारीपुरी या गावातील सोसायट्यांकडे बँक कर्ज नव्हते. इ. स. १९५३ अखेर नारी विविध कार्यकारी सहकारी सोसायटीचे भागभांडवल बार्शी तालुक्यामध्ये सर्वाधिक होते, तर महागाव सोसायटीचे सर्वात कमी भागभांडवल होते. इ. स. १९५३ अखेर पांगरी विविध कार्यकारी सहकारी सोसायटीचा राखीव निधी व

खेळते भांडवल तालुक्यात सर्वाधिक होते. त्यामुळेच सामाजिक कार्यामध्ये ही सोसायटी तालुक्यामध्ये अग्रेसर होती. [३६]

तक्ता क्र. २८


तालुक्यातील सोसायट्यांची इ. स. १९५३ पर्यंतची स्थिती

इ. स.	सोसायट्या	सभासद संख्या	भागभांडवल	खेळते भागभांडवल
१९१३	२	२५९	७,९००	४७,११६
१९२३	१८	१७२५	५४,४४५	३,९४,८३७
१९३३	२८	२६१३	९२,२९५	५,५४,१५८
१९४३	४२	३४३४	१,३०,३२९	७,०७,८४५
१९५३	७२	५३५८	२,०६,१८४	९,९१,२७९

(काळे. गो. र, बार्शी सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि. व बार्शी तालुक्यातील सहकारी पतपेढयांचा इतिहास, इ. स. १९५४)

इ. स. १९५७-५८ मध्ये बार्शी तालुक्यातील विविध कार्यकारी सहकारी सोसायट्यांची संख्या ८४ इतकी झाली. त्यांची एकूण सभासद संख्या ७,५२३ तर खेळते भांडवल १५,१३,६५९ रू. इतके होते. या वर्षांमध्ये सर्व सोसायट्यांनी एकूण ७,७८,५१५ रू. कर्जे दिली होती. या वर्षाखेर सोसायट्यांनी ५,६९,६३० रू. कर्जवसूली केली, शिवाय एकूण येणे बाकी १२,७७,७३४ रू. इतकी होती. इ. स. १९५८-५९ मध्ये या सोसायट्यांची संख्या ९३ इतकी झाली, तर सभासद संख्या ९,४७७ इतकी झाली. खेळते भांडवल २१,००,८९८ रू. इतके होते. या वर्षामध्ये या सर्व सोसायट्यांनी एकूण १४,२१,९१३ रू. कर्जे दिली होती. या पूर्वीच्या वर्षापेक्षा हे कर्जवाटप जवळजवळ दुप्पट होते. तर वर्षअखेर या सर्व सोसायट्यांची कर्जवसूली ९,८२,३७३ रू. इतकी झाली. एकूण येणे बाकी १७,५५,०५६ रू. इतकी होती. सोसायट्यांची संख्या व सभासदांची संख्या यामध्ये बार्शी तालुक्याचा सोलापूर जिल्ह्यामध्ये प्रथम क्रमांक होता.[३७]

आलेख क्र. २



(संदर्भ: सामाजिक आर्थिक विवेचन, सोलापूर जिल्हा, संबंधित वार्षिक अहवाल व काळे गो. र., बार्शी सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक व बार्शी तालुक्यातील सहकारी पतपेढ्यांचा इतिहास.)

इ. स. १९६०-६१ मध्ये बार्शी तालुक्यातील सहकारी चळवळीची व्याप्ती खूप वाढली. याचे उत्तम उदाहरण म्हणजे सोसायट्यांची संख्या ९३ वरून ११७ इतकी प्रचंड वाढली. त्यांची सभासद संख्या ११,९२९ इतकी झाली. भागभांडवल ९,४४,८१५ रूपये इतके झाले. तर खेळते भांडवल २८,६३,६७५ इतके झाले. या वर्षामध्ये या सर्व सोसायट्यांनी एकूण २४,७३,६५४ रू. कर्जे दिली होती. ही रक्कम गतवर्षाच्या तुलनेत १० लाखापेक्षा जास्त होती. एकंदर तालुक्यातील या सोसायट्यांच्या कार्याची व्याप्ती प्रचंड वेगाने वाढत होती. शेती व शेतकऱ्यांच्या सर्वांगिण विकासाच्या दृष्टीकोनातून ही बाब महत्वाची होती. [३८]


इ. स. १९६३-६४ मध्ये तालुक्यातील सोसायट्यांची संख्या ११७ वरून १२६ इतकी झाली. तर सभासद संख्या गतवर्षाच्या तुलनेत ११,९२९ वरून १५,०६७ इतकी झाली. भागभांडवल १६,८१,०० रूपये इतके झाले. गतवर्षाच्या तुलनेत यामध्ये ७ लाख रूपयांपेक्षा जास्त वाढ झाली. या वर्षाखेर सर्व सोसायट्यांचा राखीव निधी ५,५५,००० रूपये इतका होता. तर खेळते भांडवल ५१,२३,००० रूपये इतके झाले. गतवर्षाच्या तुलनेत झालेली ही वाढ जवळजवळ दुप्पट होती. या वर्षाखेर तालुक्यातील सोसायट्यांनी ३३,४८,००० रू कर्जवाटप केले. तर ३१,८१,००० रूपये इतकी कर्जवसूली केली. तरीही या वर्षाखेर त्यांची एकूण येणे बाकी ३९,३०,००० रूपये इतकी, तर थकबाकी ११,९१,००० रूपये इतकी होती.

इ. स. १९६४-६५ मध्ये सोसायट्यांची संख्या १२७ झाली तर सभासद संख्या १७,७२० इतकी झाली. या वर्षाअखेर यांचे भागभांडवल १९,४८,००० रूपये इतके होते, तर राखीव निधी ५,८०,०००

रूपये इतका होता. खेळते भांडवल ५४,२८,००० रूपये इतके झाले होते. या वर्षामध्ये सर्व सोसायट्यांनी ३१,४५,००० रूपये कर्जवाटप केले. तर कर्जवसूली २९,७०,००० रूपये इतकी झाली. गतवर्षाच्या तुलनेत हे कर्जवाटप व कर्जवसुलीही कमी होती. तर या वर्षाखेर सोसायट्यांची एकूण येणे बाकी ४१,०५,००० रूपये इतकी व थकबाकी २१,२०,९४१ रूपये इतकी होती. थकबाकीचे प्रमाण खूपच वाढले होते. थोडक्यात या सोसायट्यांच्या वाढत्या व्यवहाराबरोबर त्यांची थकबाकी फार झपाट्याने जवळजवळ दुपटीनेच वाढत आहे. हीच या सोसायटयासाठीची धोक्याची घंटा मानली जाते. [३९]

इ. स. १९४७ पूर्वी बार्शी तालुक्यामध्ये ३७ विविध कार्यकारी सहकारी सोसायट्या स्थापन झाल्या होत्या. इ. स. १९४७ ते १९९० पर्यंत ७९ विविध कार्यकारी सहकारी सोसायट्या स्थापन झाल्या. अशा मिळून इ. स. १९९० अखेर तालुक्यामध्ये ११६ विविध कार्यकारी सहकारी सोसायट्या स्थापन झाल्या. यामध्ये इ. स. १९५८ ते इ. स. १९६० या काळामध्ये ३२ विविध कार्यकारी सहकारी सोसायट्यांची भर पडली. स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये जितक्या सोसायट्या स्थापन झाल्या होत्या, जवळजवळ तितक्या सोसायट्या या दोन वर्षाच्या काळामध्ये स्थापन झाल्या. थोडक्यात स्वातंत्र्यप्राप्तीनंतर विविध कार्यकारी सहकारी सोसायट्यांचा विस्तार प्रंचंड वाढला. [४०]

आलेख क्र. ३



(संदर्भः सामाजिक आर्थिक विवेचन, सोलापूर जिल्हा, संबंधित वार्षिक अहवाल व काळे. गो. र, बार्शी सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक, व बार्शी तालुक्यातील सहकारी पतपेढ्यांचा इतिहास.)

इ. स. १९६०-६१ मध्ये तालुक्यातील विविध कार्यकारी सहकारी सोसायट्यांचे एकूण भागभांडवल ९,४४,८१५ रूपये इतके होते व खेळते भांडवल २८,६३,६७५ रूपये इतके होते. पुढील ३० वर्षांमध्ये

भागभांडवल जवळजवळ १५ पट वाढल्याचे दिसते. तर खेळते भांडवल जवळजवळ ३० पटीपेक्षा जास्त वाढल्याचे दिसून येते. स्वांत्र्यप्राप्तीनंतर या सोसायट्यांचा कामाचा विस्तार अगदी झपाट्याने झाला. या सोसायट्यांनी शेतीसाठी फार मोठ्या प्रमाणामध्ये वित्तपुरवठा केला. त्यामुळे तालुक्यातील शेतीविकासाचा वेग वाढण्यास मदत झाली. या सोसायट्यांच्या माध्यमातून तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यास मदत झाली. इ. स. १९८१-८२ मध्ये बार्शी तालुक्यातील विविध कार्यकारी सहकारी सोसायट्यांची संख्या १२० होती. ती संख्या इ. स. १९९० अखेर ११५ इतकी झाली. [४१]

इ. स. १९८१ च्या जणगणने नंतर १३ ऑगस्ट १९८२ रोजी बार्शी तालुक्यातील **१)** येडशी **२)** दुधगाव **३)** गोपाळवाडी **४)** कोंबडवाडी **५)** कसबे तडवळे **६)** जवळे दुमाला **७)** अंबेजवळगे **८)** कौडगाव ही ८ गावे उस्मानाबाद जिल्ह्यास जोडण्यात आली. त्यामुळे या गावांच्या सोसायट्या उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये सामाविष्ट झाल्या. [४२]

४.३.३ तालुक्यातील काही महत्त्वाच्या प्राथमिक सहकारी शेती संस्था

बार्शी तालुक्याला सहकाराची प्रदीर्घ व वैभवशाली परंपरा लाभलेली आहे. तालुक्यातील सहकारी चळवळीच्या उद्गात्यांनी या सहकाराला तालुक्यामध्ये नैतिक अधिष्ठान प्राप्त करून दिले. तसेच आपल्या वृत्तीतून व त्यागातून तालुक्यातील सहकारी चळवळीच्या विकासास अनुकूल पार्श्वभूमी निर्माण केली. त्यामुळेच तालुक्यातील सहकारी चळवळ कर्तृत्व व परंपरेने चालत आलेल्या वैचारिक पायावर सक्षमपणे उभी आहे. यामध्ये तालुक्यातील प्राथमिक सहकारी शेती संस्थांचे योगदान खूप महत्वपूर्ण आहे. बार्शी तालुक्याच्या आर्थिक प्रगतीमध्ये व सामान्य शेतकऱ्यांच्या जीवनामध्ये या संस्थांचे मौलिक योगदान आहे. आपल्या कार्याच्या माध्यमातून या संस्थांनी तालुक्यमध्ये आपला एक वेगळा ठसा उमटविला आहे. तालुक्यातील या संस्थांनी आपल्या सभासदांना मुबलक प्रमाणात वित्तपुरवठा करत असतानाच आपल्या सामाजिक बांधिलकीकडे कधीच दुर्लक्ष केले नाही. यापैकी तालुक्यातील काही महत्त्वाच्या सोसायट्यांचे कार्य पुढीलप्रमाणे.

१) तडवळे विविध कार्यकारी सहकारी सोसायटी

बार्शी तालुक्यातील ' कसबे तडवळे ' या ठिकाणी स्थापन झालेली ही बार्शी तालुक्यातीलच नव्हे तर सोलापूर जिल्ह्यातील पहिली सहकारी सोसायटी होती. या सोसायटीच्या स्थापनेमध्ये तेथील स्थानिक पुढारी श्री. नारायण कृष्ण देशपांडे यांचे मोलाचे योगदान आहे. हेच या सोसायटीचे पहिले चेअरमन होते.

५२ रूपये प्रवेश फी, ८०० रूपये मुदत ठेव व ८०० रूपये सरकारी कर्ज असे एकूण १६५२ रूपये एवढ्या भांडवलावर ही सोसायटी सुरू झाली. पुढे काळानुसार तिचे स्वरूप व व्याप्ती वाढत गेली.

कसबे तडवळे या गावामध्ये प्रवेश करताना गावाच्या प्रवेशव्दाराजवळून एक नाला (ओढा) वाहत होता. पावसाळयात या ओढयामुळे लोकांना गावात ये-जा करताना खूप त्रास होत होता. त्यामुळे या सोसायटीने सदर ओढयावर पूल बांधण्यासाठी आपल्या नफ्यातून ५०० रूपये दिले होते. तसेच स्थानिक शाळेलाही सोसायटी दरवर्षी २०० रूपये मदत देत असे. लोकांचे आरोग्य सुव्यवस्थित रहावे म्हणून या सोसायटीने मोफत औषधे देण्याचा उपक्रम राबविला होता. या सोसायटीच्या माध्यमातून अनेक शेतकरी कुटुंबाची परिस्थिती सुधारली. इ. स. १९५३ पर्यंत या सोसायटीने आपले व्यवहार स्वतःच्या भांडवलावरच केले होते. कोणत्याही बँकेचे कर्ज या सोसायटीवर नव्हते. इ. स. १९८१ च्या जणगणनेनंतर हे गाव बार्शी तालुक्यातून उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये सामाविष्ट करण्यात आले.

२) कारी विविध कार्यकारी सोसायटी

इ. स. १९१२ मध्ये स्थापन झालेली " कारी विविध कार्यकारी सोसायटी " ही तालुक्यातील दुसरी जुनी सहकारी सोसायटी आहे. या सोसायटीच्या स्थापनेमध्ये तेथील स्थानिक पुढारी श्री. रंगो केशव पाटील कारीकर यांचे मोलाचे योगदान आहे. या सोसायटीचे पहिले चेअरमन श्री. कृष्णात रामचंद्र हवेली हे होते. शिवाय या सोसायटीच्या उभारणीमध्ये श्री. धोंडी नरहर खडके यांचाही उल्लेख केला जातो. स्वतःच्या भांडवलावर चालणाऱ्या या सोसायटीने सामाजिक कार्यावरही खर्च केला होता. [४३]

३) आंबेजवळगे विविध कार्यकारी सोसायटी

श्री. जर्नादन नारायण कुलकर्णी यांनी इ. स. १९१४ मध्ये " आंबेजवळगे विविध कार्यकारी सोसायटी " स्थापन केली. ते या सोसायटीचे पहिले व पुढे सतत २१ वर्षे चेअरमन होते. सुरूवातीस या सोसायटीमध्ये आंबेजवळगे, कौडगाव व गुंजेवाडी ही तीन गावे होती. आंबेजवळगे विविध कार्यकारी सोसायटी ही सतत 'अ' वर्गात समावेश असणारी सोसायटी होती. या सोसायटीने वेळोवेळी सभासद तसेच बिगर सभासदांकडून ठेवी घेऊन, प्रसंगी बँकेकडून कर्ज घेऊन आपल्या कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांचे हित जोपासले. आंबेजवळगे सोसायटी मधून वेगळे होऊन इ. स. १९३५ मध्ये स्थापन झालेली " कौडगाव विविध कार्यकारी सोसायटी " ही दरवर्षी धर्मादाय फंडातून विविध सामाजिक कार्यावर खर्च करते.[४४]

४) वैराग विविध कार्यकारी सहकारी सोसायटी

इ. स. १९४७ मध्ये " वैराग विविध कार्यकारी सोसायटीची " स्थापना झाली. या सोसायटीचे पहिले चेअरमन श्री. ना. द. पिंपरकर हे होते. या सोसायटीने प्रथम गरजू शेतकऱ्यांना कर्ज देण्याचा व वैरागसह आसपासच्या गावात नांगर भाड्याने देण्याचा उपक्रम सुरू केला. या सोसायटीने आपल्या सभासदांना स्वस्त दराने बियाणे, खते व शेतीची विविध अवजारे पुरविली, शेतकऱ्यांना आपल्या पिकास जलद गतीने पाणी देता यावे म्हणून १ डिसेंबर १९५० रोजी एक विद्युत पंपसेट खरेदी करून तो शेतकऱ्यांना अल्प दराने भाडयाने दिला. पुढे याचे महत्व लक्षात घेऊन आणखी एक पंपसेट सोसायटीने खरेदी केला.

सरकारने धान्य व कापड यांचे वाटप सोसायट्यांमार्फत करण्याचे जाहीर केल्यावर हे कार्यदेखील या सोसायटीने उत्तमरित्या पार पाडले. या सोसायटीमधून अन्नधान्य, कपडे, सूत, रॉकेल, साखर, पेंड, सिमेंट मिक्सर इत्यादी बाबी योग्य प्रमाणात पुरविल्या जात होत्या. वैराग सोसायटीचे सर्वात उल्लेखनीय कार्य म्हणजे या सोसायटीने बेकारांना काम मिळावे म्हणून एक लोखंडाचा कारखाना चालविण्यास घेतला होता. असा उपक्रम राबविणारी ही बार्शी तालुक्यातील पहिलीच सोसायटी होती. धान्य व कापड यावरील नियंत्रण उठविल्यानंतरही या सोसायटीने स्वतःच्या हिमतीवर कापड, साखर, गूळ अशा वस्तूंची विक्री करण्याचे काम चालूच ठेवले होते. सोसायटीमार्फत एक आडत दुकान चालविणे व शेतकऱ्यांच्या मालतारणाचा एक आगळावेगळा उपक्रम या सोसायटीने सुरू केला होता. या सोसायटीने वैराग येथील विद्यामंदिर या शाळेला १,७०० रूपये देणगी दिली. या सोसायटीला स्वतःची जागा नसल्याने इ. स. १९५१ मध्ये जागा खरेदी केली.[४५] या सोसायटीच्या माध्यमातून वैराग परिसरातील शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीमध्ये आमुलाग्र बदल घडून आला. आजतागायत राजकारणविरहीत दृष्टीकोन डोळयासमोर ठेऊन या सोसायटीने अत्यंत प्रामाणिकपणे आपल्या सभासदांच्या हितासाठीच कार्य केले. शिवाय दिलेल्या कर्जाचा संबंधित कारणासाठीच उपयोग होतो का नाही यावरही या सोसायटीने जाणिवपूर्वक लक्ष दिले. त्यामुळे उत्तरोत्तर या सोसायटीची तालुक्यातील प्रथम क्रमांकाची सोसायटी म्हणून ओळख निर्माण झाली. या सोसायटीने विविध सामाजिक कार्यावर सातत्याने खर्च केला. राष्ट्रीय आपत्तीच्यावेळी शासनाला मदत निधी पाठविला आहे. तसेच गणेशोत्सव, शिवजयंती फार मोठ्या प्रमाणावर साजरी केली जाते. [४६]

५) शेळगाव विविध कार्यकारी सोसायटी

बार्शी तालुक्यातील मर्यादित जबाबदारीच्या तत्वावर स्थापन झालेली " शेळगाव विविध कार्यकारी सोसायटी " ही पहिली सहकारी सोसायटी होती. तिची स्थापना इ. स. १९१४ मध्ये झाली. श्री. माधवराव रंगनाथ केसकर हे या सोसायटीचे पहिले चेअरमन होते. शेती सुधारणेसाठी या सोसायटीने अथक प्रयत्न केले. आपल्या कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांना सुधारित बी-बीयाणे, शेतीची अवजारे पुरविण्याकडे सातत्याने

लक्ष पुरविले. या सोसायटीने धर्मादाय फंडातून विविध सामाजिक कार्यास हातभार लावला. शाळेतील गरीब विद्यार्थ्यांना कपडे व पुस्तके वाटप, गावातील पाण्याच्या विहिरीस रहाट बसविणे, वाचनालयास तसेच पौढ शिक्षणास मदत करणे असे अनेक उपक्रम राबविले. या सोसायटीचे एक महत्वाचे वैशिष्टय म्हणजे या सोसायटीला सुरूवातीपासूनच स्वत:ची इमारत होती. इ. स. १९४२ मध्ये या सोसायटीने आपला रौप्य महोत्सव साजरा केला होता. या कार्यक्रमास साहित्यसम्राट नरसिंह चिंतामण केळकर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी येथे बार्शी तालुक्यातील सहकारी कार्यकर्त्यांचा एक मेळावा भरला होता.[४७]

६) साकत विविध कार्यकारी सोसायटी

इ. स. १९१५ मध्ये स्थापन झालेल्या " साकत विविध कार्यकारी सोसायटी " मध्ये सुरूवातीला साकत शिवाय पिंपरी व घाणेगाव ही दोन गावे समाविष्ट होती. या सोसायटीचे सेक्रेटरी श्री. आण्णाजी नरहर कुलकर्णी हे बार्शी तालुक्यातील नावाजलेले सेक्रेटरी होते. सोसायटीचे कामकाज उत्तम व पारदर्शी होते. या सोसायटीने गावातील चावडी बांधण्यास हातभार लावला. रस्ते दुरूस्तीच्या कामामध्ये ही सोसायटी प्रत्येक वर्षी खर्च करत असे. स्थापनेपासूनच शैक्षणिकदृष्टया ही एक जागृत सोसायटी होती. शिक्षणाचे महत्व लक्षात घेऊनच साकत येथील हनुमान वाचनालयास या सोसायटीने सातत्याने देणगी दिलेली आहे. पूर्वी लोक आरोग्याविषयी फारसे जागृत नव्हते. शिवाय आधुनिक पध्दतीच्या औषधोपचार पध्दती नव्हत्या. प्रामुख्याने ग्रामीण समाजासाठी तर रोगराई नित्याचीच होती. खेडयातील ही समस्या लक्षात घेऊन या सोसायटीचे ग्रामीण भागामध्ये मोफत औषधोपचार करण्याचे काम निरंतर चालू होते. [४८] गोरवाला कमिटीच्या शिफारशीप्रमाणे सरकारने सहकारी संस्थांच्या शेअर-भांडवलामध्ये भागिदारी पत्करण्याचे ठरविल्यामुळे साधारणपणे पाच मैलाच्य क्षेत्रात असणाऱ्या क्रेडिट व विविध कार्यकारी संस्थांची एकच मोठ्या आकाराची विविध कार्यकारी सोसायटी बनविण्याचे धोरण सरकारने अवलंबिले. त्यामुळे तालुक्यातील काही सोसायट्यांमध्ये एकापेक्षा जास्त गावांचा समावेश होता. [४९]

७) रातंजन विविध कार्यकारी सोसायटी

भाऊसाहेब साने यांच्या पुढाकाराने इ. स. १९१५ मध्ये " रातंजन विविध कार्यकारी सोसायटी " स्थापन झाली. याकामी स्थानिक रहिवाशी श्री. आनंदराव शिवाजीराव कुलकर्णी यांनी विशेष परिश्रम घेतले. हेच या सोसायटीचे पहिले चेअरमन होते. बार्शी तालुक्यातील उत्तम सोसायट्यांपैकीच ही एक सोसायटी होती. श्री. आनंदराव शिवाजीराव कुलकर्णी यांच्यानंतर सलग ३१ वर्षे श्री. श्रीपतराव देशमुख हे या सोसायटीचे चेअरमन होते. ते अतिशय कर्तव्यदक्ष होते. या सोसायटीने धान्य दुकान, कापड वाटप ही कामे चांगल्या प्रकारे पार पाडली. शेतीउत्पादन वाढविण्याच्या दृष्टीने या सोसायटीने शेतकऱ्यांना पिकास

पाणी देण्यासाठी एक ऑईल इंजिन घेतले. तसेच प्रारंभीच्या काळामध्ये शेतकऱ्यांना भाडयाने देण्यासाठी दोन नांगर ठेवले होते. या सोसायटीच्या माध्यमातून अनेक शेतकऱ्यांनी कर्ज घेऊन आपली शेती व शेतीच्या माध्यमातून आपली आर्थिक परिस्थिती सुधारल्याची अनेक उदाहरणे आहेत.

८) पांगरी विविध कार्यकारी सोसायटी

इ. स. १९१५ मध्ये स्थापन झालेल्या " पांगरी विविध कार्यकारी सोसायटी " मध्ये सुरूवातीला पांगरी या गावाशिवाय जहानपूर, उक्कडगाव, ममदापूर, चिंचोली व पांढारी या ५ गावांचा सामावेश होता. ही सोसायटी स्थापन करण्यामध्ये श्री. नारायण भास्कर देशपांडे यांचे बहुमोल योगदान होते. तेच या सोसायटीचे पहिले चेअरमन होते. या सोसायटीने धान्य दुकान, कापड वाटप ही कामे चांगल्या प्रकारे पार पाडली. पांगरी या गावालगत एक पाण्याचा मोठा ओढा आहे. पावसाळयामध्ये या ओढयाचे पाणी गावामध्ये शिरते. त्यामुळे गावकऱ्यांना प्रचंड त्रास होत असे. या सोसायटीने गावची ही समस्या लक्षात घेऊन गावालगतच्या या ओढयास २५० मीटर लांबीचा तट बांधून पावसाळयात गावात शिरणाऱ्या पाण्यापासून गावचे संरक्षण केले. हे या सोसायटीचे उल्लेखनीय व आदर्शवत असे सामाजिक काम होते. आजही हा चिरेबंदी तट सुस्थितीमध्ये आहे. या गावामध्ये आठवडी बाजार भरतो तो रस्ता लोकांच्या रहदारीमुळे सतत खराब होत असे. हा रस्ता तसेच गावातील इतर रस्ते सातत्याने दुरूस्त करण्याचे काम या सोसायटीने केले. गावातील शाळेसाठी १,८०० रूपयाची मदत केली होती. या सोसायटीमुळे अनेक शेतकरी कुटुंबांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यास मदत झाली.[५०]

९) मळेगाव विविध कार्यकारी सोसायटी

इ. स. १९१७ मध्ये स्थापन झालेल्या " मळेगाव विविध कार्यकारी सोसायटी " चे संस्थापक व प्रथम चेअरमन श्री. रामचंद्र श्रीनिवास देशपांडे हे होते. याही सोसायटीने आपली सामाजिक बांधिलकी जपत ग्रामीण आरोग्याची गरज लक्षात घेऊन सतत ३० वर्षे मोफत औषधे वाटपाचे काम केले. या सोसायटीने गावालगतच्या गावतळयाची दुरूस्ती करून गावाच्या सांडपाण्याच्या प्रश्नावर मात केली. बलसंवर्धनाचे महत्व लक्षात घेऊन गावातील व्यायामशाळेचे बांधकाम या सोसायटीने आपल्या पैशातून केले. इ. स. १९१७ मध्ये स्थापन झालेल्या " नारी विविध कार्यकारी सोसायटी " च्या स्थापनेमध्ये कारीचे श्री. रंगो केशव पाटील कारीकर व श्री. भाऊसाहेब साने यांनीच पुढाकार घेतला. या कामामध्ये त्यांना श्री. व्यंकटेश सखाराम पाटील यांनी खूप सहकार्य केले. हेच या सोसायटीचे पहिले चेअरमन होते. या सोसायटीस सुरूवातीस केवळ १७ सभासद व ठेवी ५,००० रूपये मिळाल्या. या ठेवीमध्ये पानगावचे

सावकार श्री. गेणबा आंदोबा गव्हाणे याची २,००० हजार रूपयाची ठेव होती. सोसायटीने वेळोवेळी युध्द मदत निधी, मोफत औषध वाटप, गांधी मदत निधी अशा सामाजिक कार्यास हातभार लावला. [५१]

तक्ता क्र. २९

तालुक्यातील प्राथमिक सहकारी शेती संस्थांची आर्थिक स्थिती

इ. स	राखीव इतर निधी	भागभांडवल	खेळते भांडवल
१९६३-६४	५,५५,०००	१६,८१,०००	५१,२३,०००
१९६७-६८	६,६९,०००	२४,८४,०००	६०,६५,०००
१९७३-७४	९,७७,५७०	३२,३१,१०५	१,३३,२५,३२०
१९८१-८२	१४,२१,०००	४४,८८,०००	१,७४,००,०००
१९८५-८६	३३,७९,०००	६२,४५,०००	१,४३,०७,०००
१९९०-९१	३२,४६,०००	१,४०,९४,०००	८,२५,९५,०००

(संदर्भ : सामाजिक-आर्थिक विवेचन, सोलापूर जिल्हा, संबंधित वर्षाचे अहवाल)

वरील टेबलवरून असे दिसून येते की, तालुक्यातील प्राथमिक सहकारी शेती संस्थांची आर्थिक स्थिती सातत्याने वाढलेली आहे. विशेषत: इ. स. १९८५-८६ ते इ. स. १९९०-९१ या पाच वर्षाच्या काळामध्ये या संस्थांचे खेळते भांडवल साडेपाचपटीपेक्षा अधिक वाढले होते.

इ. स. १९१९ मध्ये " रूई विविध कार्यकारी सोसायटी " ची स्थापना झाली. या सोसायटीमध्ये सुरूवातीला निंबळक हे एक गाव होते. या सोसायटीकडे धान्य दुकान होते. त्याला ७ गावे जोडलेली होती. या सोसायटीने इ. स. १९५३ पर्यंत बँक कर्ज न घेता स्वत:च्या भांडवलावर कामकाज चालविले. भातंबरे विविध कार्यकारी सहकारी सोसायटीची स्थापना १९२० मध्ये झाली. याकामी श्री. गोविंदराव मारूतीराव ऊर्फ बाबासाहेब पाटील यांनी पुढाकार घेतला होता. तसेच श्री. भाऊसाहेब साने यांची देखील यामध्ये महत्त्वाची भूमिका होती. या सोसायटीमध्ये बाबासाहेब पाटील यांचीच सर्वात मोठी ठेव होती. तिच्याच आधारे सुरूवातीला या सोसायटीचे कामकाज चालले होते. पुढील काळामध्ये या सोसायटीने धान्य व कपडे वाटपाचेही कार्य केले.

तक्ता क्र. ३०

तालुक्यातील प्राथमिक सहकारी शेती संस्थांचा आर्थिक व्यवहार

इ. स	कर्जवाटप	येणे बाकी	थकबाकी
१९६३-६४	३३,४८,०००	३९,३०,०००	११,९१,०००
१९६७-६८	३८,६८,०००	४७,०९,०००	१५,२७,०००
१९७३-७४	६९,२७,४८२	१,१३,७८,१६४	४२,६०,५९६
१९८१-८२	१५,५६,०००	१,३२,४९,०००	८९,६८,०००
१९८५-८६	१,०६,०६,०००	२,२३,४६,०००	८५,७४,०००
१९९०-९१	३,६६,५३,०००	६,५५,२७,०००	२,३७,०४,०००

(संदर्भ : सामाजिक-आर्थिक विवेचन, सोलापूर जिल्हा, संबंधित वर्षाचे अहवाल)

वरील टेबलवरून असे दिसून येते की बार्शी तालुक्यातील प्राथमिक सहकारी शेती संस्थांचे कर्जवाटप वर्षानुवर्षे सातत्याने वाढले आहे. विशेषत: इ. स. १९८५-८६ ते इ. स. १९९०-९१ या पाच वर्षाच्या काळामध्ये ते जवळजवळ तीनपटीने वाढले होते. असे असले तरी येणे बाकी व थकबाकी यांचीही वाढ तीनपटीतच झाली होती.

इ. स. १९२१ मध्ये " राळेरास विविध कार्यकारी सोसायटी " ची स्थापना करण्यात आली. सदर सोसायटी दरवर्षी वाटसरूंना पाणी मिळावे म्हणून बार्शी-सोलापूर मार्गावर पाणपोई सुरू करते. पूर्वी या सोसायटीने शेतकऱ्यांना अल्प दराने भाडयाने देण्यासाठी शेतीची विविध अवजारे ठेवली होती. साखर वाटपाचेही काम उत्तमरित्या केले होते. इ. स. १९२५ मध्ये स्थापन झालेल्या " महागाव विविध कार्यकारी सोसायटी " ने स्वत:च्या धर्मादाय निधीतून गावामध्ये एक व्यायामशाळा बांधली. गावातील युवक सशक्त व निरोगी रहावा या हेतूने हे काम केले होते. इ. स. १९३१ मध्ये स्थापन झालेल्या " बावी विविध कार्यकारी सोसायटी " ने स्वत:च्या निधीतून गावातील शाळेच्या बांधकामास मदत करत आपली सामाजिक बांधीलकी जपली. इ. स. १९३४ मध्ये स्थापन झालेल्या " पांढरी विविध कार्यकारी सोसायटी " ने स्वत:च्या निधीतून गावातील शाळेला मदत म्हणून २००/- रू. देणगी दिली.[५२]

शेतकऱ्यांच्या सोयीसाठी व सोसायटीच्या प्रगतीसाठी बार्शी तालुक्यातील काही सोसायट्यांनी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या बार्शी व वैराग येथील बाजार आवारात नियमित शेतमालाची कमिशनवर विक्री करण्याचे काम सातत्याने केले.[५३] साधारणत: इ. स. १९६२-६३ मध्ये बाजार समितीमध्ये व्यवहार करणाऱ्या सोसायट्यांची संख्या वाढली. यावर्षामध्ये कृषी उत्पन्न बाजार समितीच्या बार्शी येथील बाजार आवारामध्ये तालुक्यातील गाडेगाव सोसायटीने ६०,३४३ रू. खामगाव सोसायटीने ४४,७१० रू. चारे सोसायटीने १,०७,८७० रू. तर वैराग बाजार आवारामध्ये काळेगाव सोसायटीने १७,४३३ रू. रातंजन

सोसायटीने ४२,३६५ रू. शेळगाव-आर सोसायटीने ९९,४२२ रूपयांचा व्यवहार केला. यामुळे संबंधित सोसायट्यांच्या कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांना याचा खूप फायदा झाला.[५४]

इ. स. १९६३-६४ मध्ये बाजार समितीमध्ये व्यवहार करणाऱ्या सोसायट्यांची संख्या वाढली. या वर्षी गाडेगाव सोसायटीने ५,४७,५१८ रू. खामगाव सोसायटीने १,९१,३३४ रू. चारे सोसायटीने ३,१४,३६१ रू. तर वैराग बाजार आवारामध्ये काळेगाव सोसायटीने ९२,६९० रू. रातंजन सोसायटीने ४९,०२० रू. शेळगाव (आर) सोसायटीने १,१८,०७६ रूपयांचा व्यवहार केला. तालुक्यातील या विविध कार्यकारी सहकारी सोसायट्यांनी शेती हंगामामध्ये आपल्या कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांचा माल स्थानिक स्तरावरच विकत घेऊन त्या मालाची विक्री सोसायटीमार्फत बाजार समितीमध्ये करून शेतकऱ्यांची सोय केली. शेतकऱ्यांचा मालवाहतुकीचा खर्चही कमी केला.[५५]

तालुक्यातील प्रमुख १० विविध कार्यकारी सहकारी सोसायट्यांनी कृषी ऊत्पन्न बाजार समिती बार्शीच्या बाजार भाव प्रसिध्दीचे काम केले. यामध्ये आगळगांव, पांगरी, कसबे तडवळे, पानगाव, भातंबरे, गौडगाव, कारी, मालवंडी, मौजे तडवळे व येडशी या सोसायट्यांचा समावेश होता. या गावातील सहकारी सोसायटीकडे भावप्रसिद्धीची जबाबदारी सोपविण्यात आली. यासाठी त्यांना मजबुत लाकडी फलक विनामूल्य देण्यात आले होते. बार्शी पेठेतील दैनिक भाव रोज त्याच्यांकडे पोस्टाने पाठविण्यात येतात व ते रोज संबंधित खेडेगावात प्रसिद्ध केले जातात.

हा कार्यक्रम १५ ऑगस्ट १९५९ पासून सुरू करण्यात आला. यामुळे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना आपल्या जवळच्या गावामध्येच शेतमालाचे भाव समजू लागले. त्यामुळे त्यांचा बार्शीला जाण्याचा खर्च व वेळही वाचला. थोडक्यात या सोसायट्यांनी शक्य तितकी शेतकऱ्यांची उत्तम सोय करण्याचा प्रयत्न केला. [५६]

स्वातंत्र्योत्तर काळामध्ये बार्शी तालुक्यातील या विविध कार्यकारी सोसायट्यांनी तालुक्याच्या शेती विकासामध्ये अत्यंत मोलाचे योगदान दिले आहे. या सोसायट्यांनी शेतकऱ्यांना प्रत्येक हंगामामध्ये शेतीच्या विविध कारणासाठी कमी व्याजदराने मोठ्या प्रमाणावर वित्तपुरवठा केला आहे. त्याचबरोबर ग्रामीण भागातील लोकांना सवलतीच्या दराने धान्य वाटपाचे काम या सोसायट्यांनी पार पाडले. अशा प्रकारे विविध दृष्टीकोनातून तालुक्याच्या आर्थिक विकासामध्ये या प्राथमिक सहकारी शेती संस्थांनी मौलिक भूमिका पार पाडली.

४.४. बँका

पैशासंबंधी व्यवहार करणारी बँक ही संस्था प्राचीन काळापासून विविध देशात अस्तित्वात होती. आजच्या बँकांचे व्यवहार व पूर्वीच्या या संस्थेचे व्यवहार यांच्यात आकार-प्रकाराच्या दृष्टीने फरक होता. भारतातदेखील वैदिक काळापासून अशा स्वरूपाचे व्यवहार होत असल्याचे दिसून येते. स्थानिक पेढ्यातून एका राज्याची नाणी दुसऱ्या राज्यातील नाण्याबद्दल विशिष्ट दराने बदलून मिळत असत. या संस्थाही व्याज घेऊन कर्ज देत असत. इ. स. ११७१ मध्ये इटलीतील व्हेनिस राज्यातील अधिकाऱ्यांनी युध्दाचा खर्च भागविण्यासाठी नागरिकांकडून कर्ज घेतले. अशा कर्जाला इटलीच्या भाषेत मॉन्ट (संयुक्त निधी) म्हणत. त्या काळात इटलीच्या बऱ्याच भागावर जर्मनीची अधिसत्ता असल्यामुळे त्या शब्दाला जर्मन समानार्थी शब्द ' बँक ' हा प्रचारात आला. त्याचे इटालियन रूपांतर ' बँको ' असे झाले. फ्रान्स व इंग्लंडमध्ये हेच शब्द त्या त्या भाषेत थोड्याफार फरकाने वापरले जाऊ लागले. इ. स. १६४६ पासून इंग्लिश लेखकांनी बँक या शब्दाचा आपल्या लेखातून उपयोग केलेला आढळतो. त्यानंतर प्रत्यक्ष बँक या शब्दाचा आपल्या नावातही अंतर्भाव केलेल्या अनेक बँका अस्तित्वात आल्या. उदा-बँक ऑफ मिलान. इंग्लंडमध्ये क्रॉमवेलच्या कारकीर्दीत ही बँक स्थापन करण्याची कल्पना पुढे आली होती. पण इ. स. १६९४ पर्यंत ती प्रत्यक्षात आली नाही. इ. स. १६९४ मध्ये बँक ऑफ इंग्लंडची स्थापना झाली. त्यावेळी ती खाजगी बँक होती व ती सरकारलाही कर्ज देत होती. इ. स. १९४७ मध्ये तिचे राष्ट्रीयीकरण झाले.[५७]

आधुनिक बँक व्यवसायाची सुरूवात सोनारापासून झाली. पूर्वी व्यक्तीने सोनाराकडे पैसे दिल्यास सोनार पैसे पोहोचल्याची पावती देत. नंतर पैसे मागताना ती पावती सादर केल्याशिवाय पैसे मिळत नसत. कालांतराने सोनाराच्या असे लक्षात आले की सर्वच ठेवीदार एकाच वेळी पैसे मागत नाहीत. त्यामुळे सोनारांनी ठेवीदारांच्या पैशाचा वापर भांडवल म्हणून कर्जे देण्यासाठी सुरू केला. यापैकी काही नामवंत सोनारांनी आपल्या नावाच्या कागदी नोटा काढण्यास सुरूवात केली. अशा नोटांना प्रतिष्ठा असल्याने त्या नोटा दुकानदार व व्यापारी स्वीकारू लागले. अशा व्यवहाराची आजच्या चेकशी तुलना करता येईल. जास्त कागदी नोटा काढण्यासाठी सोनारांनी ठेवीवर आकर्षक व्याज देऊन पैसा जमा करण्यास सुरूवात केली. थोडक्यात आधुनिक बँक व्यवसायाचा पाया सोनारांनीच घातला आहे.[५८] ख्रिस्त शकापूर्वी बॅबिलोन संस्कृतीमध्ये लोक आपल्याजवळील मौल्यवान वस्तू सुरक्षिततेसाठी देवळातील पुजाऱ्याकडे देत. कारण मंदिरे लोकांची श्रध्दास्थाने होती. देवळात चाललेला हा व्यवहार बघून खाजगी व्यक्तींनी पैशाच्या देवाणघेवाणीचे व्यवहार सुरू केले. याला दुसरे एक कारण म्हणजे देवळातील पुजारी लोकांकडून पैसे, मौल्यवान वस्तू ठेऊन घेत, मात्र यासाठी संबंधितांना व्याज वगैरे देत नसत. परंतू हाच पैसा ते गरजू लोकांना व्याजाने देत. याउलट खाजगी व्यक्तींनी त्यांच्याकडे ठेवलेल्या पैशावर संबंधित लोकांना थोड्या प्रमाणत व्याज देण्यास सुरूवात केली. त्यामुळे मंदिरातील व्यवहार कमी होऊन खाजगी लोकांचे व्यवहार वाढले. हे

खाजगी लोक म्हणजे सोनार व सावकार होय. म्हणूनच क्राऊथर हा अर्थतज्ज्ञ म्हणतो की, पुजारी, व्यापारी, सावकार व सोनार हे आधुनिक बँकेचे पूर्वज आहेत.

४.४.१ भारतातील आधुनिक बँकिंगची सुरूवात

भारतातील बँकिंग व्यवसायाची सुरूवात फार प्राचीन आहे. कौटिल्याच्या अर्थशास्त्रामध्ये, त्याकाळी व्यापारी सावकारांच्या संस्था अस्तित्वात असल्याचा उल्लेख आढळतो. भारतात जे ब्रिटिश नागरिक येऊन स्थायिक झाले होते त्यांनी प्रथम भारतात आधुनिक पध्दतीच्या बँका स्थापन केल्या. ईस्ट इंडिया कंपनीच्या लोकांनी मुंबई, कलकत्ता येथे ' एजन्सी हाऊसेस ' स्थापन करून व्यापाराबरोबर आधुनिक बँक व्यवसाय सुरू केला. त्याचवेळी युरोपातील लोकांनी भारतात संयुक्त भांडवली बँका स्थापन केल्या. त्यानंतर भारतात पहिली व्यापारी बँक इ. स. १७७० मध्ये स्थापन झाली. या बँकेचे नाव ' बँक ऑफ हिंदुस्थान ' होते. परंतू इ. स. १८३२ मध्ये ही बँक बुडाली. पुढे इ. स. १७८५ च्या सुमारास बँक ऑफ बेंगॉल, बँक ऑफ बॉम्बे व बँक ऑफ मद्रास या तीन इलाखा बँकांची स्थापना झाली. या तिन्ही बँका सरकारच्या मदतीने सुरू झाल्या होत्या. त्यानंतर भारतात इ. स. १८६५ मध्ये अलाहाबाद बँकेची स्थापना झाली. इ. स. १९०० पर्यंत भारतातील बँकांची संख्या वाढत जाऊन ती ०९ झाली.[५९] इ. स. १९०५ मध्ये हिंदुस्थानमध्ये स्वदेशीची चळवळ सुरू झाल्यामुळे आपल्या स्वतःच्या बँका असाव्यात या जिद्दीने भारतीयांनीही बँक स्थापनेत पुढाकार घेण्यास सुरूवात केली. इ. स. १९०६-१३ या काळात हिंदुस्थानमध्ये बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ बडोदा, सेंट्रल बँक ऑफ इंडिया या प्रमुख बँकांसह अनेक बँका स्थापन झाल्या. इ. स. १९२१ मध्ये तीन इलाखा बँकांचे एकत्रिकरण करून ' इंपीरियल बँक ऑफ इंडिया ' अस्तित्वात आली. तिचेचे पुढे " स्टेट बँक ऑफ इंडियात " रूपांतर झाले. पुढे इ. स. १९३५ मध्ये देशाची सर्वोच्च मध्यवर्ती बँक म्हणून " रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया " ची स्थापना झाली. [६०]

४.४.२. तालुक्यातील राष्ट्रीयीकृत बँका

भारतासारख्या विकसनशील देशामध्ये आर्थिक व सामाजिक परिवर्तनाचे एक प्रभावी साधन या दृष्टीने व्यापारी बँकांचे महत्व अनन्यसाधारण असे होते. मात्र या संदर्भात त्या फारच उदासीन राहिल्या. त्यामुळे या व्यापारी बँकांच्या कार्यातील दोष दूर करण्यासाठी, आर्थिक विकासाचा प्रादेशिक असमतोल कमी करण्यासाठी, बँकांच्या कर्जाचा गैरवापर टाळून या बैंकांचा नफा समाजहितासाठी वापरण्यासाठी भारत सरकारने बंगलोरच्या अधिवेशनात बैंकांच्या राष्ट्रीयीकरणाचा निर्णय घेतला. त्यावेळी भारताच्या पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी होत्या." एखाद्या बँकेची मालकी व व्यवस्थापन सरकार स्वतः कडे घेण्याच्या प्रक्रियेस राष्ट्रीयीकरण असे म्हणतात." १९ जुलै १९६९ रोजी भारत सरकारने ज्या व्यापारी बँकांच्या ठेवी ५० कोटी

रूपये किंवा त्यापेक्षा जास्त होत्या अशा १४ व्यापारी बँकांचे एका वटहुकुमाव्दारे राष्ट्रीयीकरण केले. या बँकांची नावे पुढीलप्रमाणे. १) सेंट्रल बँक ऑफ इंडिया. २) पंजाब नॅशनल बँक. ३) युको बँक. ४) देना बँक. ५) युनायटेड बँक ऑफ इंडिया. ६) सिंडिकेट बँक. ७) बँक ऑफ महाराष्ट्र. ८) बँक ऑफ इंडिया. ९) बँक ऑफ बडोदा. १०) अलाहाबाद बँक. ११) इंडियन बँक. १२) कॅनरा बँक. १३) युनियन बँक ऑफ इंडिया. १४) इंडियन ओव्हरसीज बँक.[६१] इ. स. १९८९-९० पर्यत बार्शी तालुक्यामध्ये १) बँक ऑफ इंडिया. २) सेंट्रल बँक ऑफ इंडिया. ३) स्टेट बँक ऑफ इंडिया. ४) बँक ऑफ महाराष्ट्र. ५) युनियन बँक ऑफ इंडिया. ६) युनायटेड वेस्टर्न बँक. या राष्ट्रीयीकृत बँकांच्या शाखा स्थापन झाल्या होत्या.[६२] यापैकी युनायटेड वेस्टर्न बँक ही इ. स. २००५ मध्ये इंड्रस्ट्रीयल डेव्हलपमेंट बँक ऑफ इंडिया या बँकेत विलीन झाली.

४.४.२.१. बँक ऑफ इंडिया

बार्शी तालुक्याच्या आर्थिक विकासात बँक ऑफ इंडियाचे महत्वाचे योगदान राहीले आहे. या बँकेची स्थापना ७ सप्टेंबर १९०६ रोजी झाली. या बँकेचे प्रधान कार्यालय मुंबई येथे आहे. या बँकेचे पहिले अध्यक्ष सर डेव्हिड ससून हे होते. तर पहिले शाखा व्यवस्थापक एच्. स्ट्रींगफेलो हे होते. या बँकेने मुंबईबाहेर आपली पहिली शाखा इ. स. १९२० मध्ये अहमदाबाद येथे काढली. राष्ट्रीयीकरणाच्यावेळी या बँकेच्या ३२५ शाखा होत्या. आज जगाच्या पाच खंडात या बँकेच्या शाखांचा विस्तार झालेला आहे. देशातील पहिली संगणीकृत शाखा व ए. टी. एम. याच बँकेने सुरू केले. चित्रपट उद्योगाला अर्थसहाय्य देणारी तसेच इंग्लंड व जपान या देशात शाखा उघडणारी ही पहिली भारतीय बँक आहे. या बँकेचे सोलापूर विभागामध्ये ७ जिल्हे येतात. या ७ जिल्ह्यामध्ये या बँकेच्या एकूण ७२ शाखा आहेत. यापैकी ५८ शाखा ग्रामीण भागामध्ये आहेत. बार्शी तालुक्यामध्ये बँक ऑफ इंडियाच्या ४ शाखा आहेत. त्यांच्या शाखा असणाऱ्या गावांची नावे व स्थापना दिनांक यांची माहिती पुढीलप्रमाणे.

१	बँक ऑफ इंडिया, बार्शी शहर	१३ डिसेंबर १९७२
२	बँक ऑफ इंडिया, पांगरी	१ डिसेंबर १९८०
३	बँक ऑफ इंडिया, चारे	९ डिसेंबर १९८१
४	बँक ऑफ इंडिया, शेळगाव	२८ डिसेंबर १९८१ [६३]

बँक ऑफ इंडिया ही बार्शी तालुक्यामध्ये बँकिंग क्षेत्रामध्ये प्रथम क्रमांकावर असलेली बँक आहे. या बँकेमार्फत " दि स्टार वाहन योजना" या अंतर्गत दुचाकी, चारचाकी वाहनासाठी ७५ लाख रूपयांपर्यंत कर्ज दिले जाते. " दि स्टार एज्युकेशन लोन " अंतर्गत विद्यार्थ्यांना शैक्षणिक कर्ज दिले जाते. यामध्ये मुलीसाठी व्याजदरामध्ये १ टक्क्यापर्यंत विशेष सवलत दिली जाते. याशिवाय या बँकेमार्फत खातेदारासाठी

" बँक ऑफ इंडिया नॅशनल स्वास्थ्य विमा योजना " राबविली जाते. व्यापारी, छोटे-मोठे व्यावसायिक, स्वयंरोजगार करणारे, मालवाहतूक करणारे यासाठी भांडवल, जागा, यंत्रसामग्री, कच्चा माल, वाहन घेण्यासाठी ही बँक सुलभ दराने कर्ज उपलब्ध करते.

या बँकेमार्फत खास शेतकऱ्यांसाठी विविध कृषीकर्ज योजना राबविल्या जातात. यामध्ये जमीन सपाटीकरण व विकास, पीक कर्ज, जलसिंचन, शेतीचे यांत्रिकीकरण, कृषीपुरक व्यवसाय, फलोद्यान, कृषीमाल प्रक्रिया उद्योग, गोबर गॅस कर्ज, शेतघर बांधणी अशा विविध बाबींचा समावेश होतो. याशिवाय उच्च तंत्र कृषी कर्ज योजना या अंतर्गत पुष्पशेती, निर्यातक्षम फळे, भाजीपाला, प्रगत बीज उत्पादन, औषधी वनस्पतीची लागवड व प्रक्रिया प्रकल्पासाठी कर्ज वितरण केले जाते. " स्टार किसान वाहन योजना " अंतर्गत खास शेतकऱ्यांना वाहन घेण्यासाठी १५ लाख रूपयापर्यंत कर्ज दिले जाते. शेळी व मेंढी पालन, विविध शेती अवजारे खरेदी व शेतकऱ्यांच्या जीवनात येणाऱ्या आकस्मात कौटुंबिक गरजा पूर्ण करण्यासाठी " किसान समाधान कार्ड " ही बँक ऑफ इंडियाची अभिनव योजना आहे. बार्शी तालुक्यातील लोकांनी या विविध योजनांचा भरपूर लाभ घेतलेला आहे. विशेषत: शेतीविषयी असलेल्या विविध योजनांचा लाभ घेऊन बार्शी तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांनी आपली शेती व शेतीच्या माध्यमातून आपली आर्थिक परिस्थिती सुधारली आहे. पूर्वी शेतकऱ्याचे कुटुंब म्हणजे अडाणी कुटुंब अशी संकल्पना होती. मात्र सध्या शेतकऱ्यांची मुले उच्च शिक्षण घेऊ लागली आहेत. बैलगाडीसह आज अनेक शेतकऱ्यांच्या घरासमोर दुचाकी, चारचाकी वाहने उभी आहेत. यात बँक ऑफ इंडियाचा वाटा निश्चितच आहे. [६४]

बार्शी तालुक्यामध्ये बँक ऑफ इंडियाच्या असलेल्या शाखांनी आपल्या परिसरातील गावांमध्ये बँकेच्या विविध योजनांच्या माध्यमातून १२५ कोटीपेक्षा जास्त कर्जवाटप केले आहे. या कर्जवाटपामध्ये या बँकांनी शेती व शेतीपूरक उद्योगधंद्यांना प्राधान्यक्रम दिला आहे. शेतीसाठी वितरित केलेल्या कर्जामध्ये लहान व मध्यम शेतकऱ्याकडे कर्ज थकबाकीचे प्रमाण कमी आहे. तर मोठ्या शेतकऱ्याकडे कर्ज थकबाकीचे प्रमाण जास्त आहे. या सर्व शाखांनी आपल्या परिसरातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करून त्यांना वेळोवेळी पुढील शिक्षणासाठी कर्ज उपलब्ध करून दिले आहे. शासनाच्या विविध योजनांच्या माध्यमातून तालुक्यातील या बँकेच्या चारही शाखांनी समाजातील मध्यम व दुर्बल घटक, स्त्रिया, विद्यार्थी, शेतकरी, उद्योजक, छोटे व्यावसायिक यांना आर्थिक आधार दिलेला आहे. विविध सामाजिक कार्यात या शाखा सहभागी असतात. किल्लारी भूकंप, पूरपरिस्थिती, गणेश उत्सव, गावोगावच्या यात्रा-उत्सव अशा प्रसंगी देणग्या देऊन आपली सामाजिक बांधिलकी जोपासण्याचा सतत प्रयत्न केला आहे. प्रत्येक वर्षी गरजू विद्यार्थ्यांना या शाखांतील कर्मचारी वहया, गणवेश व इतर शालेय साहित्याचे मोफत वाटप करतात. बार्शी शाखेमार्फत रक्तदान शिबीर आयोजीत केले जाते.[६५]

४.४.२.२. स्टेट बँक ऑफ इंडिया

भारताच्या नाणेबाजारात ' स्टेट बँक ऑफ इंडिया ' ला महत्वाचे स्थान आहे. या बँकेला पूर्वी " इंपीरियल बँक ऑफ इंडिया " या नावाने ओळखले जात होते. इ. स. १९२१ मध्ये मुंबई, मद्रास व बंगाल या तीन प्रेसिडेन्सी बँकेच्या एकत्रिकरणातून ही बँक अस्तित्वात आली होती. इ. स. १९२१ ते १९३५ या काळात या बँकेने खूप प्रभावीपणे कार्य केले. रिझर्व्ह बँकेच्या स्थापनेनंतर या बँकेचे महत्व कमी झाले. पुढे इ. स. १९५४ सालच्या अखिल भारतीय पत पाहणी समितीच्या शिफारसीनुसार इंपीरियल बँकेचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. तेव्हापासून या बँकेची सर्व मालमत्ता सरकारी झाली. अशा रीतीने "स्टेट बँक ऑफ इंडिया-१९५५" या कायद्यान्वये १ जुलै १९५५ रोजी इंपीरियल बँकेच्या राष्ट्रीयीकरणाची घोषणा करून तिचे "स्टेट बँकऑफ इंडिया" असे नामांतर करण्यात आले.[६६]

बार्शी तालुक्यात " स्टेट बँकऑफ इंडिया " या बँकेच्या दोन शाखा आहेत.यापैकी पहिली शाखा २९ डिसेंबर १९५८ रोजी बार्शी शहरामध्ये स्थापन झाली. या शाखेचे कार्यक्षेत्र संपूर्ण बार्शी तालुका आहे. या शाखेने तालुक्यातील काटेगाव, चुंब, कोरेगाव, धामणगाव, खडकोणी, खांडवी, कांदलगाव ही गावे दत्तक घेतलेली आहेत. या गावामध्ये या शाखेने मोठ्या प्रमाणावर कर्जवाटप केले आहे. या शाखेने कर्जवाटपामध्ये पीककर्ज, वाहन कर्ज, शैक्षणिक कर्ज, पर्सनल कर्ज, खास शेतकऱ्यांसाठी सुवर्ण तारण कर्ज योजना, मुदत कर्ज, विविध तारण कर्ज, व्यापारी कर्ज अशा विविध बाबींचा समावेश होता. सुवर्ण तारण कर्जामध्ये ही शाखा सोलापूर जिल्ह्यामध्ये प्रथम क्रमांकावर आहे, तर अपेक्षित वार्षिक उद्दिष्ट साध्य करण्यामध्ये ती द्वितीय क्रमांकावर आहे. या शाखेने गरजूंना त्वरीत कर्जमंजूरी दिल्यामुळे अनेकांची सावकारापासून मुक्तता होण्यास मदत झाली आहे. शासनाच्या विविध योजने अंतर्गत या शाखेने दारिद्रय रेषेखालील लोकांना प्राधान्याने कर्ज दिले आहे. ही शाखा विद्यार्थ्यांना त्वरीत कर्ज उपलब्ध करून देते. शिवाय शाळांना १० पंखे व जलशुध्दीकरण उपकरणे यांचे वाटप केले जाते. [६७]

या शाखेने तालुक्यातील अनेक कापड व्यावसायिक, ड्रिप दुकानदार अशा अनेक छोट्या व्यावसायिकांना प्रधान्याने कर्जपुरवठा केला आहे. त्यामुळे या छोट्या व्यावसायिकांची आर्थिक भरभराट होण्यास मदत झाली. स्त्रियांच्या आर्थिक स्वावलंबनाच्या दृष्टीने या शाखेने काही बचत गट स्थापन केले आहेत. शासनाच्या विविध योजनांच्या माध्यमातून या शाखेने सातत्याने आर्थिकदृष्टया दुर्बल व मध्यम घटकाला वित्तपुरवठा केलेला आहे. उदा. आण्णाभाऊ साठे सुवर्ण योजना. याचबरोबर तालुक्यातील शेतकऱ्यांना या शाखेने फार मोठ्या प्रमाणामध्ये कर्जवाटप केले आहे. यामध्ये जलसिंचन, ट्रॅक्टर खरेदी, पाईपलाईन, विहीर बांधकाम, विद्युतपंप खरेदी, घरबांधणी, पीककर्ज, मुदत कर्ज अशा विविध उद्देशाने हे

कर्जवाटप करण्यात आले आहे. तसेच या कर्जाची वसुलीही वेळोवेळी करण्यात या शाखेने चांगले यश मिळविले आहे. कर्जवाटप करताना संबंधित व्यक्तीची गरज पाहिली जाते, शिवाय घेतलेल्या कर्जाचा त्याच उद्देशाने वापर झाला की नाही याची बँकेमार्फत चौकशी केली जाते. त्यामुळेच बार्शी तालुक्यातील इतर बँकांच्या तुलनेत या शाखेची थकबाकी फारच कमी आहे. [६८]

२९ डिसेंबर १९८० रोजी या बँकेची दुसरी शाखा बार्शी शहरामध्येच सुभाषनगर परिसरामध्ये स्थापन झाली. या शाखेचे कार्यक्षेत्र संपूर्ण बार्शी शहरापुरतेच मर्यादित आहे या शाखेने कर्जवाटपामध्ये या शाखेने औद्योगिकीकरणाला प्राधान्य दिले. या शाखेने तालुक्यातील सिमेंट व प्लॅस्टिक पाईप उद्योग, ॲल्युमिनीयम भांडी निर्मिती उद्योग, शेतीची औषधे व खत निर्मिती उद्योग, रबरी पादत्राणे निर्मिती उद्योग अशा विविध उद्योगांना फार मोठ्या प्रमाणामध्ये कर्जपुरवठा केला. बार्शीच्या आधुनिक औद्योगिक विकासामध्ये या शाखेचा मोठा वाटा आहे. या शाखेच्या आर्थिक सहकार्यामुळेच बार्शीच्या औद्योगिक वसाहतीमध्ये अनेक उद्योग स्थिरावले व भरभराटीस आले. यामुळे तालुक्यात मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होऊन अनेकांना काम मिळाले. [६९]

या बँकेने आपली सामाजिक बांधिलकी जोपासताना समाजातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकाच्या विकासासाठी आपल्या विविध योजनांच्या माध्यमातून सतत प्रयत्न केले. या बँकेने शिक्षण, आरोग्य, बालविकास, आर्थिकदृष्टया दुर्बल घटक, पर्यावरण संरक्षण, प्रदूषण विरहित उर्जानिर्मिती, राष्ट्रीय आपत्ती अशा विविध घटकांसाठी मोठ्या स्वरूपामध्ये मदत करण्याचा संकल्प आखला होता. हा संकल्प त्यांनी आपल्या विविध शाखांच्या माध्यमातून पूर्ण केला.[७०] बार्शी तालुक्यातील या दोन्ही शाखांनी यापैकी बऱ्याचशा योजना आपल्या कार्यक्षेत्रामध्ये राबविल्या.

या बँकेच्या भरीव सामाजिक कार्यामुळेच तिला " सुवर्ण मयुर कार्पोरेट सामाजिक दायित्व " हा प्रतिष्ठेचा पुरस्कार मिळाला. गरजू शाळांना वाहने भेट दिली. शारीरिक व मानसिकदृष्टया अशक्त व आर्थिकदृष्टया कमकुवत वर्गातील मुले ज्या शाळेमध्ये शिक्षण घेतात अशा शाळांना मदत करण्यामध्ये या बँकेने प्राधान्य दिले. भारतात विविध ठिकाणी आलेल्या आपत्तीमुळे झालेले नुकसान भरून काढण्यासाठी या बँकेने कोटयावधी रूपये राष्टीय मदत निधीस दिले आहेत. प्रौढ शिक्षण, रक्तदान शिबीर, रोगनिदान शिबीर अशा विविध कार्यक्रमांचे सातत्याने आयोजन केले जाते. विविध योजने अंतर्गत ही बँक आपल्या कर्मचाऱ्यांना उत्तम आरोग्य सेवा पुरविते. " एस.बी.आई युथ फॉर इंडिया " या कार्यक्रमांतर्गत या बँकेने तरूणांना फेलोशिपसह प्रशिक्षण देऊन ग्रामीण भागातील समस्या सोडविण्यासाठी खास नवीन कार्यक्रम आखण्यासाठी ग्रामीण भागाचे सर्वेक्षण करण्याच्या हेतूने त्यांची नियुक्ती केली आहे.[७१] यापैकी काही

कार्यक्रमामध्ये म्हणजेच विविध हेतूने आर्थिक मदत, पर्यावरण संर्वधन, शिक्षण या संदर्भात बार्शीतील दोन्ही शाखांचा सक्रिय सहभाग असतो.

४.४.२.३. सेंट्रल बँक ऑफ इंडिया

" सेंट्रल बँक ऑफ इंडिया " या बँकेची स्थापना २० डिसेंबर १९११ मध्ये झाली. इंग्रजांच्या काळात भारतीयांनी भारतीयांसाठी स्थापन केलेली बँक हे या बँकेचे महत्वाचे वैशिष्टय आहे. या बँकेचे पहिले चेअरमन श्री. फिरोजशहा मेहता हे होते. त्यानंतर जवळजवळ २७ वर्षांनी म्हणजेच ५ ऑगस्ट १९३८ मध्ये या बँकेची एक शाखा बार्शी तालुक्यात सुरू झाली. बार्शी तालुक्यामध्ये स्थापन झालेली ही राष्टीयीकृत बँकेची पहिली शाखा होय. बार्शी शहर व तालुका हे या बँकेचे कार्यक्षेत्र आहे. शहरी भागात उत्तम कार्य करून या शाखेने पुणे विभागामध्ये प्रथम क्रमांक पटकाविला. या शाखेने वित्तपुरवठ्यामध्ये स्त्रियांना विशेष प्राधान्य दिले. याद्वारे आपल्या कार्यक्षेत्रातील स्त्रियांना समाजाच्या मुख्य प्रवाहामध्ये आणण्याचा यशस्वी प्रयत्न केला. महिलांचे ६० बचतगट या शाखेमार्फत चालविले जातात. ज्येष्ठ नागरिकांना ठेवीवर अर्धा टक्के अधिक व्याज दिले जाते. या शाखेने कर्जवाटपामध्ये केवळ पतच नव्हे तर खातेदारांची गरज पाहून कर्जपुरवठा केला. तालुक्यातील अनेक छोटे व्यावसायिक, उद्योजक, शेतकरी, व्यापारी, वाहतूक व्यावसायिक यांना वित्तपुरवठा करून त्यांची उन्नती साधण्यामध्ये या शाखेने मोलाचा हातभार लावला आहे. इ. स. १९७८ मध्ये बार्शी तालुक्यातील वैराग येथे या बँकेची दुसरी शाखा स्थापन झाली. या शाखेने वैराग भागामध्ये शेतीसाठी प्राधान्याने वित्तपुरवठा केला. थोडक्यात या शाखेने बार्शी शाखेचेच अनुकरण करत आपल्या ग्राहकांना उत्तम सेवा देत, त्याच्या उन्नतीबरोबरच आपला बँकिंगचा व्यवसाय वाढविला. [७२]

या शाखेने तालुक्यातील शेतकरी व उद्योजक यांना मोठ्या प्रमाणामध्ये वित्तपुरवठा केला. उद्योगधंदयामध्ये या शाखेने प्लॅस्टिक उद्योगाला अधिक प्राधान्य दिले. त्याचबरोबर शेतकऱ्यांना जमीन सुधारणा, शेतीची आधुनिक अवजारांची खरेदी, विद्युत पंप व जलसिंचनाच्या विविध बाबींची पूर्तता करण्यासाठी या शाखेने मुबलक कर्जपुरवठा केला. समाजातील दुर्बल व मध्यम घटकास शासनाच्या विविध योजनांच्या माध्यमातून वित्तपुरवठा केला. जिल्हा उद्योग केंद्राच्या विविध योजनास या शाखेने उत्तम प्रतिसाद दिला. अपंगासाठी विविध योजना राबविल्या. याचा तालुक्यातील अपंगांनी मोठ्या प्रमाणामध्ये लाभ घेतला. [७३] या बँकेची स्थापना श्री. सोराबजी पोचखानवाला यांनी केली होती. त्याच्या जयंतीनिमित्त बार्शी शाखेने आपल्या खातेदार शेतकऱ्यांसाठी भव्य किसान मेळावा आयोजित केला होता. बँकेच्या विविध योजनांपैकी या शाखेमार्फत सेंट गृहकर्ज, सेंट वाहनकर्ज, सेंट व्यापारी कर्ज, सेंट वेअरहाउस रिसीट

तारण, सेंट लखपती ठेव योजना, सेंट शिक्षणासाठी कर्ज, सेंट मॉरर्गेज कर्ज, सेंट पीक कर्ज या योजना अत्यंत प्रभावीपणे राबविल्या जातात.[७४]

या विविध योजनांचा या शाखेच्या ग्राहकांनी मोठ्या प्रमाणामध्ये लाभ घेऊन आपली आर्थिक उन्नती साधली आहे.

४.४.२.४. युनियन बँक ऑफ इंडिया

" युनियन बँक ऑफ इंडिया " ची स्थापना इ. स. १९१९ मध्ये झाली. त्यानंतर जवळजवळ ३३ वर्षांनी या बँकेची एक शाखा इ. स. १९५३ मध्ये बार्शी येथे स्थापन झाली. बार्शी तालुक्यामध्ये या बँकेची ही एकमेव शाखा आहे. या शाखेने कर्जवाटपात शेती व व्यापाराला अधिक प्राधान्य दिले आहे. या शाखेच्या व्यापाराला प्रोत्साहन देण्याच्या धोरणामुळे पूर्वीपासूनच व्यापारी केंद्र अशी ख्याती असलेल्या बार्शीच्या व्यापाराला अधिकच प्रोत्साहन मिळाले. व्यापाराबरोबरच या शाखेने शेती, घरबांधणी, शिक्षण यांनाही भरपूर प्रमाणामध्ये कर्जवाटप केले आहे. व्यापाराच्या खालोखाल या शाखेने शेतीला आपल्या विविध योजनांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणामध्ये कर्जपुरवठा केला आहे. या शाखेने केवळ मोठ्या शेतकऱ्यांनाच नव्हे तर लहान व मध्यम शेतकऱ्यांनाही मोठ्या प्रमाणात कर्जवाटप केले आहे. या बँकेच्या बार्शी शाखेच्या प्रभावी व्यवस्थापनामुळे या बँकेची तालुक्यातील थकबाकी कर्जवाटपाच्या तुलनेत फार कमी आहे. [७५]

या शाखेने आपल्या बँकींगच्या व्यवहाराबरोबरच सामाजिक बांधिलकी योग्यप्रकारे जोपासली आहे. या शाखेमार्फत सुलाखे हायस्कूलमधील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार केला जातो. शिवाय गुणवंत परंतू आर्थिकदृष्टया गरीब विद्यार्थ्यांना ही शाखा त्वरीत कर्ज देते. विविध सामाजिक कार्यासाठी या बँकेतील सर्व कर्मचाऱ्यांचे एक दिवसाचे वेतन मुख्य शाखेकडे जमा होते. समाजातील सर्व स्तरातील लोकांना या शाखेने आपल्या विविध योजनांच्या माध्यमातून आधार दिलेला आहे. अशा या कार्यामुळे या बँकेला अनेकवेळा उत्तम ग्राहक सेवेचे पुरस्कार मिळालेले आहेत.[७६]

४.४.२.५. बँक ऑफ महाराष्ट्र

इ. स. १९३५ मध्ये " बँक ऑफ महाराष्ट्र " या बँकेची स्थापना झाली. पुढे बार्शी तालुक्यामध्ये या बँकेची पहिली शाखा ८ नोहेंबर १९५९ रोजी बार्शी येथे स्थापन झाली. या शाखेने आपल्या एकूण कर्जवाटपापैकी सर्वात जास्त कर्ज शेतकऱ्यांमध्ये वितरीत केले. म्हणजेच शेतकरी हा या बँकेचा केंद्रबिंदू होता. यानंतर कर्जवाटपात औद्योगिकीकरण, घरबांधणी, शिक्षण यांना प्राधान्य दिले. या शाखेने

तालुक्यातील छोट्या उद्योगांना व व्यावसायिकांना कर्ज दिले. त्यामुळे तालुक्यातील अनेक छोटे उद्योग व व्यवसाय भरभराटीस येण्यास मदत झाली. [७७]

सदर बँक कृषी कर्जामध्ये शेतीसुधारणा, जमिनीचे सपाटीकरण, शेतीचे यांत्रिकीकरण, खास शेतकऱ्यांसाठी सोनेतारण, किसान तात्काळ योजना, किसान क्रेडिट कार्ड या माध्यमातून सुलभ हप्त्यात कर्ज उपलब्ध करते. याशिवाय व्यापार उद्योगासाठी कर्ज, वाहन कर्ज, शैक्षणिक कर्ज, घर कर्ज, सोलर उर्जेसाठी कर्ज अशा प्रकारच्या अनेक कर्जयोजना या बँकेमार्फत राबविल्या जातात.[७८] या सर्व योजनांचा बार्शी तालुक्यातील लोकांनी लाभ घेतलेला आहे. अनेक गरीब शेतकऱ्यांना त्यांची आर्थिक पत नसतानाही या बँकेच्या बार्शी शाखेने धोका पत्करून कर्ज दिले. यापैकी अनेकांनी शेती व शेतीच्या माध्यमातून स्वत:ची आर्थिक परिस्थिती सुधारून या शाखेचा विश्वास सार्थ ठरविला आहे. याचबरोबर शेतीपूरक व्यवसायांनाही या शाखेने कर्जवाटप केले आहे. या शाखेमार्फत प्रतिवर्षी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार केला जातो. केवळ अशा सत्कारावरच शाखा समाधानी नसून बार्शी तालुक्यातील अशा गुणवंत परंतू आर्थिकदृष्टया कमकुवत असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी या बँकेने मोठ्या प्रमाणामध्ये कर्जवाटप केले आहे. बार्शीमधील अनेक छोटया व्यापाऱ्यांचे व व्यावसायिकांचे व्यवसाय उभे करण्यामध्ये या शाखेचा मोठा वाटा आहे. तसेच भूकंप, महापूर, सामाजिक-धार्मिक उत्सव अशा विविध प्रसंगी या शाखेने वेळोवेळी देणग्या दिल्या आहेत.[७९]

इ. स. १९६१-६२ पासून या बँकेने कृषी उत्पन्न बाजार समिती बार्शी येथील बाजार आवारामध्ये सातत्याने बँकिंगचे कार्य केले आहे. [८०]

४.४.३. तालुक्यातील सहकारी बँका

बार्शी तालुक्याच्या आर्थिक विकासामध्ये राष्ट्रीयीकृत बँकांबरोबरच सहकारी बँकांचा मोलाचा वाटा आहे. तालुक्यामध्ये सहकारी बँकेच्या सर्वाधिक शाखा ग्रामीण भागामध्ये स्थिरावल्या आहेत. या शाखांनी प्रामुख्याने ग्रामीण भागातील तळागळाचा घटक असलेल्या घटकाला आपला केंद्रबिंदू बनविले आहे. शासनाच्या विविध योजनेतून दुर्बल घटकाला वित्तपुरवठा केला आहे. तालुक्यामध्ये सहकारी बँकेमध्ये सर्वाधिक शाखा " सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँके " च्या आहेत. ग्रामीण भागामध्ये खऱ्या अर्थाने सहकार पोहचविण्यामध्ये या बँकेला बऱ्याच प्रमाणात यश आले आहे. " एकमेका सहाय्य करू. अवघे धरू सुपंथ " हे तत्व रूजविण्याचे कार्य या बँका सतत करत आल्या आहेत. शिवाय सोलापूर जिल्ह्याच्या सहकाराची सुरूवात बार्शी तालुक्यापासूनच झाली असल्याने तालुक्यातील सहकाराची वाटचाल उल्लेखनीय आहे. अशा या तालुक्यातील सहकारी बँकांची माहिती पुढीलप्रमाणे.

४.४.३.१. बार्शी अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक

५ फेब्रुवारी १८८९ हा दिवस नागरी सहकारी बँकांच्या इतिहासात खूप महत्वाचा मानला जातो. याच दिवशी बडोद्याला श्री. विठ्ठल लक्ष्मण कवठेकर व त्यांच्या इतर सहका-यांनी एकमेकांना आर्थिक मदत करण्याच्या उद्देशाने " अन्योन्य सहाय्यकारी मंडळी " या संस्थेची स्थापना केली. श्री. कवठेकरांनी ठेवी आणि कर्जविषयक नियम बनविले होते. पहिल्या दिवशी या संस्थेचे सभासद २३, तर ठेवी ७६ रूपये इतक्या होत्या. त्या ठेवी वर्षाखेर ८७३ रूपये इतक्या झाल्या. पहिले कर्जवाटप ९ मार्च १८८९ रोजी वैयक्तिक जामिनावर केले. पुढे १५ ऑगस्ट १८८९ पासून इतर सभासदांच्या जामिनावर कर्जवाटपाची व्यवस्था केली. अशा संस्थांचे पुढे नागरी सहकारी बँकेमध्ये रूपांतर झाले. [८१]

सहकारी विचाराने भारलेले वकील श्री. भाऊसाहेब साने यांनी बार्शी तालुक्यामध्ये सहकारी चळवळीची सुरूवात केली. त्यांच्याच पुढाकारातून तालुक्यातील कसबे तडवळे येथे इ. स. १९०५ मध्ये पहिली सहकारी सोसायटी स्थापन झाली. त्यानंतर पुढे सहकारी सोसायट्यांचे तत्कालीन रजिस्ट्रार श्री. मॅकलीन बार्शीला आले त्यावेळी बार्शीतील प्रमुख शेतक-यांची एक बैठक घेण्यात आली. त्यानंतर १ जुलै १९०६ रोजी बार्शी येथेही " बार्शी अर्बन को-ऑपपरेटीव्ह क्रेडिट सोसायटी " स्थापन करण्यात आली. श्री. विश्वनाथ पंढरीनाथ सुलाखे, श्री. नागनाथ संभुआप्पा कथले, श्री. रामचंद्र मोरेश्वर साने, श्री. रघुनाथ एकनाथ परंडकर, श्री. शिवाजी मोरारजी भाटे या सदस्यांचा समावेश असलेले या सोसायटीचे पहिले कार्यकारी मंडळ होते. [८२] मार्च १९११ अखेर या सोसायटीच्या ठेवी ८,४५० रूपये इतक्या होत्या. यामध्ये सर्वात मोठी ठेव पानगाव येथील सावकार श्री. गेनबा आंदोबा गव्हाणे यांची होती. यावर्षाखेर या सोसायटीचे एकूण सभासद १७० होते. यापैकी केवळ ८ सभासद बार्शी तालुक्यातील होते. इ. स. १९११-१२ मध्ये या सोसायटीने आपल्या सभासदांना पासबुके दिली. तसेच भागीदारांच्या घरी पेटया ठेऊन त्यात प्रत्येकाने दररोजची शिल्लक रक्कम टाकावी व पेटी भरल्यानंतर ती सोसायटीकडेआणून त्यातील रक्कम सोसायटीमध्ये ठेव म्हणून ठेवावी असा " पूअर मॅन्स बँक " चा एक अभिनव उपक्रम या सोसायटीने राबविला. ही सोसायटी जरी शहरातील असली तरी या सोसायटीने जमीन सुधारणा, विहीर बांधणी, जनावरे खरेदी, बी-बियाणे खरेदी, चारा खरेदी, सरकारी सारा, जुनी कर्जफेड यासाठीच प्रधान्याने वित्तपुरवठा केला होता. थोडक्यात शेतक-यांचे हित जोपासण्याचा प्रयत्न या सोसायटीने प्रथमपासूनच केल्याचे आढळते. [८३]

१ मे १९१३ रोजी सोलापूरचे डॉ. किर्लोसकर यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या सभेमध्ये काही महत्वाचे ठराव मंजूर करण्यात आले. यामध्ये बार्शी सोसायटीने सोलापूर जिल्ह्यातील सोसायट्यांना कर्ज देण्यासंदर्भात एक ठराव होता. मा. रजिस्ट्रारच्या शिफारशीवरून या सोसायटीने २५ ऑगस्ट १९१४ रोजी

अहमदनगर जिल्ह्यातील हिंगणी व बऱ्हाणपूर या दोन सोसायट्यांना कर्ज दिले होते. १६ जून १९१६ रोजी मुबई सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेत खाते सुरू करण्याचा ठराव झाला. इ.स. १९१६ पर्यंत या सोसायटीने बार्शी तालुक्यातील सर्व सोसायट्यासह माढा तालुक्यातील म्हैसगाव, वडशिंगे, चिंचगाव, तडवळे तर पंढरपूर तालुक्यातील करकंब, उत्तर सोलापूर तालुक्यातील वडाळा, करमाळा तालुक्यातील टेंभूर्णी या सोसायट्यांना कर्जपुरवठा केला.[८४]

तक्ता क्र. ३१

बार्शी सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेचे पहिले कार्यकारी मंडळ

अ. क्र	नाव	पद
१	श्री. गोविंद पंढरीनाथ सुलाखे	अध्यक्ष
२	श्री. रामचंद्र मोरेश्वर साने	चेअरमन
३	श्री. भगवंत बाळकृष्ण वैद्य	सभासद
४	श्री. भगवंत पंढरीनाथ सुलाखे	सभासद
५	श्री. सिताराम राम प्रताप	सभासद
६	श्री. रघुनाथ रावजी काळे	सभासद
७	श्री. सैफोद्दीन शरफोद्दीन नाईकवाडी	सभासद
८	श्री. गेनबा आंदोबा गव्हाणे	सभासद


(स्मृतिग्रंथ, बार्शी सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक, इ. स. १९८२, पृष्ठ क्र ७.)

पुढे सोलापूर जिल्ह्यामध्ये काही नवीन सोसायट्या स्थापन झाल्या. या सर्वांना पतपुरवठा व्हावा म्हणून सर्व सोसायट्यांची मिळून एक मध्यवर्ती संस्था असावी या दृष्टीने १ एप्रिल १९१३ रोजी बार्शी सोसायटीचे रूपांतर "बार्शी शहराची पतपेढी व युनियन" या स्वरूपामध्ये करण्यात आले. यानंतर इ. स. १९१८ मध्ये सोलापूर येथे "मध्यवर्ती सहकारी बँक" स्थापन झाली. इ. स. १९२० पर्यंत बार्शी युनियनच सोलापूर जिल्ह्यातील सोसायट्यांना कर्जपुरवठा करीत असल्यामुळे १ ऑक्टोबर १९२० रोजी बार्शी युनियनचे रूपांतर " बार्शी सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक" असे करण्यात आले.

पुढे बार्शी तालुक्यातील सर्व सोसायट्या सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडे वर्ग कराव्यात अशा आशयाचे रजिस्ट्रारचे पत्र २४ मार्च १९३४ रोजी या बँकेला आले. मात्र या बँकेच्या तत्कालीन कार्यकारी मंडळाने त्याला तीव्र विरोध केला. यामध्ये सर्व सोसायट्यांही सहभागी झाल्या. त्यामुळे रजिस्ट्रार

यांनी आपला निर्णय मागे घेतला व त्यामुळे तालुक्यातील सर्व सोसायट्या या बँकेकडे राहून बँकेचे सेंट्रल हे स्वरूप कायम ठेवण्यात तत्कालीन कार्यकारी मंडळाला यश आले. इ. स. १९३६ मध्ये या बँकेची एक शाखा वैराग येथे सुरू करण्यात आली होती.[८५]

आलेख क्र. ४




	इ. स. १९२०	इ.स. १९३०	इ.स. १९४०	इ. स. १९५०
ठेवी	१०२८९६	३६९७३७	४२०४७४	१४६२६७९
कर्जवाटप	६९०९३	१७६४५०	१९६१२	८५१००७
खेळते भांडवल	१४६८९५	४८८०७१	५७९९८६	१६९५२३१

(काळे. गो. र, बार्शी सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि. व बार्शी तालुक्यातील सहकारी पतपेढयांचा इतिहास, यशवंत प्रेस, सदाशिव पेठ पुणे, इ. स. १९५४.)

इ. स. १९५६ मध्ये या बँकेने आपला सुवर्ण महोत्सव साजरा केला. या कार्यक्रमास सहकार चळवळीचे आधारस्तंभ श्री. वैकुंठलाल मेहता हे प्रमुख पाहूणे म्हणून उपस्थित होते. कालांतराने पुन्हा सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने सर्व सोसायट्या आपल्याशी संलग्न असाव्या असा आग्रह धरला व सरकारनेही प्रत्येक जिल्ह्यामध्ये एकच मध्यवर्ती बँक असावी हे धोरण उचलून धरले. याहीवेळी पूर्वीप्रमाणेच एकजूटीने विरोध झाला. परंतू सरकारचे धोरणच बदलल्यामुळे या विरोधाचा काहीच परिणाम झाला नाही. इ. स. १९६६ मध्ये सोसायट्यांची या बँकेशी असलेली संलग्नता काढून घेण्यात आली. त्यामुळे ही बँक पुढे " बार्शी सेंट्रल अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक " या नावाने ओळखण्यात येऊ लागली. या संलग्नता प्रक्रियेत या बँकेला ७००० हजार रूपये तोटा सहन करावा लागला. या बँकेचे अर्बन बँकेत रूपांतर झाल्यानंतर ॲड. माधव विष्णू विश्वरूपे, ॲड. रामचंद्र गोविंद परंडकर, श्री. रामचंद्र गोविंद टिळक व श्री. देवीदास जनार्दन कुलकर्णी आंबेजवळगेकर या सर्वांनी इ. स. १९६६ पर्यंत या बँकेची धुरा यशस्वीपणे सांभाळली. संचालक मंडळ व कर्मचारी यांना विश्वासात घेऊन बँक प्रगतीपथावर ठेवली.

इ. स. १९८२ मध्ये या बँकेच्या अद्ययावतअशा नवीन इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले. याच इमारतीमध्ये बँकेचा अमृत महोत्सव साजरा झाला.

आलेख क्र. ५



(काळे. गो. र, बार्शी सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि. व बार्शी तालुक्यातील सहकारी पतपेढयांचा इतिहास, यशवंत प्रेस, सदाशिव पेठ पुणे, इ. स. १९५४.)

या बँकेने आपल्या कार्यक्षेत्रातील शेतकरी, व्यापारी, छोटे व्यावसायिक, दुर्बल घटक यांना त्यांच्या गरजेनुसार कर्जपुरवठा केला. ही बँक जरी शहरी असली तरी या बँकेचे बहुसंख्य सभासद हे शेतकरी होते. आपला देश शेतीप्रधान असल्यामुळे प्राधान्याने शेतीच्या गरजा भागविण्याकडे या बँकेने प्रथमपासूनच प्रधान्य दिले. यानंतर या बँकेने लघु उद्योग व छोटे व्यावसायिक यांच्या गरजा तत्परतेने पूर्ण केल्या. बँकेच्या सुस्थितीस सभासद, ठेवीदार, कर्मचारी व कर्जदार हे चार घटक महत्वाचे असतात. या प्रत्येकाच्या आर्थिक अपेक्षा एकमेकापासून भिन्न असतात. सभासदास जास्त नफ्याचा हिस्सा हवा असतो. ठेवीदाराला जास्त दराने व्याज हवे असते. कर्मचाऱ्यांना जास्त वेतन हवे असते. तर कर्जदाराला कमी व्याजदराने कर्ज हवे असते. या सर्वांचा व्यवस्थित मेळ घालून बँकेची प्रगती साधणे ही संचालक मंडळाची जबाबदारी असते. यावरच कोणत्याही बँकेची खरी प्रगती अवलंबून असते. ही जबाबदारी या बँकेच्या संचालक मंडळाने व्यवस्थित पार पाडली, त्यामुळेच या बँकेची प्रगती झाली.[८६]

इ. स. १९४९ पासून नागरी सहकारी बँकांचा करभार चालविण्यासाठी " बँकिंग रेग्युलेशन ॲक्ट १९४९" हा कायदा लागू करण्यात आला. त्यानुसार या बँकांवर रिझर्व्ह बँकेचे नियंत्रण आले. हा नागरी सहकारी बँकांच्या इतिहासातील एक महत्वाचा टप्पा मानला जातो. या कायदयान्वये शासन, रिझर्व्ह बँक व

राज्य सरकार यांच्याकडून मिळणाऱ्या प्रोत्साहनामुळे नागरी सहकारी बँकांना आपोआपच देशाच्या बँकिंग व अर्थव्यवस्थेत महत्वाचे स्थान प्राप्त झाले. या बँकांच्या ठेवी व कर्जवाटपात उल्लेखनीय वाढ झाली. [८७]

श्री. विनायकराव धर्माधिकारी यांनी बँकेच्या स्थापनेपासून केवळ एक रूपयाचे नाममात्र वेतन घेऊन काम केले. त्यांना सरकारकडून त्यांच्या उत्तम कामाचे बक्षिस म्हणून ४० रूपये किंमतीची सोन्याची अंगठी देण्यात आली. इ. स. १९२२ मध्ये बँकेची कागदपत्रे बांधण्यासाठी जे रूमाल लागतात ते खादीचे घेण्याचा ठराव करण्यात येऊन एक प्रकारे स्वदेशीचा पुरस्कार या बँकेने केला. इ. स. १९२७ मध्ये गुजरात येथे पुरामुळे उध्वस्त झालेल्या लोकांच्या मदतीसाठी ५१ रूपये निधी पाठवून बँकेने आपली सामाजिक बांधिलकी जोपासली. ८ फेब्रुवारी १९४७ रोजी अर्थमंत्री नामदार श्री. वैकुंठलाल मेहता यांनी या बँकेस भेट देऊन या बँकेच्या कामकाजाबद्दल समाधान व्यक्त केले होते.

१७ जानेवारी १९५० रोजी पंढरपूर येथे भरलेल्या शेतकी प्रदर्शनास या बँकेने देणगी दिली. पुणे विद्यापीठास ५०० रूपये, मॉडेल हायस्कूल बार्शी ५०० रूपये, हरिजन सेवक संघ बार्शी २०० रूपये, सार्वजनिक वाचनालय बार्शी ७५ रूपये, रूग्णोपयोगी साहित्यसंग्रह सोलापूर २५ रूपये, अनाथ विद्यार्थी ग्रह ५० रूपये, शिवाजी बोर्डिंग बार्शी ५० रूपये अशा देणग्या या बँकेमार्फत देण्यात आल्या. याशिवाय १६ जानेवारी १९५० रोजी आसाम फंडास या बॅकेने २५१ रूपये देणगी दिली होती. यानंतरही या बँकेचे सामाजिक बांधिलकीचे हे काम निरंतर चालू होते. [८८]

बँकेच्या एकूण खातेदारांपैकी जवळजवळ ९० टक्के खातेदार हे अल्प प्रमाणात व्यवहार करणारे होते. यामध्ये हातगाडा ओढणारे हमाल, बैलगाडी चालविणारे गाडीवान, शिवणकामावर पोट भरणाऱ्या महिला, ओरडून पेपर विकणारे, छोटे पेपर विक्रेते, शेळया-मेंढया पाळणारे, फळाचे गाडे चालविणारे, पानदुकानदार दुधवाले इ. समावेश होता. थोडक्यात छोटया ग्राहकांची ही मोठी बँक होती. या बँकेने अनेक तारण नसलेल्या पण कारण असलेल्यांना वित्तपुरवठा करून त्यांच्या उन्नतीस हातभार लावला. एकंदर बार्शी तालुक्याच्या अर्थकारणासह जिल्ह्याच्या अर्थकारणातही या बँकेची खूप मोलाची भूमिका आहे.[८९]

४.४.३.२. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, सोलापूर

हिंदुस्थानमध्ये इ. स. १९०४ मध्ये शेतकी पतपेढयांच्या माध्यमातून सहकारी कायदयान्वये सहकारी चळवळीस प्रारंभ झाला. या सहकारी संस्थांचा कारभार चालविताना येणाऱ्या अडचणींची चौकशी व त्यावरील उपाय सुचविण्यासाठी इ. स. १९१२ मध्ये एडवर्ड मॅक्लेगन यांच्या अध्यक्षतेखाली एक कमिटी नेमली. या कमिटीने सहकारी संस्थांना खऱ्या अर्थाने आर्थिकदृष्टया कार्यक्षम करण्यासाठी त्यांना भांडवल

पुरविणाऱ्या जिल्हानिहाय मध्यवर्ती सहकारी बँका स्थापन कराव्या असे सुचविले. त्यामुळे इ. स. १९१६ पासून जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका निघण्यास सुरूवात झाली.[९०] ग्रामीण समाजाच्या मूलभूत गरजातूनच सहकाराचा उदय झाला असून जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका त्यामधील एक प्रमुख घटक आहेत. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी ग्रामीण विभागामध्ये वित्तपुरवठयाचे अतिशय महत्वाचे कार्य करून ग्रामीण जनतेच्या विकासाला मोलाचा हातभार लावला आहे. या बँकांचे कार्य आता केवळ ठेवी जमा करणे व कर्ज देणे असे मर्यादित स्वरूपात राहिले नसून ग्रामीण जनतेस जोडव्यवसाय व बँकिंगच्या सुविधा कमीतकमी अंतरावर उपलब्ध करून त्यांची सर्वांगिण उन्नती करण्यातही त्या सहभाग घेऊ लागल्या आहेत. ग्रामीण विकासाचे त्या एक महत्वाचे साधन बनल्या आहेत. [९१]

११ सप्टेंबर १९१७ रोजी पंढरपूर येथे झालेल्या सभेत चर्चिले गेलेल्या अनेक विषयांपैकी सोलापूर जिल्ह्यामध्ये मध्यवर्ती सहकारी बँकेची स्थापना करावी हा एक प्रमुख विषय होता. या बँकेच्या स्थापनेमध्ये खुद्द सोलापूर जिल्ह्याचे तत्कालीन जिल्हाधिकारी ए. एच. ए. सिम्कॉक्स यांनीही पुढाकार घेतला होता. ८ मार्च १९१८ रोजी मुंबई प्रांताचे तत्कालीन सहकारी संस्थांचे रजिस्ट्रार यू बॅक यांनी ही संस्था रजिस्टर केली. त्यानंतर २६ मार्च १९१८ रोजी या बँकेची पहिली सर्वसाधारण सभा सोलापूर जिल्ह्याचे कलेक्टर ए. एच. ए. सिम्कॉक्स यांच्या अध्यक्षतेखाली झाली. याच सभेत बँकेच्या पहिल्या मंडळाची नेमणूक करण्यात आली. याच सभेने बँकेचे पहिले चेअरमन म्हणून श्री. जी. के. साठे यांची नियुक्ती केली. बँकेच्या कार्यालयास जागा नव्हती. त्यामुळे रावसाहेब पित्रे यांनी आपली जागा बँकेला दिली. त्यांच्या वाडयातच बँकेच्या कार्याला सुरूवात झाली. या बँकेच्या सुरूवातीच्या पोटनियमाप्रमाणे जिल्ह्यातील सहकारी सोसायट्यांना वित्तपुरवठा करणे, त्यांच्यावर देखरेख ठेवणे व या माध्यमातून जिल्ह्यातील सहकारी संस्थांचा विकास करणे हे या बँकेचे सुरूवातीचे उद्दिष्ट होते. बँकेच्या व्यवहारासाठी सुरूवातीस पोस्ट ऑफिसमध्ये खाते उघडावे लागले. सोलापूर येथील बँक ऑफ बॉम्बेच्या शाखेमध्येही या बँकेने खाते उघडले. या बँकेची जाहिरात ' केसरी ' सारख्या मातब्बर वर्तमानपत्रातून केली जात होती. पुढे बँकेस जागा कमी पडू लागल्यामुळे जून १९२० च्या सुमारास कसब्यातील श्री. लिमये यांच्या वाडयात बँकेचे कार्यालय हलविण्यात आले. १८ सप्टेंबर १९४३ रोजी या बँकेचा रौप्य महोत्सव तत्कालीन मुंबई प्रांताचे रजिस्ट्रार आय. सी. एस अधिकारी श्री. एस. एन. इक्रम यांच्या अध्यक्षतेखाली झाला. [९२]

पुढे श्री. गणपतराव साठे, श्री. शंकरराव मोहिते-पाटील व श्री. नामदेव जगताप यांनी या बँकेला खेडोपाड्यांपर्यंत पोहचविले. स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये बँकेची प्रगती संथ गतीने होत राहिली. स्वातंत्र्यानंतर सहकारी चळवळीचा वेगाने विकास झाला. इ. स. १९७० नंतर या बँकेची प्रगती फार वेगाने झाली. जिल्ह्यातील शेती व शेतीपूरक उद्योगांना या बँकेने फार मोठ्या प्रमाणामध्ये वित्तपुरवठा केला. त्यामुळेच

जिल्ह्यामध्ये साखर कारखाने, सहकारी सूत गिरण्या उभारणीस गती मिळाली. या बँकेने देशपातळीवरचे उत्कृष्ट कार्यप्रणालीचे प्रथम क्रमांकाचे बक्षिस पटकाविले. तसेच उत्कृष्ट कार्याबद्दल राज्य सहकारी बँक असोसिएशन कडून दोनवेळा पुरस्कार प्राप्त केला. या जिल्ह्यातील भौगोलिक परिस्थितीला अनुसरून बँकेच्या संचालक मंडळाने इ. स. १९८६ मध्ये नाबार्डचे कर्जवाटपाचे निकष थोडेसे बाजूला ठेऊन फळपिकाच्या उत्पादन खर्चाशी निगडित कर्जपुरवठा करण्याचे धाडसी पाऊल उचलले. यासाठी २१ कृषी पदवीधारकांना बँकेच्या सेवेत घेतले. या उपक्रमामुळे जिल्ह्यातील फळबागांचे प्रमाण वाढले. त्यातून शेतकऱ्यांची विशेषत: लहान भूधारकांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यास मदत झाली. या फलोत्पादन उपक्रमाच्या यशस्वीतेमुळे संपूर्ण महाराष्ट्रात सदर बँक प्रसिध्द झाली. इ. स. १९९० अखेर या बँकेचे भागभांडवल ७६०.३१ लाख, ठेवी ९६०७.१४ लाख, खेळते भांडवल १३,८४५.२२ लाख रूपये इतके व कर्जवसूली ६५.४४% इतकी होते. शिवाय ' अ ' ऑडिट वर्गामध्ये असणारी ही बँक होती. [९३]

या बँकेने जिल्ह्यातील प्राथमिक सहकारी शेती पतपुरवठा संस्थांना अल्प, मध्यम व दीर्घ मुदतीची कर्जे देऊन हरित क्रांतीचे स्वप्न साकारण्यामध्ये मोलाची भूमिका पार पाडली आहे. वित्तपुरवठा केला आहे. २० कलमी एकात्मिक ग्रामीण विकास योजनेखाली शेतकऱ्यांना, शेतमजूरांना, भूमिहीन सभासदांना त्यांचे जीवनमान उंचाविण्यासाठी निरनिराळया योजनेखाली अल्प, मध्यम मुदतीचा कर्जपुरवठा केला आहे. तसेच कृषी यांत्रिक सुविधा योजनेखाली जिल्ह्यातील बागायती क्षेत्रामध्ये वाढ होण्यासाठी इ. स. १९८४ पासून शेतकऱ्यांना ट्रॅक्टर्स, शेती अवजारे, पाईप लाईन, इलेक्ट्रीक मोटार, गोबर गॅस, ठिबक सिंचन, तुषार सिंचन, तसेच पूरक व्यवसायासाठी ट्रॅक्टर, मळणी यंत्र, शेतघर,पशुपालन, दुग्धव्यवसाय इत्यादी विविध बाबीसाठी मध्यम मुदतीचा कर्जपुरवठा केला. याचा जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांनी लाभ घेतला. [९४]

ग्रामीण भागातील जनतेस बँकिंगची सवय व्हावी व शेतकऱ्यांना कमीतकमी अंतरावरून कर्जव्यवहार करणे सुलभ व्हावे म्हणून या बँकेने शाखाविस्ताराचा कार्यक्रम हाती घेतला. इ. स. १९३७ पर्यंत या बँकेच्या कुर्डूवाडी, पंढरपूर व करमाळा येथे शाखा उघडण्यात आल्या. पुढे इ. स. १९४६ मध्ये मोहोळ व इ. स. १९४७ मध्ये सांगोला येथे शाखा उघडण्यात आली. इ. स. १९५० मध्ये अक्कलकोट, मंगळवेढा, इ. स. १९५४ मध्ये मैंदर्गी, इ. स. १९५६ मध्ये अकलुज व नातेपुते येथे शाखा उघडण्यात आली. बार्शी तालुक्यामध्ये बार्शी सेंट्रल बँकेमार्फत वित्तपुरवठा होत होता. इ. स. १९५८ मध्ये हे कार्य बार्शी सेंट्रल बँकेकडून जिल्हा मध्यवर्ती बँकेकडे वर्ग करण्यात आले. त्यामुळे बार्शी तालुक्यामध्ये या बँकेची शाखा उघडण्यासाठी इ. स. १९५८ साल उजडले. ३ नोव्हेंबर १९५८ रोजी बार्शी व वैराग येथे प्रत्येकी एक शाखा उघडण्यात आली. [९५]

जिल्हा मध्यवर्ती बँक या नात्याने या बँकेच्या कार्याची व्याप्ती सर्व जिल्हाभर असावी लागते. मात्र जिल्ह्यातील ७ तालुक्यांपैकी ५ तालुक्यांसाठीच या बॅंकेचे कार्यक्षेत्र मर्यादित करण्यात आले. बार्शी तालुक्यातील पतपेढ्यांना बार्शी सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक वित्तपुरवठा करत होती. तर माळशिरस तालुक्यातील सोसायट्या मुंबई प्रांतिक बँकेस जोडण्यात आल्या होत्या. अशा प्रकारे एका जिल्ह्यामध्ये शेतकी पतपेढ्यांना भांडवल पुरविण्याचे काम तीन वेगवेगळया संस्था करत असल्याचे उदाहरण संपूर्ण मुंबई प्रांतात इतरत्र कोठेच दिसत नसल्याची व्यथा इ. स. १९४३ च्या बँकेच्या रौप्य महोत्स्वी कार्यक्रमामध्ये बँकेचे तत्कालीन चेअरमन श्री. जे. ई. कुलकर्णी यांनी मांडली होती. त्या सोसायट्या या बँकेस जोडून जिल्हा मध्यवर्ती बँकेला जिल्ह्यातील सहकारी चळवळीचे केंद्र बनविण्यात यावे असा आशावाद व्यक्त केला होता. त्यामुळेच पुढे १ ऑक्टोबर १९५८ रोजी बार्शी तालुक्यातील शेतकी पतपेढ्या सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेस जोडण्यात आल्या. [९६]

इ. स. १९६८ मध्ये या बँकेच्या २६ शाखा होत्या. इ. स. १९७९ अखेर त्यांची संख्या ६४ इतकी झाली. या बँकेचा वाढता व्याप व व्यवहार लक्षात घेऊन प्रशासनाची विभागवार रचना केली. सोसायट्यांवर देखरेख व शाखेवर नियंत्रण ठेवण्यासाठी तालुकावार सिनियर बँक इन्स्पेक्टर नेमले. शेतकऱ्यांना कर्जपुरवठा करताना त्याला किती कर्जाची आवश्यकता आहे याची शास्त्रीय व तांत्रिक स्तरावर चिकित्सा करून कर्जवाटप केले. या बँकेने जादा उत्पादन देणारे संकरीत पीक उत्पादन कार्यक्रम फार मोठ्या प्रमाणावर राबविला. ऊसाचे एकरी उत्पादन वाढावे म्हणून इ. स. १९७५-७६ मध्ये या बँकेने ऊस पायलट योजना राबविली. अवर्षण प्रवण क्षेत्र कार्यक्रमांतर्गत या बँकेने जिल्ह्यातील अल्प भूधारक व दुर्बल घटकांना मध्यम मुदतीची कर्जे दिली. यामध्ये शासनाकडून संबंधितांना २५ ते ३४ टक्क्यापर्यंत अनुदान मिळाले. सवलतीच्या व्याज दराने घरबांधणीसाठी लोकांना वित्तपुरवठा केला. " शेती कर्ज सधन विकास योजना" यामध्ये भारतातील ४३ जिल्ह्यांची निवड केली होती. यामध्ये सोलापूर जिल्ह्याचा समावेश होता. या योजनेमुळे जिल्ह्याच्या कृषी विकासाला चालना मिळाली. [९७]

इ. स. १९५८ अखेर सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील बार्शी तालुक्यातील एकूण सभासद १,०७२ इतके होते. यापैकी ९६७ व्यक्ती तर १०५ संस्था होत्या. त्यांना एकूण २७,६४,६५७ रूपये कर्जवाटप करण्यात आले होते. या वर्षाखेर कर्जवसूली २४,०३,१८५ रूपये तर एकूण थकबाकी १४,६१,२४४ इतकी होती. [९८]

बार्शी तालुक्यातील या २६ शाखांच्या माध्यमातून जिल्हा मध्यवर्ती बँकेने तालुक्यातील शेतकऱ्याला प्रगतीच्या दिशेने घेऊन जाण्याचे कार्य केले आहे. इ. स. २०१०-११ अखेर बार्शी तालुक्यातील

या सर्व शाखांच्या ठेवी २१० कोटीपेक्षा जास्त होत्या, तर कर्जवाटप १५५ कोटीपेक्षा अधिक होते. बँकेशी सलग्न असलेल्या तालुक्यातील सर्व सहकारी संस्थांना या बँकेने मुबलक प्रमाणामध्ये वित्तपुरवठा केला आहे. तालुक्यातील शेतकऱ्यांना शेतकी पतपेढ्यांमार्फत पीक कर्जाचा मोठ्या प्रमाणावर पुरवठा केला आहे. कारण तालुक्यामध्ये एकही सहकारी सूत गिरणी नाही. शिवाय तालुक्यामध्ये एकच साखर कारखाना होता. त्यामुळे जिल्ह्यातील इतर तालुक्याच्या मानाने बार्शी तालुक्यातील शेतकऱ्यांनाच अधिक वित्तपुरवठा केल्याचे आढळून येते. याशिवाय शेतीपूरक जोडव्यवसाय म्हणून पशुपालन, कुक्कुटपालन, रेशीम उद्योग, गाळ काढण्याचे यंत्र, मळणीयंत्र, गुऱ्हाळ साहित्य यासाठी मध्यम मुदतीचा कर्जपुरवठा केला आहे. यामुळे तालुक्यातील दुग्ध संकलन वाढून दुग्ध व्यवसाय मोठ्या प्रमाणामध्ये वाढला. याचा प्रामुख्याने तालुक्यातील आर्थिकदृष्ट्या गरीब शेतकऱ्यांना अधिक फायदा झाला. शेतकऱ्यांना घरबांधणीसाठी असलेल्या योजनेचा तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांनी लाभ घेतलेला आहे. तसेच या बँकेने ग्रामीण कारागिरांना केलेल्या संकलीत स्वरूपाच्या कर्जपुरवठयामुळे तालुक्यातील अनेक कारागिर आर्थिकदृष्टया स्वावलंबी झाले आहेत. तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांना या बँकेने जलसिंचन, जमीन मशागत, शेतमाल वाहतुकीसाठी वाहन खरेदी यासाठी सातत्याने कर्जपुरवठा केला आहे. त्यामुळे तालुक्यातील बागायती क्षेत्र वाढण्यास मदत झाली. याशिवाय सोनेतारणावर १ लाख रूपयापर्यंत कर्ज दिले जाते. वेअर हाऊस रिसीट तारणावर तात्काळ कर्ज दिले जाते. जिल्ह्यामध्ये प्रत्येक तालुक्यामध्ये एक याप्रमाणे ११ सहकारी खरेदी-विक्री संघ कार्यरत होते. बार्शी सहकारी खरेदी-विक्री संघामार्फत प्रामुख्याने रासायनिक खते, बी-बियाणे, होलसेल साखर, ऑईल इंजिन, विद्युत पंप तसेच शासनाच्या धोरणानुसार ग्राहक मालाचे वितरण ही कामे केली जातात. संघाने केवळ या व्यवसायावर समाधानी न राहता बाजारात येणाऱ्या शेतमालास योग्य भाव मिळवून देऊन त्यांच्या मार्फत जास्तीत जास्त शेतमालाची विक्री करून पतपुरवठयाबाबत जी मुख्य जबाबदारी आहे ती त्यांनी यशस्वीरित्या पार पाडली. स्वयंसंहाय्यता बचत गटाव्दारे महिलांना स्वावलंबी बनविण्याच्या तसेच महिला सक्षमीकरणासाठीच्या कार्यामध्ये बार्शी तालुक्यातील या बँकेच्या विविध शाखांचे मोठे योगदान आहे. नाबार्ड व या बँकेच्या सहकार्याने मार्च २०११ अखेर ३९ "शेतकरी मंडळे" कार्यान्वित केली. यापैकी जिल्ह्यामध्ये सर्वात जास्त म्हणजे ७ शेतकरी मंडळे बार्शी तालुक्यामध्ये आहेत. ही मंडळे शेती, शेतकरी व बँक यांच्या संयुक्त विकासासाठी सतत प्रयत्नशील आहेत. [९९]

बार्शी तालुक्यामध्ये सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची पहिली शाखा ' वैराग ' येथे इ. स. १९५८ मध्ये स्थापन झाली. त्यानंतर इ. स. २०११ अखेर या तालुक्यामध्ये या बँकेच्या २६ शाखा स्थापन झाल्या आहेत. हा शाखाविस्तार होण्यामागे संबंधित ठिकाणच्या विशेषत: ग्रामीण भागातील विविध कार्यकारी सोसायट्यांचे तत्कालीन पदाधिकाऱ्यांचे मोलाचे योगदान होते. या शाखाविस्तारामुळे

वित्तपुरवठयातील विलंबास मोठ्या प्रमाणामध्ये आळा बसला. माळशिरस वगळता या बँकेच्या जिल्ह्यामध्ये सर्वात जास्त शाखा बार्शी तालुक्यात आहेत. तालुक्यामध्ये फार मोठे सहकारी उद्योग नसल्यामुळे कर्जवाटपामध्ये सहकारी सोसायट्यांच्या माध्यमातून तसेच इतर विविध योजनांच्या माध्यमातून शेतकरीच अग्रभागी होता. यामुळे खऱ्या अर्थाने शेतीच्या विकासाला चालना मिळाली. या बँकेने नियमित व समाधानकारक कर्जव्यवहार असलेल्या शेतकऱ्यांना शासनाची किसान क्रेडीट कार्ड योजना लागू केली. त्यामुळे शेतकऱ्यांना शेतीसाठी वेळेवर कर्ज मिळू लागले. याचा बार्शी तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांनी लाभ घेतला. शासनाच्या धोरणानुसार २० कलमी कार्यक्रमांतर्गत लघुसिंचन बाबी व गोबरगॅस संयंत्र यासाठी व एकात्मिक ग्रामीण विकास योजनेखाली दुभती जनावरे व इतर कारणासाठी या बँकेने मोठ्या प्रमाणावर कर्जपुरवठा केला. त्यामुळे तालुक्यातील बहुसंख्य शेतकऱ्यांनी गोबरगॅस संयत्र बसविली आहेत. लघुसिंचनासाठी मोठ्या प्रमाणामध्ये दिलेल्या कर्जामुळे तालुक्यातील ओलिताखालील क्षेत्र वाढले. त्याचबरोबर फळबागांचे प्रमाण वाढले. तालुक्यामध्ये एकमात्र असलेल्या भोगावती साखर कारखान्यास या बँकेने सतत वित्तपुरवठा केला. शासनाच्या राष्ट्रीय वखार जाळे निर्मिती योजने अंतर्गत गोडावून बांधण्यासाठी प्रती मे. टन ५०० रूपये प्रमाणे दीर्घ मुदतीचा कर्जपुरवठा केला. याचा लाभ घेऊन तालुक्यातील काही सोसायट्यांनी सुसज्ज अशी गोडाऊन उभारली. बँक कर्मचाऱ्यांना गृहोपयोगी वस्तूंची खरेदी यासाठी बँकेमार्फत कर्जपुरवठा केला.

जिल्ह्याच्या एकूण वार्षिक पतपुरवठा आराखडयामध्ये या बँकेचा वाटा ५० % पेक्षा जास्त आहे. जिल्ह्यातील भौगोलीक व आर्थिक परिस्थितीचा विचार करून या बँकेने सातत्याने सर्वसामान्यांचा विचार करून विविध योजना आखल्या आहेत. त्यामध्ये फळबाग विकास योजना, जलसिंचन योजना, सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील एकात्मिक शेती विकास प्रकल्प, दुभती जनावरे खरेदीसाठी स्टेप योजना, जिल्हा दूध संघामार्फत कर्जपुरवठा, बँकेस संलग्न पगारदारासाठी नंदीनी गृह योजना, शेतकऱ्यांसाठी सहकार महर्षी गृह कर्ज योजना, महिला बचतगट, स्वतंत्र सेवक प्रशिक्षण केंद्र अशा विविध योजनांचा समावेश होतो. या सर्व योजना बार्शी तालुक्यामध्ये राबविण्यात आल्या. या योजनांचा समाजातील सर्व स्तरातील लांकांनी लाभ घेऊन आपली आर्थिक स्थिती सुधारली. तालुक्याच्या एकूण आर्थिक विकासामध्ये या विविध योजनांची भूमिका महत्वाची आहे.[१००]

४.४.३.३. सांगली नागरी सहकारी बँक, शाखा बार्शी

नागरी सहकारी बँका ह्या समाजातील मध्यम व कनिष्ठ वर्गातील लोकांच्या, त्यांच्या प्रतिनिधींनी चालविलेल्या व त्यांचे आर्थिक हित साधण्यासाठी स्थापन झालेल्या सहकारी संस्था आहेत. नागरी जनतेला

काटकसर व बचतीच्या सवयी लावून ठेवी गोळा करणे, त्या ठेवीतून व भागभांडवलातून सभासदांच्या आर्थिक गरजा माफक व्याज दराने पूर्ण करण्याचे काम या बँका अत्यंत प्रभावीपणे करत आहेत. या सर्व व्यवहारातून झालेला नफा सभासद, ठेवीदार, कर्जदार व सेवक या चारही घटकांना योग्य प्रमाणात देऊन बँकेला समर्थ करण्याचा सातत्याने प्रयत्न केला जातो. [१०१]

इ. स. १९३५ साली सांगलीमध्ये ही बँक स्थापन झाली. जानेवारी १९३६ मध्ये ११०० रूपये भागभांडवल व २०० रूपये ठेवीवर या बँकेच्या प्रत्यक्ष कामकाजास सुरूवात झाली. इ. स. १९३५ च्या दरम्यान तत्कालीन बँका या केवळ मोठे व्यापारी व व्यावसायिक यांच्या गरजा प्राधान्याने भागवित होत्या. तसेच शेती कर्जाच्या गरजा स्थानिक सहकारी संस्थांमार्फत पूर्ण होत होत्या. परंतू छोटे व्यावसायिक व कमी उत्पन्न असलेल्या गटातील लोकांना त्यांच्या आर्थिक गरजा भागविण्यासाठी त्यांना सावकाराकडे जाणे भाग पडत असे. याच प्रश्नातून श्री. आण्णासाहेब गोडबोले यांनी या बँकेची मुहूर्तमेढ रोवली. इ. स. १९८८ मध्ये रिझर्व्ह बँकेने देशातील १० अर्बन सहकारी बँकांना शेड्यूल बँकेचा दर्जा दिला. त्यात या सांगली अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेचा समावेश होता. [१०२]

या बँकेची एक शाखा बार्शी येथे आहे. या शाखेची स्थापना इ. स. १९८१ मध्ये झाली. मार्च २०१३ अखेर बार्शी शाखेतील खातेदारांची संख्या ११ हजारापेक्षा जास्त होती. तर ठेवी ४५ कोटी रूपयांपेक्षा अधिक होत्या. शिवाय या बँकेने आपल्या विविध योजनेअंतर्गत बार्शी तालुक्यात २३ कोटी रूपये कर्जवाटप केले होते. तालुक्यातील शेततळयासाठी या शाखेने २५,००० रूपये देणगी दिली होती. इ. स. २००७ मध्ये सांगलीमध्ये महापूर आला होता तेव्हा या शाखेतून त्या ठिकाणी मदत पाठविण्यात आली होती. अवघ्या दोन दिवसामध्ये कमी व्याजदराने १० कोटी रूपयांचे कर्ज वाटप करण्यात आले होते. बार्शी येथे पूर आला होता तेव्हा बार्शीच्या बाजारपेठेतील व्यावसायिकांचे फार नुकसान झाले होते. त्यावेळी या शाखेने संबंधित उद्योजक, व्यापारी, व्यवसायिक यांना तात्काळ विम्याची रक्कम दिली होती. इ. स. २०१३ पर्यंत या शाखेने २५ हजार लोकांना मोफत पॅन कार्डचे वाटप केले. ही बँक सर्वसामान्य ठेवीदारांना आपला केंद्रबिंदू मानते. कारण या बँकेच्या एकूण ठेवीदारांपैकी ९७ % पेक्षा अधिक ठेवीदारांच्या ठेवी या १ लाख रूपये व त्यापेक्षा कमी आहेत. तर एकूण कर्जदारांपैकी ९२ % पेक्षा जास्त कर्जदारांकडे २ लाख रूपये व त्यापेक्षा कमी रकमेचे कर्ज आहे. साधारणपणे हिच स्थिती बँकेच्या बार्शी शाखेची आहे. आजतागायत बार्शी शाखेने कर्ज देताना केवळ ठेवीदारांच्या ठेवीचा कधीच विचार केला नाही. सामान्यपणे आपल्या गरजू सभासदांना कर्ज वाटपात या बँकेने प्राधान्य दिले आहे. त्यामुळेच बार्शी सारख्या ठिकाणी ही बँक आजही आपले एक वैशिष्टयपूर्ण स्थान टिकवून आहे. [१०३]

या बँकेमार्फत लघु, मध्यम व मोठे उद्योजक, स्वतंत्र व्यावसायिक, शेती व शेतीपूरक व्यवसाय, व्यापार, स्थावर बांधकाम व दुरूस्ती, शिक्षण, घरगुती अडचणी व प्रापंचिक खर्च अशा उद्देशाने कर्ज दिले जाते. यामध्ये शेतीपूरक व्यवसाय, स्थावर बांधकाम व दुरूस्ती, घरगुती अडचणी व प्रापंचिक खर्च यासाठीच्या कर्ज घेणाऱ्या कर्जदारांची संख्या अधिक दिसून येते. यावरून असे लक्षात येते की ही बँक छोटे व्यवसायिक व कमी उत्पन्न असलेल्या गटातील लोकांना त्यांच्या आर्थिक गरजा भागविण्यासाठी प्राधान्याने कर्जवाटप करते. म्हणूनच या बँकेला " लहान लोकांनी मोठी केलेली बँक " असे म्हटले जाते. या बँकेच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त ३० जानेवारी २०१२ ते ६ फेब्रुवारी २०१२ या ८ दिवसांच्या कालावधीमध्ये बँकेने " धनवर्षा ठेव योजना " राबविली. यामध्ये १५ महिन्यांसाठी १२ % व्याजदराचा अंतर्भाव होता. या योजनेच्या पहिल्याच दिवशी या बँकेच्या सर्व शाखांतून १० कोटी रूपये ठेवी जमा झाल्या. तर एकूण ८ दिवसात ६० कोटी पेक्षा अधिक ठेवी जमा झाल्या. [१०४]

यामध्ये बार्शी शाखेचे योगदान उल्लेखनीय होते. या योजने अंतर्गत बार्शी शाखेमध्ये ३ कोटी पेक्षा अधिक ठेवी जमा झाल्या होत्या. हे सर्व या बँकेवरील सामान्य लोकांच्या विश्वासामुळे शक्य झाले. ही बँक जेष्ठ नागरिकांसाठी अर्धा टक्के व्याजदर जास्त देते. सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक निधी, मेडीकल फंड, धर्मादाय निधी, सहकार प्रचार व प्रसार निधी अशा विविध माध्यमातून सांगली अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेच्या बार्शी शाखेने आपली सामाजिक बांधिलकी जोपासली आहे.[१०५]

४.४.३.४. सोलापूर जनता सहकारी बँक, शाखा बार्शी

सोलापूर जनता सहकारी बँकेची स्थापना २८ फेब्रुवारी १९६६ रोजी सोलापूर येथे झाली. पुढे १८ ऑक्टोबर १९७० रोजी या बँकेची एक शाखा बार्शी येथे स्थापन झाली. या शाखेने कर्जवाटप करताना उद्योगधंदयांना अधिक प्राधान्य दिले आहे. कर्जवाटप करणे हे बँकेचे प्रमुख कार्यच असते. हे आपले प्रधान कार्य करताना या शाखेने सर्वतोपरी काळजी घेऊनच कर्जवाटप केले आहे. त्यामुळे या शाखेची कर्जवाटपाच्या तुलनेत थकबाकी अतिशय कमी आहे. [१०६] ही बँक लघु उद्योगांना औद्योगिक कर्ज, घाऊक व किरकोळ व्यापारासाठी कर्ज, व्यावसायिक व स्वयंरोजगारासाठी कर्ज, घरबांधणी व इमारत तारण कर्ज, सोनेतारण, ठेव तारण, प्रापंचिक अडचणी, धार्मिक विधी, जामिनकी, शैक्षणिक, वाहन कर्ज, शेती व शेतीपूरक व्यवसाय अशा विविध उद्देशाने सभासदांच्या गरजेनुसार कर्जवाटप केले. मात्र कर्जवसुलीच्या संदर्भात बँक अतिशय दक्ष असते.[१०७]

वरील विविध योजनांपैकी बार्शी तालुक्यामध्ये उद्योग, व्यापार, व्यवसाय, वाहन, स्वयंरोजगार, घर, शिक्षण या क्षेत्रांना अनुक्रमे कर्जवाटपात या शाखेने प्राधान्य दिले आहे. यापैकी छोटे-मोठे उद्योग,

घाऊक व किरकोळ व्यापार या क्षेत्रामध्ये या शाखेने फार मोठ्या प्रमाणामध्ये कर्जवाटप केले आहे. या शाखेने बार्शीमधील डाळ उद्योगालाही मोठ्या प्रमाणात कर्ज पुरवठा केला आहे. डाळीच्या तारणावर तसेच डाळ उद्योग उभारणीसाठी आवश्यक असणाऱ्या विविध घटकांची पूर्तता करण्यासाठी या शाखेने सढळ हाताने कर्जपुरवठा केला आहे. तसेच वसूलीही योग्य पध्दतीने केलेली आहे. याचबरोबर तालुक्यातील छोटया व्यावसायिकांनाही मोठ्या प्रमाणामध्ये कर्ज पुरवठा करण्याचे धाडस या शाखेने केले. याचबरोबर वाहन खरेदी, शिक्षण, घर या संदर्भातही वेळोवेळी कर्जपुरवठा केला. विविध सामाजिक - धार्मिक कार्यास हातभार लावून आपली सामाजिक बांधिलकी जोपासण्याचे काम या बँकेच्या मुख्य शाखेमार्फत केले जाते. त्यामागे प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष या बँकेच्या प्रत्येक शाखेचा वाटा असतो. रिझर्व्ह बँकेचे निकष, वेळोवेळीची येणारी परिपत्रके, बँकिंग विनियमन कायदा, सहकार कायदा, संचालक मंडळाने ठरविलेले कर्जविषयक धोरण या कक्षेत राहून सदर शाखेने तालुक्यामध्ये कर्जपुरवठा केला आहे. रिझर्व्ह बँकेने अग्रक्रम क्षेत्रास ६० % पतपुरवठा करावा व यापैकी १५% पतपुरवठा आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांना करण्याची सूचना केली होती. तसेच या शाखेने तालुक्यामध्ये आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांना १५ % कर्जपुरवठा केला आहे. [१०८]

सोलापूर जनता सहकारी बँक कर्मचारी सांस्कृतिक मंडळाची व्याख्यानमाला गेल्या २४ वर्षापासून अव्याहतपणे सुरू आहे. गणेशोत्सवात ही व्याख्यानमाला होते. या बँकेच्या विविध शाखांपैकी बार्शी शाखेमार्फत ही व्याख्यानमाला आयोजीत केली जाते. प्रतिवर्षी या व्याख्यानमालेचे आयोजन करून समाजामध्ये विशेषत: तरूणाईच्या मनामध्ये चांगले विचार निर्माण करून त्यातून चांगले नागरिक घडविण्याचा प्रयत्न करण्याचा एक स्तुत्य उपक्रम या बँकेमार्फत राबविला जातो. [१०९]

" बँकिंग हा व्यवसाय व सेवा ही संस्कृती " हे ब्रिदवाक्य मनाशी धरून बँकिंगचे व्यवहार करताना बँकेने सामाजिक जबाबदारीचे नेहमी भान ठेवले आहे. बँकेमार्फत १० वी १२ वी च्या गुणवंत विद्यार्थ्यांचा दरवर्षी सत्कार केला जातो. रक्तदान शिबिरे भरविली जातात. सभासद कल्याण निधीची उभारणी करून सभासद व त्याच्या कुटुंबियांना त्यांच्यावर ओढवणाऱ्या संकटसमयी बँक मदत करते. [११०]

४.४.३.५. पंढरपूर नागरी सहकारी बँक, शाखा बार्शी

इ. स. १९१२ मध्ये पंढरपूरसारख्या चार वाऱ्यावर जगणाऱ्या निवांत तीर्थक्षेत्री श्री. जोग. वि. सी, श्री. जोशी वा .आ, श्री. मांगले द. ना, श्री. कवठेकर ह. तु, श्री. पुरंदरे दा. त्रि, श्री. लिगाडे दा. बा, श्री. परिचारक द. बा व श्री. कोलगंडे ना. ह या आठ जणांनी पंढरपूर बँकेची पतपेढीरूपात स्थापना केली. गरीब, गरजू, मध्यम वर्गीय, छोटे व्यापारी यांना सावकारांच्या पाशातून मुक्त करणे हे या लोकांचे उद्दिष्ट होते. या बँकेच्या स्थापनेमध्ये पंढरपूरमधील सर्व स्तरातील समाजाचा सक्रीय सहभाग होता. इ. स. १९१२

मध्ये अवघ्या २३०० रूपये भागभांडवलावर सुरू झालेली ही संस्था सध्या १ हजार कोटी रूपयाची उलाढाल करणारी एक सक्षम बँक म्हणून सहकार क्षेत्रात स्थिरावली आहे. या प्रदीर्घ वाटचालीत या बँकेने अनेक चढउतार पाहिले आहेत. इ. स. १९२८ दरम्यानच्या जागतिक महामंदीच्या मोठ्या संकटात या बँकेला श्री. भाऊसाहेब काणे वकील यांनी खऱ्या अर्थाने तारले. त्यानंतर बाबुराव जोशी, औंदुंबरजी कवठेकर यांनी या बँकेला सतत प्रगतीपथावर ठेवले. पुढे इ. स. १९७५ नंतर बँकेची धुरा सुधाकरपंत परिचारक यांच्या खांद्यावर आली व ती इ. स. २००० पर्यंत होती. त्यांनीच या बँकेला अधिक लोकाभिमुख बनविले. यांच्याच काळामध्ये या बँकेचा मोठ्या प्रमाणामध्ये शाखाविस्तार झाला.[१११]

बार्शीच्या श्री. भाऊसाहेब साने वकीलांची या बँकेच्या स्थापनेमागे खरी प्रेरणा होती. श्री. साने यांनी बार्शी येथे एक पतपेढी स्थापन केली होती. इ. स. १९११ च्या जून-जुलै महिन्यात श्री. साने वकील पंढरपूरमध्ये श्री. जोग यांच्या घरी आले होते. त्याचवेळी अशा प्रकारची एक पतपेढी पंढरपुरमध्येही स्थापन करण्याचा निर्धार झाला. पुढे १२ नोव्हेंबर १९१२ रोजी हा निर्धार पूर्ण झाला. कालांतराने इ. स. १९५४ ते १९७५ या कालखंडात श्री. औदुंबरशेठ कवठेकर या बँकेचे चेअरमन असताना २४ डिसेंबर १९७० रोजी या बँकेची एक शाखा बार्शी शहरात सुरू करण्यात आली. बार्शी ही एक फार मोठी बाजारपेठ होती. त्यामुळे येथे व्यापारीवर्ग फार मोठ्या प्रमाणात होता. याचाच विचार करून या बँकेची एक शाखा बार्शी येथे सुरू करण्यात आली. श्री. सुधाकरपंत परिचारक यांच्या काळामध्ये या बँकेने ज्या विविध योजना सुरू केल्या त्यामध्ये " घर बांधणी कर्ज " ही योजना सभासदासाठी देणगीच ठरली. इ. स. १९७६ ते २००० या कालखंडात या योजनेचा बार्शीमधील अनेक मध्यम वर्गीयांनी लाभ घेऊन स्वत:ची घरे बांधली. श्री. सुधाकरपंत परिचारक यांनी खऱ्या अर्थाने बँक बहुजन समाजापर्यंत पोहोचविली. केवळ तारण पाहून कर्जे दिली तर बँक समाजातील तळागळातील लोकांपर्यत पोहोचणार नाही याची जाण सुधाकरपंतांना होती. म्हणूनच त्यांनी तारणाबरोबरच कारणालाही तितकेच महत्व देऊन ग्राहकांवर विश्वास दाखवून वित्तपुरवठा केला. त्यांचा हा विश्वास ग्राहकांनी सार्थ ठरविला. अशा धोरणामुळेच ही बँक लोकाभिमुख झाली. [११२]

बारावीमध्ये मराठी विषयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास " धर्मसिंधूकार बाबामहाराज पाध्ये सुवर्णपदक " बँकेमार्फत दिले जाते. मराठीचे जतन करण्याचा हा या बँकेचा प्रयत्न निश्चितच गौरवास्पद आहे. अर्थकारणाबरोबरच सामाजिक बांधिलकीचे सदैव भान ठेऊन सामाजिक उपक्रम राबविणारी बँक म्हणून या बँकेचा नावलौकीक आहे. ज्या समाजामुळे बँकेला आर्थिक बळकटी मिळाली त्या समाजासाठी ही बँक सामाजिक बांधिलकीचे धोरण सातत्याने राबविते. इ.स. १९७२ च्या दुष्काळामध्ये या बँकेने आपला हीरक महोत्सव साजरा करण्याचे टाळून दुष्काळ निधीस सढळ हाताने मदत पाठविली होती. थोडक्यात, समाजाच्या सुखात स्वत:चे सुख मानणारी ही बँक आहे. इ. स. १९७५-७६ मध्ये गरीब विद्यार्थ्यांना क्रमिक

पुस्तके वाटून समाजसाक्षरतेस प्रोत्साहन दिले. अश्विनी कॅन्सर रिसर्च व रिलीफ सोसायटीने बार्शी येथे कॅन्सर हॉस्पीटलची उभारणी सुरू केली. यासाठी बँकेने तत्कालीन जिल्हाधिकारी श्री. मोहनराव पाटील याच्या हस्ते १ लाख रूपये देणगी दिली. इ. स. २००५ मध्ये भारतामध्ये आलेल्या त्सुनामीवेळी या बँकेने ५ लाख रूपये व आपल्या सर्व सेवकांचा एक दिवसाचा पगार मुख्यमंत्री सहाय्यता निधीस देऊन आपली सामाजिक बांधिलकी जोपासली. कारगिलमध्ये शहीद झालेल्या जवानांच्या नातेवाईकांना ५ लाख रूपये, ओरीसातील वादळग्रस्तासाठी ५ लाख रूपये, सोलापूर मधील दंगलग्रस्तांसाठी २ लाख रूपये दिले. [११३]

बार्शी तालुक्यातील सर्वसामान्य लोकांच्या उन्नतीसाठी या शाखेने लघुउद्योजक, किरकोळ व्यापारी, छोटे व्यावसायिक, व्यापार, स्वयंरोजगार करणारे ग्रामीण कारागिर यांना सतत वित्तपुरवठा केला आहे. महिला मेळावे, आरोग्य शिबीर, कुष्ठरोग्यांना कॅलीपर्स, कुबड्या, पोलीओग्रस्तांना मोफत तीनचाकी सायकली यांचे वाटप केले जाते. कर्करोगग्रस्त, हृदयरोगी असलेल्या असहाय्य रूग्णांना बँकेने आर्थिक सहकार्य केले. सामाजिक बांधिलकी म्हणून सक्षम कर्जदार सोडून या बँकेने केवळ दुर्बल घटकांना २५ टक्के कर्जपुरवठा केला. प्रभावी व कार्यक्षम वसुलीमुळे या शाखेची थकबाकी नाही. बार्शी तालुक्यातील थकबाकी नसणारी ही एकमेव बँक राहिली आहे. या शाखेने प्रथमपासूनच व्यापार व उद्योगधंदयांना कर्जवाटपामध्ये प्राधान्य दिले आहे. कर्जदाराने वेळीच कर्ज भरल्यास त्याला कर्जाच्या व्याजातून २.५ टक्के सूट दिली जाते. या शाखेने बार्शीच्या आडत बाजारामध्ये फार मोठ्या प्रमाणावर कर्जपुरवठा केला आहे. उद्योगधंदयामध्ये प्लॅस्टिक उद्योग, पाईप उद्योग यांना कर्जपुरवठा केला आहे. तालुक्यातील डाळ उद्योगाला सुरूवातीपासूनच या शाखेने मुबलक प्रमाणात वित्तपुरवठा केला आहे. काही तोट्यातील डाळ कारखान्यांना कर्ज देऊन ते सुस्थितीमध्ये आणण्यात या शाखेची महत्वाची भूमिका आहे.[११४]

या बँकेच्या विविध योजनांमध्ये सावली गृहकर्ज योजना, सुहाना सफर वाहन योजना, विविध तारण योजना, स्वावलंबन कर्ज योजना, धन्वंतरी कर्ज योजना, संसार कर्ज योजना, सुवर्ण अलंकार खरेदी कर्ज योजना, शेतकऱ्यांना गोडाऊनमधील मालाच्या पावती तारणावर कर्ज, सोनेतारण कर्ज योजना, बांधकाम व्यावसायिकांसाठी कर्ज योजना अशा विविध योजनांचा समावेश होतो.[११५]

या सर्व योजनांचा बार्शी शाखेतील अनेक ग्राहकांनी लाभ घेऊन आपले जीवनमान उंचावले आहे. शेतकऱ्यांना गोडाऊनमधील त्याच्या मालाच्या तारणावर त्वरीत कर्ज दिल्यामुळे अनेक शेतकऱ्यांचे शेतमालाच्या अस्थिर बाजारभावापासून होणारे नुकसान कमी झाले आहे. स्वावलंबन कर्ज योजनेमुळे बार्शी तालुक्यातील अनेक सुशिक्षीत युवकांना स्वतःच्या पायावर ऊभे राहण्यास मदत झाली. बांधकाम व्यावसायिकांना दिलेल्या कर्जामुळे ग्रामीण भागातील अनेक छोटे बांधकाम व्यावासायिक मोठे झाले

आहेत. या बांधकाम व्यावसायिकांनी या शाखेकडून घेतलेल्या कर्जाच्या माध्यमातून आधुनिक बांधकाम साहित्याची खरेदी करून आपल्या व्यवसायामध्ये आधुनिकता आणली. त्यामुळे त्यांची आर्थिक परिस्थिती वेगाने सुधारली. या सर्व प्रगतीच्या पाठीमागे या शाखेचा निश्चितच वाटा आहे.[११६]

बार्शी तालुक्याच्या आर्थिक विकासामध्ये ' प्राथमिक सहकारी शेती संस्थां ' व ' बँका ' यांचा महत्वाचा वाटा असल्याचे दिसून येते. तालुक्यात स्वातंत्र्यापूर्वी " बार्शी सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक " या बँकेपासून बँकांची सुरूवात झाली. पुढे स्वातंत्र्योत्तर काळामध्ये तालुक्यात सहकारी व सरकारी बँकांचे जाळे तयार झाले. या बँकांनी तालुक्यातील शेतकरी, छोटे-मोठे उद्योग, व्यापार, विविध व्यवसाय यांना वित्त पुरवठा करून त्यांचे आर्थिक जीवनमान उंचाविण्याचा प्रयत्न केला. यातून तालुक्याच्या आद्यौगिक विकासाला गती मिळाली. उद्योजकांना आपल्या उद्योगांच्या विस्तारास प्रोत्साहन मिळाले. यातूनच तालुक्यामध्ये नवनवीन उद्योगांचे आगमन झाले. याचा तालुक्यातील बेकारी कमी होण्यास हातभार लागला. थोडक्यात बँकांनी तालुक्याची औद्यौगिक परंपरा जोपासण्यामध्ये मोलाची भूमिका पार पाडली. शेतकऱ्यांना केलेल्या अर्थपुरवठयामुळे तालुक्यातील कृषी विकासास गती मिळाली. शेतकरी शेतीमध्ये दूरगामी सुधारणा करू शकले. यातूनच तालुक्यामध्ये आधुनिक शेतीस योग्य पार्श्वभूमी तयार झाली. विद्यार्थ्यांना केलेल्या कर्जपुरवठयामुळे दुर्बल आर्थिक परिस्थिती असणाऱ्यांचीही मुले उच्च शिक्षण घेऊन नोकरीस लागली. यातूनच अनेक कुटुंबाची आर्थिक स्थिती सुधारली. बँकांच्या वित्तपुरवठयामुळे अनेक छोटया व्यावसायिकांचे मोठ्या व्यावसायिकांमध्ये रूपांतर होण्यास मदत झाली. यातूनच तालुक्याच्या आर्थिक विकासाची पायाभरणी झाली. बार्शी तालुक्यात गावोगावी असणाऱ्या " प्राथमिक सहकारी शेती संस्थांनी " शेतकऱ्यांना पीककर्जाच्या माध्यमातून तात्काळ अल्प व्याजदराने मोठ्या प्रमाणावर वित्तपुरवठा केला आहे. त्यामुळे बऱ्याच प्रमाणात ग्रामीण भागातील शेतकऱ्यांची सावकाराच्या तावडीतून सुटका झाली आहे. शिवाय शेती विकासाला प्रोत्साहन मिळाले. यातून शेतकऱ्याकडे मुबलक पैस आला. त्यामुळे त्यांच्या मुलांना शिक्षण घेता आले. तसेच शेतकऱ्यांच्या जीवनातील विविध प्रासंगिक गरजा पूर्ण होण्यास मदत झाली. यातून शेतकऱ्यांना त्यांच्या कौटुंबिक प्रगतिची नवी दालने खुली झाली आहेत. यामुळेच बँका व प्राथमिक सहकारी शेती संस्था यांना बार्शी तालुक्याच्या आर्थिक जीवनात महत्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. एवढेच नव्हे तर, तालुक्याच्या आर्थिक विकासाला गती मिळाल्याचे दिसून येते.

संदर्भ साधने

१) सहस्त्रबुध्दे. व. ग, भारताची ग्रामीण अर्थव्यवस्था, पृ. १०० ते १०४.

२) महाराष्ट्र राज्य गॅझेटियर, लातूर जिल्हा, पृ. ४५०, ४५१.

३) महाराष्ट्र राज्य दर्शनिका, सातारा जिल्हा, पृ. ४६४.

४) गॅझेटियर ऑफ बॉम्बे प्रेसिडेसी, सोलापूर जिल्हा, पृ. २३१, २३२.

५) सामाजिक-आर्थिक विवेचन, सोलापूर जिल्हा, इ. स. १९६१-६२, पृ. ७५.

६) कित्ता, सन १९७०-७१, पृ. ८८, ८९.

७) कित्ता, सन १९९०-९१, पृ. १२८.

८) मुंबई सावकार अधिनियम १९४६, (डिसेंबर २००५ पर्यंत सुधारीत) पृ. १.

९) महाराष्ट्र स्टेट गॅझेटियर, सोलापूर जिल्हा, इ. स. १९७७, पृ. ४४५.

१०) मुंबई सावकार अधिनियम १९४६, पृ. ७ ते २३.

११) शेजवलकर. प्र. चिं., सहकारी संस्थांची व्यवस्था व चिटणिसाची कामे, पृ. २

१२) मोरे. शं. शां., सहकारी कायदा १९६०, गो. य. राणे प्रकाशन पुणे, इ. स. १९६४, पृ. ६.

१३) पन्नालाल सुराणा, लोकशाही समाजवाद व सहकारी चळवळ, पृ. ३५, ३६.

१४) सहकारी महाराष्ट्र रौप्य महोत्सवी वर्ष विशेषांक, नोव्हेंबर १९८६, पृ. १.

१५) दोशी. आर. टी., सहकाराचे सिंध्दांत, ३० जून १९७१, पृ. ४.

१६) सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, सुवर्ण महोत्सव स्मृतिग्रंथ, सप्टेंबर १९६८, पृ. २.

१७) देशपांडे. कृ .भा., सहकारी संस्थांची कार्यपध्दती , तिसरी आवृत्ती, पृ. ५, ६.

१८) शतकोत्तर सहकार, मे २००४. पृ. १०

१९) भागवत. ल. के., शेतकी पतपेढी, इ. स. १९३०, पृ. ६.

२०) शतकोत्तर सहकार, मे २००४. पृ. २, ३.

२१) कित्ता, पृ. ११, १२.

२२) देशपांडे. कृ .भा., पूर्वोक्त, पृ. ७.

२३) मोरे. शं. शां., पूर्वोक्त, पृ. ८, ९.

२४) भागवत. ल. के., पूर्वोक्त, पृ. २३, २४.

२५) महाराष्ट्र स्टेट गॅझेटियर, सोलापूर जिल्हा, इ. स. १९७७, पृ. ४४६.

२६) सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, सुवर्ण महोत्सव स्मृतिग्रंथ, सप्टेंबर १९६८, पृ. ११.

२७) महाराष्ट्र स्टेट गॅझेटियर,सोलापूर जिल्हा, इ. स. १९७७, पृ. ६४९.

२८) शतकोत्तर सहकार, मे २००४. पृ. १२.

२९) भिडे. वि. शि., सहकारी पतपेढयांचा कारभार, जुलै १९३६, पृ. २, ३.

३०) देशपांडे. कृ .भा., पूर्वोक्त, पृ. ११८.

३१) भागवत. ल. के., पूर्वोक्त, पृ. १२.

३२) देशपांडे. कृ .भा., पूर्वोक्त, पृ. ३७ ते ४०.

३३) घाणेकर विद्या, सहकार-मित्र, इ. स. १९७०, पृ. ३६.

३४) देशपांडे. कृ .भा., पूर्वोक्त, पृ. ३७ ते ४२.

३५) काळे. गो. र., बार्शी सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि. व बार्शी तालुक्यातील सहकारी पतपेढयांचा इतिहास, पृ. १, २.

३६) कित्ता, पृ. १४८.

३७) सामाजिक-आर्थिक विवेचन, सोलापूर जिल्हा, इ. स. १९५८-५९, पृ. ४२.

३८) कित्ता, इ.स. १९६१-६२, पृ. ६६.

३९) कित्ता, इ. स. १९६४-६५, पृ. ९५.

४०) सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था कार्यालय बार्शी, सहकारी संस्थांची यादी.

४१) सामाजिक-आर्थिक विवेचन, सोलापूर जिल्हा, इ. स. १९९०-९१, पृ. ११०.

४२) भारताची जनगणना , जिल्हा जनगणना हस्तपुस्तिका, सोलापूर, इ. स. १९९१, पृ. ६,१४.

४३) काळे. गो. र., पूर्वोक्त, पृ. ७४, ७५.

४४) कित्ता, पृ. ७७, ९८.

४५) कित्ता, पृ. १०५, १०६.

४६) मुलाखत, चंद्रकांत नाना निंबाळकर, माजी आमदार वैराग-मोहोळ.

४७) काळे. गो. र., पूर्वोक्त, पृ. ७८.

४८) कित्ता, पृ. ८०, ८१.

४९) देशपांडे. कृ. भा, सहकार-विकास, २३ ऑक्टोबर १९६६, पृ. ५५.

५०) काळे. गो. र., पूर्वोक्त, पृ. ७९ ते ८२.

५१) कित्ता, पृ. ८२, ८३.

५२) कित्ता, पृ. ८६ ते ९७.

५३) कृषी ऊत्पन्न बाजार समिती बार्शी, वार्षिकअहवाल, इ. स. १९५४-५५, पृ. २०.

५४) कित्ता, इ. स. १९६२-६३, पृ. १२.

५५) कित्ता, इ. स. १९६३-६४, पृ. ११, १२.

५६) कित्ता, इ. स. १९५८-५९, पृ. २०,२१.

५७) कामत. गो. स., बँकिंग-तत्व आणि व्यवहार, पृ. ३ ते ५.

५८) कोळी पी. ए., प्रा. व्हटकर पी. आर., सहकारी बँकिंग, ११ आक्टोबर १९७८, पृ. ६, ७.

५९) साबळे व पहूरकर, अधिकोषण व ग्रामीण विकास, ४ आक्टोबर १९८४, पृ. १, २, ४.

६०) कामत. गो. स., पूर्वोक्त, पृ. ६.

६१) साबळे व पहूरकर, पूर्वोक्त, पृ. १०६, १०७.

६२) कृषी ऊत्पन्न बाजार समिती बार्शी, वार्षिकअहवाल, इ. स. १९८९-९०, पृ. ७.

६३) बँक ऑफ इंडिया, सोलापूर विभाग दिनदर्शिका.

६४) मुलाखत, श्री. कावडे अशोक, शाखा प्रबंधक, बँक ऑफ इंडिया, शाखा बार्शी.

६५) प्रश्नावलीच्या आधारे मिळालेली माहिती.

६६) डॉ. कुरूलकर. र. पू, बँकिंगची तत्वे आणि बँकिंग पध्दती, एप्रिल १९७९, पृ. ४१२, ४१३.

६७) प्रश्नावलीच्या आधारे मिळालेली माहिती.

६८) मुलाखत, श्री. धनंजय होनमाने, विपणन व वसूली अधिकारी, स्टेट बँक ऑफ इंडिया, बार्शी.

६९) मुलाखत, श्री. हारूण सय्यद, सहाय्यक, स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा सुभाष नगर बार्शी.

७०) स्टेट बँक ऑफ इंडिया, वार्षिक अहवाल, सन २०११-१२, पृ. ८४.

७१) कित्ता, पृ. ८४, ८६, ८८.

७२) मुलाखत, श्री. भिमराव मन्मथ कोरे, शाखाधिकारी, सेंट्रल बँक ऑफ इंडिया, शाखा बार्शी.

७३) प्रश्नावलीच्या आधारे मिळालेली माहिती.

७४) रजत महोत्सव वर्षपूर्ती सोहळा पत्रीका.

७५) प्रश्नावलीच्या आधारे मिळालेली माहिती.

७६) मुलाखत, श्री. डांगे. एन. के , शाखा प्रबंधक, युनियन बँक ऑफ इंडिया, शाखा बार्शी.

७७) मुलाखत, श्री. गायकवाड अशोक लक्ष्मण, शाखाप्रबंधक, बँक ऑफ महाराष्ट्र, शाखा बार्शी.

७८) बँक ऑफ महाराष्ट्र, हस्तपुस्तीका, पृ. ५, ६.

७९) मुलाखत, श्री. गायकवाड अशोक लक्ष्मण, शाखाप्रबंधक, बँक ऑफ महाराष्ट्र, शाखा बार्शी.

८०) कृषी उत्पन्न बाजार समिती बार्शी, वार्षिक अहवाल १९६१-६२ ते १९८५-८६.

८१) शतकोत्तर सहकार, मे २००४. पृ. १२६.

८२) स्मृतिग्रंथ, बार्शी सेंट्रल को- ऑपरेटिव्ह बँक, इ. स. १९८२, पृ. ६.

८३) काळे. गो. र., पूर्वोक्त, पृ. १५, १६.

८४) कित्ता, पृ. १८, २०, २२.

८५) स्मृतिग्रंथ, बार्शी सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक, इ. स. १९८२, पृ. ६, ७, ८.

८६) कित्ता, पृ. ९ ते १२.

८७) शतकोत्तर सहकार, मे २००४. पृ. १३०, १३१.

८८) स्मृतिग्रंथ, बार्शी सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक, इ. स. १९८२, पृ. २२, २३, २४.

८९) कित्ता, पृ. ९६, ९७.

९०) देशपांडे. कृ .भा., पूर्वोक्त, पृ. १२६, १२७.

९१) सहकारी महाराष्ट्र रौप्य महोत्सवी वर्ष विशेषांक, नोव्हेंबर १९८६, पृ. १५९.

९२) सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, सुवर्ण महोत्सव स्मृतिग्रंथ,सप्टेंबर १९६८, पृ. १२ ते १९

९३) सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, वार्षिक अहवाल, इ. स. १९९९-२०००, पृ. ११, १२.

९४) सहकारी महाराष्ट्र, रौप्य महोत्सवी वर्ष, नोव्हेंबर १९८६, पृ. ८४.

९५) सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, सुवर्ण महोत्सव स्मृतिग्रंथ, सप्टेंबर १९६८, पृ. १४ ते १७

९६) कित्ता, पृ. २५, २७.

९७) सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, हीरक महोत्सव स्मृतिग्रंथ, इ. स. १९७९.

९८) सामाजिक आर्थिक विवेचन, सोलापूर जिल्हा, इ. स. १९५८-५९, पृ. ४१.

९९) मुलाखत, श्री. राजेश उंबरदंड, शाखाधिकारी, बार्शी प्रधान शाखा, मार्केट यार्ड शाखा बार्शी.

१००) मुलाखत, श्री. ना. दिलिपरावजी सोपल, माजी चेअरमन, सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक.

१०१) सहकारी महाराष्ट्र, रौप्य महोत्सवी वर्ष, नोव्हेंबर १९८६, पृ. ४८.

१०२) दैनिक लोकमत, शुक्रवार दि २१ डिसेंबर २०१२.

१०३) मुलाखत, महावीर चौगुले, शाखा प्रबंधक, सांगली नागरी सहकारी बँक, शाखा बार्शी.

१०४) सांगली नागरी सहकारी बँक, वार्षिक अहवाल, सन २०१०-११, पृ. १२, २७.

१०५) मुलाखत, महावीर चौगुले, शाखा प्रबंधक, सांगली नागरी सहकारी बँक, शाखा बार्शी.

१०६) प्रश्नावलीच्या आधारे मिळालेली माहिती.

१०७) सोलापूर जनता सहकारी बँक, वार्षिक अहवाल, इ. स. २०१२-१३, पृ. ५.

१०८) मुलाखत, श्री. अनिल रोहीनकर, शाखाधिकारी, सोलापूर जनता सहकारी बँक, शाखा बार्शी.

१०९) मंगनाळे व्ही. एस्.,२१ व्या शतकातील सहकारी बँकेसमोरील आव्हाने, जून २००१, पृ. १०७.

११०) सोलापूर जनता सहकारी बँक, वार्षिक अहवाल, इ. स. २०१२-१३, पृ. ७, ८.

१११) शतार्थश्री, शताब्दी गौरव गाथा, पंढरपूर नागरी सहकारी बँक, पृ. २७.

११२) कित्ता, पृ. ५६, ५७, ५८.

११३) कित्ता, पृ. ६०, ६४, ६५, ६६.

११४) प्रश्नावलीच्या आधारे मिळालेली माहिती.

११५) वार्षिक अहवाल, पंढरपूर नागरी सहकारी बँक, इ. स. २०१०-११, पृ. १८.

११६) मुलाखत, श्री. विवेक चिंतलवार, शाखाधिकारी, पंढरपूर नागरी सहकारी बँक, शाखा बार्शी.

प्रकरण पाचवे

औद्योगिक विकास

अ. क्र	घटक
५.१	प्रस्तावना
५.२	बार्शी बाजारपेठ
५.३	**बार्शी तालुक्याचा दळणवळण विकास**
	५.३.१ रस्ते विकास
	५.३.२ रेल्वे विकास
५.४	**बार्शी तालुक्यातील प्रमुख उद्योगधंदे**
	५.४.१ डाळ उद्योग
	५.४.२ सूत व कापड उद्योग
	५.४.२.१ लोकमान्य सूत गिरणी
	५.४.२.२ जय शंकर सूत गिरणी
	५.४.२.३ राजन कापड व सूत गिरणी
	५.४.३ साखर उद्योग
	५.४.३.१ भोगावती सहकारी साखर कारखाना
	५.४.४ तेल उद्योग
५.५	**बार्शी तालुक्यातील इतर उद्योगधंदे**
५.६	**आद्योगिक वसाहत**

५.१. प्रस्तावना,

आपल्या देशातील आर्थिक प्रश्न खूप गुंतागुंतीचे आहेत. त्यापैकी काही प्रश्न आपल्या जीवनाशी निगडीत असून त्यांचा सखोल विचार न केल्यास भारताची अर्थव्यवस्था कोलमडल्याशिवाय राहणार नाही. भारत हा खेडयांचा देश असून त्यात राहणारी बहुसंख्य जनता शेतकरी वर्ग आहे. त्यामुळे खेडयांची सुधारणा म्हणजेच देशाची सुधारणा असे म्हणणे अतिशयोक्ती ठरणार नाही. प्रचंड वाढणाऱ्या लोकसंख्येमुळे शेतीचे लहान-लहान तुकडे झाले. शिवाय सततचा लहरी पाऊस यामुळे शेतीतून होणारा फायदा कमी झाला. भारतात ७० टक्के लोक शेतीवर अवलंबून आहेत. त्यामुळे शेतीवरील ताण प्रचंड वाढला आहे. यासाठी आधुनिक पध्दतीने शेती करण्याच्या योजना आखल्या पाहिजे. शिवाय शेतकी योजना व औद्योगिक योजना यांची परस्पर सांगड घालून त्या एकमेकांना पूरक होतील अशा आखल्या पाहिजेत. सध्या पूर्वीची बलुतेदारी पध्दत विस्कळीत होऊन ते लोक कामधंदयासाठी शहराकडे धाव घेत आहेत. मात्र त्यांना तेथेही काम मिळत नाही. थोडक्यात भारतात मजूरांची संख्या खूप आहे मात्र उद्योगधंदयांचा अभाव आहे. पाश्चिमात्य देशात याच्या उलट परिस्थिती आहे. त्यामुळेच भारताने आखलेल्या पंचवार्षिक योजनेमध्ये मजूरांना कामधंदा मिळवून देणे ही बाब सामाविष्ट केली. तसेच ग्रामोद्योगाला प्रोत्साहन दिले. इ. स. १९५५ मध्ये प्रा. डी. जी कर्वे यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने एकंदर २६ ग्रामोद्योगांना मान्यता दिली. यामध्ये हातमाग, कापड, तेलघाणी, लोकर विणकाम, कातडी काम, गूळ व खांडसरी, मधुमक्षिका पालन अशा विविध उद्योगांचा समावेश होतो.[१]

सोलापूर जिल्हा महाराष्ट्रातील एक औद्योगिकदृष्टया विकसित झालेला जिल्हा आहे. कापूस व साखर उद्योगासाठी हा जिल्हा विशेष प्रसिध्द आहे. रेल्वेमुळेच खऱ्या अर्थाने या जिल्ह्याच्या औद्योगिक विकासाला चालना मिळाली. इ. स. १९९० अखेर सोलापूर जिल्ह्यामध्ये ' बार्शी ' व ' सोलापूर ' याच ठिकाणी औद्योगिक वसाहती होत्या. याच्या माध्यमातून हजारो लोकांना रोजगार मिळाला आहे. ' तूरडाळ उद्योग ' व ' तेल उद्योग ' हे या जिल्ह्यातील महत्वाचे लघु उद्योग आहेत. जिल्ह्यामध्ये प्रामुख्याने बार्शी , करमाळा व सांगोला या तालुक्यांमध्ये या उद्योगांचे केंद्रीकरण झालेले आढळते. यामध्ये बार्शी तालुका आघाडीवर आहे. येथे तूरडाळीचे फार मोठ्या प्रमाणावर उत्पादन घेतले जाते. ही तूरडाळ संपूर्ण भारतात फार मोठ्या प्रमाणात निर्यात केली जाते.[२]

इ. स. १९५१ च्या जणगणनेनुसार सोलापूर जिल्ह्याचे एकूण ५ ग्रामीण विभाग होते. यापैकी पहिल्या विभागामध्ये बार्शी व उत्तर सोलापूर या दोन तालुक्यांचा समावेश होता. या विभागामध्ये एकूण ६८९४ लोक विविध उद्योगांशी निगडीत होते. यापैकी ६७८ मालक तर २६९१ कामगार होते. तर जिल्ह्याच्या एकूण ४ शहरी विभागांपैकी दुसऱ्या विभागामध्ये बार्शीसह अक्कलकोट व उत्तर सोलापूर या

शहरांचा समावेश होता. या विभागामध्ये एकूण १८,०४७ लोक विविध उद्योगांशी निगडित होते. यामध्ये १७७० मालक, तर १०,५२० कामगार होते.[३]

१९ व्या शतकामध्ये सोलापूर जिल्ह्याच्या औद्योगिकीकरणास सुरूवात झाली. इ. स. १८७० मध्ये सोलापूर जिल्ह्यामध्ये रेल्वे आली. इ. स. १८७७ मध्ये टेक्सटाईल मिलची स्थापना व एकरूख तलावाची निर्मिती झाली. या तीन गोष्टीमुळे जिल्ह्याच्या औद्योगिक विकासाला चालना मिळाली. इ. स. १९६१ अखेर सोलापूर जिल्ह्यामध्ये ३५ मोठे उद्योग होते. यामुळेच त्यावेळी औद्योगिकदृष्टया सोलापूर जिल्ह्याचा महाराष्ट्रामध्ये तिसरा क्रमांक होता. असे असले तरी जिल्ह्यातील बहुसंख्य लोक ग्रामीण भागामध्ये विविध लघु उद्योगांमध्ये गुंतलेले होते. हे उद्योग ग्रामीण अर्थव्यवस्थेचे महत्वाचे अंग होते. याच्या माध्यमातूनच ग्रामीण भागातील बहुसंख्य लोकांना रोजगार मिळून त्यांच्या बहुसंख्य गरजा स्थानिक पातळीवरच पूर्ण होत. त्यावेळी जिल्ह्यामध्ये कापडाच्या मोठ्या ८ गिरण्या होत्या. पैकी ३ बार्शीमध्ये होत्या.[४] कर्नाटक आणि हैद्राबाद या प्रदेशासाठी व्यापाराच्या दृष्टीने सोलापूर हे एक महत्वाचे व सोयीचे व्यापारी केंद्र होते. पुढे ते औद्योगिक केंद्र बनले. सोलापूरमधील पहिली कापड गिरणी इ. स. १८७४ मध्ये मुंबईच्या शेठ मोरारजी गोकुळदास यांनी सुरू केली. सोलापूर विभागातील ' बार्शी ' हे एक कापड उद्योगाचे मुख्य ठिकाण होते.[५]

बार्शी येथील ' गुजरात ऑईल मिल ' या तेल कारखाण्यातून तेलाचे व पेंडीचे फार मोठ्या प्रमाणामध्ये उत्पादन घेतले जात होते. इ. स. १९६१ अखेर जिल्ह्यामध्ये २८० नोंदणीकृत लघु उद्योग होते. यातून ७ हजारांपेक्षा जास्त लोकांना रोजगार मिळाला होता. या लघु उद्योगामध्ये डाळ उद्योग, तेल उद्योग, विडी उद्योग, लोखंडी अवजारे बनविण्याचा उद्योग, कापड उद्योग, वाहन दुरूस्ती उद्योग यासारख्या विविध उद्योगांचा समावेश होता. बार्शी येथे हातमाग व यंत्रमाग उद्योगामुळे कपडयांना रंग देण्याचा उद्योग मोठ्या प्रमाणावर सुरू झाला. विडी उद्योगाचे जिल्ह्यामध्ये २७ गट कार्यरत होते. याशिवाय बार्शी येथे कापडावर छपाई करण्याचाही उद्योग मोठ्या प्रमाणावर चालत होता. जिल्ह्यातील बार्शी व सांगोला या ठिकाणी लोकरीपासून घोंगडी बनविण्याचाही व्यवसाय मोठ्या प्रमाणावर चालत होता.[६] इ. स. १९९१ अखेर तालुक्यातील लघु उद्योगात २३४२ तर इतर उत्पादन प्रक्रिया उद्योगामध्ये ६६२४ कामगार कार्यरत होते.[७]

बार्शी तालुका स्वस्ताईचे माहेरघर म्हणून ओळखला जातो. पूर्वीपासूनच बार्शी ही मराठवाड्याची प्रमुख बाजारपेठ होती. यामुळेच ब्रिटिशांनी बार्शीला रेल्वे सुरू केली. त्यामुळे बार्शीचे औद्योगिक महत्व खूपच वाढले. कापसाची आवक मोठ्या प्रमाणात होत असल्यामुळे बार्शीमध्ये जिनिंग व प्रेसिंगचे कारखाने सुरू झाले. यातूनच पुढे सूत गिरण्या सुरू झाल्या. पुढे आद्यौगिक वसाहत झाली. इ. स. १९८७ नंतर या औद्योगिक वसाहतीची सूत्रे आमदार दिलीप सोपल यांच्या हातात आली. त्यांच्या कौशल्यापूर्ण नेतृत्वामुळे व सहकार्यामुळे बार्शीचे आद्यौगिकीकरण झपाट्याने झाले. एका वसाहतीच्या तीन वसाहती झाल्या.

पीव्हीसी पाईपच्या उत्पादनात महाराष्ट्रामध्ये जळगावनंतर बार्शीचा क्रमांक लागतो. या पीव्हीसी पाईप उद्योगामध्ये खांडवीकर, माढेकर, संघवी, कांकरीया हे उद्योजक अग्रेसर होते.[८]

५.२. बार्शी बाजारपेठ

' बार्शी ' हे जिल्ह्यातील मोक्याचे व्यापारी ठिकाण होते. हे निजामाच्या सरहद्दीवरील ठिकाण असल्याने निजामाच्या राज्यातील सर्व प्रकारच्या मालाची देवाणघेवाण बार्शीमार्गेच होत असे. बार्शी आणि सोलापूर ही जिल्ह्याची दोन टोके असल्यामुळे त्यांचा व्यापार जिल्ह्यासह जिल्ह्याबाहेरील भागाशी मोठ्या प्रमाणावर होता. अंतर्गत व्यापारासाठी बार्शी हे जिल्ह्यातील सर्वात मोठे केंद्र होते. तर बार्शी तालुक्यातील ' वैराग ' हे दुय्यम व्यापारी केंद्र होते. व्यापारी केंद्र, आठवडी बाजार, जत्रा, खेडयांतील दुकाने आणि फेरीवाले हे आयात माल विकण्याचे व निर्यात माल गोळा करण्याचे मोठे साधन मानले जाते. या ठिकाणी वार्षिक सरासरी ३६ लाख रूपयाचा कापूस तर ८ लाख रूपयापर्यंत तेलबियांची उलाढाल होत असे. बार्शीमध्ये तयार होणाऱ्या हळदीच्या निर्यातीतून वार्षिक सरासरी २ लाख रूपयांची उलाढाल होत असे. कॉटन, विविध प्रकारच्या तेलबिया यांची निर्यात करणारे निर्यातदार हे मुंबईचे होते. हे लोक १ हजार रूपयांपर्यंतचे व्यवहार मुंबईमधूनच आपल्या मध्यस्थामार्फत करत. यापेक्षा मोठ्या स्वरूपाचा व्यवहार करण्यासाठी ते आपल्या कारकुनाला पाठवत. बार्शी येथे मुंबईचे व स्थानिक व्यापारी सोडून ' रॅली ब्रदर्स ' व ' गॅड्डम बॅथेल ' या युरोपीय व्यापारी संस्था कार्यरत होत्या. यावरून असे लक्षात येते की, बार्शीच्या व्यापारी पेठेने केवळ देशातीलच नव्हे, तर परदेशातील व्यापाऱ्यांनाही आकर्षित केले होते. या संस्था कापूस व जवस यांचा मोठ्या प्रमाणात व्यापार करत. स्थानिक दलालांचा या व्यापारावर खूप प्रभाव होता. तालुक्यातील दलाल प्रामुख्याने ब्राह्मण, वाणी, मारवाडी होते. यांच्याकडे भांडवल कमी होते. मात्र त्यांची सावकाराकडील पत चांगली होती. याच आधारावर ते आपला व्यवसाय करत असत. आजही या पेठेवर त्यांचेच वर्चस्व आहे. येथील सोनार त्यांच्या कौशल्यामुळे खूप प्रसिध्द होते. या ठिकाणच्या तांबटकरी व कासार या लोकांचा तांबे आणि पितळी भांडी बनविण्याचा व्यवसाय तेजीत होता. हे लोक मुंबईवरून तांबे आणि पितळ खरेदी करत. येथील पाथरवट व गवंडी कौशल्यपूर्ण कामासाठी ओळखले जात होते. पाथरवटाची दिवसाची कमाई ८ ते १४ आणे होती, तर गवंडयाची १२ आणे ते १ रूपये इतकी होती. बार्शीच्या सूतारांचा चांगला नावलौकीक होता. हे लोक मुंबई व पुणे येथून चंदन तसेच विविध प्रकारचे लाकूड आणत. हे लोक दिवसाला ८ आणे मिळवत. बहुतांशी खेडयांमध्ये सूतार लोकच सूतारकीचा व्यवसाय करत. अपवादात्मक परिस्थितीमध्ये काही इतर शिकाऊ लोक हे काम करत. [९]

बार्शी तालुक्यामध्ये विविध प्रकारच्या तेलबियाचे मोठे उत्पादन घेतले जात होते. बार्शी व सोलापूरच्या लिंगायत, कोमटी, गुजर मारवाडी यांच्यामार्फत ते मुंबईला पाठविले जात. येथे बैलगाडया बनविण्याचा व्यवसाय फार तेजीत होता. येथील बैलगाडयांना संपूर्ण जिल्ह्यातून मोठी मागणी असायची. येथील साळी, कोष्टी जमातीचे लोक कापड विणण्याचा उद्योग फार मोठ्या प्रमाणात करत होते. सोलापूरसारखी सुस्थिती नसतानाही मोहोळ व माढ्यापेक्षा बार्शी ही मोठी बाजारपेठ होती. बार्शी व वैराग ही भरभराटीस आलेली दख्खनची दोन मोठी शहरे होती. इ. स. १८१८ मध्ये बार्शी हा विभाग ब्रिटिशांच्या अधिपत्त्याखाली गेला. त्यावेळी सोलापूरच्या इतर कोणत्याही उपविभागापेक्षा ' बार्शी ' हा उपविभाग खूप जास्त भरभराटीस आला होता. इ. स. १८५९-६० मध्ये पेनुसूला रेल्वे सुरू होण्यापूर्वी पनवेल येथून मीठ आयात केले जायचे. बार्शीमधून पनवेल येथे कापूस घेऊन गेलेल्या गाडया परत येताना मीठ घेऊन येत. सरासरी वार्षिक ७५०० टन मीठ आयात केले जायचे. ब्रिटिश साम्राज्याच्या सुरूवातीला बार्शी या उपविभागातील ' वैराग ' हे एक महत्वाचे व्यापारी केंद्र होते. वैरागमध्ये प्रामुख्याने लिंगायत समाजाचे लोक व्यापारामध्ये गुंतलेले होते. ते प्रामुख्याने निजामाच्या प्रदेशामध्ये मालाची निर्यात करत. याचबरोबर पुणे व सोलापूर येथेही माल पाठवत. वैरागमुळे बार्शीच नव्हे तर सोलापूरचाही व्यापार कमी झाला होता. इ. स. १८२० मध्ये बार्शीचा एक तृतियांश तेलाचा व्यापार कमी झाला होता.[१०]

५.३. बार्शी तालुक्यातील दळणवळण विकास

कोणत्याही देशाचा आर्थिक विकास व औद्योगिक यश प्रभावी दळणळवणावर अवलंबून असते. दळणळवणाच्या विकासामुळेच आज जग लहान झाले आहे असे मानले जाते. दळणळवणामुळे आचार विचारांची देवाणघेवाण होऊन सांस्कृतिक विकास होण्यास मदत होते. वस्तू वितरण सुलभ होते. प्रभावी दळणवळणामुळेच सुरक्षिताता व सुव्यवस्था राखण्यास मदत होते. दुष्काळ, पूर, भूकंप अशा विविध नैसर्गिक संकटांचा प्रभावी मुकाबला करता येतो. शेतमालाला योग्य किंमत मिळते. विकासाच्या संधी उपलब्ध होतात. नाशवंत वस्तूंची उपयोगिता वाढते, बेकारी कमी होण्यास मदत होते, प्रादेशिक विकासाचा समतोल राखण्यात मदत होते. निसर्ग संपत्तीचा पुरेपूर उपयोग करता येतो असे कितीतरी फायदे प्रभावी दळणळवणामुळे होतात. भारतातील सुमारे ८० टक्के लोक ग्रामीण भागामध्ये वास्तव्य करतात. त्यांचा शेती हा प्रमुख व्यवसाय असल्यामुळे या व्यवसायाच्या विकासाकरिता रस्ते अनिवार्य आहेत. कौटिल्याच्या अर्थशास्त्रात ग्रामीण भागातील रस्त्याचे महत्व विशद केले आहे. हडप्पा व मोहेंजोदडो येथील उत्खननातही सुव्यवस्थित बांधणी केलेले रस्ते आढळले. यावरून प्राचीन काळापासून असलेले ग्रामीण रस्त्याचे महत्व आपल्या लक्षात येईल.[११]

वाहतुकीच्या साधनाशिवाय उद्योगधंदयाचा विकास होणे कठीण आहे. उद्योगांना लागणाऱ्या सर्व गोष्टी एकाच ठिकाणी सापडणे जवळ जवळ अशक्य असते. त्यामुळे या गोष्टी इतर ठिकाणांहून आणणे भाग पडते. हे सर्व प्रभावी वाहतुकीच्या साधनांवर अवलंबून आहे. त्याचबरोबर तेथे तयार झालेल पक्का माल शक्य तितक्या लवकर बाजारपेठांमध्ये पोहचविणे आवश्यक असते. त्याचबराबर मोठ्या कारखान्यांना लागणारी कामगारांची संख्या मोठी असते. या सर्वांना कारखान्याच्या परिसरामध्ये राहण्यासाठी जागा मिळणे अशक्य असते. त्यामुळे वाहतुकीला पर्यायच उरत नाही. यावरून आपल्या लक्षात येईल की वाहतूक व उद्योगधंदे यांचा किती घनिष्ट संबंध आहे. त्यामुळेच सरकारने दळणवळणाच्या विकासावर वेळोवेळी विपूल प्रमाणात खर्च केला आहे.[१२] दळणवळणाची उपलब्धता हाच उद्योगधंदे व इतर आर्थिक व्यवहार यांच्या स्थानिकीकरणामध्ये सर्वात महत्वाचा घटक ठरतो. याचे उत्तम उदाहरण म्हणजे मुंबई व कलकत्ता ही शहरे होय. या दोन्ही शहरांमध्ये स्थल व जल वाहतुकीच्या सोयी मुबलक प्रमाणात उपलब्ध आहेत. त्यामुळे या ठिकाणी उद्योगधंदयाची फार मोठ्या प्रमाणामध्ये वाढ झाली. प्रादेशिक विकासातही दळणवळण महत्वाची भूमिका पार पाडते.

५.३.१ रस्ते विकास

सडकांची तुलना मानवी शरीरातील रक्तवाहिन्यांशी केली जाते. आधुनिक समाजाच्या जीवनाचा सडक हा अविभाज्य घटक आहे. कृषी, उद्योग, व्यापार, प्रवास अशा विविध दृष्टीने सडका फारच महत्वाच्या मानल्या जातात. कृषी विकास व सडका यासंदर्भात व्ही. व्ही. रामनाथन यांनी म्हटले आहे की, " सैन्याची शक्ती जर त्यांच्या पायात आहे असे म्हणने संयुक्तिक असेल तर, आपल्या शेतीची शक्ती सडकामध्ये सामावलेली आहे असे म्हणने आणखी संयुक्तिक ठरेल " म्हणूनच ग्रामीण विकासाच्या सर्व योजना सडकांच्या विकासाशी निगडित आहेत असे म्हटले जाते. सडक निर्मितीचे कार्य हजारो वर्षांपासून सुरू असले तरी ते शास्त्रीय पध्दतीने कसे करावे हे शोधण्याचे श्रेय इ. स. १७५०-१८३५ या कालखंडातील ' थॉमस टॅलफोर्ड ' व ' मॅकॲडम ' या दोन इंग्रजांना जाते. थॉमस टॅलफोड याने एक तरंगता पूल व रस्ता बांधून दाखविला. तर मॅकॲडमने सडकेचा पृष्ठभाग एखाद्याजलरोधक पदार्थापासून तयार करावा असे प्रतिपादन केले. [१३]

इ. स. १८५५ नंतर सोलापूर जिल्ह्यामधील रस्त्यांच्या स्थितीमध्ये हळूहळू बदल होऊ लागले. या काळामध्ये सोलापूरमध्ये मुख्य रस्ते नव्हते. बैलगाडीसाठी बनविलेले रस्ते होते. हे रस्ते काळया मातीचे असल्याने पावसाळयात खराब होत असत. त्या काळामध्ये ' पंढरपूर ' हे ठिकाण आठ रस्ते मार्गांनी जोडलेले होते. यात पंढरपूरपासून उत्तर-पूर्वेकडे ५७ मैलावर मोहोळ, वैराग, पानगाव मार्गे बार्शी हे ठिकाण

जोडले होते. या आठ मार्गांपैकी दोन मार्ग बार्शी तालुक्यातील पानगावमधून जात होते. कालांतराने स्थानिक निधीतून सोलापूरमध्ये ७ रस्ते बनविण्यात आले. यापैकी ४ रस्ते प्रथम श्रेणीचे होते. त्यात बार्शी-पंढरपूर रस्त्याचा समावेश होता. द्वितीय श्रेणीचे ३ रस्ते बनविण्यात आले. त्यात बार्शी-सोलापूर हा २० मैलाचा रस्ता होता. इ. स. १८५६ मध्ये मुंबईच्या १४ व्या स्थानिक पायदळाचा ' कॅप्टन ह्युजटन ' याने बार्शीतून पूर्व-पश्चिम असणारा ३५ मैलाचा रस्ता बनविला होता. हा रस्ता मुरूमाचा होता. बार्शी-टेंभूर्णी रस्त्यावरील रहदारी वाढल्यामुळे हा मुरूमाचा रस्ता सतत खराब होत असे. इ. स. १८५९-६० मध्ये ' दि ग्रेट इंडियन पेनुसुला ' रेल्वेमार्गामुळे या मार्गावरील वाहतूक प्रचंड वाढली. त्यामुळे बार्शी ते कुर्डूवाडी हा रस्ता निजामाच्या प्रदेशाकडे जाताना एक महत्वाचा रहदारीचा रस्ता बनला. पुढे बालाघाटच्या डोंगररांगामधून मराठवाड्याकडे जाणारा मार्ग बनविण्यात आला. या मार्गाने कापूस, बाजरी, गहू यांची दिवसाला ५०० बैलगाडया इतकी वाहतूक होत असे. इ. स. १८८१-८२ मध्ये या रस्त्यावरील जकात नाक्याना मिळणारी जकात १७,००० इतकी होती. इ. स. १८८२ पर्यंत नागरी विभागामार्फत या रस्स्त्याच्या पुढील विस्तारीकरणाचे काम चालू होते. मोठ्या प्रमाणातील रहदारीमुळे हा रस्ता सतत खराब होत असे. त्याच्या दुरूस्तीसाठी शासनाकडे सतत पाठपुरावा केला जात असे. तत्कालीन सोलापूर जिल्ह्यातील चार प्रादेशिक जकात नाक्यांपैकी १ जकात नाका बार्शी तालुक्यातील ' कुसळंब ' या ठिकाणी बार्शी-मोमीनाबाद या मार्गावर होता. तर दुसरा जकात नाका बार्शी-बार्शी स्टेशन रोड या मार्गावर ' पापनस ' या ठिकाणी होता. [१४]

लॉर्ड डलहौसी याच्या काळात सडकनिर्मितीचे नवे पर्व सुरू झाले. याच्यापूर्वी सडक निर्मितीची जबाबदारी लष्कराकडे होती. डलहौसीने केंद्रिय सार्वजनिक बांधकाम विभागाची निमिर्ती करून त्यांच्याकडे सडक निर्मितीची जबाबदारी सोपविली. तसेच प्रत्येक प्रांतात सार्वजनिक बांधकाम विभाग सुरू केले. याच काळात रेल्वे कंपन्यांनी देशात लोहमार्ग टाकण्यास सुरूवात केली. रेल्वेला स्पर्धेची झळ पोहचू नये म्हणून इंग्रजांनी सडक निर्मितीकडे दुर्लक्ष केले. इ. स. १९१९ च्या सुधारणा कायदयान्वये सडकांना प्रांतिक विषय ठरविण्यात आले. प्रांतिक सरकारांनीही काही महत्वपूर्ण सडकांच्या निर्मितीची जबाबदारी स्वत:कडे ठेऊन बाकी सर्व सडकांच्या निर्मितीची जबाबदारी स्थानिक संस्थाकडे सोपविली. स्थानिक संस्थांची वित्तीय स्थिती कायमच हालाखीची असायची. परिणामी सडकांची दुर्दशा वाढली. इ. स. १९२७ च्या जयकर समितीने रस्त्याचे महत्व राष्ट्रविकासाशी निगडीत असल्याचे प्रतिपादन करून केंद्रीय उत्पादनाचा काही भाग सडकांवर खर्च करण्याची शिफारस केली. रेल्वेसाठी सडका कशा पूरक आहेत ते पटवून सांगितले. जयकर समितीच्या शिफारशींवरून भारतीय सडकांच्या विकासाचा आधुनिक कालखंड सुरू झाला. इ. स. १९४३ मध्ये भारत सरकारने नागपूर येथे निरनिराळया प्रांतातील मुख्य अभियंत्यांचे एक संमेलन घडवून आणले. यामध्ये सडकांच्या भविष्यातील विकासावर आधारीत " वीस वर्षीय सडक विकास योजना

तयार " करण्यात आली. तीच ' नागपूर योजना ' म्हणून ओळखली जाते. या योजनेनुसार सडकांची पुढीलप्रमाणे विभागणी करण्यात आली. १) राष्ट्रीय महामार्ग २) प्रांतिक महामार्ग ३) जिल्ह्याच्या प्रधान सडका ४) ग्रामीण सडका.[१५]

इ. स. १९४७ मध्ये भारत सरकारने राष्ट्रीय हमरस्त्यांबाबतची जबाबदारी स्वीकारली. इ. स. १९५८ मध्ये भारत सरकारने इंटर-स्टेट ट्रान्सपोर्ट कमिशन नेमले. त्याचप्रमाणे ' रोड बोर्डस ' आणि ' सेंट्रल रोड रिसर्च इन्स्टिटयूट ' या संस्था स्थापून रस्त्यांच्या विकासाच्या दृष्टीने उपयुक्त कार्य केले. त्यामुळे देशातील रस्ते विकास झपाट्याने होण्यास मदत झाली. पहिल्या तीन पंचवार्षिक योजनांच्या काळात देशातील रस्त्यांची लांबी ४ लाख कि . मी. वरून ८,९२,००० कि. मी. झाली. तर चौथ्या पंचवार्षिक योजनेपूर्वी भारतातील रस्त्यांची लांबी ९,७२,००० किलोमीटर इतकी होती. [१६]

जिल्हा परिषदेची स्थापना ही त्या भागातील सर्वकश विकास करण्यासाठी झाली. रस्ते हे या विकासाच्या मार्गातील महत्वाचे दुवे आहेत हे ओळखून सोलापूर जिल्हा परिषदेने प्रथम रस्ते विकासाला अग्रक्रम दिला. दळणवळणाच्या विकासासाठी दुर्गम भागातील खेडी प्रमुख रस्त्यांना जोडली. इ. स. १९६२ मध्ये तत्कालीन सोलापूर जिल्हा लोकल बोर्डाच्या रस्त्याची एकूण लांबी १५८७ कि. मी. इतकी होती. ती इ. स. १९६२ मध्ये ५१७४ इतकी झाली. इ. स. १९७२ ते १९७४ या काळात दुष्काळग्रस्त स्थितीमुळे लोकांच्या हाताला काम मिळावे म्हणून अनेक नवीन रस्त्यांची कामे हाती घेण्यात आली. त्यामुळे या कालावधीमध्ये २२७५ कि. मी. लांबीचे नवीन रस्ते तयार झाले. यामुळे ९१,००,००० मजूरांना काम मिळाले. रस्त्यांच्या सर्वांगिण विकासासाठी जिल्हा परिषदेने सातत्याने प्रयत्न केले. त्यामुळे जिल्ह्याच्या दळणवळण विकासाला चालना मिळाली.[१७]

इ. स. १९६४-६५ या वर्षासाठी शासानाने व जिल्हा परिषदेने बार्शी तालुक्यातील रस्ते विकासासाठी १६ हजार रूपये, ग्रामीण रस्त्यासाठी १९,८४८ रूपये, सार्वजनिक बांधकाम विभागाकडून वर्ग झालेल्या रस्त्यासाठी ३० हजार रूपये, नवीन रस्त्यासाठी ५० हजार रूपये, रस्त्यांच्या दुरूस्ती व व्यवस्थेसाठी ३५,५०० रूपये, पूर्वीच्या जिल्हा लोकल बोर्डाच्या चालू रस्ते दुरूस्तीसाठी ३९ हजार रूपये, स्थानिक समाज विकास व राष्ट्रीय विस्तार कार्यक्रमाखाली तयार केलेल्या रस्त्यांच्या चालू दुरूस्तीसाठी १२,९०० रूपये तर ग्रामीण रस्त्यांच्या चालू दुरूस्तीसाठी २,८०० रूपये मंजूर केले. त्यामुळे बार्शी तालुक्यातील दळणवळणाचा विकास झपाट्याने होण्यास मदत झली.[१८] इ. स. १९६५-६६ मध्ये जिल्हा परिषदेने स्वत:च्या फंडातून बार्शी तालुक्यामध्ये केलेल्या मुख्य जिल्हा रस्त्यासाठी २,६३,००० रूपये मंजूर केले. तर रस्ते दुरूस्ती व व्यवस्था यासाठी १,९०,००० पेक्षा जास्त रूपये खर्च केले.[१९]

इ. स. १९६७-६८ च्या दरम्यान बार्शी तालुक्यात दर १०० चौरस कि. मी. ला १९.६० कि. मी. याप्रमाणे एकूण १४४ कि. मी. लांबीचे रस्ते होते.[२०] इ. स. १९६९-७० च्या सरकारी अंदाजपत्रकामध्ये बार्शी तालुक्यातील रस्ते विकासासाठी २,१८,६०० रूपये निधीची तरतूद करण्यात आली. त्यामुळे तालुक्यातील रस्ते विकासाला चालना मिळाली.[२१] इ. स. १९७०-७१ च्या जिल्हा परिषदेच्या सुधारित अंदाजपत्रकात बार्शी तालुक्याच्या रस्ते विकासावर ३,६८,५४० रूपयांची तरतूद करण्यात आली. तर इ. स. १९७१-७२ च्या मूळ अंदाजपत्रकामध्ये तालुक्याच्या रस्ते विकासावर ३,२७,७०० रूपयांची तरतूद करण्यात आली.[२२]

इ. स. १९७३-७४ मध्ये जिल्हा परिषदेने स्वत:च्या अनुदानातून बार्शी तालुक्यातील रस्ते वाढ, विकास व संवर्धन यासाठी ४,०८,००० रूपयांची तरतूद केली.[२३] तालुक्यातील कुसळंब ते येरमाळा रस्ता डांबरीकरणासाठी लागणारी अंदाजीत रक्कम ५६,२३,०० रूपये इतकी होती. हा बार्शी तालुका व मराठवाडा यांना जोडणारा एक अतिशय महत्वाचा रस्ता होता. इ. स. १९७५-७६ च्या जिल्हा परिषदेच्या सुधारित अंदाजपत्रकात या रस्त्याच्या कामासाठी २,५०,००० रूपयांची तरतूद करण्यात आली. तर इ. स. १९७६-७७ च्या अंदाजपत्रकामध्ये ५०,००० रूपयांची तरतूद करण्यात आली. या रस्त्यामुळे बार्शीच्या व्यापारामध्ये भरीव वाढ झाली.[२४] इ. स. १९७४-७५ मध्ये जिल्हा परिषदेने स्वत:च्या अनुदानातून बार्शी तालुक्यातील रस्ते वाढ, विकास व संवर्धन यासाठी ४,०८,४०० रूपयांची तरतूद केली.[२५]

इ. स. १९७२-७३ मध्ये दुष्काळी परिस्थितीमुळे जिल्ह्यामध्ये दुष्काळी कामे म्हणून अनेक रस्त्यांची कामे हाती घेण्यात आली. परिणामी दळणवळणाच्या दृष्टीने जिल्ह्यातील रस्त्यांची संख्या झपाट्याने वाढली. या वर्षामध्ये सोलापूर जिल्हा परिषदेच्या कार्यक्षेत्रातील सर्व प्रकारच्या रस्त्यांची एकूण लांबी ३४९७ कि. मी. पेक्षा अधिक होती. वर्षाखेर यामध्ये भर पडून ती ५१२० कि. मी. इतकी झाली. या वर्षामध्ये जिल्ह्यातील एकूण रस्ते वाढ, विकास व निर्मितीसाठी १९,२४,१०० रूपये अनुदान मंजूर केले. मात्र या कामावर प्रत्यक्ष २४,१८,६२० रूपये खर्च झाला. या कामासाठी जिल्हा परिषदेने स्वत:च्या फंडातून ४६,२९२ रूपये खर्च केले.[२६] इ. स. १९७२-७३ मध्ये बार्शी पंचायत समितीने तालुक्यातील दळणवळण विकासावर १०,५८० रूपये खर्च केले.[२७]

सोलापूर जिल्ह्यामध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाची सोलापूर, बार्शी व पंढरपूर या ठिकाणी कायमस्वरूपाची उपविभागीय कार्यालये आहेत. इ. स. १९७३ पर्यंत या विभागाने राष्ट्रीय व राज्य मार्ग मिळून ८९९ कि. मी. लांबीचे रस्ते बांधले. सोलापूर जिल्हा परिषदेच्या अधिकाराखाली ४,८०३ कि. मी. लांबीचे रस्ते येत होते. यापैकी मुख्य जिल्हा मार्ग १,०६४ कि. मी. तर इतर जिल्हा मार्ग १,०८७ कि. मी. व खेड्यातील रस्ते २,६५२ कि. मी. लांबीचे होते.[२८]

इ. स. १९८१ अखेर बार्शी तालुक्यातील १४२ गावांपैकी ६८ गावांमध्ये दळणवळणाच्या सोयी उपलब्ध होत्या. यापैकी ४० गावे पक्क्या रस्त्यांनी जोडलेली होती.[२९] इ. स. १९८५-८६ मध्ये बार्शी तालुक्यासाठी ४ कि. मी. डांबरी तर २१ कि. मी. पक्क्या खडीचे रस्ते नव्याने मंजूर झाले. इ. स. १९८५-८६ च्या सुरूवातीस बार्शी तालुक्यातील एकूण डांबरी सडकांची लांबी २१.२० कि. मी. इतकी होती, ती वर्षाखेर २५.२० इतकी झाली. तर पक्क्या खडीच्या रस्त्यात भर पडून त्यांची एकूण लांबी १९४.४९ कि. मी. वरून २११.४९ कि. मी. इतकी झाली. शिवाय कनिष्ठ प्रतिच्या सडकांची लांबी २६८.७० कि. मी. वरून २४७.७७ कि. मी. इतकी झाली. कारण या वर्षामध्ये २१ कि. मी. रस्त्याचे शासनाकडे हस्तांतरण करून त्याचे खडीकरण करण्यात आले होते. या वर्षामध्ये महाराष्ट्र शासनाने जिल्ह्यातील रस्ते निर्मिती व संवर्धन यावर १,२६,४१,००० रूपये अनुदान मंजूर केले होते, मात्र या कामावर प्रत्यक्ष १,२८,६९,६२७ रूपये खर्च झाला.[३०]

इ. स. १९८५-८६ या काळात बार्शी तालुक्याच्या रस्ते विकासामध्ये तालुक्याचे तत्कालीन विधानसभा सदस्य दिलीपरावजी सोपल यांचे मोलाचे योगदान राहीले आहे. या वर्षी बार्शी तालुक्यातील दळणवळणाच्या विकासावर आमदारांचा स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत ७,२५,००० रूपये खर्च करण्यात आले. इ. स. १९८६-८७ मध्ये ५,२५,०० रूपये खर्च करण्यात आले. इ. स. १९८७-८८ मध्ये ४,५०,०० रूपये खर्च करण्यात आले. इ. स. १९८८-८९ मध्ये ५,५९,०० रूपये खर्च करण्यात आले. इ. स. १९८९-९० मध्ये ५,२२,०० रूपये खर्च करण्यात आले. इ. स. १९९१-९२ मध्ये ७,६०,०० रूपये खर्च करण्यात आले. आमदार निधीतून दळणवळणाच्या विकासासाठी केलेल्या भरीव तरतुदीमुळे तालुक्यातील दळणवळणाचा वेगाने विकास झाला. हा विकास तालुक्याच्या आर्थिक विकासास साहाय्यभूत ठरला.[३१]

मार्च १९८५ अखेर बार्शी तालुक्यातील रस्त्यांची एकूण लांबी ९६०.६० कि. मी. इतकी होती. तर इ. स. १९८१-२००१ या २० वर्षाच्या कालावधीसाठी दुसऱ्या रस्ते विकास योजनेनुसार तालुक्यातील रस्ते विकासाचे लक्ष १०८१.४० कि. मी. इतके होते. जिल्ह्यामध्ये यापेक्षा जास्त लक्ष केवळ माळशिरस तालुक्यासाठीचे होते. बार्शी तालुक्यातील ९६०.६० कि. मी. रस्त्यांपैकी २२४.९० कि. मी. राज्यमार्ग हाते. २४८.९० कि. मी. प्रमुख जिल्हामार्ग, २०५.८० कि. मी. इतर जिल्हामार्ग तर ग्रामीण मार्ग २८१.२० कि. मी. इतके होते.[३२] इ. स. १९९०-९१ अखेर बार्शी तालुक्यातील पक्क्या खडीच्या रस्त्यांची एकूण लांबी ४१६.९० कि. मी. इतकी होती.[३३]

बार्शी - तुळजापूर हा बार्शी व मराठवाडा यांना जोडणारा एक महत्वाचा मार्ग आहे. या रस्त्यासाठी भूसंपादनाची प्रक्रिया मार्च १९५१ मध्ये सुरू झाली. या भूसंपादनामध्ये बार्शी तालुक्यातील उपळे दुमाला ते

उंडेगाव या दोन गावा दरम्यानची १५ ते ३३० नंबर गटातील सर्वेक्षण केलेली ही जमीन होती. या कामासाठी २६,६०० रूपये रक्कम अपेक्षित होती. याची तरतूद जिल्हा लोकल बोर्डाने आपल्या पुढील वर्षाच्या अर्थसंकल्पामध्ये करावी अशी सूचना सरकारकडून जिल्हा लोकल बोर्डाच्या अध्यक्षांना करण्यात आली होती. मुंबई राज्याचे तत्कालीन सहाय्यक सचिव एल. ए. धामानिगी यांच्या मार्गदर्शनाखाली ही भूमी संपादनाची प्रक्रिया पार पडली. या प्रक्रियेमध्ये स्थानिक लोकांनी कोणतीही हरकत घेतली नाही. या रस्त्याचे बार्शी तालुक्याच्या व पर्यायाने जिल्ह्याच्या विकासासाठीचे महत्व लक्षात घेऊन तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांनी या कामाचा सातत्याने पाठपुरावा केला.[३४] तिसऱ्या पंचवार्षिक योजने अंतर्गत राज्य रस्ते विकास निधीतून बार्शी - तुळजापूर या रस्त्याच्या दुरूस्तीसाठी ४०,००० रूपयांची तरतूद करण्यात आली होती.[३५] पुढेही या रस्त्याच्या विकासासाठी महाराष्ट्र शासनाने सातत्याने तरतूद केली.

पश्चिम महाराष्ट्र व मराठवाडा यांच्या सीमेवर असलेले काटेगाव हे एक महत्वाचे गाव आहे. ८ ऑगस्ट १९५१ रोजी आगळगाव - काटेगाव या रस्त्यासाठी जिल्हा लोकल बोर्डाला भूमी संपादनाचा आदेश मिळाला होता. या संदर्भात आवश्यक ती चौकशी झाली. ही सर्व जमीन खाजगी होती. यासाठी स्थानिक व संबंधित लोकांचे ना हरकत प्रमाणपत्र घेण्यात आले. आगळगाव परिसरातील काही लोकांच्या या संदर्भात काही तक्रारी होत्या. त्यांचे योग्य ते निरसन करण्यात आले. व नंतर ही भूमी संपादनाची प्रक्रिया पार पडली. यासाठी ४,३३० रूपये खर्च अपेक्षित होता. त्याची तरतूद जिल्हा लोकल बोर्डाने आपल्या इ. स. १९५१-५२ च्या अर्थसंकल्पामध्ये करावी अशी सूचना सरकारकडून जिल्हा लोकल बोर्डाच्या अध्यक्षांना करण्यात आली होती. हा देखील बार्शी व मराठवाडा यांना जोडणारा एक महत्वाचा रस्ता आहे.[३६]

इ. स. १९९१ अखेर बार्शी तालुक्यातील खेड्यांची संख्या १३६ इतकी होती. यापैकी ११६ गावांमध्ये दळणवळणाच्या सोयी उपलब्ध होत्या. यापैकी ७९ गावे पक्क्या रस्त्यांनी जोडण्यात आलेली होती.[३७]

५.३.२ रेल्वे विकास

१९ व्या शतकाच्या आरंभी पाश्चिमात्य देशात उद्योगधंदे आणि व्यापार यात जी प्रगती झाली व वाहतुकीच्या वाढत्या गरजा पूर्ण करण्यासाठी जे प्रयत्न झाले त्यातूनच खऱ्या अर्थाने रेल्वेचा उदय झाला. इंग्लंडमध्ये सुरूवातीला रेल्वेची उभरणी खाजगी तत्वावर होती. पुढे ती सरकारी झाली. इंग्लंडमध्ये सर्वप्रथम कोळशाच्या खाणी आणि जलवाहतुकीचे मार्ग यांना जोडण्यासाठी लोखंडी रूळ टाकण्यात आले. चाके असलेल्या या गाडया या रूळावरून घोडयाच्या सहाय्याने ओढल्या जात. इ. स. १८०४ मध्ये पहिला रूळाचा मार्ग सार्वजनिक वाहतुकीसाठी खुला करण्यात आला. ' सरे आयर्न रेल्वे ' या कंपनीच्या लोहमार्गावर पन्नास टनापेक्षा जास्त वजन नेणारी पहिली गाडी घोडयाच्या साहाय्याने चालविण्यात आली.

पुढे ' नॉर्दम्बरलँड ' मधील कोळसा खाणीच्या रूळ मार्गावर ' जॉर्ज स्टिव्हन्सन ' या संशोधकाने प्रयोग करून वाफेवर चालणाऱ्या इंजिनचा शोध लावला. इ. स. १८२५ मध्ये स्टॉकटन आणि डार्लिगटन रेल्वेने सार्वजनिक रूळ मार्गावर वाफेच्या इंजिनचा सर्वप्रथम वापर करून त्या गाडीतून प्रवाशांची वाहतूक केली. केवळ इंजिनच्या साहाय्याने चालणाऱ्या गाडीसाठी इ. स. १८३० मध्ये लिव्हरपूल-मँचेस्टर हा रेल्वेमार्ग टाकण्यात आला. पुढे बर्मिंगहॅम, लंडन, ब्रिस्टल अशा विविध शहरांना जोडणारे रेल्वेरूळ टाकण्यात आले. कालांतराने व्यापार, उद्योगासाठी जलमार्ग अपुरे व गैरसोयीचे वाटू लागल्याने त्याची जागा लोहमार्गाने घेतली. त्यामुळे अवजड माल दूरवरसुध्दा अत्यंत वेगाने नेणे शक्य झाले. इ. स. १८५३ मध्ये भारतामध्ये प्रथमच मुंबई ते ठाणे या लोहमार्गावरून रेल्वे धावली. तेव्हापासून आज या रेल्वेचे फार मोठे जाळे या देशामध्ये पसरलेले आहे. भारतातील एकूण माल वाहतूकीपैकी ८०% तर प्रवाशी वाहतूकीपैकी ५०% पेक्षा जास्त वाहतूक रेल्वेच्या माध्यमातून होते.[३८]

दक्षिण-मध्य रेल्वेचा ' मुंबई-सोलापूर-मद्रास ' हा रेल्वेमार्ग सोलापूर जिल्ह्यातील एक महत्वाचा व्यापारी मार्ग आहे. हा मार्ग जिल्ह्यातील महत्वाची केंद्रे जोडतो. विशेषत: सर्व व्यापारी मालाची वाहतूक याच मार्गाने होते. ' लातूर-बार्शी-कुर्डूवाडी-मिरज ' या रेल्वेमार्गामुळे हा रेल्वेमार्ग खूपच विस्तृत झाला आहे. हा रेल्वेमार्ग मराठवाडा, सांगली व कोल्हापूर यांना जोडतो. या रेल्वेमार्गामुळे बार्शी तालुक्याच्या आर्थिक विकासाला प्रचंड गती मिळाली. या मार्गामुळे तालुक्यातील विविध उद्योगधंद्यामध्ये उत्पादित होणाऱ्या मालाला जास्त बाजारपेठा मिळाल्या. त्यामुळे उद्योगधंदयाच्या मालकांना होणाऱ्या फायदयात वाढ झाली. परिणामी त्यांना उद्योगधंदे वाढविण्यास किंवा नवीन उद्योगधंदे सुरू करण्यास प्रोत्साहन मिळाले. यामुळे बार्शी तालुक्याचा औद्योगिक विकास झपाट्याने घडून आला.[३९] औद्योगिक विकासात रेल्वेची भूमिका फार महत्वाची आहे. रेल्वेमुळेच भारताच्या अंतर्गत व बाहय व्यापारात वाढ होण्यास मदत झाली. तसेच रस्ते व जल वाहतुकीच्या प्रगतीत रेल्वेमुळे गती आली. भारतात औद्योगिक शहरांची निर्मिती होण्यामध्ये रेल्वेची भूमिका फार महत्वाची आहे. रेल्वेमुळे वस्तूंच्या किंमतीत मोठ्या प्रमाणामध्ये होणाऱ्या चढउतारांना आळा बसला. दुष्काळ, भूकंप, पूर तसेच युध्द अशा काळात रेल्वेने खूप मोलाची भूमिका पार पाडली आहे. भारतातील शेतमालाला पूर्वी केवळ स्थानिक बाजारपेठाच उपलब्ध होत्या. परंतू रेल्वेमुळे आपला माल दूरवरच्या बाजारपेठांमध्ये विकता आल्यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या मालाची जास्त किंमत मिळू लागली.[४०] मार्च १९९१ अखेर सोलापूर जिल्ह्यातील रेल्वे मार्गाची एकूण लांबी ४२३.८७ कि. मी. इतकी होती. यामध्ये ब्रॉडगेज मार्गाची लांबी २२०.०९ कि. मी. मीटरगेज मार्गाची लांबी ४१.५९ व नॅरोगेज मार्गाची लांबी १६२.१९ कि. मी. इतकी होती.[४१]

' लातूर - मिरज ' ही मध्य रेल्वेची नॅरोगेज लाईन बार्शी तालुक्यातून जाते. या मार्गावर तालुक्यातील उपळाई, शेंद्री, बार्शी, कुसळंब, पांगरी, रामलिंग व येडशी ही स्थानके येतात. या रेल्वेमार्गाची जिल्ह्यातील एकूण लांबी ११५.८९ मैल इतके होते. तर बार्शी तालुक्यातील लांबी ५० मैलापेक्षा जास्त होते.[४२] या नॅरोगेज मार्गाचे ब्रॉडगेजमध्ये रूपांतर करण्याच्या कामाला इ. स. १९९२-९३ मध्ये मंजूरी मिळाली.[४३] यामुळे बार्शी तालुक्याच्या विकासाला खूप चालना मिळाली. शेतकऱ्यांना आपला माल संपूर्ण देशामध्ये विकता येऊ लागला. बार्शीतील विविध छोटया व मोठ्या उद्योगधंदयांना चांगले दिवस आले. यामध्ये डाळ उद्योग, तेल उद्योग, कापड उद्योग यांचा आवर्जून उल्लेख करावा लागतो. बार्शीची डाळ संपूर्ण देशामध्ये प्रसिध्द झाली. बार्शीमध्ये विविध शेतमालाची होणारी आवक प्रचंड वाढली. बाजार समितीला आलेला शेतमाल संपूर्ण देशामध्ये निर्यात करणे सोयीस्कर झाले. येथील औद्योगिक वसाहतीत उद्योगधंदे खूप वेगाने वाढले. त्यांना लागणारा कच्चा माल व त्यांनी उत्पादित केलेला पक्का माल यांची वाहतूक रेल्वेमुळेच सुलभ व गतिमान झाली. यातून तालुक्याचा औद्यागिक विकास झपाट्याने होण्यास मदत झाली.

५.४. बार्शी तालुक्यातील प्रमुख उद्योगधंदे

व्यापार उद्योगधंदयाच्या दृष्टीने बार्शीची ओळख फार जुनी व महत्वाची आहे. पूर्वीपासून बार्शी तालुक्यामध्ये ग्रामीण तसेच शहरी भागामध्ये विविध उद्योगधंदे सुरू आहेत. काही मोठ्या स्वरूपामध्ये आहेत तर काही लहान स्वरूपामध्ये आहेत. यापैकी सूत व कापड उद्योग, डाळ उद्योग, साखर उद्योग व तेल उद्योग हे बार्शी तालुक्यातील प्रमुख उद्योगधंदे आहेत.

५.४.१ डाळ उद्योग

बार्शी तालुक्यातील हा एक महत्वाचा उद्योग आहे. दगडी जात्यामध्ये तूर, मुग, उडिद अशी विविध कडधान्ये घालून डाळ तयार करण्याची पध्दत परंपरेने चालत आलेली आहे. यासाठी संपूर्ण कुटुंबाला राबावे लागत असे. यामध्ये स्त्रियांची भूमिका महत्वपूर्ण होती. दगडी जाते ओढण्याचे काम, तसेच घरोघरी जाऊन डाळ विकण्याचे काम त्यांना करावे लागे. आजही ग्रामीण भागामध्ये अशाच पध्दतीने डाळ निर्मिती केली जाते. अर्थात त्याचे स्वरूप व उत्पादन मर्यादित असते. तालुक्यामध्ये या डाळ उद्योगाला यांत्रिक दर्जा मिळवून देण्याचे काम श्री. धोंडीराम नंदराम खटोड यांनी केले. त्यांनी इ. स. १९२५-२६ च्या दरम्यान बार्शी तालुक्यामध्ये सर्वप्रथम यंत्राच्या साहयाने डाळ निर्मिती करण्यास सुरूवात केली. या उद्योगासाठी लागणारा कच्चा माल म्हणजेच तूर, मुग, उडिद अशी विविध कडधान्ये यांची बार्शी बाजारपेठेमध्ये, बार्शी तालुक्यातून व संपूर्ण मराठवाड्यातून मोठ्या प्रमाणात आवक होते. त्यामुळे येथील डाळ उद्योगाच्या वाढीस चालना मिळाली. येथील डाळ संपूर्ण भारतामध्ये विशेषत: दक्षिण भारतामध्ये खूप प्रसिध्द आहे.[४४] इ. स.

१९५४-५५ अखेर बार्शीमध्ये ९ डाळ कारखाने सुरू होते. यावर्षी बार्शीच्या तूरडाळीस दक्षिण भारतातून मागणी वाढल्यामुळे व तुरीची आवक फारच कमी झाल्यामुळे तुरीचे भाव खूप वाढले होते.[४५]

इ. स. १९५६ मध्ये बार्शी मार्केट क्षेत्रात तुरीचे पीक दरवर्षापेक्षा कमी होते. परंतू मराठवाड्यातून मोठ्या प्रमाणात तुरीची आवक झाली. तूरडाळीच्या उत्पादनाचे बार्शी हे मोठे केंद्र असल्याने व येथील डाळीला संपूर्ण देशात विशेषत: दक्षिण भारतामध्ये खूप मागणी असल्याने तुरीला येथे नियमित व मोठ्या प्रमाणात मागणी असते. मे १९५७ मध्ये बार्शीच्या डाळीची मागणी वाढल्याने तुरीचे भाव वाढले. मात्र पावसाळयात डाळ कारखानदारांना डाळीचे वाळण करता येणे शक्य नसल्याने पावसाळयामध्ये तुरीची मागणी कमी असते. त्यामुळे पावसाळयाच्या दरम्यान तुरीचे भाव कमी असतात. डाळीच्या उत्पादनाचे बार्शी हे मोठे केंद्र असून येथील हरण छाप, कमळ छाप, सिंह छाप, सूर्य छाप, छोकरा छाप इत्यादी डाळी महाराष्ट्र, तामिळनाडू, कर्नाटक व मध्य प्रदेश या प्रांतात खूप प्रसिध्द आहेत. येथील तूरडाळीची निर्यात सर्वस्वी रेल्वेवरच अवलंबून आहे. त्यामुळे या डाळ वाहतुकीसाठी किती वॅगन पुरवठा होतो यावर या उद्योगाचे स्थैर्य अवलंबून आहे. इ. स. १९५६-५७ मध्ये मिरजवरून होणारा रेल्वे वॅगनचा पुरवठा बंद झाला. त्याचा फार विपरित परिणाम येथील डाळ उद्योगावर झाला. त्यामुळे बार्शी मार्केट कमिटीच्या तत्कालीन वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी रेल्वेच्या अधिकाऱ्याशी चर्चा करून रेल्वे वॅगनचा पुरवठा सुव्यवस्थित केला. त्यामुळेच इ. स. १९५६-५७ मध्ये बार्शीतून मुंबई, पुणे, म्हैसूर, सांगली, कोल्हापूर, मद्रास, गुजरात बरोबरच राज्यात १३० रेल्वे वॅगन्स डाळ निर्यात झाली. सहाजिकच येथील डाळ कारखानदारामध्ये नवा उत्साह निर्माण झाला.[४६]

औद्योगिक क्रांतिपूर्वीच्या काळात व्यापार, उद्योगधंदे सर्वस्वी स्थानिक स्वरूपाचे होते. उत्पादकांपासून वितरकांपर्यंत किंवा व्यापाऱ्यांपासून ग्राहकांपर्यंत मालाची वाटचाल अगदी सरळ मार्गाने होती. भावातील चढ-उताराचे धोके कमी होते. कारण सर्व व्यवहार थोडक्या काळात पूर्ण होत. परंतू औद्योगिक क्रांतीमुळे यंत्रयुगाला सुरूवात झाली. त्यामुळे उत्पादन, व्यापार, दळणवळण यांच्या स्वरूपात अमुलाग्र बदल झाला. व्यापार व उद्योगधंदे यांचे प्रादेशिक स्वरूप कमी होऊन त्यांना जागतिक स्वरूप प्राप्त झाले. त्यामुळे उत्पादक व ग्राहक यांच्या दरम्यान होणाऱ्या मालाच्या वाटचालीचे अंतर व कालावधी वाढला. त्यामुळे अशा उलाढालीत भावातील अस्थिरतेचे धोके निर्माण झाले. त्यामुळे यातून मार्ग काढण्यासाठी कारखानदार व व्यापारी यांनी केलेल्या प्रयत्नातून ' वायदे बाजाराची ' उत्क्रांती झाली. आज या वायदे बाजाराला आधुनिक बाजार व्यवस्थेचे अत्युच्च शिखर समजण्यात येते. वायदे बाजारामुळे उत्पादक, ग्राहक व मध्यस्त यांना भावातील हेलकाव्यापासून संरक्षण मिळून लाभप्रेरीत व्यापाऱ्यांमध्ये

धोक्याचे केंद्रीकरण होते. वायदे बाजारामुळे निरनिराळया बाजारपेठांतील विविध हंगामातील मालाच्या बाजारभावाचा समन्वय घालण्यास मदत होते. [४७]

इ. स. १९५७ मध्ये बार्शी तालुका व मराठवाड्यात तुरीचे पीक समाधानकारक नव्हते, त्यामुळे बार्शी पेठेमध्ये तुरीची आवक कमी झाली. त्यातच स्थानिक डाळ कारखानदारांनी मद्रास, मुंबई व स्थानिक खरेदीदार व्यापारी यांच्याशी तूर डाळीचे वायद्याचे सौदे मंदित केले होते. तूरीचा भाव १५ ते १६ रूपये प्रती मण असल्यास डाळीचा भाव १९ रूपये प्रती मण असणे अपेक्षित असते. परंतू स्थानिक डाळ कारखानदारांनी हे सौदे पूर्वीच १७ रूपये प्रती मण याप्रमाणे दिले होते. साहजिकच डाळ कारखानदारांनी तुरीचे भाव मंदित काढले. त्यामुळे या कालावधीत तुरीची आवक फारच कमी झाली. पुढे जून १९५८ मध्ये तुरीची आवक संपल्याने व व्यापाऱ्यांजवळही तुरीचे साठे नसल्याने तूर व तूरडाळीचे भाव वाढले. त्यामुळे येथील डाळ कारखानदारांना दिलासा मिळाला.[४८]

इ. स. १९५८ मध्ये बार्शी पेठेतील तुरीची आवक मागील वर्षापेक्षा निम्म्यावरच आली. त्यामुळे तुरीचे भाव वाढल्याने स्थानिक डाळ कारखानदारांनी तुरीचे अथवा तूरडाळीचे साठे केले नाहीत. शिवाय तुरीवर ॲडव्हान्स देणे बँकांनी बंद केले होते. याचा प्रतिकुल परिणाम बार्शीतून दक्षिण भारतात होणाऱ्या डाळ पुरवठयावर झाला. दक्षिण भारतात डाळीचा तुटवडा भासला. जून १९५९ अखेर डाळीस मागणी वाढल्याने बार्शीच्या डाळ कारखानदारांनी उत्तर प्रदेश व मध्य प्रदेश या राज्यांतून तूर मागवून तूरडाळीचा पुरवठा सुरळीत केला. यामुळे स्थानिक डाळ कारखानदारांना याचा खूप फायदा होऊन तूरडाळीला चांगला भाव मिळाला. याही वर्षी डाळ कारखान्यांच्या संख्येमध्ये एकाने भर पडून ही संख्या ११ इतकी झाली.[४९]

इ. स. १९६० मध्ये बार्शी पेठेमध्ये मोठया प्रमाणात तुरीची आवक झाली. ३ फेब्रुवारी १९६० रोजी २००० पोती तूर विकली गेली. यापैकी १४०० पोती तूर स्थानिक डाळ कारखानदारांनी घेतली. यावर्षी त्यांना तूरडाळीसाठी कोईमतूर, दावणगिरी, बेन्नूर, हुबळी, शिमोगा, म्हैसूर, कोल्हापूर या ठिकाणांहून मोठे गिऱ्हाईक मिळाले. त्यावर्षी डाळ कारखान्याच्या संख्येमध्ये एकाने भर पडून ही संख्या १२ इतकी झाली.[५०]

इ. स. १९६१ मध्ये तुरीचे आवक नियमित होती, मात्र अपुऱ्या रेल्वे वॅगन्स पुरवठ्यामुळे येथील डाळीस गिऱ्हाईक कमी झाले. यामुळे तूरडाळीचे भाव साधारण राहिले. या वर्षाचे वैशिष्टय म्हणजे तुरीचे व डाळीचे भाव यामध्ये तफावत दिसून आली नाही. कारण आवक योग्य होती, पण रेल्वे वॅगन्सचा पुरवठा अपुरा होता. या वर्षामध्ये बार्शीतून शिमोगा, धारवाड, बेळगाव, कोईमतूर, पुणे, हुबळी, म्हैसूर, कोल्हापूर या ठिकाणी प्रामुख्याने तूरडाळीची निर्यात झाली.[५१] डिसेंबर १९६१ च्या सुरूवातीस ३००० क्विंटल तूरडाळीचे वायद्याचे सौदे झाले होते. पुढे जून १९६२ नंतर दक्षिण भारतातून तूरडाळीस प्रचंड मागणी

वाढल्याने व बार्शी पेठेतील तुरीचे आवक संपुष्टात आल्याने जुलै अखेरीस तुरीच्या भावाने नवा उच्चांक गाठला. वाढत्या मागणीमुळे या वर्षी डाळ कारखान्यांच्या संख्येत भर पडून ही संख्या १५ इतकी झाली.[५२]

डिसेंबर १९६२ च्या दुसऱ्या पंधरवडयामध्ये तुरीचे आवक सुरू झाली, ती जानेवारी १९६३ मध्ये खूप वाढली. त्यामुळे तुरीचे भाव घसरले. तर डाळीचे भाव ६४ ते ६८ रूपये प्रती क्विंटल इतके झाले. फेब्रुवारी व मार्च १९६३ मध्ये तूरडाळीची मागणी वाढल्याने तसेच रेल्वे वॅगन्सचा पुरवठा समाधानकारक झाल्याने तूरडाळीचे भाव ७१ ते ७५ रूपये प्रती क्विंटल इतके वाढले. पुढे एप्रिलमध्ये तुरीची आवक रोडावल्यामुळे तूरडाळीचे भाव ८५ ते ९० रूपये प्रती क्विंटल इतके प्रचंड वाढले. दक्षिण भारतात बार्शी बाजारपेठ ही प्रामुख्याने तूर डाळीसाठी प्रसिध्द आहे. या भागातून होणाऱ्या तूर डाळीच्या सततच्या वाढत्या मागणीमुळे बार्शीमध्ये डाळ कारखानदारीला चांगले दिवस आले. त्यामुळे या वर्षामध्ये बार्शीत नवीन ७ डाळ कारखान्याची भर पडून या वर्षाखेर येथील डाळ कारखान्यांची संख्या २२ इतकी झाली.[५३]

तुरीचे विक्री जलद गतीने होण्यासाठी इ. स. १९६४ मध्ये बार्शी मार्केट क्षेत्रात प्रतवार पध्दतीचा अवलंब केला. त्यामुळे येथील डाळ कारखानदारांना आवश्यक असाच माल घेण्याची संधी मिळाली. या वर्षात डाळ कारखानदारांनी प्रामुख्याने ' गजर ' व ' लाल तूरी ' ची खरेदी केली. या वर्षीही बार्शीमध्ये एका डाळ कारखान्याची भर पडून त्यांची एकूण संख्या २३ इतकी झाली.[५४]

२४ डिसेंबर १९६४ पासून सरकारच्या परवानगीशिवाय महाराष्ट्राबाहेर तूर, मुग, तूरडाळ, मुगडाळ पाठविण्यास किंवा आयात करण्यास बंदी घालण्यात आली. त्यामुळे तुरीचे भाव मंदावले. परप्रांतांतून मागणी असूनही केवळ बंदीमुळे तूरडाळ बाहेर पाठविता आली नाही. तरीही बार्शीच्या तूरडाळीस मुंबई, पुणे, कराड, कोल्हापूर व कोकण भागातून मागणी राहिली. अशाही स्थितीमध्ये हा उद्योग आपले मजबूत अस्तित्व टिकवून होता. या प्रांतबंदीच्या काळातही बार्शीच्या तूरडाळीला ११२ ते ११६ रूपये प्रती क्विंटल इतका भाव होता.[५५] प्रांतबंदीमुळे तालुक्यातील डाळ कारखानदाराकडे तूरडाळीचे जुने साठे शिल्लक होते.२५ जानेवारी १९६६ मध्ये तूरडाळीची निर्यात बंधमुक्त केल्यामुळे तालुक्यातील डाळ कारखानदारीने जास्त जोर पकडला.[५६]

इ. स. १९६६-६७ मध्ये पावसाच्या अभावामुळे तुरीचे पीक बेताचेच होते. मात्र तालुक्यातील डाळ कारखानदारांकडे जून्या तूरडाळीचे साठे वाढत्या भावाच्या अपेक्षेने अडकून पडले होते. जुन्या तूरडाळीचे भाव १०८ ते ११२ रूपये प्रती क्विंटल असे होते. नवीन डाळीस अद्यापही गिऱ्हाईक नव्हते. त्यामुळे डाळ कारखानदार तूर घेण्यास उत्सूक नव्हते. जानेवारी १९६७ अखेर तूरडाळीस तूतीकोरीन, मडगाव, हुबळी,

कोईमतूर या पेठेतून मागणी वाढल्याने तूरडाळीचे भाव ११० ते ११५ रूपये प्रती क्विंटल पर्यंत वाढले. मे १९६७ मध्ये तर तूरडाळीचे भाव १६० ते १७० रूपये प्रती क्विंटल पर्यंत वाढले.[५७]

तक्ता क्र. ३२

बार्शी पेठेतील तुरीची आवक व किंमत (इ. स. १९५१-१९९०)

वर्ष	आवक	किंमत (रू)
१९५१-५२	१,१९,७३९ मण	१६,८६,५३९
१९५५-५६	१,९५,१८५ मण	०३,३६,५५२
१९६१-६२	१,४०,४८५ क्विंटल	५४,८२,१९२
१९६५-६६	३१,५१७ क्विंटल	२६००,३७३
१९७१-७२	९,३९६ क्विंटल	१०,६२,३९८
१९७७-७८	५७,८४१ क्विंटल	०१,६७,९२,२६९
१९८५-८६	७७,२५६ क्विंटल	०२,७६,९७,०६२
१९९०-९१	१,३९,६२८ क्विंटल	११,७०,७७,५००

(संदर्भ :- कृषी उत्पन्न बाजार समिती बार्शी, वार्षिक अहवाल, संबंधित वर्ष.)

ऑक्टोबर-नोव्हेंबर १९६८ मध्ये तूरडाळीचे भाव १८० ते २५० रूपये प्रती क्विंटल इतके वाढले. हा या वर्षापर्यंतचा सर्वात जास्त भाव होता. तुरीच्या प्रतवार विक्री पध्दतीमुळे या पेठेमध्ये तुरीची आवक प्रचंड वाढली. मात्र सर्वत्र डाळीचा भरपूर पुरवठा झाल्यामुळे तुरीस मागणी कमी झाली. असे असले तरी तूरडाळीला आलेल्या प्रचंड भावामुळे तालुक्यातील डाळ कारखानदारांचा खूप फायदा झाला.[५८]

इ. स. १९७१ साली मे महिन्यातच पाऊस सुरू झाल्याने डाळ कारखानदारांची तुरीची मागणी घटली. कारण पावसाळ्यामध्ये तूरडाळ वाळविता येत नाही. त्यामुळे या वर्षी केवळ ९ डाळ कारखाने सुरू होते.[५९] इ. स. १९७१-७२ मध्ये आवर्षणामुळे तुरीचे आवक ६७ हजार क्विंटल वरून ती ९ हजार क्विंटलवर आली. पीकपाण्याच्या अंदाजावरून तालुक्यातील डाळ कारखानदारांनी १४२ रूपये प्रती क्विंटल याप्रमाणे तूर खरेदी केली, पण तूरडाळीस फारशी मागणी नसल्याने तुरीचे भाव पुन्हा घटले.[६०]

तक्ता क्र. ३३

बार्शीतून होणारी तूरडाळीची निर्यात (प्रमाण : रेल्वे वॅगन्स)

इ. स.	निर्यात	इ. स.	निर्यात
१९५१-५२	१२४	**१९६५-६६**	१४७
१९५६-५७	१२४	**१९६६-६७**	१३६
१९५९-६०	८६	**१९७०-७१**	४१
१९६०-६१	८९	**१९७१-७२**	४३
१९६१-६२	१२०	**१९७३-७४**	२१
१९६२-६३	१२४	**१९७४-७५**	२५
१९६३-६४	२४०	**१९७५-७६**	७०
१९६४-६५	५५	**१९७७-७८**	१४

(संदर्भ : कृषी उत्पन्न बाजार समिती बार्शी, वाषिक अहवाल, इ.स. १९५४-५५ते १९७७-७८.)

इ. स. १९७२-७३ मध्ये दुष्काळी परिस्थितीमुळे शेतीची फार दुरावस्था झाली. पण तरीही बार्शी पेठेमध्ये तुरीचा व्यापार चांगला झाला. तूरीचे भाव २३५ रूपये प्रती क्विंटल पर्यंत वाढले. तालुक्यातील डाळ कारखानदारांना याचा फायदा झाला. इ. स. १९७२-७३ च्या दुष्काळातही येथील डाळ कारखानदारी चांगल्या अवस्थेत होती.[६१] इ. स. १९७४-७५ मध्ये केरळ, पश्चिम बंगाल, कर्नाटक, तामिळनाडू, गुजरात, या राज्यांमध्ये तालुक्यातून मोठ्या प्रमाणात तूरडाळीची निर्यात झाली. या वर्षात तूरडाळीचे भाव चांगले व टिकून होते.[६२] इ. स. १९७७-७८ मध्ये तुरीचे पीक कमी आल्याने बाजारात सर्वत्र याची टंचाई दिसून आली. परिणामी तूरडाळीचे भाव आकाशाला भिडले. या वर्षामध्ये येथील डाळ कारखानदारांनी गुजरात, तामिळनाडू, केरळ, कर्नाटक या राज्यात मोठ्या प्रमाणात डाळीची निर्यात केली.[६३]

इ. स. १९६२ मध्ये लघु उद्योगांतर्गत जिल्ह्यामध्ये फॅक्टरी ॲक्ट अंतर्गत १३ डाळ कारखाण्याची नोंद झाली होती. इ. स. १९७७ पर्यंत ही संख्या २३ पर्यंत गेली. यापैकी ५ डाळ कारखाण्याचे सर्वेक्षण करण्यात आले. या ५ पैकी ३ डाळ कारखाने बार्शी तालुक्यात होते. वर्षातून हे कारखाने ८ ते १० महिने चालत.[६४] इ. स. १९८५-८६ मध्ये तुरीची आवक मोठ्या प्रमाणात टिकून होती. तुरीचे भावही ३४५ ते ५६८ रूपये प्रती क्विंटल पर्यंत वाढले. या वर्षी प्रामुख्याने तालुक्यातील स्थानिक डाळ कारखानदारांनीच मोठ्या प्रमाणावर तूर खरेदीदार होते. या वर्षामध्ये स्थानिक डाळ कारखानदारांनी तामिळनाडूमध्ये ४२ रेल्वे वॅगन्स शिवाय मुंबई व पुणे या पेठेमध्ये मोठ्या प्रमाणात डाळीची विक्री केली.[६५] इ. स. १९८७-८८ या वर्षात बार्शी पेठेत तुरीची आवक मोठ्या प्रमाणात झाली. तुरीची आवक जास्त झाल्याने वर्षभर डाळ

कारखानदारांची खरेदी टिकून होती. याही वर्षात तामिळनाडूमध्ये मोठ्या प्रमाणात डाळीची निर्यात झाली. या वर्षाखेर तालुक्यातील डाळ कारखान्यांची संख्या २६ इतकी झाली.[६६]

इ. स. १९८७-८८ च्या तुलनेत इ. स. १९८८-८९ मध्ये तुरीची आवक २५ हजार क्विंटल कमी झाली. तरी वर्षभर स्थानिक डाळ कारखानदारांनी तूर खरेदी केली. कारण तूरडाळीला दक्षिणेतील राज्यातून प्रचंड मागणी वाढली होती. आंध्र प्रदेश, कर्नाटक, केरळ, तामिळनाडू, गोवा राज्याप्रमाणेच पुणे व मुंबई या भागांतून डाळीला वर्षभर मागणी होती.[६७]

बार्शीच्या व्यापार व उद्योग क्षेत्राच्या विकासामध्ये भर घालणाऱ्या विविध घराण्यामध्ये सोमाणी घराणे फार महत्वाचे मानले जाते. याचे सर्व श्रेय या घराण्यातील श्री. रामचंद्रभाऊ भगवानदास सोमाणी यांच्याकडे जाते. खऱ्या अर्थाने या घराण्याच्या व्यापार उद्योगाचा प्रारंभ रामचंद्रभाऊ यांचे जेष्ठ बंधू मोतीलाल सोमाणी यांनी केला असला तरी त्याची वाढ व विकास कष्टाने व कल्पकतेने श्री. रामचंद्रभाऊ सोमाणी यांनीच घडवून आणली. उद्योगामध्ये विशेषत: बार्शीच्या डाळ उद्योगामध्ये सोमाणी घराणे अग्रेसर आहे. जवळ-जवळ ७५ वर्षांपेक्षा जास्त काळापासून डाळ उद्योगामध्ये हे घराणे कार्यरत आहे. या घराण्याची बार्शीतील व्यापाराची सुरूवात आडत दुकानापासून झाली.[६८]

हे सोमाणी घराणे मुळचे मराठवाड्यातील उस्मानाबाद जिल्ह्यातील तेर या गावचे आहे. त्यांचे वडील भगवानदास हे शेतकरी होते. मात्र त्यांना आपल्या मुलांनी चांगले उच्च शिक्षण घ्यावे असे वाटत होते. त्यामुळे त्यांनी आपली तीन मुले मोतीलाल, रामचंद्र व द्वारकादास यांना शिक्षणासाठी बार्शीमध्ये पाठविले. येथूनच सोमाणी घराण्याचा व बार्शीचा सहवास सुरू झाला. या तीन बंधूंपैकी सर्वात जेष्ठ असणारे मोतीलाल सोमाणी यांनी सर्वप्रथम व्यापार-उद्योगामध्ये उडी घेतली. त्यांच्या आग्रहामुळेच रामचंद्र भाऊंनी व्यापारास सुरूवात केली. सातत्याने कष्ट करण्याच्या प्रवृत्तीमुळे अल्पावधीतच रामचंद्र भाऊंनी डाळ उद्योगामध्ये बार्शी सारख्या ठिकाणी चांगलाच जम बसविला. आपल्या डाळ कारखाण्यासाठी त्यांनी गुणवत्तेच्या आधारे दक्षिण भारतातील बहुसंख्य बाजारपेठा काबिज केल्या. डाळ कारखानदारीमध्ये त्यांनी आपले चिरंजीव मुकुंद व उज्वल तसेच नातू नवल यांना उद्योजकीय स्वातंत्र्य दिले. त्यामुळे हे कुटुंब बार्शीच्या डाळ उद्योगामध्ये खूप प्रसिध्दिस आहे.[६९] श्री. रामचंद्रभाऊ भगवानदास सोमाणी यांनी इ. स. १९५० मध्ये बार्शीमध्ये जामगाव रोड या ठिकाणी आपली स्वतंत्र डाळ मिल सुरू केली. या मिलमध्ये प्रामुख्याने तूर डाळीची निर्मिती केली जाते. गुणवत्तेनुसार या मिलमधील अनुक्रमे त्रिमूर्ती छाप, गणपती छाप व स्वस्तिक छाप हे डाळींचे तीन प्रमुख प्रकार आहेत. या उद्योगामधील विविध यंत्रांची सध्याची किंमत ६० लाख रूपये इतकी आहे. या मिलचे खेळते भांडवल ५० लाख रूपये इतके आहे. सदर भांडवल

उभारणीमध्ये प्रामुख्याने बँकेचे सहकार्य लाभले. या कारखान्यामध्ये कामगारांची संख्या २० इतकी आहे. यामध्ये १५ कामगार बार्शी तालुक्यातील आहेत तर ५ कामगार बिहारचे आहेत. या कामगारांना दररोज ३०० ते ५०० रूपयांपर्यंत वेतन दिले जाते. कारखान्यातील कामगारांना विविध सणांना भेटवस्तू दिल्या जातात. शिवाय प्रसंगानुरूप योग्य ती मदत केली जाते. या कारखान्यामधून वार्षिक २० हजार क्विंटल डाळीचे उत्पादन घेतले जाते. या उद्योगासाठी आवश्यक असणारा कच्चा माल बार्शी तालुका, मराठवाडा, विदर्भ, आंध्र प्रदेश, कर्नाटक, बिहार, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश अशा विविध ठिकाणांहून आणावा लागतो. पूर्वी हा कच्चा माल केवळ स्थानिक व मराठवाड्यामधून उपलब्ध होत होता. मात्र लातूर, माजलगाव, बीड येथे डाळींचे कारखाने सुरू झाल्यामुळे मराठवाड्यातून या कारखान्यासाठी येणाऱ्या कच्च्या मालाचे प्रमाण कमी झाले आहे. मोतीलाल सोमाणी यांची विजयकुमार, विनोदकुमार, जुगलकिशोर व श्रीवल्लभ अशी चार मुले स्वतंत्रपणे डाळ उद्योगामध्ये कार्यरत आहेत. या प्रत्येकाच्या डाळ मिलचे भांडवल ९० लाखापेक्षा जास्त आहे. या भांडवल उभारणीमध्ये बँकांचा मोठा वाटा आहे. या मिलचा प्रत्येकी वार्षिक खर्च ४५ ते ५० लाख रूपये इतका आहे. या प्रत्येकाच्या डाळ मिलमधील कामगारांची संख्या २० पेक्षा जास्त असून त्यांना महिना ३ ते ५ हजार रूपये वेतन दिले जाते. कामगारांचे कामाचे ८ तास असतात.[७०]

श्री. शामसुंदर शंकरलाल पुरोहित यांनी इ. स. १९७० मध्ये बार्शी येथे ' राम डाळ मिल ' ची स्थापना केली. या मिलमधून तूरडाळीचे फार मोठ्या प्रमाणावर उत्पादन घेतले जाते. या कारखान्याचे एकूण भांडवल ९० लाख रूपये इतके आहे. याचा प्रमुख आधार बँक आहे. या मिलमध्ये ९ स्त्रिया व १२ पुरूष कामगार आहेत. त्यांना महिना ३ ते ५ हजारापर्यंत वेतन दिले जाते. अर्थात आवश्यकतेनुसार कामगारांना विविध सोयी-सवलती दिल्या जातात. या मिलसाठी आवश्यक असणारा कच्चा माल प्रामुख्याने स्थानिक व आसपासच्या परिसरातून येतो. कच्चा माल, वाहतूक, मजूरी, जाहिरात, कर्ज व इतर खर्च असा एकूण ३० लाख रूपये या डाळ मिलचा वार्षिक खर्च आहे. येथे तयार होणारी डाळ प्रामुख्याने महाराष्ट्रातील पुणे, कोल्हापूर, मुंबई अशा विविध बाजारपेठांमध्ये पाठविली जाते. उत्तम प्रतीच्या डाळ निर्मितीबरोबरच कामगारांच्या हितसंवर्धनाला या मिलमध्ये प्राधान्य दिले जाते. म्हणूनच ऐन दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर स्थापन झालेल्या या मिलने उत्तम व्यवस्थापनाच्या माध्यमातून आजतागायत आपले अस्तित्व जपत बार्शीच्या डाळ कारखानदारीमध्ये उल्लेखनीय योगदान दिले आहे.[७१] बार्शीमध्ये दैनंदिन १०० क्विंटल क्षमतेपासून २००० क्विंटल क्षमतेपर्यंत डाळ निर्मिती करणारे कारखाने आहेत. येथील डाळ कारखानदारांनी बदलत्या काळाबरोबर आधुनिकतेचा स्विकार केल्यामुळेच येथे या व्यवसायाचा मोठ्या प्रमाणावर विकास झाला. बार्शीमध्ये मैनुद्दीन तांबोळी यांच्या बाबा इंडस्ट्रिज व व्ही. सी. पी. इंडस्ट्रिज हे दोन मोठे डाळ कारखाने आधुनिक पध्दतीने व मोठ्या क्षमतेने सुरू आहेत. या डाळीबरोबरच या कारखान्यांतून

जनावरासाठी खाद्य म्हणून कळणादेखील निर्माण केला जातो. याला शेतकरी वर्गातून खूप मागणी आहे. तूर डाळीबरोबरच हरभरा, मुग, उडीद आदी प्रकारच्या डाळीचेही बार्शीमध्ये उत्पादन घेतले जाते. देशाच्या विविध भागात बार्शीतील डाळीचे हरण छाप, ५०१ छाप, उडता घोडा, बाबा डिलक्स, बाबा ऑरेंज असे अनेक ब्रँड प्रसिध्द आहेत. या डाळ कारखानदारीमुळे सुमारे १००० लोकांना रोजगार मिळाला आहे. बार्शीतील कारखानदारांनी वाढत्या स्पर्धेतही बार्शीच्या डाळीचा दर्जा राखण्यामध्ये यश मिळविले आहे.[७२]

तालुक्यातील विविध डाळ कारखान्यामध्ये विविध जाती-जमातीचे लोक एकत्र काम करू लागले. हे कामगार एकमेकांच्या सुख दुखाःत सहभागी होऊ लागले. यातून जातीय सलोखा व सामाजिक समता निर्माण होण्यास मदत झाली. भारतीय उद्योगामध्ये स्त्रियांना अत्यंत नगण्य असे स्थान होते. परंतू बार्शी तालुक्यातील डाळ उद्योगामध्ये अगदी सुरूवातीपासून महिला पुरूषाच्या बरोबरीने काम करत आहेत. थोडक्यात समाजातील हीन समजल्या जाणाऱ्या वर्गाला समाजाच्या मुख्य प्रवाहामध्ये आणण्याचे कार्य तालुक्यातील डाळ उद्योगांनी काही प्रमाणात केले आहे.

५.४.२ सूत व कापड उद्योग

कापसाचा उगमच हिंदुस्थानमध्ये झाल्याचे मानले जाते. वृक्षरूपी कापसाचे तंतू कापडनिर्मितीस उपयुक्त ठरतात यावर मुळात पाश्चात्यांचा विश्वासच नव्हता. परंतू ज्यावेळी हे सिध्द झाले तेव्हापासून त्यांनी आपल्या वाड्.मयामध्ये कापसाचे वर्णन व गुणगाण करण्यास सुरूवात केली. प्राचीन काळी गंगा, सिंधू या नदयांच्या खोऱ्यात कापसाची उत्कृष्ट लागवड केली जात होती. पूर्वी हा कापूस इतका सुंदर होता की त्यापासून जी वस्त्रे बनविली जात असत, ती मौल्यवान वस्तूंनी मढवून अधिक आकर्षक व किंमती बनविली जात. ही वस्त्रप्रावरणे परदेशात ' हीरक वस्त्र, मणिचीरा वस्त्र ' अशा रचनात्मक नावांनी राजेरजवाडयास भारतीयांची भेट म्हणून पाठविली जात असत. भारतामध्ये येणाऱ्या परदेशी प्रवाशांचे लक्ष याकडे गेले. त्यांनी या वस्त्रांना ' भारतीय विणलेली हवा ' असे संबोधले. या वस्त्रोद्योगाच्या माध्यामातून युरोप- आशिया खंडात व्यापार वाढीस लागला. यामुळे भारतीय कापसाचा अभ्यास करण्याची प्रवृत्ती पाश्चिमात्यात निर्माण झाली व त्यातूनच पुढे पाश्चात्यांनी आपल्या देशामध्ये कापूस उत्पादनाचे प्रयोग सुरू केले. जगातील सर्व कापसामध्ये अटलांटिक महासागरातील वेस्ट इंडिज बेटापैकी ' फिजी ' या बेटामध्ये उत्पादीत होणारा कापूस हा गुणवत्ता, सुबकता, आकर्षकता, उपयुक्तपणा, तलमपणा या दृष्टीने सर्वात श्रेष्ठ समजला जातो. येथील कापूस रेशमाचा गुंडा वाटावा इतका हलका, सोनेरी रंगाचा व लोण्याहूनही मऊ आहे. पूर्वी ज्या हातमागाच्या सहाय्याने वस्त्रनिर्मिती होत होती ती अतिशय मंद होती. पुढे एका कल्पक विणकराने इ. स. १७३३ मध्ये 'धावता धोटा' शोधून काढला.[७३]

औद्योगिक क्रांतीच्या प्रारंभावस्थेत आपल्या कल्पकतेने व हुशारीने यांत्रिक सूत कताई यंत्राची निर्मिती करणारा ' रिचर्ड आर्कराइट ' हा एक दृष्टा उद्योजक होता. त्याने हौशी संशोधकांना सर्वतोपरी मदत करून यंत्र निर्मितीला चालना देऊन सूत कताई यंत्र तयार करून घेतले. यामुळे सूत कताईच्या कामाला कमालीचा वेग आला. तसेच रोजगारांच्या संधी वाढल्या. यंत्राच्या निर्मितीला चालना देणारा हा उद्योजक इतरांसाठी निश्चितच प्रेरणास्थान ठरला.[७४]

यामुळे वस्त्रनिर्मितीस गती आली. तर वस्त्रोपयोगी सूताचा अभाव जाणवू लागल्यामुळे पुढे इ. स. १७६४ मध्ये ' जेम्स हरग्रीव्हज ' या कल्पक इंग्रजाने अधिक उत्पादन देणाऱ्या जेनिचा शोध लावला. या जेनिवर एका वेळी एकच सुई वापरली जात असल्याने उत्पादन गतीशील झाले, मात्र ते मुबलक नव्हते. त्यामुळे इ. स. १९७५ मध्ये ' कार्टरीट ' याने वेगवान व जलद उत्पादन देणाऱ्या ' पावर लूम ' चा शोध लावला. पूर्वी भारतामध्ये वस्त्रनिर्मिताचा व्यवसाय घरगुती स्वरूपाचा होता. इंग्रजांमुळे भारतीयांना या उद्योगाचे महत्व लक्षात आले. यातूनच इ. स. १८५४ मध्ये ' कासवजी दादाभाई दावर ' या पारशी व्यक्तीने ' मुंबई ' येथे भारतातील पहिली कापड गिरणी उभारली. पुढे या उद्योगाने देशात फार मोठे स्वरूप धारण केले. त्यातूनच मुंबई, अहमदाबाद, सोलापूर, नागपूर, मद्रास, कानपूर, कोईमतूर अशी अनेक शहरे वस्त्रोद्योगाची प्रमुख केंद्रे बनली.[७५]

भारतात विशेषतः महाराष्ट्रामध्ये सूती वस्त्रोद्योग फार मोठ्या प्रमाणामध्ये पसरलेला आहे. इंग्रजांच्या सान्निध्यामुळे पारशी, भाटीया, मारवाडी, गुजराथी लोक व्यापार-उद्योगात पुढे आले. त्यांच्या कुशलतेचा, भांडवलाचा व माहितीचा आपोआपच महाराष्ट्राला उपयोग झाला. पुढे मुंबईत गिरण्यांची संख्या वाढू लागल्यामुळे दुसऱ्या ठिकाणी गिरण्या स्थापन करण्यास सुरूवात झाली. यातूनच सोलापूर जिल्ह्यामध्ये आधुनिक सूती वस्त्रोद्योगाचे आगमन झाले.[७६]

' एक स्पिंडल ' म्हणजे सूत गिरणीचे परिमाण होय. स्पिंडलच्या एकूण संख्येवर गिरणीची कार्यक्षमता समजते. काही वर्षापूर्वी जिला सूत गिरणी असे म्हटले जायचे ती साधारणतः ४० हजार स्पिंडल्सची असायची. काही गिरण्या यापेक्षाही मोठ्या असत. परंतू अलिकडच्या सहकारी तत्वानुसार ज्या नवीन गिरण्या उदयास आल्या आहेत त्या साधारणतः त्यांची कार्यशक्ती बरीच मर्यादित म्हणजे १२ ते १६ हजार स्पिंडल्स इतकी आहे. गिरणीच्या सूत निर्मितीच्या प्रक्रियेचे दोन प्रकार मानले जातात. एक म्हणजे केवळ सूत निर्मिती करणारी यंत्रयुक्त सूत गिरणी, तर सूत निर्मितीनंतर कापडही तयार केले जाते त्याला ' कॉपोनंट मिल ' म्हणतात.[७७]

पेशवाईच्या काळात सोलापूरातील हातमाग व्यवसायाच्या विकासास चालना मिळाली. पुढे इ. स. १८१८ मध्ये ब्रिटिश सैन्य सोलापूरात घुसल्यानंतर तेथील विणकर मोठ्या प्रमाणात बार्शी तालुक्यातील ' वैराग ' येथे स्थलांतरीत झाले.[७८] सूत गिरणी हा सोलापूर जिल्ह्यातील पहिला संघटीत उद्योग होता. याचे प्रमुख केंद्र बार्शी आणि सोलापूर हे होते. सोलापूरमधील कापड गिरण्यासाठी वार्षिक सरासरी ७८४ टन कापूस लागत होता. यापैकी दोन तृतियांश कापूस बार्शीमधून जात होता.[७९]

इ. स. १९६३ च्या सुमारास सोलापूर जिल्ह्यामध्ये १२ हजार विणकर होते. तेथे विणकऱ्यांना ' मुंगा ' असे म्हणत. हातमागाच्या विकासासाठी सरकारने राज्य हातमाग मंडळाची स्थापना केली. विणकरांच्या सहकारी संस्था स्थापन करणे, त्यांना कर्ज व अनुदान देणे या माध्यमातून वेळोवळी या व्यवसायाला शासनाने प्रोत्साहन दिले आहे. कापड छपाई व रंगकाम हा उद्योग हातमागाच्या व्यवसायाला पूरक व सहाय्यकारक आहे. यामध्येही विणकर समाजच आढळतो. छापाईचा उद्योग ' खत्री ' लोक करतात. प्राचीन काळी भारतामध्ये हाताने कापडाला रंग देण्याची कला अस्तित्वात होती. विजेताअलेक्झांडर, शहाजहान, इंग्लंडचा राजा पहिला चार्ल्स यांना हिंदुस्थानात रंगविलेले कापड फार अवडत असे.[८०]

निजामाच्या कापूस उत्पादक प्रदेशासाठी ' बार्शी ' हे मुख्य व्यापारी केंद्र होते. इ. स. १८४० मध्ये निजामाच्या प्रदेशातून ५००० बैलगाड्या इतका कापूस आला. याची किंमत साधारणत: १,२५,००० रू. इतकी होती. बार्शी तालुक्यामध्ये सूतासाठीचे ३७६ हातमाग होते तर लोकरीसाठीचे ११७ हातमाग होते. जिल्ह्यामध्ये विणकरांची जी संख्या होती त्यामध्ये ' बार्शी ' व ' वैराग ' ही खूप महत्वपूर्ण ठिकाणे होती. येथील बहुतांशी विणकर स्वतंत्रपणे विणायचे तर काही रोजंदारीवर दिवसाला २ ते ६ आणे या दराने विणायचे. बार्शी तालुक्यामध्ये बार्शी, वैराग, तडवळे व पांगरी ही विणकरांची प्रमुख ठिकाणे होती. कापसापासून व लोकरीपासून कपडे तयार करण्याच्या व्यवसायामध्ये हे विणकर गुंतलेले होते. त्यांच्याकडे कापसासाठीचे ३७६ हातमाग तर लोकरीसाठीचे ११७ हातमाग होते. या माध्यमातून बार्शीमध्ये प्रत्येक आठवड्याला १ लाखापर्यंत तर वैरागमध्ये १४ हजारापर्यंतच्या मालाची उलाढाल होत असे. सोलापूरमध्ये तयार झालेले कापड स्थानिक बाजाराप्रमाणे बार्शी, विजापूर आणि निजामाच्या प्रदेशात पाठविले जायचे. बार्शीमध्ये कापसाच्या गाठी बनविण्याचे दोन कारखाने होते. यापैकी एक कारखाना इ. स. १८६६ मध्ये ईस्ट इंडिया प्रेस कंपनी यांनी सुरू केला होता तर दुसरा कारखाना इ. स. १८७६ मध्ये डब्ल्यू. ए. ग्रॅहम आणि कंपनी यांनी सुरू केला होता. कापसाच्या हंगामामध्ये या कंपन्या येथील कामगारांना दिवसाला ८ ते १२ आणे पगार देत. या कारखान्यांमध्ये काम करणारे बहुसंख्य लोक मराठा व मुस्लिम होते. येथील कारखान्यामध्ये तयार झालेल्या कापसाच्या गाठी मुंबईला पाठविल्या जायच्या. [८१]

स्थानिक लिंगायत, कोमटी, गुजर मारवाडी व मुंबई येथील भाटिया हे कापसाचे प्रमुख व्यापारी होते. इ. स. १८७० पर्यंत कापसाची मुख्य बाजारपेठ सोलापूर होती. पुढे इ. स. १८७० नंतर ' बार्शी ' ही कापसाची मुख्य बाजारपेठ बनली. कारण सोलापूरमधील व्यापाऱ्यांनी कापसाच्या प्रत्येक बंडलमागे विशिष्ट प्रमाणामध्ये जकात घेण्यास सुरूवात केली. त्यामुळे निजामाच्या प्रदेशातील व्यापाऱ्यांनी बार्शी हे आपले कापसाचे मुख्य केंद्र बनविले. त्यामुळे निजामाच्या प्रदेशातील व्यापाऱ्यांनी सोलापूरकडे दुर्लक्ष करून बार्शीला कापसाचे मुख्य केंद्र बनविल्याने सोलापूरमधील कापसाच्या गाठी बनविण्याचे कारखाने बार्शीला आले. त्यामुळे मुंबईचे व्यापारीही बार्शीला येऊ लागले. बार्शीमध्ये येणारा कापूस प्रामुख्याने दिगनोर, दिसमत, खामदाबाद, किरकोली, मदनूर, माकीर, नांदेड, पार्ली आणि उनवीर या निजामाच्या प्रदेशातून येत असे. बार्शीमध्ये कापसाची खरेदी-विक्री दोन प्रकारे होत असे. एकतर स्थानिक व्यापारी किंवा शेतकरी हा अडत्याच्या माध्यमातून आपला कापूस बाजारामध्ये विकत असे. अथवा मुंबई किंवा बार्शीचे व्यापारी किंवा त्यांचे एजंट कापूस खरेदीसाठी दिवाळीनंतर निजामाच्या कापूस उत्पादन घेणाऱ्या प्रदेशाचा दौरा करत असत. बार्शीमध्ये साळी लोक या कापड व्यवसायात मोठ्या प्रमाणात होते. ते कापड विणण्याचा व्यावसाय करत. निजामाच्या प्रदेशातून बार्शीमध्ये येणाऱ्या कापसाची वार्षिक उलाढाल ३६ लाख रूपये इतकी होती. सोलापूर जिल्ह्याच्या कापूस उत्पादक प्रदेशामध्ये जिनिंग आणि प्रेसिंगचे कारखाने होते. नातेपुते हे अशा कारखान्याचे मुख्य केंद्र होते. इ. स. १९०३ मध्ये बार्शी तालुक्यामध्ये जिनिंग आणि प्रेसिंगचे ६ कारखाने होते. यामध्ये ४७३ कामगार काम करत होते. इ. स. १९११ मध्ये या कारखान्यांची संख्या ५ इतकी झाली, तर कामगारांची संख्या ३६० इतकी झाली. पुढे इ. स. १९२१ मध्ये या कारखान्यांची संख्या १३ इतकी झाली. थोडक्यात सातत्याने ही संख्या वाढत होती.[८२]

संपूर्ण मराठवाड्यातील शेतमाल विक्रीसाठी बार्शीला मोठ्या प्रमाणावर येत असे. यामध्ये कापसाचे प्रमाण उल्लेखनीय होते. त्यामुळेच येथे कापूस उद्योगाची बीजे पेरली गेली. यातूनच बार्शीमध्ये सुलाखे, काडादी, गोकूळदास कल्याणजी, कवठेकर, भरतपुरे, गमाडीया, माने, कोठारी, मेंडके, मुलजी जेठा, नारळी अशा बारा जिनिंग मिल सुरू झाल्या. या समृध्द पार्श्वभूमीने बार्शी तालुक्यामध्ये सूत गिरण्या उभारणीस चालना दिली.[८३]

इ. स. १९२१ पर्यंत बार्शीमध्ये एक सूत गिरणी होती. या सूत गिरणीमध्ये १२२३ एवढे कामगार काम करत होते. इ. स. १९७७ अखेर तीन कापड गिरण्या झाल्या. सोलापूर येथील कापड गिरण्यांना लागणरे मध्यम व जाडेभरडे सूत बार्शी येथून पाठविले जायचे. इ. स. १९२८ मध्ये बार्शी येथे लोकमान्य सूत गिरणी सुरू झाली. यामध्ये सूत कातले जायचे. या गिरणीत त्यावेळी सूत कातण्याच्या ११,८४० चकत्या होत्या. इ. स. १९५२-५३ मध्ये १,०३२ चकत्या वाढविण्यात आल्या. इ. स. १९६१ अखेर या गिरणीमध्ये

१२,८७२ सूत कातण्याच्या चकत्या होत्या. या गिरणीच्या माध्यमातून १००० लोकांना रोजगार मिळाला. याचवर्षी बार्शीमध्ये जय शंकर सूत गिरणीची स्थापना झाली. या गिरणीमध्ये १४,५२० सूत कातण्याच्या चकत्या होत्या. याही गिरणीत सूत कातले जायचे. त्यावेळी येथे ८०० कामगार काम करत होते.[८४]

इ. स. १९४६ च्या मुंबई कायदयान्वये सोलापूर जिल्ह्यामध्ये ४ कामगार संघटनांची नोंद झाली. यामध्ये बार्शीच्या " राष्ट्रीय गिरणी कामगार संघाचा " समावेश होता. मुंबई कामगार कल्याण कायदा १९५३ अन्वये महाराष्ट्र कामगार कल्याण केंद्र अस्तित्वात आले. या मंडळाचे एक कार्यालय बार्शी येथे अद्यापही आहे.[८५]

५.४.२.१ लोकमान्य सूत गिरणी

२१ डिसेंबर १९२२ रोजी ' लोकमान्य कापड गिरणी ' ची स्थापना झाली. ही मिल लोकमान्य टिळक यांच्या प्रेरणेने सुरू केल्यामुळे या मिलचे संस्थापक ' श्री. काकासाहेब सुलाखे ' यांनी या मिलला टिळकांचेच नाव दिले. श्री. काकासाहेब सुलाखे यांनी शेअर्सद्वारे या मिलसाठीचे भांडवल गोळा केले होते. या मिलचे सुरूवातीचे एकूण भांडवल ५० लाख रूपये एवढे होते. इ. स. १९२२ मध्ये या मिलचे प्रशासन पाहण्यासाठी ७ लोकांचे संचालक मंडळ नियुक्त केले होते. त्यांची नावे खालीलप्रमाणे.

१) श्री. सरदार व्ही. एन. मुतालिक (सातारा)

२) श्री. रामचंद्र मोरेश्वर साने (बार्शी)

३) श्री. विनायक दामोदर दातार (बार्शी)

४) श्री. लक्ष्मण विश्वनाथ पोकळे (मालेगाव)

५) श्री. शेठ रायमल हिरजी (कुर्डुवाडी)

६) श्री. शेठ रामचंद्र मुळचंद (बार्शी)

७) श्री. भगवंत पंढरीनाथ सुलाखे (बार्शी)

इ. स. १९२२ मध्ये ही मिल स्थापन झाली असली तरी प्रत्यक्ष सूत निर्मितीची सुरूवात ६ डिसेंबर १९२८ रोजी झाली. या मिलमध्ये १ नंबर पासून ते ३२ नंबर पर्यंतचे सूताचे उत्पादन घेतले जात होते.[८६]

सूताची जाडी व लांबी यांचा मेळ बसविण्यासाठी सूताला नंबर दिले जातात. १ हजार मीटर लांब व १ किलोग्रॅम वजन असणाऱ्या सूताला १ नंबर दिला जातो. याशिवाय सूताला नंबर देण्याच्या इतर पध्दती

आहेत, मात्र ही सर्वात सोपी पध्दत आहे.[८७] लोकमान्य मिलमध्ये १२,८७२ हातमाग, तर १००० पेक्षा जास्त कामगार होते. ही सूत कातन्याची मिल होती.[८८]

तक्ता क्र. ३४

लोकमान्य मिल बार्शी, आर्थिक उलाढाल

इ. स	वार्षिक उत्पन्न	वार्षिक खर्च	नफा	तोटा
१९३१	४२३५३३	३८५१८७	३८३४६	-
१९३५	४३४५२४	४२८११४	६४१०	-
१९४०	६९६७१४	७८८९५८	-	९२२४३
१९५०	७११२९०	९५६०७१	-	२४४७८१
१९५५	३६९२९१७	३६६४७३८	२८१७९	-
१९६०	७१६५२३५	६८२९१९४	३३६१३९	-

इ. स. १९४९ मध्ये या मिलला १,६४,९६५ रूपयांचा तोटा झाला. कारण जुलै १९४८ मध्ये मुंबई सरकारने सूत गिरण्यांवर अनेक निर्बंध घातले. तसेच या काळामध्ये कापसाचे दर व मजूरी वाढली. इ. स. १९४९ मधील तोटयामुळे ४ जानेवारी १९४९ रोजी ही मिल बंद करण्यात आली. या संकटातून मार्ग काढण्यासाठी या मिलच्या मालकांनी इंडस्ट्रियल फायनान्स कार्पोरेशन दिल्ली यांचेकडून ८ लाख रूपयांचे कर्ज घेतले. त्यामुळे पुन्हा ४ जानेवारी १९५० रोजी ही मिल चालू झाली. तरीही इ. स. १९५० मध्ये या मिलला २,४४,७८१ रूपयांचा तोटा झाला. इ. स. १९५२ मध्ये पहिल्या सहा महिण्यांमध्ये सूत बाजारात मंदी असल्याने व सूताचे भाव अस्थिर असल्याने पुन्हा मिल तोटयात गेली. इ. स. १९४९ व १९५० मध्ये झालेल्या तोट्याची भरपाई इ. स. १९५२ मध्ये करावी लागली होती.

इ. स. १९५३ मध्येही मिलला तोटा झाला, कारण या वर्षात जुलै महिन्यामध्ये सूतावरील नियंत्रण उठविण्यात आले. त्यामुळे लहान गिरण्यांना खुल्या बाजारात मोठ्या गिरण्यांशी स्पर्धा करावी लागली. सूताचे नियंत्रित दरही लहान गिरण्यांना परवडणारे नव्हते. त्यामुळे नियंत्रण उठविल्यानंतर सूताचे भाव खूपच उतरले. यामुळे हा तोटा सहन करावा लागला.[८९]

कामगार वर्गाच्या हितासाठी १७ मे १९३८ रोजी लोकमान्य मिलहँडस् को-ऑपरेटिव्ह सोसायटी स्थापन झाली. यामागे लोकमान्य मिलचे मॅनेजर श्री. सुलाखे. भ. प, श्री. क्षिरसागर, श्री. दिवाकर, श्री.

शुक्ला यांनी पुढाकार घेतला. सभासदांना भागाच्या रकमेइतकेच कर्ज वैयक्तिक जबाबदारीवर दिले जात असे. या सोसायटीने प्रारंभी केवळ कर्जव्यवहारच केले. पुढे इ. स. १९४१-४२ मध्ये किराणा-भुसार मालाचे दुकान चालू केले. या दुकानासाठी ज्वारी खरेदी करण्यास लोकमान्य मिलने ३०,००० रूपये भांडवल म्हणून बिनव्याजी दिले. युध्दजन्य परिस्थितीमुळे ज्वारीचे भाव उतरले होते. त्यावेळी या सोसायटीने एकदम भरपूर धान्य खरेदी केले. त्यामुळे सोसायटीच्या सभासदांना कमी दराने धान्य मिळू शकले. याच वर्षापासून या सोसायटीने कामगारांसाठी कापडाचे दुकान चालविले. ही दुकाने चार वर्षे चालविल्यानंतर पुढे इ. स. १९४५ मध्ये दुकानांचा व्यवहार स्वतंत्रपणे चालविता यावा या हेतूने सोसायटीच्या चालकांनी नवीन सप्लाय सोसायटी स्थापन केली. सभासदांच्या मनोरंजनासाठी व शारीरिक उन्नतीसाठी २६ मार्च १९५२ रोजी " मिल कामगार संस्कार केंद्र " स्थापन केले. स्वत:चे एक वाचनालय सुरू केले. वेगवेगळे सण-उत्सव मोठ्या उत्साहात साजरे केले जात. कामगारांच्या आरोग्याकडेही या सोसायटीने चांगले लक्ष दिले होते. या सर्व कार्यामध्ये ही मिल या सोसायटीच्या पाठीमागे खंबीरपणे उभी होती.[९०]

या मिलला जरी काही वेळा नुकसान झाले असले तरी मिल मालकांनी कामगारांच्या सुखसोयीकडे जाणीवपूर्वक लक्ष दिले. कामगारांच्या शारीरिक व मानसिक विकासासाठी एक संस्कार केंद्र सुरू केले. कामगारासांठी मिलमध्ये औषधोपचाराची सोय केली. उन्हाळयामध्ये कामगारांना थंड पिण्याचे पाणी मिळण्याची सोय केली. कुशल कामगार तयार व्हावेत या दृष्टीने टेक्निकल स्कूल चालविले. इ. स. १९५२ मध्ये सरकारने कामगारांसाठी केलेले विविध कायदे या मिलने कामगारांना लागू केले. यासाठी मिलला शासनाकडे जादा रक्कम भरावी लागली. इ. स. १९२२ ते १९६० या काळामध्ये ही मिल अनेक संकटावर मात करून उभी होती. यामध्ये श्री. पंढरीनाथ सुलाखे यांचे बहुमोल योगदान होते. इ. स. १९५७ ते १९५९ या काळामध्ये या मिलला तोटा झाला. कारण या काळात सूताला योग्य भाव मिळाले नाहीत. शिवाय इ. स. १९५८ मध्ये फेब्रुवारी ते एप्रिल दरम्यान मिल बंद होती, तर मे व जून मध्ये ती पूर्णवेळ चालू नव्हती. अशातच कामगारांनी पगारवाढ, महागाई भत्ता, बोनस मिळावा म्हणून मे. इंड्रस्ट्रियल कोर्ट मुंबई यांच्याकडे अर्ज केला. कोर्टाच्या निकालाप्रमाणे या मिलला कामगारांना रोज १ रूपये ६५ पैसे या प्रमाणे महागाई भत्ता द्यावा लागला. त्यामुळे ही मिल अधिकच तोट्यात गेली.[९१]

भगवंत पंढरीनाथ सुलाखे यांच्या पुढील वारसांनी या मिलच्या व्यवस्थापनाकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले. या ठिकाणचा पैसा दुसरीकडे गुंतविण्याच्या वृत्तीमुळे संबंधित मालकांनी या मिलच्या सुधारणेकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले. यातच कामगारांनी आपल्या विविध मागण्यांसाठी संप केला. त्यामुळे मिलच्या मालकाला मिल बंद करण्याची आयती संधीच मिळाली. मिलच्या मालकांना त्यांच्या मागण्या मान्य

करण्याऐवजी मिलच बंद केली. या मिलच्या मालकाचे तसेच मिलमधील कामगारांचे कपडे शिवण्याचे काम श्री. भगवान उध्दव लांडे यांच्याकडे होते. सध्या या मिलचे वारस बार्शीमध्ये नसतात.[९२]

५.४.२.२. जय शंकर सूत गिरणी (बार्शी टेक्सटाईल मिल)

बार्शी तालुक्यामध्ये कार्यरत असलेली ही एकमेव सूत गिरणी आहे. पूर्वी बार्शीमध्ये कापसाबरोबरच किराणा मालाचा मोठा व्यापार चालू होता. श्री. रामलिंगाप्पा सिद्रामाप्पा झाडबुके हे बार्शीतील एक फार मोठे किराणा दुकानदार होते. त्यावेळी बार्शीचे प्रसिध्द वकील गोविंद कृष्णात टिळक (तात्यासाहेब टिळक) औंधकर सभाग्रहामध्ये दर आठवडयाला व्याख्यान देत. यामध्ये श्री. रामलिंगाप्पा झाडबुके उत्साहाने भाग घेत. यातूनच तात्यासाहेब टिळक यांच्या प्रेरणेने बार्शीमध्ये एक सूत व कापड गिरणी काढण्याचा श्री. रामलिंगाप्पा झाडबुके यांनी ध्यास घेतला.[९३] इ. स. १९११ मध्ये त्यांनी गिरणी काढण्यासाठी शेअर्स गोळा केले. मात्र त्यांना त्यावर्षी गिरणी स्थापन करता आली नाही. असे घडले तरी त्यांनी आपला मनोदय बदलला नाही. यातूनच पुढे २ नोव्हेंबर १९२२ रोजी " दि जयशंकर मिल्स लिमिटेड बार्शी " ही सूत गिरणी स्थापन झाली. त्यावेळी या मिलचे भांडवल २० लाख रूपये इतके होते. इ. स. १९३० मध्ये श्री. रामलिंगाप्पा झाडबुके यांचे निधन झाल्यानंतर श्रीयुत रामलिंग सिद्रामप्पा झाडबुके हे मिलचे एकमेव संस्थापक मालक होते. पुढे त्यांचे चिरंजीव श्री. गणपत झाडबुके यांच्या हातात या मिलची सुत्रे आली. त्यावेळी मिलचा कारभार पाहण्यासाठी नियुक्त केलेले संचालक मंडळ खालीलप्रमाणे होते.

१) मे. जिवराज हरीश्चंद्र शहा

२) मे. गंगाधर आप्पा साखरे

३) मे. विठ्ठल महालिंग फलफले

४) मे. सिध्दलिंग विरभद्र शिलवंत

५) मे. चिंतामणी मोतीसा लाड

६) मे. गणपत रामलिंग झाडबुके [९४]

जय शंकर मिलच्या स्थापनेसाठी स्वामी परंडकर यांनीही खूप प्रयत्न केले. विदर्भापर्यंत प्रवास करून या मिलसाठी त्यांनी वीरशैव समाजाकडून हजारो रूपये जमा केले. वीरशैव समाजानेही त्याला प्रचंड प्रतिसाद दिला. वीरशैव समाजाच्या मालकीची एक सूत गिरणी व्हावी व त्यामार्फत वीरशैव समाजाचा आर्थिक विकास व्हावा असा परंडकरांचा हेतू होता. छत्रपती शिवरायांनी ' हर हर महादेव ' या गर्जनेने आपल्या कार्याची सुरूवात केली होती. त्याप्रमाणे स्वामी परंडकर व त्यांच्या सहकाऱ्यांची ' जय शंकर ' ही

गर्जना होती. म्हणून या मिलचे नाव ' जय शंकर ' असे ठेवण्यात आले.[९५] इ. स. १९२८ मध्ये ही ' जय शंकर ' सूत गिरणी सुरू झाली. त्यावेळी या मिलमध्ये १४,५२० हातमाग होते, तर ८०० पेक्षा अधिक कामगार होते. ही सूत कातन्याची मिल होती.[९६]

या मिलचे मालक श्री. गणपत रामलिंग झाडबुके यांना इ. स. १९४२ मध्ये इंग्रजांनी ' रावबहादूर ' ही पदवी दिली. हा झाडबुक्यांच्या वैभवाचा काळ मानला जातो. श्री. गणपत रामलिंग झाडबुके यांच्या मृत्यूनंतर श्री. शंकरराव ऊर्फ भाऊसाहेब झाडबुके हे या मिलचे मालक झाले. ते पुढे बार्शीचे नगराध्यक्ष झाले. त्यांना राजकारणात खूप रस होता. त्यामुळे त्यांचे मिलकडे दुर्लक्ष झाले. त्यांच्याच काळात मिलचे दिवाळे निघाले. पुढे इ. स. १९७२ मध्ये भारत सरकारने या मिलचा ताबा घेतला.[९७] त्याचा तपशील पुढीलप्रमाणे.

२ जून १९७० रोजी केंद्र शासनाने बार्शीच्या जय शंकर मिल साठी " उद्योग अधिनियम १९५१ " च्या १५ व्या कलमान्वये एका चौकशी समितीची नियुक्ती केली होती. या समितीने १६ जुलै १९७१ रोजी शासनाला आपला अहवाल सादर केला. या अहवालाच्या माध्यमातून या समितीने "उद्योग अधिनियम १९५१" च्या १८ 'अ' या कलमान्वये शासनाने ही गिरणी चालविण्यास घ्यावी अशी शिफारस केली. या अहवालाचा विचार करून केंद्र सरकारने ही गिरणी चालविण्यास घ्यावी असा राज्य शासनाने आग्रह धरला. १७ सप्टेंबर १९७१ रोजी राज्य शासनाने केंद्र सरकारला असे सूचित केले की, " ही गिरणी चालू न केल्यास ५०० पेक्षा अधिक कामगारांवर बेकारीचे संकट ओढवेल. त्यामुळे केंद्र शासनाने ही गिरणी चालविण्यास घ्यावी. शिवाय राज्य सरकार केंद्र शासनाने नियुक्त केलेल्या चौकशी समितीच्या शिफारसीशी सहमत आहे." यावेळी विधानसभा आश्वासन समितीवर बार्शीच्या तत्कालीन आमदार श्रीमती शैलजाताई शितोळे या होत्या. त्यांनीच हा प्रश्न उचलून धरला होता. ६ जानेवारी १९७२ रोजी केंद्र शासनाने राज्य सरकारला असे कळविले की " गिरणीला लागणाऱ्या आर्थिक सहाय्यापैकी ४९ टक्के सहाय्य देण्यास व राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळ या गिरणीस जे कर्ज देईल त्यासाठी तारण म्हणून गिरणीच्या स्थावर व जंगम मालमत्तेवर बोजा निर्माण करण्यास राज्य शासन तयार असेल तर ही गिरणी केंद्र सरकार चालविण्यासाठी विचार करेल." अशा आशयाचे पत्र केंद्र सरकारने ५ जानेवारी १९७२ रोजी राज्य सरकारला पाठविले. केंद्र सरकारच्या या पत्रावर राज्य शासनाने निर्णय घेण्यापूर्वीच ३० ऑक्टोबर १९७२ पासून या गिरणीचे व्यवस्थापन केंद्र शासनाने " सिक टेक्सटाईल अंडरटेकिंगज् इ .स. १९७२ " (टेकिंग ओव्हर ऑफ मॅनेजमेंट) या कायदयान्वये ताब्यात घेतले. त्यामुळे राज्य सरकारला केंद्र शासनाच्या ५ जानेवारी १९७२ रोजीच्या पत्रावर निर्णय घेण्याची आवश्यकताच राहिली नाही. या संपूर्ण प्रक्रियेमध्ये तत्कालीन मंत्री

श्री. न. म. तिडके यांनी मोलाची भूमिका पार पाडली. मात्र मिलमधील कामगारांच्या भविष्य निर्वाह निधीच्या थकबाकी वसूलीसंदर्भातील प्रश्न न्यायालयीन प्रक्रियेतून मार्गी लागला.[९८]

प्रतिवर्षाप्रमाणेच बार्शी टेक्सटाईल मिलने ५ मार्च ते ९ मार्च १९९० या कालावधीमध्ये राष्ट्रीय सुरक्षा दिवस व सप्ताह मोठ्या उत्साहाने राबविला. केंद्रीय श्रमिक संस्थेकडून मागविलेल्या विविध सुरक्षा साधनांचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. गत वर्षाच्या तुलनेत या वर्षी वृक्षारोपणाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहाने राबविण्यात आला. नेहमीप्रमाणेच त्याही वर्षी उद्घाटनाच्या निमित्ताने लावलेली पणती पूर्ण सप्ताह संपेपर्यंत चालू होती. त्या वर्षाच्या विशेष प्रदर्शनामध्ये मिलच्या आतील भागांच्या प्रभावी सुरक्षिततेच्या साधनांचे प्रदर्शन करण्यात आले. १ एप्रिल १९९० रोजी या मिलमध्ये हनुमान जयंती मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आली होती. यानिमित्त विविध खेळांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रीय मिल मजूर संघाचे अध्यक्ष श्री. हरिभाऊ नाईक व महाप्रबंधक ए. के. टंडन यांना निमंत्रित करण्यात आले होते. यावेळी श्री. हरिभाऊ नाईक यांनी या मिलच्या चांगल्या कार्यासाठी मिलचे कौतुक केले. यासाठीच्या कामगार व मिल व्यवस्थापन यांच्या सुसंबंधाचा आवर्जून उल्लेख केला.[९९]

" दि जय शंकर मिल एम्प्लॉईज को-ऑपरेटिव्ह सोसायटी " ही जय शंकर मिलमधील कामगारांची सोसायटी आहे. या मिलमधील कामगारांना पूर्वी पगाराचे प्रमाण फार कमी होते. त्यामुळे त्यांना लागणाऱ्या पैशाची सोय सावकार व विशेषत: पठाण यांच्याकडून होत असे. त्यांचे व्याजाचे दर खूप जास्त होते व पगाराच्या दिवशी मिलच्या दारातच वसुली करण्याचा प्रघात होता. त्यामुळे बहुतेक कामगारांकडे पैसाच शिल्लक राहत नसे. यातून मार्ग काढण्यासाठी मिलचे मॅनेजर श्री. कोरे व ऑफिस मॅनेजर श्री. पळनिटकर यांनी पुढाकार घेऊन १६ ऑक्टोबर १९३४ रोजी ही सोसायटी स्थापन केली. सुरूवातीला या सोसायटीचे केवळ १५ सभासद होते. प्रत्येक व्यक्तीच्या शेअर्सच्या आठपट, पगाराच्या चौपट किंवा ३०० रूपये यापैकी जी संख्या कमी असेल तेवढी कर्ज मर्यादा प्रत्येक सभासदांसाठी होती. काही अपवादात्मक परिस्थितीत १०० रूपये अधिक देण्याचा चेअरमनला अधिकार देण्यात आला होता. पेमेंट ऑफ वेजेस ॲक्टचे कलम ७ अन्वये मजुरांच्या पगारातून सोसायटीचे कर्ज वसूल केले जात होते. या सोसायटीने शेअर्स देखील हप्त्याने गोळा केले होते. कामगार सोसायट्यांमधील ही एक आदर्श सोसायटी आहे.[१००]

या सोसायटीला नेहमीच परिक्षणामध्ये 'अ' वर्ग मिळत असे. गुढी पाडव्याच्या मुहूर्तावर या सोसायटीने आपल्या ३२ सभासदांना टी. व्ही, १६ सभासदांना फॅन व ५ सभासदांना मिक्सर वाटप केले. इ. स. १९९० अखेर या सोसायटीच्या सभासदांची संख्या ५०० इतकी होती. इ. स. १९९० पर्यंत या सोसायटीने कोणत्याही वित्तीय संस्थेकडून कर्ज घेतलेले नव्हते. वेगवेगळया माध्यमातून आपल्या

सभासदांना या सोसायटीने १३ लाख रूपयांची मदत केली होती.[१०१] हँडलूम्स, पावरलूम्स, तुरूंग व पुनर्वसन-सरकारी उत्पादन विभागांना तसेच औद्योगिक घटकांना आवश्यक असणाऱ्या काऊंट नंबर ३ ते ४० पर्यंतच्या हँक आणि कोनवर एकेरी, दुहेरी तसेच दर्जेदार सूतांच्या धाग्याचे उत्पादन या बार्शी टेक्सटाईल्स मिल मध्ये मोठ्या प्रमाणावर घेतले जाते.[१०२]

नॅशनल टेक्सटाईल कार्पोरेशन दिल्ली यांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमामध्ये नॅशनल टेक्सटाईल कार्पोरेशनचा उत्कृष्ट मिलचा पुरस्कार इ. स. १९८८-८९ मध्ये या मिलला मिळाला. हा पुरस्कार तत्कालीन टेक्सटाईल मंत्री श्री. शरद यादव यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी नॅशनल टेक्सटाईल कार्पोरेशनचे अध्यक्ष श्री. अजित सिंह उपस्थित होते. महाराष्ट्रातील राष्ट्रीयीकरण झालेल्या मिलमध्ये या मिलचा राज्यात प्रथम क्रमांक होता, तर देशात तिसरा क्रमांक होता.[१०३]

" बार्शी टेक्सटाईल मिल " चा एकूण परिसर २८ एकर इतका आहे. शिवाय या मिलची ५० एकर खुली जागा आहे. या ठिकाणी सूताच्या गाठी बनविल्या जातात. साधारणतः प्रत्येक महिन्याला १ ते १.५ लाख किलो सूत निर्मिती केली जाते. या मिलमध्ये एकूण ५१८ कामगार कार्यरत आहेत. यापैकी २५२ कामगार कायम असून, २६६ कामगार कंत्राटी स्वरूपामध्ये कामावर आहेत. कायम कामगारांना दिवसाला २७५ ते ३७५ रूपये वेतन मिळते. तर कंत्राटी कामगारांना १९५ ते २४० रूपये वेतन मिळते. कामगारांचे कामाचे ८ तास आहेत. डी. के. शर्मा यांच्या काळात १२५ कामगारांना कायम करण्यात आले. दुसऱ्या शिप्टमध्ये महिला कामगार कामावर आल्यास त्यांना मिलच्या गाडीतून घरपोच केले जाते. कामगारांच्या नियमित उपस्थितीसाठी ही मिल बक्षिस योजना राबविते. महिन्याचे वर्किंग दिवस पूर्ण करणाऱ्या कामगाराला रोज ३० रूपये याप्रमाणे बक्षिस मिळते. वर्किंग दिवसांपेक्षा एक दिवस कमी भरला तर प्रत्येक दिवसाला २० रूपये, तर २ दिवस कमी भरले तर प्रत्येक दिवसाला १० रूपये बक्षिस म्हणून मिळतात. या मिलसाठी प्रामुख्याने मराठवाडा, पंजाब व विदर्भ येथून कच्चा माल येतो तर तयार होणारा माल इचलकरंजी, मालेगाव, बऱ्हानपूर, मध्य प्रदेश, कर्नाटक येथे निर्यात होतो. या मिलमध्ये २० काऊंट कॉटन ते ७४ काऊंट पॉलिस्टर पर्यंतचे सूत बनते.[१०४]

इ. स. २००४-०५ पूर्वी या मिलचा माल चीन मध्ये निर्यात होत होता. या मिलचा वार्षिक खर्च १५ कोटी रूपये इतका आहे. मिलची कार्यशक्ती उत्तम असल्यामुळेच ही मिल टिकून आहे. उच्चपदस्थ अधिकाऱ्यांचे या मिलकडे खूप लक्ष आहे. सध्या ' ना नफा ना तोटा ' या तत्वावर ही मिल चालविली जाते. असे असले तरी इ. स. १९८५-८६ मध्ये या मिलचा वार्षिक नफा २ कोटी रूपये इतका होता. प्रदुषण टाळण्यासाठी या मिलने परिसरात सर्वत्र झाडे व बागा लावल्या आहेत. शिवाय प्रदूषण टाळण्याचे आधुनिक

उपायही योजिले आहेत. सध्या या मिलची यंत्रसामग्री खूप जुनी असल्यामुळे त्याचा मिलच्या उत्पादनावर विपरित परिणाम होत आहे. त्यामुळे या मिलमध्ये नविन आधुनिक यंत्रसामग्री बसविण्याची एक योजना आहे. यासाठी ६८ कोटी रूपये खर्च अपेक्षित आहे. या मिलने व्यवसायाबरोबर आपले सामाजिक बांधिलकीही जोपासण्याचा सातत्याने प्रयत्न केला आहे. वेळोवेळी भूकंपग्रस्त, पूरग्रस्त तसेच दुष्काळ या प्रसंगी या मिलने मदत केली. शिवाय दरवर्षी गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कारावर भरपूर पैसे खर्च करून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्याचे काम या मिलने अविरतपणे केले आहे. या मिलने पैलवानांना सांभाळून कुस्ती या खेळास विशेष प्रोत्साहन दिले आहे. याशिवाय इतरही खेळांना प्रोत्साहन देण्याचे काम या मिलने सातत्याने केले.[१०५]

५.४.२.३ स्पिनिंग आणि विव्हिंग मिल, बार्शी / जुनी मिल (राजन कापड व सूत गिरणी)

इ. स. १९११ मध्ये गुजरातचे प्रसिध्द शेठ ' विद्युत प्रसाद देसाई ' यांनी बार्शी येथे " स्पिनिंग आणि विव्हिंग मिल " स्थापन केली. ही बार्शीमधील पहिली कापड व सूत गिरणी होती. या मिलच्या मालकीमध्ये ' श्री. जंबुआण्णा बाबाजी आरवडे ' हे विद्युत प्रसाद देसाई यांचे प्रमुख भागिदार होते. या मिलमध्ये ' धोतर ' व ' मदरा ' नावाच्या कापडाची निर्मिती होत असे. मदरा हे कापड परदेशात निर्यात केले जात होते. ही मिल १२ - १२ तासाच्या दोन भागामध्ये चालत असे. त्यावेळी कामगारांना ३ ते ५ रूपयांपर्यंत पगार मिळत असे. तर अधिकाऱ्यांना १०० रूपयांपर्यंत पगार दिला जात होता. स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये या मिलच्या कामगारांनी कोणताही संप केला नाही. मिलचे प्रमुख मालक श्री. विद्युत प्रसाद देसाई यांनी मिलच्या आवश्यक त्या बाबीकडे दुर्लक्ष केले. मिलच्या मोठ्या पदावर गुणवत्ता नसतानाही आपले जवळचे नातेवाईक ठेवले. त्यांनी या मिलचे दिवाळे काढले. शेवटी मिलच्या गैरकारभाराला कंटाळून देसाई यांनी या मिलचे भागिदार श्री. श्री. जंबुआण्णा बाबाजी आरवडे यांना सदर मिलचा ताबा दिला. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर या मिलमधील कामगारांनी पगारवाढीसाठी संप करण्यास सुरूवात केली. याला प्रत्युत्तर म्हणून मिलच्या मालकांनी मिलचे दिवाळे काढले. इ. स. १९५५ मध्ये ' नानाजीभाई मदवाणी ' यांनी ही मिल चालविण्यास घेतली. यावेळी त्यांनी या मिलचे पूर्वीचे नाव बदलून " दि राजन टेक्सटाईल मिल प्रा. लि. बार्शी " असे नामकरण केले. इ. स. १९५५ मध्ये या राजन मिलचे मालक खालीलप्रमाणे होते.

१) श्री. लक्ष्मीदास नानाजीभाई मदवाणी

२) श्री. कांतीलाल नानाजीभाई मदवाणी

३) श्री. राजेंद्र नानाजीभाई मदवाणी [१०६]

' श्री. कांतीभाई मदवाणी ' हे मूळचे बडोद्याचे होते. त्यांच्या आफ्रिकेमध्ये शुगर मिल होत्या. मदवाणी हे खूप धनाढ्य व्यक्ती होते. या मिलमधील कामगारांचे कपडे शिवण्याचं काम श्री. भगवान उध्दव लांडे यांच्याकडे होते. तसेच मदवाणी हे देखील श्री. लांडे यांच्याकडूनच कपडे शिवून घेत होते. श्री. मदवाणी व श्री. लांडे यांचे खूप सलोख्याचे संबंध होते. त्यावेळी त्यांच्याकडे इंपाला गाडी होती. सोलापूर जिल्ह्यामध्ये केवळ त्यांच्याकडेच ही गाडी होती.[१०७]

इ. स. १९५८ मध्ये ही मिल पुन्हा बंद पडली. मिलचालकाच्या दिवाळखोर धोरणामुळे अनेक कामगार बेकार झाले. मधवाणी परिवाराला ही मिल व्यवस्थित चालविता आली नाही. शेवटी इ. स. १९७९ मध्ये मदवाणी यांनी ही मिल मुंबईच्या ' श्री. बि. ही. पारसे ' यांच्या ताब्यात दिली. त्यांनीही इ. स. १९८४ मध्ये या मिलचे दिवाळे काढले. विस्कळीत व्यवस्थापन, मालकाचे दुर्लक्ष, कामगारांच्या विविध कारणामुळे होणाऱ्या असहकारातून ही मिल बंद पडली. इ. स. २००० नंतर ही मिल बार्शीचे माजी नगराध्यक्ष ' श्री. विश्वासराव बारबोले ' यांनी विकत घेतली.[१०८]

बार्शी तालुक्याच्या आर्थिक विकासामध्ये मोलाचे योगदान असलेल्या सूत उद्योगाला नंतरच्या काळात घरघर लागल्याचे दिसून येते. मिलमधील जुनी यंत्रसामुग्री तसेच कामगारांची काम न करण्याची प्रवृत्ती, राजकारण, शासनाचे धोरण अशा विविध कारणातून तालुक्यातील तीनपैकी दोन मिल बंद पडल्या. तर एक राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळाच्या अधिपत्त्याखाली गेली. परंतू बंद पडलेल्या मिलमुळे तालुक्यातील हजारो कामगार बेकार झाले. यातील बहुसंख्य कामगार मुंबई, मालेगाव, इचलकरंजी, बडोदा येथे स्थलांतरीत झाले. या उद्योगाला पूरक असणारे उद्योगधंदे झपाट्याने कमी झाले. या कामगारांची खूप परवड झाली. बेकारीची संख्या वाढल्यामुळे मजूरीचे दर झपाट्याने कमी झाले. अनेक कामगार व्यसनाच्या अहारी गेले. कामगारांच्या दारीद्रयाला सीमा राहीली नाही. यातून अनेक कुटुंबे विस्कळीत झाली. तालुक्यातील कापूस लागवडीवर याचे विपरित परिणाम झाले. सूत उद्योगातून तालुक्यामध्ये मोठ्या प्रमाणावर होणारी उलाढाल ठप्प झाल्यामुळे तालुक्याचा आर्थिक विकास मंदावल्याचे चित्र दिसते. तालुक्यामध्ये या उद्योगाच्या माध्यमातून बाहेरून येणारा पैसा खूप कमी झाला.

५.४.३ साखर उद्योग

भारताच्या इतिहासाइतकाच ऊसाचा इतिहास प्राचीन आहे. संस्कृतमध्ये ऊसाच्या संदर्भात इक्षू, इक्षूदंड, इक्षूवन वगैरे शब्द रूढ आहेत. ऊसाचे उत्पादन प्रामुख्याने उष्ण व समशीतोष्ण कटिबंधामध्येच होते. असे हवामान व पाणी याची भारतात अनुकूलता असल्याने ऊसाची नैसर्गिक लागवड व वाढ येथेच झाली. ऊसाच्या माधुर्याचा आस्वाद व त्याचे महत्व प्राचीन काळापासून भारतीयांना माहित होते. ऊसाचा

उल्लेख अथर्ववेदामध्ये असल्याची नोंद भारतीय संस्कृती कोषामध्ये आहे. महाभारत तसेच इतर पुराणामध्ये गोड पक्वान्नासाठी गूळ किंवा साखर वापरीत असल्याचा उल्लेख आढळतो.

ख्रिस्तपूर्व ४ थ्या शतकात अलेक्झांडर दि ग्रेट याने हिंदूस्थानवर स्वारी केली. त्यावेळी त्याच्याबरोबर असलेल्या ' जनरल निअरचूस ' या सैनिकी अधिकाऱ्याने भारतामध्ये आढळणाऱ्या काही अजब गोष्टींची नोंद केली. त्यामध्ये त्याने मधमाशाशिवाय मध तयार करणारी बोरू किंवा बांबुसारखी झाडे किंवा मधाचे बांबू भारतामध्ये आढळतात असा उल्लेख केलेला आहे. यावरून असे वाटते की संबंधित अधिकाऱ्याला ऊस व ऊसाचा रस याची प्रथमच ओळख झाली असावी. इ. स. ६०० मध्ये चीनच्या बादशहाने साखर तयार करण्याचे तंत्र आत्मसात करण्यासाठी आपली माणसे बिहारमध्ये पाठविली होती. आजकाल इतर देशांकडून तंत्रज्ञान आयात करणाऱ्या भारताने निदान प्राचीन काळी तरी साखर उत्पादन तंत्र निर्यात केले होते ही मोठी अभिमानाची गोष्ट आहे. ऊसाचा प्रसार भारतामधून अरब व अरबातून पुढे युरोपमध्ये झाला. इ. स. १५४४ मध्ये कच्ची साखर शुध्द करण्याचे कारखाने लंडनमध्ये सुरू झाले. इ. स. १६८९ मध्ये न्यूयॉर्कमध्ये प्रथमच साखर शुध्दीकरणाचा कारखाना सुरू झाला. शर्करा संस्कृत शब्दास अरबी भाषेमध्ये सुकर, ग्रीक भाषेमध्ये सुखरॉन, इटालियन भाषेमध्ये सुखेरा, फ्रेंच भाषेमध्ये सुकर व इंग्रजी भाषेमध्ये शुगर असे म्हणतात. १७ व्या शतकापर्यंत साखर दुर्मिळ व महाग होती. समाजातील राजे, सरदार, जमिनदार अशा उच्च वर्गातील लोकांनाच ती परवडण्यासारखी होती. इ. स. १७३६ मध्ये मारीआ थेरीसा या हंगेरीच्या भावी राणीच्या विवाहासमयी हिरे, माणके यांच्याबरोबर साखर सुध्दा माहेरची भेट म्हणून देण्यात आली होती. एवढे साखरेला त्याकाळी महत्व होते. मार्कोपोलो व वास्को दि गामा यांनी भारतातून साखरेचा व्यापार कसा होत होता याची माहिती संग्रहित केली होती. इ. स. १६०० मध्ये स्थापन झालेल्या ईस्ट इंडिया कंपनीने आरंभी अरबस्थान व इंग्लंडबरोबर इतर व्यापारी वस्तूबरोबरच साखरेचा व्यापार केला होता. पुढे औद्योगिक विकासाबरोबर साखर स्वस्त झाली. १८ व्या शतकात इंग्लंडमध्ये चहा व कॉफी ही गरम पेये खूप लाकप्रिय झाली. त्यामुळे साखरेची गरज वाढू लागली. पश्चिमेबरोबरच पुर्वेकडेही साखर लोकप्रिय होऊ लागली. १६ व्या शतकापर्यंत साखर व गूळ यांचे उत्पादन होत असले तरी त्याला आंतरराष्ट्रीय पातळीवर फारसे महत्व नव्हते.[१०९]

भारतामध्ये कापड उद्योगाच्या खालोखाल साखर उद्योगाला महत्व आहे. साखरेवरील उत्पादन शुल्कामुळे सरकारला बराच महसूल मिळतो. अल्कोहोल व चिपाडापासून कागद तयार करणारे छोटे उद्योग यांना खूप वाव मिळून ग्रामीण विकासाचा वेग वाढला. याचे प्रत्यंतर विशेषत: साखर उद्योगाच्या परिसरामध्ये येते. तेथे उपलब्ध होणाऱ्या कृषीविषयक सुविधा, वाहतुकीच्या सोयी, वैद्यकीय व शैक्षणिक सुविधा याच्या माध्यमातून ग्रामीण भागाचे स्वरूप पालटण्यास मदत झाली.

इ. स. १९७३-७४ पर्यंत सोलापूर जिल्ह्यामध्ये ४ सहकारी साखर कारखाने चालू होते. यापैकी तीन माळशिरस तालुक्यात होते. याच वर्षी जिल्ह्यामध्ये तीन नवीन सहकारी साखर कारखान्यांची उभारणी चालू होती. यापैकी एक असणाऱ्या भोगावती सहकारी साखर कारखान्याची बार्शी तालुक्यातील वैराग या गावापासून पश्चिमेकडे एक कि. मी. अंतरावर उभारणी चालू होती. १८-१९ व्या शतकात भारतामध्ये प्रारंभी काही इंग्रज व डच लोकांनी कलकत्ता व बिहार येथे व्यक्तिगत कारखानदारीचे प्रयत्न केले. परंतू ते फार काळ टिकू शकले नाहीत. इ. स. १९०९ च्या सुमारास बिहार व उत्तर प्रदेश येथे साखर कारखानदारीचा आरंभ झाला. भारतीय साखर परकीय साखरेशी स्पर्धा करू शकणार नाही. त्यामुळे भारतातील साखर कारखाने लवकर बंद पडतील अशी भिती वाटू लागली. परिणामी या उद्योगाला वेळीच संरक्षण देण्याचे सरकारी स्तरावर मान्य होउन इ. स. १९३२ मध्ये साखर उद्योगाला संरक्षण देणारा कायदा पास करण्यात आला आणि भारतातील या साखर उद्योगाचे सुवर्णयुग सुरू झाले. [११०]

न्या. म. गो. रानडे व नामदार गोपाळकृष्ण गोखले यांनी साखर उद्योगाला संरक्षण मिळावे म्हणून प्रयत्न केले होते. त्यावेळी लॉर्ड कर्झन हा हिंदूस्थानचा व्हॉईसरॉय होता. इ. स. १८९९ च्या मे व जून मध्ये न्यायमूर्ती रानडे यांनी साखरेचा धंदा आपल्या देशात कसा वाढविता येईल या विषयावर मध्ये तीन लेख लिहिले होते. त्याकाळी बीटपासून तयार झालेली ऑस्ट्रिया व जर्मनी या देशातील साखर सर्व जगभर निर्यात होत असे. यामुळे ब्रिटिशांच्या साखर कारखानदारींवर याचे अनिष्ट परिणाम होऊ लागले. त्यामुळे ब्रिटिशांनी तात्काळ साखर आयातीवर निर्बंध घातले. अर्थात हे धोरण खुल्या व्यापाराच्या धोरणाच्या विरोधात होते. याच धोरणाचा न्या. रानडे यांनी पुरस्कार केला. नामदार गोखले यांनीही वेळोवेळीच्या आपल्या भाषणातून भारतात साखर धंदा वाढीस लागण्यासाठी त्याला संरक्षण देण्याचे सतत प्रतिपादन केले. ९ फेब्रुवारी १९०७ रोजी ' लखनौ ' येथील भाषणात त्यांनी स्वदेशी साखरेचा पुरस्कार केला.

लोकमान्य टिळकांनी याबाबत धडाडीचा प्रचार केला. २२ सप्टेंबर १९०३ च्या ' केसरी ' च्या अंकात त्यांनी लिहिले होते की, " आपल्याला लागणारी साखर आपल्या देशातच तयार झाली पाहिजे. पण यासाठी योग्य रीतीने योजना आखून त्याचा पुरस्कार करणे आवश्यक आहे. आपले राष्ट्रीय सरकारच हे उद्दिष्ट गाठण्यासाठी कर्तव्य म्हणून याचा विचार करील " [१११]

तक्ता क्र. ३५

भारतातील सहकारी साखर कारखाने (इ. स. १९७३-७४ पर्यंत)

राज्य	सहकारी कारखाने

	अनुज्ञप्ति दिलेले	प्रत्यक्ष चालू
उत्तर प्रदेश	२६	५
उत्तरेतील इतर राज्ये	१५	१३
महाराष्ट्र	**६७**	**४०**
गुजरात	१४	८
तामिळनाडू	१०	७
केरळ	२	१
कर्नाटक	१२	७
आंध्र प्रदेश	२३	८

(प्रा. बर्वे. प. म, साखर, इ. स. १९७७, पृष्ठ क्र ११३)

डॉ. धनंजयराव गाडगिळ व श्री. विखे पाटील यांच्या कल्पक नेतृत्वाखाली इ. स. १९५० मध्ये पहिला सहकारी साखर कारखाना उभारला. यातूनच सहकारी साखर कारखाने उभारण्यास खऱ्या अर्थाने प्रेरणा मिळाली. ऊस हे अतिशय नाशवंत पीक असल्यामुळे साखर कारखाने ग्रामीण भागामध्ये स्थापन करावे लागले आहेत. त्यामुळेच साखर उद्योग हा ग्रामीण भागातील एक मोठा सुसंघटीत असा उद्योग बनला आहे. ज्या भागामध्ये कारखाना ऊभा असतो त्या भागाच्या सामाजिक, आर्थिक विकासाचा केंद्रबिंदू बनतो. त्यामुळे राज्य सरकारने जाणीवपूर्वक साखर कारखान्यांच्या उभारणीसाठी भरघोस मदत करून शासनाने कृतिशीलपणे भागिदारी केली.[११२]

इ. स. १९५० पर्यंत महाराष्ट्रामध्ये साखर धंदा खाजगी स्वरूपात होता. महाराष्ट्रातील साखर कारखान्याचा इतिहास पाहिल्यास आपणास असे आढळून येते की, इ. स. १९२० मध्ये जेव्हा गोदावरी प्रवरा कॅनॉल बांधला गेला, त्यावेळी अहमदनगर जिल्ह्यात ' बेलापूर ' येथे पहिला साखर कारखाना स्थापन झाला. इ. स. १९३३-१९५३ या काळात असे १३ खाजगी साखर कारखाने महाराष्ट्रात स्थापन झाले होते. इ. स. १९३० मध्ये सर्वत्र मंदीची लाट पसरली. शेतकरी संकटात सापडला. याचा फायदा घेऊन खाजगी साखर कारखानदारांनी आपल्या कारखान्यांसाठी शेतकऱ्यांकडून ३० वर्षाच्या दीर्घ मुदतीच्या कराराने १०-१५ रूपये इतक्या अल्प खंडाने जमिनी घेतल्या. सरकारकडून सवलतीच्या दराने पाणी उपलब्ध केले. अशा रीतीने शेतकरी केवळ कामगार झाले व सर्व नफा भांडवलदारांना मिळाला. यामुळे शेतकऱ्यांना आपलाच स्वतःचा कारखाना असावा असे वाटू लागले. वास्तविकत: महाराष्ट्रातील पहिला सहकारी साखर कारखाना म्हणून सोलापूर जिल्ह्यातील " सासवड माळीनगर कारखाना" याची नोंद झाली असती. मात्र

काही कारणाने ' जॉईंट स्टॉक कंपनी ' म्हणून याची नोंद झाली. या कारखान्याची बैठक संपूर्णत: सहकारीच होती, पण यामध्ये अधिक बलवान व श्रीमंत असे शेतकरी होते. सहकारी तत्वातून साखर कारखाने उभारले तर शेतकऱ्यांचा फायदा होईल या हेतूने इ. स. १९४५ मध्ये प्रा. ध. रा. गाडगीळ यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या परिषदेमध्ये सहकारी साखर कारखाने काढण्यासंबंधीचा ठराव झाला. इ. स. १९५०-५१ मध्ये यातूनच अहमदनगर जिल्ह्यातील ' प्रवरानगर ' येथे पहिला सहकारी साखर कारखाना स्थापन झाला. तर दुसरा सहकारी साखर कारखाना याच जिल्ह्यात सुरू झाला. पुढे महाराष्ट्रामध्ये सहकारी साखर कारखान्यांची झपाट्याने वाढ झाली.[११३] साखर उद्योगामध्ये सहकारी तत्वाचा प्रारंभ थोडा उशिरानेच झाला. इ. स. १९३५ मध्ये केवळ ३ सहकारी साखर कारखाने होते. उत्तर भारतापेक्षा दक्षिण भारतामध्ये सहकारी साखर कारखान्यांचे प्रमाण जास्त होते. महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्याच्या प्रचंड प्रवाहाची गंगोत्री म्हणजे " प्रवरा सहकारी साखर कारखाना " होय. या कारखान्याच्या असाधारण यशामुळेच महाराष्ट्रामध्ये इतर ठिकाणी सहकारी साखर कारखाने काढण्यास प्रोत्साहन मिळाले.[११४]

५.४.३.१ भोगावती सहकारी साखर कारखाना

' वैराग ' भागातील ऊस उत्पादकांसाठी एक सहकारी साखर कारखाना काढावा यासाठी इ. स. १९६९ मध्ये ' दहिटणे ' या गावाजवळ श्री. तुळशीदास जाधव यांनी एक सभा घेतली होती. त्यांनी या कामाचा पुढे सातत्याने पाठपुरावा केला. यासाठीचे भागभांडवल गोळा करण्यास सुरूवात केली. बार्शी तालुक्यातील वैराग या गावापासून पश्चिमेकडे एक कि. मी. अंतरावर हा " भोगावती सहकारी साखर कारखाना " आहे. इ. स. १९७४ मध्ये या कारखान्यासाठीचा केंद्र सरकारचा उद्योग खात्याचा परवाना मिळाला. या कामामध्ये तत्कालीन केंद्रिय कृषी मंत्री बाबू जग जीवनराम यांनी खूप सहकार्य केले. पुढे या कारखान्यासाठी आवश्यक असणारी जमीन व इतर बाबींची पूर्तता करण्यासाठी इ. स. १९७८ पर्यंत प्रतिक्षा करावी लागली. इ. स. १९७८ मध्ये राज्य सरकारने एकदम बारा कारखान्यांना मंजूरी देऊन यंत्रसामग्री खरेदी केली. इ. स. १९७९ पर्यंत या कारखान्यासाठी एकूण ३ कोटी ५५ लाख रूपयाची यंत्रसामग्री खरेदी करण्यात आली. ही यंत्रसामग्री कारखान्यामध्ये उभारण्यास इ. स. १९८० साल उजाडले. अशा सर्व घडामोडीतून इ. स. १९८१ मध्ये या कारखान्याचा पहिला गळीत हंगाम पार पडून १ लाख पेक्षा जास्त साखर पोत्याचे उत्पादन झाले. अशाप्रकारे कारखान्यासाठी झालेल्या पहिल्या सभेनंतर तब्बल १२ वर्षांनी सुरू झालेला हा पहिला सहकारी साखर कारखाना होय.[११५]

तक्ता क्र. ३६

भोगावती साखर कारखान्याचे संस्थापक संचालक मंडळ

अ. क्र	नाव	पद
१)	श्री. तुळशीदास सुभानराव जाधव	चेअरमन
२)	श्री. माणिकराव गणपतराव गरड	संचालक
३)	श्री. चंद्रकांत दत्ताजीराव निंबाळकर	संचालक
४)	श्री.पांडूरंगराव विठ्ठलराव पाटील	संचालक
५)	श्री. आनंदराव विठ्ठलराव पाटील	संचालक
६)	श्री. यशवंतराव तुळशीदास जाधव	संचालक
७)	श्री. शंकरराव मन्मथअप्पा झाडबुके	संचालक
८)	श्री. श्रीपादराव रामचंद्रराव बुडूख	संचालक
९	श्री. नारायणराव पंढरीनाथ पुराणिक	संचालक
१०)	श्री. तुकाराम बंडोपंत मोटे	संचालक
११)	श्री. सोपानराव पांडूरंग घुडे	संचालक
१२)	श्री. गोविंदराव लिंबाजी पंके	संचालक
१३)	श्री. नरसिंगराव तात्याराव देशमुख	संचालक
१४)	श्री. एच्. व्ही. कुबेर (बँक ऑफ महाराष्ट्र)	बँक प्रतिनिधी

(भोगावती सहकारी साखर कारखाना, पहिला वार्षिक अहवाल, इ. स. १९७५-७६.)

२६ फेब्रुवारी १९७६ रोजी या कारखाण्याची पहिली सर्वसाधारण सभा पार पडली. निवडून आलेल्या संचालक मंडळाने या दिवशी ' श्री. तुळशीदास जाधव ' यांना या कारखान्याचा चेअरमन म्हणून निवडले. तसेच बँकेचे प्रतिनिधी म्हणून बँक ऑफ महाराष्ट्राचे अधिकारी श्री. एच्. व्ही. कुबेर यांची नियुक्ती करण्यात आली. ३० जून १९७६ अखेर भागभांडवलाच्या माध्यमातून एकूण १०,६८,१४९.२० रूपये जमा झाले. यामध्ये जलद गतीने वाढ होण्याच्या दृष्टीने बँक ऑफ महाराष्ट्र ने शेतकऱ्यांना शेअर्स खरेदी करण्यासाठी मध्यम मुदतीचे कर्ज दिले. त्यामुळे शेअर्सच्या संख्येत झपाट्याने वाढ झाली. अशा प्रकारे अगदी सुरूवातीपासूनच या साखर कारखाण्याला या बँकेचे सहकार्य लाभत गेले. सुरूवातीला या कारखान्याच्या कार्यक्षेत्रामध्ये बार्शी तालुक्यातील १२३, माढा तालुक्यातील २५ व मोहोळ तालुक्यातील २२ गावांचा समावेश होता. सोलापूर जिल्हा हा दुष्काळी जिल्हा म्हणून ओळखला जातो. त्यामुळे या कारखान्याच्या दृष्टीने हे क्षेत्र कमी होते. त्यामुळे पुढे या कारखान्याला ऊसाचे जादा क्षेत्र उपलब्ध व्हावे यासाठी २० मैलाच्या परिसरातील आणखी जास्त गावांचा समावेश व्हावा यासाठी महाराष्ट्र शासनाला विनंती करण्यात आली. त्यामुळे पुढे या कारखान्याचे कार्यक्षेत्र वाढले. या कारखान्याच्या उभारणीमध्ये

तत्कालीन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. शंकरराव चव्हाण, तत्कालीन कृषी मंत्री व सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री श्री. शरद पवार आणि सहकार मंत्री शंकरराव पाटील यांनी मोलाचे सहकार्य केले.[११६]

कारखाना कार्यक्षेत्रातील ऊस उत्पादकांना शुध्द व निरोगी ऊस बेण्याचा पुरवठा करता यावा म्हणून या कारखान्याने ऊस बेणे मळा तयार केला होता. या माध्यमातून आपल्या सभासदांना उत्तम प्रतीचे बियाणे देण्याचा सातत्याने प्रयत्न केला. कारखान्याच्या आर्थिक विकासामध्ये कारखान्याला सतत कमी मिळणारा साखर उतारा हा प्रमुख अडसर होता. त्यामुळे कारखान्याच्या संचालक मंडळाने आपल्या सभासदांना ऊसाच्या सुधारित जातीच्या लागवडीचे महत्व सातत्याने पटवून दिले. आपल्या सभासदांना कमी दराने खत वाटप केले. आपल्या सभासदांना व कर्मचाऱ्यांना दिवाळीच्या सणानिमित्त सवलतीच्या दराने प्रत्येकी २० किलो साखर वाटप केले. सभासदांना बोनस वाटपही केले जात होते. वेतन मंडळाच्या शिफारशीनुसार सर्व कर्मचाऱ्यांना वेतन व सर्व सवलती दिल्या जात. कारखान्याच्या वतीने व सर्व कर्मचारी व कामगार यांच्या संयुक्त सहभागातून कारखाना कार्यस्थळावर शिवजयंती, गणेश उत्सव, आंबेडकर जयंती असे विविध कार्यक्रम मोठ्या उत्साहाने साजरे केले जात. यामाध्यमातून सामाजिक सलोखा निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात होता. इ. स. १९९६ अखेर या कारखान्याकडे सर्व प्रकारची देणी रक्कम ८,११,२८,६४० रूपये इतकी होती. तर बँकेतील शिल्लक १,३९,२७,०७३ रूपये इतकी होती. पुढील काळामध्ये ही तफावत सातत्याने वाढत गेली. कारखाना कर्जात बुडाला.[११७] त्यामुळे इ. स. २००३-०४ मध्ये हा कारखाना बंद पडला. या कारखान्याची ऊस गाळप क्षमता प्रतीदिन १२५० टन इतकी होती. या कारखान्याचे कार्यक्षेत्र सोलापूर व उस्मानाबाद या दोन जिल्ह्यामध्ये पसरलेले होते. २८७ गावांचा या कारखान्याच्या कार्यक्षेत्रात समावेश असला तरी, या कारखान्याला कार्यक्षेत्रातील ऊस पुरविणाऱ्या गावांची संख्या ३०० होती. तर कार्यक्षेत्राबाहेरील ९९ गावे या कारखान्याला ऊस पुरवत होती.[११८]

मद्रास येथे १४ ऑक्टोबर १९८४ रोजी " शुगर टेक्नॉलॉजिस्ट असोसिएशन ऑफ इंडिया" च्या ४८ व्या वार्षिक चर्चासत्राचे उद्घाटन करताना तत्कालीन उपराष्ट्रपती आर. व्यंकटरमन यांनी म्हटले होते की, " भारतातील साखर कारखान्यांनी कमी खर्चात जास्तीत जास्त साखरेचे उत्पादन करण्याकरीता तसेच वीज व जळणाचा वापर कमी करण्यासाठी स्वयंचलित यंत्रे बसवून आपल्या साखर कारखान्यात आधुनिकता आणावी." [११९] अर्थातच भोगावती साखर कारखान्यातील मशिनरी खूप जुनी असल्याने या कारखान्याचा साखर उतारा खूपच कमी पडत होता. त्यामुळे इ. स. १९९९-२००० चा गळीत हंगाम सुरू होण्यापूर्वी या कारखान्यामध्ये १३८.०० लाख रूपयाची आधुनिक मशिनरी बसविण्यात आली.[१२०] कारखान्याच्या कार्यक्षेत्रामध्ये उत्तम प्रतिच्या ऊसाचे उत्पादन व्हावे यासाठी या कारखान्याने केंद्र सरकारच्या साखर विकास निधी योजने अंतर्गत बोअर घेणे व जुन्या विहिरी दुरूस्त करणे यासारख्या योजना आपल्या

सभासदांसाठी राबविल्या. त्याच प्रमाणे ऊस उत्पादन वाढीसाठी सभासदांना उधारीवर ऊसाचे बेणे व रासायनिक खते देण्यात आली. याचा बहुसंख्य सभासदांनी लाभ घेतला, परंतू आपला ऊस या कारखान्याला घातला नाही. त्यामुळे कारखान्याचे गाळप कमी झाले. शिवाय या योजनेमध्ये गुंतविलेल्या रकमा वसूल होऊ शकल्या नाहीत. त्यामुळे कारखान्याच्या तोटयात भर पडली .[१२१]

भारतीय साखर उद्योगामध्ये दरवर्षी सरासरी ३० हजार कोटींची उलाढाल होते. हा उद्योग प्रामुख्याने उत्तर भारत व दक्षिण भारत अशा दोन विभागामध्ये विभागलेला आहे. उत्तर भारतामध्ये या उद्योगाचे स्वरूप प्रामुख्याने खाजगी आहे, तर दक्षिण भारतामध्ये ते प्रामुख्याने सहकारी आहे. सहकारी क्षेत्राची कार्यप्रणाली बरीच स्वतंत्र आहे. त्यात काही अंगभूत मर्यादा आहेत. तसेच परंपरागत गुणदोषही आहेत. सहकारी साखर कारखाना व्यावसायिक पध्दतीने चालविला जात नाही. नफा-तोटा याचा गांभीर्याने विचार केला जात नाही. त्यामुळे असे कारखाने हे पूर्णपणे ऊस उत्पादनावर अवलंबून असतात. त्यामुळे एखाद्यावर्षी पावसाने ताण दिला तर अशा सहकारी साखर काराखान्यांचे उत्पादन घटते. आंतरराष्ट्रीय पातळीवर साखरेमध्ये सल्फरचे प्रमाण जितके कमी तितकी साखर उच्च दर्जाची मानली जाते. परंतू सहकारी साखर कारखाने अशी सल्फरलेस साखर तयार करत नाहीत. त्यामुळे कोका कोला, कॅडबरी यासारख्या मोठ्या उत्पादन संस्था अशी सल्फरयुक्त साखर खरेदी करत नाहीत. सहकारी साखर कारखान्यांचे आणखी एक मोठे दुखणे म्हणजे त्यांची पैसे देण्याची पध्दत. साखरेचे उत्पादन घटले तर सहकारी साखर कारखाने शेतकऱ्यांना त्यांच्या ऊसाचे पैसे देण्यामध्ये विलंब करतात. त्यामुळे शेतकरी कर्जाच्या विळख्यात सापडतो. तसेच बहुतेक सर्व सहकारी साखर कारखान्यांनी अनेक वित्तीय संस्थांकडून मोठ्या प्रमाणावर कर्ज घेतलेले आहे. कर्ज व व्याज याच्या विळख्यात हे कारखाने सापडले आहेत.[१२२]

भोगावती सहकारी साखर कारखाना दुष्काळी परिसरामध्ये उभारलेला असून सातत्याने आर्थिकदृष्टया तोट्यातच जात होता. इ. स. १९८०-८१ मध्ये या कारखान्याचा पहिला गळीत हंगाम झाला. पुढे निसर्गाच्या अवकृपेमुळे इ. स. १९८३-८४, इ. स. १९८६-८७ व इ. स. १९९२-९३ या हंगामामध्ये कारखान्याचे गाळप अत्यंत कमी झाले. तर इ. स. १९८७-८८ व इ. स. १९९३-९४ या दोन हंगामामध्ये हा कारखाना ऊसा अभावी पूर्णपणे बंद होता. प्रतिकूल नैसर्गिक परिस्थितीमुळे सुरूवातीच्या ५ गळीत हंगामामध्ये झालेले अपुरे गाळप, कमी साखर उतार या कारणामुळे कारखान्याचा तोटा वाढतच जाऊन तो मार्च २००० अखेर ९७७.५६ लाख रूपये इतका झाला. त्यामुळे हा कारखाना राज्य शासनाकडून वेळोवेळी घेतलेल्या कर्जाची व त्यावरील व्याजाची परतफेड करू शकला नाही. कारखान्यावर असलेल्या कर्जामुळे सभासदांना चांगला भाव देता आला नाही. हे सर्व प्रश्न लक्षात घेऊन तत्कालीन आमदार श्री. दिलीप सोपल यांनी या कारखान्याकडील शासकीय कर्जावरील व्याज माफ करून व राहिलेल्या कर्जाचे व्याजमुक्त

हप्ते बांधुन घेण्याकरीता युती शासनाच्या काळापासूनच सातत्याने प्रयत्न केले. त्यांच्या प्रयत्नांना यश आले. कारखान्याच्या कर्जावरील व्याज माफ करून राहिलेल्या रक्कमेचे बिनव्याजी हप्ते पाडून देण्यास शासनाने मंजूरी दिली. ही या कारखान्याच्याच नव्हे तर सहकारी साखर उद्योगाच्या इतिहासातील पहिली घटना होती. गुजरात भूकंप पीडितांच्या पुनर्वसनासाठी राज्य शासनाने केलेल्या मदतीच्या आवाहनानुसार या कारखान्याने ३ लाख रूपये मुख्यमंत्री सहाय्यता निधीस दिले. तसेच ओरीसा राज्यात महापूरामुळे नैसर्गिक आपत्तीमध्ये सापडलेल्या देशबांधवाच्या मदतीसाठी कारखान्यातील सर्व कर्मचाऱ्यांनी आपला एक दिवसाचा पगार दिला. अशा प्रकारे सातत्याने तोटयात असूनही या कारखान्याने आपली सामाजिक बांधिलकी जोपासण्याचा प्रयत्न केलेला दिसतो.[१२३]

सहकारी साखर कारखान्यामुळे महाराष्ट्रातील ग्रामीण जीवनात फार मोठा बदल घडून आला. ग्रामीण नेतृत्वाला वाव मिळाला. शेतकऱ्यांच्या जीवनात स्थैर्य आले. त्याच्याकडे पैसा येऊ लागल्यामुळे तो इतर शेती उत्पादनातही मोठ्या प्रमाणात लक्ष घालू लागला. आधुनिक पध्दतीने शेती करू लागला. सिंचनाखालील क्षेत्र वाढविण्यासाठी तो जलसिंचनाच्या आधुनिक मार्गाचा शोध घेऊ लागला. ग्रामीण भागाच्या सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात बरीच प्रगती झाली.

५.४.४. तेल उद्योग

सोलापूर जिल्ह्यामध्ये २००० पेक्षा जास्त तेली कुटुंबे तेल व्यवसायामध्ये होती. तीळ, सूर्यफूल, एरंड, कारळे, आंबाडी यापासून तेल काढले जाई. हे तेली प्रामुख्याने हिंदू होते. ते आपल्या व्यवसायासाठी स्थानिक शेतकऱ्यांकडून तेलबिया खरेदी करत असत. याशिवाय मोठ्या शहरांतील व्यापाऱ्यांकडूनही तेलबिया खरेदी करत. तयार केलेले तेल गावामध्ये तसेच शहरातील बाजारात विकत. हे तेली लोक आपले तेलघाणे आपल्या घरीच चालवत. त्यांच्या कुटुंबातील स्त्रिया गावात घरोघरी जाऊन तेलविक्री करून या व्यवसायामध्ये मदत करत. तसेच बाजाराच्या दिवशीही आपल्या कुटुंबातील पुरूषाबरोबर शहरामध्येही तेलविक्रीसाठी जात.[१२४]

बार्शी तालुक्यामध्ये इ. स. १९३७ पूर्वी पारंपरिक पध्दतीने तेल गाळपाचा उद्योग सुरू होता. मोठ-मोठ्या तेलघाण्यामध्ये बैलाच्या साहाय्याने तेल गाळले जात होते. तर काही लोक लाकडी घाण्याचाही वापर करत. मात्र तेल गाळप पारंपरिक पध्दतीने केल्यामुळे उत्पादन कमी व नफाही कमी मिळत असे. या व्यवसायाच्या माध्यमातून या तेली कुटुंबाची केवळ रोजीरोटी चालत असे. इ. स. १९३७ नंतर तालुक्यात

प्रथमच श्री. तम्मेवार यांनी यांत्रिक पध्दतीने तेल गाळण्याचा उद्योग सूरू केला. त्यानंतर बार्शी तालुक्यातील तेल उद्योग खऱ्या अर्थाने नावारूपास आला. ' कसबे तडवळे ' या ठिकाणी सूरू झालेली " महाराष्ट्र ऑईल मिल" ही तालुक्यातील पहिली तेलगिरणी होती. त्यानंतर तालुक्यातील तेलगिरण्यांची संख्या झपाट्याने वाढली. या तेलगिरण्यास लागणारा कच्चा माल बार्शी बाजारपेठेमध्ये मोठ्या प्रमाणावर येत असल्याने या तेलगिरण्यांना कच्च्या मालाची कधीच कमतरता भासली नाही. त्यामुळे अल्पावधीतच या उद्योगाने तालुक्यामध्ये मोठे स्वरूप धारण केले.[१२५]

कच्चा माल मिळवण्याच्या हेतूने कसबे तडवळे येथे स्थापन झालेली महाराष्ट्र ऑईल मिल बार्शी येथे स्थलांतरीत झाली. बार्शी पेठेमध्ये तेलबियाची विपूलता असल्यामुळे इ. स. १९३७ नंतर गुजराथ ऑईल मिल, श्री. ऑईल मिल, कांती ऑईल मिल, भारत ऑईल मिल, विजय ऑईल मिल अशा अनेक ऑईल मिल्स येथे सुरू झाल्या. इ. स. १९९० अखेर एकूण २० ऑईल मिल्स बार्शीमध्ये चालू होत्या.[१२६]

तेल गाळण्याचे कारखाने निघाल्यापासून बैलाच्या सहाय्याने चालविल्या जाणाऱ्या घाण्यातून तेल गाळण्याचा व्यवसाय मोडकळीस आला. इ. स. १९६३ च्या सुमारास महाराष्ट्रामध्ये सुमारे दहा हजार तेलघाणे चालू होते. ' हास्केल ' पध्दतीच्या घाण्याचा वापर केल्यास बैलास कमीत कमी त्रास होऊन तेलाचे प्रमाण वाढत असे. बैलाला त्याच्या वजनाच्या एक अष्ठांश वजन ओढावयास लावणे शास्त्रशुध्द आहे. याच तत्वावर तत्कालीन सुधारलेले घाणे होते. घाण्यामध्ये बॉलबेरींगचा उपयोग केल्यामुळे घाणा ओढण्याची प्रक्रिया सुकर झाली. ग्रामीण तेल उद्योगाच्या वाढ व विकास यासाठी शासनाने खूप प्रयत्न केले. इ. स. १९६३ मध्ये " ग्रामीण तेल उद्योग " या योजनेअंतर्गत नवीन घाणी घेण्यासाठी १५०० रूपयांचे कर्ज व १५०० रूपयाचे अनुदान देण्यात येत. हे कर्ज बिनव्याजी असून ५ वर्षांनी त्याची परतफेड करावी अशी यात तरतूद होती. उद्योगाचे महत्व पटवून देण्याकरिता ठिकठिकाणी घाणी केंद्रे स्थापन करण्यात आली. यासाठीच्या इमारतीसाठी ५००० रूपये, घाणी व इतर साहित्य यासाठी १५०० रूपये, तेल्यांचा पगार व इतर किरकोळ खर्च यासाठी ४००० रूपयांची तरतूद केली. खेळत्या भांडवलासाठी २००० रूपये हे कर्ज पहिले वर्षी बिनव्याजी होते, तर पुढील दोन वर्षांसाठी वार्षिक ३ टक्के व्याज होते. सुधारलेल्या घाण्या तयार करण्यासाठीचे केंद्र चालविण्याकरीता ७९५० रूपयाचे अनुदान व ९२५० रूपयाचे कर्ज मिळत होते. याशिवाय तेलबियाचे साठे करण्याकरिता, घाण्याकरिता शेड बांधण्याकरीता अत्यंत माफक व्याजदराने कर्ज मिळत होते. याशिवाय घाण्यातून निघालेले तेल व मिलमध्ये तयार झालेले तेल यांच्या विक्रीच्या किंमतीत जास्त तफावत असू नये म्हणून घाणी तेलाच्या विक्रीवर दर मणास २.५० रूपये रिबेट देण्यात येत होता. याशिवाय या व्यवसायासाठी आवश्यक असणारे ज्ञान मिळविण्यासाठी मोफत प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केले जात होते. या ठिकाणी प्रशिक्षण घेणाऱ्या व्यक्तीस शिष्यवृत्ती दिली जात होती.[१२७]

तेलबिया उत्पादनासाठी सोलापूर जिल्हा हा खूप महत्वाचा मानला जायचा. या जिल्ह्यामध्ये अनेक ठिकाणी तेलगिरण्या आहेत. इ. स. १९४८ च्या फॅक्टरी ॲक्ट नुसार जिल्ह्यामध्ये १ मोठी व २२ लहान तेल गिरण्यांची नोंद झालेली होती. इ. स. १९७०-७१ मध्ये जिल्ह्यामध्ये २५ तेल गिरण्यांची नोंद झालेली होती. यापैकी ८ तेलगिरण्या बार्शी तालुक्यामध्ये होत्या. तालुक्यातील ' वैराग ' हे ठिकाण तेल उद्योगासाठी विशेष प्रसिध्द होते.[१२८] इ. स. १९५४-५५ मध्ये बार्शी पेठेमध्ये तेलबियांचे भाव मंदीत होते. पुढे तेलास निर्यात न मिळाल्यामुळे व मागणीप्रमाणे रेल्वे वॅगन्सचा पुरवठा न झाल्यामुळे हे भाव अधिक घसरले. या वर्षामध्ये तालुक्यामध्ये ५ तेल कारखाने चालू होते.[१२९] इ. स. १९५६-५७ मध्ये पावसाच्या अनियमितपणामुळे तालुक्यामध्ये शेंगाचा उतार कमी पडला. शिवाय शेंगदाण्यापासून निघणाऱ्या तेलाचा उतारही कमी पडला. यामुळे बार्शी तेल उत्पादनाचे प्रमुख केंद्र असूनही शेंगाला मुंबई भावाच्या पडथरीपेक्षा १ रुपये कमी भाव मिळाला. इ. स. १९५६-५७ मध्ये भूईमुगाच्या हंगामामध्ये जास्त पाऊस पडल्यामुळे शेतकऱ्यांना वेळेवर मशागत करता आली नाही. त्यातच पुढे या पिकावर ' मवा ' नावाची कीड पडली. यातूनही भुईमुगाचे जे पीक तयार झाले तेही जादा पावसामुळे काळे व न पोसलेले होते. त्यामुळे शेंगदाण्यापासून निघणाऱ्या तेलाच्या प्रमाणातही फरक पडला. तालुक्यामध्ये ऑईल मिल मोठ्या प्रमाणात असल्याने येथे शेंगांना मोठ्या प्रमाणात नियमित मागणी असते. मात्र कमी पावसामुळे तालुका व आसपासच्या परिसरातून शेंगाची आवक कमी झाली. त्यामुळे शेंगाचे भाव प्रचंड वाढले. मात्र तालुक्यातील तेल कारखानदारांना केलेल्या तेलाचे वायदे पूर्ण करण्यासाठी चढत्या भावाने तेलबियांची खरेदी करावी लागली. पुढे ऑगस्ट १९५७ मध्ये शेंगाचे पीक सर्वत्र समाधानकारक असल्याने व केवळ करडीच्या तेलास निर्यात मिळाल्यामुळे शेंगाचे भाव घटले. जवसाची हीच परिस्थिती होती. करडीचे भाव मंदीत होते. ते साधारणत: १५ रूपयाच्या आसपास होते. पुढे जुलै १९५७ पासून करडीची आवक घटल्याने व करडीच्या तेलास परदेशी निर्यात मिळाल्यामुळे करडीचे भाव १७ रूपयाच्या पुढे गेले. या वर्षामध्ये तालुक्यामध्ये ७ तेल कारखाने चालू होते.[१३०]

इ. स. १९५८-५९ मध्ये भुईमुंगाला ऊतार कमी होता, परंतू प्रत चांगली होती. त्यामुळे शेंगदाण्यापासून निघणाऱ्या तेलाचे प्रमाण जास्त होते. मात्र तेलास पुरेशी मागणी नसल्याने स्थानिक ऑईल मिलकडून शेंगाची विशेष खरेदी झाली नाही.[१३१]

भुईमुगाचे पीक सर्वत्र जोरदार असल्याने सप्टेंबर १९६० अखेर तेलबियाचा बाजार मंदावला. परंतू बार्शी पेठेत जुन्या शेंगाची आवक संपल्याने येथील तेल व्यापाऱ्यांनी चढत्या भावाने शेंगाची खरेदी केली. ऑक्टोबर १९६० पासून या पेठेत नवीन घुंगरू शेंगदाण्याची आवक सुरू झाली. हा शेंगदाणा मातीमिश्रित व ओला असल्याने येथील स्थानिक तेल कारखानदारांनी तो खरेदी केला नाही. " परदेशी चलन हा देशाच्या जिवनमरणाचा प्रश्न असल्याने शेंगदाणा व तेल यांच्या भावात वाढ झाली असली तरी सरकार यांच्या


निर्यातीचे धोरण चालूच ठेवील " असे राजकोट येथे भारताचे तत्कालीन अर्थमंत्री श्री. मोरारजीभाई देसाई यांनी प्रतिपादन केले. त्यामुळे शेंगदाणा तेलाच्या निर्यातीमध्ये वाढ होऊ लागली. त्यामुळे तालुक्यातील तेल उद्योगांना फायदा झाला.[१३२] इ. स. १९६१-६२ मध्ये शेंगदाणा पेंडेची निर्यात वाढत्या प्रमाणावर होणार आहे व स्टेट ट्रडिंग कार्पोरेशन तेलाचीही मोठ्या प्रमाणावर निर्यात करणार आहे. अशा बातम्यामुळे शेंगाचे भाव वाढले. तरीही तालुक्यातील तेलगिरण्यांनी मोठ्या प्रमाणामध्ये तेलाचे उत्पादन घेतले. या वर्षामध्ये तालुक्यातून शेंगदाणा पेंडीची रवानगी दक्षिण भारतात मोठ्या प्रमाणावर झाली.[१३३]

इ. स. १९६४-६५ या वर्षामध्ये बार्शी पेठेमध्ये शेंगाचे भाव चढते राहीले. उन्हाळी शेंगाची आवक मोठ्या प्रमाणावर झाली. मात्र उन्हाळी शेंगापासून तेल काढण्याचा खर्च व विक्रीची किंमत यांचा ताळमेळ बसत नसल्याने तालुक्यातील बऱ्याच ऑईल मिल बंद राहिल्या. त्यामुळे बार्शी पेठेत तेलाची कमतरता भासू लागली. बार्शी पेठेत दिवाळीच्या पाडव्यापासून सर्व तेलगिरण्या चालू झाल्या. त्यामुळे पुन्हा या पेठेत शेंगासाठीचे गिऱ्हाईक वाढले.[१३४]

इ. स. १९६६-६७ मध्ये बाजारभावाची घसरण सातत्याने सुरू असल्याने स्थानिक ऑईल मिल बंद राहिल्या. या समस्येतून कायमचा मार्ग काढण्यासाठी याच वर्षामध्ये बार्शी तालुक्यातील तेली समाजाने स्थापन केलेल्या " बार्शी तेली समाज उत्पादक सहकारी सोसायटी " ने 'अ' वर्ग व्यापाराचा परवाना घेतला. ३० जून १९६७ अखेर या सोसायटीने ४२,२६५ रूपयांचा व्यवहार केला.[१३५]

मुख्य बाजारात पाहिजे तेवढया तेलबिया खरेदी करता याव्यात, ग्राहकांना चांगल्या दर्जाचे तेल पुरवावे व बैलघाण्याचा धंदा हा ऑईल मिल, रोटरी मिलच्या बरोबरीने चालावा यासाठी तेली व्यापाऱ्यांची ही सहकारी सोसायटी स्थापन करण्यात आलेली होती. या बाजारपेठेमध्ये ही सोसायटी मोठ्या प्रमाणावर तेलबियांची खरेदी करत असे. ३० जून १९६८ अखेर या सोसायटीने १,८१,७५३ रूपयांचा तेलबियांचा व्यवहार केला.[१३६]

आलेख क्र. ६



(संदर्भ : कृषी उत्पन्न बाजार समिती, बार्शी, संदर्भीय वार्षिक अहवाल)

मुंबई पेठेतील शेंगदाणा तेलाच्या भावावर येथील तेलबियांचा व्यापार चालतो. त्यामुळे तेथील भावाच्या चढउताराचा परिणाम येथील तेल उद्योगावर निश्चितच होतो.[१३७]

इ. स. १९७१-७२ च्या दरम्यान दुष्काळग्रस्त परिस्थितीमुळे तेलास गिऱ्हाईक राहिले नाही. त्यामुळे तेलाचे भाव उतरले. याचा येथील तेलउद्योगावर विपरित परिणाम झाला. यातच डिसेंबर १९७१ मधील भारत-पाक युध्दाची भर पडली.[१३८] इ. स. १९७३-७४ मध्ये शेंगाच्या तुलनेत तेलाचे भाव चांगलेच वधारलेले होते. त्यामुळे येथील कारखानदारांनी ओला माल देखील खरेदी केला. मात्र पुढे शेंगाची आवक वाढल्याने तेलाचे भाव कमी झाले. पुढे खरीपातील तेलबियांची दयनिय अवस्था दिसताच तेलाचे भाव पुन्हा वाढले. जानेवारी १९७४ मध्ये मुंबई पेठेतील तेलाचे भाव खूप वाढले. त्यामुळे बार्शी पेठेमधील शेंगाचे भाव वाढले. परंतू सततच्या वाढत्या तेलाच्या भावामुळे बार्शी तालुक्यातील तेल कारखानदारांनी परळी, जालना, लातूर या पेठेतून शेंगाची खरेदी केली. याच दरम्यान करडीचेही भाव प्रचंड वाढले. त्यामुळे स्थानिक तेल कारखानदारांना अशा चढत्या भावामध्ये करडी खरेदी करून कारखाने चालविणे परवडत नव्हते. शिवाय यास फारसे गिऱ्हाईक नसल्याने ते परवडत नव्हते. त्यामुळे तालुक्यातील तेल कारखानदारांनी आपले लक्ष शेंगदाणा तेलावरच केंद्रीत केलेले दिसते.[१३९]

इ. स. १९७७-७८ या बाजारवर्षामध्ये तेलबियांचा व्यापार स्थिर होता. शिवाय सरकारी योजनेनुसार लोकांना तेलवाटप करण्यात आल्यामुळे तेलाची मागणी कमालीची घटली. त्यामुळे या कालावधीमध्ये तालुक्यातील केवळ ४ तेल कारखाने चालू होते.[१४०] इ. स. १९८५-८६ मध्ये स्थानिक तेल कारखानदारांनी व व्यापाऱ्यांनी वर्षभर या तेलबियांची मोठ्या प्रमाणावर खरेदी केली. कारण तेलास मागणी वाढल्याने तेल उद्योगाला भरभराटीचे दिवस येऊ लागले. या वर्षामध्ये तालुक्यामध्ये १२ तेल कारखाने व ८

तेलघाणी चालू होती.[१४१] इ. स. १९८७-८८ या वर्षात स्थानिक तेल कारखानदारांनी शेंगाची वर्षभर खरेदी केली. कारण तेलाच्या सततच्या भाववाढीमुळे तेल व्यावसायाला खूप चांगले दिवस आले होते. त्यामुळे स्थानिक तेल कारखानदारांना होणाऱ्या नफ्यामध्ये वाढ झाली होती. त्यामुळे तालुक्यातील तेल गिरण्या व तेलघाणे यांची संख्या वाढली. या वर्षामध्ये तालुक्यात १६ तेल कारखाने व ६ तेलघाणी चालू होती.[१४२]

इ. स. १९८९-९० मध्ये शेंगाचे भाव सतत तेजीत राहिले कारण शेंगा व सूर्यफूल तेलास मुंबई, पुणे विशेषत: दिल्ली येथून मागणी वाढली. त्यामुळे शेंगा व सूर्यफूल यांची स्थानिक तेल कारखानदारांनी वर्षभर मोठ्या प्रमाणावर खरेदी केली.[१४३] अशा प्रकारे बार्शी तालुक्यातील तेल उद्योग इ. स. १९९० पर्यंत खूप भरभराटीस आला होता. यामध्ये येथील बाजारपेठेची व रेल्वेची खूप मोलाची भूमिका होती.

५.५. बार्शी तालुक्यातील इतर उद्योगधंदे

बार्शी, सोलापूर, पंढरपूर, महूद, मोहोळ, अकलुज, मंगळवेढे आणि नाझरे ही सोलापूर जिल्ह्यातील दोरखंड उद्योगाची प्रमुख केंद्रे होती. इ. स. १९६१ अखेर ४,२९६ लोक या व्यावसायामध्ये गुंतलेले होते. त्यावेळी या उद्योगाचे स्वरूप प्रामुख्याने घरगुती व अतिशय छोटे असे होते. या उद्योगासाठी लागणारा कच्चा माल बार्शी, पंढरपूर, माळशिरस, सांगोला या तालुक्यातून मोठ्या प्रमाणावर मिळत होता.[१४४]

बार्शीमध्ये असलेल्या विविध उद्योगांपैकीच लक्ष वेधून घेणारा एक उद्योग म्हणजे " चंडक नायलॉन दोरखंड उद्योग " होय. संपूर्ण सोलापूर जिल्ह्यामध्ये इतक्या मोठ्या स्वरूपातील असा नायलॉन दोरखंड निर्मितीचा उद्योग नाही. या उद्योगामध्ये दररोज ५ टन नायलॉन दोरखंडाची निर्मिती केली जाते. या उद्योगाचे एकूण भांडवल २ कोटी रूपयांपेक्षा अधिक होते. याचा प्रमुख आधार बँका आहेत. या उद्योगाचा वार्षिक खर्च १ कोटी रूपये इतका होता. कामगारांना ४५०० पेक्षा अधिक वेतन व वेळोवेळी बोनस दिला जातो. अर्थात हे वेतन त्यांच्या कार्य कुशलतेनुसार व अनुभवानुसार वाढत जाते. कामगारांचे कामाचे तास ८ होते. मात्र स्वेच्छेने कामगार आपल्या नियमित वेळेपेक्षा अधिक काम करू शकतात. यासाठी त्यांना मिळणारे वेतन नियमित वेतनापेक्षा जास्त असते. या उद्योगातील कामगारांना मालकाच्या वतीने दोन वेळेस मोफत भोजन दिले जाते.[१४५]

बार्शी शहराबाहेरच्या कामगारांना राहण्यासाठी या उद्योगाच्या मालकांनी वसाहत निर्माण केली आहे. होतकरू कामगारांना गरजेनुसार त्यांच्या कौटुंबिक व इतर गरजा भागविण्यासाठी आगाऊ रक्कमा दिल्या जातात. कामाच्या कालावधीमध्ये काही दुखापत झाल्यास मोफत औषधोपचार केले जातात.

वेळोवेळी महागाई भत्ता व पगारवाढ दिली जाते. कामगारांसाठी भविष्य निर्वाह निधी योजना लागू आहे. या कारखाण्यामार्फत प्रत्येक कामगाराचा २ लाख रूपयाचा विमा काढला जातो. या उद्योगामार्फत रक्तदान शिबीर व मोफत आरोग्य तपासणी शिबिरे वेळोवळी आयोजित केली जातात. असे असले तरी कच्चा माल, मजूर, पाणी या घटकांची कमतरता या उद्योगाला सातत्याने भासते. कारण या उद्योगाचे स्वरूप खूपच वाढलेले आहे. या उद्योगामुळे तालुक्यातील अनेक बेकार तरूणांना रोजगार मिळाला आहे. या उद्योगाने कामगारांच्या हिताचा सातत्याने विचार केला. या उद्योगाचे मालक स्वत: कामगारांशी सातत्याने संवाद साधतात. त्यांच्या सुख-दुखा:शी एकरूप होतात. येथील कामगारांना या कारखाण्याविषयी खूपच आत्मियता वाटते. यामुळेच या उद्योगाचा झपाट्याने विकास झाला आहे.[१४६]

स्वातंत्र्यपूर्व भारत देशात भारतीयांच्या विचारावर मर्यादा येत असल्याने ब्रिटिशांनी ज्या सुविधा निर्माण केल्या त्या पलीकडे जाऊन स्वत: सुधारणा करणे भारतीयांना शक्य झाले नाही. त्यामुळे वडिलोपार्जित परंपरेनुसार विविध वस्तूंची निर्मिती केली जात होती. त्याची निर्मिती फारच अल्प व केवळ स्वयंपूर्णता या हेतूने केली जात होती. काळानुसार यामध्ये बदल घडत गेले. नैसर्गिक साधनसंपत्तीपासून विविध वस्तूंचे उत्पादन सुरू झाले. परंतू संशोधकांनी प्लॅस्टिकचा उपयोग दैनंदिन जीवनातील आवश्यक गरजा भागविण्यासाठी होऊ शकेल याचा विचार केला. इ. स. १८६० मध्ये जे. डब्ल्यू. हायर आणि ओ. एस. हायर या बंधूंनी प्लॅस्टिकचा शोध लावला. इ. स. १९२० पासून प्लॅस्टिकपासून विविध वस्तू बनविण्यात येऊ लागल्या. पूर्वी कारखान्यांची संख्या मर्यादित होती. आता त्यांची संख्या वाढली असून लघुउद्योगही मोठ्या प्रमाणावर सुरू झाले आहेत. प्लॅस्टिकपासून विविध वस्तू बनविण्याचे कारखाने भारतात सर्वात जास्त महाराष्ट्रामध्ये आहेत. त्यांची संख्या १५४० पेक्षा अधिक आहे. इ. स. १९७२ पूर्वी महाराष्ट्रामध्ये या उद्योगाचे स्वरूप फारसे मोठे नव्हते. मात्र त्यानंतर हा उद्योग खूप भरभराटीस आला.[१४७]

बार्शी तालुक्यामध्ये हा उद्योग मोठ्या प्रमाणामध्ये केला जातो. बार्शीतील मे. सोमाणी ॲग्रो प्लॅस्टिक कारखाण्यामधून फार मोठ्या प्रमाणामध्ये शेतीउपयोगी पी. व्ही. सी पाईपचे उत्पादन घेतले जाते. या कारखान्याचे एकूण भांडवल ३ कोटी रूपयापेक्षा अधिक असून या उद्योगामुळे तालुक्यातील २५ पेक्षा अधिक लोकांना रोजगार मिळाला आहे. या उद्योगाला आवश्यक असणारा कच्चा माल आवश्यकतेनुसार संपूर्ण देशातून मागविला जातो. तर या कारखाण्यामध्ये तयार होणाऱ्या पक्क्या मालाची प्रमुख बाजारपेठ सोलापूर जिल्हा हा आहे. या कारखाण्याचा वार्षिक खर्च १ कोटी ३५ लाख रूपये इतका आहे. या उद्योगातील नफ्याचे प्रमाण ८ टक्के इतके आहे.[१४८]

कृषी अधिकारी या शासकीय नोकरीचा त्याग करून दिनेशसिंह परदेशी यांनी जे. डी. पी. कृषी उर्जा या नावाखाली टाकाऊ लाकडाचा भुसा, शेंगाची टरफले, काट्याकुट्या यांचा वापर करून पांढरा कोळसा निर्माण करण्याचा उद्योग बार्शी येथे सुरू केला. अशा स्वरूपाचा हा महाराष्ट्रातील पहिलाच उद्योग होता. यामध्ये तयार झालेला पांढरा कोळसा राज्यातील विविध केमिकलच्या कारखान्यामध्ये दगडी कोळशाला पर्याय म्हणून वापरला जातो.[१४९]

कातडी उद्योग हा देशातील एक महत्वाचा उद्योग आहे. या धंदयामध्ये चांभार, मोची, ढोर, धेड, महार कसाई या जातीतील लोक आहेत. इ. स. १९६३ च्या सुमारास महाराष्ट्रामध्ये अर्धा कोटी कातडी कमाविली जात होती. कारखाण्यात तयार होणाऱ्या मालामुळे या परंपरागत उद्योगाला फार मोठ्या स्पर्धेला तोंड दयावे लागते. शिवाय हा उद्योग मागासलेल्या वर्गाच्या ताब्यात असल्यामुळे भांडवलाची टंचाई हे तर या धंदयाचे खास वैशिष्टयच आहे. पैशाच्या टंचाईमुळे अनेकवेळा अर्धवट कमाविलेले कातडे बाजारात विकावे लागते. त्यामुळे हा घटक फारसा सुधारलेला दिसत नाही.[१५०] सोलापूर जिल्ह्यातील ' बार्शी ' हे एक चामडी उद्योगाचे महत्वाचे केंद्र होते.[१५१]

बार्शी तालुक्यातील बार्शी, वैराग, पांगरी, मालवंडी, कारी, येडशी, आगळगाव, उपळे (दु), नारी, सुर्डी, मानेगाव, गौडगाव ही या उद्योगाची प्रमुख केंद्रे होती. सुरूवातीला साधारणतः ८ दिवस कच्ची कातडी चुना मिसळलेल्या नांदीत (हौद) टाकली जाते. लाकडाच्या पाटावर ते कातडे स्वच्छ केले जाते. त्यानंतर बाभळीची साल, हिरडा व पाणी एकत्र केलेल्या नांदित ते कातडे टाकले जाते. अशी प्रक्रिया तीन वेळेस करावी लागत असे. त्यानंतर प्रत्येक कातडयात बाभळीच्या व हिरडयाच्या सालीचे पाणी एकत्र करून ते कातडयात भरून नंतर ८ दिवस आडूला लटकत ठेवावे लागते. त्यानंतर ते पसरून वाळत घालावे लागते. शेवटी त्याची घडी करून बाजारात विकण्यास नेले जाते. त्यावेळेस हे कातडे लांबी-रूंदी पाहून नगावर विकले जाई. शेतकऱ्यांना पूर्वी पाण्याची मोट बांधण्यासाठी, कोळ्याची पाणी वाहण्याची ' पकाल ' तयार करण्यासाठी, पादत्राणे, शेतीच्या विविध साहित्यासाठी मोठ्या प्रमाणावर वापर होत असे. पायाच्या पाउंडावर मोट मोजली जात असे. एका पाउंडाला १० रूपये भाव होता. ही मोट कमीतकमी ६ पाउंड व जास्तीत जास्त ८ पाउंड असे. यासाठी बैलांची जास्त गरज होती. त्यामुळे प्रत्येक शेतकऱ्याकडे ४ ते ६ बैल असायचे. त्यामुळे हा व्यवसाय खूप तेजीत होता. जलसिंचनाची आधुनिक साधणे आल्यापासून या उद्योगाला उतरती कळा लागली. त्यामुळे हा व्यवसाय करणारे लोक मुंबईकडे मोठ्या प्रमाणावर स्थलांतरित झाले. सध्या केवळ बार्शी शहरामध्येच हा उद्योग चालतो. तसेच पांगरी येथे कातड्यांचा फार मोठा बाजार भरतो.[१५२]

बार्शी तालुक्यातील लाकूड उद्योग हा एक महत्वाचा उद्योग आहे. बार्शी तालुका व परिसरामधील तोडलेली झाडे बैलगाडयांमधून बार्शीला येत असत. त्यांची पध्दतशीर लिलावाने विक्री करण्याची सुरूवात बार्शीमध्ये प्रथम श्री. बकशेट्टी यांनी केली. जळाऊ लाकडाबरोबरच इमारतीसाठी उपयोगी पडणाऱ्या लाकडी ओंढक्याचीही बार्शीमध्ये विक्री होऊ लागली. कालांतराने या ओंढक्यापासून फळया तयार करण्याच्या ' सॉ मिल्स ' बार्शीमध्ये सुरू झाल्या. श्री. जगदाळे यांनी इ. स. १९५० मध्ये विजेवर चालणारे पहिले ' सॉ मशीन ' बार्शीमध्ये आणले. इ. स. १९९० अखेर बार्शीमध्ये ११ ' सॉ मिल्स ' होत्या. सॉ मशीनच्या सहाय्याने बाजारात आलेल्या लाकडी ओंढक्याची यांत्रिक पध्दतीने कटाई करण्याची व्यवस्था झाल्यामुळे बार्शीतील लाकूड उद्योगाला उर्जितावस्था आली. त्यामुळे फर्निचर तयार करण्याच्या उद्योगालाही बार्शीमध्ये भरभराटीचे दिवस आले. इ. स. १९९० अखेर या उद्योगामध्ये १२३ लोक कार्यरत होते. बार्शी येथे कर्नाटकातून तंबाखू आणून त्यापासून तपकीर बनविण्याचा व्यवसाय बार्शीतील श्री. गिराम हे करत होते. यातूनच बार्शीच्या विडी उद्योगाची सुरूवात झाली. बार्शीमध्ये या उद्योगाचा श्रीगणेशा श्रीमती कोंदनबूबू यांनी केला. या उद्योगाचे स्वरूप, भांडवल व त्यामानाने मिळणारा नफा लक्षात आल्यानंतर या उद्योगाकडे मोठ्या कारखानदारांचे लक्ष गेले. बार्शी मध्ये छोकराछाप विडी वर्क्स, ठाकूर सावेदकर आणि कंपनी, १ नंबर विडी कारखाना, ५ नंबर विडी कारखाना यातून मोठ्या प्रमाणावर विडीचे उत्पादन घेतले जाते. यातून अनेक लोकांना रोजगार मिळाला आहे. [१५३]

विडी उद्योग हा सोलापूर जिल्ह्यातील एक महत्वाचा उद्योग म्हणून ओळखला जातो. बार्शी, सोलापूर, पंढरपूर, माढा ही या उद्योगाची जिल्ह्यातील प्रमुख केंद्रे आहेत. इ. स. १९६१ च्या जनगणनेनुसार ७,४६५ लोक या व्यवसायामध्ये गुंतलेले होते. विडी आणि सिगारेट कायदयान्वये सरकारी मजूर अधिकाऱ्याची सोलापूर या ठिकाणी निरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली हाती. या व्यवसायावर देखरेख ठेवणे, संबंधित परिसर व त्या परिसरातील कामगार यांच्याशी संवाद साधणे, त्यांच्या नोंदीची तपासणी करणे, तसेच या कायदयाची अंमलबजावणी योग्यरित्या होत आहे की नाही हे पाहणे ही या संबंधित अधिकाऱ्याची जबाबदारी होती. [१५४]

महाराष्ट्रामध्ये गूळाचा धंदा फार पूर्वीपासून चालत आला आहे. ऊस उत्पादक क्षेत्रातच हे गूळ तयार करण्याचे लहान मोठे कारखाने आढळतात. पूर्वी गूळ तयार करण्यासाठी बैलाच्या सहाय्याने ओढल्या जाणाऱ्या चरक्याचा वापर केला जात असे. परंतू हल्ली बैलाच्या चरकाची जागा यांत्रिक चरक्याने घेतली आहे. यांत्रिक शक्तीवर या धंदयाचा श्रीगणेशा श्री. चितळे यांनी चितळेनगरला केला. कोल्हापूर जिल्ह्यामध्ये तयार होणारा गूळ भारतात सर्वश्रेष्ठ समजला जातो. इ. स. १९६० अखेर महाराष्ट्रामध्ये गूळ कारखान्यांची एकूण संख्या ६५६ इतकी होती. तर यामध्ये ४०४४ लोक काम करत होते. यापैकी सोलापूर

जिल्ह्यामध्ये ५९ कारखाने होते, तर यामध्ये १००९ इतके कामगार काम करत होते. महाराष्ट्रामध्ये या उद्योगातील ही दुसऱ्या क्रमांकाची कामगारांची संख्या होती.[१५५]

इ. स. १९६२ मध्ये बार्शी तालुक्यातील पांगरी येथे श्री. नारकर यांनी गूळ व खांडसरी उद्योग चालू केला होता. हिच या तालुक्यातील साखर उद्योगाची सुरूवात होय. बार्शी तालुक्यामध्ये जवळजवळ ७० पेक्षा जास्त गावामध्ये गूळ निर्मितीचा उद्योग चालतो. यामुळे शेतकऱ्यांना तात्काळ पैसा मिळतो. शिवाय तालुक्यामध्ये एकमेव साखर कारखाना होता व तोही आजारी अवस्थेमध्ये असल्याने गूळ उद्योगाला तालुक्यामध्ये चांगले दिवस आले. इ. स. २०१० पर्यंत ही स्थिती कायम होती. यानंतर तालुक्यामध्ये दोन नवीन साखर कारखाने चालू झाले. त्यामुळे या उद्योगाला उतरती कळा लागली.[१५६]

५.६. औद्योगिक वसाहत

औद्योगिक वसाहतीचा विकास हा फार जूना विचार आहे. इ. स. १८८५ मध्ये अमेरिकेतील ' शिकागो ' येथे पहिली औद्योगिक वसाहत स्थापन झाली. पुढे इ. स. १८९६ मध्ये इंग्लंडमध्ये मँचेस्टर जवळ ' ट्रॅफोर्ड पार्क ' येथे औद्योगिक वसाहत स्थापन झाली. या वसाहतीचे वर्णन विल्यम ब्रेडो यांनी ' औद्योगिक वसाहतीची जन्मदात्री ' असे केले आहे. दुसऱ्या महायुध्दानंतर खऱ्या अर्थाने औद्योगिक वसाहतींच्या विकासाला वाव मिळाला. विकसित व विकसनशील अशा दोन्ही प्रकारच्या देशांमध्ये विभिन्न उद्दिष्टये दृष्टीसमोर ठेऊन औद्योगिक वसाहतींची स्थापना करण्यात आली. लघु उद्योगाचा विकास साधणे, उद्योगांचे विकेंद्रीकरण करणे तसेच मोठ्या उद्योगांच्या परीसरात पूरक उद्योगांच्या विकासाला सहाय्य करणे अशा विविध हेतूने दुसऱ्या पंचवार्षिक योजनेमध्ये औद्योगिक वसाहतीची स्थापना करण्याचा कार्यक्रम देशात आखण्यात आला. औद्योगिक वसाहतींच्या संदर्भात भारतातील इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्र खूप प्रगतीपथावर दिसतो. यातही पश्चिम महाराष्ट्रातील औद्योगिक वसाहतींनी विशेष प्रगती केल्याचे निदर्शनास येते.[१५७]

एकाच ठिकाणी नवीन उद्योग सुरू करू इच्छिणाऱ्या कारखानदारांना एकत्र येवून औद्योगिक सहकारी वसाहत निर्माण करता येते. यासाठी महाराष्ट्र शासन स्वत: जमीन संपादित करून ९० वर्षाच्या कराराने उपलब्ध करून देते. अशा वसाहतीच्या सदस्यांनी २० टक्के रक्कम जमा केल्यास शासन तेवढीच रक्कम भागभांडवल म्हणून दीर्घ मुदतीच्या कर्ज रूपाने देते व राहिलेले ६० टक्के आयुर्विमा महामंडळ किंवा राज्य वित्तीय महामंडळाकडून कर्जाऊ घेता येते. महाराष्ट्रातील अविकसित भागात अशा वसाहती निर्माण करून मोठ्या कारखानदारांना आकर्षित करणे हा शासनाचा यामागील उद्देश आहे. यासाठी शासन

सर्वतोपरी सहकार्य करते.[१५८] बार्शी तालुका उद्योग विकास सहकारी सोसायटीची नोंदणी २३ मे १९६१ रोजी झाली. (तिचा नोंदणी क्रमांक पी - ६२६० / ६१ हा आहे) [१५९]

तिसऱ्या पंचवार्षिक योजनेमध्ये बार्शी व सोलापूर या ठिकाणी सहकारी तत्वावर औद्योगिक वसाहती स्थापन करण्याच्या प्रस्तावाला मान्यता मिळाली. त्यानुसार ' बार्शी ' येथे औद्योगिक वसाहत स्थापन झाली. या औद्योगिक वसाहतीसाठी सरकारकडून १७ एकर ८ गुंठे एवढी जमीन मिळाली. या वसाहतीमध्ये सुरूवातीला व्यापाऱ्याचे भागभांडवल ३६,७०० रूपये इतके होते. तर सरकारने ३६,७०० रूपये इतकी मदत केली होती. औद्योगिक वसाहतीची योजना व नकाशा याला सरकारने मंजूरी दिली. या वसाहतीमध्ये सुरूवातीला सिमेंट प्रक्रिया उद्योगाचे उत्पादन चालू झाले.[१६०]

श्री. प्रेमचंद माढेकर, ॲड. आण्णाराव हिंगमिरे, श्री. शिवाजीभाई आर्य अशा मंडळींनी एकत्र येऊन " बार्शी तालुका उद्योग विकास सहकारी संस्था " स्थापन केली. या संस्थेचे पहिले चेअरमन श्री. भाऊसाहेब झाडबुके हे होते. त्यांच्याच कालावधीत या संस्थेला १७ एकर जागा मिळून संस्थेच्या कार्यास सुरूवात झाली. झाडबुके यांच्यानंतर श्री. मधुकर जगताप, त्यानंतर श्री. अनिल बंडेवार या संस्थेचे चेअरमन झाले. त्यानंतर खऱ्या अर्थाने या संस्थेची घोडदौड सुरू झाली. इंजिनियरिंग, फॅब्रिकेशन, ऑईल मिल, डाळ मिल, चिंचोका उद्योग, केमिकल्स, कडबाकुट्टी, मसाले युनिट, सिमेंट पाईप व टाईल्स, स्टोन पॉलिश असे अनेक प्रकारचे कारखाने या औद्योगिक वसाहतीमध्ये झपाट्याने वाढू लागले. पुढे या संस्थेला दुसऱ्या वसाहतीकरिता २१ एकर जागा मिळाली. इ. स. १९८४ ते १९८७ या काळामध्ये श्री. पारसमल कांकरीया हे या संस्थेचे चेअरमन झाले. इ. स. १९८७ नंतर श्री. दिलीप सोपल यांनी या संस्थेचे चेअरमनपद स्विकारले. त्यांच्या अथक प्रयत्नामुळेच सोलापूरचे तत्कालीन जिल्हाधिकारी श्री. रत्नाकर गायकवाड यांनी इ. स. १९८८ मध्ये या संस्थेच्या तिसऱ्या औद्योगिक वसाहतीकरीता ३२ हेक्टर जागा दिली. या तिसऱ्या वसाहतीचे तत्कालीन क्रीडामंत्री श्री. शाम आष्टेकर यांच्या हस्ते " कै. यशवंतराव चव्हाण औद्योगिक वसाहत " असे नामांतर करण्यात आले. या परिसरात आमदार निधीतून घेतलेल्या दोन विहिरीमुळे पाण्याचा प्रश्न संपला. या औद्योगिक वसाहतीमुळे ३ ते ४ हजार लोकांना रोजगार मिळाला. इ. स. १९९० पर्यंत उत्कृष्ट कार्याबद्दल लेखा परीक्षण खात्याकडून या संस्थेस सतत 'अ' वर्ग मिळत होता.

महाराष्ट्र शासनाकडून प्रतिवर्षी प्रत्येक जिल्ह्यातून दोन उद्योजकांना पारितोषिके दिली जात होती. यामध्ये इ. स. १९८५-८६ मध्ये पहिले पारितोषिक मे. शांती ॲल्यूमिनियम इंडस्ट्रिज, इ. स. १९८६-८७ साली दुसरे पारितोषिक मे. व्यंकटेश टाईल्स, इ. स. १९८७-८८ साली दुसरे पारितोषिक मे. जलाराम प्लॅस्टिक इंडस्ट्रिज, इ. स. १९८८-८९ चे पहिले मे. सागर एंटर प्राईजेस व दुसरे पारितोषिक मे. ॲडव्हान्स

इंजिनियरिंग यांनी पटकाविले होते. इ. स. १९८६ साली " उद्योग भवन " या नावाने ओळखल्या जाणाऱ्या या संस्थेच्या स्वत:च्या भव्य अशा वास्तूचे उद्घाटन श्री. शरद पवार यांच्या हस्ते झाले. इ. स. १९९० अखेर या संस्थेकडे कोणाचेही कर्ज नव्हते व ही संस्था स्वत:च्या पायावर उभी होती. वसाहतींच्या परिसरामध्ये २५०० झाडांची लागवड करून पर्यावरण संवंर्धनाचेही काम या संस्थेने उत्तमरित्या केले आहे. इ. स. १९९० अखेर या औद्योगिक वसाहतीमध्ये पीव्हीसी पाईप व प्लॅस्टिक पिशवी निर्मितीचे सर्वात जास्त ११ कारखाने होते. याशिवाय चिंचोका पावडरचे ४, कडबाकुट्टी ४, सिमेंट पाईप व टाईल्स निर्मितीचे ३, तार व खिळे निर्मिती १, ॲल्युमिनियम व पितळी भांडी निर्मितीचे ३, केमिकल्सचे २, कोल्ड स्टोअरेज १, वहया निर्मितीचा १, ऑईल फॅक्टरी १, कातडी चप्पल व पिशवी निर्मितीचा १, ऑईल मिल ८, दाळ मिल व मसाले निर्मितीचे ५, टायर रिमोल्डिंगचा १, जीप व फायबर बॉडी बनविण्याचा १, स्कूटर मोटार ॲक्सेसरीजचा १ असे विविध कारखाने कार्यरत होते.[१६१]

३१ मार्च २००७ अखेर या सोसायटीच्या सभासदांची एकूण संख्या ७५५ इतकी होती. यामध्ये कारखानदार सभासद १८० होते, महिला सभासद ४५ होते. सहकारी संस्था सभासदांची संख्या १९ होती, तर इतर सभासद ५१४ होते. या वर्षापर्यंत या सोसायटीकडे कोणत्याही वित्तीय संस्थेचे कर्ज नव्हते.[१६२]

अशा प्रकारे बार्शी तालुक्याला समृध्दशाली औद्योगिक परंपरा लाभलेली आहे. स्वातंत्र्यापूर्वी निजाम व मोगल यांच्या सीमेवर तर स्वातंत्र्यानंतर मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्र यांना जोडणारा तालुका अशी वैशिष्टयपूर्ण ओळख असणारा हा प्रदेश पूर्वीपासूनच उद्योग-व्यापारामध्ये सातत्याने आघाडीवर होता. पेशवे काळामध्ये येथील सूत उद्योग भरभराटीस आला होता. निजामाच्या प्रदेशामध्ये पिकलेल्या कापसाची पूर्वीपासूनच बार्शी ही प्रमुख बाजारपेठ होती. त्यामुळे या उद्योगाच्या वाढ व विकासास सुयोग्य अशी पार्श्वभूमी येथे निर्माण झाली. अर्थात इंग्रजांच्या आगमणापूर्वी सोलापूर ही कापसाची प्रमुख बाजारपेठ होती. पुढे इंग्रज सोलापूर शहरामध्ये घुसल्यानंतर तेथील विणकर मोठ्या प्रमाणामध्ये बार्शी तालुक्यात आले. शिवाय तत्कालीन प्रशासकीय धोरणेही याला कारणीभूत होती. त्यातच २० व्या शतकामध्ये तालुक्यामध्ये रेल्वेचे आगमन झाल्याने तालुक्याच्या उद्योग-व्यापारात उल्लेखनीय भर पडली. रेल्वेमुळे अवजड मालाची वाहतूक जलद व मोठ्या प्रमाणामध्ये होऊ लागली. शिवाय येथील उत्पादनांना संपूर्ण देशाची बाजारपेठ रेल्वेमुळे उपलब्ध झाली. स्वातंत्र्योत्तर काळातील रस्ते विकासाने व आधुनिक तंत्रज्ञानाच्या विकासामुळे तालुक्यातील उद्योग-व्यापारांमध्ये नवचैतन्य संचारले. जिल्ह्याचा प्रधान उद्योग असणाऱ्या सूत उद्योगाचे बार्शी हे एक मोठे व सर्वात महत्त्वाचे केंद्र होते. पूर्वी तालुक्यामध्ये सुरू असणाऱ्या घरगुती सूत व्यवसायाचे विसाव्या शतकात गिरण्यांमध्ये रुपांतर झाले. स्वातंत्र्योत्तर काळामध्ये तालुक्यात तीन सूत गिरण्या सुरू झाल्या. यापैकी दोन गिरण्यांची स्थापना तालुक्यातीलच व्यक्तीने केली होती, हे या तालुक्यातील औद्योगिक

दृष्टीचे उत्तम उदाहरण होय. कारण जिल्ह्यातील बहुतांश मोठे उद्योग जिल्ह्याबाहेरील उद्योजकांनी सुरू केलेले होते. तालुक्यातील सूत उद्योगामागे लोकमान्य टिळकांची प्रेरणा होती. त्यामुळेच येथील एका मिलला लोकमान्य मिल असे नाव होते. यावरून असे लक्षात येते की लोकमान्य टिळकासारख्या असामान्य विभूतीचे या तालुक्याने लक्ष वेधले होते. याचबरेबर तालुक्यातील वैभवशाली डाळ उद्योग व तेल उद्योग यांनी बार्शी तालुक्याला औद्योगिक समृध्दीत लक्षणीय भर घातली. बार्शी तालुक्यातील डाळ संपूर्ण देशभर प्रसिध्द होती. पारंपरिक पध्दतीने सुरूवात झालेल्या या डाळ उद्योगाने स्वातंत्र्योत्तर काळात विशाल स्वरूप धारण केले. तालुक्यातील तेल उद्योगाने अशाच प्रकारे वाटचाल केली आहे. शिवाय तालुक्यातील औद्योगिक वसाहतीत सुरू झालेल्या विविध उद्योगधंदयांनी सर्वत्र आपला ठसा उमटविला आहे. यातूनच तालुक्याचा समृध्दशाली औद्योगिक इतिहास निर्माण झाला.

संदर्भ साधने

१) देशपांडे कृ. भा., आद्यौगिक सहकार दर्शन, २२ फेब्रुवारी १९६३, पृ. १, २, ३.

२) भारताची जनगणना , जिल्हा जनगणना हस्तपुस्तिका, सोलापूर, सन १९९१, पृ. ५०, ५१.

३) कित्ता, सन १९५१, पृ. ६, २४, २५.

४) कित्ता, सन १९६१, पृ. ४९.

५) महाराष्ट्र स्टेट गॅझेटियर, सोलापूर जिल्हा, इ. स. १९७७, पृ. ९७.

६) भारताची जनगणना , जिल्हा जनगणना हस्तपुस्तिका, सोलापूर, सन १९६१, पृ. ५०, ५१.

७) कित्ता, सन १९९१, पृ. ३८,

८) दैनिक लोकमत, २१ मे २०१३, पृ. ३.

९) गॅझेटीयरऑफ बॉम्बे प्रेसिडेन्सी, पृ. २६१, २७२, २७३.

१०) कित्ता, पृ. २६६, ३१८, ४१०, ५०३.

११) प्रा. पहूरकर व प्रा. साबळे, अधिकोषण व ग्रामीण विकास, पृ. १५८, १५९, १६१.

१२) वैद्य चिं. न., औद्योगिक विकास, जोशी व लोखंडे प्रकाशान पुणे, पृ. ५६.

१३) मोडक शं. के, आधुनिक परिवहनाचे अर्थशास्त्र. इ. स. १९८०, पृ. १०, ११.

१४) गॅझेटीयर ऑफ बॉम्बे प्रेसिडेन्सी, पृ. २५४, २५५, २५६, २५८.

१५) मोडक शं. के, पूर्वोक्त, पृ. १५६, १५८.

१६) गोखले. आर. एम, स्वातंत्र्योत्तर भारतीय अर्थव्यवस्था भाग-१, इ. स. १९७८, पृ. २०९, २११.

१७) सोलापूर जिल्हा परिषद रौप्य महोत्सव स्मरणिका इ. स. १९८७, पृ. १, २.

१८) अर्थ संकल्प, सोलापूर जिल्हा परिषद , अर्थ विभाग, इ. स. १९६४-६५, पृ. १८७ ते २०८.

१९) कित्ता, इ. स. १९६५-६६, पृ. १७५ ते १९२.

२०) महाराष्ट्र स्टेट गॅझेटियर, सोलापूर जिल्हा, इ. स. १९७७, पृ. ५९५.

२१) अर्थ संकल्प, सोलापूर जिल्हा परिषद, अर्थ विभाग, इ. स. १९६९-७०, पृ. १९९ ते २०३.

२२) कित्ता, इ. स. १९७१-७२, पृ. १९८ ते २०२.

२३) कित्ता, इ. स. १९७३-७४, पृ. १९२ ते १९४.

२४) कित्ता, इ. स. १९७६-७७, पृ. १२६.

२५) कित्ता, इ. स. १९७५-७६, पृ. १९८ ते २०२.

२६) वार्षिक प्रशासन अहवाल, सोलापूर जिल्हा परिषद, इ. स. १९७२-७३, पृ. ९२ ते ९५.

२७) कित्ता, पंचायत समिती विभाग-२, इ. स. १९७२-७३, पृ. १२.

२८) महाराष्ट्र स्टेट गॅझेटियर, सोलापूर जिल्हा, इ. स. १९७७, पृ. ७१८.

२९) भारताची जनगणना , जिल्हा जनगणना हस्तपुस्तिका, सोलापूर, इ. स. १९८१, पृ. २२.

३०) वार्षिक प्रशासन अहवाल, सोलापूर जिल्हा परिषद, इ.स.१९८५-८६, प्रकरण ६ वे, पृ. ४,२४.

३१) घाणेगांवकर सो. म, बार्शी तालुक्याची बार्शी तालुक्याची विकासगाथा इ. स. १९८५ पासून, १६ ऑगस्ट २००४, पृ. १२४ ते १२८.

३२) रस्ते विकास योजना, जिल्हा सोलापूर (१९८१-२००१), इ. स. १९८७, पृ. १७, २०.

३३) वार्षिक प्रशासन अहवाल, सोलापूर जिल्हा परिषद, इ. स. १९९१-९२, प्रकरण ६ वे, पृ. ८.

३४) मुंबई पुराभिलेख, आर. डी. फाईल क्रमांक ९११७ / ४९ जी-१९५१, पृ. ५, ६, ७.

३५) अर्थ संकल्प, सोलापूर जिल्हा परिषद , अर्थ विभाग, इ. स. १९६४-६५, पृ. २१७.

३६) मुंबई पुराभिलेख, आर. डी. फाईल क्रमांक ९४०५ / ४९ जी, पृ. १ ते ४.

३७) भारताची जनगणना , जिल्हा जनगणना हस्तपुस्तिका, सोलापूर, इ. स. १९९१, पृ. ४१, ४६.

३८) मोडक. शं. के., पूर्वोक्त, पृ. ६५, ६६.

३९) महाराष्ट्र स्टेट गॅझेटियर, सोलापूर जिल्हा, इ. स. १९७७, पृ. ४७६, ४७७.

४०) गोखले आर. एम., पूर्वोक्त, पृ. २०६, २०७.

४१) जिल्हा सामाजिक आर्थिक समालोचन, सोलापूर जिल्हा, इ. स. १९९०-९१, पृ. १४८.

४२) भारताची जनगणना , जिल्हा जनगणना हस्तपुस्तिका, सोलापूर, इ. स. १९६१, पृ. ५४, २२७.

४३) महाराष्ट्र राज्य गॅझेटियर, लातूर जिल्हा, भाग १, प्रथम मराठी आवृत्ती २००८, पृ. ५३१.

४४) स्मृतिगंध स्मरणिका, कृषी उत्पन्न बाजार समिती बार्शी, ७ जुलै १९७६.

४५) कृषी उत्पन्न बाजार समिती बार्शी, वार्षिक अहवाल, इ. स. १९५४-५५, पृ. १०, ११, २०.

४६) कित्ता, इ. स. १९५६-५७, पृ. ७, ८, १०, १५, १६.

४७) कुलकर्णी. डी. पी., शेतीमालाची बाजारव्यवस्था,ऑक्टोबर १९६२, पृ. २७६, २७७, २८२, २८३.

४८) कृषी उत्पन्न बाजार समिती बार्शी, वार्षिक अहवाल, इ. स. १९५७-५८, पृ. ८, १३.

४९) कित्ता, इ. स. १९५८-५९, पृ. ९, १५.

५०) कित्ता, इ. स. १९५९-६०, पृ. ९, १०, १७.

५१) कित्ता, इ. स. १९६०-६१, पृ. १३.

५२) कित्ता, इ. स. १९६१-६२, पृ. १४, १५, १९.

५३) कित्ता, इ.स. १९६२-६३, पृ. ६, १०.

५४) कित्ता, इ. स. १९६३-६४, पृ. ७, ९, १०.

५५) कित्ता, इ. स. १९६४-६५, पृ. ६, ७.

५६) कित्ता, इ. स. १९६५-६६, पृ. ७.

५७) कित्ता, इ. स. १९६६-६७, पृ. ९ ते ११.

५८) कित्ता, इ. स. १९६७-६८, पृ. १०.

५९) कित्ता, इ. स. १९७०-७१, पृ. ८, १४.

६०) कित्ता, इ. स. १९७१-७२, पृ. ८, ९.

६१) कित्ता, इ. स. १९७३-७४, पृ. ७.

६२) कित्ता, इ. स. १९७४-७५, पृ. १०.

६३) कित्ता, इ. स. १९७७-७८, पृ. ५, ४६.

६४) महाराष्ट्र स्टेट गॅझेटियर, सोलापूर जिल्हा, इ. स. १९७७, पृ. ३९०.

६५) कृषी उत्पन्न बाजार समिती बार्शी, वार्षिक अहवाल, इ. स. १९८५-८६, पृ. ४.

६६) कित्ता, इ. स. १९८७-८८, पृ. ४, ७.

६७) कित्ता, इ. स. १९८८-८९, पृ. ४.

६८) मुलाखत, श्री. रामचंद्रभाऊ भगवानदास सोमाणी, डाळ उद्योजक बार्शी.

६९) दैनिक जनता दरबार, ११ ऑगस्ट २०१०, पृ. १, २.

७०) प्रश्नावलीच्या माध्यमातून मिळालेली माहिती.

७१) मुलाखत, श्री. शामसुंदर शंकरलाल पुरोहित, डाळ उद्योजक बार्शी.

७२) दैनिक लोकमत, २१ मे २०१३, पृ. १८.

७३) देवधर. न. गो., सुती वस्त्रोद्योग, इ. स. १९७५, पृ. ६, ७, ९.

७४) उद्योजक मासिक, जून २०१२, पृ. २३, २४.

७५) देवधर. न. गो., पूर्वोक्त, पृ. १०.

७६) वैद्य चिं. न., पूर्वोक्त, पृ. १८, १९.

७७) देवधर न. गो., पूर्वोक्त, पृ. ४४, ४६.

७८) महाराष्ट्र स्टेट गॅझेटियर, सोलापूर जिल्हा, इ. स. १९७७, पृ. ४००.

७९) गॅझेटीयरऑफ बॉम्बे प्रेसिडेन्सी, पृ. २६४, २६५.

८०) देशपांडे कृ. भा., पूर्वोक्त, पृ. ९, १०, १२.

८१) गॅझेटीयरऑफ बॉम्बे प्रेसिडेन्सी, पृ. २७०, २७१, ३५१, ४१०.

८२) महाराष्ट्र स्टेट गॅझेटियर, सोलापूर जिल्हा, इ. स. १९७७, पृ. ३८८, ३८९, ४८१ ते ४८३.

८३) मुलाखत, देवधरे सुभाष श्रेणिक, बार्शी.

८४) महाराष्ट्र स्टेट गॅझेटियर, सोलापूर जिल्हा, इ. स. १९७७, पृ. ३८२ ते ३८४, ३८६.

८५) कित्ता, पृ. ४१८, ८१८.

८६) Ms. Bangar A. S., History of Barshi A Studay of Economic conditions (१८५६ ते १९६०) शिवाजी विद्यापिठाच्या एम्. फिल. साठी सादर केलेला प्रबंध. नोव्हेंबर १९८७, पृ. १४२, १४३, १४४.

८७) देवधर. न. गो., पूर्वोक्त, पृ. ४०.

८८) सोलापूर जिल्ह्याची जनगणना , सन १९६१, पृ. ५०.

८९) Ms. Bangar A. S., पृ. १४८, १४९.

९०) काळे. गो. र., बार्शी सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक व बार्शी तालुक्यातील सहकारी पतपेढ्यांचा इतिहास, पृ. १२२, १२३.

९१) Ms. Bangar A. S., पृ. १५०, १५२.

९२) मुलाखत, श्री. भगवान उध्दव लांडे, बार्शी.

९३) मुलाखत, देवधरे सुभाष श्रेणिक, बार्शी.

९४) Ms. Bangar A. S., पृ. १५३.

९५) प्रा. डॉ. स्वामी. भि. शि, सद्गुरूदर्शन-हिरक महोत्सव गौरव ग्रंथ, इ. स. २००५, पृ. ९०.

९६) भारताची जनगणना , जिल्हा जनगणना हस्तपुस्तिका, सोलापूर, इ. स. १९६१, पृ. ५०.

९७) मुलाखत, देवधरे सुभाष श्रेणिक, बार्शी.

९८) विधानसभा आश्वासन समिती, इ. स. १९७०, पृ. ७, २९६, २९७,३७७.

९९) भाव परिधान त्रैमासिक, अंक ९, एप्रिल-जून १९९०, पृ. नाहीत.

१००) काळे. गो. र., पूर्वोक्त, पृ. १२१, १२२.

१०१) भाव परिधान त्रैमासिक, अंक ९, एप्रिल-जून १९९०, पृ. नाहीत.

१०२) बार्शी नगरपालिका शतकोत्तर रौप्य महोत्सव स्मरणिका, जून १९९०.

१०३) भाव परिधान त्रैमासिक, अंक ९, एप्रिल-जून १९९०, पृ. नाहीत.

१०४) कामगार नोंद रजिस्टरच्या माध्यमातून मिळालेली माहिती.

१०५) प्रश्नावलीच्या माध्यमातून मिळालेली माहिती.

१०६) Ms. Bangar A. S., पृ. १४०, १४१.

१०७) मुलाखत, श्री. भगवान उध्दव लांडे, ३ मे २०१०.

१०८) मुलाखत, देवधरे सुभाष श्रेणिक, बार्शी.

१०९) बर्वे. प. म., साखर, इ. स. १९७७, पृ. १ ते ४.

११०) कित्ता, पृ. ९३ ते १०४

१११) महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, सुवर्ण महोत्सव स्मृतिग्रंथ, ७ सप्टेंबर १९६२, पृ. १०५, १०६.

११२) मोहिते यशवंतराव, महाराष्ट्रातील ऊस उद्योग, पृ. १, २.

११३) महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, सुवर्ण महोत्सव स्मृतिग्रंथ, पृ. १०७ ते १०९.

११४) बर्वे प. म., पूर्वोक्त, पृ. ११२ ते ११४.

११५) कामतकर व्यंकटेश, तुळशीदास जाधव, फेब्रुवारी २००५, पृ. ११४, ११५.

११६) भोगावती सहकारी साखर कारखाना, पहिला वार्षिक अहवाल, इ. स. १९७५-७६, पृ. १, २.

११७) कित्ता, २१ वा वार्षिक अहवाल, पृ. ७, ८, २०, २१.

११८) कित्ता, २८ वा वार्षिक अहवाल, पृ. ५, ४४.

११९) सहकारी महाराष्ट्र, रौप्य महोत्सवी विशेषांक, नोव्हेंबर १९८६, पृ. १६३.

१२०) भोगावती सहकारी साखर कारखाना, २२ व २३ वा वार्षिक अहवाल, इ. स. पृ. ९, ११.

१२१) कित्ता, २६ वा वार्षिक अहवाल, पृ. ५.

१२२) प्रकाश बियाणी, भारतीय उद्योजिका शून्य ते शिखर, सुवर्णा बेडेकर, इ. स. २०१०, पृ. ९१.

१२३) भोगावती सहकारी साखर कारखाना, २४ वा वार्षिक अहवाल, पृ. ४ ते ९

१२४) गॅझेटियर ऑफ बॉम्बे प्रेसिडेन्सी, पृ. २७२.

१२५) स्मृतिगंध स्मरणिका, कृषी उत्पन्न बाजार समिती बार्शी, इ. स. ७ जुलै १९७६.

१२६) बार्शी नगरपालिका शतकोत्तर रौप्य महोत्सव स्मरणिका, जून १९९०.

१२७) देशपांडे. कृ. भा., पूर्वोक्त, पृ. १३, १४, ८८, ८९.

१२८) महाराष्ट्र स्टेट गॅझेटियर, सोलापूर जिल्हा, पृ. ३९१.

१२९) कृषी उत्पन्न बाजार समिती बार्शी, वार्षिक अहवाल, इ. स. १९५४-५५, पृ. १०, १९.

१३०) कित्ता, वार्षिक अहवाल, इ. स. १९५६-५७, पृ. ३, ४ , ७, ८.

१३१) कित्ता, वार्षिक अहवाल, इ. स. १९५८-५९, पृ. ३, १२.

१३२) कित्ता, वार्षिक अहवाल, इ. स. १९६०-६१, पृ. १४, १५.

१३३) कित्ता, वार्षिक अहवाल, इ. स. १९६१-६२, पृ. १७.

१३४) कित्ता, वार्षिक अहवाल, इ. स. १९६४-६५, पृ. ५.

१३५) कित्ता, वार्षिक अहवाल, इ. स. १९६६-६७ पृ. १३, २०.

१३६) कित्ता, वार्षिक अहवाल, इ. स. १९६७-६८ पृ. १७.

१३७) कित्ता, वार्षिक अहवाल, इ. स. १९७०-७१ पृ. ५, ६, ७.

१३८) कित्ता, वार्षिक अहवाल, इ. स. १९७१-७२ पृ. ६.

१३९) कित्ता, वार्षिक अहवाल, इ. स. १९७३-७४ पृ. ५, ६.

१४०) कित्ता, वार्षिक अहवाल, इ. स. १९७७-७८ पृ. ५, ८.

१४१) कित्ता, वार्षिक अहवाल, इ. स. १९८५-८६ पृ. ३, ४, ८.

१४२) कित्ता, वार्षिक अहवाल, इ. स. १९८७-८८ पृ. ४, ७.

१४३) कित्ता, वार्षिक अहवाल, इ. स. १९८९-९० पृ. ४.

१४४) महाराष्ट्र स्टेट गॅझेटियर, पृ. ४१०.

१४५) प्रश्नावलीच्या माध्यमातून मिळालेली माहिती.

१४६) मुलाखत, श्री. चैतन्य शाम चंडक, उद्योजक.

१४७) उद्योजक मासिक, जून २०१२, पृ. ३७, ३८.

१४८) मुलाखत, श्री. रमेश विजयकिशोर सोमाणी.

१४९) दैनिक लोकमत, २१ मे २०१३, पृ. ३.

१५०) देशपांडे. कृ. भा., पूर्वोक्त, पृ. १२, १३.

१५१) महाराष्ट्र स्टेट गॅझेटियर, पृ. ४०७.

१५२) मुलाखत, रमेश नारायणकर व जनाबाई नारायाणकर, पूर्वीचे कातडी उद्योजक.

१५३) बार्शी नगरपालिका शतकोत्तर रौप्य महोत्सव स्मरणिका, जून १९९०.

१५४) महाराष्ट्र स्टेट गॅझेटियर, पृ. ४१६, ८१७.

१५५) वैद्य. चिं. न., पूर्वोक्त, पृ. ३४, ३५.

१५६) मुलाखत, गूळ उद्योजक.

१५७) प्रभाकर देशमुख, भारताची अर्थव्यवस्था, नोव्हेंबर १९८७, पृ. २१८, २१९, २२१ ते २२३.

१५८) धर्माधिकारी. भा. वि., लघु उद्योग गाईड, पृ. २२, २३.

१५९) बार्शी तालुका उद्योग विकास सहकारी सोसायटी, लेखापरिक्षण अहवाल, पृ. १.

१६०) महाराष्ट्र स्टेट गॅझेटियर, पृ. ३७९, ३८०.

१६१) बार्शी नगरपालिका शतकोत्तर रौप्य महोत्सव स्मरणिका,जून १९९०.

१६२) बार्शी तालुका उद्योग विकास सहकारी सोसायटी, लेखापरिक्षण अहवाल, पृ. २, ७, १८.

प्रकरण सहावे

उपसंहार

इ. स. १८३८ मध्ये निर्माण झालेल्या सोलापूर विभागातील ' बार्शी ' हा एक महत्वाचा उपविभाग होता. यापूर्वी हा उपविभाग तत्कालीन अहमदनगरला दोन वेळेस, तर पुण्याला एकवेळेस जोडण्यात आला. शेवटी इ. स. १८३८ मध्ये तो पुन्हा सोलापूरला जोडण्यात आला, तो आजतागायत कायम आहे. पुढे या सोलापूर विभागाचे जिल्ह्यात रूपांतर झाले. गावांच्या संख्येबाबत सदर जिल्ह्यामध्ये बार्शी तालुक्याचा प्रथम क्रमांक आहे. क्षेत्रफळाच्या व लोकसंख्येच्या दृष्टीने बार्शी तालुका खूप मोठा आहे. बार्शी तालुक्यातील वैरागसह ५७ गावांची राजकीयदृष्ट्या बिकट स्थिती होती. कारण या भागातील लोकांना विविध कामासाठी बार्शीला यावे लागत होते, मात्र या भागाचे मतदान बार्शी तालुक्यात नव्हते. इ. स. २००९ मध्ये हा भाग बार्शी तालुक्याला जोडण्यात आला व या भागाची होणारी परवड थांबली.

पूर्वेला बालाघाट डोंगररांगा व पश्चिमेला सीना नदी यामध्ये बार्शी तालुका पसरलेला असून त्याचा पृष्ठभाग पूर्वेकडून पश्चिमेकडे मंद उताराचा आहे. जिल्ह्याच्या मानाने बार्शी तालुक्याचे हवामान थंड आहे. एवढेच नव्हे तर या तालुक्यातील ' येडशी ' या ठिकाणाला सोलापूरचे माथेरान संबोधले जाते. थंड प्रदेशामध्ये राहणाऱ्या ब्रिटिशांनीही या ठिकाणी आपले एक हिलस्टेशन बांधले होते. पावसाच्या प्रमाणानुसार सोलापूर जिल्ह्याचे पूर्व, मध्य व उत्तर असे तीन विभाग पडतात. यापैकी पूर्व विभागामध्ये समावेश असणाऱ्या बार्शी तालुक्यात खात्रीशीर पाऊस पडतो. त्यामुळे तालुक्यातील शेतीच्या विकासाला हातभार लागला. शेतीची कृषी उत्पन्न बाजार समितीशी नाळ जोडल्याने शेतकऱ्यांच्या श्रमाला न्याय मिळून त्यांच्या आर्थिक सुबत्ततेत भर पडली. बँका, विविध कार्यकारी सहकारी सोसायट्या व शेती यांच्यातील परस्पर समन्वयाने तालुक्याच्या अर्थकारणाचा पाया भक्कम झाला.

प्रभू रामचंद्राने बार्शी तालुक्याच्या परिसरामध्ये काही दिवस वास्तव्य केल्याची कथा आहे. रामायण, गुरूग्रंथसाहेब यासारख्या पवित्र ग्रंथामध्ये सदर तालुक्यातील परिसर, तालुक्यातील संतांच्या ओव्या असे मौलिक संदर्भ आढळतात. भारतात विष्णूची भगवंत रूपातील केवळ दोनच मंदिरे आहेत. यापैकी एक बार्शी येथे आहे. हिंदू धर्मियांच्या या पवित्र मंदिराची माहिती औरंगजेबाला देखील होती. याशिवाय बार्शी तालुक्यामध्ये इतर ठिकाणीही प्रसिध्द देवस्थाने आहेत. यादव घराण्यातील पराक्रमी राजा ' सिंघण ' याने सदर तालुक्यातील कारी येथे एक महादेवाचे मंदिर बांधलेले असून ते आजही सुस्थितीत आहे. २०१०-११ मध्ये या मंदिराचा कारी येथील ग्रामस्थांनी जिर्णोध्दार केला. महान विठ्ठलभक्त माणकोजी बोधले महाराज यांच्यामुळे तालुक्यातील धामणगावची एक वेगळी ओळख निर्माण झालेली आहे.

युगप्रर्वतक छत्रपती शिवाजी महाराज त्यांना गुरूस्थानी मानत होते. बार्शीतील वीरशैवांचे मठ हे तालुक्याच्या सर्वधर्मसमभावाचे एक प्रतिक आहे. महाराष्ट्राची कुलस्वामिनी तुळजाभवानीची पालखी मूर्तीसह खांदयावर घेण्याचा मान तालुक्यातील आगळगाव व गोरमाळे या दोन गावांना आहे. हे तालुक्याच्या दृष्टीने खूप भूषणावह आहे.

मुघल, निजाम, मराठा, पेशवे व इंग्रज यांचा तालुक्याशी अत्यंत निकटचा संबंध आलेला आहे. तालुक्यातील वैराग व पानगाव येथील निंबाळकर घराण्याचे सातारा व कोल्हापूर येथील छत्रपती घराण्याशी वैवाहिक संबंध होते. इ. स. १७५० मध्ये सातारच्या गादीचा छत्रपती झालेला ' रामराजा ' त्यापूर्वीची पाच वर्षे सदर तालुक्यातील ' पानगाव ' येथे आपल्या जेष्ठ भगिणी दर्याबाई निंबाळकर यांच्याकडे वास्तव्यास होता. मराठी स्वराज्याचे सरलष्करपद दोन वेळा बार्शी तालुक्याला मिळाले होते. पेशव्यांचे एकेकाळचे तोफखाना प्रमुख ' पानसे ' तसेच छत्रपती राजाराम महाराजांची चौथी राणी मातोश्री अहिल्याबाई ही पानगावच्या निंबाळकर घराण्यातील होती. याच घराण्यातील श्री. चंद्रकांत नाना निंबाळकर हे वैराग-मोहोळ विधानसभा मतदारसंघाचे दोन वेळा आमदार होते. त्यांनी वैराग भागाच्या विकासामध्ये अविस्मरणीय भूमिका बजावली आहे. इ. स. १९७२ च्या दुष्काळातील वैराग गोळीबारात सुंदराबाई या महिलेने स्वतःचा प्राण देऊन नानांना वाचविले. यावरूनच नानांच्या कार्याची व लोकप्रेमाची प्रचिती येते.

रशियापर्यंत प्रसिध्द झालेले बार्शीचे शाहीर अमर शेख, इ. स. १८६३ मध्ये बार्शी येथे सार्वजनिक वाचनालयाची स्थापना करणारे रामचंद्र मोरेश्वर साने, इ. स. १९२४ मध्ये खास ब्राह्मणासाठी समर्थ व्यायामशाळेची स्थापना करणारे गोविंद कृष्ण टिळक व बाबाराव काळे हे तालुक्याच्या इतिहासातील दृष्टे विचारवंत होते. सदर तालुक्याला वैभवशाली शैक्षणिक वारसा लाभलेला आहे. यामध्ये लोकमान्य टिळकांचा प्रभाव असलेले काकासाहेब सुलाखे, कर्मवीर मामासाहेब जगदाळे, कर्मवीर गडसिंग गुरूजी, भाऊसाहेब झाडबुके व प्रा. सौ. प्रमिला देशमुख यांचे योगदान उल्लेखनीय आहे.

' बार्शी ' हे सोलापूर जिल्ह्यातील सर्वात महत्वाचे व प्रमुख असे व्यापारी ठिकाण आहे. १९ व्या शतकाच्या अखेरीस समृध्दशाली बाजारपेठ म्हणून बार्शीची सर्वत्र ख्याती झाली होती. यातूनच तालुक्यामध्ये विकसित झालेल्या छोटया-मोठ्या उद्योगधंदयांनी तालुक्याच्या आर्थिक विकासाची पायाभरणी केली. या बाजारपेठेची कीर्ति केवळ भारतीयच नव्हे तर, युरोपीय व्यापाऱ्यांपर्यंत पोहोचली होती. हे निजाम व मोगल यांच्या सीमेवरील ठिकाण असल्याने या ठिकाणी मालाची देवाण-घेवाण फार मोठ्या प्रमाणात होत असे. स्वतः पेशव्यांचेही या पेठेकडे विशेष लक्ष होते. या ठिकाणी स्थानिक व मुंबईचे व्यापारी यांच्या शिवाय युरोपीय व्यापारी व्यापार करत होते. एकेकाळी तालुक्यातील वैराग हे गाव व्यापारामध्ये बार्शीच्या पुढे होते.

मात्र पुढे कुर्डूवाडीला रेल्वे आल्यामुळे व बार्शी-कुर्डूवाडी सडक तयार झाल्यामुळे बार्शीचे व्यापारी महत्व वाढले. इ. स. १९११ मध्ये मिरज-लातूर नॅरोगेज रेल्वेमार्ग सुरू झाल्यानंतर त्यात कमालीची भर पडून तालुक्याचे अर्थकारण जलद गतीने विकसीत होत गेले. तालुक्यातील व्यापार-उद्योगाच्या उत्कर्षामध्ये या रेल्वेचा सिंहाचा वाटा आहे. पूर्वीपासून बार्शी तालुक्यामध्ये आठवडी बाजार व विविध देवतांच्या यात्रांच्या माध्यमातून फार मोठी आर्थिक उलाढाल होते. एक उल्लेखनीय बाब म्हणजे तालुक्यावर दुष्काळाचे सावट ओढवले असताना वैरागचे प्रसिध्द सावकार घोंगडे यांनी तालुक्यात अनेक ठिकाणी मोफत अन्नछत्रे चालवून समाजापुढे एक नवा आदर्श ठेवला.

भारताच्या स्वातंत्र्य लढयामध्ये बार्शी तालुक्याचे लक्षवेधी योगदान आहे. या माध्यमातून महात्मा गांधी, क्रांतिसिंह नाना पाटील यासह तत्कालीन अनेक नामवंत विभूतींचा या तालुक्याशी अनेकवेळा प्रत्यक्ष संबंध आलेला आहे. निजामाच्या अत्याचार व गुलामगिरीतून मुक्त होण्यासाठी उभारलेल्या हैद्राबाद मुक्ती संग्रामामध्ये बार्शी तालुक्यातील काही व्यक्तींनी वीरमरण पत्करले, तर काहींना घरापासून परागंदा व्हावे लागले. स्वातंत्र्यानंतर पंडित नेहरू, इंदिरा गांधी, डॉ. राजेंद्र प्रसाद, यशवंतराव चव्हाण अशा अनेक राष्ट्रीय पातळीवरील नेत्यांचा बार्शी तालुक्याशी संबंध आलेला आहे. स्वातंत्र्योत्तर बार्शी तालुक्याच्या जडणघडणीमध्ये तालुक्यातील सर्वच लोकप्रतिनिधींचे चांगले योगदान आहे. यापैकी नामदार श्री. दिलीपरावजी सोपल यांचे योगदान खूप महत्वपूर्ण आहे.

शेती हा बार्शी तालुक्याच्या आर्थिक विकासाचा कणा आहे. ज्वारी, तूर, विविध तेलबिया, बोर, द्राक्ष यांचे तालुक्यामधे मोठ्या प्रमाणावर उत्पादन घेतले जाते. सोलापूरला ज्वारीचे कोठार बनविण्यामध्ये बार्शी तालुक्याचे अनन्यसाधारण असे योगदान आहे. दख्खनच्या पठारावरून वाहून आलेल्या मातीने सोलापूर जिल्ह्याचा प्रदेश व्यापलेला आहे. जिल्ह्यामध्ये सर्वसाधारणत: काळी, बरड आणि तांबडी अशी तीन प्रकारची मृदा आढळते. याला केवळ बार्शी तालुका अपवाद आहे. या तालुक्यामध्ये मोठ्या प्रमाणावर काळी मृदा आढळते. शिवाय जलसिंचनाच्या सोयीही उपलब्ध असल्याने या तालुक्याच्या कृषी विकासास गती मिळाली आहे. तालुक्यामध्ये केवळ ' भोगावती ' ही एकमेव मोठी नदी आहे. इतर सर्व नद्या लहान स्वरूपाच्या आहेत. असे असले तरी कोरेगाव, पाथरी, हिंगणी, बाभुळगाव, ढाळे पिंपळगाव, जवळगाव यासारखे मध्यम प्रकल्प व कारी, मांडेगाव, चुंब, ममदापूर, चावडी, काटेगाव, कळंबवाडी, चारे, वालवड असे छोटे जलसिंचन प्रकल्प तसेच तालुक्यातील ३० ते ३५ गावांमध्ये असणारे छोटे तलाव, तालुक्यातील विविध नद्यांवर असलेले कोल्हापूर पद्धतीचे बंधारे व तालुक्यातील विहिरी यावर या तालुक्यातील बहुतांशी शेती अवलंबून आहे. सोलापूर जिल्ह्यामध्ये अक्कलकोट नंतर बार्शी तालुक्याचा जमीन महसूलासंदर्भात द्वितीय क्रमांक लागत असला तरी मागणी व जमा यासंदर्भात जिल्ह्यामध्ये बार्शी

तालुक्याचाच प्रथम क्रमांक लागतो. म्हणजेच तालुक्यातील जमीन महसूल वसूली जिल्ह्यामध्ये सर्वात उत्तम होती. हे तालुक्याच्या कृषी व आर्थिक समृध्दीचे द्योतक आहे. बार्शी तालुका महाराष्ट्रामध्ये बांध बंदिस्तीच्या कामामध्ये आघाडीवर होता. या तालुक्यातील बांध बंदिस्तीचे काम पाहण्यासाठी भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी या तालुक्यास आवर्जून भेट दिली. शेतीस जोडधंदा म्हणून केले जाणारे पशुपालन, तालुक्याच्या कृषी विकासातील जिल्हा परिषद व पंचायत समिती यांचे योगदान महत्वपूर्ण होते.

कृषी उत्पन्न बाजार समितीच्या स्थापनेमुळे शेतकऱ्यांना आपला शेतमाल विकण्यासाठी हक्काची व नियमबध्द अशी बाजारपेठ उपलब्ध झाली. कारण पूर्वी शेतमालाच्या विक्रीसंबंधी कोणतीही नियमबध्द व्यवस्था नव्हती. त्यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या शेतमालाचा योग्य मोबदला मिळत नव्हता. परंतू बाजार समितीच्या स्थापनेमुळे शेतकऱ्यांना आपल्या शेतमालाची योग्य किंमत मिळू लागली. साहजिकच शेतकऱ्याला शेती करण्यास प्रोत्साहन मिळाले. बाजार समितीच्या भाव प्रसिध्दीकरण योजनेमुळे शेतकऱ्यांना सर्व ठिकाणचे बाजारभाव समजू लागले. त्यामुळे शेतकऱ्याच्या शेतमालाला योग्य भाव मिळू लागला. बाजार समितीच्या शेतमालाची प्रतवारी करण्याच्या पध्दतीमुळे गुणवत्तापूर्ण शेतमालाचे उत्पादन करण्यास शेतकऱ्याला प्रोत्साहन मिळाले. त्यामुळे शेतकऱ्यांकडे मुबलक प्रमाणात पैसा येऊ लागला. यातूनच शेतकरी पुढे आधुनिक शेतीकडे वळला. शेती करण्याची नवनवीन तंत्रे शेतकरी आत्मसात करू लागला. शेतीपूरक व्यवसायामध्ये वाढ झाली. बाजार समितीच्या शेतमालाचे नियमन व शेतमालाची तोलाई या प्रक्रियेमुळे शेतकऱ्याची होणारी फसवणूक मोठ्या प्रमाणात कमी झाली. कृषी उत्पन्न बाजार समितीच्या स्थापनेमुळे शेतकऱ्यांची सावकारांकडून होणाऱ्या पिळवणुकीला मोठ्या प्रमाणात आळा बसला. पूर्वी ग्रामीण भागामध्ये दुणीने धान्य देण्याची पध्दत होती. म्हणजे चालू वर्षी घेतलेले धान्य पुढच्या वर्षी दुप्पटीने परत दयावे लागत असे. अशा अनेक अघोरी पध्दती बाजार समितीच्या स्थापनेमुळे नामशेष झाल्या. शेतकऱ्यांकडे मुबलक प्रमाणात पैसा आल्यामुळे त्यांचे राहणीमान उंचावले. पूर्वी झोपडीमध्ये राहणारा शेतकरी आता चांगल्या घरामध्ये राहू लागला. त्यांचीही मुले उच्च शिक्षण घेऊ लागली. एकंदर या बाजार समित्यांनी शेतकऱ्याच्या सर्वांगीण विकासास मोलाचा हातभार लावला.

दैनंदिन जीवनामध्ये येणाऱ्या अडीअडचणींतून मार्ग काढण्यासाठी लोकांना आवश्यक असणाऱ्या पैशाची गरज भागविण्याचे काम पूर्वी सावकार, व्यापारी, जमिनदार करत होते. या घटकांकडून लोकांचे खूप आर्थिक शोषण होत असे. याच प्रश्नातून विविध वित्तीय संस्थांचा उदय झाला. यामध्ये बँका व प्राथमिक सहकारी शेती संस्था खूप महत्वाच्या आहेत. बार्शी तालुक्याच्या आर्थिक विकासामध्ये या वित्तीय संस्थांचा मोलाचा वाटा आहे. सोलापूर जिल्ह्यातील सहकारी चळवळीचा प्रारंभ हा बार्शी तालुक्यापासूनच झाला आहे. त्यामुळे सोलापूर जिल्ह्याच्या सहकारी चळवळीच्या इतिहासात बार्शी तालुक्याचे नाव

सुवर्णाक्षरांनी कोरलेले आहे. बार्शी तालुक्यामध्ये सहकारी चळवळीचा आरंभ करण्याचे श्रेय रामचंद्र मोरेश्वर साने यांना जाते. त्यांनी बार्शी तालुक्यातील " कसबे तडवळे " या ठिकाणी मे १९०५ मध्ये पहिली सोसायटी स्थापन केली. ही बार्शी तालुक्यातीलच नव्हे तर सोलापूर जिल्ह्यातील पहिली व तत्कालीन मुंबई प्रांतामध्ये स्थापन झालेल्या सहकारी सोसायट्यांपैकी सहावी सहकारी सोसायटी होती. इ. स. १९१८ मध्ये जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक स्थापन करण्यातही रामचंद्र मोरेश्वर साने यांचा पुढाकार होता. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर लोकांच्या आर्थिक जीवनामध्ये सहकारी चळवळ हा एक महत्वाचा घटक बनला होता. बार्शी तालुक्यामध्ये या चळवळीने अभूतपूर्व यश मिळविले. प्रत्येक संस्थेच्या इतिहासात असा एक काळ येतो की, त्यावेळी ती संस्था स्थापन करणारे मूळ लोक दिवंगत होतात. त्यापैकी केवळ संस्थापकाचेच नाव लोकांच्या दीर्घ काळ लक्षात राहते, बाकीचे कार्यकर्ते विसरले जातात. वास्तविकत: अशा कार्यकर्त्यांचे कार्यदेखील तितकेच महत्वाचे असते. इ. स. १९४७ पूर्वी बार्शी तालुक्यामध्ये ३७ प्राथमिक सहकारी शेती संस्था स्थापन झाल्या होत्या. पुढे इ. स. १९९० अखेर ही संख्या ११६ पर्यंत वाढली. थोडक्यात स्वातंत्र्यप्राप्तीनंतर बार्शी तालुक्यातील विविध कार्यकारी सहकारी सोसायट्यांचा विस्तार वाढला. त्यांनी शेतीच्या माध्यमातून तालुक्याच्या अर्थकारणाची सुयोग्य घडी बसविण्याचा पाया घातला. सोसायट्यांची संख्या व सभासदांची संख्या यामध्ये बार्शी तालुक्याचा सोलापूर जिल्ह्यामध्ये प्रथम क्रमांक होता. जो इ. स. २०१३ पर्यंत कायम आहे. तालुक्यातील या सोसायट्यांनी आपली सामाजिक बांधिलकी अतिशय सचोटीने जोपासलेली आहे. गावातील विविध सार्वजनिक कामे, शाळा, आरोग्य, नैसर्गिक आपत्ती, वाचनालये, व्यायामशाळा अशा विविध बाबीवर सातत्याने खर्च करण्याचे कल्याणकारी उपक्रम सहकारी संस्थांनी राबविले. शेतकऱ्यांच्या सोयीसाठी तालुक्यातील प्रमुख १० प्राथमिक सहकारी शेती संस्थांनी कृषी ऊत्पन्न बाजार समिती बार्शीच्या बाजार भाव प्रसिध्दीचे काम केले.

इ. स. १९९० अखेर बार्शी तालुक्यामध्ये १) बँक ऑफ इंडिया. २) सेंट्रल बँक ऑफ इंडिया. ३) स्टेट बँक ऑफ इंडिया. ४) बँक ऑफ महाराष्ट्र. ५) युनियन बँक ऑफ इंडिया. ६) युनायटेड वेस्टर्न बँक, या राष्ट्रीयीकृत बँकांच्या शाखा स्थापन झाल्या होत्या. यापैकी युनायटेड वेस्टर्न बँक ही इ. स. २००५ मध्ये इंडस्ट्रीयल डेव्हलपमेंट बँक ऑफ इंडिया या बँकेत विलीन झाली. या राष्ट्रीयीकृत बँकांनी तालुक्यातील औद्योगिक, शेती, व्यापार अशा विविध घटकांना सातत्याने वित्त पुरवठा करून त्यांच्या पर्यायाने तालुक्याच्या आर्थिक विकासात भर घातली. समाजातील मध्यम व दुर्बल घटक, स्त्रिया, विद्यार्थी, शेतकरी, छोटे व्यावसायिक यांना आर्थिक आधार दिला. त्यामुळे लोकांचे जीवनमान उंचावले. विविध सामाजिक-धार्मिक सण, उत्सव यामध्ये सदर बँका उत्स्फूर्त सहभागी होतात. तालुक्यातील विद्यार्थ्यांना विविध पारितोषिकांच्या माध्यमातून सतत प्रोत्साहन देतात. स्त्रियांच्या आर्थिक स्वावलंबनासाठी बचत गट

स्थापन केले आहेत. तसेच भूकंप, महापूर अशा प्रसंगी वेळोवेळी आपदग्रस्तांना मदत करण्यात तालुक्यातील विविध बँकांच्या शाखा अग्रभागी राहिल्या आहेत.

बार्शी तालुक्याच्या आर्थिक विकासामध्ये राष्ट्रीयीकृत बँकाबरोबरच सहकारी बँकांचाही मोलाचा वाटा आहे. सदर तालुक्यामध्ये सहकारी बँकेच्या सर्वाधिक शाखा ग्रामीण भागामध्ये स्थिरावल्या आहेत. या शाखांनी प्रामुख्याने ग्रामीण भागातील तळागाळाचा घटक असलेल्या माणसाला आपला केंद्रबिंदू बनविले आहे. शासनाच्या विविध योजनांतून दुर्बल घटकाला वित्तपुरवठा केला आहे. तालुक्यामध्ये सहकारी बँकेमध्ये ' सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँके ' च्या सर्वाधिक शाखा आहेत. तालुक्यामध्ये या बँकेची पहिली शाखा ' वैराग ' येथे इ. स. १९५८ स्थापन झाली. त्यानंतर इ. स. २०११ अखेर या तालुक्यामध्ये या बँकेच्या २६ शाखा स्थापन झाल्या. तालुक्यामध्ये फार मोठे सहकारी उद्योग नसल्यामुळे कर्जवाटपामध्ये सहकारी सोसायट्यांच्या माध्यमातून तसेच इतर विविध योजनांच्या माध्यमातून शेतकरीच अग्रभागी होता. यामुळे खऱ्या अर्थाने शेतीच्या विकासाला चालना मिळाली. सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या पूर्वीच इ. स. १९०६ मध्ये मूहूर्तमेढ रोवलेल्या " बार्शी सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक " चे कार्य खूपच गौरवास्पद आहे. या बँकेने केवळ तालुक्यालाच नव्हे तर संपूर्ण सोलापूर जिल्ह्याला तसेच जिल्ह्याच्या बाहेरही वित्तपुरवठा केला होता. याशिवाय सांगली नागरी सहकारी बँक, सोलापूर जनता सहकारी बँक, पंढरपूर नागरी सहकारी बँक या बँकेच्या बार्शी तालुक्यातील शाखांनी तालुक्याच्या आर्थिक विकासामध्ये मोलाची भर घातलेली आहे. हे करत असताना आपल्या सामाजिक जबाबदारीचेही भान ठेवलेलेआहे. या बँकांनी तालुक्यातील छोटया-मोठ्या उद्योग-व्यवसायाला सोन्याचे दिवस आणले.

बार्शी तालुक्याच्या अर्थकारणामध्ये उद्योग व विविध व्यवसाय यांना अतिशय महत्वाचे स्थान आहे. सदर तालुका जरी शेतीप्रधान असला तरी येथील उद्योगधंदयामुळे तालुक्याची अर्थव्यवस्था समृध्दशाली होण्यास खूप मदत झाली. बार्शी आणि सोलापूर ही जिल्ह्याची दोन टोके असल्यामुळे त्यांचा व्यापार जिल्ह्यासह जिल्ह्याबाहेरील भागांशी मोठ्या प्रमाणावर होता. बार्शी हे मराठवाड्याचे प्रवेशद्वार असल्याने मराठवाड्यातून निर्यात होणारा सर्व प्रकारचा माल व मराठवाड्याला लागणारा सर्व माल त्यांना बार्शीमार्गेच आयात करावा लागत असे. सोलापूर जिल्ह्यातील चार प्रादेशिक जकात नाक्यांपैकी एक जकात नाका बार्शी तालुक्यातील ' कुसळंब ' या ठिकाणी, तर दुसरा जकात नाका बार्शी स्टेशन रोड या मार्गावर ' पापनस ' या ठिकाणी होता. हे तालुक्याच्या व्यापारी व आद्योगिक समृध्दीचे द्योतक आहे.

फार पूर्वी पासूनच बार्शीची ओळख ही एक व्यापारी पेठ म्हणून होती. बार्शीच्या व्यापारी पेठेने केवळ देशातीलच नव्हे, तर परदेशातील व्यापाऱ्यांनाही आकर्षित केले होते. येथे कापसाचा व्यापार फार

मोठ्या प्रमाणामध्ये चालत होता. यातूनच येथे जिनिंग व प्रेसिंग कारखाने सुरू झाले. पुढे सूत व कापड गिरण्यांची सुरूवात झाली. मात्र बार्शी लाईट रेल्वेमुळे बार्शीच्या औद्योगिक विकासाला खऱ्या अर्थाने गती मिळाली. बार्शीची डाळ संपूर्ण भारतामध्ये विशेषत: दक्षिण भारतामध्ये खूप प्रसिध्द आहे. इ. स. १९८९-९० अखेर तालुक्यामध्ये २२ डाळ कारखाने कार्यरत होते. जिल्ह्यातील सूत उद्योगाची बार्शी आणि सोलापूर ही प्रमुख केंद्रे होती. या उद्योगांतर्गत तालुक्यामध्ये असलेल्या लोकमान्य सूत गिरणी, जय शंकर सूत गिरणी व राजन कापड व सूत गिरणी या तीन गिरण्या होत्या. या गिरण्यांनी बार्शीच्या औद्योगिक परंपरेत लक्षणीय भर घातली. या गिरण्यांनी केलेले सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक कार्य महत्वाचे आहे. इ. स. १९९० पूर्वी तालुक्यामध्ये एकमेव असलेल्या भोगावती सहकारी साखर कारखान्याची स्थापना, सोलापूर व उस्मानाबाद अशा दोन जिल्ह्यातील आठ तालुक्यांच्या परिसरातील सुमारे ३०० गावांचे कार्यक्षेत्र व्यापले होते. प्रत्यक्ष गाळपास झालेला विलंब व अवर्षणग्रस्त स्थितीमुळे कारखाना सातत्याने बंद राहील्याने या कारखान्यावरील कर्जाचा बोजा सातत्याने वाढला होता. अशा अवस्थेतही या कारखान्याने आपली सामाजिक बांधिलकी जोपासली. तालुक्यातील तेल उद्योगाला समृध्दशाली परंपरा लाभलेली आहे. इ. स. १९९० अखेर बार्शी तालुक्यामध्ये एकूण २० ऑईल मिल्स चालू होत्या. याशिवाय तालुक्यातील लाकूड उद्योग, दोरखंड उद्योग, कातडी उद्योग, गूळ उद्योग, विडी उद्योग, पांढरा कोळसा निर्मिती उद्योग, पी. व्ही. सी पाईपचे उद्योग अशा उद्योगांनी तालुक्याच्या आर्थिक विकासात आपापल्या परिने भर घातली. या उद्योगामुळे तालुक्यामध्ये फार मोठ्या प्रमाणामध्ये रोजगार निर्मिती झाली. विचारांचे आदानप्रदान होऊ लागले. विविध जातीधर्माचे लोक एकत्र काम करू लागले. या उद्योगामुळे सामाजिक व धार्मिक विषमता कमी होण्यास मदत झाली. तालुक्याच्या वाहतूक क्षेत्रामध्ये झपाट्याने विस्तारले. पूरक व्यवसायांना प्रोत्साहन मिळाले. या सर्वांतून बार्शी तालुक्याच्या आर्थिक विकासाला कमालीची गती मिळाली.

संशोधनाचे निष्कर्ष

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ते इ. स. १९९० पर्यंतच्या कालखंडात बार्शी तालुक्याचा शेती, कृषी उत्पन्न बाजार समिती, प्राथमिक सहकारी शेती संस्था, बँका व विविध उद्योगधंदे यांच्या माध्यमातून जो आर्थिक विकास झाला त्याचे विश्लेषण करताना पुढीलप्रमाणे निष्कर्ष काढता येतात.

